


# मद्रासची मराठी हस्तलिखिते

गव्हर्नमेंट ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्टस लायब्ररी,
मद्रास येथील मराठी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची

संपादक डॉ. वसंत स. जोशी



राज्य मराठी विकास संस्था
मुंबई ४०० ००१

# मद्रासची मराठी हस्तलिखिते

गव्हर्नमेंट ओरिएन्टल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररी
चेन्नई (मद्रास)

येथील मराठी हस्तलिखितांची
वर्णनात्मक सूची

टी. चंद्रशेखरन, एम. ए., एल. टी.

मराठी अनुवाद
प्रा. डॉ. अरविंद वामन कुळकर्णी

संपादक
डॉ. वसंत स. जोशी

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई– ४००००१.

**मद्रासची मराठी हस्तलिखिते**
**दक्षिण भारतातील मराठी साहित्याचा इतिहास :**
**प्रकल्प : प्रकाशन क्र. २**

□

प्रथमावृत्ती : नोव्हेंबर १९९६

□



□

प्रकाशक :
प्रशासन अधिकारी
राज्य मराठी विकास संस्था
३ महानगरपालिका मार्ग
मुंबई-४०० ००१.

□

अक्षरजुळणी :
एच्. एम्. टाइपसेटर्स
हेमंत प. जोशी
११२० सदाशिव पेठ
निंबाळकर तालीम चौक
पुणे ४११ ०३०

□

मुद्रक :
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड,
प्रभादेवी मुंबई-४०० ०२५

□

मूल्य : रु. १५०/-

---

पत्रव्यवहार आणि अधिक माहिती यांसाठी संस्थेचा पत्ता :
Curator, Govt. Oriental Manuscripts Library, Madras University Campus, Madras-600 005

---

# A DESCRIPTIVE CATALOGUE

OF THE

# MARATHI MANUSCRIPTS

IN THE

## GOVERNMENT ORIENTAL MANUSCRIPTS LIBRARY, CHENNAI (MADRAS)

BY

**T. CHANDRASEKHARAN,** M. A., L. T.

*Curator, Government Oriental Manuscripts Library, Madras*

*(Prepared under the orders of the Government of Madras)*

**Volume I**

**(D. Nos. 1 to 308)**

# अनुक्रमणिका

# निवेदन

'दक्षिण भारतातील मराठी साहित्याचा इतिहास' या संशोधन प्रकल्पाची आखणी करताना माझ्या आणि डॉ. वसंत जोशी यांच्या डोळ्यांपुढे प्रामुख्याने तंजावर येथील सुप्रसिद्ध 'सरस्वती महाल' हे ग्रंथालय व त्यातील हस्तलिखितांची मौलिक संपदा होती; परंतु कामाची सुरुवात झाली आणि तंजावरच्या वाटेवरच असणारी आणखीही काही महत्त्वाची ग्रंथालये आम्हांला खुणावू लागली. तेथील हस्तलिखितांची माहिती या प्रकल्पाच्या अंतर्गतच अभ्यासकांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे असेही ध्यानात आले. या जाणिवेतूनच यापूर्वी आम्ही 'त्रिवेंद्रमची मराठी हस्तलिखिते' या शीर्षकाची एक सूची वाचकांच्या हाती ठेवलेली आहे आणि आज 'मद्रासची मराठी हस्तलिखिते' ही दुसरी वर्णनात्मक सूची अभ्यासकांना उपलब्ध करून देत आहोत.

सूची हे साधन आहे, साध्य नाही याची आम्हांला जाणीव आहे; परंतु हे साधन हाती आल्याखेरीज पुढील वाटचाल योग्य रीतीने करणेही शक्य नसते हे जाणकार ओळखतातच.

एखाददुसरा अपवाद वगळता या सूचीत नोंदलेली हस्तलिखिते इतिहास व वाङ्मय क्षेत्रातील अभ्यासकांनी अद्याप न पाहिलेली आहेत. त्यांच्या परिशीलनाने या दोन्ही अभ्यासक्षेत्रांवर नवा प्रकाश पडण्यास बरेच साहाय्य होणार आहे.

ग्रंथसंग्राहक कर्नल मॅकेंझीच्या मनात असणारी इतिहासाबद्दलची ज्ञानलालसा आणि त्यासाठी त्यांच्या जीवनात त्यांनी दाखविलेली परिश्रमशीलता आपल्याला विस्मित करणारी आहे. मराठीच्या अभ्यासकांना अशा व्यक्तींच्या जीवनकार्याचा परिचय होणेही आवश्यक आहे. त्यासाठी प्रा. म. श्री. माटे यांनी कर्नल मॅकेंझींची आणि या सूचीतील महत्त्वाच्या साहित्याची थोडक्यात ओळख प्रारंभी करून दिली आहे.

मद्रासच्या ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररीला भेट देणे हा अनुभव मला आणि डॉ. वसंत स. जोशी— दोघांनाही अतिशय स्फूर्तिदायक वाटला. प्राचीनांच्या ज्ञानलालसेचे आणि कलाप्रेमाचे प्रतीक असणारे ताडपत्रांवरील हजारो ग्रंथ तेथे आपल्याला पाहायला मिळतात. काळाच्या ओघात बऱ्याच गोष्टी नाहीशा झाल्या आहेत, पण मानवी परिश्रमशीलतेने बऱ्याच टिकवून ठेवलेल्या आहेत हेही लक्षात आले. अभ्यासकांनी या सर्वांचा पुरेपूर उपयोग मात्र करून घ्यायला हवा. अशा संस्थांच्या अस्तित्वाची कृतार्थता त्यातच आहे. त्या संदर्भात डॉ. वसंत स. जोशी यांनी या ग्रंथालयाचा करून दिलेला सविस्तर परिचय अभ्यासकांना विशेष उपयुक्त वाटेल.

मराठीचे जुने-नवे अभ्यासक ह्या सूचीचा उपयोग करतील अशी अपेक्षा मी करते.

**सरोजिनी वैद्य**

आमचे 'सूची'च्या मुद्रणाचे काम पूर्ण होत आले असतानाच मद्रास शहराला चेन्नई हे नाव अधिकृत रीतीने देण्यात आले आहे; म्हणून प्रारंभीच्या पृष्ठावर 'चेन्नई' असा उल्लेख केलेला आहे.

# PREFACE

*Integration of India is possible only if regional languages are given due respect. So in order to achieve unity in diversity, languages like Tamil, Marathi, etc. should be not only postered but also developed in sincere terms. In this line, the endeavour of Rajya Marathi Vikas Samstha in translating English Catalogues published by us into Marathi should be highly appreciated.*

*But for the efforts of Dr. Sarojini Vaidya, Director, Dr. Vasant S. Joshi, Editor, this translation would not have become so successful.*

*In Govt. Oriental Manuscripts Library we are preserving 956 Marathi manuscripts. 'Modi' was the script used to write Marathi documents in those days. It has been said that one Hemadu Panth developed this Modi script during the Rama Deva Yadav's rule of Devagiri (present Dowladabath) in 12th A. D. I understand that Thirupathi Devasthanam (A. P.) has attempted to certain extent to translate some volumes of our 'Modi' Manuscripts.*

*Govt. Oriental Manuscripts Library, which was started in 1869, has published two catalogues of Marathi MSS. The Vol. I was published in 1953 and Vol. II was in 1958. Apart from those, Govt. Oriental Manuscripts Library has published an alphabetical and subject Index of Marathi Manuscripts (1949).*

*'Poonapet Kaifyat', 'Bhonsle and Peswa's Bakhar' are the two prestigious Marathi publications of Govt. Oriental Manuscripts Library. It may be mentioned that all the Marathi MSS of Govt. Oriental Manuscripts Library had been collected by Colonel Colin Mackenzie (1754-1821).*

**- Dr. S. Soundarapandian,**
M. A., M. A., B. Ed., Dip. Skt., Ph. D.,
Curator
Govt. Oriental Manuscripts Library
Madras- 600 005

# परिचय

प्रस्तुत ग्रंथात तीन गोष्टींचा समावेश केलेला आहे. मद्रासच्या शासकीय प्राच्यविद्या संग्रहालयातील मराठी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची हा त्यातला आकाराने व उपयुक्ततेने मोठा व महत्त्वाचा भाग. दुसऱ्या भागात काही ऐतिहासिक आज्ञापत्रे, पत्रे, सनदा अशांसारखे कागद— अशा कागदांची माहिती— आहे आणि तिसऱ्या भागात हस्तलिखित ग्रंथांची यादी आहे. मूळ हस्तलिखितांची सूची मद्रास शासनाने १९५३ मध्ये प्रसिद्ध केली, तिचा मराठी अनुवाद येथे दिलेला आहे.

ज्ञानाचे, नव्या माहितीचे पत्ते माहीत होणे ही संशोधनाच्या, अध्ययनाच्या क्षेत्रातील अगदी प्राथमिक परंतु नितांत गरजेची, आवश्यक अशी पायरी आहे. महाराष्ट्रापासून आता दूर, परंतु दोन-एकशे वर्षांपूर्वी खूपच जवळ असलेल्या एका प्रदेशातील ज्ञानाच्या साधनांचे पत्ते मराठी अभ्यासकांपर्यंत पोचविण्याचे फार महत्त्वाचे काम या सूचीने केले आहे. पहिल्या भागात तीनशे आठ 'कैफियतीं'ची माहिती वाचायला मिळते. 'कैफियत' या फारशी शब्दाचा अर्थ 'अथपासून इतिपर्यंत माहिती, हकीकत' असा आहे; तेव्हा हा अनेक हकीकतींचा संग्रह आहे.

निरनिराळ्या ठिकाणांहून आणि माणसांकडून एकत्र करण्यात आलेल्या अशा कैफियती एकाच विषयासंबंधी किंवा एकाच काळासंबंधी असतील अशी अपेक्षा करणे अवास्तव ठरते. विशेषतः हा संग्रह करणारा माणूस जर मोठा चौकस, जिज्ञासू आणि काहीसा छांदिष्ट असेल तर असा संग्रह म्हणजे 'विविध-विषय-भांडार' याच स्वरूपाचा होणे अपरिहार्य ठरते. म्हणून सूचीतील हस्तलिखितांचा परिचय करून घेण्यापूर्वी ह्या संग्राहकाची थोडी माहिती मनोरंजक व उपयुक्त ठरणार आहे. या संग्राहकाचे नाव कर्नल कॉलिन मॅकेंझी.

या संग्रहातील बव्हंशी हस्तलिखिते मॅकेंझी यांनी गोळा केलेली आहेत, तर काही टेलर यांनी.

मॅकेंझी हा स्कॉटलंडमधील तरुण, गणिताची विशेष रुची असणारा. अभ्यास करताना त्याला समजले की गुणाकार-भागाकार सुलभ करणारी जी कोष्टके (logarithm) त्याला उपलब्ध होती त्यांचे जनक हे प्राचीन भारतातील गणितज्ञ होते. याचा आणखी शोध घेण्यासाठी वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी कस्टम खात्यातली नोकरी सोडून त्याने हिंदुस्थानचे जहाज पकडले. मद्रासच्या किनाऱ्यावर १७८२ च्या आसपास तो उतरला, तेव्हा त्याच्याकडे नव्हती नोकरी ना व्यापारात जम. होती जबरदस्त जिज्ञासा आणि प्रचंड आत्मविश्वास. या ऐन उमेदीच्या तरुणाला ईस्ट इंडिया कंपनीने लष्करात दाखल करून घेतले आणि आपल्या लष्करी व्यवसायात तो एक शूर व हुन्नरी सेनानायक म्हणून प्रसिद्धीस आला. लष्करात असतानाच म्हैसूर-कर्नाटक या भागाचे प्रमाणशीर नकाशे तयार करण्याचे काम त्याच्याकडे सोपविण्यात आले आणि ते त्याने इतक्या चोखपणे पार पाडले की पुढे सबंध देशाचे नकाशे तयार करण्याच्या यंत्रणेवर 'सर्वेअर जनरल' म्हणून त्याची नेमणूक झाली.

नकाशे करण्यासाठी जे सर्वेक्षण करावे लागले त्या निमित्ताने हा सगळा प्रदेश त्याने पायाखाली घातला आणि त्याच्या असे ध्यानात आले की भारत हा केवळ गणिताचा देश नाही. इथे इतिहास, संस्कृती, धर्म यांच्या अभ्यासकाला अगणित संपत्ती उपलब्ध आहे. एकीकडे आपला व्यवसाय सांभाळत असताना या संपत्तीचे इतस्ततः विखुरलेले कण गोळा करण्याचा उद्योग त्याने सुरू केला (१७९६). देवळांची, श्रवण-बेळगोळ येथल्यासारख्या मूर्तींची वर्णने, मोजमापे लिहून ठेवणे हा या उद्योगाचा एक भाग झाला. त्यापेक्षा कित्येक पट महत्त्वाची कामगिरी म्हणजे साधन-संग्रह. १८१५ पर्यंत त्याने १५६८ हस्तलिखित ग्रंथ, ६२१८ नाणी,

३००० ताम्रपट आणि ८०७६ शिलाशासनांचे ठसे किंवा नकला जमा केल्या ! देवळांची, मूर्तींची २६१० चित्रे ही त्याशिवाय. जेथे मूळ कागद हाती येण्याची शक्यता नसेल तेथे त्याच्या नकला करवून घेतल्या. हा उद्योग त्याने स्वतःची पदरमोड करून केला होता हे ध्यानात ठेवायला हवे.

१८२१ मध्ये मॅकेंझीचा मृत्यू झाला आणि त्याच्या संग्रहाची विभागणी मद्रास, कलकत्ता, लंडन अशा तीन ठिकाणी झाली. परंतु या संग्रहाचे महत्त्व स्पष्टच असल्याने रॉयल एशियाटिक सोसायटीचे विल्सन यांनी १८२८ मध्ये पहिली सूची प्रसिद्ध केली. मद्रासचा बराच मोठा संग्रह तसाच पडून होता. त्याची वर्णनात्मक सूची करण्याचे काम ईस्ट इंडिया कंपनीने मॅकेंझीसारख्याच एका कलंदर माणसाकडे सोपविले; त्याचे नाव रेवरंड विल्यम टेलर. टेलर याने याआधीच प्राचीन इतिहाससंबंधी तमिळ भाषेतील हस्तलिखिते जमविली होती आणि त्यांचे सटीक भाषांतर १८३५ मध्ये प्रसिद्धही केले होते. पुढे १८५० ते १८६२ या काळात तीन खंडांत सूची प्रसिद्ध केली, त्यात मॅकेंझीच्या संग्रहाबरोबर त्याच्या संग्रहाचाही समावेश होता. प्रस्तुत सूचीत मॅकेंझीशिवाय टेलरने जमविलेल्या संग्रहाची नोंद आहे.

मॅकेंझी हा गणिती, मापनशास्त्रज्ञ, शिपाईगडी तर टेलर हा धर्मगुरू— दोघांत समान होती प्रचंड जिज्ञासा, चौकस वृत्ती. त्यामुळे त्यांच्या संग्रहात अपरंपार वैविध्य आले आहे. काही हस्तलिखितांची थोडीशी ओळख करून घेतली तरी या सूचीची उपयुक्तता किती निरनिराळ्या विद्याशाखांच्या अभ्यासकांना आहे याची साक्ष पटेल.

'अनेगोंदी कैफियत' (डी-१) ही अनेगोंदीच्या विरूपाक्ष मंदिरातील एका शिलासनाची नक्कल व अनुवाद आहे. हरपनहळ्ळी गावच्या रामय्यै नावाच्या ब्राह्मणाने १८०७ मध्ये ती करून दिली. बहादुरशहा या मोगल सम्राटाच्या फौजेने अनेगोंदीला वेढा दिला त्या प्रसंगी अनेगोंदीचेच काही अधिकारी फितूर झाले होते. पण त्याची माहिती राजाशी एकनिष्ठ असणाऱ्या सेवकांनी त्याला दिल्यामुळे त्याला उपाययोजना करता आली. अशा तऱ्हेची माहिती यात आहे. 'पुणे कैफियती'त (डी. १२६) शिवाजी महाराजांपासून पेशवाईच्या अखेरपर्यंतची हकीकत काहीशा त्रोटक स्वरूपात दिलेली आहे. 'अहमदनगरची कैफियत' (डी. ८) ही व्यक्ती व काल यांचा घोटाळा केल्यामुळे अनैतिहासिक ठरली तरी नगराची स्थापना, त्यातील इमारती यांची माहिती बरोबर आहे.

'हसन गंगु बाईमाम' (डी. २९१) ही कैफियत म्हणजे दखखनच्या बहमनी सुलतानांची हकीकत आहे, तर डी. १५८ या कैफियतीत भोसले घराण्याचा संपूर्ण वृत्तांत आहे.

डी. १७१ क्रमांकाच्या कैफियतीत महाराष्ट्रातील पंचद्रविड ब्राह्मणांच्या चालीरीती, कुलाचार यांची माहिती आहे. कैफियतीचा शेवट असा आहे : "ब्राह्मणाचे घरीचे मुलीस वरहाड करून घेतात. परंतु त्याचे मुलीस चितपावन ब्राह्मणास देत नाहीत. वरकड गोरगरीब आपल्यास त्या गोत्रातच समध करितातीं." अशा सामाजिक समजुती, ग्रह यांची माहिती आणखीही अनेक कैफियतींत आहे.

याशिवाय एकेकच महत्त्वाची ऐतिहासिक घटना घेऊन तिची माहिती काही कैफियती देतात. मराठी इतिहासात अशा दोन घटना म्हणजे तालिकोटची लढाई आणि पानिपतचा संग्राम. तालिकोटच्या लढाईमुळे विजयनगर साम्राज्य मोडून गेले, तर पानिपतमुळे मराठी साम्राज्याला उतरती कळा लागली. तालिकोटचे वर्णन क्र. डी. ५ मध्ये तर पानिपतचे डी. १२१-१२२ मध्ये आढळते.

डी. १५ ही कैफियत बरीचशी निराळी आहे. यामध्ये अहमदनगर, औरंगाबाद, जालना आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतील शेतकी महसूल, महसुलाच्या वसुलीची व्यवस्था, महसुलाचे एकूण उत्पन्न या सगळ्याचा तपशील आहे. आणखी एक निराळ्या स्वरूपाची कैफियत डी. ३२५ ही आहे. औरंगाबादेपासून अहमदनगरपर्यंतच्या प्रवासात लागणाऱ्या स्थलविशेषांची ही नोंद आहे; म्हणजे ही भौगोलिक स्वरूपाची आहे.

एकाएका तीर्थस्थानाचे वा देवालयाचे माहात्म्य काही कैफियती सांगतात. 'कपिस्थल कैफियती'त (क्र. डी. १८) तंजावर सुभ्यातील तिरुवैय्यार येथील वरदराजस्वामी मंदिरासंबंधी प्रचलित असणारी आख्यायिका आहे. डी. ८८ या कैफियतीत तिरुपतीच्या देवस्थानचे वर्णन आहे. मंदिरासमोर असणारे मंडप, ते बांधविणाऱ्यांची नावे, श्री वेंकटेश्वराची निघणारी मिरवणूक व त्यासाठी वापरण्यात येणारी वाहने यांची नोंद यात आहे.

थोडक्यात इतिहास, भूगोल, सामाजिक स्थिती, शासनव्यवहार, देवस्थाने यांपैकी कोणतीही गोष्ट हा संग्रह करणाऱ्याच्या नजरेतून सुटलेली नाही. राहतो तो प्रश्न असा की, या कैफियतीत आलेली माहिती कितपत विश्वसनीय व साधार आहे ! बऱ्याच कैफियतींत नक्कल करणाऱ्याचे नाव, केव्हा केली ते वर्ष यांचे उल्लेख असले तरी मूळ लेखकाचे नावगाव, त्याचा काळ यांची मात्र माहिती नाही.

वस्तुतः सर्वच बखर वाङ्मयासंबंधी हा आक्षेप घेण्यात येतो. तरीही बखरी (आणि या कैफियती) पूर्णत्वे टाकाऊ वा निरर्थक म्हणता येणार नाहीत. सर्वसाधारण सुशिक्षित माणसाला, मूळ घटनेनंतर शे-दोनशे वर्षांनी नेमकी कशाची स्मृती राहिली होती, कोणत्या परंपरा व समजुती त्याच्यापर्यंत येऊन पोचत्या होत्या याची साक्ष म्हणजे बखरी किंवा कैफियती. काही ठळक तथ्ये तपासून घेण्याचे आणखी एक साधन म्हणूनही त्यांचा उपयोग होतो, पण अभ्यासकाला नीरक्षीर याचे भान जास्त सावधपणे ठेवावे लागते.

दुसऱ्या भागात आज्ञापत्रे, पत्रे, सनदा यांच्या नकलांचा संग्रह आहे. चार-दोन कागदांवर शिक्के असले तरी ते कोणाचे याचा उल्लेख मूळ संपादकाने केलेला नाही. बरीच सनदापत्रेही थोरल्या माधवरावाच्या काळातली किंवा त्याने जारी केलेली आहेत. तर काही हैदराबादच्या निजामाच्या राजविटीतील. विशिष्ट व्यक्ती वा देवस्थाने यांना दिलेल्या जमिनी किंवा लावून दिलेली उत्पन्ने अशी ही दानपत्रे आहेत. ज्याला दान दिले असेल त्याला ते कशासाठी दिले आहे, त्याबद्दल त्याने सरकारात कोणते नजराणे (पेशकश) भरायचे वा पट्ट्या द्यायच्या यांचा तपशील बहुतेक आज्ञापत्रांत आहे. पुलिवेंडल गावचा रहिवासी अवधानी भीमाचारी याला मलाई खेड्यातली जमीन 'श्रोत्रीय' कराराने दिली आहे. दुसऱ्या एका आज्ञापत्रात गूर्मकोंडा येथील नरसिंहस्वामीच्या देवालयाला दैनंदिन पूजाअर्चेच्या खर्चासाठी पूर्वी दिलेली जमीन देवस्थानाकडे कायमची देण्यात आल्याची आज्ञा आहे. डी.३३० या आज्ञापत्रात रायकोटी जिल्ह्याच्या सुभेदाराला असा हुकूम आहे की, तालुक्यातले जकातीचे उत्पन्न तालुक्यातील सर्व मशिदी व दर्गे यांत दिवे लावण्यासाठी वापरावे. डी. ३१८ क्रमांकाच्या पत्रात, ज्यातून उत्पन्न मिळायचे त्या जमिनीचा मगदूर आणि पुढील काही वर्षांत येण्यासारख्या उत्पन्नाचा तक्ता दिला आहे. डी.३१२ या पत्रात, "कदरी तालुक्यातील प्रजेकडून साजऱ्या होणाऱ्या प्रत्येक विवाहामागे एक रुपया" वसूल करण्याचा अधिकार देवालयाच्या व्यवस्थापकांना दिला आहे. माधवराव पेशव्याच्या आज्ञापत्रात ज्या प्रदेशांचा उल्लेख आहे ते कर्नाटक, आंध्र, तमिळनाड भागातले आहेत हे आवर्जून ध्यानात घेण्याजोगे आहे. कागद मूळचे— अस्सल— नसले तरी त्यांतील भाषा, दानाची व वसुलीची व्यवस्था इत्यादी बाबी पेशवेकालीन कागदांशी मिळत्या-जुळत्या आहेत, म्हणून या नकला विश्वसनीय मानायला हरकत नाही.

तिसऱ्या भागात मद्रास संग्रहालयातील जवळपास दीडशे हस्तलिखितांची यादी देण्यात आलेली आहे. त्यात मूळ लेखकाचे नाव, नक्कलकाराचे नाव, काळ, वर्ण्य विषय यांची नोंद आहे.

प्रास्ताविकाचा शेवट मॅकेंझी व त्याच्यासारखे संग्राहक, संशोधक यांना वंदन करूनच करता येईल. सर विल्यम जोन्स, प्रिन्सेप, हॉजसन, टॉड अशी कितीही नावे घेतली तरी पुरे होणार नाहीत. यांच्यापैकी कोणीही रूढ अर्थाने इतिहास-संशोधक नव्हता, यांपैकी कोणाचीही संशोधनाच्या कामावर नेमणूक झाली नव्हती. प्रत्येकाला

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

- [illegible]
- [illegible]
- [illegible]

# प्रस्तावना

मद्रास विद्यापीठाच्या आवारात असणारे 'गव्हर्नमेंट ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररी' हे ग्रंथालय म्हणजे संस्कृत, तमिळ, तेलगू, मराठी आदी भाषांतील प्राचीन साहित्याचा शोध घेणाऱ्या संशोधकांचे एक तीर्थक्षेत्र आहे. मद्रासमधील वास्तव्यात मी दोन दिवस या ग्रंथालयात जात राहिलो. ग्रंथालय शासकीय असले तरी माझ्यासारख्या दूरच्या महाराष्ट्रातून आलेल्या जिज्ञासूला सहकार्य देण्यातील तेथील तत्परता मनाला दिलासा देते. मद्राससारख्या तमिळ भाषिक प्रदेशात मराठी भाषेतील तीनशेहून अधिक हस्तलिखितांचा संग्रह व्यवस्थित जपून ठेवलेला असावा आणि त्यातील काही ग्रंथांचे मुद्रणही झालेले असावे, ही गोष्ट मराठी मनाला आनंददायक आहे.

या ग्रंथालयाचे क्युरेटर आहेत डॉ. एस. सौंदरापंडियन. त्यांनी ख्रिस्ती साहित्यावर पीएच. डी. पदवी मिळवली आहे. येणाऱ्या संशोधकांना तिथली संशोधन साधने व्यवस्थित मिळावीत असा त्यांचा प्रयत्न असतो. त्यासाठी त्यांनी हस्तलिखितांची टंकलिखित वर्गवारी करून घेतली आहे. मराठी साहित्य आणि महाराष्ट्र यांविषयी त्यांना जिज्ञासा दिसली.

## तंजावरी मराठीचा प्रभाव

या ग्रंथालयात पूर्वी के. तुलजाराम नावाचे मराठी पंडित काम करीत होते. त्यांचे उपनाम क्षीरसागर. त्यांनी या ग्रंथालयातील मराठी हस्तलिखितांची बयाजवार यादी करणे, मोडीतील ग्रंथांचे देवनागरीत लिप्यंतर करून ते प्रसिद्ध करणे, त्यांची माहिती देणे इत्यादी कामे चांगल्या प्रकारे केलेली दिसली. तंजावरी मराठीचा प्रभाव त्यांच्या लेखनावर दिसतो. ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांची जागा— मराठी पंडिताची— अद्यापि भरलेली नाही. तथापि या ग्रंथालयात मिसेस एस. राजलक्ष्मी, एम. ए. या संस्कृत पंडिता म्हणून काम करतात. त्यांनी मला खूप मदत केली. बऱ्याच वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध संशोधक अ. का. पियोळकर यांच्या एका लेखात या ग्रंथालयाचा उल्लेख वाचल्याचे स्मरणात होते. त्यामुळे मद्रासला गेल्यानंतर ते पाहण्याचा निश्चय मी मनाशी केला होता. तेथे गेल्यानंतर स. १८०५ मधील मराठीतील पहिल्या व्याकरणाच्या मोठ्या आकाराच्या पुस्तकाच्या प्रारंभी त्या व्याकरणाची इंग्रजीमध्ये थोडक्यात माहिती देणारे प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांचे टिपण पाहावयास मिळाले. याखेरीज अन्य कोणा मराठी वाचकांची किंवा संशोधकांची वर्दळ तेथे आढळली नाही.

तंजावरमधील सरस्वती महाल लायब्ररी आणि मद्रासमधील ही ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररी तमिळनाड शासनाच्या अखत्यारीत आहेत. साहित्य, चित्र, शिल्प, संगीत, नृत्य इत्यादी कलांशी संबंधित वस्तूंची मोठमोठी संग्रहालये दक्षिणेतील राज्यांतून आढळतात. आपला सांस्कृतिक वारसा त्यांनी काळजीपूर्वक जपून ठेवला आहे. देशी-परदेशी जिज्ञासूंचे ते एक महत्त्वाचे आकर्षण ठरले आहे. त्यासाठी आवश्यक त्या व तशा इमारती आणि सेवकवर्ग यांची तरतूदही त्यांनी केली आहे.

## जिज्ञासेपोटी

मद्रासच्या 'गव्हर्नमेंट ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररी'चा इतिहास उद्बोधक आहे. एकोणिसाव्या

शतकात साऱ्या भारतभर पसरलेल्या इंग्रज शासकीय अधिकाऱ्यांची ज्ञानपिपासा आणि त्यासाठी अपार कष्ट घेण्याची तयारी कौतुकास्पद होती. या जिज्ञासेपोटीच इथला इतिहास, भूगोल, भाषा, साहित्य, विज्ञान, तत्त्वज्ञान आदी विषयांचे ज्ञान त्यांनी करून घेतले. या विषयावरील हस्तलिखिते मिळविली किंवा त्यांच्या प्रती तयार करवून घेतल्या, टिपणे काढली, त्यांचा मोठा संग्रह केला. मद्रासच्या प्रस्तुत ग्रंथालयातील हस्तलिखितांचा प्रचंड संग्रह हा सुद्धा कर्नल कॉलिन मॅकेंझी, डॉ. लेडन आणि मि. सी. पी. ब्राउन या अधिकाऱ्यांच्या परिश्रमांचे फलित आहे. काही ताम्रपट, शिलालेख आणि कैफियती यांचीही उपलब्धी त्यांच्या शोधयात्रेत झाली. त्यांचाही संग्रह येथे करण्यात आला आहे.

कर्नल मॅकेंझी हा ईस्ट इंडिया कंपनीच्या मद्रास भागातील आस्थापनेत इंजिनियरिंग विभागातील कामासाठी सन १७८२ मध्ये भारतात आला. प्राचीन भारतीय गणितशास्त्र— विशेषतः लोगॅरिथम आणि प्राच्य विद्या-अभ्यासात त्याने विशेष लक्ष घातले. साहित्य, धर्म, लोकांचे रीतिरिवाज यांवर आधारित अशी अनेक हस्तलिखिते, नाणी, शिलालेख, नकाशे यांचा मोठा संग्रह जमविला. केवळ भारताच्या विविध भागांचाच नव्हे तर सिलोन (श्रीलंका) आणि जावा येथील ठिकाणांचाही धांडोळा त्याने घेतला.

सन १८१४ मध्ये भारताचा सर्व्हेअर जनरल म्हणून त्याची कलकत्ता येथे नियुक्ती झाली. त्या वेळी हा विपुल संग्रहही त्याने तिकडे नेला. सन १८२१ मध्ये त्याचे देहावसान झाले. तोपर्यंत या संग्रहात तो सातत्याने भर घालीत राहिला. त्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीने हा संग्रह मिसेस मॅकेंझी यांच्याकडून दहा हजार पौंडांना सन १८२१ मध्ये खरेदी केला. त्याचे तीन भाग केले. त्यांतील एक लंडनमध्ये आणि इतर दोन कलकत्ता व मद्रास येथे पाठविण्यात आले.

### डॉ. लेडनचा संग्रह

डॉ. लेडन हा भाषावैज्ञानिक आणि प्रवासी सन १८०८ ते १८११ या काळात भारतात होता. त्याने जमविलेला तमिळ, तेलगू व कन्नड भाषांतील हस्तलिखितांचा संग्रह लंडनच्या इंडिया ऑफिस लायब्ररीत होता. डॉ. लेडन यांचा संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर खरेदी करून ईस्ट इंडिया कंपनीने इंडिया ऑफिसमध्ये ठेवला होता. सन १८८७ मध्ये इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्ये असलेल्या सी. पी ब्राउन यांच्या निदर्शनास तो आला. त्यांनी प्रयत्न करून तो पुन्हा भारतात आणला. याबद्दल ब्राउन यांना धन्यवादच द्यायला हवेत. सी. पी. ब्राउन यांनी आपला स्वतःचा संस्कृत आणि तेलगू हस्तलिखितांचा मौलिक संग्रह ईस्ट इंडिया कंपनीच्या स्वाधीन केला. तो संग्रह स. १८५५ मध्ये भारतात आणला गेला.

सन १८७० मध्ये मॅकेंझी संग्रह, 'ईस्ट इंडिया ऑफिस' संग्रह आणि ब्राउन संग्रह हे तिन्ही संग्रह मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधील संस्कृतचे प्रोफेसर पिकफोर्ड यांच्या स्वाधीन करण्यात आले होते. महत्त्वाचे साहित्य व कागदपत्रे प्रसिद्ध करण्यासाठी योजना आखण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले. हस्तलिखितांचा शोध घेणे, ती मिळवणे आणि आवश्यक तर खरेदी करणे याही गोष्टी त्यांनी केल्या. त्यानुसार वेळोवेळी अनेक हस्तलिखिते मिळविण्यात येऊन प्रस्तुत संग्रहांत मोलाची भर टाकण्यात आली. भाषावार प्रांतरचनेनंतर यांतील बरीचशी तेलगू, कन्नड आणि मल्याळम हस्तलिखिते आंध्र, कर्नाटक आणि केरळ या राज्यांत पाठविण्यात आली. सध्या या लायब्ररीत ६८००० हस्तलिखितांचा संग्रह आहे. संदर्भासाठी १९००० मुद्रित ग्रंथ उपलब्ध आहेत.

आजही या ग्रंथालयाकडून हस्तलिखितांचा शोध घेणे, संग्रह करणे, महत्त्वाच्या ग्रंथांचे संपादन, मुद्रण करणे ही कामे करण्यात येतात. आजवर असे ३५० ग्रंथ प्रकाशित करण्यात आले आहेत. ग्रंथालयाचे क्यूरेटर व

संबंधित कर्मचारी त्यांचे संपादन करतात. ग्रंथालयामार्फत एक बुलेटिनही प्रसिद्ध करण्यात येते. त्यात विविध भाषांतील हस्तलिखिते प्रकाशित केली जातात. त्यांचे आजपर्यंत एकवीस खंड प्रसिद्ध झालेले आहेत.

कर्नल मॅकेंझी व रेव्हरंड टेलर यांच्या संग्रहातील मराठी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची मद्रासच्या ओरिएंटल लायब्ररीने प्रसिद्ध केली होती. तथापि ती इंग्रजीत असल्याने तिचा मराठी अनुवाद आमच्या 'दक्षिण भारतातील मराठी साहित्याचा इतिहास' या प्रकल्पांतर्गत प्रसिद्ध करण्याचे राज्य मराठी विकास संस्थेने ठरविले. ही सुमारे ४५० पृष्ठांची सूची दोन विभागांत प्रसिद्ध झाली होती आणि तिचा पहिला भाग तर दुर्मिळच झाला होता. त्यामुळे त्याच्या भाषांतराचे कार्य तातडीने हाती घेण्यात आले. ते आता मराठी वाचकांना उपलब्ध होत आहे. या संग्रहात जी हस्तलिखिते आहेत त्यांत विविध विषय सामावलेले आहेत. अभ्यासकांच्या माहितीसाठी त्यांची धावती नोंद येथे करीत आहोत.

## मराठ्यांचा इतिहास

या संग्रहातील दस्तऐवज प्रामुख्याने राजकीय व ऐतिहासिक स्वरूपाचे व मराठ्यांच्या राजकारणाशी निगडित आहेत. कदाचित त्यांच्या मुळातील अध्ययनाने काही नवी माहिती हाती येऊ शकेल. मराठ्यांच्या इतिहासविषयक बखरी, कैफियती पुढीलप्रमाणे आहेत :

डी. नं. ७ मध्ये इंदूरचे होळकर, विश्वासराव पेशवे, नाना फडणवीस यांच्याविषयीच्या नोंदी, डी. नं. १८ मध्ये शिवाजी राजा व निजाम उल्मुल्क यांच्याविषयीची हकीगत, डी. नं. ४९ मध्ये शिवाजी, संभाजी व कापशीकर घोरपडे यांची कैफियत व घोरपडे सोंडूर कैफियत, डी. नं. ५३ मध्ये मराठ्यांचा उदय व इतिहास, सातारच्या भोसल्यांच्या इतिहासावर अधिक भर, तसेच देवगिरी आणि मोडी लिपीचे मूळ सांगितले आहे. पुणे शहर आणि सोबतचा प्रदेश यांची माहिती, घटना व तारखांची नोंद डी. नं. ५५ मध्ये येते. चित्रदुर्ग कैफियत मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची (डी. नं. १११) असून रघुनाथराव, विश्वासराव व नाना फडणवीस यांच्या संदर्भात डी. नं. १२१-१२४ मध्ये पानिपत युद्धाची त्रोटक माहिती मिळते. पुणे कैफियतीत (डी. न. १२४-२५) पुणे शहर, उपनगरे, मंदिरे, महत्त्वाची ठिकाणे, मराठा अधिकारी, त्यांची कामे व किताब, प्रमुख मराठा कुटुंबांचे मूळ व त्यांच्या पूर्वजांचा इतिहास आणि शिंदे, होळकर, पेशवे इत्यादींविषयी माहिती मिळते. डी. नं. १३५ या कैफियतीत शिवाजी महाराजांनी दक्षिणेत केलेल्या राज्यविस्ताराचे वर्णन येते. बडा बल्लापूर कैफियतीत (डी. नं. १४०-१४१) थोरले बाजीराव, तुकोजी पवार, राणोजी वाघ, पिल्लाजी जाधव यांचे पराक्रम आहेत. डी. नं. १५३ मध्ये भाऊगर्दी, पानिपत कैफियत, पानिपत युद्धाचे तपशीलवार वर्णन येते. डी. नं. १५६, १५७ व १५८ मध्ये शिवाजी महाराजांचे जीवन, घराण्याचा इतिहास, वंशावळ इत्यादी येतात. डी. नं. १६३ ही मराठ्यांची बखर म्हणजे ग्रँट डफने लिहिलेला मराठ्यांचा इतिहास होय. मराठी राजे, त्यांची आडनावे, मराठे व पेशवे, मालोजी भोसले यांच्याविषयी डी. नं. १६६ ते १६९ मध्ये व १७३मध्ये माहिती मिळते. डी. नं. २०८ मध्ये राघोबा व सवाई माधवराव यांच्या कारकीर्दी, तर डी. नं. २१२मध्ये मराठ्यांचा इतिहास व शिवाजीचरित्र ही येतात. डी. नं. २४२ मध्ये वेलोरमध्ये मराठ्यांनी बांधलेले किल्ले असून डी. नं. २५०मध्ये शाहजी राजांची कैफियत येते. यात शाहू राजांचे चरित्र, शाहू व निजाम उल्मुल्क यांचे संबंध, शिवाजी वंशावळ व संभाजीची माहिती मिळते. डी. नं. २५९-६० व २६१ मध्ये शिवाजी, संभाजी यांची बखर, तर डी. नं. २७०-७१ मध्ये श्री शिवाजीचरित्र हा संस्कृत शिवभारताचा मराठी अनुवाद ग्रथित केला आहे. अशा प्रकारे विविध कैफियतींतून इतिहाससंशोधकांना मराठ्यांच्या इतिहाससंशोधनास विपुल खाद्य उपलब्ध होण्यासारखे आहे.

### आख्यान-काव्य

प्रस्तुत संग्रहात काही आख्यान-कथा-काव्ये, माहात्म्यवर्णनपर ग्रंथ ही आहेत. पण त्यांची संख्या फार थोडी आहे. काही ग्रंथ असे : विक्रमचरित्र, नलदमयंती चरित्र, रामायण, दमयंती-कथा (डी. नं. १); शिवालयमाहात्म्य, घृष्णेश्वरमाहात्म्य, देवगिरीमाहात्म्य, इंद्रबृहस्पती-कथा, सीतास्वयंवर, अश्वत्थ-वृक्ष-पूजा कथा (डी. नं. १३०); सिंहासनबत्तिशी, सुदामचरित्र, काशीविश्वनाथ कथा (डी. नं. १७३).

### जैन कैफियती

दक्षिण भारतातील जैन धर्माचा प्रसार, तेथील मठ-मंदिरे आणि राज्यकर्ते यांची माहिती देणारे साहित्य या संग्रहाचे वेगळेपण दर्शविते. जैन साहित्याच्या अभ्यासकांना या साहित्याचा अभ्यास उपयुक्त ठरेल.

डी. नं. ६८ ही जैन देशांची कैफियत व जैन मठांची कैफियत असून डी. नं. ४५ या दप्तरात 'जिनदत्तराय कैफियत' समाविष्ट आहे. डी. नं. ९४ मध्ये तोंडरमंडल व कांची कैफियत, जैन धर्मप्रसार व जैन मंदिरे यांची माहिती मिळते. डी. नं. ९६ मध्ये जैन धर्माविषयी माहिती व जैन धर्माचा प्रसार आहे. डी. नं. २१६ या रास्तल बेगमपूर जैन कैफियतीत जैन धर्माची संक्षिप्त माहिती मिळते.

### प्रती व प्रतलेखन

कर्नल मॅकेंझी व रेव्हरंड टेलर या ज्ञानपिपासू इंग्रजांनी आपल्या संग्रहात किती प्रकारांनी भर टाकली हे पाहिल्यास त्यांची जिज्ञासू वृत्ती व परिश्रमशीलता यांचा प्रत्यय येतो. त्यांनी आपल्या पदरी मराठी भाषा आणि मोडी लिपी जाणणारे आनंदराव, नारायणराव रंगाप्पा, वेंकटराव यांसारखे कारकून बाळगले होते. त्यांनी मिळविलेल्या व लिहिलेल्या बखरींची नोंद पुढीलप्रमाणे मिळते : डी. नं. ३ ही अनेगोंदी कैफियत. कर्नल मॅकेंझी हे हस्तलिखित मूळ मालकाकडून मिळवू शकला नाही. ही बखर मिळविण्यासाठी त्याने लष्करी अधिकाऱ्याकडून नबाबास निरोप पाठविला व ती मिळविली. डी. नं. ४ : रेव्हरंड डब्ल्यू. टेलर याच्या आज्ञेवरून केलेल्या नकला. मराठीसाठी रेव्हरंड टेलर यांनी नेमलेल्या वेंकटराव नावाच्या कारकुनाने त्या तयार केल्या आहेत. डी. नं. २० यात कर्नल मॅकेंझी याच्या आज्ञेवरून आनंदरावाने या कैफियतीचे लेखन केले. डी. नं. २६ मध्ये आपल्या उत्तर भारताच्या प्रवासाचा नारायणराव व आनंदराव यांनी तयार केलेला वृत्तांत असून डी. नं. ३१ मध्ये बेलूर येथे राहणाऱ्या शिवाचारी याने दिलेली माहिती मिळते. जुन्या दस्तऐवजांच्या आधारे ही कैफियत तयार केली आहे. डी. नं. ३७ ही 'कोपम् कैफियत' रेव्हरंड टेलर यांच्या सूचनेवरून रंगा नावाच्या प्रतलेखकाने तयार केलेली आहे. डी. नं. ४० ही 'गुजरात प्रांत कैफियत' असून १६ ऑगस्ट १८०६ रोजी पुरी येथे ही बखर पूर्ण झाली. डी. नं. ५३ या वाईकर जोशी यांच्याकडील शके ११५८ च्या दप्तरातून वरील माहिती मिळाल्याचे लेखक सांगतो. डी. नं. ४९, ५० यांमध्ये शके १५३९ मध्ये वर्डसाहेबासोबत नारायणराव होते. त्यांनी सोंडूरची कैफियत मिळवली. डी. नं. ६६ या कैफियतीची कर्नल मॅकेंझीचा कारकून शामराव याने २३ सप्टेंबर १८०७ मध्ये नक्कल केली. डी. नं. ७६ची नक्कल कर्नल मॅकेंझीच्या हाताखालील आनंदराव या अधिकाऱ्याने ताडपत्री येथे मुक्काम असताना केली. डी. नं. १८८ मध्ये उत्तर हिंदुस्थानची यादी आनंदराव यांनी तयार केलेली आहे. डी. नं. २०८ मध्ये राघोबा व सवाई माधवराव यांच्या कारकीर्दी आहेत. तुळजापूरचे रहिवासी चिमणराव व रघुनाथ श्रीनिवासराव यांनी केलेली ही नक्कल असून कर्नल मॅकेंझीच्या विनंतीवरून हा इतिहास भीमराव रंगराव यांनी उतरून घेतला. डी. नं. २२२ ही बखर लोहदंड क्षेत्राची माहिती देते. क. मॅकेंझी याच्या सूचनेवरून मल्हारभट व लक्ष्मण भट या बंधूंनी २७ ऑगस्ट १८०७ रोजी हिची नक्कल पूर्ण केली. डी. नं. २२५ ही

कैफियत म्हणजे अहमदनगरहून औरंगाबादेस जाताना वाटेत दिसलेल्या महत्त्वाच्या ठिकाणांची नारायणराव व आनंदराव यांनी क. मॅकेंझी याला दिलेली माहिती. डी. नं. २३६-३७ मध्ये विश्वासराव-भाऊसाहेबांसंबंधी माहिती मिळते. औरंगाबाद येथील गंगाराम तांबटकर यांच्याकडील दस्तऐवजावरून कर्नल मॅकेंझीसाठी ही नकलली गेली (दि. २९ जानेवारी १८०६). डी. नं. १८८ ही 'वोरंगल कैफियत' वेंकटराव शिरस्तेदार यांनी १० ऑगस्ट १८१५ रोजी तयार केली. या वेळी ते चित्तूर जिल्ह्याचे शिरस्तेदार होते. डी. नं. २४२ ही नारायणरावाने केलेली नक्कल असून डी. नं. २४८ ही 'शालिवाहनाची बखर' म्हणजे पैठणकडील भास्कर भाले यांच्याकडील पोथीवरून केलेली नक्कल. डी. नं. २५४ ही 'शिंदे कैफियत.' पुण्यातील रघुनाथराव नावाच्या एका वृद्धाकडून माहिती मिळवून १० एप्रिल १८०६ रोजी कर्नल मॅकेंझी याला हिची नक्कल पाठविण्यात आली. मॅकेंझीस पुण्यातून बखरींच्या नकला करून पाठविण्यात येत असत. डी. नं. २७०-७१ म्हणजे श्री शिवाजीचरित्राची रेड्डीराव नावाच्या गृहस्थाने २ डिसेंबर १८०२ रोजी केलेली नक्कल आहे. डी. नं. २७५ ही सातारा राजांची कैफियत असून मॅकेंझीसाठी पुण्याचे श्री. देशपांडे यांनी १२ एप्रिल १८०६ रोजी तिची नक्कल केली. डी. नं. २७७, २८१ व २९१ यांचे लेखक अनुक्रमे रघुनाथराव, नारायणराव व वेंकटराव मुनशी हे आहेत.

## इतर माहिती

कर्नल मॅकेंझी व रेव्हरंड टेलर यांच्या संग्रहात केवळ ऐतिहासिक व राजकीय ग्रंथच नाहीत, तर अन्य विषयांवरील पुढील प्रकारचे ग्रंथही आहेत. त्यावरून त्यांच्या अभ्यासक्षेत्राची कल्पना येऊ शकते.

डी. नं. १४ ही राजे लोकांची कैफियत असून डी. नं. २६ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर मंदिराचे वर्णन येते. डी. नं. २७ मध्ये गोव्यात बांधलेल्या ख्रिस्ती मंदिरांची माहिती आहे, तर डी. नं. ४४ मध्ये गोकर्ण व महाबळेश्वर या दोन्ही क्षेत्रांची पौराणिक आणि भौगोलिक माहिती मिळते. डी. नं. ४६ ही कैफियत गोव्याची ऐतिहासिक माहिती पुरवते. कित्येक कैफियतींत (हाच शब्द या ग्रंथांना 'बखर' ऐवजी वापरला आहे). धार्मिक स्थळे, मंदिरे यांचा इतिहास व आख्यायिका दिलेल्या आहेत. उदाहरणार्थ: डी. नं. ८१ ते ९० मध्ये तिरुपतीचे उत्सव आणि मद्रासच्या व नजीकच्या आंध्र प्रदेशातील अशी स्थळे यांविषयी बरीच माहिती मिळते. डी. नं. १४४ हिचे नाव 'पंचवटी कैफियत' असे असून त्यात नाशिक-त्र्यंबकेश्वराची माहिती देण्यात आली आहे. डी. नं. १५५ मध्ये अनेक ऐतिहासिक मराठी व्यक्ती व त्यांनी केलेली धार्मिक कार्ये यांची माहिती मिळते. डी. नं. १८९ मध्ये उत्तर हिंदुस्थान व काबूल इत्यादीकडील राजकारणाची माहिती मिळते. डी. नं. २२२ मध्ये लोहदंड व पंढरपूर या क्षेत्रांचे वर्णन येते. वेगवेगळी गावे, खेडी यांतील महत्त्वाच्या स्थळांच्या नोंदी काही कैफियतींतून मिळतात (डी. नं. २२५, २३५) . डी. नं. २४५ मध्ये शंकराचार्यांचे चरित्र दंतकथा व प्रसंग यांद्वारे सांगण्यात आले आहे.

## आज्ञापत्रे, सनदा व ऐतिहासिक पत्रे

मद्रास सूचीच्या दुसऱ्या विभागात आज्ञापत्रे, सनदा व ऐतिहासिक पत्रे यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात बरीच पत्रे पेशवेकालीन आहेत. त्यावरून दक्षिणेतील राज्यकर्ते व प्रजा यांच्याशी असलेल्या मराठ्यांच्या संबंधांची कल्पना येते. त्यामध्ये पेशव्यांच्या ताब्यातील प्रदेशांचा बंदोबस्त, प्रशासकीय शिस्त, जरब, विविध ठिकाणच्या मंदिरांची व पूजेची व्यवस्था, त्यासाठी दिलेली दानपत्रे इत्यादी अनेक विषय आले आहेत. हिंदू व मुसलमान पुजाऱ्यांच्या उदरनिर्वाहासाठी देणग्या व अन्य तरतुदी यांची बरीच पत्रे यात आहेत. मंदिरांप्रमाणेच मशिदींसाठी अनुदानांची फर्माने काढण्यात आली आहेत. पेशव्यांप्रमाणेच मुसलमान राज्यकर्तेही उदार दिसतात. कडाप्पा येथील नबाबाकडून दर्गा, मशिदी यांतून दिवाबत्तीसाठी व देखभालीसाठी देणग्या देण्यात आल्या

होत्या. काझींना इनामादाखल जमिनी व करवसुलीसाठी गावे देण्यात आली होती. सीताराम जोशी या हिंदू पुजाऱ्याचे थांबविलेले अनुदान नबाबाने पुन्हा सुरू केल्याचीही माहिती मिळते.

कडाप्पा येथील नबाबाच्या बऱ्याच सनदा व पत्रे या संग्रहात आहेत. त्याने आपल्या दीर्घायुष्यासाठी व भरभराटीसाठी प्रार्थना करावी म्हणून शेष भट या हिंदू पुजाऱ्यास अनुदान चालू ठेवले. त्याने मागितलेली जमीनही खुषीने दिली. अशीच देणगी 'काझीकोटा' येथील नबाबाने दिलेली आहे. गंजीकोटच्या नबाबाने राम पंडिताचा पुत्र रामकृष्ण यास हे गाव अनुदान म्हणून मंजूर केले. हिंदू पुजारी व फकीर या सर्वांना त्याने देणग्या दिल्या. भीमाचारी यास कलपायी हे गाव इनाम म्हणून दिले. शेवटची तीन-चार पत्रे या भीमाचाऱ्याला दिलेल्या देणग्यांविषयीचीच आहेत.

## मराठी हस्तलिखितांची सूची

मद्रास सूचीच्या दोन्ही विभागांत अंतर्भूत करण्यात न आलेल्या अन्य मराठी हस्तलिखितांची सूची प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट करण्यात आली आहे. मद्रास ग्रंथालयात असलेल्या सूचीतील सहाव्या रकान्यात हस्तलिखिते ठेवलेली जागा, शिडाळे (rack) व रांग यांचे क्रमांक देण्यात आले आहेत. पण आता त्या ठिकाणी ती सर्व व्यवस्था बदलली असल्यामुळे तो रकाना रद्द केला आहे. ऐतिहासिक कागदपत्रांव्यतिरिक्तची हस्तलिखिते या नोंदीत आहेत. मुकुंदराज, एकनाथ, रामदास यांचे ग्रंथ यात आहेत, तसेच तंजावर कवींची काव्येही मोठ्या प्रमाणात आहेत. माधवस्वामीचे महाभारत देवनागरीत आहे. काही पूर्ण तशाच अपूर्ण बखरीही आहेत. आदिपुराण, कालिकामाहात्म्य, श्रेणिक महाराज-चरित्र हे जैन ग्रंथही आहेत. ही सर्व .हस्तलिखिते मोडी लिपीत आहेत.

'महाराष्ट्र शब्दमाला', 'महाराष्ट्र प्रयोग चंद्रिका', 'मराठी व्याकरण', 'महाराष्ट्र शब्दानुशासन', 'महाराष्ट्र अक्षरलक्षणाची पोथी' हे व्याकरणविषयक ग्रंथ या सूचीत उपलब्ध आहेत. प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांनी **'महाराष्ट्र प्रयोग चंद्रिका'** या ग्रंथाचे साक्षेपी संपादन केले असून त्यात या सर्व व्याकरणग्रंथांचा चिकित्सक परामर्श घेण्यात आला आहे. प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांनी लिहिलेल्या प्रास्ताविकातील माहितीवरून वि. का. राजवाडे आणि ग. ह. खरे या इतिहास-संशोधकांनी मद्रासच्या ओरिएन्टल लायब्ररीस भेट दिली होती व त्यांनी तेथील व्याकरण-ग्रंथ पाहिले होते असे दिसते. १९६७ मध्ये प्रा. अर्जुनवाडकर यांनी मद्रासला जाऊन 'महाराष्ट्र प्रयोग चंद्रिके'ची 'यथामूल प्रत' करून आणली. तिच्या काही पृष्ठांची छायाचित्रे त्यांनी ग्रंथात दिली आहेत. या ग्रंथाचा कर्ता वेंकट माधव हा फोर्ट सेन्ट जॉर्ज कॉलेजात मराठीचा अध्यापक असावा. त्याच्या मराठीवर तंजावरी बोलीची छाप आहे. वेंकटराव हे त्याचे स्वतःचे नाव आणि माधव हे त्याच्या वडिलांचे नाव. म्हणजे नव्या शैलीने एम. वेंकटराव असे म्हणायला हरकत नाही. त्याची नियुक्ती ८ ऑक्टोबर १८२२ च्या पत्राने झाली, अशी माहिती 'प्रास्ताविक व परिशिष्ट' यांतून देण्यात आली आहे. (संदर्भ : 'महाराष्ट्र प्रयोग चंद्रिका' : संपा. कृ. श्री. अर्जुनवाडकर, प्र. आ. १९७०, पुणे.) याच संदर्भात 'वोरंगल कैफियत' (डी. नं. १८८) तयार करणाऱ्या, चितूरचा शिरस्तेदार असलेल्या वेंकटराव याचे स्मरण होते. त्याने ही कैफियत १० ऑगस्ट १८१५ रोजी तयार केली आहे.

या कालखंडात तंजावरचे मराठी राज्य अस्तित्वात होते व त्या वेळी 'सरस्वती महाला'चे संस्थापक सर्फोजी राजे हे तंजावरचे अधिपती होते. दरबारी भाषा म्हणून मराठीचा प्रभाव मद्रास, त्रिवेंद्रम, बंगळूर या सर्व प्रदेशांत होता. त्यामुळेच आनंदराव, नारायणराव, रंगाप्पा, राघोजी, वेंकटराव यांसारखे तंजावरस्थ मराठी भाषिक लोक इंग्रजांच्या पदरी कारकून म्हणून राहिले असावेत आणि त्यांच्याच आदेशावरून त्यांनी मराठी व संस्कृत

व्याकरण आणि कोश यांची रचना केली असावी, असे वाटते. मद्रासजवळील तिनवेल्ली या गावात त्रिवेंद्रमचे सुप्रसिद्ध दिवाण सर टी. माधवराव यांचे 'सुभेदार' हे मराठी घराणे होते. त्यांची हजारो एकर जमीन होती आणि कित्येक गावांचे ते इनामदार होते. अशी कित्येक मराठी घराणी मद्रासच्या परिसरात स्थायिक झालेली होती. उपरोक्त ग्रंथांतील 'भाषादीपक' हे प्रकरण लिहिणारा सुबाजी शेषो हा स्वतः 'तंजावरवासी' म्हणवून घेतो हेही लक्षात घेण्यासारखे आहे. या सूचीतील 'ज्ञानेश्वरी कूट शब्दार्थ', 'मराठी शब्दार्थ कोश', 'मराठी, इंग्रजी भाषादीपक' हे कोश-वाङ्मयही भाषाभ्यासकांना आकृष्ट करणारे आहे. शंकराचार्यचरित्र, पंचतंत्र, विक्रमकथा, नलदमयंती-कथा असे अन्य काही ग्रंथही त्यात आहेत. या सूचीतील काही ग्रंथांचा परिचय पूर्वविभागात करून देण्यात आला आहे. त्यांच्या ह्या प्रती असाव्यात.

## मराठी पंडित

मद्रास येथील 'गव्हर्नमेन्ट ओरिएन्टल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररी' मधील मराठी हस्तलिखितांची ही बहुमोल वर्णनात्मक सूची तेथील मराठी पंडित श्री. के. तुळजारामराव क्षीरसागर यांनी परिश्रमपूर्वक तयार केली. शासकीय नियमानुसार संपादक म्हणून क्यूरेटर श्री. टी. चंद्रशेखरन यांचे नाव असले तरी सूचीच्या कर्तृत्वाविषयी मराठी पंडित श्री. के. तुळजारामराव यांचाच नामनिर्देश संपादकांनी आपल्या प्रस्तावनेमध्ये केला आहे. १९९३ मध्ये मी प्रथम या ग्रंथालयास भेट दिली, त्या वेळी श्री. के. तुळजारामराव हे नुकतेच सेवानिवृत्त झाल्याचे व तिरुपती संस्थानचे काही काम ते पाहत असल्याचे समजले होते. त्यांना भेटण्याची खूप इच्छा होती. जानेवारी १९९५ मध्ये मी पुन्हा तिथे गेलो, त्या वेळी श्री. के. तुळजारामराव आता हयात नसल्याचे समजले आणि खूप हळहळ वाटली. त्यांनी 'पुणे पेट कैफियत' त्याचप्रमाणे 'भोसले व पेशवे यांची बखर' संपादित केली आहे. या मराठी पंडितांनी आपल्या कार्याने मराठी अभ्यासकांना ऋणी केले आहे.

## संपादन

प्रस्तुत इंग्रजी सूचीचे मराठी भाषांतर करताना मूळ सूचीमध्ये मराठीत व इंग्रजीत दिलेली शीर्षके त्याच स्वरूपात ठेवण्यात आली आहेत. अनुवाद करताना माझे मित्र डॉ. अरविंद वामन कुळकर्णी यांनी व मी अनुवादाविषयी, त्यातील काही शब्दप्रयोगांविषयी व मांडणीविषयी बरीच चर्चा केली. त्यातील काही विशिष्ट ऐतिहासिक शब्दप्रयोग तसेच ठेवण्यात आले आहेत. इतिहाससंशोधकांना त्यांचा संदर्भ लागू शकेल व अधिक शोधही घेता येईल. डॉ. अरविंद वामन कुळकर्णी यांचा हा मराठी अनुवाद प्रवाही व वाचनीय झाला आहे. डॉ. कुळकर्णी यांच्या या सहकार्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. या सूचीतील संक्षेपांचे स्पष्टीकरण असे :

१) डी. नं. म्हणजे एखाद्या हस्तलिखितास देण्यात आलेला क्रमांक आणि मुद्रित सूचीत वर्णन केलेला क्रमांक होय. ही सूची वर्णनात्मक (discriptive) असल्यामुळे 'डी.'असा उल्लेख करण्यात आला आहे.

२) 'Mac' म्हणजे मॅकेंझी. Mac १९४ म्हणजे मॅकेंझी व्हॉल्यूम १९४. M म्हणजे सुद्धा मॅकेंझी. आणि Tay. V. याचा अर्थ टेलर व्हॉल्यूम ५ असा आहे.

## आभार

ही सूची तयार करीत असताना अनेकांचे सहकार्य आम्हांला लाभले. मद्रासमधील हस्तलिखित ग्रंथालयातील हस्तलिखितांच्या छायाप्रती घेणे, त्यांचे संपादन व मुद्रण करणे यासाठी परवानगी मिळवण्याकरिता राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालक डॉ. सरोजिनी वैद्य यांनी व मी मद्रास सेक्रेटरिएटमधील संबंधित

खात्याच्या सचिवांच्या गाठीभेटी घेऊन चर्चा केली. ही परवानगी मिळण्यासाठी तमिळनाडू शासनाच्या 'तमिळ डेव्हलपमेंट अँड कल्चर' खात्याचे श्री. एस. पी. इलांगोवन, श्री. आर. ख्रिस्तोदस गांधी या सचिवांची, श्री. विवेकानंदन् या सहसचिवांची, त्याचप्रमाणे आर्काइव्ह्ज खात्याचे संचालक श्री. काशिनाथ यांची आम्हांला खूप मदत झाली. त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत. 'गव्हर्नमेन्ट ओरिएन्टल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररी'चे क्युरेटर श्री. डॉ. एस. सौंदरापंडियन यांनी वेळोवेळी आम्हांला आवश्यक ती माहिती व सहकार्य दिले. त्याचप्रमाणे प्रास्ताविकही लिहून दिले. लायब्ररीतील संस्कृत पंडिता सौ. एम. राजलक्ष्मी (एम. ए.) यांनी मराठी सूची व हस्तलिखिते मिळवून देण्यात खूप सहकार्य केले. या उभयतांचे आम्ही ऋणी आहोत. सूचिकार्यात सौ. नूतन शरद कुलकर्णी, मद्रास यांचेही सहकार्य लाभले. त्यांना धन्यवाद. प्रा. कृष्ण श्री. अर्जुनवाडकर यांनी मद्रास येथील मोडी हस्तलिखिताचा नमुना उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

इतिहाससंशोधक डॉ. म. श्री. माटे यांनी आमच्या विनंतीवरून सूचीचे स्वरूप स्पष्ट करणारा परिचय लिहून दिला. राज्य मराठी विकास संस्थेचे नियामक मंडळ आणि संस्थेच्या संचालिका डॉ. सरोजिनी वैद्य यांचे उत्तम सहकार्य मला लाभले. ग्रंथनिर्मितीमध्ये श्री. पुरुषोत्तम धाक्रस यांचे सुजाण आणि साक्षेपी सहकार्य मिळाल्याने ही महत्त्वपूर्ण सूची आकर्षक स्वरूपात प्रसिद्ध होत आहे. एच. एम. टाइपसेटर्सचे श्री. हेमंत प. जोशी यांचेही छपाईविषयक कामात बहुमोल सहकार्य लाभले.


१७३० ई, सहावी गल्ली,<br>
राजारामपुरी,<br>
कोल्हापूर- ४१६ ००८.

**डॉ. वसंत स. जोशी**<br>
संपादक


**Gratitudes**

Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai and the editor of the Marathi translation of the Descriptive Catalogue of Marathi Manuscripts are grateful to the Department of Tamil Development and culture, Govt of Tamilnadu, Madras, for their kind co-operation and permission to publish this catalogue in Marathi. We also received valuable help and guidance from Dr. S. Soundarapandian, the Curator of the Govt. Oriental Manuscripts Library, and Mrs. M. Rajalaxmi (Sanskrit Pandit). I express my heartful thanks to them also.


**– Dr. Vasant S. Joshi**<br>
Editor.

# मूळ ग्रंथाची प्रस्तावना

या ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या मराठी हस्तलिखितांतील ऐतिहासिक महत्त्व असलेल्या निवडक ३०८ कैफियतींची ही वर्णनात्मक सूची आहे. या सर्वच कैफियती मोडी लिपीत लिहिलेल्या आहेत. प्रस्तुत हस्तलिखिते सहज उपलब्ध व्हावीत म्हणून प्रत्येक दप्तरास एक वर्णनात्मक क्रमांक आणि ते ज्यात समाविष्ट केलेले आहे त्या भागाचा क्रमांक (descriptive number and number of the volume) अशी यादी दिलेली आहे. प्रत्येक दप्तराचा वर्णानुक्रम आणि विषयानुक्रम यांची सूची याआधी प्रसिद्ध केलेली आहेच. हस्तलिखितांची एकंदर स्थिती व स्वरूप, संक्षिप्त आशय, लेखकाचे नाव आणि प्रारंभीच्या व शेवटच्या काही ओळी असे प्रस्तुत सूचीचे काही उल्लेखनीय विशेष आहेत. या भागातील बव्हंश हस्तलिखिते मराठी राजे व पेशवे, तसेच मराठा साम्राज्याच्या निर्मितीस व विकासास मदत करणाऱ्या ऐतिहासिक व्यक्ती व घराणी यांचा उदय व इतिहास यांबद्दलची माहिती देतात. त्यांनी केलेली युद्धे, घातलेले वेढे, त्यांचे जय-पराजय, त्यांची प्रदेश व व्यक्ती यांवरील पकड व त्यांचे परिणाम यांचे स्पष्टीकरण काही कैफियतींत करण्यात आलेले आहे. काही थोड्या कैफियतींत तीर्थ-क्षेत्रे आणि महत्वाची ठिकाणे यांची वर्णने येतात. ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाच्या असणाऱ्या काही कैफियती पुढे दिलेल्या आहेत :

| | डी. नंबर | संदर्भ नंबर |
|---|---|---|
| १. घोरपडे सोंडूर कैफियत. घोरपडे कुटुंबियांचा उदय व इतिहास आणि ते सोंडूरचे अधिपती कसे झाले हे सांगणारी कैफियत. | 49 | M. 30 |
| २. टिपू सुलतान कैफियत. ही कैफियत टिपूचा स्वभाव, त्याचा हिंदूंबद्दलचा दृष्टिकोण आणि चोख राज्यकारभार यांची माहिती देते. | 70 | M. 29 |
| ३. तिरुमलाई देवस्थान– नित्यकर्म व पूजा. तिरुपती-तिरुमलाई येथील मंदिरात केले जाणारे अनेकविध धार्मिक उत्सव आणि त्यासाठी देणग्या देणाऱ्या आश्रयदात्यांची नावे यात आहेत. | 85 | M. 133 |
| ४. पेशव्यांची कैफियत आणि वंशावळी. या कैफियतीत पेशव्यांचा उदय व इतिहास आणि मराठी इतिहासातील त्यांची भूमिका यांचे निवेदन आहे. | 130 | M. 194 |
| ५. पूनेपेट (Poonepet) कैफियत. मराठा राज्याच्या काळात अनेक प्रसिद्ध किल्ल्यांनी बजावलेली महत्त्वाची भूमिका यात विशद केलेली आहे. (पुणे) हे शहर ज्यांची राजधानी होते त्या शास्त्यांची नावे आणि ते कसकसे एकाकडून दुसऱ्याकडे सोपविले जात जात अखेरीस ईस्ट इंडिया कंपनीच्या वर्चस्वाखाली आले या-विषयीचा चित्रमय वृत्तान्त यात दिलेला आहे. | 125 | M. 30 |
| ६. सवाई माधवराव यांची बखर. सवाई माधवराव यांचे (पेशवे) चरित्र यात रेखीवपणे सांगितले आहे. | 134 | M. 197 |
| ७. श्री शिवाजी बखर. शिवाजी-राजांचे समग्र जीवन आणि अनेक प्रसंगांच्या तारखा दिलेल्या आहेत. | 272 | M. 202 |
| ८. हैदरची माहिती. अतिशय वेधकपणे हैदर अलीखान याचा जीवनवृत्तान्त सांगितला आहे. | 305 | Tay., Vol. v |

काही हस्तलिखिते अतिशय खराब अवस्थेत असून त्यांचे वाचन व वर्णन यांसाठी घेता येईल ती काळजी घेतलेली आहे. त्यातील काही थोड्या रचनांत लेखकांची नावे किंवा त्यांत असलेल्या माहितीचे मूळ यांचे उल्लेख आहेत.

ही सर्व सूची श्री. के. तुळजारामराव या मोडीतून देवनागरीत लिप्यंतर करणाऱ्या व्यक्तीने तयार केली आहे.

मद्रास — टी. चंद्रशेखरन
१३ ऑगस्ट १९५३ — ग्रंथपाल

# मराठी हस्तलिखितांतील विषय

| हस्तलिखित रचनेचे शीर्षक | डी. नंबर | संदर्भ क्रमांक |
|---|---|---|
| अनेगोंदी कैफियत | 1 | Mac. 106 |
| अनेगोंदी कैफियत | 2 | M. 107 |
| अनेगोंदी कैफियत | 3 | M. 49. |
| अनेगोंदी कैफियत | 4 | Tay Vol. V |
| अनेगोंदी कैफियत | 5 | Mac. 142 |
| अरहडेश्वर कैफियत | 6 | Mac. 199 |
| असफजाह कैफियत | 7 | Mac. |
| अहमदनगर कैफियत | 8 | Mac. |
| अहमदनगर कैफियत | 9 | Mac. |
| अहमदशहा हसन गंगू बामणी | 10 | Mac. |
| अर्काट कैफियत | 11 | Mac. |
| अफसरकोट कैफियत | 12 | M. |
| अफसरकोट मढ माहात्म्य | 13 | M. |
| उज्जैनी राजे लोकांची कैफियत | 14 | Tay Vol. IV |
| औरंगाबाद ऊर्फ सुभे खुजास्ते बुनिया | 15 | M. |
| कंड आर्सी कोटा पलेपट कैफियत | 16 | M-31. |
| कंड आर्सीकोट्टा पाले कैफियत | 17 | M. |
| कपिस्थान कैफियत | 18 | M. 30 |
| कमरअलिखान वतन कैफियत | 20 | Mac. 203 |
| कमरअलिखान वतन अजमीर व हिंदुस्थान कैफियत | 21 | Mac. 203 |
| करियापट्टण कैफियत | 22 | Tay Vol. v |
| कलुबू तालुका कैफियत | 23 | Mac. 167 |
| कार्णिक पूर्णय्या | 24 | M. 49 |
| कार्णिक कैफियत | 25 | Tay. Vol. v |
| कायगाव कैफियत | 26 | Mac. 194 |
| ख्रिश्चन इंग्रजीची कैफियत | 27 | Mac. 179 |
| ख्रिश्चन इंग्रजीची कैफियत | 28 | Mac. 179 |
| ख्रिश्चन इंग्रजीची कैफियत | 29 | Mac. 179 |
| कुरुंबडा कैफियत | 30 | Mac. 87 |
| केलंदी संस्थानची कैफियत | 31 | M. 49 |
| केलंदी संस्थानची कैफियत | 32 | M. 49 |
| केलंदी रामेश्वर तपशील | 33 | Mac. 167 |

| हस्तलिखित रचनेचे शीर्षक | डी. नंबर | संदर्भ क्रमांक |
|---|---|---|
| कोकण देशस्थ ब्राह्मण | 34 | Tay Vol. I |
| कोटीश्वर कैफियत | 35 | Mac. 179 |
| कोपम् कैफियत | 36 | Mac. 167 |
| कोपम् कैफियत | 37 | Tay. vol. IV |
| कोपम् कैफियत | 38 | Tay. vol. IV |
| खतावणी ममसमुद्र | 39 | Mac. 52 |
| गुजराथ प्रांत कैफियत | 40 | Mac. 194 |
| गुजराथ प्रांत कैफियत | 41 | Tay. Vol. 105 |
| गुंडाली द्वीप व डोंगरे कैफियत | 42 | Mac. 50 |
| गुडियातम् कैफियत | 43 | Mac. 92 |
| गोकर्णेश्वर कैफियत | 44 | Mac. 179 |
| गोंडागिरी कैफियत | 45 | Mac. 177 |
| गोवा कैफियत | 46 | M. 106 |
| गोवा बंदर कैफियत | 47 | Mac. 179 |
| गोलीमंडल कैफियत | 48 | Mac. 88 |
| घोरपडे सोंडूर कैफियत | 49 | M. 30 |
| घोरपडे सोंडूर कैफियत | 50 | Mac. 87 |
| चन्नपट्टणची कैफियत | 51 | Mac. 115 |
| चार युगांचे राजे | 52 | Mac. 199 |
| चार युगांचे राजे | 53 | Mac. 199 |
| चित्रगिरी कैफियत | 54 | Mac. 88 |
| चित्रदुर्ग कैफियत | 55 | M. 49 |
| चित्रदुर्ग कैफियत | 56 | Tay. Vol. v |
| चिंगलपट्टण बखर | 57 | Mac. 92 |
| चतुरंगपट्टण कैफियत | 58 | Mac. 92 |
| चंद्रगिरी कैफियत | 59 | Mac. 88 |
| चंद्रगुत्ती तालुका कैफियत | 60 | Mac. 197 |
| चोल राजांची कैफियत | 61 | Tay vol. I |
| जगन्नाथपूर व सिंहाद्रिपूर कैफियत | 62 | Mac. 151 |
| जमाबंदी हुकूम टिपू कैफियत | 63 | Mac. 172 |
| जयसिंग राजाचे चरित्र | 64 | Mac. 92 |
| जंजीरा कूर्मगड कैफियत | | |
| जबीता शिरेस्तो दफ्तर | 65 | Mac. 179 |

| हस्तलिखित रचनेचे शीर्षक | डी. नंबर | संदर्भ क्रमांक |
|---|---|---|
| बादशहा विजापूर | 66 | Mac. 20A |
| जैन देशांची कैफियत | 67 | Mac. 115 |
| जैन मठांची कैफियत | 68 | Mac. 115 |
| जोहनसिंग तहसीलदार अर्जी | 69 | Mac. 124 |
| टिपू सुलतान कैफियत | 70 | M. 29 |
| टिपू सुलतान कैफियत | 71 | M. 49 |
| टिपू सुलतानाची ताकीद नकल | 72 | M. 29 |
| टिपू सुलतानाची रसीद नकल | 73 | M. 29 |
| तंबाकू कैफियत | 74 | Mac. 179 |
| तंबाकू कैफियत | 75 | M. 107 |
| ताडपत्री पाळेगार कैफियत | 76 | Mac. 151 |
| तरुकाबाद | 77 | Mac. 194 |
| तिरुक्काणाबी कैफियत | 78 | M. 49 |
| तिरुनागेश्वर कैफियत | 79 | Mac. 87 |
| तिरुनागेश्वर कैफियत | 80 | M. . 133 |
| तिरुपतीचे राजे | 82 | M. 133 |
| तिरुमलाई देवस्थान व उत्सव | 83 | M. 133 |
| तिरुमलाई देवस्थान व उत्सव | 84 | M. 133 |
| तिरुमलाई देवस्थान नित्यकर्म व पूजा | 85 | M. 133 |
| तिरुमलाई देवस्थान मूर्तीचा तपशील | 86. | M. 133 |
| तिम्मलपर्वत व बाग वगैरे | 87 | M. 133 |
| तिरुमलाई देवस्थान निवेशन-मंडप तपशील | 88 | M. 133 |
| तिरुमलाई पर्वताची जाण्याची वाट | 89 | M. 133 |
| तिरुमलाई पर्वतावर चालायचे विशेष उत्सव | 90 | M. 133 |
| तिरुवकराज कैफियत | 91 | M. 133 |
| तिरुवकराज कैफियत | 92 | Mac. 87 |
| तोंडरमंडल व कांची कैफियत | 93 | Tay Vol. V |
| तोंडरमंडल व कांची कैफियत | 94 | Tay Vol.V |
| तोंडरमंडल कैफियत | 95 | M. 30 |
| तोंडरमंडलातील जनांची कैफियत | 96 | M. 30 |
| तोंडरमंडलातील जनांची कैफियत | 97 | Mac. 87 |
| तोली देशांची कैफियत | 98 | Mac. 179 |
| तिरुवतूर माहिती | 99 | Mac. 92 |
| धार नगरांची कैफियत | 100 | Tay vol. IV |
| नगर कैफियत | 101 | M. 29 |
| नगर कैफियत | 102 | M. 49 |
| नंदवार गाव अग्रहार कैफियत | 103 | Mac. 152 |
| नबाब असफशाह कैफियत | 104 | M. 107 |
| नरसिंहपूर माहिती | 105 | Mac. 88 |
| नरसिंहस्वामी देवालय कैफियत | 106 | Mac. 151 |
| नागुर कैफियत | 107 | M. 30 |
| नागुर कैफियत | 108 | Mac. 89 |
| नाने जित्र (की नानेजी ?)ची कैफियत | 109 | Mac. 165 |
| नानासाहेब कैफियत | 110 | Tay Vol. IV |
| नाना फडणवीस यांची पत्रे | 111 | Tay Vol.III |
| नायक मजांची कैफियत | 112 | M. 49 |
| नारायण राय व स्वामीमाहात्म्य | 113 | Mac. 38 |
| पंचवटी कैफियत | 114 | Mac. 204 |
| पंचवटी कैफियत | 115 | Mac. 204 |
| पंडनल्लूर किल्ला कैफियत | 116 | Mac. 87 |
| पंडनल्लूर किल्ला महनम कैफियत | 117 | M. 30 |
| प्रसन्न प्रभूची बखर | 118 | Mac. 197 |
| प्रसन्न प्रभूची बखर | 119 | Mac. 197 |
| पट्टण व गुजराची कैफियत | 120 | Mac. 203 |
| पानिपत्योद (थोरले माधवराव व नारायणराव) | 121 | Mac. 197 |
| पानिपत बखर | 122 | Mac. 202 |
| पाळेगार सैयर कावली व मावली | 123 | Mac. 86 |
| पुणे कैफियत | 124 | Mac. 194 |
| पुणे पेठ कैफियत | 125 | M. 50 |
| पुणे पेठ कैफियत | 126 | M. 23 |
| पुणे पेठ कैफियत | 127 | M. 50 |
| पेरियापट्टण कैफियत | 128 | Tay Vol. I |
| पेरियापट्टण कैफियत | 129 | Tay Vol. IV |
| पेशव्यांची कैफियत व वंशावळी | 130 | Mac. 194 |
| पेशव्यांची वंशावळी | 131 | Mac. 194 |
| पोरुलवैटासेटी पाप कोविल | 132 | Mac. 167 |
| पेरिस्ता देहाये जामवर तालुका | 133 | Mac. 86 |
| बखर सवाई माधवराव | 134 | Mac. 197 |
| बडा बल्लापूर कैफियत | 135 | Mac. 197 |
| बडा बल्लापूर कैफियत | 136 | Tay Vol.V |
| बडा बल्लापूर कैफियत | 137 | Tay Vol. IV |
| बडा बल्लापूर कैफियत | 138 | M. 29 |
| बल्लाळ कैफियत | 139 | Mac. 179 |

| हस्तलिखित रचनेचे शीर्षक | डी. नंबर | संदर्भ क्रमांक |
|---|---|---|
| बल्लाळ कैफियत | 140 | Tay Vol. IV |
| बल्लाळ रायदुर्ग कैफियत | 140 | Mac. 169 |
| बाजीराव थोरले व नबाब नाह्यजंग उध | 141 | M. 23 |
| बाजीराव थोरले व त्रिंबकराव दाभाडे उध | 142 | M. 23 |
| बरुके किल्ला कैफियत | 143 | Mac. 202 |
| विजापूर कैफियत | 144 | Tay Vol. IV |
| बिलेगी देशांची कैफियत | 145 | Mac. 179 |
| बेडर लोकांची कैफियत | 146 | Mac. 87 |
| बेडर लोकांची कैफियत | 147 | Tay Vol. V |
| बेलूर कैफियत | 148 | M. 29 |
| बैर देशांचे उत्पन्न | 149 | Mac. 177 |
| बोर नदंची कैफियत | 150 | Mac. 177 |
| बौद्ध मत खंडन | 151 | Mac. 197 |
| भरतपूर राजांचा पराक्रम | 152 | Tay vol. III |
| भाऊगर्दी पानिपत कैफियत | 153 | Mac. 202 |
| भीमनपडू कैफियत | 154 | Mac. 101 |
| भोजराज पट्टण कैफियत | 155 | M. 30 |
| भोसले यांची बखर | 156 | Mac. 195 |
| भोसले यांची वंशावळी | 157 | Mac. 194 |
| भोसले यांची वंशावळी (राजे लोक) | 158 | Mac. 107 |
| मगध देशाची कैफियत | 159 | Tay Vol. IV |
| मातृस्थल कैफियत | 160 | M. 49 |
| मद्रास पालेप्पाट श्रीरंग पट्टण कैफियत | 161 | Mac. 165 |
| मयूरवर्म कैफियत | 162 | Mac. 179 |
| मराठ्यांची बखर | 163 | M. 46 |
| मराठ्यांची बखर | 164 | M. 47 |
| मराठी (लोकांची)आडनावांची बखर | 165 | Mac. 179 |
| मराठी राजांची कैफियत | 166 | Tay vol 1. |
| मराठी राजांची कैफियत (आडनावांची बखर) | 167 | Mac. 179 |
| मराठी राजे | 168 | Mac. 199 |
| मराठे व पेशवे | 169 | Mac. 199 |
| मल्लपट्टण कैफियत | 170 | Mac. 50 |
| महाराष्ट्र ब्राह्मणांची पंचजाती कैफियत | 171 | Mac. 202 |
| मधुराजलु वंशावली | 172 | Mac. 88 |
| मालोजी भोसले कैफियत | 173 | Mac. 206 |
| महाराष्ट्र ब्राह्मणांची कैफियत | 174 | Tay vol. III |
| मुसलमान राजे | 175 | Mac. 199 |
| म्हैसूर कैफियत | 176 | M. 49 |
| म्हैसूरातील देवालये | 177 | Tay Vol. I |
| म्हैसूर कैफियत | 178 | Tay vol. IV |
| येदास्त अर्काट सुभा | 179 | M. 50 |
| येददास्त अर्काट सुभा बेरीज जबीता | 180 | M. 50 |
| येददास्त (कचदेह) कैफियत | 181 | M. 86 |
| येददास्त कानगोये मजुमु देशमुख कैफियत | 182 | M. 50 |
| येददास्त कैफियत | 183 | |
| येददास्त मदुरा मीनाक्षी कैफियत | 184 | Mac. 86 |
| येददास्त मदुरा मीनाक्षी देवालय पूजा | 185 | Mac. 86 |
| येददास्त मदुरा मीनाक्षी देवालय पूजा | 186 | Mac. 86 |
| येददास्त देह यादा तालुका मदुराई व तिरुपती | 187 | Mac. 86 |
| येददास्त पांडवगुडी वरंगळ कैफियत | 188 | Mac. 82 |
| येदी उत्तर हिंदुस्थान व काबूल कैफियत | 189 | Mac. 198 |
| येददास्त तालुका काणकुपी | 190 | Mac. 172 |
| येददास्त रवै बंदर व करियापट्टण कैफियत | 191 | Mac. 50 |
| येददास्त सदाशिवगड कैफियत | 192 | Mac. 179 |
| येददास्त सुब्रह्मण्येश्वर स्वामी कैफियत | 193 | Mac. 86 |
| येददास्त लासे गाव कैफियत | 194 | Mac. 86 |
| येददास्त सालवार कैफियत | 195 | Mac. |
| येददास्त स्थलवार कैफियत | 196 | Mac. 88 |
| येददास्त फेरिस्त जरीब रामसमुद्र | 197 | Mac. 52 |
| येददास्त जरीब कृष्णगिरी | 198 | Mac. 52 |
| यादी सरंजाम फौज | 199 | Mac. 197 |
| यादी सरंजाम फौज | 200 | Mac. 197 |
| एंगूर कैफियत | 201 | Mac. 179 |
| एंगूर कैफियत | 202 | Mac. 107 |
| येलनाडू प्रभू वंशावळी तपशील | 203 | Mac. 107 |
| येलनाडू प्रभू वंशावळी तपशील | 204 | Mac. 49 |
| रंग दुर्ग कैफियत | 205 | Tay.Vol. IV |

| हस्तलिखित रचनेचे शीर्षक | डी. नंबर | संदर्भ क्रमांक |
|---|---|---|
| रंग देवालयसंबंधी व्यवस्था | 206 | M. 49 |
| राघोजी भोसले नागपूर | 207 | Mac. 202 |
| राघोबा दाते व सवाई माधवराव कारकीर्दी | 208 | Mac. 197 |
| राजा गोपीचंद बखर | 209 | Mac. 194 |
| राजावळी गोवळ्कोंडा | 210 | Mac. 89 |
| राजावळी पौराणिक चोळ यादव सुलतान | 211 | Mac. 88 |
| राजा प्रतापरुद्र कैफियत | 212 | Mac. 107 |
| राजा (रण) वायागुडीचे कैफियत | 213 | M. 49 |
| राजा (रण) वायागुडीचे कैफियत | 214 | M. 49 |
| रामराजा देवगिरी बखर | 215 | Mac. 204 |
| रस्तल बेगमपुरी जैन कैफियत | 216 | Mac. 179 |
| लालबाग कैफियत | 217 | M. 49 |
| लासेगाव तालुका तिरुमंगलम् | 218 | Mac. 86 |
| लासेगाव तालुका तिरुमंगलम् | 219 | Mac. 86 |
| लासेगाव आणि गिरी देवस्थान कैफियत | 220 | Mac. 86 |
| लिंगराजपट्टण कैफियत | 221 | M. 50 |
| लोहदंड ऊर्फ पंढरपूर क्षेत्र कैफियत | 222 | Mac. 203 |
| वंदनपुरी पट्टण कैफियत | 223 | M. 50 |
| वही कृतयुगातील राजे लोकांची वंशावळी | 224 | Tay. Vol. I |
| वामूर कैफियत | 225 | Mac. 194 |
| वारदानदींची कैफियत | 226 | Mac. 194 |
| विक्रम राजांची बखर | 227 | Mac. 179 |
| विजयनगर कैफियत | 228 | Tay.Vol. IV |
| विजापूर बादशहा कैफियत | 229 | Mac. 194 |
| विद्यानगर कैफियत | 230 | M. 49 |
| विरंचीपूर बेलूर माहिती | 231 | Mac. 92 |
| विरलगुडी कैफियत | 232 | Mac. 92 |
| विरलगुडी कैफियत | 233 | M. 19 |
| विरलगुडी पांडवगुडी देवालय कैफियत | 234 | Mac. 92 |
| विरलगुडी पांडवगुडी देवालय कैफियत | 235 | Mac. 92 |
| विश्वास राव व भाऊसाहेब कैफियत | 236 | Mac. 197 |
| विश्वासराव सदाशिवराव भाऊ व अबदाली यांची लढाई | 237 | M. 23 |
| विष्णुशर्मा कैफियत | 238 | Mac. 197 |
| वेंकटरमणस्वामीस टेकर राजे दिले ते बाबतीची कैफियत | 239 | M. 133 |
| वेंकटरमण दीक्षितपुत्रांची कैफियत | 240 | Mac. 86 |
| वेरूळ घृष्णेश्वर कैफियत | 241 | Mac. 204 |
| वेलूर किल्ला कैफियत | 242 | Mac. 92 |
| वेलूर किल्ला व नगर कैफियत | 243 | Mac. 92 |
| व्यावहारिक माहिती संवत्सर | 244 | Mac. 133 |
| शंकराचार्य चरित्र | 245 | Mac. 197 |
| शंकराचार्य चरित्र | 246 | Mac. 197 |
| सांदीपती गाव कैफियत | 247 | Mac. 107 |
| शालिवाहनांची बखर | 248 | Mac. 197 |
| शालिवाहनांची बखर | 249 | Mac. 197 |
| शहाजी राजांची कैफियत | 250 | M. 50 |
| शाहू राजांची उत्पत्ती | 251 | M. 50 |
| शाहू राजा व निजाम मुलमुल्क कैफियत | 252 | Mac. 107 |
| शाहू राजाची माहिती | 253 | Mac. 202 |
| शिंदे कैफियत | 254 | M. 23 |
| शिवाजी राजांची कैफियत | 255 | Tay. Vol. iii |
| शिवाजी राजे व दिल्ली बादशहा लढाई | 256 | . . . |
| शिवाजे राजे व निजाम उल मुल्क | 257 | M. 50 |
| शिवाजीच्या वंशावळीची माहिती | 258 | Mac. 202 |
| शिवाजी व शाहू व निझाम उलमुल्क | 259 | Mac. 197 |
| शिवाजी व संभाजी यांची बखर | 260 | Mac. 196 |
| शिवाजी व संभाजी यांची बखर | 261 | M. 50 |
| समयपूर माहिती | 262 | Mac. 87 |
| श्रीरंगपट्टण कैफियत | 263 | M. 49 |
| श्रीरंगपट्टण कैफियत | 264 | M. 49 |
| श्रीरंगपट्टण कैफियत | 265 | Tay Vol. v |
| श्रीरंगपट्टण कैफियत | 266 | M. 29 |
| श्रीरंगपट्टण कैफियत | 267 | M. 133 |
| श्रीरंगपट्टणम् शहर किल्ला कैफियत | 268 | M. 107 |
| श्री. वेंकटेश्वरस्वामी कैफियत | 269 | M. 37 |
| श्री. शिवाजीचरित्र संस्कृत शिवभारताचा मराठी अनुवाद | 270 | Mac. 202 |

| हस्तलिखित रचनेचे शीर्षक | डी. नंबर | संदर्भ क्रमांक |
|---|---|---|
| श्री. शिवाजीचरित्र संस्कृत शिवभारताचा मराठी अनुवाद | 271 | M. 202 |
| श्री. शिवाजी बखर | 272 | M. 202 |
| श्रीहरीकोट कैफियत | 273 | Mac. 50 |
| श्रीहरीकोट कैफियत | 274 | Mac. 50 |
| सातारा राजांची कैफियत | 275 | Tay Vol. I |
| सदाशिवगड कैफियत | 276 | M. 107 |
| शिंदे कैफियत | 277 | M. 50 |
| शिलेदार इनाम कैफियत | 278 | Mac. 200 |
| शिवाजी राजे व निजाम उलमुल्क | 279 | Mac. 197 |
| शिवाजी राजे व निजाम उलमुल्क | 280 | Mac. 197 |
| सुभे विजापूर व बादशहाची कैफियत | 281 | . . . |
| सुभे विजापूर व बादशहा सरकार तपशील | 282 | Mac. 206 |
| सूर्य वंशातील राजांची कैफियत | 283 | Tay Vol. v |
| सुरपूर संस्थानच्या व गुट्टी संस्थानच्या राजांचा तपशील | 284 | Mac. 35 |
| सोंडूर घोरपडे कैफियत | 285 | Mac. 110 |
| सोनाई | 286 | Mac. 203 |
| सृष्टीक्रम राजे भोसले | 287 | Mac. 204 |
| सैय्यद याकूफ मदुराई चेन्नपट्टण कैफियत | 288 | Mac. 197 |
| हरनहल्ली तालुका कैफियत | 289 | M. 29 |
| हसनगंगू बा ईमाम | 290 | Mac. 197 |
| हसनगंगू बा ईमाम | 291 | Mac. 197 |
| हस्तिनावती दिल्ली कैफियत | 292 | Mac. 179 |
| हस्तिनावती दिल्ली कैफियत | 293 | Mac. 179 |
| हस्तिनापुराचे राजे | 294 | Mac. 197 |
| हिंदुपती राजे | 295 | Mac. 197 |
| हिंदुराजे लोकाचे तपशील | 296 | Tay Vol. v |
| हेबाहळ्ळी कैफियत | 297 | Tay Vol. iv |
| हेमाडपंताची बखर | 298 | Mac. 194 |
| हेलबिदुर कैफियत | 299 | Mac. 167 |
| हेलबिदुर कैफियत | 300 | Tay Vol. iv |
| हैदर व टिपू सुलतान कैफियत | 301 | Mac. 169 |
| हैदर व टिपू | 302 | M. 31 |
| हैदर व टिपू कैफियत | 303 | Mac. 169 |
| हैदरांची माहिती | 304 | Mac. 205 |
| हैदरांची माहिती | 305 | Tay Vol. v |
| होळकर कैफियत | 306 | M. 50 |
| होळकर कैफियत | 307 | M. 23 |
| होळकर कैफियत | 308 | M. 23 |

# मद्रासची मराठी हस्तलिखिते

## गव्हर्नमेंट ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररी
## मद्रास

### मराठी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची

### विभाग पहिला

**बखरी, कैफियती**

**डी. नं. १ ते ३०८**

# मराठी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची

## भाग १. Volume 1.

### डी. नंबर १

**अनेगोंदी कैफियत**
**Anēgondi Kaifiyat**

कागद १२" x ८", मोडी. १७ ओळी, जुने हस्तलिखित. खराब अवस्थेत. दुर्वाच्य. पूर्ण.

पृ. क्र. ६२ वर प्रारंभ झालेला आहे. यातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :

| | |
|---|---|
| विक्रमचरित्र— | पृ. १ ते २५ |
| नळदमयंती चरित्र | पृ. २५ ते २६ |
| रामायण | पृ. २७ ते २९. |
| दमयंती कथा | पृ. २९ (अ) ते ३१ |
| बडाबल्लापूर कैफियत | पृ. ३२ ते ३३ |
| हस्तिनावती दिल्ली कैफियत | पृ. ६२ ते ६६ |
| असफशा कैफियत | पृ. ३४ ते ६० |
| मराठ्यांची बखर | पृ. ६७ ते ७३. |

तुंगभद्रेच्या उत्तर तीरावर वसलेल्या आणि बेल्लारी जिल्ह्यातील आजच्या हंपी या खेडेगावानजीक असलेल्या अनेगोंदी संस्थानाच्या इतिहासाशी प्रस्तुत कैफियत संबंधित आहे.

ही कैफियत म्हणजे हंपीच्या श्रीविरूपाक्ष-स्वामी मंदिरातील भिंतीवर कोरलेल्या एका शिलालेखाच्या ठशाची नक्कल असून तो हरपनहल्ली येथील रामय्या नावाच्या वृद्ध सद्गृहस्थाच्या मालकीचा आहे. हरपनहल्ली हे बेल्लारी जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण आहे. या प्रसंगाची किंवा नकलेची तारीख, तसेच नकलकाराचा काळ दिलेला नाही.

दिल्लीच्या बहादूरशहाचा प्रतिनिधी रशीदुल्लाखान याने दीर्घकाळपर्यंत अनेगोंदीच्या किल्ल्याला वेढा घातला. रणकंदनाच्या जोरावर किल्ला ताब्यात घेणे अशक्य आहे हे लक्षात आल्यावर त्याने फंदफितुरीच्या मार्गाचा अवलंब करायचे ठरविले. यासाठी त्याने अनेगोंदीच्या राजाच्या पंतप्रधानांशी (विजयनगरचे दोन मुस्लिम सेनापती) संधान बांधले आणि मोठी किंमत मोजून त्यांची मदत विकत घेण्यात तो यशस्वी झाला. पंतप्रधानांनी सैन्याची शरणागती आणि वेळ अनुकूल असेल तर खुद्द राजाशी द्रोह करण्याची तयारी दाखविली. पण जेव्हा ही मसलत बाहेर फुटली तेव्हा अनेगोंदीच्या काही हितचिंतक देशभक्तांनी राजाला वस्तुस्थिती सांगून खान व पंतप्रधान यांच्या विरोधात मदत देऊ केली. राजाने ती स्वीकारली आणि (परिणामी) रशीदुल्लाखान पराभूत झाला. विश्वासघातकी वर्तणुकीबद्दल पंतप्रधानांनाही शिक्षा करण्यात आली.

**शेरा :** पहिल्या पृष्ठावरील डाव्या बाजूला वरच्या कोपऱ्यात अशी नोंद आहे की प्रस्तुत कैफियत १८ मार्च १८०७ रोजी अनुवादित करून म्हैसूरला पाठविण्यात आली. ठिकाणाचे नाव यापुढील कैफियतीत जरी वेगवेगळ्या तऱ्हेने लिहिले गेले असले तरी ते अनेगोंदीच आहे हे नक्की !

**प्रारंभ :** अनेगोंदी राय सवस्थानास दिल्ली पादशहाकडील फौज व सरदार रषदुल्लाखान घेरणेस कारण काय म्हणजे दिल्लीचा वकील दिलदिलेखान म्हणार पट्टाण रायलाकडे असतां रायला. कडील मुतशाही मातबर व कितेक अमलदार व त्या वकीला मिळुन अहेद पहरत करून घेऊन राये सवस्थान टाणत घालुन दिल्लीया तुम्हास १२००० होनाची जाहीर व लाख अषरफी नकद तेदों म्हणुनें वकिल मजकुर कबुल केले.

**शेवट :** या रीती चालिलें वृत्तांत हंपीत विरुपाक्षेश्वर देउळांती सिला षासन लिफी आहे. हरपनहलीवाला रामैय्या म्हणार पंचेताळीस वरुषवाला त्यांच अबळी होत. तो पोथीत या रीती लिहील होत ते घेऊन कर्नल साहेबानी लिहुन घेतलें असे संवछर तारीख नाही.

## डी. नंबर २

**अनेगोंदी कैफियत**
**Anegondi Kaifiyat**

कागद : ११" x १६ $\frac{१}{२}$. मोडी. १५ ओळी. जुने हस्तलिखित. चांगल्या स्थितीत. वाच्य. पूर्ण

पृ. १७७ (ब) वर प्रारंभ होतो. यातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत.

भोसले राजवंशावळी– पृ. १ ते ६६
शिवाजी राजा व निजाम-उल्-मुल्क कैफियत-पृ. ६७ ते १०६
श्रीरंगपट्टण शहर व किल्ला कैफियत-पृ. १०७ ते ११०
वेल्लानाडू (की येल्लनाडू ?). प्रभू वंशावळी तपशील– पृ. १११ ते ११४
वेंगूर कैफियत– पृ. ११५ ते १२१
तांबाकू कैफियत– पृ. १२१
गोवा कैफियत– पृ. १२२ ते १२४
ख्रिश्चन कैफियत– पृ. १२४ ब ते १२५
सदाशिवगड कैफियत– पृ. १२५ ब ते १२९
नबाब असफशहा कैफियत– पृ. १३१ ते १६३.
राजा प्रतापरुद्र कैफियत– पृ. १६४ ते १७२
हस्तिनावती दिल्ली कैफियत– पृ. १७३ ते १७७

**डी. नंबर १** या आधीच्या कैफियतीप्रमाणेच प्रस्तुत कैफियत आहे. नकलची तारीख किंवा नकलकाराचे नाव दिलेले नाही. पहिल्या कैफियतीवर नोंदलेले शेरे इथे गाळलेले आहेत. प्रारंभ व शेवट याआधीच्या कैफियती प्रमाणेच आहेत.

## डी. नंबर ३

**अनेगोंदी कैफियत**
**Anēgondi Kaifiyat**

कागद : १२" x ८ $\frac{१}{२}$" १५ ओळी. मोडी. जुने हस्तलिखित. खराब अवस्था. दुर्वाच्य. पूर्ण. पृ. क्र. २०(ब)वर प्रस्तुत कैफियत सुरू होते. ती अन्तर्भूत असलेल्या इतर रचना पुढील प्रमाणे आहेत.

नाईक राजांची कैफियत
राणे वैगुडी कैफियत (Vāigudi)
श्रीरंगपट्टण कैफियत
म्हैसूरातील देवालये
त्रिंकामली
श्रीरंगपट्टण कैफियत
येल्लनाडू प्रभूंची वंशावळी
माट्टूर (Māttūr) स्थल कैफियत
पतिव्रताप्रभाव
कार्णिक पूर्णय्या कैफियत
टिपू सुलतान कैफियत
विद्यानगर कैफियत
इरिकेरे स्थळ माहात्म्य
हैदर व टिपू सुलतान कैफियत
श्रीरंगपट्टणाची कैफियत
केलंदी सोमस्थानाची कैफियत
नगर कैफियत
चित्रदुर्ग कैफियत
लालबाग कैफियत
रण वाईगुडी– (Rana Vāigudi) कैफियत
म्हैसूर कैफियत

आधीच्या हस्तलिखातासारखाच यातील मजकुराचा विषय आहे. फक्त थोडी अधिक माहिती यात दिलेली आहे.

कर्नल मॅकेंझी मुळातल्या (संग्राहक) मालकाकडून हस्तलिखित मिळवू शकला नाही. म्हणून त्याने प्रस्तुत कैफियत मिळविण्यासाठी लष्करी अधिकाऱ्याकरवी नबाबाकडे निरोप धाडला. नबाबाच्या वाड्यावर कैफियत उपलब्ध होती. तीमधील पाने नीट लावलेली आणि बांधलेली नसल्यामुळे कैफियतीच्या वाचनात काही अडचण जाणवते. २० व्या पृष्ठावर ही कैफियत सुरू होते आणि ती २२-२३ व्या पानापर्यंत जाते. नकलेचा दिनांक किंवा नकलकाराचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** याआधीच्या हस्तलिखिताप्रमाणेच प्रारंभ आहे. पण शेवट वेगळ्या तऱ्हेने झालेला आहे.

**शेवट :** x x x बंदोबस्ती अछा वानी जाहाली. मुलुकाचे आहले काराची कचेरी जात खुण वाण बाजार खडे पाडे आणि पाणी देखील बिर्घीहोऊन लागली. राजाही हुषार जाहाला यारीती चालीला वृतांत हंपीत विरपाक्षीचा देउळात सिलाशासन लिहिले आहेत. म्हणुन हरनहाली वाला रामैया ब्राह्मण म्हणार पंचताळीस वरुषवाला त्याचे तेलंगी पोथींत या रीती लिहीले व्होत ते घेऊन– कर्नल कौसल बहदुर सोनीगेले.

## डी. नंबर ४

**अनेगोंदी कैफियत**
**Anegondi Kaifiyat**

कागद : १९" x १२". मोडी. २८ ओळी, जुने, खराब अवस्था, दुर्वाच्य, पूर्ण.

या कैफियतीचा प्रारंभ पृ. ३८७ ब वर होतो. यात असलेल्या रचना पुढीलप्रमाणे आहेत.

चोल राजांची कथा– पृ. ३४८.
तोंडर मंडल कैफियत– पृ. ३५५ ब.
आधीच्या राजांचा कालक्रमानुसार वृत्तान्त– पृ. ३५७.
चित्रदुर्ग कैफियत– पृ. ३६० ब.
श्रीरंगपट्टणम कैफियत– पृ. ३७४ ब.
सूर्यवंशाचे राजे– पृ. ३७७ ब.
बडाबल्लापूर कैफियत– पृ. ३७८ ब.
बेलूर कैफियत– पृ. ३८३ ब.
कार्णिक (Kārnik) कैफियत– पृ. ३८५.
करियापट्टण कैफियत– पृ. ३८८

या भागात ७७८ पृष्ठे असून रेव्हरंड डब्ल्यू. टेलर यांच्या आज्ञेवरून त्यात तामीळ, तेलगू, कन्नड, मल्याळम् आणि मराठी दस्तऐवजांच्या मुळावरून केलेल्या नकला समाविष्ट केलेल्या आहेत. मराठीच्या बाबतीत रेव्ह. टेलर यांनी नेमलेल्या कुणा वेंकटराव नावाच्या कारकुनाने नकला करण्याचे काम केलेले आहे. चुकीचे लेखन (mis-spelt) झालेल्या शब्दांची संख्या मोठी असून लेखन दुर्वाच्यही झालेले आहे. तसेच डी. नंबर १, २ आणि १३ प्रमाणेच याचाही आशय आहे. शेवटचा काही भाग हैदरअल्ली आणि टिपू सुलतान यांच्या सार्वभौम सत्तेबद्दल काही माहिती देणारा आहे. नकलेचा दिनांक १ आक्टोबर १८०४.

**प्रारंभ** : अनेगोंदी रायल समस्थानास दिल्ली पादशाई सरदार x x x खान म्हणार.

फौज घेऊन्न धरणे करणे काय म्हणजे दिल्लीच वकील. दिलेलखान म्हणार पट्टण रायलकडे असतां रायलाकडील मुसती मातबरी व वकील आपले x x x मीलुव आसर सदरप्रमाणे करून एकच ठाणा घालुन दिल्लीया तुम्हास ११,००० हजार होनांचे जागीर लाख अषरफी देतो म्हणुन वकील मजकुर कबुल केला.

**शेवट** x x x ऐसे आहे. यावर टिपुसुलतान याचे x x x होते असे x x हुलमसल बहदुर यांचे कनडी मुनीपी वेंकटरावकडे x x x त्याचे नकल बकसरीक मेजर कर्नल मर्केजी बहदुर सुपरंअडेंट मैसुर सरवीज म्हणेज पैमायष करणार बा तारीख छ १ अकडोबर न १८०४ इसवी कलमी सुबादर जागा मैसुर.

## डी. नंबर ५

**अनेगोंदी कैफियत**
**Anegondi Kaifiyat**

कागद : १७" x ११". मोडी १८ ओळी. जुने. सुधारित (mended) आणि बांधणी केलेले (bound). अपूर्ण. चांगल्या स्थितीत. वाच्य.

या कैफियतीचा पृ. १५२ वर प्रारंभ झालेला आहे. यातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत.

शिवाजी चरित्र (शिवभारत मराठी अनुवाद) पृ. १
शिवाजी चरित्र (शिवभारत मराठी अनुवाद) पृ. ४-७
शिवाजी वंशावळी व माहिती– पृ. १०१.
महाराष्ट्र Brānihanānā पाच जातीची कैफियत– पृ. १०२.
बहु कीर्दी Pāimpout कैफियत– पृ. १०४.
रघोजी भोसले– नागपूर– पृ. १५०.
शाहू राजांची... Rājānciliāhili– पृ. १५५.
पानिपत बखर– पृ. १६८.

पृ. १५२ वर प्रारंभ.

विजयनगर साम्राज्याच्या कृष्णदेवरायाचा जावई रामदेवराय याच्या अनेगोंदी संस्थानाच्या हानीची आणि उत्तर भारतातील मोंगलांनी ते जिंकल्याची अपूर्ण, पण अतिशय जुनी अशी देशी बनावटीच्या हातकागदावर नोंदलेली माहिती (म्हणजे प्रस्तुत कैफियत).

पहिला भाग अपमानित झालेल्या साधूने कृष्णदेवरायाला दिलेल्या शापाच्या संदर्भातील परिस्थिती स्पष्ट करतो. दुसऱ्या भागात राज्यातील काही जलाशयांचे पाणी दूषित केल्याबद्दल रामदेवरायाने एका मुस्लिम संताला केलेल्या शिक्षेची कारणे सांगितलेली आहेत. शेवटच्या भागात मुस्लिम फकिराच्या अपमानांचा बदला घेण्यासाठी अली अदिलशहा, इब्राहिम कुतुबशहा आणि हुसेन निजामशहा या तीन सुलतानांच्या एकत्रित सैन्याने अनेगोंदी राज्यावर केलेला हल्ला आणि अखेरीस रामदेवरायाचा केलेला वध याचा वृत्तांत येतो. अनेगोंदी राज्याची भौगोलिक रचना आणि जिथे रामदेवराय व सुलतान यांच्यातील युद्ध प्रत्यक्ष घडले ती जागा यांचेही वर्णन केलेले आहे. कृष्णा नदीच्या तीरावर हे युद्ध झाले.

**प्रारंभ :** विजयनगरमध्ये किसनदेव रायल राजा राज्य करीत होता. नरबदा नदीचे अलाड अवेष दक्षनच राज्य होत. त्या जवळ लाखो फौज होते. आनगोंदी राजे च हाती बंधा याचे जागा होती. विजयनगरचे वस्ती तीस कोसाची विस्तार होती राजा फार धर्मशील होता. त्यास गुडका करावे म्हणुन छेंद लागला.

**शेवट :** आत कितियेकास सुलुकान मीळुऊन घेऊन मुलुक चा वाटा केले. तेव्हा बिजयपुर तालुकेस आली. अबदलषा पादष जाहाला. दौलताबादे तालुकेस जिजामष भयेरी पादष जाहाला. विदर तालुकेस कुतुबषा पादष जाहावला. या प्रमाणे मुलुक बांदुन घेऊन तीघे पादषा बाईता फाकीन राज्य करून लागलें. त्यावेळ विज्यनगर वैरान जाहले. तेव्हा राजाराजाचे खान दान याल होते. त्यानी अनेगोंदीस आधार करून तेथ केले. अध्यापी त्याचे आवघ दखानचे मुलुकाचे ईस्तबचे फरद नित्य तयार होत आहेत. ऐसे असता टिपुचे उपद्रवा करीता रामराज्याचे खानदान वाले वेंकटपती रायल अनेगोंदी सोडुत सोरापुरांत xxxxxx

## डी. नंबर ६

### अरहडेश्वर कैफियत
### ARAHADESWAR KAIFIYAT

कागद : १४" x १८". मोडी. २२ ओळी. जुने. खराब अवस्थेत. दुर्वाच्य. अपूर्ण.

पृ. ३३ ब वर या कैफियतीचा प्रारंभ होतो. यात समाविष्ट केलेल्या रचना पुढीलप्रमाणे आहेत :



हा श्री हरहडेश्वर स्वामींना सर्मर्पित केलेल्या अर्काटनजीकच्या मंदिराचे मूळ (origin) आणि इतिहास या संबंधीचा देशी हातकागदावर लिहिलेला अपुरा वृत्तान्त आहे. पांडवांनी पिनाकी नदीच्या तीरावर त्यांच्या अज्ञातवासाचा काळ क्रमिला असे सांगितले जाते. (स्थानिक लोकांत या नदीला पिनाकिनी किंवा दक्षिण पेन्नार असे म्हटले जाते.) या हरहडेश्वरस्वामी देवावर त्यांनी पावित्र्याचे संस्कार करून (म्हणजे त्याची प्राणप्रतिष्ठा करून) त्याची आराधना केली आणि त्याचे आशीर्वाद मिळविले. पांडवांनी निवास केला त्या गुहा, अन्न शिजविले ती भांडीकुंडी आणि इतरही काही वस्तूंचे अवशेष तिथे अजूनही अस्तित्वात आहेत असे म्हटले जाते. या देवळाच्या देखभालीसाठी आणि पूजाअर्चेसाठी मोठी देणगी दिलेल्या हिंदू राजाचे नाव लिहिलेले पान खूप खराब झालेले असल्यामुळे त्याचा अंदाज करता येत नाही. तारीख व नकलकाराचे नाव यांची नोंद केलेली नाही.

**प्रारंभ :** पिनाक नदी तीरी कृष्णारण्ये छेत्रात आरहाडनलुर म्हणुन मोटा x x x नदी आहे. ते तिरुकोविलुरास अरध कोष इशान्ये भागी व आरकाटास दक्षेणे आट कोसावरी द्वापर युगीं पंच पांडव वनवास केले. तेथे धर्मराज ईश्वरास पुजा केला करिता ईश्वर प्रतेक्ष जाहाला.

**शेवट :** कितेक दिवसानंतरे ते स्थल पांडवानी सोडुन वनवास पुर्ती होतें वेळेस अज्ञातवास एक वरुष करावयास विराट नगरास निघुन गेले. त्या दिवसापासुन पांडवानी लिंग तेऊन पुजा केले होते. कलियुगात x x x x x महाराजाचे दिवसांत त्या लिंगास देऊळ बांधुन अरहडेश्वर म्हणुन नाव टेऊन पुजा करवीत होता.

## डी. नंबर ७

### असफषाहा कैफियत
### ASĀPHJAHA KAIFIYAT

कागद : ९" x ७ $\frac{१}{२}$ ". मोडी. जुने चांगल्या स्थितीत. वाच्य. अपूर्ण.

डी. नंबर १ मध्ये वर्णिलेल्या भागातील पृ. ३२ अ– वर या कैफियतीचा प्रारंभ होतो.

प्रस्तुत लेखन हे एका मोठ्या भागातून सुटलेला एखादा

छोटा तुकडा असावा असे वाटते. ही कैफियत ९ व्या पानापासून सुरू होत असल्यामुळे पहिली आठ पाने मिळत नाहीत आणि शेवटही अपूर्ण आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. नकलेची तारीख, नकलकाराचे नाव किंवा या कैफियतीतील माहितीचे मूळ यांचा उल्लेख नाही.

निजाम-उल्-मुल्कच्या उप-नामा(Surname) पैकीच असफशहा हे एक आहे. प्रस्तुत लेखनाचे शीर्षक जरी 'असफशहा-कैफियत' असले तरी त्यात ९ उपविभाग असून त्यांतील प्रत्येकात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धातील ऐतिहासिक घटना वर्णिलेल्या आहेत. या काळात मोगल, नबाब आणि मराठे हे या देशाचे राज्यकर्ते होते.

निजाम उल्-मुल्कची बालवयातील अनेकविध शिलेदारी कृत्ये, दिल्लीच्या अलमगीर (औरंगझेब) बादशहाच्या विरोधात त्याने केलेली चढाई, त्याचे दक्षिणेतील विजय, त्याची न्यायदान-क्षमता आणि राज्यविस्तारासाठी त्याने केलेली (इतर) युद्धे यांचे अगदी चित्रमयी शैलीत येथे वर्णन करण्यात आलेले आहे. वेगवेगळ्या मुलकी आणि लष्करी अधिकाऱ्यांची नावे आणि त्यांच्या अखत्यारीत असलेले भूप्रदेश (districts) यांचीही नोंद केलेली आहे.

हिजरी शक ११५५ मध्ये त्याचा मृत्यू झाल्यानंतर बुर्धानपूर (Burdhanpur)च्या तख्तावर बसू इच्छिणाऱ्या स्पर्धकांच्या नावांची एक लांबलचक यादी दिलेली आहे. ४० व्या पृष्ठावर असे लिहिले आहे की असफशहा मराठ्यांचा दोस्त झाला आणि उत्तरेत अनेक लढाया लढला. ४२ व्या पृष्ठावर मॉन्सिअर बुसीचे नाव, हिंदी राजांच्या स्थानीय कामातील फ्रेंचांची ढवळाढवळ, फ्रेंचांनी मोंगलांची बाजू घेऊन लढलेली चोरीकोडे व वरंगळ येथील युद्धे यांचे वर्णन आलेले आहे.

या कैफियतीच्या पाचव्या उपभागात दुसरे कर्नाटकाचे युद्ध किंवा हैदराबादच्या तख्तासाठी नझरजंग व मुझफरजंग यांच्यातील संघर्षाचे तपशीलवार रेखाटन आलेले आहे. यात दोन्ही पक्ष घेणाऱ्या फ्रेंच आणि हिंदी राज्यकर्त्यांची नावे आलेली आहेत. अर्काटचा वेढा, अंबूरच्या (Ambur) युद्धातील अन्वरउद्दीनचा पराभव व पलायन, इंग्रजांची मध्यस्थी, इंग्रज आणि फ्रेंच यांनी मुलुखाचे केलेले सामिलीकरण आणि कर्नाटकातील या वारसा हक्कासाठीच्या लढाईचे निष्कर्ष सांगितले आहेत.

शेवटच्या काही पृष्ठांवर– म्हणजे ४७ ते ११० या पृष्ठांवर– सावनूरची लढाई, तिची कारणे आणि तिचे परिणाम हे स्पष्ट केलेले आहे.

इंग्रज आणि फ्रेंच यांच्या मायदेशातच (म्हणजे युरोपात) निर्माण झालेले (परस्पर) शत्रुत्व, तिचा भारतात झालेला परिणाम, बुसी आणि लाली यांची अकार्यक्षमता, कंपनीच्या आज्ञेवरून त्यांची फ्रान्सला झालेली पाठवणी, इंदूरच्या होळकरांनी केलेली मदत, विश्वासराव पेशवा व नाना फडणीस यांचे मृत्यू, पेशवा म्हणून माधवरावांची झालेली नेमणूक, कर्नाटकातील चौथाईचा वसूल, त्यात होळकरांनी बजावलेली भूमिका, पश्चिमेला मराठ्यांच्या दरबारातील कारस्थाने आणि कर्नाटकाच्या नबाबांचा संक्षिप्त इतिहास यांची रेखीव वर्णने यात आलेली आहेत.

**प्रारंभ :** दिलीमधे आलंगीर बादषाचे वेळे किलीचखान सरदार बादबाई होते. त्याचे उदरी पुत्र जाहले. त्याचे नाव गजुदीन खान फ्रोज जंग. त्याचे उदरी पुत्र जाहाले. त्याचे नाव निजाम मुलु मुलुक असबजा बहदर. यावरी अलंगीर पादषाचे फार दया होती.

**शेवट :** xxxx तेही लुटुन अषषे हवेली यास आग लावली xxxx होळकराची जाहगीर आहे ते देवस्थानची जागा होती. तेथ एक मोकाम केले तेथ नवाब सलबतजंग मोगल आली त्वान व राजे रामचेंद्र मिळुन फितुर करून रघुनाथरायास पत्र लिहीले कि अम्ही एकत्र तुम्हास भेटतो मग अवगी मिळुन निजामालीखानास मारून घेऊन म्हणुन निहीले. त्यानीही कबुल केले.

## डी. नंबर ८

अहमदनगर कैफियत
**AHAMADNAGAR KAIFIYAT**

कागद : फ्रेंच बनावटीचा ८" x ६". १४ ओळी. मोडी. खराब अवस्थेत. अपूर्ण.

या कैफियतीतील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
विजापूर बहादूरशहा कैफियत
गोपीचंद बखर
गुजराथ प्रांती कैफियत
वामूर (Vāmoor) कैफियत
सोनिन (Sōnin)
कुइया गवून (Kuia Gavun)
तामकाबाद आणि औरंगाबाद
अहमदनगर कैफियत
रोझी (Rozee)
अहमदनगर कैफियत, इत्यादी.

या भागाच्या ५९ व्या पृष्ठावर प्रस्तुत कैफियत सुरू होते. हस्ताक्षर चांगले व वाच्य आहे. पृष्ठे खराब अवस्थेत आहेत.

पहिल्या पानावर श्रीगणेशाची एक प्रार्थना आहे. जरी पहिली आठ पाने गहाळ झालेली असली तरी अहमदनगरच्या किल्ल्याची निर्मिती आणि इतिहास पूर्ण स्वरूपात आलेला आहे. हे मोठे शहर रामदेवरावाच्या कारकीर्दीत एक छोटे खेडेगाव होते हे या कैफियतीत प्रारंभीच स्पष्ट केलेले आहे. या स्थानाची भौगोलिक रचनाही स्पष्ट करण्यात आलेली आहे. त्यानंतरची चार पृष्ठे अहमद निजामशहा याच्याकरवी रामदेवरावाचा झालेला पराभव आणि मृत्यू याचे वर्णन करतात. नायक राजाचा कारभार आणि राज्याची स्थिती मोठ्या रेखीवपणे वर्णिलेली आहे. हे छोटे खेडेगाव अनेकांकडून अनेक नावांनी ओळखले जायचे असे सांगितले जाते. अहमदशहाने या खेड्याच्या अन्तर्भागात किल्ला बांधला आणि त्याला आपल्या वडिलांचे नाव दिले. अनुक्रमे मोगल, मराठा आणि इंग्रज यांनी केलेल्या स्वाऱ्यांच्या वेळेचा या प्रख्यात किल्ल्याचा इतिहास मोठ्या तपशीलवार रेखीवपणे सांगितला आहे. ही कैफियत अहमदनगरला राज्य केलेल्या सर्वच राजघराण्यांचा परिचय करून देते. वेढे, लढाया, विजय आणि पराजय अशा या किल्ल्याशी संबंधित घटना स्पष्ट केलेल्या आहेत. या किल्ल्यात राहिलेल्या हिंदू आणि मुसलमान अधिकाऱ्यांच्या नावांची यादी आणि तिथे असलेले दरवाजे, दालने, राजवाडे व इतर इमारती यांची नावे व वर्णने दिलेली आहेत. मराठ्यांचा पराभव करण्यात आणि प्रस्तुत किल्ला आपल्या राज्यात सामील करून घेण्यात इंग्रज कसे यशस्वी झाले याबद्दलच्या मजकुराने प्रस्तुत कैफियतीची सांगता होते. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ यांचा निर्देश केलेला नाही. २८ डिसेंबर १८०५ रोजी ही कैफियत नकलली गेली आणि ती कर्नल मॅकेंझी यांचेकडे पाठविली गेली, अशी मात्र नोंद आहे.

**प्रारंभ** : श्रीराम प्रसन्न, शहर अहमदनगर कैफियत. श्रीगणेशमयाः टिकापुर्वी द्वापर आंती व कलीयुग प्रारंभी भृगुरुषी यानी प्रथीवीची संच्यार करीत तपवास करणे बदल हा टिकाणास आले.

**शेवट** : बातारीख छ २८ माहे इशतवी दर जाग अहमदनगर xxxx

## डी. नंबर ९

**अहमदनगर कैफियत**

**AHAMADNAGAR KAIFIYAT**

कागद : इंग्लिश बनावटीचा ७" x ५". १५ ओळी. मोडी. खराब अवस्थेत. अपूर्ण.

डी. नंबर ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या ४७ व्या पृष्ठावर प्रस्तुत लेखन सुरू होते. हस्ताक्षर चांगले असून वाच्य आहे. इथे राज्य केलेल्या काही राजांचे उदय व इतिहास यासंबंधी केलेल्या चौकशीवरून नारायणराव यांनी तयार केलेल्या वृत्तांताची ही अपूर्ण नक्कल आहे असे दिसते. याला ना वेगळे शीर्षक आहे, ना शेवट. अहमदनगर आणि त्याच्या परिसराच्या भौगोलिक रचनेचे आणि तेथील मंदिरे, थडगी व मशिदी यांचे थोडक्यात वर्णन केलेले आहे. प्रस्तुत स्थानाचे मूळ व इतिहास यासंबंधी आपण काहीही माहिती मिळवू शकलो नाही याची लेखकाने कबुली दिलेली आहे. ही कैफियत अपूर्ण असल्यामुळे लेखकाचे नाव वा तारीख सांगणे शक्य नाही.

**प्रारंभ** : छ १७ दिवसी गावात मुकाम जाहाले. तेथे कोणी ब्राह्मण नाहीत. शोध केलेया सांगणार नाहीत.

**शेवट** : श्रीमंत पेशवेकडोन ज्यागीर जाहाले अहे. तेथील कैफियत. येवडच कलम.

## डी. नंबर १०

**अहमदशा हसनगंगु बामणी**

**AHAMADSHA HASAN GANGU BAMANI**

कागद : इंग्लिश बनावटीचा. ८" x ६". १८ ओळी. मोडी. चांगल्या अवस्थेत.

या भागातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
शालिवाहनाची भाके (Bhaken)
शिवाजी शान (Shan) राज
निजामुलमुल्क कैफियत
चंद्रकुटी तालुका
शिवाजीराजा व निजाम मुलल्क
सत्यहरिश्चंद्र कथा आणि इतर रचना

सदरहू कैफियत या भागाच्या पृ. २०२ वर सुरू होते. जरी या भागातील पानांची योग्य क्रमांक देऊन बांधणी झालेली नसली तरी प्रस्तुत कैफियत पूर्ण आहे. तीत बामनी (बहामनी) राज्याचा संस्थापक अहमदशहा हसन गंगू बामिन याचा जन्म आणि इतिहास सांगितलेला आहे. पहिली काही पाने या बामनीचे घराणे (parentage) आणि बालपण यांची माहिती देतात. या राजघराण्याला बामनी घराणे कसे म्हटले गेले याचे स्पष्टीकरण

कैफियत करते. पुढची काही पाने अहमदशहाने केलेला राज्यविस्तार आणि विजापूरचे सुलतान व काही हिंदू राजे यांच्या विरोधात केलेल्या यशस्वी लढाया यांचे वर्णन करतात. शेवटचे पान अहमदशहाच्या राज्यकारभाराविषयीची माहिती देते. काही घटनांच्या तारखा हिजरी कालगणनेत दिलेल्या आहेत. लेखकाचे नाव किंवा प्रस्तुत बखरीच्या लेखनामागच्या माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** श्रीगणेशाय नमः श्रीगुरुप्रसन्न अर्जदस्त अर्जबंदगी वंदे कमीन कमर्तारी नंवदणी सुर अली खान पटान बहदुर बिज्यापुर सुरसग ११३९ माहे शाबान साहेब चिकैन नजरकडुन

**शेवट :** x x x लिहुन पाटवुन त्यासी लुटुन घेणे आल्लाहुतालास जे करणे होईल ते डाडेल. लेकीन बीलफेल ते कुफारास लुटुन घेणे. षाहरात पटण व रोहिल व वजीर व उमरा बहुतेरे बोकार आहेत. त्यास बोलावुन दरमाहे पाच हजार रुपये देणगी दितले.

## डी. नंबर ११

**आर्काट कैफियत**
**ĀRKĀT KAIFIYAT**

कागद : ८ $\frac{१}{२}$". १६ ओळी. मोडी. जुने. खराब अवस्था (दुरुस्ती व बांधणी– mended and bound), दुर्वाच्य. अपूर्ण.

भाग ३७ च्या पहिल्या पृष्ठावर या कैफियतीचा प्रारंभ झालेला आहे. चतकोर (quarter) आकाराच्या १८ हात-कागदांचा हा एक दुरुस्त्या केलेला बांधीव, कमी जाडीचा भाग आहे. पुसता न येणाऱ्या शाईने तो लिहिलेला असून अतिशय जीर्ण अवस्थेत आहे. अर्काट आणि त्याचे संस्थापक यांचा उदय व इतिहास यांचे वर्णन संपूर्ण भागात केलेले आहे. प्रस्तुत घटना मूळच्या लेखनावरून अनेक लोकांनी नकललेली आहे असे दिसते. नकलकाराचे नाव, कैफियतीतील मजकुराच्या माहितीचे मूळ आणि नकलेची तारीख यांचा उल्लेख नाही. काही पृष्ठांवरील विशिष्ट मजकूर इतका खराब झालेला आहे की त्यातील आशय समजू शकत नाही.

पहिल्या पृष्ठावर अर्काट या खेड्याची नेमकी जागा आणि त्याचे भौगोलिक वर्णन देण्यात आलेले आहे. एका मुस्लिम संताने एका मुस्लिम मुलाला आशीर्वाद कसा दिला आणि तो मुलगा सुलतान कसा झाला याचे तपशीलवार लेखन केलेले आहे. तैमूरलंगाची पूर्वज-परंपरा, तो दिल्लीचा बादशहा कसा झाला आणि बाबर, हुमायून, अकबर, शहाजहान व औरंगझेब यांचे यशस्वी राज्यारोहण कसे झाले हे यात सांगितले आहे. मोगलांच्या राज्यात अर्काट हे मोगल साम्राज्यात गणले जात होते याची नोंद केलेली दिसते. पुढे विजयनगर आणि मोगल साम्राज्य यांचे पतन आणि मराठ्यांचा उदय यांचे तपशीलवार वर्णन येते. विजापूरच्या सुलतानाचा उदय व अस्त, मराठा राज्यसंघाचा ऱ्हास आणि पहिल्या कर्नाटक युद्धाची कारणे, राजाराव व मुरारराव यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी त्यात बजावलेली भूमिका, अर्काट व जिंजी यांवर त्यांनी मिळविलेला ताबा यांचीही नोंद केलेली दिसते. शेवटच्या तीन पृष्ठांत अर्काटचा नबाब आणि हैदराबादचा निजाम यांना मदत करण्यासाठी इंग्रज व फ्रेंच यांनी केलेल्या हालचाली आणि अखेरीला लॉर्ड क्लाइव्हचा विजय व ईस्ट इंडिया कंपनीशी अर्काटचे राज्य जोडले जाणे याचे वर्णन केलेले आहे. सर्व कैफियतीत महत्त्वाच्या घटनांच्या संदर्भात हिजरी पद्धतीच्या तारखा दिलेल्या आहेत.

**प्रारंभ :** कैफियत आर्काट देक्षण कर्नाटकांत पायन घाठस्वाले श्रीकंचीस पश्चम भागी xxxx वेलुरास पुर्वेसा दाहा घटीकाचे वाटी आरकाड म्हणुन नावी xxxxxx सिवाय दाऊदखान म्हणार दिल्लीहुन पादषईकडुन xxxx आरकाडचे मैदानांत उतरून षहर वसऊन किल्लाही बांदुन तेथ कहीं दिवस xxxx सुभे अनगोंदी वेथच राहुन लागला. करिता आरकाड वगैरे उत्तर कृष्णपासुन दक्षण कन्या कोमरी व रामेश्वर परीयेत नबाबाचे कज्यामुळे मुलुक साधून त्या पाठीमाघे वरून आरकाड सुभ्भा म्हणुन नाव पावले. ते विस्तार अबल पादषाहा पासुन लिहीले आहे.

**शेवट :** अपूर्ण असल्यामुळे 'शेवट' नाही.

## डी. नंबर १२

**आफसरकोट कैफियत**
**ĀPHSARKOT KAIFIYAT**

कागद १४" x ८ $\frac{१}{२}$". मोडी. १५ ओळी. जुने. चांगली स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ९ वर सुरू होणारी ही कैफियत नरसिंहस्वामींना समर्पित केलेले मंदिर आणि दुर्गा देवतेचे मंदिर अशा दोन मंदिरांच्या इतिहासाशी संबंधित आहे. कपिल ऋषींनी उमा पर्वतांवर (Uma

Parvathar) ही दोन्ही मंदिरे बांधली असे सांगितले जाते. श्रीमद्शंकराचार्य स्वामींचा शिष्य असलेल्या एका सत्यानंद सरस्वती यांनी तिथे एक मठ उभा केला. या मठाची देखभाल आणि दोन्ही मंदिरांची पूजाअर्चा यांसाठी मंजूर केलेल्या देणगीचा तपशीलही प्रस्तुत कैफियतीत दिलेला आहे. टिपू सुलतानाने ही देणगी जप्त केली आणि काही व्यक्तींच्या प्रयत्नांमुळे नंतर ती ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात पुन्हा सुरू केली गेली याचीही नोंद केलेली आढळते.

इंग्लंडमध्ये तयार केलेल्या कागदावर चांगल्या हस्ताक्षरात जरी या कैफियतीचे लेखन झालेले असले तरी तिचा अभ्यास करताना काही अडचण ही जाणवतेच. कारण तीमधील पृष्ठे योग्य क्रमाने रचलेली वा एकत्र बांधलेली नाहीत. नकलकाराचे नाव आणि कैफियतीतील मजकुराचे मूळ यांची नोंद केलेली नाही. कैफियतीच्या प्रारंभीच तिचे लेखन अक्षय (AK'sya) वर्षाच्या चैत्र महिन्याच्या १३ व्या दिवशी केले असल्याची नोंद आहे.

**प्रारंभ :** अक्षये संवछर चैत्र बहुल १३ सी रोजी लिहील जे आफसर कोड माहात्म्य. पुर्वी कपिल माहामुनेश्वराच आश्रमांत तेथे फार दिवस स्सेस्वरानी तपश्चर्या करीत होते हाल आहेत.

**शेवट :** xxxxxx टिपुसुलतान दिवसीत उतार जत्फी नंतरें देवाच पूजा चालत नाही जाहल वरून सरकारहुन दिवी १० दाहा होन देवीत होतें हाल कुंपणी सरकार जाहाले वरी देवाच पूजा साही तसदीक देवी ६७ साहा होन देवीत होता. हाल कुंपनी सरकार जाहाले वरी देवाचे पुजे साटी तसदीक बेरीज ६७ ग्होनावर तो. कचेरीहुन तहसीलदार देवीत आहे.

## डी. नंबर १३

### अफसरकोट मट माहात्म्य
### ĀPHSARKOT MUTT MĀHĀTMYA

कागद : इंग्लिश बनावटीचा १६" x ८ $\frac{१}{२}$". मोडी. १४ ओळी. पूर्ण.

डी. नंबर ६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. १३ वर सुरू होत असून इंग्लिश बनावटीच्या कागदावर ती चांगल्या तऱ्हेने लिहिलेली आहे. तिला याआधीच्या १२ क्रमांकाच्या कैफियतीचे दुसरे प्रकरणही म्हणता येईल. काही धबधबे, जलाशय आणि मंदिरे यांचे मूळ व इतिहास यांबद्दलची माहिती इथे देण्यात आलेली आहे. काही जलाशयांतील पवित्र पाण्याच्या सामर्थ्याविषयीच्या आख्यायिका रेखीवपणे वर्णिलेल्या आहेत. ही जागा म्हैसूर राज्यात वसलेली आहे असे नमूद केले आहे.

कैफियतीच्या पुढच्या भागात काही गुहांची वर्णने आलेली आहेत आणि तिथे पांडवांनी अज्ञातवासात वसती केली होती असे सांगितले आहे. या ठिकाणाला हैदर आणि टिपू सुलतान यांच्या कारकीर्दीत महत्त्वाच्या शहराचे स्थान प्राप्त झाले आणि आता अस्तित्वात असलेला किल्ला हैदर अलीखानाने बांधला असेही नमूद केले आहे. लेखकाचे नाव व माहितीचे मूळ यांची नोंद केलेली नाही.

**प्रारंभ :** xxx अफसर तीर्थ कोणे ते प्रोजाहले म्हजुन विचारीले वरी सांगीतले जें अफसर स्त्रीया व देवकन्या आदी करून येऊन जलक्रीडा करीत होते म्हणुन अफसर तीर्थ नाव प्राप्त जाहाले.

**शेवट :** xxx येऊन च्यारी पांच पुरुष तलावात पाणी धडधड अवाजे कडुत पडत आहे. अमनुषानी केलच नव्हे. देवतामहिमा कृतखेर ह गडें वरच दोनी ओडचे जमीन सेतचे आहे मणुन लिहुन दिलें कैफियत.

## डी. नंबर १४

### उज्येयनी राजे लोकांची कैफियत
### UJJAINI RĀJ LŌKĀNIC KAIFIYAT

कागद : २२" x १२". मोडी ३० ओळी. जुने चांगल्या अवस्थेत. वाच्य. पूर्ण.

यात समाविष्ट असलेल्या रचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. कर्नाटकातील राजकर्ते– पृ. ६६९ ते ६७४.
२. पेरियापट्टण कैफियत– पृ. ६७५ ते ६८०.
३. बलल (Balal) दुर्ग कैफियत– पृ. ६८० ते ६८२.
४. हेल्ले बदोई (Helle Badōi) कैफियत– पृ. ६८२ ते ६८९.
५. कोपम कैफियत– पृ. ६८९ ते ६९०.
६. नानासाहेब कैफियत– पृ. ६९१ ते ७२७.

या कैफियतीचा प्रारंभ पृ. ६६५ वर झालेला आहे.

या मोठ्या भागात ७२७ पृष्ठे आहेत. मि. हेलर यांच्या सूचनेवरून तामीळ, तेलगू, मल्याळम, कन्नड आणि मराठी भाषेतील कितीतरी कैफियती व इतर ऐतिहासिक दस्तऐवज मुळातील हस्तलिखितांवरून नकलून प्रस्तुत भागात अंतर्भूत केलेले आहेत. मोडी लिपीत लिहिलेली पहिली मराठी कैफियत पृ.

६६५ वर दिसते. तीमधील हस्ताक्षर चांगले आणि वाच्य असले तरी तीत अशुद्ध लेखन केलेल्या शब्दांचा भरणा मोठा असून विरामचिन्हांचा वापरही चुकीचा केलेला आहे.

पृ.६६५ वर असे लिहिलेले आढळते की, २० क्रमांकाच्या हस्तलिखिताच्या एका मोठ्या भागातील ही तिसरी कैफियत आहे. आणि प्रस्तुत कैफियतीच्या अखेरीस असे सांगितले आहे की, अहमदनगर येथील एका मशिदीत असलेल्या मूळ हस्तलिखितावरून दि. ११ मे १८०६ रोजी आनंदराव यांनी ती नकललेली आहे.

प्रारंभीच्या काही पानांवर अजमेरला राज्य केलेल्या काही मोगल राजांची नामावली दिलेली आहे. कैफियतीच्या दुसऱ्या भागात काही मराठी राज्यातील प्रमुख (chieftains) नाना फडणवीसांसारखे पेशवे आणि इतर महत्त्वाच्या व्यक्ती यांच्याविषयीची थोडक्यात माहिती दिलेली आहे. त्यांनी अजमेरच्या मोगल राजांवर केलेल्या चढाया, केलेले संघर्ष आणि लढाया, यांविषयीचीही माहिती दिलेली आहे. (marches, conflicts and wars)

सुंदरराव नावाच्या कुणा एका कारकुनाने प्रस्तुत कैफियतीची नक्कल तयार केली असे तिच्या अखेरीस सांगितले आहे.

**प्रारंभ :** कैफियत कमर आलीखानाचे उत्पि व आजमीर मुता. तालुका इंदुस्थान बाा. लिहिवीले कैफियतपूर्वी ७००१ से वर्षाखाले xxxxxxxx फकीराचे xxxxxx देव प्रो भुभाग लोक हासीलसाली होऊन पहिले तपशलि वार कलम केला आहे.

**शेवट :** हली पट्टणास एऊन एक महिना मुकाम करून मग ती वटतर जातेल. xxxxxx एक महिना खंटावा त्या नंतर हजरतं मेजर कलनल मकीजी साहेबचे मुक्कामी xxxxxx व त्याचे कैफियत लिहून घेणेस मैसुर साहेबाचे निरोपा प्रमाणे लिहीले तें बिकलम आनंदवाव खत तारीख छ ११ माहे मे सन १८०५ इसवी.

## डी. नंबर १५

### औरंगाबाद उर्फ सुभे खुजस्ते बुनिया
### AURANGABAD URPH SUBE KHUJASTE BUNIYĀ

कागद : १३.५"x९.५" ओळी २०. मोडी. जुने. वाच्य. चांगल्या स्थितीत. पूर्ण.

पहिल्या पृष्ठावर प्रारंभ होतो.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या २६७ पृष्ठांचा हा एक मोठा भाग असून त्यात औरंगाबाद, जालनापूर, सोलापूर आणि अहमदनगर या जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुके-महालांतील (firkas) खेड्यांची एक यादी दिलेली आहे. स्थानिक राज्ये आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्याकडून जमीनदार व रयत यांच्यावर आकारलेला व प्रत्यक्ष वसूल केलेला कर यांची नोंद केलेली आहे. नक्कल करणाराचे नाव, यातील मजकुराच्या माहितीचे मूळ किंवा नक्कल केलेली तारीख यांचा उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ :** सुभे खुजस्ते बुनियाद उर्फ औरंगाबाद सरकार व माहाल सुमार तपशील.

**शेवट :** सरकार बीड व अन परगणे मजकुर एकुन सरकार परगणे बिनतनरखा सदरी प्रो. मोकरर साहासतीन ६०५.

## डी. नंबर १६

### कंड आरसी कोट पालेप्ट कैफियत
### KAṆDAARSI KOṬĀ PĀLEPAT KAIFIYAT

कागद-१३"x८.५". मोडी. चांगल्या स्थितीत. जुने, वाच्य, संपूर्ण.

यात समाविष्ट केलेल्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत.
भोज (Boja) राजपट्टण कैफियत-पृ. १ ते ५.
तोंडरमंडल कैफियत– पृ. ६ ते १३.
तोंडरमंडल जैन कैफियत– पृ. १३ ते २२.
तिरुवाकराज कैफियत– पृ. २३ ते २८.
कपिस्थलम कैफियत– पृ. २९ ते ३२.
नागूर कैफियत– पृ. ३३ ते ४५.
कंड अर्सी कोट्टाई कैफियत– पृ. ४६ ते ४९.
पंडनल्लूर कैफियत– पृ. ५० ते ५२.
तिरुनेगेश्वरम् कैफियत– पृ. ५३ ते ५५
प्राउल वैट्ट शेठी व पापाकोविल Proul Vaitta Sethi Va Pāpākovil– पृ. ५६ ते ५९.
दीपमकुडी कैफियत– पृ. ५९ ते ६१.
घोरपडे यांची कैफियत– पृ. ६१ (ब) ते ६९.

प्रस्तुत कैफियत पृ. ४६ वर सुरू होत असून तीत वर उल्लेखिलेल्या पालिपूट (ता. पट्टूकोटाई, ति. तंजावर Pattukottai) या खेड्याचे मूळ आणि इतिहास यांचे वाच्य हस्ताक्षरात देशी हातकागदावर वर्णन केलेले आहे. ही कैफियत २८ फेबुवारी १८१८ मध्ये तयार केली गेल्याचे सांगितले आहे. प्रस्तुत खेडे शैव संप्रदायाचे मोठे तीर्थक्षेत्र गणले जात होते अशी

पृ. ४९ वर नोंद केलेली दिसते. वरदराज पंडरथर या कंडासीकोट्टाई येथील जमीनदाराच्या प्रयत्नामुळे हे गाव अस्तित्वात आले अशी माहिती प्रस्तुत खेड्याचे मूळ शोधताना जमविली गेली आहे. या संस्थापकाच्या वंशजांची नामावली आणि पालिपुटमधील देवळे व जलाशय यांचेही वर्णन करण्यात आलेले आहे. शेवटी याच खेड्यात राहणाऱ्या कुणा पोलिगर (Poligar पाळेगार) कुटुंबियांपैकी जुन्या ताडपत्रावर लिहिलेली ही सर्व माहिती उपलब्ध झाली आहे असे म्हटले आहे. नकलकाराच्या नावाचा उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ** : कैफियत कंडआरसी कोठ पाळेपट तालुका पडुकोट सुभे तंजावर सन १८१८ इसवी तारीख छ १८ माहे फेबरवरी हे गंडरकोटचे पाळेगारचे ज्यात वन्नियर चेंद्र वंशाचे राजे– यानी पुर्वी असणेच स्तळ काचीपट्टण तेथ यांचे मुळ पुरुष वरदराज पंडारतार यास पंडारतार म्हणुन नाव कैसे म्हणजे पुर्वी आदिवीर रामपांडीय म्हणार राजा दौलत करीत असतान क्षत्रियांमध्ये शास्त्र प्रमाणे तीनी ज्यातीमध्ये विवाह करून घेऊ ये म्हणायाच वचन आहे करिता क्षत्रियांमधे एक पोर सुद्रामध्ये एक पोर ऐसे विवाह करून घेतला.

**शेवट** : हे कंडआरसी कोठा दाहा वरुषारवाले फार काही राण. त्यां मध्ये राणचे बैल व रढे वगैरे अनेक तरायांचे मृग होत. आता राण दरोबस्त हीं तोडुन टाकीक्तयामुळे– सदरी मृग वगैरे या स्थल सोडुन पुडुकोटचे राणास गेले.

### डी. नंबर १७

**कंडआरसीकोट पाले कैफियत**

**KANDA ĀRSIKOTTĀ PĀLE KAIFIYAT**

कागद : $९\frac{१}{२}$ x $६\frac{१}{२}$". मोडी. ओळी १६. जुने. खराब अवस्थेत. वाच्य. पूर्ण.

यातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत:

समयपरची (Samayaparaci) माहात्म्य– पृ.१ ते ६.
थोंडर मंडलम् कैफियत– पृ.११ ते १९.
कुरम्बधार कैफियत– पृ.१९-२०
थोंडरमंडल जै(न) कैफियत– पृ.२१-२५
थोंडरमंडल जैन कैफियत– पृ.२१-२५
मम तीर्थंकर चक्रवर्ती कैफियत– पृ.२६-३८
तिरुवाकरिय कैफियत– पृ.३९-४८
कपिस्थलम् कैफियत– पृ ४९-५५
नागूर कैफियत– पृ.५७-७४
कंडआरसी कोट कैफियत– पृ.८१-८८
पंडनल्लूर फोर्ट कैफियत– पृ.८९-९६
तिरुंगेश्वर कैफियत– पृ.९७-१०२
दीपम कुडाई (Kudai) कैफियत– पृ.१०७-१११
घोरपडे कैफियत– पृ.११३-१२३.

पृ. ८१ वर ही कैफियत सुरू होते. या भागातील कागद वेगवेगळ्या आकारांचे आहेत. यातील काही देशी तपकिरी (brown) रंगाच्या हातकागदावर तर काही पांढऱ्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिल्या आहेत. प्रस्तुत कैफियत डी. नंबर १६ ची सरळ सरळ नक्कल आहे असे दिसते. दोन्हींचा विषय एकच आहे. नक्कलकाराचे नाव, नकलेची तारीख आणि नक्कल करण्याची कारणे याबद्दलचे उल्लेख नाहीत. डी. नंबर १६ प्रमाणेच प्रारंभ व शेवट आहेत.

### डी. नंबर १८

**कपिस्थल कैफियत**

**KAPISTHAL KAIFIYAT**

कागद : $८\frac{१}{४}$"x १३". मोडी. १५ ओळी. जुने, खराब अवस्था. वाच्य. पूर्ण.

ही कैफियत पृ. २९ वर सुरू होत असून त्यात समाविष्ट केलेल्या रचना डी. नंबर १६ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत.

ही कैफियत कपिस्थलम् नावाचे खेडे आणि गजेंद्र वरदराज स्वामी यांना अर्पण केलेले देऊळ यांचे मूळ व इतिहास यांचे वर्णन करते. दैवी गड (हत्ती) असणाऱ्या गजेंद्राला विष्णू देवाचे आशीर्वच लाभले ती हीच जागा असून नंतर या मंदिराची आराधना श्रीराम आणि नल राजा यांच्याकडून केली गेली असे सांगितले आहे. मंदिराची दुरुस्ती, जादा केलेले बांधकाम आणि मंदिरातील शिलालेख हे राजेंद्र चोल (chola) याच्या करवी झाले असे सांगितले जाते. जलाशयांची नावे आणि कपिस्थानचा परिसर यांचेही वर्णन केलेले आहे. या कैफियतीच्या प्रारंभी इंग्रजी भाषेत असे नमूद करण्यात आलेले आहे की, मंदिराच्या भिंतीवरील शिलालेख आणि ताडपत्रावरील हस्तलिखिते (जी मंदिराच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात होती त्यांच्याकडून) मिळवून ही सर्व माहिती ३० मार्च १८१८ रोजी तयार करण्यात आलेली आहे. नक्कलकाराचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ** : कैफियत कपिस्थल. तालुका तिरुवैय्यार सुभे तंजावर. सन १८१८ इसवी त ॥ ३० माहे मार्च पूर्वी हे

कफिस्तलास चेंपकवन म्हणायाची राण वाहडुन तेथे एक लहण आनदी नरसी व्हाची देवालय होत. ते करता या स्थलास नरसव्हि क्षत्र म्हणोन नाव आला. आसे ऐसे काही दिवस जाहाल्य नत्रें रामावतारांत अनेक कपिनी उदभवून हे स्थळ काही रमणीय कडून असणेच पाहून इकडे जलक्रीडा केले.

**शेवट :** तेव्हा मासाळेयाची हाड त्याचे घशात अडकून नंतर सर्प एवून मधील अंगणात बसून तोंड उघडून दाखविताना घरचे दरोबरतत्तही मिळून पाहाताना घशांत हाड अडकले होत. ते पाहून हळू काहडून टाकिले तेव्हा सर्प अर्ध घटीका पावेतो मुध्यगित होऊन मग उटुन गावास एक प्रदक्षण करून आपले डोसक्यान खाले तीनीदा बडवून निघून गेले. आणि रात्री स्वपनामध्ये एऊन सांगितले की इतः पर हा कफिस्थळी सर्प द्रिष्ठी झालियांने विष वेधणार नाही म्हणोत सांगीतलें. तधी पासुन हा स्थळी आजवर पावेतो ही सर्प चावली यान विष वेधत नाही.

### डी. नंबर १९

**कपिस्थल कैफियत**
**KAPISTHAL KAIFIYAT**

कागद : इंग्लिश बनावटीचा ९" x ४ $\frac{१}{२}$". मोडी. १२ ओळी. जुने. खराब अवस्थेत. वाच्य. पूर्ण.

या भागातील इतर समाविष्ट रचना डी. नंबर १६ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत.

पृष्ठ ४९ वर प्रस्तुत कैफियत सुरू होत असून ती देशी हात कागदावर नोंदलेली आहे. ती मुळातील एका ताडपात्रावरील मजकुराची नक्कल असून ३० मार्च १८१८ रोजी ही नक्कल उतरविण्यात आली असे प्रारंभीच सांगितले आहे. नक्कलकाराच्या नावाचा निर्देश केलेला नाही.

जिल्हा तंजावर, तालुका तिरुवईर येथील कपिस्थल नावाच्या एका खेड्याचे मूळ आणि इतिहास यांचे निवेदन प्रस्तुत कैफियतीत केलेले आहे. श्री गजेंद्र वरदस्वामी यांचे पावित्र्य आणि सामर्थ्य सांगणाऱ्या आख्यायिका आणि पौराणिक कथा यात वर्णिलेल्या आहेत. वर उल्लेखिलेल्या मंदिरातील एका शिलालेखात आढळणाऱ्या माहितीवरून ही कैफियत तयार केली गेल्याचे सांगितले आहे. मंदिराला जोडून असलेल्या इतर इमारतींची दुरुस्ती व वाढ आणि (तेथील) जलाशय यांचे काम राज राज- दि ग्रेट याने केले असे म्हटले जाते.

सदर कैफियत या खेड्याचा आणि इतर काही मंदिरांचा स्थानिक इतिहासही सांगते. याविषयीच्या सर्व हकीकती तेथील मंदिरात नोकरी केलेल्या एका वृद्ध नोकराकडून एकत्र केलेल्या आहेत असेही पुढे सांगितले आहे.

**प्रारंभ :** पूर्वी कपिस्थळ चेंपक वन म्हणावयाचे राण वाहाडुन तेथ एक लहाण अनादी नरसींव्हाचे देऊळ होतें करितां या स्तळास नहसीव्ह क्षेत्र म्हणुन नाव आल. ऐसे काही दिवस जाहल्यानंतर रामावतारामध्ये अनेक कपिनी उद्भवून हे स्थळ फार काही रमणीय कडून जलत्रीण काष्ट समुर्धी वाणी आहे. यथे काही दिवस वास करावे म्हणायचा तात्पर्येकडोन हा स्थलास एऊन अनेक दिवस वास केल्याकरितां त्या क्षेत्रास कपिस्तळ म्हणून नाव आल.

**शेवट :** यात नैरुती भागी तीर्थ आहे. त्यास पुर्व भागी एक तीर्थ आहे. येण प्रमाण तेथील देवुळचे स्थानीक ४ च्यार जग मीळुन सांगितल्याप्रमाणे लिहिले असे बातारीख ३० माहे मार्च सन १८१८ इसवी.

### डी. नंबर २०

**कमरआलीखान वतन कैफियत**
**KAMARĀLIKHĀN VATAN KAIFIYAT**

कागदः १० $\frac{१}{२}$" x ८". मोडी. १८ ओळी. जुने. खराब अवस्था. दुर्वाच्य. पूर्ण.

यात समाविष्ट केलेल्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
लोहदण्ड- पंढरपूर कैफियत– पृ.१ ते ५८
अहमदनगर कैफियत– पृ.५९ ते ७८
कमरआलीखान कैफ़ियत– पृ.७९ ते ८८
पट्टण- गुजराथ कैफियत– पृ.८९ ते १०१
विक्रमकथा– पृ.१०२ ते १५२
आनंदाराव अहवाल– पृ.१५३ ते १७०

या भागात वेगवेगळ्या आकारांची १७० पृष्ठे असून त्यांतील काही फ्रेंच बनावटीच्या कागदाची आणि इतर देशी हातकागदाची आहेत. अनेक नक्कलकारांनी नकललेल्या कैफियतींचा हा एक संग्रह आहे असे दिसते. कमरआलिखानाची कैफियत पृ. ७९ वर सुरू होत असून शाई अतिशय पुसट झाल्यामुळे त्यातील काही वेधक भाग अर्थ लावण्याच्या पलिकडे गेलेले आहेत.

दिल्लीवर राज्य केलेल्या कुतुबशाही राजवटीतील काही सुलतानांचे वर्णन पहिल्या चार पानांत येते. त्यांचे प्रवास आणि चढाया, त्यांच्या राजवटीतील काही महत्त्वाच्या घटना आणि त्यांच्या

मंत्र्यांची नामावळी यांची नोंद केलेली आहे. शेवटच्या तीन पृष्ठांत नाना फडणवीस आणि सवाई माधवराव यांच्या दरबारास भेटी देणाऱ्या (ज्याचे नाव वाचता येणार नाही इतके हस्तलिखितात खराब झालेले आहे अशा) सुलतानाच्या प्रवासाचे वर्णन आलेले आहे. कॅप्टन मॅकेंझी यांच्या आज्ञेवरून आनंदरावाने सदरहू कैफियत ११ मे १८०५ रोजी नकललेली आहे असा शेवटच्या भागात निर्देश केलेला दिसतो. सर्व कैफियतभर अतिलेखन (overwritting) आणि खाडाखोड मोठ्या प्रमाणात दिसून येते.

**प्रारंभ :** कैफियत कमरआलीखान- आजमीर मुतालुका हिंदुस्थान याने लिहीवीले कैफियत.

**शेवट :** हजरत मेजर कलनल मेकेंजी स्तो। किल्ला पैमाष त्याचे दुभाषी लक्ष्मीयाचे मार्फतेन हे कैफियत लिहील घेणेसे मेजर स्घोचा निरोपा प्रमाण लिहिल गेल बिकलम आनंदराव त्रा. ११ माहे मे सन १८०४ इसवी.

## डी. नंबर २१

**कमरआलीखान वतन अजमीर व हिंदुस्थान कैफियत**
**KAMARALIKHĀN VATAN AJMIR VA HINDUSTAN KAIFIYAT**

कागद : ९"x ८$\frac{१}{२}$". मोडी. १५ ओळी. फार जुने. खराब अवस्था. वाच्य, पण पुसता न येणाऱ्या शाईने लिहिलेले. अपूर्ण.

डी. क्र. २० मध्ये वर्णिलेल्या ८४ क्रमांकाच्या भागातील ८६ व्या पृष्ठावर ही कैफियत सुरू होते. नेमका कालनिर्देश आणि खानाने भेट दिलेली व प्रवास केलेली ठिकाणे (स्थले) नीटपणे समजू शकत नाहीत. पहिली सहा पृष्ठे कैफियतीला पूर्णत्व देण्याच्या प्रयत्नात दिसतात. नकलकाराचे नाव, तारीख, यातील मजकुराचे मूळ यांचा उल्लेख केलेला नाही. इतर बाबतींत ही कैफियत याआधीच्या कैफियतींसारखीच गणता येईल.

**प्रारंभ :** येथून रुवरू म्हणणेच्या परगणेस स्वारी आले असे. त्यास हाकीम म्हणार मानसबदार होता.

**शेरा शेवटचे :** (८८ क्रमाकांचे) पृष्ठ पूर्णपणे खराब झालेले असल्यामुळे शेवटचा भाग नकलणे अशक्य आहे.

## डी. नंबर २२

**करियापट्टण कैफियत**
**KARIYAPĀTN KAIFIYAT**

कागदः २०" x १३ $\frac{१}{२}$". मोडी. २८ ओळी. जुने. खराब अवस्था. वाच्य. अपूर्ण.

या भागातील इतर रचना डी. नंबर ४ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत. इंग्लिश बनावटीच्या फूल्सकॅप आकाराच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. ७६ वर सुरू होते. या मोठ्या भागातील प्रस्तुत कैफियत हे शेवटचे प्रकरण असल्यामुळे आणि (चळतीतील वरच्या कागदांचे) अतिवजन व शाईचा रासायनिक परिणाम यामुळे पृष्ठांची अतिशय खराबी झालेली आहे. त्यामुळे फारच सावधपणे आणि शांतपणे कागद हाताळणे आवश्यक ठरते. ही कैफियत म्हणजे जुन्या दस्तऐवजाची नवी नक्कल असून तीत मोठ्या संख्येने अशुद्ध शब्दलेखन आणि विरामचिन्हांची चुकीची योजना झालेली आहे असे दिसते. जरी याच्या नकलेची तारीख दिलेली नसली तरी नक्कल करणाऱ्याची सही अखेरीस नोंदलेली आहे. म्हैसूरहून अनेगोंदीला स्थलांतरित झालेल्या आणि नंतर तिथल्या राज्याचे स्वतःच राजे झालेल्या एका कुटुंबाचे मूळ आणि इतिहास सांगणे हा या कैफियतीचा मुख्य विषय होय. हे राज्य हासिल करण्याच्या प्रयत्नात त्यांना झालेला त्रास आणि अशाच स्वरूपाच्या कमी महत्त्वाच्या अनावश्यक गोष्टींचे विस्तृत वर्णन यात केलेले आढळते.

**प्रारंभ :** . . . सेटी म्हणार लिंगावत पीताचे दुकानदार यांचे आजा व पणजा x x x x x म्हणार अनेगोंदीचा समस्तानासी दुकान घालून विकीत होता.

**शेवट :** त्रासून छेन आलिखान चे दिवस पावेतो पाये आनादार म्हणीजे x x x x x x करीत होता.

## डी. नंबर २३

**कलुबु तालुकेचे कैफियत**
**KALUBU TĀLUKĀ KAIFIYAT**

कागद : १० $\frac{१}{२}$" x ८". मोडी. १५ ओळी. फार जुने. खूप खराब अवस्था. दुर्वाच्य. पूर्ण.

यात समाविष्ट असलेल्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
नारायणराव आणि आनंदराव यांचे अहवाल- पृ. २ ते ३३
गोरक्षनाथ कथा- पृ. ३४ ते ३८
पेरियापट्टण कैफियत- पृ. ४१ ते ५३
पूर्णिमंगलम् कथा- पृ. ५४ ते ६०
कपालीमठ तपशील- पृ. ६१ ते ७२
बट्टल रायदुर्ग कैफियत- पृ. ७३ ते ७८
चंद्रगुत्ती क्षेत्र कैफियत- पृ. ७९ ते ८२

**केलंदी रामेश्वर माहात्म्य– पृ.८३ ते ९२**
**हळेबीडु कैफियत– पृ.९३ ते १०२**
**चोपोम (cōpom) कैफियत– पृ.१०३ ते ११७**
**कलुबु तालुका कैफियत– पृ.११८ ते १२४.**

**ही कैफियत पृ. ११८ वर सुरू होत असून ती चतकोर आकाराच्या देशी कागदावर लिहिलेली आहे आणि तिचा विषय भाषा कन्नड, पण लिपी मोडी असा उतरवला गेला आहे. ही कैफियत हे एक अपूर्ण निवेदन आहे. त्यात काही मंदिराची उत्पत्ती आणि इतिहास सांगितलेला असून श्रीरंगपट्टण येथील श्री गोपालस्वामी मंदिर व श्री वेंकटेश्वर स्वामी मंदिर यांना अधिक महत्त्व दिलेले आहे. म्हैसूरच्या राजांनी या मंदिरांच्या देखभालीसाठी दिलेल्या देणग्यांचाही निर्देश केलेला आहे. देवतांच्या दैवी सामर्थ्याबद्दलच्या काही आख्यायिका आणि म्हैसूरच्या राजांनी विस्तारासाठी बांधलेल्या अधिक इमारती (अशी माहिती) मंदिरांच्या भिंतींवर कोरलेली आहे. हैदर अली आणि टिपू सुलतान यांनी त्यांच्या म्हैसूरच्या राजवटीच्या काळात या मंदिरांची चांगली काळजी घेतली होती असेही सांगितलेले दिसते.**

**प्रारंभ : कैफियत कनुबु तालुके. पूर्वी कावेरी उत्पत्ये वागी दे मुचीत वागी व्याघ्रपद रायन हेमपुरीपट्टण आनु हे सरू इं कनवाडी अवनी मेले आईतु.**

**शेवट : शेवटच्या भागावर पांढरा कागद चिकटविलेला असल्यामुळे तो शेवटच भाग नोंदविलेला नाही.**

## डी. नंबर २४

### कार्णिक पूर्णया
### KĀRNIK PŪRNIYA

**कागद: १५" x ९". मोडी. १८ ओळी. जुने, खराब अवस्था. दुर्वाच्य. पूर्ण.**

**डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणेच यातील इतर रचना आहेत.**

**पृष्ठ ५४ वर ही कैफियत सुरू होते. हैदर अली व टिपू सुलतान यांच्या कर्तबगार आणि बुद्धिमान अशा पूर्णय्या नावाच्या एका मंत्र्याच्या चरित्राशी सदर कैफियत संबंधित आहे. पहिली दोन पृष्ठे पूर्णय्याच्या कुलपरंपरेबद्दलची (Parantage) माहिती देतात. पूर्णय्याचे वडील मुळात वलमनूर खेड्याचे रहिवासी. नंतर चरितार्थसाधनाच्या शोधात श्रीरंगपट्टणला आले. व्याजाने पैसे देणाऱ्या एका सावकाराकडे लेखनिक म्हणून पूर्णय्याचे वडील प्रारंभी काम करीत होते. नंतर म्हैसूर शासनातील एका शिरस्तेदाराच्या कार्यालयात कारकून म्हणून काम करू लागले. पूर्णय्या (बालवयातच) आपल्या वडिलांना कार्यालयीन कामात मदत करीत असे. ते जेव्हा शिरस्तेदारास समजले तेव्हा त्याने पूर्णय्याच्या कामाचे कौतुक करून त्याला सरळ सरळ शासकीय सेवेत घेतले असे सांगितले जाते. आणि मग अल्पावधीतच बुद्धिमत्ता व कर्तव्यनिष्ठा यांच्या बळावर हा पूर्णय्या हैदर व टिपू यांच्या दरबारात मंत्र्याच्या हुद्यापर्यंत पोहोचला. म्हैसूर राज्यातील शेटसावकार आकारीत असलेले भरमसाट व्याज दाबून टाकण्यासाठी पूर्णय्याने योजिलेले अनेक उपाय, भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांवर केलेल्या आरोपांच्या चौकशीत त्याने केलेले चतुराईचे, जाणकारीचे प्रदर्शन आणि म्हैसूरच्या राजांना तो किती मदत करणारा होता याचे वेधक वर्णन यात केले गेलेले आहे. नकलकाराचे नाव आणि या माहितीचे मूळ यांचा उल्लेख केलेला नाही. पृष्ठे योग्य क्रमाने रचलेली नाहीत, तशीच ती नीट बांधलेलीही नाहीत.**

**प्रारंभ : वामळूरचे स्थळामध्ये त्याचे त्याचे बापप्यादाचे जागेत खरीबा घेऊन होता. त्या बाबज त्याचे बाप पेंस्वि जाहाल्यानंतर स्वैरीबा लोकानी घेऊन यास x x x x xवाट केल्याकडोन खाणेस नाही ते होऊन तेथून श्रीरंगपटणास तरी गेलीयान कालक्षेप करोन घेऊन सावुकार लोक ब्राह्मण बनिया x x x x होइल म्हणुन तजवीज केले.**

**शेवट : x x x x उत्तगद होता. ऐसे लिहिले x x x x मणुन मणुन वेंकटराव पत्र लिहीले इलाखे मेजर मेकेंजी बहादुर सुपरेंडेंट मैसुर सर्वीज म्हणजे पैमाष करणार छ १ माहे आक्टोबर सन १८०६ इसवी जागा मैसूर.**

## डी. नंबर २५

### कार्णिक कैफियत
### KĀRNIK KAIFIYAT

कागद : २०" x १३". मोडी. २७ ओळी. जुने. चांगल्या स्थितीत. वाच्य.

डी. नंबर ४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ७७० वर ही कैफियत सुरू होते. मूळ कैफियतीची ही नक्कल असून त्यात मोठ्या संख्येने चुकीचे शब्दलेखन आणि चुकीची विरामचिन्हयोजना झालेली दिसते. या कैफियतीच्या पहिल्या काही पानांतील विषय डी. नंबर २४ मध्ये

सांगितल्याप्रमाणेच आहेत. उरलेल्या भागात टिपू सुलतानाने म्हैसूरवर केलेले हल्ले, मिळविलेले विजय आणि मंत्री पूर्णय्याचा कारभार यांचे वर्णन आलेले आहे. या वर्णनात मोठ्या संख्येने फारसी आणि अरबी शब्द दिसून येतात. कर्नल मॅकेंझी यांच्या सूचनेवरून ही कैफियत १ ऑक्टोबर १८०४ रोजी तयार करण्यात आली असे शेवटी सांगितले आहे.

**प्रारंभ :** कार्णिक कैफियत बुनिया पासुन वामळुस्ये स्थळामध्ये वेदपाचे जातीत खगीवु करून घेऊन होते. त्या व्याज त्याचे बाप फैत जाहाल्या नंतर खतीबु आहे. ते सार लोकानी बोलुन कासी वाटेस व वाटेत खाणेस नाहीत शहर व्होऊन तेथून श्रीरंगपट्टणास गेले.

**शेवट :** सोनीपटण घेतलेवरून जाहले अमल हजरतास कळले. ऐसे कार्णिक ही पूर्णयाचे कैफियत अस. हे बीकलम ईलाखे मेजर कलनल मंकीजी बहदुर साहेब सुपेरेंडेंट मैसुर सर्विज पैमाष करणार छ १ माहे अक्रटोबर सन १८०४ इसवी कलम.

## डी. नंबर २६

**कायागाव कैफियत**
**KĀYĀGĀVA KAIFIYAT**

कागद : ९ $\frac{१}{२}$" x ६$\frac{१}{४}$". मोडी. १३ ओळी. जुने. खराब अवस्था. वाच्य. पूर्ण.

डी. नंबर ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. पृष्ठ ४७ (ब) वर प्रस्तुत कैफियत सुरू होते. आपल्या उत्तर भारताच्या प्रवासाचे आणि तिथे भेटी दिलेल्या स्थळांचे वर्णन करणारा जो दीर्घ अहवाल आनंदराव आणि नारायणराव यांनी तयार केला होता, त्यातील एक भाग म्हणजे प्रस्तुत कैफियत असावी असे दिसते. पहिली दोन पृष्ठे कायागावचे (कायगाव- ?) भौगोलिक, हवामानदृष्ट्या वर्णन करतात. हे गाव नासिकच्या जवळ असून एक प्रसिद्ध तीर्थयात्रेचे केंद्र असल्याचे सांगितले आहे. त्रिंबकेश्वराच्या मंदिराचे वर्णन अगदी मोठे महत्त्व देऊन केलेले आहे. शिवाजी राजांचा नातू असलेल्या शाहू राजाने आपल्या कार्यक्षम आणि हुषार अशा बाजीराव पेशव्याकरवी सदर जागेचा ताबा मोंगलाकडून पुन्हा घेतला असे पुढे लेखकाने सांगितले आहे. बाजीरावाने आपल्या पाठीराख्यांना मोठ्या प्रमाणात सुपीक जमीन दान म्हणून दिली, तसेच काही सेवाभावी संस्थांनाही दिली. बडोद्याच्या यशवंतराव होळकरांनी या जमिनी ताब्यात घेऊन खेड्यातील ब्राह्मण रहिवाश्यांना हाकलून लावले असे कैफियतीचा शेवट करताना सांगितले आहे. या रहिवाश्यांनी नंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या मदतीने त्यांची गेलेली मालमत्ता परत मिळविली. मंदिरे, थडगी आणि जलाशय यांची यादीही दिलेली आहे. बाबू भट या त्या खेड्यातील जुन्या रहिवाशांने दिलेल्या व मठात जतन करून ठेवलेल्या काही जुन्या हस्तलिखितांवरून प्रस्तुत कैफियत तयार केली गेली अशी नोंद केलेली दिसते. तसेच ३१ जानेवारी १८०६ रोजी या कैफियतीचे लेखन झालेले असून नक्कलकराच्या नावाचा निर्देश केलेला नाही असे दिसते.

**प्रारंभ :** २० माहे मारी गंगा प्रवेश संगमी टाका म्हणावयाचे जागी गंगेस अलिकडे कायेगाव नामेत मुकाम जाहाल. तेथील कैफियत नासीकासी पक्षेम भागी दाहा कोसावरी त्रीयंबक नामे स्थळ आहे. डोंगरावरी ईश्वर आहे. त्यास त्रीयंबकेश्वरी म्हणताती.

**शेवट :** बाजीराव यानी मामुल प्रो त्या सर्व ब्राह्मणास इनाम इत्यादी ज्यारी केली आहे. व तेथ कितेक तीर्थ आहे. त्याचे नाव. एकुन तीर्थ आठ ऐसी आहे. तेथील वर्तमान सांगीतल ते भाऊमठ धर्माधीकारी यांचे जुबानी लिहील असे कलम.

## डी. नंबर २७

**किरीस्तान इंग्रेजीची कैफियत**
**KRISTAN INGRAJEECI KAIFIYAT**

कागदः १६" x ९". मोडी. १७ ओळी. जुने, चांगली स्थिती. वाच्य. अपूर्ण.

डी. नंबर १२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. ही कैफियत पृ. १६ (ब) वर सुरू होते.

ईस्ट इंडिया कंपनीच्या कालखंडात गोवा येथे बांधल्या गेलेल्या काही ख्रिस्ती प्रार्थनामंदिरांचे मूळ आणि इतिहास यांचे इथे वर्णन केलेले आहे. गोवा जिल्ह्यात ही प्रार्थनामंदिरे बांधण्यास जबाबदार असलेल्या व्यक्ती, तेथील धर्मोपदेशक आणि प्रार्थनामंदिरांचे व्यवस्थापक यांची नावेही दिलेली आहेत. हैदर अली आणि टिपू सुलतान यांनी नेस्तनाबूत केलेल्या प्रार्थनामंदिरांची गावे, खेडेगावे यांचे नावानिशी आणि ईस्ट इंडिया कंपनीने त्यांचे केलेले पुनर्वसन याचेही तपशीलवार वर्णन यात आलेले आहे. नकलकार आणि या कैफियतीतील मजकुराचे मूळ यांचा उल्लेख केलेला नाही. अखेरीस शालिवाहन शकाची नोंद केलेली आहे.

**प्रारंभ :** किरष्टस्तान इग्रेजीची कैफियत

हनोवरात आहे ते ईग्रजी रुजाई देवार्चेना x x x (सुभाकृतुसंवछर) x x x x पलीकडे किरीस्तनानी होता तेव्हा

ईंग्रजीत देव टेवुन पुजा वगैरे पादरी करीत होता. किरीस्तान लोक तमामं x x x x जात होर्ते.

**शेवट :** मुरुडेर चेरीत पांच कोस x x x x एक मसीद सोडोल होत. ते टिपू सुलतानाचे दिवसात वोस पडीले होत. हाल कुंपेनी अमल जाहल्यावरी पाच वर्षे ईंग्रेजेनी बांधील आहे. ईग्रजीची देव व पादरी वगैरे नेमीले x x x x

## डी. नंबर २८

**किरीस्तान इंग्रेजीची कैफियत**
**KIRISTĀN INGRAJECI KAIFIYAT**

कागद : १५" x १२" मोडी. १५ ओळी. जुने. खराब स्थिती (दुरुस्त व पुनर्बांधणी केलेले). वाच्य. अपूर्ण.

डी. नंबर २ मध्ये सांगितल्याप्रमाणे यात इतर रचना आहेत.

पृष्ठ ८६ वर प्रस्तुत कैफियतीचा प्रारंभ आहे. आदम आणि ईव्ह, त्यांनी निषिद्ध वृक्षाचे फळ खाणे याच्याशी संबंधित असलेल्या बायबलमधील उल्लेखित कथेचा अपूर्ण अनुवाद म्हणजे ही कैफियत होय. फूल्सकॅप आकाराच्या देशी हातकागदावर इथे ख्रिस्तजन्माची हकीकत नीटपणे नोंदलेली आहे.

ख्रिस्ताची शिकवण, त्याचे क्रूसावर बळी जाणे आणि त्यानंतरचे पुनरुत्थान या (भागा)चे अनुवाद केले गेले आहेत. नकलकाराचे नाव किंवा नकलेची तारीख याविनाच प्रस्तुत कैफियतीची अखेर झालेली दिसते.

**प्रारंभ :** कैफियत किरीस्तान– देवाने प्रथीवी व आकाश समस्त निर्माण करून सात दिवसानंतरे समस्त जेनास उत्पन्न करणेस अगादर निर्माण केले ते (१) मर्दान आदाम (२) बाईको एव या दोषास निर्माण करून एक वनांत टेवून त्या वनातील समस्त वृक्षाची फळे खाऊन राहावी.

**शेवट :** (तैसे कलुन) ईतक दिवस पावेतो मार्गकडून चलते दुर्मागास जात आहेत करीता मरणे प्राप्त जाहाले. तेथुन किरीस्तान याने पुनहा च्यारी दिवसानंतरे माणस जेन्र घेऊन पुर्वप्रमाणे नर्णतुक करीतर्से तमाम लोकास च्याळीस दिवस पावेतो राहूत पुन्हा– गेले.

## डी. नंबर २९

**किरीस्तान इंग्रजीची कैफियत**
**KIRISTĀN INGRAJEECI KAIFIYAT**

कागद : ... मोडी. १५ ओळी. चांगली स्थिती. वाच्य. अपूर्ण.

डी. नंबर २ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृष्ठ ६ वर या कैफियतीचा प्रारंभ होतो. या आधीच्या कैफियतीतील विषयच यात घेतलेला आहे. लेखकाचे नाव आणि कैफियतीच्या नोंदीची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** किरीस्तानचे कैफियत– देवान प्रथवी व आकाष समस्त निर्माण करून सात दिवसानंतर समस्त जेनास उत्पत्ती करणेस अगोदर निर्माण केले. १. मर्धनंआदम १ बाईको एव.

**शेवट :** (दिवस) मार्गकडोन चालते धर्मास जात आहेत. करितां मरण प्राप्ति जाहले ते किरीसान पुना हा च्यारी दिवसानंतरे माणस जन्म घेऊन पुर्वप्रमाणे वर्तुणुक करीतर्से तमाम लोकास चाळीस दिवस पावेतो राहुन पुनह स्वर्गास गेलामाय.

## डी. नंबर ३०

**कुरंबडेर कैफियत**
**KURUMBADĀ KAIFIYAT**

कागद : ९" x ७ $\frac{१}{२}$". मोडी. १५ ओळी. जुने. खराब अवस्था. वाच्य. संपूर्ण.

डी. नंबर १९ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. पृ. ११ वर सदर कैफियतीचा प्रारंभ होतो,

१६ पानापर्यंत पसरलेली ही कैफियत चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली आहे. पहिल्या तीन पृष्ठांत कुरुंबर जमात, त्यांच्या चालीरीती– पद्धती, त्यांचा धर्म, आराधना– उपासना, आणि त्यांची स्वभाववैशिष्ट्ये यांबद्दलची माहिती हा या कैफियतीचा विषय म्हणून सांगितले आहे. कैफियतीचा मधला भाग कुरुंबराचे राजे झालेल्या जैन राज्यकर्त्यांनी केलेल्या बांधकामाशी संबंधित आहे. तिरुवन्नमलाई टेकड्यांवरील अरुणाचल स्वामींच्या मंदिरात केलेल्या सुधारणा आणि अनेक मंदिरांना दिलेल्या देणग्या यांचे वर्णन केलेले आहे. देणग्या देणाऱ्या आणि जादा इमारतींचे बांधकाम करून देणाऱ्या राजांची नावे मंदिराच्या दगडी भिंतीवर कोरलेली आहेत असे सांगितले आहे. ही कैफियत पुढे किल्ला जिंकण्याचा प्रयत्न करणाऱ्या मारवा (Marwa) आणि नायडू जातीच्या पाळेगारांच्या नावांचा उल्लेख करते. विजापूरचे सुलतान आणि नाईक पाळेगार यांच्यातील युद्धे आणि अखेरीस नाइकांचा सुलतानांनी केलेला निःपात यांचे ठळक वर्णन केलेले दिसते. कुरुंबाई किल्ला बांधण्यामागील कारणे, त्याची तटबंदी कशी तयार केली आणि शेवटी तो विजापूरच्या सुलतानाच्या हाती कसा सोपविला गेला याविषयीची

नोंद केलेली आहे. चतुरंगपट्ट्णचा रहिवासी असलेल्या कुण्या एका वेंकटशास्त्र्याने मुळातील हस्तलिखितावरून प्रस्तुत नक्कल २५ ऑगस्ट १८१६ रोजी तयार केली असे सांगितले आहे.

**प्रारंभ :** तांडरमंडल याने कांची देशांत होत. ते कुरुबडेरचे कैफियत चेंदरंग पटणात असणार वेंकटेशशास्त्रा लिहीलते छ २८ आगष्ट सन १८०६ शालिवाहन शके ४० नंतरे शैव बल्लाळ जयन राजा पश्चम देशाहून एऊन तोडरमंडल चोळ मंडल वगैरे मंडलात सैव मथ प्रबळ करून तिरुणामलेंत राजधानी बांधुन आनेक जैन देवाल्य बांदीला. त्याचे काळात उबजलासही शास्त्र रितीन बांधुन अनेक जैन अग्रहार निर्माण करून फार दिवस राज्य केले.

**शेवट :** मुष्टी गोला वगैरे देशात वर्तक पण करीताहेत. आता x x x x तिरुपळ नाईकाचे खास वेंकचाटेल इनक तीनी च्यारीशे पिडीवर सांगताहेत. आपुर किल्ल्याचे राणास घोटी बांदुन घेऊन इतर लोकासारिख उष्ट घऊन जीवन करीताहेत. बा तारीश छ २८ ऑगस्ट सन १८१६ इसवी चेंदरंगपट्टणांत असणार वेंकटेश शास्त्री लिहिवीलते.

## डी. नंबर ३१

### केलंदी समस्थानाचे कैफियत
### KELANDI SAMSTHANCI KAIFIYAT

कागद : १५" x ९". मोडी. १५ ओळी. जुने. खराब अवस्था. वाच्य. पूर्ण.

डी नंबर. ३० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. पृ. १६३ वर प्रस्तुत कैफियत सुरू होते.

म्हैसूर इलाख्यातील केलंदी राज्य, त्याचे संस्थापक चंद्रैय्या आणि भद्रपाल यांचे मूळ आणि इतिहास यांचे चित्रमय वर्णन या कैफियतीत आहे. दुर्मती नाम संवत्सरे केलंदी राज्याची निर्मिती झाली अशी नोंद केलेली आहे. किल्ल्याची तटबंदी करणे आणि शेजारील राज्ये जिंकणे या बाबतीत मूळ संस्थापकांच्या वारसदारांनी केलेले अनेक अधिकतर प्रयत्न तपशीलाने वर्णिलेले आहेत. युद्धे, (किल्ल्याचे) वेढे, विजय, केलंदीच्या राजांचे निधन यांसारख्या प्रमुख घटनांसाठी शालिवाहन शकाच्या तारखा योजिलेल्या आहेत. केलंदीची शेवटची विधवा राणी वीरम्मा हिला पुष्कळ महत्त्व दिलेले आहे. कृष्णदेवराय या म्हैसूरच्या राजाने आपला सैन्याधिपती हैदर अलीखान याला प्रस्तुत राज्य जिंकण्याची आज्ञा केली आणि ते चित्रभानू नाम संवत्सरे (म्हैसूरला) जोडले गेले असे कैफियतीचा शेवटचा भाग सांगतो.

बेलूर येथे राहणाऱ्या कुणा शिवाचारी (Sivachari) नावाच्या माणसाने दिलेल्या जुन्या व मूळ दस्तऐवजातील माहितीवरून या कैफियतीची नोंद करण्यात आली असे या रचनेच्या आरंभीच सांगितलेले आहे. या मूळ हस्तलिखिताची तारीख दुर्मुखी काल (era) आहे. नकलकाराचे नाव किंवा नकलेची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** श्री गणराज कैफियत केळंदी समस्थानाची केळंदी समस्थानाचे राजे लोकांनी उद्भव होऊन दौलत केलतें सिलसिलावार बेळुर.ऽ सिवाचार्ये वंशांत असल ते पोथी प्रमाण कुल्ल गोषवारा दुर्मती संवछर निज जेष्ठ सुधृ १० लमा. नगरांत लिहिले ते केळंदी हल्ली मैदान मुलुकचे गावी असल ते बसवयाचे लेंक चडवपा व भद्रबाळ म्हणार दोघ लेंक असे.

**शेवट :** दौलत करीत असतान चित्रभानू संवछर पुण्य मास पर साल ९ माहे पांच राजे ३ ता। दौलत केली कुलराज १६ साल २६३ माहे २ रोज ६.

एणे प्रमाणे असताना चित्रभानू संवछर माघ मासी मैसूर कृष्णराज वोडयार निरोपप्रमाणे नावाब हैदर आलीखान बहदुर यानी चित्र- नाईकास हमशा घेऊन नगरची मुलुक बांदून घेऊन मुलुक स्वाधीन करून घेऊन त्यानंतर नगर घेतले.

## डी. नंबर ३२

### केळंदी समस्थानाचे कैफियत
### KELANDI SAMSTHANCI KAIFIYAT

कागद : १५" x १०". मोडी. १६ ओळी. जुने. चांगल्या स्थितीत. वाच्य. अपूर्ण.

डी नंबर ३० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. पृ. ६२ वर सदर कैफियत सुरू होते.

फूल्सकॅप आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेले हे एक अपूर्ण, पण अतिशय रंजक लेखन आहे. चंदाप्पाच्या कुशल नेतृत्वाखाली केळंदी संस्थानाच्या होत असलेल्या भरभराटीची वार्ता ऐकून विजयनगरचा राजा अच्युताप्पा रायलू याने त्यास आपल्या राजवाड्यास भेट देण्याची विनंती केली असे सांगितले आहे. चंदाप्पाकडून त्याची पूर्ण कथा ऐकल्यानंतर आणि केळंदी संस्थानाच्या निर्मितीत त्याला असलेली परमेश्वरी मदत लक्षात आल्यावर त्याने पुंड पाळेगारांचा नाश करण्यासाठी चंदाप्पाशी समझोता केला. (त्या बाबतीतील) आपल्या प्रयत्नात चंदाप्पा यशस्वी झाला. नंतरच्या घटना असे दाखवितात की पाळेगारांवर नवा पेशकिश (Peshkish) कर लादण्यात तो यशस्वी झाला.

अच्युताप्पाने चंदाप्पाला 'रायलू' हा किताब दिला आणि आठ गावांची जहागीर दिली. कोलंदी आणि रायलसीमा यांचा मिळून 'रायलू' म्हणून चंदाप्पाचा झालेला अभिषेक मोठ्या चित्रमय स्वरूपात वर्णिलेला आहे. या कैफियतीतील माहितीचे मूळ किंवा नक्कलकाराचे नाव यांचा निर्देश न करताच कैफियतीची अखेर करण्यात आलेली आहे. शालिवाहन शक गणनेनुसार काही तारखा देण्यात आलेल्या आहेत.

**प्रारंभ :** केळंदीवाले सिलसिला तपसीलवार हेळ बळा बसवपाचे पुत्र चोंडपाने फार पराक्रमशाली असतां यासी निक्षेप सांपडल ते वर्तमान विध्यानगरचे राजानी अचुतरायल ऐकून दौलत करणारांनी चुकली थोरांची गोष्ट ऐकून सजेन होऊन असणाराचे x x नासुनये संतोषकडून रक्षणा करणे राजधर्म म्हणुन अचुतपा– आणोन यांची दुष्ट लोकांसी तोंड फोडून टाकिला.

**शेवट :** देऊन तेथ हवेली बांधुन जबरदस्त सुधास्वस्तीश्री विजये शालिवाहन शेखें वरुष १४२२ सिधार्थी संवछर माघ शूध ६ पावेतो चोडपानाईकास पठाभीशेक करून केळंदी इलाखी आदी करून आट गावही माधाणा ईत्यादीचे लोक एऊन नजर न्याय धरून ऊभा असतां त्या लोकांसही सरफराजी अन त्या लोकांसी केले.

## डी. नंबर ३३

**केळंदी रामेश्वर माहात्म्य तपशील**
**KELANDI RAMESHWAR MAHATMY TAPSIL**

कागद : ९" x ६". मोडी आणि देवनागरी. १४ ओळी. जुने. फार खराब अवस्था. दुर्वाच्य. अपूर्ण.

डी. नंबर २३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ८३ वर या कैफियतीचा प्रारंभ आहे. ती देशी हातकागदावर मोडी व नागरी लिप्यांत लिहिलेली, पण कानडी भाषेत आहे. तीत केळंदी संस्थानातील काही मंदिरांचे मूळ व इतिहास सांगितलेला आहे. केळंदी संस्थान निर्माण होण्याच्याही आधीचे म्हटले जाणाऱ्या श्रीरामस्वामीच्या मंदिरास फार महत्त्व दिलेले आहे. या मंदिरातील देवाच्या दैवी शक्तीशी संबंधित अशा आणि तेथील जलाशयातील पाण्याच्या पावित्र्याबद्दल अशा काही आख्यायिकासुद्धा सांगितलेल्या आहेत. नक्कलकाराचे नाव आणि तारखा वा माहितीचे मूळ यांसारखा तपशील दिलेला नाही.

**प्रारंभ :** केळंदी रामेश्वर स्वामीचे कैफियत. नैमशारण्य राणे-मुनिश्वर शानेकादी ज्यपतप करीत होते.

**शेवट :** या कैफियतीचा शेवटचा भाग फारच खराब झालेला असल्यामुळे त्यातील मजकूर लावता येत नाही.

## डी. नंबर ३४

**कोकण देशांतील ब्राह्मण**
**KONKNA DESANTILA BRĀHMANA**

कागद : इंग्लिश बनावटीचा. २०" x १२". मोडी. २८ ओळी. खराब अवस्था. अपूर्ण.

डी. नंबर ४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या ६२९ व्या पृष्ठावर ही कैफियत सुरू होते. हस्ताक्षर जरी चांगले व वाच्य असले तरी मोठ्या संख्येने चुकीचे शब्दलेखन आणि चुकीची विरामचिन्हयोजना या कैफियतीत सर्वत्र दिसते. कोकणातील रहिवासी ब्राह्मणांचा इतिहास सांगणाऱ्या एखाद्या मोठ्या रचनेची ही नक्कल असावी. या लेखनाच्या माथ्यावर दिलेले शीर्षक जरी या कैफियतीस असले तरी कोकणच्या ब्राह्मणांबद्दलची फार थोडी माहिती यात दिसते. टेलरच्या भाग ३ मधील दप्तर १७४ मधील विषयच इथे पुनरुक्त झालेला दिसतो. महाराष्ट्रातील ब्राह्मण जातीतील पाच शाखांचे (Sect) वर्णन केलेले आहे. काही पौराणिक आख्यायिकाही प्रस्तुत कैफियतीत सांगितलेल्या आहेत. इथे ना लेखकाचे नाव, ना यातील माहितीचे मूळ सांगितले आहे.

**प्रारंभ :** कैफियत माहाराष्ट्र ब्रह्मणाच जातीचे माहाराष्ट्र ब्राह्मणाचे पाच जातीचे व पंचेद्र x x x व x x तयेकाचे तपशील.

**शेवट :** x x x x कोकणस्त विष्टणवी ब्रह्मणदी घंचि दुसर वराहड करून घेतात घरचे त्याचे मुलीस चितपावणी ब्रह्मणास देत नाहीत. वरकड गरीब आपले घरास त्याग x x x समीपाक करीताती.

## डी. नंबर ३५

**कोठीश्वर कैफियत**
**KŌTISWAR KAIFIYAT**

कागद : १५" x १२". मोडी. १७ ओळी. जुने. चांगल्या स्थितीत. वाच्य. पूर्ण.

डी. नंबर २७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील रचना आहेत.

ही कैफियत पृ. २२ वर सुरू होते. सुबुकोटा तालुक्यातील शिवेश्वर गड येथील किल्ल्याबद्दल प्रतिवर्षी घडलेल्या महत्त्वाच्या

घटनांचा इतिहास या कैफियतीत फूलस्कॅप आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेला आहे. अतिशय महत्त्वाचा सहभाग असलेले उपरोल्लेखित गडाचे भौगोलिक स्थान नीटपणे दर्शविले गेलेले नाही. (फक्त) असे सांगितले आहे की प्रस्तुत किल्ला म्हणजे असफशा याने केलेल्या संस्मरणीय बांधकामांपैकी एक आहे. ही कैफियत चार भागांत विभागलेली आहे. तिसऱ्या भागात म्हैसूरचा हैदरखान याच्या स्वारीचे वर्णन केलेले असून त्या वेळी किल्ल्याचे संरक्षण करणारे काही पाळेगार कसे नमले आणि नबाबाने किल्ला कसा ताब्यात घेतला याचे वर्णन आलेले आहे.

कैफियतीच्या चौथ्या भागात सदाशिवगड आणि शिवेश्वरगड येथील आनंदराव व बळवंतराव आणि रुद्राजी जाधव यांच्या समर्थ नेतृत्वाखाली मराठ्यांनी केलेली स्वारी आणि त्यांनी किल्ल्याचा केलेला कब्जा यांचे वर्णन आलेले आहे. मराठ्यांच्या कमकुवतपणाचा परिणाम आणि त्यानंतरची पेशवाईतील यादवी यामुळे ईस्ट इंडिया कंपनीने शेवटी हा किल्ला ताब्यात घेतला. सर्व महत्त्वाच्या घडामोडी शालिवाहन शकात टिपलेल्या आहेत. नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ : कोट सीवेस्वरचे कैफियत** किल्ला भुईकोठ कसबेत बांदीलते शरीबान मलिक सुमार वरुषे २०० दोनसे कलम. मोगलाई टाणा अत्फर जाहान वारषा x x x सदाशीवराजे यासी सर करून मुलुक वकिल्लस ठाण बसवीज्या.

**शेवट :** सुभकृतु नाम संवछर कुपेनी x x x x x तालूके x x x ज्याजरामतेस आणि फौजसूत्था ज्याजावरून मीशने तालुकेत गडीचे खाडीस वरून खुध फौजेसुधा, नगर कबिज करुन सदासीव गड सर करणेस पाटविले ते सरदार मेस्तर हेजीब व कारपीटन यानी अकोले चा किल्ला घेऊन सदासीव गड शहर व मकान मजकुरास राणा चडऊन तेंच साली किल्ला दरोबस्त मोडून टाकिला कलम.

### डी. नंबर ३६

**कोपम कैफियत**
**KŌPAM KAIFIYAT**

कागदः १० " x ८". मोडी. १४ ओळी. जुने. खराब अवस्था. अपूर्ण.

डी. नंबर २३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. ११५ वर सुरू होते.

चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर ही कैफियत लिहिलेली आहे. कोपम या गावाचे मूळ आणि इतिहास हा विषय आहे. जरी ही कैफियत मराठी भाषेत व मोडी लिपीत लिहिलेली असली तरी तीत मोठ्या संख्येने कन्नड वाक्प्रचार आणि उतारे योजिलेले आहेत. पहिली दोन पृष्ठे या गावाला कोपम् का म्हटले जाते याविषयीची वस्तुस्थिती स्पष्ट करणारी आहेत. पार्वतीच्या अपमानाचा सूड घेण्यासाठी दक्ष प्रजापती आणि त्याची प्रजा यांना ठार मारून टाकणाऱ्या वीरभद्रस्वामीच्या अवताराची पौराणिक आख्यायिका स्पष्ट केलेली आहे. पुरातन सौंदर्यासाठी प्रसिद्ध असलेल्या इमारती आणि शिलालेख यांनी युक्त अशी अनेक प्राचीन मंदिरे असलेले हे गाव आहे अशी नोंद केलेली दिसते. चौथ्या पानात विजयनगरचा राजा चंदाप्पा याने केलेली स्वारी आणि कबजा, तसेच केलेली किल्ल्याची सुधारणा व देवळातील जादा इमारतींचे बांधकाम यांचे वर्णन आलेले आहे. काही मंदिरांतील मौल्यवान खजिन्यातून मिळालेल्या संपत्तीच्या जोरावरच मंदिरांची पुनर्बांधणी आणि गावाचा तट चंदाप्पाने बांधला.

नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचा उल्लेख नाही. वीरभद्रस्वामींच्या मंदिरात काही शिलालेख असल्याची नोंद केलेली आहे. पृष्ठे खराब झालेली असल्याने काही भाग लावता येत नाही. हे गाव हरिहरपूर तालुक्यात होते.

**प्रारंभ :** कैफियती कोपम्

पूर्वी दक्षत्रजापती यानी हरिहर पुरजवळी x x x ब्राह्मणाचे x x x x नजदीक कोणास x x x दक्षणदोनी x x x येग्य करीत असता x x x हे दक्ष प्रजापती x x x x ईश्वरास x x x x मेनकी म्हणारीस विवाह करून दिदल होता.

**शेवट :** खरीत म्हणून नाव हेवुन x x x हे पर्वत पाहुन x x x

### डी. नंबर ३७

**कोपम कैफियत**
**KOPAM KAIFIYAT**

कागद : २४" x ९". मोडी. २८ ओळी. जुने. चांगली स्थिती. दुर्वाच्य. पूर्ण.

यात समाविष्ट असलेल्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेतः
अजमीरच्या राज्यकर्त्यांविषयीची कैफियत– पृ. ६६५ ते ६७४.
पेरिपट्टनी कैफियत– पृ. ६७५ ते ६७९.
बटे पैय्या (Bate Paiya) दुर्ग कैफियत– पृ. ६८० ते ६८२.
हेलबिडतु कैफियत– पृ. ६८२ ते ६८९.
नानासाहेब कैफियत– पृ. ६९० ते ७२८.

विजापूरचा वृत्तान्त (account)– पृ.७२९ ते ७३४.

प्रस्तुत कैफियत पृ.६८९ वर सुरू होते.

मुळातील कैफियतीची फूल्सकॅप आकाराच्या जाड कागदावर उतरविलेली नक्कल म्हणजे प्रस्तुत लेखन होय. कोपम् गावाचे मूळ व इतिहास इथे वर्णिला आहे. सभोवतालच्या गावांचा भूगोलही स्पष्ट केलेला आहे. वीरभद्रस्वामींचा दंतकथात्मक जन्म (Legendary birth) आणि पार्वतीचा अपमान करणारा राजा दक्षप्रजापती याचा नाश याच ठिकाणी झाला असे कळून येते. वीरभद्राने संतापाच्या भरात नाशाचा बदला (नाशानेच) घेतला म्हणून या जागेला 'कोपम्' नाव पडले.

चंदाप्पा, सोमेश्वर इत्यादी विजयनगर येथे राज्य केलेल्या राजांची नावे, मंदिरांची बांधकामे, धर्मादाय संस्था आणि किल्ल्याची तटबंदी या बाबतीत त्यांनी केलेले योगदान व सुधारणा यांचे चित्ररम्य वर्णन केलेले आहे. चंदाप्पा नाईक आणि त्याचा राज्यकारभार याला जास्त महत्त्व देण्यात आलेले आहे. प्रस्तुत नक्कल मि. टेलर यांच्या सूचनेवरून तयार करण्यात आलेली आहे. मूळ नक्कलकाराचे नाव देण्यात आलेले नसून निवेदनाच्या अखेरीस 'रंगा' अशी सही आहे. ही व्यक्ती कदाचित नक्कलकार असेल. जरी या कैफियतीची नक्कल चांगल्या तऱ्हेने केलेली असली तरी तिच्यात खूप अशुद्ध शब्दलेखन आणि चुकीची विरामचिन्हयोजना दिसते.

**प्रारंभ** : कैफियत कोपम्. पूर्वी युगांतरी दक्षप्रज्यापती हरिहरपुराजवळ ज्योतीर्बादी म्हणावयाचे दीपकोपास दक्षण दोनी कोसावरी तेथे राहात होत्याकरीतां हे दक्ष प्रज्यापतीचे लेंक- म्हणार ईश्वरास विवाह करून दीदला.

**शेवट** : या दिवसांत बिहरवी म्हणून नवीखडी होती. ते सबके भरारी म्हणीजे ब्रह्मणाचे समस्त्यत्यास सक्षिप्त करून त्या गावास बीदरू म्हणार नाव टेवून राज्यभार करीत होता.

सोमशेकर राजा म्हणारी अदीकार जाहाला. त्याचे– म्हणार आधीकारी जाहाला. मग सोमशेकर राजा–

## डी. नंबर ३८

**कोपम् कैफियत**
**KŌPAM KAIFIYAT**

**कागद** : २४" x ९". मोडी. २८ ओळी. जुने. चांगली स्थिती. वाच्य. पूर्ण.

**डी. नंबर ३ मध्ये** सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. पान ६८८ वर याचा प्रारंभ होतो. शेवटचा प्रभाग. इंग्लिश बनावटीच्या फूल्सकॅप आकाराच्या जाड कागदावर अर्धवट नकललेली ही डी. नंबर ३७ मध्ये सांगितलेली कोपम् कैफियत आहे. यात विपुलतेने अशुद्ध शब्दलेखन आणि विरामचिन्हांची वाईट योजना दिसून येते. नक्कलकाराच्या नावाचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ** : पूर्वी युगांतरी दक्षप्रज्यापती यानी हरिहरपुरा जवळ ज्योतिबिंब म्हणावयाचे तीप कोपास दक्षण भागी दोनी कोसावरी राहत होता.

**शेवट** : कैफियतीच्या शेवटच्या भागातील शाई उडालेली आहे. म्हणून शेवटच्या भाग नोंदीतून गाळला आहे.

## डी. नंबर ३९

**खतावणी रामसमुद्र**
**KHATĀVANI RAMSAMUDRA**

कागद : १९" x ९". मोडी. २६ ओळी. जुने. खराब अवस्था. वाच्य. पूर्ण.

या कैफियतीत समाविष्ट केलेल्या रचना पुढील प्रमाणे आहेत:

दखुल अमुल मुल्क– पृ.१ ते ३९
जरीब कृष्णगिरी– पृ.४४ ते ४६
जिल्हे (Jaile) रामसमुद्र– पृ.४७ ते ८१
खुष्की जमीन (Kuskhi)– पृ.८२ ते ८७
येदास्त सादिलवार (Yēdāst Sathilwar)– पृ.८८ ते ९१

तिरुपतुर फिक्रमधील रामसमुद्रम तालुक्याचे मूळ व इतिहास वर्णन करणारी ही कैफियत पृ.४७ वर सुरू होते. संपूर्ण तालुक्याचे वर्गीकरण करून त्याची अगदी इंचांपर्यंत मोजणी केलेली आहे. जमीनमालकांची नावे, त्यांच्या मालकीच्या क्षेत्राची मर्यादा आणि जमिनीचा सुपीकपणा इत्यादींची तपशीलवार नोंद केलेली आहे. या वर्णनाच्या दुसऱ्या भागात ज्यांना जमीन बक्षीस (gift) म्हणून मिळालेली आहे त्या इनामदारांच्या मालकीच्या जमिनीचा विस्तार स्पष्ट केलेला आहे. तिसरा भाग संपूर्ण तालुक्याचे वर्गीकरण आणि त्यात घेतली जाणारी पिके स्पष्ट करतो. फसली सन १२६३ मध्ये जमिनीची मोजणी झाली असल्याचे सांगितले आहे. पृ. ६२ वर इनाम जमिनी देणारे व त्यांचा उपभोग घेणारे यांची नावे दिलेली आहेत. पृ.४९ ते अखेर लागवडयोग्य जमिनीचे क्षेत्र, त्यातून येणारे उत्पन्न, त्यावर आकारलेले कर इत्यादीविषयीच्या नोंदी केलेल्या आहेत. हो सर्व

भाग (volume) कोण्या नारायणरावाने लिहिला असल्याचे नमूद केले आहे. त्या व्यक्तीचा हुद्दा किंवा इतर तपशील दिलेला नाही.

**प्रारंभ :** या मुलुकांत जरीबा करणेच. ३६ कदीमी काटीन आवस्से चवर एक गुंटा ऐसे गुट ४०० स एक तार हे खुषकीस तरी शेंभरी गुटेस एक काणी.

**शेवट :** याददस्त ताळवार पतीकढ तीवी रामसमुद्र तालुके तिरुपातुर सन १२०३ फसली.

## डी. नंबर ४०

**गुजरथ प्रांत कैफियत**
**GUZARAT PRĀNT KAIFIYAT**

कागद : ९" x ६". मोडी. १२ ओळी. जुने. खराब अवस्था. वाच्य. पूर्ण.

डी. नंबर ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

चतकोर आकाराच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत गुजरात प्रांतातील भिन्न राज्यांच्या राज्यकर्त्यांच्या इतिहासाशी संबंधित आहे. ही कैफियत दोन प्रकरणांत विभागलेली आहे. गुजराथ आणि माळवा यांची भौगोलिक परिस्थिती यात सांगितलेली आहे. राजांची नावे, आडनावे, प्रत्येकाच्या ताब्यात असलेल्या किल्ल्यांची संख्या, ते त्यांनी बांधले की मिळविले याविषयीचा तपशील यांचा प्रस्तुत कैफियतीत समावेश झालेला आहे. माळव्यातील इलाखे व किल्ले, त्यांतील इमारती, त्यांत वापरलेले मौल्यवान धातू व (तेथील) जडजवाहीर या आणि अशा अनेक बारकाव्यांसह थोडी अधिक माहिती दिलेली आहे.

दुसऱ्या प्रकरणाच्या अखेरीस सिंधूनदीच्या तीरावर उभ्या असलेल्या किल्ल्यांची एक तपशीलवार यादी दिलेली आहे. काही किल्ल्यांच्या भिंतींवर काही शिलालेख सापडले असल्याचे सांगितले जाते. नक्कलकाराचे नाव किंवा या कैफियतीसाठीची माहिती यांचा उल्लेख केलेला नाही. ही कैफियत १६ ऑगस्ट १८०६ रोजी पुरी केली गेली असे म्हटले आहे.

**प्रारंभ :** याददस्त हिंदुस्तान गुजरात प्रांती x x x शहर पटण साबक पुनेहून पटिलेहून पांटविल x x x की त्या सिवाये आणिक कित्येक पुरातन शहरांची नावनिसी व राजे लोकांची अडनाव म्हणिजे x x x परंतु राडे लोकांची असल नाव दाखल नाही अडनाव आगाउची झाडून लिहीली असे तपशील.

**शेवट :** पाहून आला त्याची वर्तमान हकीकद करून घेऊन व त्याची भेटी घेऊन तेथील वृत्तांत काही वाकाफा किती ती मिळऊन पाटीवणेस एईल- सीला- शेक स्वछर- संवछर- बा तारीख १६ माहे आगष्ट सन १८०६ इसवि मुकाम पुना.

## डी. नंबर ४१

**गुजरत प्रांत कैफियत**
**GUJARAT PRĀNT KAIFIYAT**

कागद: इंग्लिश बनावटीचा. २०" x ९". मोडी. २२ ओळी. चांगल्या स्थितीत. पूर्ण.

डी. नंबर २ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

डी. नंबर ४० मध्ये सांगितल्या गेलेल्या मजकुराचीच ही नक्कल दिसते. हस्ताक्षर वाच्य व बऱ्यापैकी असले तरी खूप मोठ्या प्रमाणात अशुद्ध शब्दलेखन आणि विरामचिन्हांचा गैरवापर केलेला दिसतो. नक्कलकाराचे नाव अखेरीस नोंदलेले दिसते. यात तेच तपशील आहेत. काही ठिकाणी व्यक्तिनामे आणि स्थलनामे गाळलेली आहेत. या कैफियतीसाठी मिळालेल्या माहितीचे मूळ सांगितलेले नाही.

**प्रारंभ व शेवट :** याआधीच्या कैफियतीप्रमाणेच प्रारंभ व शेवट यातील मजकूर आहे.

## डी. नंबर ४२

**गुंडली द्विप व डोंगरे कैफियत**
**GUNDALI DVIPA VA DONGARE KAIFIYAT**

कागद : १६" x ९". मोडी. २३ ओळी. जुने. खराब झालेले नाही. वाच्य. पूर्ण.

यात समाविष्ट असलेल्या रचना पुढीलप्रमाणे आहेत:
श्री हरीकोट्ट कैफियत– पृ.१ ते २ (Kotta)
श्री हरी कट्टा कैफियत– पृ.३ ते ४ (Kotta)
लिंगराज पट्टण कैफियत– पृ.५ ते ६
वंदनपुरी पट्टण कैफियत– पृ.७ ते १०
येदस्त रावे बंदर– पृ.२२ ते २६
येदस्त अर्काट सुभा– पृ.२७ ते २९
येदस्त अर्काट बेरीज जबिता– पृ.२९ ते ३१
येदस्त कांगो मजनुम देशमुख– पृ.३२ ते ३३
दरोबस्त मुल्क कर्नाटक– पृ.३४ ते ३५
दरोबस्त कैफियत– पृ.३६ ते ५०.

ही कैफियत पृ. ११ वर सुरू होत असून ती चांगल्या हस्ताक्षरात इंग्लिश बनावटीच्या फूल्सकॅप आकाराच्या कागदावर लिहिलेली आहे. यात काही पर्वतराजींचा भूगोल आणि काही प्राचीन किल्ले, मंदिरे, तीर्थक्षेत्रे यांचे मूळ व इतिहास वर्णिलेला आहे. या कैफियतीत ज्यांचा इतिहास वर्णिलेला आहे ते इलाखे किंवा विशिष्ट स्थाने यांची नावे दिलेली नाहीत. पण रायलसीमा भागातील गुंडली द्वीप हा प्रसिद्ध डोंगरी किल्ला असल्याचे एके ठिकाणी म्हटले आहे. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, जरी या स्थानास द्वीप म्हटलेले असले तरी ते पाण्याने वेढलेले बेट नाही, तर भीमेश्वर पर्वतावरील तो एक डोंगरी किल्ला आहे. जनार्दनस्वामींच्या मंदिराशी निगडित अशा पौराणिक आख्यायिका आणि विशेषतः शिवमंदिराशी निगडित आख्यायिका तपशीलवार सांगितल्या आहेत. या मंदिरातील काही देवतांचा जीर्णोद्धार, तसेच त्यांची प्राणप्रतिष्ठा (consecrated) श्री अगस्तीमुनींनी केली असे सांगितले जाते. थडगी, जादा इमारती आणि डोंगराभोवतालची शहरे यांचे काम रेड्डी पाळेगार आणि रायलसीमाचे नायडू यांनी पुरे केले असे सांगितले जाते. तेलगू शैलीचे (character) किती तरी शिलालेख तेथील देवळांच्या भिंतीवर सापडले असे म्हटले जाते. ते देवळाच्या अगदी आतील गाभाऱ्यासारख्या अंधारलेल्या निर्जन भागात असल्यामुळे नक्कलकाराचे (की खोदकाराचे?) नाव सांगणे टाळले असे लेखक सांगतो. ही कैफियत तयार करण्यासाठीच्या माहितीचे मूळ आणि कैफियत लिहिल्याची तारीख यांचा उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ :** गुंडली दीपा म्हणावयाच डोंगर ते कोटें म्हणावयाच गावा जवळ असणेच पुर्वी हे गुंडली द्वीपा म्हणावयाचे डोगरास नाव भीमेश्वर पर्वत त्या पर्वतावरी ब्रह्मदेव शाप निगीत्य त्या पर्वतावरी येऊन्न याग करून शाप विमोचन जाहाल. ते उपरांती ब्रह्मदेव ब्रह्म लोकास निघुने गेला.

**शेवट :** इत्यादी मार्गसंचार करीत असते, या पर्वतावरी देऊळ आहे की त्यात काही सिलाशासन लिहाल नाहीत आता या गावांत ओस सारीख आहे. गावात दोघ पुजारी ब्रह्मणाचे घर एकन एक दुकान आहे संगमा म्हणून यार ज्यात्रा होता आहे. तेव्हा आसपास गावचे बहुवच येऊन्न पाहून जाताहेत. उछवकाळी मात्र प्रज्या बहुत एत असे. वरकड दिवसी गावांत पहिलीया ओस बडवत आहे. आता लोकांच्या प्रवास गुंडली द्विप म्हणतोहेत. हे कैफियत समाप्ती.

## डी. नंबर ४३

### गुडीयात कैफियत
### GUDIYATAM KAIFIYAT

कागद : ९" x ७". मोडी. २१ ओळी. जुने. खराब अवस्था. पूर्ण.

यात समाविष्ट केलेल्या रचना पुढीलप्रमाणे आहेत :



चतकोर आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ.१०६ वर सुरू होते. कागदांच्या डाव्या बाजूचा समासाचा भाग खराब झालेला आहे. कागदाची स्थिती केव्हाही फाटेल अशी नाजुक आणि अक्षरे पुसटच झालेली आहेत. गुडियातम् हा उत्तर अर्काट जिल्ह्यातील एक तालुका आहे. ही कैफियत अर्काटच्या नबाबाच्या राज्यात गुडियातम्ची असलेली ऊर्जितावस्था स्पष्ट करते. मेमुलीखान हा गुडियातम्वर राज्य करणारा पहिला नबाब होता असे म्हटले आहे. त्याच्यानंतरच्या अर्काटवर राज्य करणाऱ्या नबाबांची नावे आणि त्यांनी गुडियातम्च्या तटबंदीत केलेल्या सुधारणा यांचे वर्णन केले आहे. तिथे एक शिवाचे आणि एक विष्णूचे अशी दोन मंदिरे असल्याची नोंद आढळते. प्रत्येक नबाबाने अर्काट येथे राज्य केल्याचा कालावधी शालिवाहन शकात दिलेला आहे. ह्या तालुक्यात अनेक पालिपुत (Paliputs) असून त्यांचा प्रमुख मुथुरंगाप्पा नाईक होता. या भागात कैलासगिरी नावाचा किल्ला होता आणि तो अर्काटच्या नबाबाने बांधला असे म्हटले जाते. शेतीची लागवड, शेतीसाठी उपलब्ध असणाऱ्या पाण्याचे साठे आणि स्थानीय भौगोलिक रचना यांचीही नोंद केलेली आहे. त्या ठिकाणचा अधिकारी (Karnam) असलेल्या कुणा सुब्बय्या पिलाई याच्याकडून प्रस्तुत कैफियतीतील माहिती मिळाल्याचे सांगितले आहे.

**प्रारंभ :** गुडीयातम्चे कैफियत. पुर्वी आधीकार केलते मामलीखान त्यानंतरे दरीयाखान मग नैमतखान x x x x यानी आरकाड सुभा करणार यानी मामलीयत मुस्ताजनी मोकरोंर करून पाटवीले. त्यांनी अधीकार करीत असता.

**शेवट :** कोडीकाड क्षीरनदीकडे होत आहे येथोर कैफियत आखरे येणे प्रमाण संगगड वगैरे पेषकार चेंगलराप गुडीयातं अमील वेंकटाचले पिल्लेस सांणुन पिल्ले मजकूर स्तळ संप्रती सुभचे पीलेस ताकीद लरमारून लिहीवले पा। गुडीयातम आरकाड सरकार वेळुर समत मजकूर.

## डी. नंबर ४४

### गोकर्णेश्वर कैफियत
### GŌKARNESVAR KAIFIYAT

कागद : ११" x ७". २५ ओळी. मोडी. जुने. खराब अवस्था. अपूर्ण.

पृ. ३५ वर याचा प्रारंभ होतो. डी नंबर ३५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेल्या या कैफियतीत गोकर्णेश्वर– जे महाबळेश्वर म्हणूनही ओळखले जाते– या स्थळाचा उगम आणि इतिहास वर्णिलेला आहे. याचा दुसरा कागद गहाळ झालेला असल्यामुळे ती अपूर्ण राहिलेली आहे. कृष्णा नदीच्या काठावर वसलेल्या मुंबई इलाख्यातील महाबळेश्वर या पुरातन खेडेगावात अनेक पवित्र झरे व तळी असून ते शैव सांप्रदायिकांचे पवित्र यात्रेचे ठिकाण असल्याचे सांगितले आहे. गोकर्णेश्वर आणि महाबळेश्वर अशी दोन नावे का पडली याविषयीच्या दोन आख्यायिका सांगितल्या आहेत. पहिल्या कथेत रावणाला शंकराने दिलेले लिंग हस्तगत करण्यासाठीची विष्णूची भूमिका, त्या (लिंगा) वर पावित्र्याचा केलेला संस्कार (किंवा त्याची केलेली प्राणप्रतिष्ठा) आणि त्यामुळेच ते नंतर गोकर्णेश्वर म्हणून ओळखले जाऊ लागले अशी माहिती आलेली आहे. दुसरी कथा शिवाने ब्रह्मदेवाला पापातून मोकळे करून दुःखमुक्ती दिली त्याशी संबंधित आहे. या मंदिरातील छोट्यामोठ्या जलाशयांच्या पावित्र्याचे वर्णन करण्यात आले आहे. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ आणि कैफियतीची तारीख यांचे निर्देश नाहीत. कागद अतिशय जीर्ण अवस्थेत आहे.

**प्रारंभ :** गोकर्ण माहात्म्य कैस म्हणून राजा विचारीता वेळेसं गवतुम रुषी सांगतात जे. रावणेश्वर रामलिंग xxx पुर्वीत रामेश्वे व राजवळी ब्रह्मदेव फार गरवीसी ईश्वरांचे आज्ञा वीतुरुक्त सकळ जीवही कष्टी करवीत होता. तो परमेश्वर त्याचा गरव भंग करावा म्हणुन सकल देवांनी विचारुन घेतले.

**शेवट :** तेव्हा त्याच लिंगास पुजा करीता तेळे देवेंत नौबत वाजवीले. देवेंद्र पुष्पवीष्टी पाऊस पडले. गोकरणा मग ईश्वरास नमस्कार पुजा करून तेथुन देवता आपले ठीकाणास निघुन घेले संपूर्ण.

## डी. नंबर ४५

### गोंडागिरी कैफियत
### GONDĀGIRI KAIFIYAT

कागद : ७½" x ६". मोडी. जुने. दुर्वाच्य. पूर्ण.

या भागात समाविष्ट झालेल्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :

चेन्नपट्टण कैफियत– पृ. ४८ ते ५६.
जैन मठ कैफियत– पृ. ५९ ते ६२.
काही स्थलांना रामचंद्ररावांनी दिलेल्या भेटीचा वृत्तान्त– पृ. ६६.
मीरजनपूर फकीर कैफियत– पृ. ६७ ते ७१.
बैरस वदरू जैन कैफियत– पृ. ७२ ते ७४.
आदिस्वर स्वमी कैफियत– पृ. ७५.
कोदीयाल तालुका– बार, कुरुच तालुका कैफियत– पृ. ७५ ते ८३.
जिनदत्तराय कैफियत– पृ. ८४ ते ८७

या भागातील हस्तलिखिते तेलगू, कन्नड आणि मोडी लिप्यांत लिहिलेली असून ती चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर उतरवलेली आहेत. ती अतिशय खराब अवस्थेत असून काही आणि पानांवरील बराच मोठा भाग कागदाने चिकटविलेला असल्यामुळे त्यांचे वाचनच करता येत नाही.

गोंडगिरी कैफियत पृ. ६३ वर सुरू होते. चंद्रगुत्ती तालुक्याजवळच्या बेलिगी तालुक्यातील तीन किल्ल्यांचे मूळ आणि इतिहास यांचे अपूर्ण वर्णन इथे केलेले आहे. पहिल्या तीन पृष्ठांत या किल्ल्यांच्या संस्थापकांचा इतिहास सांगितलेला आहे. बेलिगीचा रहिवासी कुणी नलूएक्का गोंडा कुडी हा अपत्यहीन होता. एका संतसाधूच्या सेवेमुळे त्याला दोन मुले झाली. पहिल्या मुलाचे नाव अवडेनाय वोडरू आणि दुसऱ्याचे नाव मूडिची वोडरू. या दोन्ही बंधूंनी त्यांच्या एकत्रित प्रयत्नांनी बेलिगी येथे राज्य निर्माण केले. यातील थोरला भाऊ जैन झाला आणि धाकटा

लिंगायत झाला, असे पुढे या कैफियतीत सांगितले आहे.

याच काळात विजयनगर येथे राज्य करणाऱ्या समकालीन राजांच्या नावांची यादी दिलेली आहे.

नाईक राजांची राज्ये खालसा करून आपल्या राज्याचा त्यांनी केलेला क्षेत्रीय (भौगोलिक) विस्तार यात दिलेला आहे. त्यांनी जिंकलेल्या ठिकाणांची निश्चित माहिती सांगता येत नाही. कारण त्या पृष्ठावरील त्या मजकुराचा भाग खराब (झाल्याने न वाचता येईल असा) झालेला आहे.

कैफियतीचा शेवट पृ. ६५ वर झालेला आहे. या निवेदनाचा शेवटचा भाग गोंडगिरी राज्याच्या सीमा सांगणारा आहे. पण त्याचे नेमके स्वरूप लक्षात येत नाही. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ आणि कैफियतीतील घटना प्रसंगाची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** कैफियत बीळीगी साबक बीळीगी तालुका xxx अयसुरास तीनी कोस पश्चम दीकी नाळु येक गोंडकुडी वकळु म्हणार असत.

**शेवट :** xxxx यास पश्चमेस xxx पावेतो एक घटिकाचे वाट पावेतो. उत्तर कावी कळुबेरू xxx नदी xxx

## डी. नंबर ४६

### गोवा कैफियत
### GOVA KAIFIYAT

कागद : १५" x १२". मोडी. १७ ओळी. जुने. वाच्य. पूर्ण.

डी. नंबर २८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. १२२ वर सुरू होते. यात फ्रेंचांनी गोव्यात स्थापिलेल्या वसाहतीची कथा सांगितलेली आहे. जेव्हा कदंब हा स्थानिक राजा गोव्यावर राज्य करीत होता तेव्हा काही युरोपीय व्यापारी खाडीच्या काठावर वसलेल्या मूरु ग्रामम् या खेड्यात उतरले. राजाला साजेलशा नजराण्यासह ते राजाला भेटले आणि निवासी इमारती बांधण्यासाठी जागा देण्याची त्यांनी राजाला विनंती केली. नजराण्यामुळे खूष झालेल्या स्थानिक राजाने त्या व्यापाऱ्यांच्या प्रमुखाने निवडलेली जागा त्यांना दिली. त्या प्रमुखाने स्वदेशाहून माणसे आणि दारूगोळा आणविला आणि थोड्याच काळात कदंब राजाचा पराभव करून त्याचा प्रदेश ताब्यात घेतला असे पुढे सांगितले आहे. या तऱ्हेने फ्रेंचांनी गोवा जिंकून घेतला. त्या पहिल्या फ्रेंच व्यापाऱ्यांची नावे आणि त्यांनी गोव्यात प्रवेश केल्याची तारीख दिलेली नाही. नक्कलकाराचे नाव, माहितीचे मूळ आणि कैफियतीची तारीखही दिलेली नाही. कैफियतीचा शेवटचा भाग असे सांगतो की गोवा पुन्हा ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या नगरच्या राजांचाही पराभव झाला.

**प्रारंभ :** गोवेसी पुर्वी कदंब राजा राज्ये करीत होता. त्यानंतर पुर्वी कालाहुन एक ज्याहजावरी कितेक फिरंगी पुर्वेहुन समुद्र किनारेस आहे ते ब्रेंदरा प्रौ ठाण घाळन स्वाधीन करून घ्यावे म्हणुन योचना करून निघाले.

**शेवट :** xxxx गोवेचे ठाणे व आनाधी पासुन देखील प्रयेत्न केले. परंतु नगरचे राज्य साध्य जाहाले नाही. गोवाचं मुलुक सरहद्द देपाले धरून दक्षणेपासुन उत्तरेस आगाव पावेतो सरहद्द लावी गाव ६ पुर्वी साकाली पासुन समुद्राचे गाव २२२ रुपये आहे याप्रमाण गोवाबंदर आहे.

## डी. नंबर ४७

### गोवा बंदर कैफियत
### GOVĀ BUNDER KAIFIYAT

कागद : १२" x १०". मोडी. १२ ओळी. खराब अवस्था. पूर्ण.

डी. नंबर २८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर नीट वाचता येईल अशा स्वरूपात लिहिलेली ही कैफियत पहिल्या पृष्ठावर सुरू होते. या भागात वेगवेगळ्या आकारांचे कागद असून पहिली आठ पृष्ठे ही (दुसऱ्या एखाद्या) मोठ्या भागातील बाजूला केलेला तुकडा असल्यागत वाटतात. पहिल्या पृष्ठाच्या डाव्या कोपऱ्यात ५१ वी कैफियत असे लिहिलेले असून त्या पृष्ठावर ४८५ असा क्रमांक टाकलेला आहे. काही युरोपिअन व्यापाऱ्यांनी गोव्यात स्थापन केलेल्या वसाहतीसंबंधीचे निवेदन प्रस्तुत कैफियत करते, आणि याआधीच्या कैफियतीची ही नक्कलही म्हणता येईल. डी. नंबर ४६ प्रमाणेच याही कैफियतीचा प्रारंभीचा व शेवटचा मजकूर आहे.

## डी. नंबर ४८

### गोलीमंडल कैफियत
### GOLIMANDAL KAIFIYAT

कागद : ११" x ७". मोडी. २० ओळी. खराब अवस्था. पूर्ण.

यातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
रंगदेवाल कैफियती– पृ. २ ते ५.

चोट (की कोटा की चोळ ?) Cota राजांची कैफियत– पृ.९ ते २१.

चित्रगिरी कैफियत– पृ.२१ ब ते २२.

विक्रम कथा– पृ.३१ ते ३२.

राजावली– चोल, यादव, सुलतान– पृ.३३ ते ३९.

नरसिंगपूर कैफियत– पृ.४० ते ४१.

चोलंग. इनाम गाव कैफियत– पृ.४२ ते ४४.

माधो राजुल वंशावळी– पृ.४५ ते...

अग्रहारमन्वार कैफियत– पृ.४६ ते ४८.

या कैफियतीचा प्रारंभ पृ. २३ वर होतो. अनेक आकारांच्या देशी हातकागदांवर लिहिलेल्या या भागात दहा कैफियती अंतर्भूत होतात. पृ. ६ आणि पृ. १० वर दोन तमिळ कैफियती आहेत. सर्वच पृष्ठे खराब अवस्थेत आहेत.

या कैफियतीला 'गोलीमंडल कैफियत' हे चुकीचे शीर्षक दिलेले आहे. कारण मुळावरून नक्कल करणाराने 'थोंडमंडल' ऐवजी हे (गोलीमंडल) वाचले असावे. कारण संस्कृतातील 'तो' आणि 'गो' ही अक्षरे मोडीत सारखीच लिहिली जातात. पण पुढच्या निवेदनात मात्र 'थोंडमंडल' अशी योग्य दुरुस्ती केली गेलेली दिसते.

ही कैफियत दोन भागांत विभागता येईल. पहिला थोंडमंडल राजकुटुंबाच्या निर्मितीविषयी; आणि दुसरा तिरुपती येथील वैष्णवी स्मारकाच्या (Shrinc) इतिहासाविषयी.

अतिशय खराब अवस्थेत असलेल्या पृ. २५ व २६ वर काही पौराणिक आख्यायिका सांगितल्या आहेत. याला जोडूनच नारायणवरम् येथे थोंडामन राजाने राजधानी व किल्ला कसा कसा बांधला याची नोंद आहे. याशिवाय त्याने कलहस्ती येथील मंदिरात काही सुधारणा केल्या, आणि तो शालिवाहन शकाच्या युववर्षी (ycar yuva) मरण पावला अशीही नोंद केलेली आहे.

पृ. २९ व ३० वर दिल्लीच्या मोंगलांनी केलेली स्वारी, गोबूरचा पाडाव आणि थोंडमंडलम् आपल्या राज्याला जोडणे याविषयीचा मजकूर आलेला आहे. थोंडमंडलम् जिंकू पाहणाऱ्या मोंगलांना प्रतिकार करण्याचे कलहस्तीच्या राजाने केलेले प्रयत्नही स्पष्ट केलेले आहेत. दिलेली काही राजांची नावे आणि काही तारखा मात्र वाचता येत नाहीत.

या कैफियतीच्या लेखकाच्या नावाचा निर्देश केलेला नसला तरी असे सांगितले आहे की थोंडमंडलम् येथील काही जुन्या सन्माननीय रहिवाशांकडून सदर कैफियतीतील मजकुराचा काही भाग मिळाला आहे. तसेच माहितीचा उरलेला भाग तोंडमंडलम् येथील राजाच्या वारसदारांनी जपून ठेवलेल्या जुन्या ताडपत्रांवरून– त्यातील लेखनावरून – मिळालेला आहे. महत्त्वाच्या काही घटनांचा काळ शालिवाहन शकात मांडलेला आहे. ही कैफियत ज्या तारखेस लिहून काढली ती गाळली आहे.

**प्रारंभ** : तोंडमंडलम्चे कैफियत. पुर्वी हे गाव तोंडमंडलम् म्हणावयाचे आरण्य वाणी होत त्या xxxx म्हणावयाचे एक लाहण तळ होत. त्या तळ्या खाले xxx म्हणार ब्राम्हच्यारी घरही xxx क्रिषी करून जीवन करीत होता.

**शेवट** : पुर्वीपासुन असणार xxx जीवनास्तव पैकी एक ब्रह्मण व वृधापीक पिडी दर पिडी पासुन राहणार याने हे वृत्तांत सांगितला. तोंडमंडलचे कैफियत समाप्त. तेथील स्तलकर्ण टेविल पुरातन वाला पाहुन लुहिविलते.

### डी. नंबर ४९

**घोरपडे सोंडुर कैफियत**
**GHŌRPHADĒ SONDUR KAIFIYAT**

कागद : ११" x ८". मोडी. १६ ओळी. चांगली स्थिती. वाच्य. पूर्ण.

डी. नंबर १८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेली ही कैफियत पृ. ६१ वर सुरू होते. सोंडूर संस्थानाच्या घोरपड्यांचे मूळ व इतिहास सांगणारी ही कैफियत एका मोठ्या रचनेचा तुटलेला भाग असावी असे वाटते. सोंडूर हा बेल्लारी जिल्ह्याचा एक भाग. ही कैफियत प्रथमदर्शनी विजापूरच्या सुलतानाचा सैन्याधिकारी असणाऱ्या मालोजीराव घोरपडे याच्या वंशजाची वंशावळ सांगते. त्याचे तीन पुत्र संताजीराव, बहिर्जीराव आणि मालोजीराव हे शिवाजी राजांचा नातू शाहू राजा याच्या सैन्याला विजापूरच्या सुलतानाविरुद्ध मिळाले आणि परिणामी त्यांची भरभराट झाली.

ही कैफियत पुढे या तीन बंधूंचा पराक्रम सांगते. मोंगलांचा पाडाव करून आणि संभाजीच्या काळात मोगलांनी बळकावलेले मराठ्यांचे प्रांत परत जिंकून त्यांनी केलेल्या सेवाकार्याची नोंदही करते.

या तिन्ही बंधूंनी केलेल्या एकनिष्ठ सेवेमुळे कोल्हापूर संस्थानातील कापशी या गावाची जहागीर संताजीरावास सन्मानपूर्वक देण्यात आली. इतर दोन बंधूंनाही हिंदुराव हा किताब देऊन गौरविण्यात आले. त्यांना अनुक्रमे मामलिकत-मदार-सेनापती आणि अमीर-उल्-उमर असे किताब

देण्यात आले, याचे विस्तारपूर्वक वर्णन केलेले आहे. पृ. ६२ ोर ६४ मध्ये गूटीचा प्रसिद्ध सेनापती व सोंडूर संस्थानचा संस्थापक असलेला आपला मुलगा मुरारीराव याच्यासह संताजीरावांनी केलेला राज्याचा विस्तार आणि विजापूर जिल्ह्यातील गर्जेद्रगडाचा कबजा स्पष्ट केलेला आहे. उरलेली सर्व कैफियत मुरारीराव आणि त्याचे वंशज यांच्या इतिहासाचे निवेदन करते. हैदर अलीखान व टिपू सुलतान यांच्या स्वाऱ्या, गूटी व सोंडूर गमावण्याने झालेले नुकसान, सवाई माधवराव, परशराम बहिरी व नाना फडणवीस यांनी बजाविलेला सहभाग हाही सांगितलेला आहे. श्रीरंगपट्टणची लढाई, टिपू सुलतानाचा मृत्यू, मराठे व म्हैसूरचे नबाब यांच्या युद्धात ईस्ट इंडिया कंपनीने केलेला हस्तक्षेप आणि सोंडूर व गूटी परत ताब्यात घेणे हा भाग पृ. ६४-६५ वर आलेला आहे. वसईच्या तहान्वये ईस्ट इंडिया कंपनीने सोंडूरची जहागीर शिव घोरपडे यास प्रदान केली.

कैफियतीचा शेवट करताना शके १७३१-शुक्ल संवत्सरामध्ये मोजणीचे नकाशे करणाऱ्या मि. वर्ड्ससाहेब या अधिकाऱ्यास वरील माहिती देण्यात आली असे सांगितले आहे. लेखकाचे नाव, नक्कलकाराचे नाव, माहितीचे मूळ गाळलेले आहे.

**प्रारंभ :** यादी कैफियत घोरफडे यांचे मूळपुरुष मालोजी राव त्यांची पोटी (१) वडील संताजीराव, (२) बहिरजीराव, (३) मालोजीराव हे त्रीवर्ग शाहू माहाराजाजवळी होते ते मोगलाईच प्रबल होऊन शाहु माहराजचे मुलुक वगैरे षीकीस्तिस आणौन शाहुमहाराज यांच ठराव न होतां गर्दी गुज्यारली.

**शेवट :** आदी दौलत कैलास वासी मुरारीराव शैनापती च ाव आपल रुणानुबंद सर्वमान मरीयाद कुंषणी सरकारास पुर्वीपासुनही आहे. साभीमान पुर्ण आसावे, सके १७३१ शुक्कल नाम संवछर कार्तीक मासी वारली साहेबानी नकषा लीहुन घेणे बदल असतां कैफियत मागीतले ते दिलह आर्से.

## डी. नंबर ५०

**घोरफडे सोंडूर कैफियत**
**GHŌRPADĒ SŌNDŪR KAIFIYAT**

**कागद :** ७ $\frac{१}{२}$" x ४ $\frac{१}{२}$". मोडी. १८ ओळी. खराब अवस्था. पूर्ण.

**डी. नंबर ३० मध्ये** सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

**देशी बनावटीच्या** हातकागदावर नीट वाचता येईल अशा रीतीने लिहिलेली ही कैफियत पृ. ११३ वर सुरू होते. मालोजीराव घोरपडे याच्यापासून त्याचा शेवटचा वंशज शिवराव घोरपडे याच्यापर्यंत सर्व घोरपडे वंशजांच्या वंशावळीचा तक्ता इथे दिलेला आहे. विषयदृष्ट्या ही कैफियत आधीच्या कैफियतीसारखीच असली तरी थोडा अधिक तपशील पुरविण्यात आलेला आहे.

मुरारीरावाचा भाऊ भुजंगराव याच्या इतिहासास जास्त महत्त्व देण्यात आलेले आहे. त्याला गर्जेद्रगडाची जहागीर आणि विजापूर जिल्ह्यातील इतर काही ठिकाणे देण्यात आली. मुरारीरावाने शिवरावास दत्तक घेणे, नरसिंगराव घोरपडे या (शिवराव लहान असताना सोंडूरवर राज्य करणाऱ्या) अज्ञान पालनदार राज्यकर्त्यास बाजूस सारताना झगडावे लागणे अशा अडचणी आणि पेशव्यांच्या हस्तक्षेपामुळे शिवरावास सोंडूर परत मिळणे– हे स्पष्ट केलेले आहे. बाजीराव पेशव्यांची सोंडूर-भेट, शिवरावाने (त्यांचा) केलेला स्वागत-शिष्टाचार आणि अशाच (तुलनेने) कमी महत्त्वाच्या बाबीही सांगितल्या आहेत.

शेवटच्या पृष्ठावर ईस्ट इंडिया कंपनीच्या दोघा नोकरांच्या नावांचा उल्लेख आहे. वसईच्या इंग्रज-मराठे युद्धानंतरच्या तहाप्रमाणे ज्यांनी सोंडूरचे राज्य नरसिंगराव घोरपडे याच्या स्वाधीन केले तेच हे दोघे– गिल्कॉट ब्रूस आणि कर्नल पॉटर होत.

ही कैफियत मोजणी-नकाशे तयार करण्यासाठी नेमलेल्या, अज्ञान पालनदाराच्या कार्यालयात कारकून असणाऱ्या नारायणरावाने तयार केली असल्याचे शेवटी लिहिले आहे. सोंडूर संस्थानात राहणाऱ्या भुजंगरावाच्या थोरल्या भावाने जपून ठेवलेल्या कागदपत्रावरून सर्व माहिती एकत्रित करण्यात आली आहे. सदर कैफियत कार्तिक ५, शुक्ल नाम संवत्सरे, शालिवाहन शक १७३१ रोजी लिहिली गेली आहे.

**प्रारंभ :** यादी कैफियत घोरपडे यांचे मुल पुरुष मालोजीराव. त्यांचे पोटी (१) वडील संताजीराव (१) दुसरे बहिरजीराव (१) तीसरे मालोजीराव. हे त्रीवर्ग शाहुवाहाराज यांचे मुलुक वगैरे सीकस्ति आणुन शाहुमाहाराज यांच ठराव न होता गुजरली.

**शेवट :** मुरारीराव सेनामतीचे व आपले रणानुबंध xxx मानमरीयादा कुंपणी सरकारास पुर्वीपासुन ही आहे. साभानीन पूर्ण असावे शके १५३९ शुक्कल नाम संवछर कार्तिक मासी वर्ड साहेबांनी नकाषा लिहुन घेणे बदल अल असता त्या बरावरी नारायणराव कारकुन होते सोंडुरचे पाहुन झाडुन दाखवीले. कैफियत माघीतले असता दिलह अस कळावे.

## डी. नंबर ५१

**चन्नपटणाची कैफियत**
**CANNAPATTNĀCI KAIFIYAT**

कागद : ७ $\frac{१}{२}$" x ५". १५ ओळी. मोडी. जुने. वाच्य. अपूर्ण.

यातील इतर रचना डी. नंबर ४५ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत. ही कैफियत पृ. ४८ वर सुरू होते. पहिल्या ४७ पृष्ठांवर तेलगू शैलीतील (character) मजकूर आहे.

नंतर जे इकेरे नाईक म्हणून ओळखले गेले त्या सोंदाईच्या नाईक राजांचा इतिहास सांगणारी ही एकत्र केली गेलेली वर्णनात्मक रचना आहे. चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत १८ पानांची आहे. जरी चन्नपट्टण कैफियत असे हिला म्हटले असले तरी ती कोणत्याही प्रकारे मद्रासशी संबंधित नाही. तमिळमध्ये मद्रास हे चन्नपट्टण म्हणून ओळखले जाते. तोंडमंडलम्च्या इकेरे नाइकांचा पराक्रम आणि कारभार यांचे ती वर्णन करते. कैफियतीत सूचित केलेली ठिकाणे आणि तटबंद्या कर्नाटक व म्हैसूर प्रांतातील आहेत. तोंडमंडलम् राज्याचा संस्थापक तोंडमन चक्रवर्ती याने सोंदे आणि सेरीसाई येथे दोन किल्ले बांधले असे सांगण्यात येते. त्याने आपला पुतण्या वेंकटपती याच्या मदतीने पाळेगारावर हल्ले करून त्यांचे आपल्या प्रदेशाजवळ असलेले किल्ले ताब्यात घेतले.

श्रद्धाळू असल्यामुळे वेंकटपथीने पुष्कळ मंदिरे बांधली. त्यातील एक गौरी वीश्वराचे मंदिर वास्तुशास्त्रीय सौंदर्यात इतर मंदिरांहून श्रेष्ठ आहे. वेंकटपथीच्या दहाव्या वंशजापर्यंतच्या वारसदारांची नावे सांगितलेली आहेत. त्यांपैकी काहींनी लिंगायत धर्माचा स्वीकार केला. दिल्लीच्या किलीचखानाचा हल्ला, नाइकांचा पराभव आणि एका तहामुळे नाइकांच्या राज्याची पुनर्स्थापना थोडक्यात सांगितलेली आहे. आपल्या सर्वसंगपरित्यागाच्या वेळी त्याने बलाप्पय्या या आपल्या मित्राची काही किल्ल्यांची व्यवस्था पाहण्यासाठी नेमणूक केली. बलाप्पय्याला नेमून दिलेल्या किल्ल्यांची व गावांची नावे आणि सदाशिव नाइकामागून आलेल्या वारसाचे नाव ही तिथे चिकटविलेल्या कागदांच्या चिठ्यांमुळे वाचता येत नाहीत. मोंगलांची स्वारी आणि इतर नाइक राजांचा इतिहास स्पष्ट केलेला आहे. अर्धवट लिहिलेली आणि कोरी अशी काही पृष्ठे कैफियतीत आहेत. नक्कलकाराचे नाव आणि यातील माहितीचे मूळ निवेदनात गाळलेले आहे. तारखा शालिवाहन शकात दिलेल्या आहेत.

**प्रारंभ** : कैफियत सोंदे सिरसी नाड xxxxxx दिलते पुर्वी सोंदेराज्य xxxx साबक चेंद्रगिरी तिरुपतीस समीप आहे. त स्थळमधे आकाशराये यांचे भाऊ तोंडमन चक्रवर्ती साकान तोंडमान ईलाखे तिरुपती तेथे तोंडमान चे xxx वंशस्त लेंकीच लेंक तिथे xxx अचुत रायलाचे भाचा वेंकटपती म्हणारास पट बांदावे म्हणुन त्यापतीस असत.

**शेवट** : श्रीरगपिटण.

## डी. नंबर ५२

**चार युगांची राजे**
**CĀR UGĀNCI RĀJE**

कागद : ११" x ७". मोडी. जुने. चांगली स्थिती. वाच्य. पूर्ण.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेल्या या पुस्तकाची ११२ पृष्ठे असून एका मोठ्या भागातील बाजूला केलेला तो एक तुकडा असावा असे वाटते. हस्ताक्षर वाच्य व स्वच्छ असले तरी विरामचिन्हांचा चांगला वापर केलेला नाही. तसेच कागद व्यवस्थित रचलेले नाहीत. १४ भागांमध्ये प्रस्तुत लेखन विभागलेले आहे. पहिला आणि शेवटचे दोन भाग स्वतंत्रपणे लिहिलेले आणि इतर हस्तलिखित सलगपणे लिहिलेले दिसते. पहिल्या भागाचा प्रारंभ पहिल्या पृष्ठावर आणि शेवट सातव्या पानावर झालेला दिसतो. हे लेखन जनमेजयापासून नंतरच्या चक्रवर्ती राजांचे वर्णन करते. त्यांनी शेकडो हजारो वर्षे राज्य केले असे सांगितले आहे. ज्यांनी पहिली तीन युगे राज्य केले त्या राजांची आणि त्यांच्या वंशजांची नावे, आडनावे, त्यांची बुद्धिमत्ता, त्यांनी मिळविलेला लौकिक आणि त्यांच्या बाबतीत वापरले जाणारे अतिशयोक्त स्तुतिपर शब्द यांची (इथे) नोंद केलेली आहे.

दुसऱ्या भागात विजयनगरच्या राजांनी काही मंदिरांच्या दगडी भिंतीवर कोरलेल्या शिलालेखांचे वर्णन केलेले आहे. जिथे ही मंदिरे आहेत त्या खेड्याचे वा गावाचे नाव सांगितलेले नाही. विजयनगरच्या राजांच्या मालकीच्या अनेक खेड्यांबद्दलचा तपशील दिलेला आहे.

शिलालेखांच्या प्रारंभी व अखेरीस कृष्णदेव रायाचे नाव आलेले आहे. देणगीदाखल दिलेली गावे, त्यांच्या सीमा, पाणी-पुरवठ्याची साधने, निसर्ग, जमिनीचा कस (सुपीकपणा) आणि तसेच इतर तपशील स्पष्टपणे नोंदविलेले आहेत. या शिलालेखातील अधिकांश भाग ज्यांना जमिनी दान म्हणून दिल्या त्या व्यक्तींच्या व संस्थांच्या नामोल्लेखांनीच भरलेला आहे. प्रधान आणि गौण देवतांच्या मंदिराची नावे आणि त्यांच्या दैनंदिन

पूजापाठासाठी व वार्षिक उत्सवासाठी मुक्रर केलेली रक्कम यांचा उल्लेख आहे.

**पृ. १०० पासून अखेरपर्यंत ही कैफियत शालिवाहन शक** १३०० नंतर ते मुसलमानी सत्तेच्या सत्ताग्रहणापर्यंतच्या काळाशी संबंधित आहे. दोनशे ते तीनशे वर्षांच्या खंडानंतर विजयनगर व वरंगळ येथील शेवटच्या राजांचा संदर्भ येतो. तेव्हा झालेली काही खेड्यांची, अग्रहारांची आणि मंदिरांची निर्मिती याविषयीचे उल्लेख येतात. विजयनगरच्या राज्याचा विनाश अगदी थोडक्यात वर्णिलेला आहे.

पृष्ठे नीट क्रमाने लावलेली नाहीत. पृ. ११२ वरील एका वेगळ्या परिच्छेदात नक्कलकार सांगतो की अनेक जुन्या हस्तलिखितांवरून आणि ताडपत्रांवरून हा कागद नकलून घेतलेला आहे. पृ. ९२ (ब) वर असे सांगितले आहे की या कागदावरील काही भाग द्रविडकांची येथे राहणाऱ्या भार्गवाचारी या(मालका)च्या परवानगीने शिलालेखाच्या प्रतीची काढलेली नक्कल आहे. (किंवा शिलालेखाच्या प्रतीवरून नकलून घेतलेला आहे) ही सर्व रचना म्हणजे कन्नड, तेलगू आणि संस्कृत भाषा यांचे मिश्रण मराठी भाषेत व मोडी लिपीत लिहिलेले असा प्रकार झालेला आहे. कैफियत संपविताना असे सांगितले आहे की एल्लूर चकानी कोट्टाय येथे राहणाऱ्या देशमुख नरहरी अय्या याने हस्तलिखिताची नक्कल काढली आणि ती ५ सोमवार (lunar day) वैशाख शुक्ल, दुन्मती संवत्सर, शालिवाहन शके १७२१ रोजी पुरी केली.

**प्रारंभ :** रायरेस्व पदया श्रीरम्येनु ।

संतता । श्री गारनु । राज्या नव्या ।

xxxx सकल कळा पारंगत । नोपुतीहासभापतीयेनळु ॥

**शेवट :** जुन पोस्तकपैकी कितक ताडावोल लिहीलते गेल आहे. कितेक अक्षर पोस्तक फार दावसाचे. तन्मुळे कितेक टाई अक्षर अल आहे. करीत तनमुळे या पोस्तकांतही स्तळ सोडुन लिहीले अस.

### डी. नंबर ५३

**चार युगांची राजे**
**CAR UGANCI RAJE**

**कागद :** १६$\frac{१}{२}$ " x ६". मोडी. २५ ओळी. जुने. चांगली स्थिती. वाच्य. पूर्ण.

या भागात १७२ पृष्ठे आहेत. मराठ्यांचा उदय व इतिहास यांशी ती संबंधित आहेत. ही रचना २५ विभागांत विभागलेली असून, प्रत्येक विभाग पुन्हा छोट्या उपविभागात विभागलेला आहे.

कैफियतीचा मुख्य हेतू हा मराठ्यांच्या उदयापासूनच्या इतिहासाबद्दलची विस्तृत माहिती आणि अचूक तारखा देणे हा आहे. हे करताना सातारच्या भोसल्यांच्या सहभागाकडे जास्त लक्ष दिलेले आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या कमी महत्त्व असलेल्या काही पौराणिक आख्यायिका या भागात सापडतात. पांडवांच्या वंशातील हस्तिनापूरवर राज्य करणारा पहिला राजा जयसिंग होय असे सांगितले आहे. हस्तिनापूर येथे राज्य केलेल्या अनेक हिंदू राजांच्या नावांची यादी आणि शालिवाहन शक ५१२ पर्यंतचा त्यांच्या राज्यकारभाराचा काळ दिलेला आहे.

संस्कृत श्लोक प्राकृत भाषेत त्यांच्या अर्थासह उद्धृत केलेले आहेत. विमल पंडित याच्याकडे असलेल्या जुन्या हस्तलिखिताच्या नकला म्हणजे ही सर्व माहिती असे सांगितले आहे. या कैफियतीप्रमाणे पहिला मुस्लिम राजा रुम-उद्-दीन असून त्याने युद्धात हस्तिनापूर जिंकले आणि त्याचे दिल्ली असे नाव ठेवले. वर उल्लेखिलेल्या पहिल्या राजापासून हिंदुस्थानात झालेल्या मुसलमान राजांच्या नावांची एक मोठी यादी आणि प्रत्येकाने दिल्लीस राज्य केल्याचा काळ दिला आहे.

एका स्वतंत्र विभागात शालिवाहन, विक्रमादित्य, हिजरी आणि सौर पंचांगे (किंवा कालगणना) ज्या ठिकाणी लोकप्रिय होत्या त्यांच्या नावांची यादी दिलेली आहे.

देवगिरीचे आणि मोडी लिपीचे मूळही स्पष्ट केलेले आहे. या दोन्हींबद्दलची माहिती वाईकर जोशी (Voyckar Joshi) यांच्या ताब्यात असलेल्या शालिवाहन शके ११५८ च्या दप्तरातून मिळविली असे या कैफियतीचा लेखक सांगतो.

पुढचे प्रकरण पुणे शहराचे मूळ स्पष्ट करून तेथील पुरातन अशा दोन प्रसिद्ध मंदिरांचा– एक पुणेश्वर आणि दुसरे केदारेश्वर– इतिहास सांगितला आहे. पीर अबदुल्ला नावाच्या एका फकिराने चमत्कारांच्या जोरावर पुण्याच्या आजुबाजूच्या खेड्यातील लोकांची मने जिंकली आणि त्यांना इस्लाम धर्माची दीक्षा दिली. त्याने या दोन्ही हिंदू मंदिरांवर हल्ला केला, त्यांचा नाश केला, त्यांना दिलेल्या देणग्या जप्त केल्या आणि त्या जागी मशिदी बांधल्या. पूजाअर्चा करण्यासाठी तिथे नेमलेल्या ब्राह्मणांना मुस्सफर (mussafars) म्हणून नेमले. त्या सर्वांनी स्वेच्छेनेच धर्मांतर केले असे सांगितले जाते. त्यांची आणि त्यांच्या वंशजांच्या नावांची यादी दिली आहे.

निजामशाही, आदिलशाही आणि ईमादशाही राजघराणी आणि त्यांतील राजकर्ते यांचा संक्षिप्त इतिहास सांगितला आहे.

वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील ५ तारखेस गुरुवारी शालिवाहन शके १५४९ प्रभवमध्ये शिवनेरी येथे शिवाजीचा जन्म झाला असे सांगितले आहे.

पृ. ३६ ते ४० वर आईच्या काळजीपूर्वक देखरेखीखाली व्यतीत झालेले शिवाजीचे बालपण वर्णिले असून शिवाजीची स्वभाववैशिष्ट्ये सांगितली आहेत. शालिवाहन शके १५५६ पर्यंत जगलेल्या आपल्या गुरूबद्दल शिवाजीच्या मनात अतिशय आदर होता असे सांगितले आहे. १५९१ पर्यंत शिवाजीने मिळविलेले किल्ले आणि केलेली शूर कृत्ये यांच्या शालिवाहन शकात तारखा दिलेल्या आहेत.

आठवे प्रकरण शिवाजीने केलेले कार्य आणि लढलेली युद्धे याच्याशी संबंधित आहे. शालिवाहन शके १५९१ मध्ये शाहीन (Shahin– शहाजी) कनकगिरी येथे घोड्यावरून पडल्यामुळे झालेल्या जखमांनी मृत्यू पावला.

पुढचे प्रकरण त्याचा राज्यविस्तार आणि मोंगलांच्या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी त्याने बांधलेल्या किल्ल्यांशी संबंधित आहे.

चैत्र १ शके १५९५ Annanda Erice मध्ये विद्वान पंडित गगफूट (Gagaphut गागाभट्ट) काशीकर यांच्या पौरोहित्याखाली शिवाजीला छत्रपती म्हणून मोठ्या थाटामाटाने राज्याभिषेक झाला असे सांगितले आहे. या प्रकरणात पुढे शिवाजीच्या राज्यकारभाराबद्दलची माहिती दिलेली आहे.

शके १६०२– रुद्रोदगरी वर्षी ताप येऊन शिवाजीचा मृत्यू झाला. मरणसमयी त्याचा पुत्र संभाजी जवळ नव्हता. राजारामाच्या वतीने काही काळ अष्टप्रधानांनी राज्य केले. मोरोपंत पिंगळे आणि अण्णाजी दत्तो (Dethe– देथे) यांना या पृष्ठावर महत्त्वाचे स्थान मिळालेले असून त्यांच्या कार्याची माहिती दिलेली आहे.

मराठा राज्याचे पतन, शके १६१० मध्ये मोठ्या सैन्यानिशी आलेल्या औरंगझेबाच्या इमामबेग या सेनापतीशी संगमेश्वर येथे झालेली शेवटची लढाई आणि संभाजीचा पराभव कसा झाला, तो कसा पकडला गेला, त्याची चौकशी कशी झाली आणि त्याचा औरंगझेबाकडून जुलपूर (Julapur– तुळापूर) येथे शिरच्छेद कसा करण्यात आला या सर्व घटना तपशीलवार हाताळलेल्या आहेत. संभाजीचा सात वर्षांचा मुलगा शाहू आणि त्याची आई येसूबाई यांना प्रतापगड येथे अटक करून औरंगझेबाच्या दिल्ली येथील दरबारी नेले गेले, तिथे त्यांना औरंगझेबाची कन्या असलेल्या बेगमेकडून कशी वागणूक मिळाली या साऱ्याचे वर्णन केलेले आहे.

उरलेली कैफियत पेशव्यांचा उदय व पतन ते अखेरीस ईस्ट इंडिया कंपनीने त्यांना जिंकणे इथवरचा मराठ्यांचा इतिहास स्पष्ट करते.

म्हैसूरच्या अप्पाजीरावाने मुळाबरहुकूम हा सर्व मजकूर नकलून घेतला आणि तो १२ एप्रिल १८०६ रोजी पुण्याजवळील मूलमठ (Mool Mutta– मुळा-मुठा) येथे पुरा झाला. या कैफियतीच्या लेखकाचे नाव सांगितलेले नाही.

**शेरा :** वरील सर्व उताऱ्यावरून असे दिसते की, हा भाग शके ५१२ पासूनच्या मराठ्यांच्या इतिहासातील घटनांबद्दल जास्त आणि अचूक माहिती देऊ शकेल, त्यासाठी तो पूर्ण भाषांतराच्या योग्यतेचा असून त्यातील विषय व दिलेल्या तारखा, त्यांची आधारभूतता प्रसिद्ध लेखकांनी तयार केलेल्या मराठा इतिहासग्रंथांशी पडताळून घ्यावी.

**प्रारंभ :** वही ऋतायुग, त्रीतायुग, द्वापार कली हे च्यार ४ युगी पैकी हस्तनापुरी हिंदुपती राजे व मुसलमान राजे कलीयुगी जाले व महाराष्ट्र देशी मराटे जातीचे भोसले यांच प्रताप व ब्रह्मण कोंकणस्त श्रीमंत पेषवे यांचे विस्तार ऐसे झाडुन लिहिली आहे.

**शेवट :** छ १२ माहे एप्रेल सन १८०६ इसवि दरजागा मुकाम मुला नदी संगम मुतशील पुना पहिल्यापासुन अजे तागायेत चालिले वृतांत सर्वही शेक संवछर दिन मास सुधा झाडुन आहे.

## डी. नंबर ५४

**चित्रगिरी कैफियत**
**CITRAGIRI KAIFIYAT**

कागद : १३" x १०". मोडी. २२ ओळी. जुने. खराब अवस्था. वाच्य. अपूर्ण.

डी. नंबर ४८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

देशी हातकागदावर लिहिलेला हा एक अपूर्ण दस्तऐवज आहे. प्रारंभ व शेवट दोन्ही गहाळ झालेले आहेत. जिंजी- (Ginge) नजीकच्या काही किल्ल्यांचा यात निर्देश केलेला असून, नाईक राजांचा इतिहास सांगितला आहे. हस्तलिखिताच्या खराब अवस्थेमुळे आशय समजणे वा ते नीट वाचणे शक्य नाही.

## डी. नंबर ५५

**चित्रदुर्ग कैफियत**

**CITRADURG KAIFIYAT**

कागद : १०" x ८". २० ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. वाच्य. पूर्ण. डी. नंबर ३१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फ्रेंच बनावटीच्या जाड कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. १७४ वर सुरू होते. चित्रदुर्गाचे मूळ व इतिहास सांगणारी ४२ पृष्ठे तीत आहेत. ती व्यवस्थित रचलेली नसून सुट्या स्वरूपात आहेत.

प्रारंभी पांडवांबद्दलच्या एका प्रसंगाची आख्यायिका सांगितली जाते. त्यांनी त्यांच्या हद्दपारीचा काळ चित्रदुर्गाजवळ काढला, असे सांगितले आहे.

शालिवाहन शके १०२५ पर्यंतची काहीही माहिती दिलेली नाही.

थिरुमल रायर हा श्रद्धाळू नाईक असून, तो नरसिंह आणि दुर्गादेवी यांचा उपासक-भक्त होता. जमिनीत पुरलेल्या धनप्राप्तीतील संपत्तीचा व्यय करून त्याने किल्ला व उपरोल्लेखित देवांचे मंदिर बांधले, असे सांगण्यात येते. या आनंदाच्या प्रसंगाचे स्मारक (स्मरण) म्हणून त्याने किल्ल्याला 'चित्रदुर्ग' हे नाव दिले. चित्रदुर्गाजवळच्या मल्लट्टी (malati) खेड्यात एक थडगे होते असे म्हटले जाते. ही कैफियत पुढे असे सांगते की, हा वोबन (Voban) नाईक तिरुपतीच्या वेंकटेश्वराचा उत्साही भक्त असून, त्याने त्या देवळासाठी बराच जमीनजुमला दिलेला होता. त्याचा मुलगा कृष्णाप्पा नाईक शके ११३७ मध्ये गादीवर बसला. त्याने पादाक्रांत केलेले प्रदेश आणि त्याच्या औदार्याच्या कृती यांचे सुरेख वर्णन केलेले आहे. त्याने जगाचा त्याग केला, सिंहासन सोडले आणि आपला दुसरा पुत्र मेता कोट्टाय नाईक याला गादीवर बसविले, असे सांगण्यात येते. विजयनगरचे राजे आणि हा मेता कोट्टाय नाईक यांच्यातील शत्रुत्व आणि कृष्ण रायर याने आपली मुलगी युवराज गणपती याला देऊन पक्की मैत्री केली यामागील परिस्थिती, यात फार थोडक्यात वर्णिलेली आहे. शके १५८७ पर्यंत राज्य केलेल्या यादव घराण्यातील २७ राजांचा संक्षिप्त इतिहास मोठ्या कौशल्याने सांगितला आहे.

श्रीरंग यादव रायरपासून सुरू होणाऱ्या यादव घराण्याशी संबंधित असा वेगळाच भाग यात आहे. त्यात मोगलांची स्वारी आणि चित्रदुर्ग व विजयनगरचे साम्राज्य मुसलमानांच्या हाती कसे गेले याचे निवेदन केलेले आहे.

शिवाजीपासून शेवटच्या सवाई माधवराव पेशव्यांपर्यंत मराठ्यांनी केलेला प्रवेशविस्तार आणि लढलेली युद्धे, यांनी या कैफियतीच्या लेखकाचे खास लक्ष वेधून घेतलेले दिसते. हैदराबादच्या नबाबाची आणि म्हैसूरच्या हैदर अलीखानाची स्वारी, कर्नाटकच्या युद्धात फ्रेंच आणि इंग्रज यांनी वठविलेल्या भूमिका आणि शेवटी ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती चित्रदुर्ग कसा गेला हे सर्व मोठ्या कौशल्याने वर्णिलेले आहे. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ देण्यात आलेले नाही.

**प्रारंभ** : चित्रदुर्गचे कैफियत. पुर्वि व्यापार युगो श्रीकृष्णकृष्णाने अवतार केले असतां त्या समई कौरव व पांडव यास समस्थानी येउन पांडवास वनवासास रवाणा करून पाटविले– त्यानी जायनवी तीरास एकन असता तेथेही कौरव दुर्योधन जाऊन उपद्रव करुन लोगले.

**शेवट** : xxx जुने देवुळ पाडुन नवित बेंगुळुर म्हणुन गाव बादविला. पाहाडेचे दक्षणेकड आहेत तिमणा नाईकाचे किल्ल्यात येणेस नळ करुन आणविला. याप्रमाणे दौलत करीत असता सिधार्थी संवछर जेष्टसुध १० दिवसी सेर्के १७२० पैकी श्रीरंगपटणाची किल्ला xxx

**शेरा** : यात सांगितलेल्या बाबींशिवाय हा दस्तऐवज खूप ऐतिहासिक घटनांचे अचूक तारखांसह स्पष्टीकरण करतो. मराठ्यांचे राज्य आणि विशेषतः पेशव्यांचे राज्य आणि तो काळ यांकडे लेखकाचे काळजीपूर्वक लक्ष गेलेले आहे.

## डी. नंबर ५६

**चित्रदुर्ग कैफियत**

**CITRADURG KAIFIYAT**

कागद : १८" x १२". २६ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

यातील इतर रचना डी. नंबर २५ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत.

डी. नंबर ५५ मध्ये सांगितलेल्या कैफियतीची ही नक्कल असून, या भागाच्या पृ. ७१९ वर ती सुरू होते, पण संपूर्ण कैफियत इथे दिसत नाही. विपुल प्रमाणात शब्दांचे अशुद्ध लेखन आणि विरामचिन्हांचा गैरवापर केलेला आढळतो. नक्कलकाराचे नाव आणि नकलेची तारीख दिलेली नाही.

## डी. नंबर ५७

**चिंगलपटण बखर**
**CIANGLPATNA BAKHĀR**

**कागद :** ८" x ६".मोडी.जुने.१८ ओळी.दुर्वाच्य.पूर्ण.

डी. नंबर ४३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

देशी हातकागदावर लिहिलेल्या या कैफियतीत १६ पाने असून ती या भागाच्या १४ व्या पानावर सुरू होते. ही कैफियत चिंगलपेटचा राजा बंगारू थिम्मण्णा रायलू आणि पेनुगोंडाचा कृष्ण रायलू यांच्यातील युद्धाची माहिती देते.

पहिली चार पाने बंगारू थिम्मण्णाने पेनुगोंडास दिलेली भेट आणि त्याची कृष्ण रायलूशी झालेली मुलाखत स्पष्ट करतात.

दुसरे प्रकरण कृष्ण रायलूने आपला अनौरस पुत्र पचन रायलू याला पेनुगोंडाच्या गादीवर बसविण्यासाठी केलेल्या प्रयत्नाशी निगडित आहे. कांची येथे कैदी असताना पचनाने मदतीसाठी म्हैसूरच्या राजाला निरोप पाठविला. म्हैसूरच्या राजाने कृष्ण रायलूच्या मदतीसाठी वेलोर वेंकट रेड्डी याला मोठ्या सैन्यासह पाठविले. तह करण्यात आला. त्याअन्वये पचन रायलू याची सुटका केली गेली आणि तो पुन्हा पेनुगोंडाचा राजा झाला. त्याच्या मृत्यूनंतर रघुपती रायलू पेनुगोंडाचा राजा झाला. थिम्मण्णा रायलू आणि रघुपती रायलू हे अपत्यप्राप्तीसाठी बराच काळ तिरुपतीस देवाची आराधना करीत होते. हा रघुपती रायलू आणि (चिंगलपेटचा) थिम्मण्णा यांच्यात शत्रुत्व होते. रघुपतीने मोठी फौज जमा केली आणि हुसेन खान, फिरोज पीर जालखान अशा सेनापतींना नोकरीस ठेवले. त्याने राम आणि लक्ष्मण नावाच्या दोन मोठ्या तोफाही तयार केल्या. चिंगलपेटच्या अंतर्भागात तीन युद्धे लढली गेल्याचे कळते. शेवटी रघुपतीला ठार करण्यात आले. वर दिलेल्या घटना चिंगलपेटजवळील एका खेड्यातील देवालयामधील शिलालेखावरून जमा करण्यात आल्या. पण त्या खेड्याचे वा देवालयाचे नाव कीटकांनी (कागदाचा) नाश केलेला असल्यामुळे वाचता येण्याच्या अवस्थेत राहिलेले नाही.

लेखकाचे नाव, घटनांच्या तारखा किंवा माहितीचे मूळ ही सांगितलेली नाहीत.

**प्रारंभ :** श्रीराम प्रसन– बखर चेगलपेटचे राजे लोकानी. राज्यकारभार केल ते पुर्वि भगार तिमंराजाम्हणार चेंगलपठणांत राज्यभार करीत होता. तेव्हा पेनगोंडाकृष्ण राबल भंगार तिमणाचे नावे कागद लिहून पाटविला.

**शेवट :** हा भाग अतिशय खराब अवस्थेत असल्याने नकलून काढणे अशक्य आहे.

## डी. नंबर ५८

**चतुरंगपटण कैफियत**
**CATURANGAPATNA KAIFIYAT**

**कागद :** ६" x ४".१४ ओळी.मोडी.जुने.दुर्वाच्य.पूर्ण.

डी. नंबर ४३ मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. ३० वर सुरू होते. ती १२ पानांची असून नागपट्टम तालुक्यातील एक खेडे ईस्ट इंडिया कंपनीने कसे ताब्यात घेतले याचा वृत्तान्त तीत आहे.

अर्काटचा फौजदार दाऊदखान याने आपल्या नोकरांना नागपट्टमला जाण्याची सूचना केली. त्याला हवे असलेले काळे ग्रनाइट दगड मिळतील अशा जागेचा शोध घेण्यासाठी. पहिल्या ६ पृष्ठांत हे सर्व आलेले आहे. आपल्याला हवे असलेले दगड एदिअलचेरी या खेड्यात सापडल्याचे नोकरांनी दाऊदखानास कळविले, तेव्हा फौजदाराने ते खेडे त्याच्या मालकाकडून विकत घेतले. त्याने अर्काटच्या नबाबाकडून परवानगी घेतली आणि तिथे एक किल्ला बांधला. हैदर अलीने कर्नाटकावर हल्ला केला. त्याला फ्रेंचांनी मदत केली. या खेड्यावर हल्ला केला गेला आणि ते ताब्यात घेतले गेले. फ्रेंचांच्या मदतीमुळे आनंदित झालेल्या हैदरने हे खेडे फ्रेंचांना दिले. जेव्हा (तिकडे) युरोपमध्ये (इंग्रज-फ्रेंच युद्धाची) शांततेत अखेर झाली तेव्हा फ्रेंचांनी हे खेडे ईस्ट इंडिया कंपनीस परत दिले. शेवटी एक पौराणिक आख्यायिका सांगितली आहे. तसेच मंदिरे, मशिदी, जलाशय इत्यादींच्या नावांची मोठी यादी दिलेली आहे. काही युरोपिअन लोकांची नावेही दिलेली आहेत. लेखकाचे नाव किंवा ही घटना घडल्याची वा ही कैफियत लिहिल्याची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** कैफियत चेतुरंग पटणाचे पूर्वी आरकाडाचा फौजदार दाऊदखानचे दिवसांत नागपटणात असणार वलादवाल अपले लोकास व धोंडे कातरणारास मुलुकावरी पाटविले.

**शेवट :** कलेकटर मेस्त दलेसास लिहून त्याचे दुपटी हासन्तस पाटवुन देउन सद्रास आपले रात टेवुन घेतले. या चेतुरणपटणात अहेते देवस्तान कुंटी बागाईतचा तपसील.

## डी. नंबर ५९

**चेंद्रगिरी कैफियत**

**CANDRAGIRI KAIFIYAT**

**कागद :** ६" x ५". ८ ओळी. मोडी. वाच्य. जुने. खराब अवस्था. पूर्ण.

या भागात १२३ पृष्ठे असून ती सर्व चंद्रगिरी आणि तेथील राजाचे मूळ व इतिहास यांच्याशी संबंधित आहेत. ही कैफियत अतिशय पातळ अशा देशी हातकागदावर लिहिलेली आहे.

चंद्रगिरी तालुक्यातील एका खेडेगावी असलेल्या कृष्णस्वामी पिल्ले या अधिकाऱ्याच्या ताब्यात असलेल्या चंद्रगिरीच्या आधीच्या काही नाईक राजांच्या जुन्या हस्तलिखितांवरून आणि अहवालांवरून या ऐतिहासिक निवेदनाची माहिती गोळा करण्यात आलेली आहे, असा पहिल्या पृष्ठावरच निर्देश केलेला दिसतो. ही कैफियत यादव, नाईक आणि मुसलमान अशा चंद्रगिरीला राज्य केलेल्या तीन राजवंशांशी संबंधित आहे.

विजयनगरच्या सिंहासनावर आरूढ झालेल्या राजांची नामावली यात सांगितलेली आहे.

रघुपती रायलू याने एक-दोन किल्ले बांधले आणि त्यांना राजमपेट व अम्मपेट अशी नावे दिली. त्यात त्याने आपले नातेवाईक आणि आश्रित यांच्यासाठी निवासस्थाने, सुंदर राजवाडे आणि बागबगिचे बांधले. परकीय आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी त्याने किल्ल्यावर दोन मोठ्या तोफा ठेविल्या. त्यांना राम व लक्ष्मण अशी नावे दिली. मात्र त्यांचा फक्त एकदाच वापर केला गेला. त्यांचा प्रचंड आवाज व त्यांनी उडविलेला कहर पाहून त्यांचा कोणत्याही परिस्थितीत पुन्हा वापर न करण्याची त्याने त्याच्या सेनापतींना आज्ञा केली. आजही त्या (तोफा) किल्ल्यावर आहेत. पाळेगार व त्यांची निवासस्थळे यांची यादीही यात दिलेली आहे.

कैफियतीचा शेवटचा भाग मोगलांच्या उदयाची माहिती देतो. शके १५३७ मध्ये गोवळकोंडा येथे कुतुबशाही घराण्याची स्थापना झाली. गोवळकोंडा येथे परकोश पादशापर्यंत क्रमाने राज्य केलेल्या सुलतानांची नावे दिलेली आहेत.

गोवळकोंड्याच्या सुलतानावर औरंगजेबाने केलेला हल्ला अगदी थोडक्यात सांगितला आहे.

अर्काटचा किल्ला व त्याच्या संस्थापकांबद्दलची हकीकत, दाऊदखान-सादिलखान यांचा इतिहास, त्यांच्या राज्यारोहणाच्या तारखा, त्यांनी किती वर्षे राज्य केले या गोष्टींचा उल्लेख आहे.

महमद अलिखान, वलज याचे अर्काटचा नबाब म्हणून झालेले राज्यारोहण आणि त्याने चंद्रगिरीवर कसा हल्ला केला व ते आपल्या राज्यास कसे जोडले, यांचे तपशीलवार स्पष्टीकरण यात केलेले आहे.

नक्कलकाराचे नाव आणि या ऐतिहासिक दस्तऐवजाच्या लेखनाची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** चेंद्रगिरी कैफियत. बयाजवार स्थल कर्णामाकडुन पुर्विल रायेलानी राज्ये भार केल्या दिवसाचि हिसोब हुडकुन चेंद्रगिरीचा स्थळ कर्ण किष्ठणराज पिळे याच कडुन लिहिविल असे.

**शेवट :** सुवर्णमुखि नदि एक चेंद्रगिरि कैफियत संपुर्ण.

## डी. नंबर ६०

**चेंद्रगुत्ती तालुका कैफियत**

**CANDRAGUTI TĀLŪKA KAIFIYAT**

**कागद :** १०" x ७". १४ ओळी. मोडी. वाच्य. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ८०१ वर ही कैफियत सुरू होत असून तीत ४८ पाने आहेत. निळ्या रंगाच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर ती लिहिली असून पृष्ठे व्यवस्थित बांधलेली नाहीत.

प्रस्तुत निवेदन इतिहासाबद्दलची फार थोडी माहिती देते. ते प्रामुख्याने जमिनीचा कस आणि वर्गीकरण, बागायतीत घेतल्या जाणाऱ्या पिकांच्या जाती व पीक-पद्धती आणि शेतीपासून जमा केलेला कर यांबद्दलची माहिती देते.

नंतर हे निवेदन शेती पिकविण्यासाठी पाणी व खत केव्हा उपलब्ध होते याच्या अंदाजे तारखा देते.

दुसरा भाग जिराईत शेतीशी संबंधित आहे. तिसऱ्या भागात जमिनीतील खाणी आणि धातुमिश्रित दगड यांच्या उत्खननाची माहिती आहे.

लेखकाचे नाव, तारीख किंवा माहितीचे मूळ यांचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ :** श्रीराम प्रसन्न चंद्रगुत्ती तालुका कैफियतिच. चेंद्रगुत्ती तालुकेत जिरायत करणेचे व त्या तालुकेत पीक होणेच तपशील व यास देणेचे तीर्वा सिल सिला चालतते तपशील.

**शेवट :** यामुलकेत होणेंच पीक. धान सात जिनस होत आहे. १ रागी अलप स्वलप विशेष नाही. १ रामं तीळ अलप स्वलप

विशेष नाही. १ x x x x वांगी मिरसिंगा अलप स्वलप फणस अंबे तो विपरीत राणांत देखिल असने– वांगि मिरसांगा वाळुक इत्यादीक भाजी अलप स्वलप होत असतात.

## डी. नंबर ६१

**चोळ राजाची कैफियत**

**COLA RAJAECI KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. २०" x १०". २२ ओळी. जुने. पूर्ण.

डी. नंबर २० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत चोळ राजघराण्याचा इतिहास सांगते. जरी हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी यात मोठ्या प्रमाणात अशुद्ध शब्दलेखन आणि चुकीची विरामचिन्हयोजना केलेली आहे. पहिल्या काही पानांत शिवपुराणातील पौराणिक आख्यायिका वर्णिलेली आहे. चार युगे राज्य करणाऱ्या सूर्य आणि Human राजघराण्यातील राजांची नावे दिलेली आहेत. चोळ राजांची नावे, त्यांच्या राजेपणाचा कालखंड आणि त्यांनी भेट दिलेली देवळे यांचा उल्लेख आहे. साहित्यिक वा ऐतिहासिक दृष्ट्या नोंद करावी, असे विशेष महत्त्वाचे यात काहीही नाही. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांची नोंद नाही.

## डी. नंबर ६२

**जगन्नाथपूर व सिंन्हाद्रिपूर कैफियत**

**JAGANNĀTHAPUR VA SIMHĀDRIPUR KAIFIYAT**

**कागद** : ७" x ५ $\frac{१}{२}$". मोडी. जुने. वाच्य. खराब अवस्था. पूर्ण.

या भागात असणाऱ्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :

अनंतपूर तालुक्यात ज़िराईत कराची वीदहन– पृ. ३ ते ८

अनंतपूर तालुक्यात ज़िराईत कराची वीदहन– पृ. ९ ते १६

तडपल्ली पाळेगार कैफियत– पृ. १७ ते २४

तडपल्ली पाळेगार कैफियत– पृ. ३३ ते ४३

तडपल्ली पाळेगार कैफियत– पृ. ४४ ते ५७

नरसिंह स्वामी कैफियत– पृ. ५९ ते ९६.

ही कैफियत पृ. २६ वर सुरू होत असून तीत बारा पाने आहेत आणि ती हिंदुस्थानी हातकागदावर लिहिलेली आहे. पानकिड्यांमुळे यातील पृष्ठे काहीशी खराब झालेली आहेत.

तडपत्री तालुक्यातील शिमाद्रिपूर आणि जगन्नाथपूर या दोन गावांचे मूळ आणि इतिहास यांच्याशी प्रस्तुत निवेदनाचा विषय संबंधित आहे.

जेव्हा निजाम-उल-मुल्कने दक्षिण भारतावर चढाई केली, तेव्हा त्याने तडपत्री (एल्लनूर महानम्) येथे एक मुक्काम केला. आणि त्याला असे आढळून आले की तडपत्रीचा उत्तर भाग म्हणजे एक घनदाट जंगल आहे. रमणपंत आणि शीनाद्रिपंत या दोन ब्राह्मण हिंतचिंतकांनी निजामाला विनंती केली की, त्याने हे जंगलाचे प्रदेश त्यांना करमुक्त देणगी म्हणून द्यावेत. हे दोन्ही ब्राह्मण आणि त्यांचे स्नेहीसोबती यांनी प्रस्तुत जंगलाचे दोन निवासयोग्य अशा सुंदर गावांत रूपांतर करण्यासाठी खूपच परिश्रम घेतले.

रमणपंताने बांधलेल्या गावाला जगन्नाथपूर असे म्हटले गेले. (कारण जगन्नाथपंत हे रामनाथपंत यांच्या वडिलांचे नाव होते) आणि दुसऱ्या गावास शिमद्रिपूर म्हटले गेले. वर उल्लेखिलेल्या व्यक्तींना ही दोन्ही ठिकाणे करमुक्त स्वरूपात दिली असल्याची निजाम-उल-मुल्कने पर्शियन भाषेत एक सनद जारी केली, असेही दिसते.

गूटी मुरारराव याने ही दोन्ही ठिकाणे कशी जिंकली आणि ती पुन्हा गोविंदरावास कशी परत केली याचा वृत्तान्त प्रस्तुत कैफियत सांगते. फसली सन १२१० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकारी मेजर मॅन्रो याने विशिष्ट मुदतीसाठी ही दोन गावे देण्याचे नक्की केले, असे प्रस्तुत कैफियतीच्या शेवटच्या भागात सांगितले आहे.

गंगोयम एल्लनूर (तालुका तडपत्री) येथे १८ मे १८११ रोजी या दोन्ही गावांचे मूळ व इतिहास सांगणारे हे निवेदन शब्दांकित केले गेले, असे अखेरीस सांगितले आहे. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ** : कैफियत जगन्नाथपुर व सिंन्हाद्रीपुर. येथील पाहेली मोगल हैद्राबाद निजाम मुलमुलुक असरफज्या यांचे आयामांन दक्षिण प्रांत परगणे येलानुर तालुक ताडपत्रि यांतिल मौजा निवड वलगला हा गावास उत्तरेस पौणा कोसावरि आरण्य असत.

**शेवट** : बा तारीख छ ५ माहे जेनवरि सन १८११ ईसवि इंग्रेजी मुताबक प्रमोदुस्वंवछर पौता ८ शुक्रवार सन १२२० फसली मुकाम ज्ञागायलानुर तालुक ताडपत्रि येथे लिहील असे.

## डी. नंबर ६३

**जमाबंदि हुकुम टिपु कैफियत**
**JAMĀBANDI HUKOOM TIPU KAIFIYAT**

**कागद**: ६" x ४$\frac{१}{४}$". मोडी. १५ ओळी. दुर्वाच्य. पूर्ण.

हा भाग २७ पृष्ठांचा असून त्यातील हस्तलिखिते पर्शियन, तेलगू, कन्नड व मोडी लिप्यांमध्ये लिहिलेली आहेत. ही सर्वच पृष्ठे सुटी, एकत्र न बांधलेली आहेत. स्वतःचा स्वतंत्र शिक्का असलेले टिपू सुलतानाचे दोन हुकूमनामे यात दिसतात. यातील काही कैफियती देशी हातकागदावर आणि इतर इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेल्या आहेत.

पृ. १३६ वर मोडी लिपीत लिहिलेली पहिली मराठी कैफियत दिसते. उलट्या क्रमाने कागद रचलेले असून, कैफियतीचा शेवट पृ. ११ वर होता.

१५ सफर १२२१ फसली सन रोजी टिपू सुलतान याने कनकपै तालुक्याच्या तहसीलदारासाठी काढलेले हे एक आज्ञापत्र आहे. योग्य असे नोकर आणि शिपाई यांची नेमणूक, त्यांना दिला जाऊ शकेल असा पगार व इतर सुविधा, त्यांना द्यायच्या कामाचे स्वरूप आणि स्वामिद्रोह व भ्रष्टाकार यासाठी त्यांना होऊ शकणाऱ्या शिक्षेचे स्वरूप यांसंबंधी या आज्ञेद्वारे तहसीलदारास मार्गदर्शक सूत्रे पुरविली गेलेली आहेत. या आज्ञेवर चार किंवा पाच सरकारी अंमलदारांच्या सह्या आहेत. नक्कलकाराच्या नावाचा निर्देश केलेला नाही.

पृष्ठ क्रमांक २० ब वर इतर कैफियत सुरू होते. विशिष्ट प्रदेशात अस्तित्वात असणाऱ्या चलनी नाण्यांचे सापेक्ष मूल्य आणि काही वजनमापांची नावे यांची माहिती यात देण्यात आलेली आहे. नक्कलकाराचे नाव किंवा या कैफियतीतील माहितीचे मूळ यांची नोंद केलेली नाही.

**प्रारंभ** : तसबीक अमीलानि हल व ईस्तकबल तालुके कणकुपा जे बराबरि मेयादप हरिविला– तुमचे तालुकेंत ज्या अनमोग बदल सिवंदि वगैरेच तसबिक साहेबचे मोकुफ करून हलि मोकरोर करून जेलत लिहिलो आहे.

**शेवट** : x x आणि रयताकडोंन नागरण गरज नाही- आपले घरचे नोकरा कडून नागरावा जाणिजे- बा तारिश १५ माहे सफर x x x साल बाहेर प्रमादिच संवछर.

## डी. नंबर ६४

**जयसिंग राजांची चरित्र**
**JAISING RAJANCI CARITRA**

**कागद** : ९" x ५$\frac{१}{२}$". १३ ओळी. मोडी. जुने. वाच्य. पूर्ण. चांगली स्थिती.

डी. नंबर ५८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या कैफियतीत १० पाने असून इंग्लिश बनावटीच्या कागदावर ती चांगल्या तऱ्हेने लिहिलेली आहे. शेवटच्या पानावरील हस्ताक्षर इतर कैफियतीहून वेगळे दिसते. राजा जयसिंगाच्या विरोधात अर्काटचा नबाब सलुल्लाखान याने जिंजीला घातलेल्या वेढ्याची ऐतिहासिक घटना यात मांडलेली आहे.

दिल्लीच्या बादशहाने जयसिंगास जिंजीचा राजा कोणत्या परिस्थितीत केले त्यासंबंधीची माहिती पहिल्या दोन पृष्ठांत आलेली आहे. अर्काटच्या नबाबास द्यायची नजराण्याची रक्कम जयसिंगाने पुरी चुकती न केल्यामुळे नबाबाने अर्णी वेंकटराव याच्या नेतृत्वाखाली बाकी वसूल करण्यासाठी फौज रवाना केली. राजा आणि नबाब यांच्यात झालेली तहाची बोलणी या कैफियतीत स्पष्ट केलेली आहेत. जयसिंगाने दिलेल्या प्रत्युत्तरामुळे नबाब अतिशय संतापला आणि त्याने मुकुंदरावास लगेच जिंजीवर चढाई करून जयसिंगाला पकडण्याची आज्ञा केली. फौजेची चाल, मुक्कामाची ठिकाणे आणि सैन्याच्या मागोमाग जाणाऱ्या प्रमुखांची नावेही सांगितली आहेत. नबाब आणि राजा यांच्यातील युद्ध आणि राजाचा पराभव व मृत्यू मोठ्या समर्पकपणे वर्णिलेला आहे. लेखकाचे नाव किंवा या वर्ण्य प्रसंगाची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ** : चजिर्चे जयसिंग राजा दिल्ली पादषाहाचा मोठा प्रिती पात्र होता. तनमुळे पादषाहान जेयसिंग राजास घोडा व चेंजी म्हणावयाच गाव जाहीर दिले.

**शेवट** : x x x आगाध युध करिते वेळेस नवाबानी त्याचे सरदारास सांगितले जे या जैसींग भोंताली वेडा घाळुन मारून टाकिले म्हणतात. तैसेच सरदारानी वेडा घाळुन तिरानीर्स मारून ठकिले वरि नवाबचेनि ठाना घाळुन राज्यभार केला जाणिजे.

## डी. नंबर ६५

**जंजीरा कुर्मगड कैफियत**
**JANJIRA KURMAGAD KAIFIYAT**

**कागद** : १०" x ६". मोडी १६ ओळी. वाच्य. चांगली स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ४४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पाच परिच्छेदांत विभागलेल्या आणि इंग्लिश बनावटीच्या कागदावर नीटसपणे लिहिलेल्या या कैफियतीत कूर्मगड आणि जंजिरा या दोन किल्ल्यांबद्दलच्या हकीकती थोडक्यात सांगितलेल्या आहेत. पृ. २३ वर ती सुरू होते. तिच्यावर लिहिलेला ४८ हा क्रमांक आणि १८०६ या सनाची नोंद करणारे इंग्रजी शीर्षक यामुळे ही कैफियत एका मोठ्या खंडाचा सुटलेला (छोटासा) भाग असावा असे वाटते.

जंजिरा किल्ला हा सदाशिवगडाच्या पश्चिमेस वसला असून, तो शिवाजीराजाने बांधला असे पहिल्या परिच्छेदात सांगितले आहे.

दुसरा किल्ला कूर्मगड हा सदाशिव नाईक याने पिंगल संवत्सरात बांधला असे सांगितले आहे.

हैदरअलीने घातलेला वेढा आणि या किल्ल्यांजवळ झालेले युद्ध यासंबंधी दुसऱ्या परिच्छेदात सांगितले आहे.

ईस्ट इंडिया कंपनीचा कॅप्टन कार्पेतेन याने वर उल्लेखिलेल्या किल्ल्यांचा केलेला कब्जा आणि कंपनीने ते सुलतानास कसे परत केले याचा वृत्तान्त तिसऱ्या परिच्छेदात येतो.

अपूर्ण असलेल्या शेवटच्या परिच्छेदात मद्रासच्या पाडावासंबंधीची हकीकत आहे. त्यानंतर निवेदन थांबते. सगळ्या घटनांसाठी शालिवाहन शक दिलेले आहेत. लेखकाचे नाव आणि माहितीचे मूळ सांगितलेले नाही.

**प्रारंभ** : जजिरा कुर्मगडचे कैफियत. जंजिरा मजकुर सदाशिवगडचें पछमेस दर्यात x x x व किल्लेस पावणे कोसाचि तरावत जंजिर बांदविला.

**शेवट** : सिधारार्था संवछरी चैतर मास कुंपेनी तालुक सदारानि पटण सर करून तमाम मुलुकास ठाणा बसविली. जंजिरा मजकरास x x x मासी x x x याणि टाणा बसविले कलम.

## डी. नंबर ६६

**जाबिता सिरस्ते दफ्तर बादशा विजापुर**
**JĀBITĀ SIRESTE DĀFTAR BĀDSHA BIJĀPŪR**

**कागद** : ६" x ४$\frac{१}{२}$". मोडी. १७ ओळी. वाच्य. जुने. पूर्ण.

यात असणाऱ्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
शिवालय माहात्म्य– १ ते ४३.
वेरूळचे (Verul) घृष्णेश्वर माहात्म्य– ४४ ते १०७
रामराजा देवगिरी
नासिक व त्र्यंबक
पंचवटी कैफियत
रामराजा देवगिरी
सुभा– विजापूर बादशहा सरकार जबिता (Jabitā)
देवगिरी माहात्म्य
श्रीष्टीकम (Śrishte) कर्म राजे-भोसले सांत धर्म

सुभा विजापूर शहर व बादशहा कैफियत.

ही कैफियत पृ. १४४ वर सुरू होत असून ती इंग्लिश बनावटीच्या जाड कागदावर लिहिलेली आहे. तिच्यात १३ कागद आहेत. हा दस्तऐवज सहा भागांत विभागलेला असून प्रत्येकास स्वतंत्र शीर्षक आहे.

फसली सन ७८५ ते १०९६ या काळातील विजापूरच्या सुलतानशाहीच्या ऐतिहासिक वाटचालीचे वर्णन पहिल्या भागात केलेले आहे. आपला पुत्र कामबक्ष याला बादशहाने विजापूर राज्यातील दिलेल्या जिल्ह्यांची नावे यात उल्लेखिलेली आहेत. औरंगजेबाचा मृत्यू आणि त्यानंतर दिल्लीचे सिंहासन मिळविण्यासाठी त्याच्या तीन मुलांत झालेली लढाई याचे थोडक्यात निवेदन केलेले आहे. पण हे निवेदन तिथेच थांबते.

११७० (फसली) सनामध्ये गिल्जा रूमी व अली गौर महमद यांच्या संयुक्त फौजेच्या विरोधात दिल्लीच्या लढाईत विश्वासराव (पेशवा) पराभूत झाला आणि मारला गेला, असे तिसऱ्या व चौथ्या विभागांत स्पष्ट केलेले आहे.

(त्यानंतर) गिल्जा रूमी याला दिल्लीचा बादशहा म्हणून अभिषेक झाला आणि अली गौर महमद अरेबियास परतला, असे सांगितले आहे.

शेवटच्या दोन विभागांत उत्तरेतील व दक्षिणेतील अनेक स्थानांची मूळ नावे, तशीच दिल्लीच्या दरबारामधील योजिली जाणारी खास (शाही) उपनामेही सांगितलेली आहेत.

विजापूरचा रहिवासी आणि सिद्दाप्पाचा भाऊ असलेल्या

(कुणा) शामरावाच्या ताब्यात असलेल्या जुन्या कागदपत्रांवरून ही कैफियत नकलिली गेली असे शेवटच्या पृष्ठावर म्हटले आहे. कर्नल मॅकेंझीच्या हाताखाली कारकून म्हणून काम करणारा हेच नामाभिधान असलेला नक्कलकार आणि तेवीस सप्टेंबर १८०७ ही नकलेची तारीख अशी नोंद दिसते.

**प्रारंभ** : जाबिना सिरस्ते दत्फर पादशाह दरवाणि सुभे विजापुर इपि अरंभ सन ८९५ फसलि लगायेत समाप्त सन १०७६ पावेतो. साल २०० महिने. रोज. सुलतान सिकंदर पादशाह साल ९२ षहिने. रोज.

**शेवट** : सदरहु वादशाहा काल किर्दीचे बखर आहे हि बखर बिज्यापुरचे भानगो सिदापाचे भाऊ शेपा या कडुन नकल लिहीलते मुंत सहि इलाखे मेजर. कलनल मकिंजी सौ सुपरीटेनडयांठ फ दिं मैसूर सर्विस बातारिख २३ माहे अकटोबर सन १८०७ इसवी दर जागा विज्यापुरि.

## डी. नंबर ६७

### जैन देशांचि कैफियत
### JAĪN DESANCI KAIFIYAT

**कागद** : ७$\frac{१}{४}$" x ५$\frac{१}{२}$". मोडी. १५ ओळी. दुर्वाच्य. मुळात खराब अवस्था, पण नंतर दुरुस्ती केलेली. अपूर्ण.

डी. नंबर ५१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत पृ.७२ वर सुरू होते. कागद अतिशय खराब झालेले असून, जरी ती वाच्य दिसत असली तरी अतिलेखन आणि खाडाखोड यांनी ती भरलेली आहे. ज्याच्या नावाचा निर्देश केलेला नाही असा लेखक यात पहिला जैन राजा आणि त्याचे वारस यांचा उदय आणि इतिहास सांगू पाहतो. त्यांनी बांधलेली काही मंदिरे आणि गावे यांचा तो उल्लेख करतो. देवतांची नावे, मंदिरांची नावे किंवा ज्याने ती बांधली त्या राजाचे नाव दिलेले नाही.

कुणी एक बैर सवेदर (Bair Sa-Veder) आला आणि मध्य भारतातील जंगलात राहू लागला, असे ही कैफियत सांगते. त्याने जंगलाची सफाई करून तिथे एक किल्ला आणि आपली पालक-संरक्षक देवता पद्मावती हिचे मंदिर बांधले. त्याने आणखी १२ किल्ले जिंकून ते आपल्या राज्यास जोडले, असेही म्हटले आहे. या मंदिराशी संबंधित अशी माहिती सांगणारे काही कागदपत्र लेखकाने मिळवले असे दिसते. मूलर-शवंत्र आणि थळू अशी मूळ संस्थापकाच्या वारसांची नावे (दिलेली) आहेत.

**प्रारंभ** : बोनाडचे सिवया जैन गावचा x x x x x पुर्वि अडिचेसे वरुषाखाले जेयन ज्यातीचे भेडस वेढरुम्ह पार साभक उत्तर मध्ये देशातुन x x x x x राहणेस आला.

**शेवट** : चित्रभानु संवछर पावे तो चालत अले मग बहदुर मुलके जाहलेत. चित्रभानु संवछर पावेतो चालत अल.

## डी. नंबर ६८

### जैनमटाचि कैफियत
### JAIN MATHĀNCI KAIFIYAT

**कागद** : ७$\frac{१}{२}$" x ५$\frac{१}{२}$". मोडी. १३ ओळी. वाच्य. खराब, पण दुरुस्त केलेले. अपूर्ण.

डी.नं ४५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ.५९ वर सुरू होत असून देशी हातकागदावर लिहिलेली आहे. नक्कलकाराचे किंवा लेखकाचे नाव, त्याचप्रमाणे या कैफियतीतील माहितीचे मूळ देण्यात आलेले नाही. जरी मोडी लिपीत लिहिलेली ही शुद्ध मराठी कैफियत असली तरी तिच्यात मोठ्या संख्येने कानडी वाक्प्रचार व वाक्ये योजिलेली आहेत. ही चार भागांत विभागलेली आहे. पहिल्या दोन भागांत कर्नाटकातील जैन मठांची निर्मिती व इतिहास सांगितलेला असून उरलेल्या दोन भागांत जैन धर्ममताच्या काही पाठिराख्यांचा इतिहास दिलेला आहे. शिवाय काही जैन साधूंची नावे, त्यांची संक्षिप्त चरित्रे आणि त्याने जैन मठ बांधलेली ठिकाणे उल्लेखिलेली आहेत. असंबद्धपणे लेखन केलेले असल्यामुळे ही सर्वच कैफियत असंबद्ध अशी बनलेली आहे.

**प्रारंभ** : सोघेते जैन मटाचे कैफियत.

१ मठ सिनशिचे कैफियत.

१ विळगि राजेच वंशावळ कैफियत.

१ जिनदेव रायाचे x x x भैरा देविच उप्तते

१ गुरुबेंगरुचेवरु, मुलरु सांवतरु अजलरुच.

या सिवायें यांच x x x स्वलप x x x x लिहिले अहे.

**शेवट** : x x x हैदर अलि भैरा देवि दरासिना अलिया x x x भैरा देवि दरसन माडि ओडि मट कटिसिदरु.

## डी. नंबर ६९

**जोहनसिंग तहसीलदार अर्ज**
**JOHANSING TAHASILDAR ARJI**

**कागद :** १०" x ६". मोडी. १७ ओळी. जुने व खराब अवस्था. वाच्य. पूर्ण.

केवळ तेलगू हस्तलिखिते असलेल्या या भागातील एकच एक मराठी रचना म्हणजे प्रस्तुत कैफियत आहे. ही इंग्लिश बनावटीच्या कागदावर कसलेल्या हाताने लिहिलेली एक नीटस रचना आहे. त्यात एकाच पृष्ठावर लिहिलेली दोन हस्तलिखिते आहेत. पहिले म्हणजे चिदंबरमचा तहसीलदार असलेल्या जोहनसिंग याने विर्धचलम् येथे उप-जिल्हाधिकारी असलेल्या मिम यांना लिहिलेले एक विनंतिपत्र आहे. ८४७, राजमनर्गुडी येथील काही जमिनींच्या संदर्भातील तंटा आपण कसा निकालात काढला याविषयीचा अहवाल देऊन उप-जिल्हाधिकाऱ्याने त्यास मान्यता द्यावी, अशी त्या पत्रात तहसीलदाराने विनंती केलेली आहे. यावर तहसीलदाराची सही असून २७ जून १८४९ अशी तारीख नोंदलेली आहे.

दुसरे हस्तलिखित म्हणजे महमूद हुसेन याने विशाखापट्टणचा शिरस्तेदार असलेल्या तिरुमलराव यास लिहिलेले तारीख २२ जुलै १८४८ चे एक पत्र आहे. काही इनाम जमिनी कसण्यासंबंधी इनामदार आणि कसणारे शेतकरी यांच्यात असलेल्या तंट्याची चौकशी करून तो मिटविण्याचा प्रयत्न करण्याबद्दल हे पत्र आहे.

**प्रारंभ :** श्रीराम प्रसन्न. हजरत मेस्तर मिम साहेब सब कलेक्टर हुजुर जिल्हा विर्धाचिल यांच खिजमतीस.

**शेवट :** x x x सोंडिले आहे सदरहू मुचलिका एक करून दिदलीं ते या अत्ररजींत मलफुफ करुन x x x रवाना केल आहे. सदरहु बाबतीस जैसे हुकुम होईल किं तेणे बाभोजी बा अमल चालवित असें.

## डी. नंबर ७०

**टिपुसुलतान कैफियत**
**TIPUSULTĀN KAIFIYAT**

**कागद :** १० $\frac{१}{२}$" x ५ $\frac{१}{४}$ १८ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती- बाउंड केलेला भाग, पण विस्कळित स्वरूपात. पूर्ण.

यातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :

बेलूर कैफियत– पृ. १३ ते २२
श्रीरंगपट्टणम् कैफियत– पृ. २३ ते ४८
संस्थान केलंदी– पृ. ४९ ते ५२
नगरम् कैफियत– पृ. ५३ ते ६४
टिपू सुलतान ताकीद नकल– पृ. ६५ ते ७०
टिपू सुलतान रशीद (Receipt) नकल– पृ. ७१ ते ७३
हामपाटी कैफियत– पृ. ७५ ते ८४.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर नीटसपणे लिहिलेले हे हस्तलिखित पृ. ६३ वर सुरू होते. सर्व पृष्ठे सुट्या अवस्थेत आहेत.

आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना उद्देशून टिपू सुलतानाने काढलेल्या दोन आज्ञा यात आहेत. या आज्ञांची तारीख, लेखकाचे नाव किंवा या कैफियतीत लिहिलेल्या माहितीचे मूळ दिलेले नाही. टिपू हा मुस्लिम व बिगरमुस्लिम प्रजेबाबत कसा निःपक्षपाती होता आणि त्याने आपल्या राज्यातील भ्रष्टाचार कसा रोखला, याबद्दलची माहिती या दोन आज्ञांमुळे प्रकाशात येते.

मुस्लिमांनी मोहरमचा सण शांततेने साजरा करावा आणि अशांतता निर्माण करणारा कोणत्याही संप्रदायाचा असला तरी त्याला शिक्षा केली जाईल व त्याची जायदाद जप्त केली जाईल, अशा आज्ञा टिपूने जारी केलेल्या आहेत.

**प्रारंभ :** कैफियत टिपुसुलतान.

टिपुसुलतानाचि कैफियत प्रा ॥ देवनहलि वरि षाहजादे करितां आलें. त्यासमई चालिल वृतातं.

**शेवट :** तेव्हा येजनानानि गुलामलि खान व आलि राजाचि पंचायति करवणे म्हणुन मिर आसफ मिर महमद साबक व मिर पुर्णया व सुरूर गुलामलि कोसि आहमद खान या लोकास बसबुन घेऊन पंचायति करिता हुजुर आर्ज केलेते एकहिं मसलत रुजु पडल नाहि.

## डी. नंबर ७१

**टिपुसुलतान कैफियत**
**TIPUSULTAN KAIFIYAT**

**कागद :** १०" x ५ $\frac{१}{२}$". १८ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती (बांधलेला बाउंड भाग, पण खराब व विस्कळित). पूर्ण.

डी. नंबर ३२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. डी. नंबर ७० सारखीच ही कैफियत असून, तसाच प्रारंभ व शेवट आहे.

## डी. नंबर ७२

**टिपुसुलतानाची ताकीद नकल**

**TIPU SULTANACI TĀKEED NACAL**

**कागद** : १०" x ५$\frac{१}{४}$". मोडी. १६ ओळी. खराब अवस्था (सुटे). पूर्ण.

डी. नंबर ७० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ६५ वर ही कैफियत सुरू होत असून तिच्यात ७ पाने आहेत. जुनेपणामुळे कागद तपकिरी रंगाचा झालेला आहे. हस्ताक्षर चांगले असून फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश कागदावर कैफियतीचे लेखन झालेले आहे.

शेख दत्तर कृष्णराव या आपल्या शिरस्तेदाराकरवी कनक कुप्पीच्या तहसीलदारासाठी टिपू सुलतानाने काढलेल्या आज्ञेची -फर्मानाची- ही नक्कल आहे. या निवेदनात मोठ्या संख्येने अरबी-फारसी शब्द व वाक्प्रचार आढळून येतात. कमी पगारावर काम करणाऱ्या आपल्या हाताखालच्या नोकरदाराबद्दल टिपूला किती कळवळा व काळजी होती आणि आपल्या अधिकाऱ्यांतील भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी त्याने काय उपाययोजना केली, याचे दर्शन हे फर्मान घडविते. राज्यात काम करणाऱ्या नोकरांची नावे व हुद्दे प्रस्तुत कैफियतीत मोठ्या प्रमाणात नोंदलेले आहेत.

कैफियतीच्या अखेरच्या भागात तीन महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या फर्मानाची तारीख प्रमदिक वर्ष २५ जमदैसनी फसली १२२१ अशी दिलेली आहे. मुळातील कोणत्या माहितीवरून ही नक्कल उतरविली गेली याविषयी प्रस्तुत कैफियत काहीही सांगत नाही.

**प्रारंभ** : तसदीक बा ईसमे आमीलान हाल व ईस्तकबाल तालुके कनककुपी जेबा तडरिर मया बाद हरिविल्ला. तुमचे तालूकें शानभोग महाल सिबंदी वगैरेचे तसदिक साबकच मैकुफ करून हलि मौर करुन जैलेत लिहिले आहे तरी त्याप्रमाणे आमल रास्ती दुरुस्त कहुन करणेचे छें गुर्रे x x x X साल साहेर प्रमाथीच संवछर पासुन तलाब देणेच तपशील.

**शेवट** : बा तारिख छ १७ माहे रहिसानि साल साहेर प्रमादि च संवछर १२२१ शाहिर बा दफ्तर कृष्णराव हजुर आसफ कचेरि वाकल षुद.

## डी. नंबर ७३

**टिपुसुलतानाची रसीद नकल**

**TIPU SULTANACI RAZEED NACAL**

**कागद** : १०" x ५$\frac{१}{४}$". १७ ओळी. मोडी. जुने व खराब अवस्था. चांगले (सुट्या स्थितीत). पूर्ण.

डी. नंबर ७० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. ही कैफियत पृ. ८१ वर सुरू होत असून तीत ३ पाने आहेत. हस्ताक्षर सुवाच्य असून फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लेखन केलेले आहे. जुनेपणामुळे कागद जीर्ण होऊन फाटायला आलेले आहेत.

कणकुप्पी तालुक्याचा महसूल अधिकारी शेख इस्माइल याने जमा केलेल्या आणि (सरकारात) भरलेल्या रकमेची पोचपावती देण्यासाठी टिपू सुलतानाने दिलेल्या रशिदीची ही नक्कल आहे. अनेक खेड्यांतून जमा केलेल्या एकूण रकमेची यात माहिती असून, ही रक्कम शेतसारा व नजराणा अशा दोन गटांत विभागलेली आहे. त्या काळी चलनात असणाऱ्या नाण्यांत ही रक्कम दिलेली आहे. टिपू सुलतानाच्या नाण्याचे दर्शनी मूल्य आणि त्याच्याशी सममूल्य अशा स्वरूपात इतर ठिकाणांहून जमा केलेली सोन्याचांदीची नाणी अगदी काटेकोरपणे व व्यवस्थित सांगितलेली आहेत. टिपूच्या आज्ञेवरून ही रशीद दिलेली असून ती तिरुमल राव याने ५ मोहरम १२२१ फसली सन- हिंदू कालगणनेप्रमाणे ५ वैशाख प्रमदिक वर्ष रोजी लिहिली, असे कैफियतीच्या शेवटी सांगितले आहे.

**प्रारंभ** : नकल रशीद टिपुसुलतान याची रसीद आ. की. काणकुपीहुन जमा युरसील आमील सेक इस्माईल हमारा. हतलवारची कासीदा वगैरे बमोजिब इसाल मौ. राहाती एने मुलुक बाबते- नजर बाबतें.

**शेवट** : मोबलग च्यार हजार बेताळिस रमहती दोनि, फलम आडिच ताहे दाखल स्वजानाहून हुजुर षुद मरकुम तारिख ६ चै. माहे मोहरम- वैशाक मास सन १२२९ लगाये साल साहेर प्रमादिच संवछर दाखल दफ्तर तिरुमल राव षुद दाखल दफ्तर भगवंत राव.

### डी. नंबर ७४

**तंबाकु कैफियत**
**TAMBĀKOO KAIFIYAT**

**कागद** : १० $\frac{१}{२}$" x ५ $\frac{१}{४}$" १६ ओळी. मोडी. वाच्य. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. ३० वर सुरू होत असून तीत फक्त एक पान आहे आणि ती इंग्लिश कागदावर वाच्य स्वरूपात लिहिलेली आहे.

ग्रामीण प्रजेबाबत टिपू सुलतान कसा कनवाळू होता, हे प्रस्तुत कैफियत स्पष्ट करते. तंबाकू आणि गांजा यांची लागवड करण्यासाठी माफक भाडेपट्टीने खेड्यातल्या लोकांना काही जमीन देण्यासाठी टिपू सुलतानाने आपल्या शिरस्तेदारास (वायनाड– Wynad– असे तालुक्याचे नाव) फर्मावले. पण नंतर पावसाळ्यातील अनपेक्षित बदलांमुळे तंबाकूचे पीक फसले आणि ठरलेली रक्कम देणे गरीब शेतकऱ्यांना अशक्य झाले. यासाठी गावकऱ्यांनी सरकारात जेव्हा माफीसाठी दयेचा अर्ज केला तेव्हा टिपूने त्यांना माफी देण्याविषयी आपल्या शिरस्तेदारास कळविले. लेखकाचे नाव किंवा या कैफियतीतील माहितीचे मूळ यांचा उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ** : तंबाकु चे कैफियत कोडिकारी म्हणरास टिपुसुलतान बादषाहनि ईजारा मोकरोर करुन केलवे एक लाख रुपये...

**शेवट** : ...एणे प्रमाणेच करणें म्हणुन तालुक ताळुकेला परवाना व कचेरीस ताकीद सुधा करुन पाटविले कसबा पठणास मात्र ८० ऐसी हजार रुपये मोखुफ केलि मुतस वेंकटनारणे पत्र मार्फतन मोक रोर करून टेविले.

### डी. नंबर ७५

**तंबाकु कैफियत**
**THAMBĀKOO KAIFIYAT**

**कागद** : १८" x १२". १९ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

कैफियत नंबर २ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या मोठ्या दुरुस्त करून बांधलेल्या भागातील पृ. २४२ वर ही कैफियत सुरू होत असून ती देशी हातकागदावर लिहिलेली आहे. ती सलग लेखन केलेल्या दोन पानांची आहे. या भागातील सर्व पृष्ठे नीट दुरुस्त करून एका मोठ्या भागात घातलेली आहेत.

याआधीच्या कैफियतीचीच ही कैफियत एक मुळाबरहुकूम नक्कल आहे असे दिसते. आधीच्या कैफियतीतील मजकुराचे काही हुकलेले दुवे येथे भरून काढलेले दिसतात. कैफियत क्रमांक ७४ प्रमाणेच हिचा प्रारंभ व शेवट सारखाच आहे.

### डी. नंबर ७६

**ताडपत्री पाळिगार कैफियत**
**TĀDPATRĪ PĀLĀIGAR KAIFIYAT**

**कागद** : ७" x ५ $\frac{१}{४}$". १२ ओळी. मोडी. जुने. खराब अवस्था. पूर्ण.

डी. नंबर ६१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ताडपत्री तालुका आणि तेथील राज्यकर्ते यांचे मूळ व इतिहास सांगणारी ही कैफियत पृ. ४४ वर सुरू होत असून तीत २८ पाने आहेत. हस्ताक्षर सुवाच्य असून ती देशी हातकागदावर लिहिलेली आहे.

ताडपत्री हा तालुका अनंतपूर जिल्ह्यात आहे. तो ताडमरी म्हणूनही लिहिला जातो. त्या ठिकाणाला ताडमारी का म्हटले जाते, हे लेखकाने स्पष्ट केलेले आहे.

ताडपत्री आणि तेथील नायडू राजे यांचे मूळ व इतिहास सांगून पुरा करताना ताडपत्री येथे राहणाऱ्या दोन वृद्ध सद्गृस्थांकडून मिळालेल्या कागदपत्रांवरून प्रस्तुत कैफियत नकलेली गेली, असा उल्लेख आहे. कर्नल मॅकेंझी याच्या हाताखाली काम करणाऱ्या आनंदराव या अधिकाऱ्याने सदरहू नक्कल १० फेब्रुवारी १८११ रोजी ताडपत्री येथे मुक्काम असताना केली.

**प्रारंभ** : ताडमारि पाळेगाराचि कैफियत. पुर्वि विदपानगरारत ईश्यानये भागी सात नदयांसंगम जाहाल्या नदियांतीरी समिप मुदनुर गांव असतां–

**शेवट** : कैफियत लिहिलि आहे लिहिलिती आनंदराव मुतालीक ईलाखे कर्नल मर्केजी साहेब मरहुम छ १० माहे फेबरुवरी सन १८११ ईसवी ईमजी मुताबक सन १२२० फसली मुकाम x x x x ताळमारी उर्फ ताडुपत्री येथें लिहीली आसे.

## डी. नंबर ७७

**तारुकाबाद**
**TĀRUKĀBĀD**

**कागद :** ७" x ५$\frac{१}{२}$". १८ ओळी. वाच्य. खराब अवस्था. पूर्ण.

पृ.५ वर ही रचना सुरू होते. अतिशय कमी महत्त्व असलेली ही एक अपूर्ण कैफियत असून, तीत या शहरासभोवताली असलेल्या काही ठिकाणांचे (शहरापासूनचे) अंतर दिलेले आहे. तिथे पोहोचण्याचा जवळचा मार्गही दिलेला आहे. पुढे तिथे राहणाऱ्या काही महत्त्वाच्या व्यक्तींची नावेही दिलेली आहेत.

माहितीचे मूळ किंवा लेखकाचे नाव यांचा उल्लेख केलेला नाही. हा वृत्तान्त ३१ जानेवारी १८०६ रोजी नोंदला गेला, असे कैफियतीच्या अखेरीस सांगितले आहे.

**प्रारंभ :** अहमदनगराहुन शहर अवरंगाबादास डाक म्हणीजे कुंपणी सरकारचा आचल असणेच जागा बानाना तपशीलवार.

**शेवट :** x x x शहरास पश्चमेस x x x जैसिंगपुर गोमाजि नाईकाची हावेलीत आहे जाणीजे मुहरम छ ३१ माहे जनवरी सन १८०६.

## डी. नंबर ७८

**तिरुक्कणाबी कैफियत**
**TIRUKKANĀBI KAIFIYAT**

**कागद :** ९" x ५". २५ ओळी. मोडी. जुने व खराब अवस्थेत. अपूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

तिरुकनमलाई या खेड्याची उत्पत्ती व इतिहास सांगणारी ही कैफियत पृ. १० वर सुरू होते. फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर ती लिहिलेली आहे. हस्ताक्षर वाच्य असले तरी मोठ्या प्रमाणात अतिलेखन झालेले दिसते. दरिद्री अवस्थेतील कुणी चिन चेट्टी आणि त्यांची तीन मुले स्थलांतरित होऊन या एकाकी ठिकाणी आली, त्यांनी काही झोपड्या बांधल्या आणि ते तिथे राहू लागले. एक दिवस त्याचा एक मुलगा काम मिळविण्यासाठी म्हैसूरला गेला. तिथे त्याला एक श्रीमंत व्यापारी भेटला आणि त्याच्या मदतीने एक घाऊक विक्रीचे दुकान काढून तो श्रीमंत बनला. पुढे घनदाट जंगलाने भरलेले हे सर्व खेडे त्याने विकत घेऊन तिथे घरे व मंदिरे बांधली. या खेड्यावर टिपू सुलतानाने हल्ला करून त्याचा विध्वंस केला आणि प्रखर अशा दुष्काळामुळे या भागाची व तेथील लोकांची दशा दशा केली, अशी माहिती यात आहे.

इथेच ही कैफियत थांबते. लेखकाचे नाव आणि माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** यादास्त चित्रासटि म्हणार फिंगायत. पासारींचा दुकानदार यांचे दोन आजे x x x दोन आजे x x x म्हणार अनेगोंदीत होता.

**शेवट :** x x x राजे चे दिवसांत यापासुन हैदरलिखानाचे दिवसांतही न्याय अन्याय म्हणजे x x x निट दर्यप्त करित व्होते. हलिसुलतानाचे दिवसांत अर्छन्याय चालुन लागला.

## डी. नंबर ७९

**तिरुनागेश्वर कैफियत**
**TIRUNĀGĒŚVAR KAIFIYAT**

**कागद :** १३" x ८$\frac{१}{४}$". १६ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती.

ही कैफियत पृ. ९७ वर सुरू होत असून ती देशी बनावटीच्या हातकागदावर लिहिलेली आहे. तंजावर जिल्ह्यातील कुंभकोणम तालुक्यातील तिरुनागेश्वरम् आणि इतर दोन मंदिरांचे मूळ व इतिहास या कैफियतीत सांगितली आहेत.

श्री नागेश्वर स्वामींच्या मंदिरातील शिलालेखाशी निगडित असलेल्या आख्यायिका पहिल्या दोन पृष्ठांत सांगितल्या आहेत. कश्यप मुनींच्या सूचनेवरून एका साधूने हे मंदिर शिवास (शंकरास) समर्पित केले आणि त्यामुळे तो शापमुक्त झाला. कैफियतीच्या दुसऱ्या भागात तिरुनागेश्वरम् मंदिरातील रहिवाशांचे मूळ व इतिहास सांगितला आहे. ते कांचीहून आले असून त्यांना कैकलर (Kai Kalar) म्हणून ओळखले जायचे, असे म्हटले जाते. उदय आणि प्रगती याबद्दलचे त्यांच्यासंबंधीचे इतर तपशील मोठ्या खुलासेवार रीत्या चर्चिले आहेत. त्यांच्या चालीरीती आणि ते नागेश्वरस्वामींच्या मंदिराचे विश्वस्त कसे झाले, हेही मोठ्या विस्ताराने खुलासेवार सांगितले आहे.

लेखकाचे नाव आणि या कैफियतीतील माहितीचे मूळ उल्लेखिलेले नाही. २ एप्रिल १८१८ रोजी ही कैफियत नकलली गेली असे म्हटले आहे.

**प्रारंभ :** कैफियत तीरुनागेश्वर तालुके कुंभकोण सुभे तंजावुर सन १८९८ इसवी तारिख ६२ माहे एप्रल ६ पुर्वी ह्या स्थळी

चंपक व्रिक्ष्ये आनेक बाहडून अघोर आरण्ये होउन असताना काणंवर वगैरे आनेक वरुष तप करीत होते.

**शेवट** : x x कलियुगामध्ये तिरुनागेश्वर म्हणावयाचे स्थली अस्ताहेत. तुम्ही आलियान प्रत्यक्षे होताहे म्हणून सांगितले करितां सदरी रुषेश्वरानी मदाचे माशे होऊन ह्या स्थली तप करीत आहेत.

## डी. नंबर ८०

**तिरुनागेश्वर कैफियत**
**TIRUNĀGEŚWAR KAIFIYAT**

**कागद** : १३" x ८$\frac{१}{४}$". १६ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

यातील इतर रचना डी. नंबर १६ मध्ये सांगितल्याप्रमाणे.

याआधीच्या कैफियतीप्रमाणेच ही असून यात थोडी जास्त माहिती दिलेली आहे. श्री नागेश्वर व वेंकटराम यांना समर्पित केलेल्या दोन मंदिरांचा इतिहास, आणि कैकलर कुटुंबाचा इतिहास, त्यांच्या रीतीभाती, मूळ (initials) हे सर्व डी. नंबर ७९ मध्ये सांगितल्याप्रमाणेच आहे. नृत्यांगनांच्या जमातीचे मूळ, त्यांचे काही वेळा मंदिरांचे विश्वस्त म्हणून काम पाहणे आणि मंदिरातील मधाचे पोळे आणि त्याचे महत्त्व अशा दोन जादा हकीकती यात आहेत.

प्रारंभ व शेवट डी. नंबर ७९ प्रमाणेच आहेत.

## डी. नंबर ८१

**तिरुपतीचे उत्सव**
**TIRUPATICI ŪTSAVA**

**कागद** : ६" x ५$\frac{१}{४}$". १७ ओळी. मोडी. वाच्य. चांगली स्थिती. अपूर्ण.

यात असणाऱ्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
सूर्यनारायण स्वामी आणि इतर देव यांबद्दलचे तपशील
तिरुपतीचे राजे
वेंकटरमणस्वामी देकर (Dekar) राज
तिरुपती देवस्थान नित्य कर्म
तिरुपती मुरोळीची (Murolici) तपशील (Tapsail)
तिरुपती तालुका उत्सव
तिरुपती तालुका उत्सव
वेंकटेशचरित्र
तिरुमलाई पर्वत कैफियत
तिरुमलाई पर्वत जनांची कैफियत (Janichi)
तिरुमलाई निवेशन आणि मंडप (Mantapam) तपशील.
तिरुमलाई पर्वत आणि बाग तपशील
वेंकटेश वृत्तान्त
हिंदू कालगणना दर्शविणारे पंचांग
वेंकटेश वृत्तान्त
वेंकटेश्वरस्वामी कैफियत

खराब अवस्थेत असलेली आणि देशी बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत पहिल्या पृष्ठावर सुरू होते. सर्व पृष्ठे दुरुस्त केलेली आहेत. तिरुपती येथील नाचार देवीच्या शुक्रवारी करायच्या उपासनेच्या काही स्वरूपांची माहिती यात मिळते. प्रधान आणि दुय्यम देवतांच्या साजऱ्या केल्या जाणाऱ्या उत्सवांचे हे वर्णन असावे, असे जरी शीर्षकावरून वाटले तरी ही अपूर्ण कैफियत फक्त चूडी कूडत नाचार देवीच्या उत्सवाचा उल्लेख करते. आठ दिवस साजऱ्या केल्या जाणाऱ्या या उत्सवाच्या कार्यक्रमाचा संपूर्ण तपशील इथे वर्णिला आहे. एका मोठ्या बांधीव भागातील प्रस्तुत लेखन म्हणजे सुटलेले पृष्ठ असावे असे वाटते. लेखकाचे नाव, यातील माहितीचे मूळ इत्यादींचा उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ** : यादास्त शुक्रवार वेचं पुर्ता आहे.

तिरुपती सुडी गुडत नाचार देविस चालणेच छछभे आडि महिनांत दाहा दिवसी नित्य विद मिरुवकरण

**शेवट** : आट दिवस ७ पुलाचा रथ व चेपर करणें णौव दिवस कपिल तीर्थास जाऊन तीर्थवारी करून येण

## डी. नंबर ८२

**तिरुपतीचे राजे**
**TIRUPATICE RĀJE**

**कागद** : ६" x ५$\frac{१}{४}$" मोडी. दुर्वाच्य. चांगली स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ८१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. ४ वर सुरू होत असून देशी हातकागदावर लिहिलेली आहे. तिरुपती येथे चार युगे राज्य केलेल्या राजांच्या नावांशी ती संबंधित आहे. कैफियतीचे शीर्षक तेलगू आणि इंग्रजीमध्ये भाषांतरित केलेले आहे. ज्यांनी तिरुपतीस राज्य केले आणि त्यांच्या काळात तिरुपतीच्या देवाच्या व्यवस्थेसाठी दैनंदिन

तरतूद केली अशा आधीच्या राजांचा एक वृत्तान्त यात लिहिला आहे. मलपरमल्ल पिल्लाई याच्याकडे असलेल्या जुन्या दस्तऐवजावरून ही कैफियत नारायणरावाने नकलून काढली आहे. पहिल्या तीन युगांत राज्य केलेल्या सौर व चांद्र कुळांतील सम्राटांची नावे दिलेली आहेत. प्रत्येक युगात त्यांनी राज्य केलेल्या वर्षांची संख्या दिलेली आहे. कृतविधराज या पहिल्या युगातील राजापासून त्याचा प्रारंभ होतो आणि त्रिभुवन चक्रवर्ती या नावावर शेवट होतो.

**प्रारंभ :** तिरुपतींत राज्येभार केलते राजेचे तपशील x x x धीपाराधना चाल वणेस x x x स्तल कर्णमा कडुन नकल लिहीलते नारायणराव.

**शेवट :** कंचि पट्टण कामाक्षि पिट तीर्थ केदार मल्लिकार्जुन पुरष प्रमाण साडे तीनि हाजार अईसे संवस्छर शेभरी राज्येभार केल राज x x x x एकुन राजे ७.

## डी. नंबर ८३

**तिरुमले देवस्थान व उत्छव**
**TIRUMALAI DEVASTĀN VA ŪTSAVA**

**कागद :** ६" x ५$\frac{१}{२}$". १९ ओळी. मोडी. वाच्य. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ८१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

मोठे ऐतिहासिक महत्त्व असलेली ही कैफियत पृ.७ वर सुरू होत असून देशी हातकागदावर ती लिहिलेली आहे. यात १० पृष्ठे आहेत.

तिरुमलाई - तिरुपती येथील देवांचे इतिहास आणि त्यांच्या दैनंदिन व नैमित्तिक आराधना व देणग्या यांसाठी अनेक घराण्यांनी व त्यांतील राजांनी केलेल्या तरतुदी यांच्याशी प्रस्तुत कैफियत संबंधित आहे. पुढे ही कैफियत घराण्यांची व तीमधील राजांची नावे आणि त्यांचा राज्यकारभाराचा कालखंड स्पष्ट करते. पृ.८ वर नाईक घराण्याचा संस्थापक अशा विजयनगरच्या बुक्क राजापासून रायलू राजांची नामावळी शेवटचा राजा श्रीरंग रायलू याच्यापर्यंत दिलेली आहे. त्यांच्या राज्यारोहणाच्या तारखा आणि त्यांच्या राज्यकारभाराचा काल दिलेला आहे.

मोगल व मराठा राजांची नावे आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या उदयापर्यंतचा त्यांचा काळ दिलेला आहे. सुलतान अबदुल्ला कुतुबशहा, नबाब सादुल्लाखान (अर्काटचा सुभेदार) आणि अन्वरदीन खान यांनी त्यांच्या कारकीर्दीत देवतांना दिलेल्या वस्तूंची संख्या आणि किंमत (rates) नोंदलेली आहे. वस्तूंची खरेदी आणि पूजाअर्चेच्या कामावरील देखरेख यांसाठी नेमलेल्या काही व्यवस्थापकांची नावेसुद्धा दिली आहेत. पूजा वगैरेसाठी वस्तूंचा पुरवठा करण्याबाबत ईस्ट इंडिया कंपनीने कायम स्वरूपाची व्यवस्था केली, असे कैफियतीच्या अखेरीस सांगितलेले आढळते.

लेखकाचे नाव आणि या कैफियतीतील माहितीचे मूळ उल्लेखिलेले नाही. शालिवाहन शकानुसार तारखा आहेत.

**प्रारंभ :** कलियुग प्रमाण संवछर ४३२००० सी उबजल ते प्रमाधींच संवछर शालिवाहन शकाब्द १९२५ रुधरोदगारी संवछर पावेतो xxx संवछर ४७०५ या संवछरांत श्री वेंकटरमणस्वामीयास पडितरं धिपाराधना पुलीकापुशेवा वगैरे चालविलते देशाधी राज्यांचे तपशील.

**शेवट :** रोजे एकास पडितरं २८ धीपाराधनास अखंडीत तुप कच्यासी १९ ॥ भोंताले धीपाराधनास तेल सेर x x x.

## डी. नंबर ८४

**तिरुमले देवस्थान व उत्छव**
**TIRUMALAI DEVASTĀN VA ŪTSAVA**

**कागद :** ६" x ५$\frac{१}{४}$". मोडी. १२ ओळी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

देशी हातकागदावर २७ व्या पृष्ठावर ही कैफियत लिहिलेली आहे. तिरुपती येथे वसलेल्या श्री व्यंकटेशाच्या मंदिरात वार्षिक व मासिक कालात उत्सवाचे साजरे केले जाणारे दिवस किती हे त्यात स्पष्ट केलेले आहे. ही कैफियत उत्सवांची एक यादीच देते. तसेच (देवाच्या) वाहनांची नावे (उदा. घोडा, हत्ती इ.) आणि मंदिरात पाळले जाणारे रथोत्सव (car festivals) यांची माहिती देते. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही. कैफियतीची तारीखही दिलेली नाही.

**प्रारंभ :** याददस्त xx देवस्थान तिरुमले तालुके तिरुपती वरी विशेष उत्छव कसा चालवणे म्हणावयाचे.

(याचा शेवट मूळ मुद्रित प्रतीत नाही. – संपादक)

**डी. नंबर ८५** 'तिरुमलाई देवस्थान नित्यकर्म व पूजा' आणि **डी. नंबर ८६** 'तिरुमलाई देवस्थान मूर्तीचा तपशील' या दोन्ही हस्तलिखितांचा मजकूर मूळ मुद्रित प्रतीत दिलेला नाही. – संपादक.

**प्रारंभ :** तिरुमले श्री वेंकठाचलपतिस्थलात आहे ते मुर्तिस तपशील.

**शेवट :** हेच मुर्तिही भगवंत x x x आहे x x x श्रीनिवास म्हणताहेत.

## डी. नंबर ८७

**तिरुमले पर्वत व बाग वगैरे**
**TIRUMALAI PARVATĀ VA BĀG VAGĀIRE**

**कागद :** ६" x ५$\frac{१}{४}$". मोडी. वाच्य. पुसट. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ८१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

देशी हातकागदावर ही लिहिलेली असून, तीत तीन पाने आहेत आणि ती पृष्ठ क्र. ३४ वर सुरू होते. जुनाटपणामुळे या कैफियतीची शाई पुसट झालेली आहे. तिरुमलाई-तिरुपती येथील प्रमुख देव श्रीनिवास यास देणगीदाखल दिलेल्या बागांची आणि त्यांच्या देणगीदारांची नावे प्रस्तुत कैफियतीत दिसून येतात. काही बागांची चतुःसीमांसह व त्यांतील बांधकामांसह वर्णने केलेली आहेत. तिरुमलाई-तिरुपती देवस्थानात टिपून ठेवलेल्या वृत्तान्तावरून सदरहू कैफियत नकललेली असून, मूळ वृत्तान्तावर कार्तिक २, खर नाम संवत्सर शके १७७४ अशी तारीख नोंदलेली आहे.

**प्रारंभ :** यादी– ईशोवा प्रमाण शालीवाहान शेकान्त १७७४ खर नाम संवछर कार्तीक छ २ तेदी तिरुमलेवरी पटण आवरण भोंतालें धार्म चालवणेस x x x चे बागच हिशाब.

**शेवट :** यास उतरेस पारवेट मंटप गुहयाखाले रंगपा बाग. पारवटेसे पछमेस ताळे पाक रायपा बांधिविलतें.

## डी. नंबर ८८

**तिरुमले देवस्थान निवेशन मंटप तपशील**
**TIRUMALAI DĒVAŚTĀN MANTAP TAPSIL**

**कागद :** ६" x ५$\frac{१}{४}$". १५ ओळी. मोडी. वाच्य. खराब अवस्था. दुरुस्त केलेले. अपूर्ण.

डी. नंबर ८१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ.७० वर सुरू होत असून तिच्यात ८ पाने आहेत, आणि ती देशी बनावटीच्या हातकागदावर लिहिलेली आहे.

तिरुमलाई-तिरुपती देवस्थानामधील महंत मठातील, तसेच जी. अय्यंगार मठ आणि खाजगी व्यक्तींच्या मालकीचे विविध मंडप किंवा अनेकखांबी इमारती यांचे वर्णन यात आलेले आहे. यांपैकी काही मंडप काही व्यक्तींनी खाजगी रीत्या बांधून देवस्थानास वापरण्यासाठी दिले, असे नमूद केलेले आहे.

उत्सवाच्या वेळी जेव्हा देव मिरवणुकीसाठी बाहेर काढले जातात तेव्हा वापरली जाणारी वेगवेगळी वाहने आणि इतर वस्तू ठेवण्यासाठी या मंडपांचा उपयोग केला जात असे, असे म्हटले आहे. देणगीदारांची नावे, चतुःसीमा आणि मंडप बांधण्यामागील प्रयोजन स्पष्ट केलेले आहे.

खराब-पडीक जमीन आणि बागेसाठी योग्य अशी जमीन यांबद्दलची माहितीही ही कैफियत देते. या जमिनींच्या सीमाही सांगितल्या आहेत. पण लेखकाचे नाव, कैफियतीतील माहितीचे मूळ आणि ती लिहिल्याची तारीख सांगितलेली नाही. हे सारे निवेदन मोठ्या प्रमाणातील अशुद्ध लेखनाने भरलेले आहे.

**प्रारंभ :** श्रीयेंकटेशप्रसन– तिरुमलेवरी असणेचे निवेशन तपशील तिरुगलेवरी च्यारि बिदी सन्त्रदी देखील स्थानिकाचे निवेशन मंटप १ देवळाचे महाद्वारास पुढे तिर बिदीस पुर्व.

**शेवट :** पोलिवट मंटप १ यास उत्तर स्थळ ताळपाक वालेचे निवेशेन १ यास उतरेसी बिदीस वाटेस पछेम बिछी वाटेस पुर्व पश्चम बिदी २ यास उतर हनुमंतराय मंटप x x x x x पोलीवट २.

## डी. नंबर ८९

**तिरुमले पर्वतास जाणेची वाट**
**TIRUMALAI PARVATĀCI JĀNĀCI VĀT**

**कागद :** ६" x ५$\frac{१}{४}$". १५ ओळी. मोडी. वाच्य. खराब स्थिती. पूर्ण.

यातील इतर रचना डी. नंबर ८१ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत.

पृ. ६६ वर सुरू होणारी आणि ८ पाने असलेली ही कैफियत देशी बनावटीच्या हातकागदावर लिहिलेली आहे.

पवित्र अशा तिरुपतीला पोहोचू शकू अशा चार रस्त्यांचे निर्देशन प्रस्तुत कैफियत करते.

शेट्टी गुंटा व मामंडूर येथून येणारे रस्ते हे उत्तरेचे मार्ग म्हटले जातात. त्यांच्यावर यात्रेकरूंना थांबण्यासाठी व ताजेतवाने होण्यासाठी बांधलेले मंडप व तळी आहेत. एक भुयारी मार्गही तिथे असल्याचे सांगितले जाते आणि तो काही देव व ऋषी यांच्याकडून वापरला जातो, असेही सांगितले जाते. त्यानंतर पूर्वेकडून व पश्चिमेकडून तिरुमलाईला येणाऱ्या रस्त्यांचे वर्णन या निवेदनात येते.

त्यानंतर लेखक त्या रस्त्यांची एकूण स्थिती आणि बैलगाडी वा घोडागाडी यांतून प्रवास करण्याबाबतची अवस्था स्पष्ट करतो. ही कैफियत रस्ता-जुळणीच्या जागा आणि डोंगरावरचे काही चढ वा उंचावरचे टप्पे यांबद्दलची माहिती सांगते.

तिरुपती या डोंगराचे मूळ आणि त्याच्याशी संबंधित आख्यायिका यांचे संक्षिप्त स्पष्टीकरण यात केलेले आहे. या डोंगरावर उपलब्ध असलेल्या वनस्पतींची आणि वृक्षांची नावे इथे उल्लेखिलेली आहेत. तपस्व्यांनी निवासस्थाने म्हणून वापरलेल्या गुहा आणि त्या ज्यात आहेत ते डोंगर यांचे थोडक्यात केलेले वर्णन यात दिसते. तिथल्या अरण्याचे स्वरूप, तिथली व डोंगरावरची जंगली हिंस्र जनावरे व सरपटणारे (सर्पादी) प्राणी यांचे विस्तृत विवेचन यात आलेले आहे. या डोंगरावरील गुहांचे संशोधक वा गिर्यारोहक किंवा येथील देवतांच्या वास्तव्याबद्दल पृच्छा करणारे जे कुणी असतील ते नष्ट होतील, असे म्हटले आहे. तिरुपती या गावाचे स्थानीय वर्णन, तेथील पवित्र पूजास्थाने व जलाशय आणि चंद्रगिरीहून तिथे येणारे इतर रस्ते यांचे सुरेख वर्णन केलेले आहे. लेखक असे सांगतो की पंडियन, चोल, यादव आणि शेवटी कैलूर या राजकर्त्यांनी तिरुपती पर्वतराजीबद्दल जास्त समजून घेण्याचा प्रयत्न केला; पण प्रस्थापित दैवतांनी त्यांना त्यापासून रोखले.

लेखकाचे नाव आणि या कैफियतीच्या लेखनासाठी जमविलेल्या माहितीचे मूळ याबद्दल कसलाही निर्देश यात नाही.

**प्रारंभ :** श्रीवेंकटेश प्रसन कैफियत श्रीतिरपतीचे श्रीस्वामी यानी असणेचे शेषाचल पर्वतास जायाचे वाटेतं असणेच पर्वतसात.

**शेवट :** आ चावली या x x x x विशपरिहार होत याकडुन वाचताव x x x उपद्रव भगवंताच कृपे कडुन उपद्रब नाहि हेच पर्वतावरीच परंतु इतर ठाई नाहि हे आर्थ याहावया म्हणजे xxx करितां संक्षेप कडुन लिहील असे.

## डी. नंबर ९०

**तिरुमले पर्वतावरी चालणेचे विशेष उत्छव**

**TIRUMALAI PARVATĀVĀR CALNĀC VIŚEŚA ŪTCEWA**

**कागद :** ६" x ५$\frac{१}{४}$". १६ ओळी. मोडी. खराब पण दुरुस्त. वाच्य. अपूर्ण.

डी. नंबर ८१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत देशी हातकागदावर लिहिलेली असून पृ. ३१ वर सुरू होते. तीत २० पाने असून मोठ्या प्रमाणात अतिलेखन आणि खाडाखोड केलेली दिसते. डी. नंबर ८४ मध्ये एका छोट्या कैफियतीत सर्वसामान्य उत्सवांचे वर्णन केलेले आहे.

तिरुमलाई देवस्थानाशी संलग्न असणारी श्रीनिवास, गोविंदराज, पद्मावती आणि काही इतर मंदिरे यांतून संपन्न होणाऱ्या ब्रह्मोत्सवासारख्या प्रमुख व वार्षिक उत्सवांचे वर्णन यात आलेले आहे. कोणत्या तिथीस हे उत्सव साजरे करावेत आणि प्रत्येक उत्सव किती दिवस चालावा, हे तपशीलवार स्पष्ट केलेले आहे.

वरिष्ठ व कनिष्ठ जी अय्यंगार आणि त्यांच्यासारखे देवस्थानातील इतर पदाधिकारी यांनी मानसन्मान प्रदान करणे, तीर्थ वाटणे आणि देवासमोर शपथा घेणे, असे सर्वसाधारणपणे प्राथमिक म्हटले जाणारे विधी स्पष्ट केलेल आहेत. उत्सवाच्या दिवसांतील एकंदर कार्यक्रम नंतर स्पष्ट केला असून, देवाच्या नैवेद्यासाठी करायच्या खाद्यपदार्थाचे नाव व तो किती करायचा हे स्पष्ट केलेले आहे. त्यानंतर तो (भक्तजनांत) कसा वाटायचा हेही सांगितले आहे. एका स्वतंत्र भागात देवस्थानाशी संलग्न असणाऱ्या वरिष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांची कामे सांगितलेली आहेत. तसेच जी अय्यंगारांच्या मठातील व्यक्ती वा सेवक यांची नेमकी कामे, तिरुमलाई-तिरुपती देवस्थानाकडून त्यांना प्राप्त झालेले आनुवंशिक अधिकार व हक्क यांचेही त्या भागात स्पष्टीकरण केलेले आहे.

**प्रारंभ :** श्री वेंकटेश प्रसन्न. तिरुमले देवस्थानांत विशेष उछव व तिरुपती. // आनिवारी उछव करणेच विध कस म्हणजें नित्यपडी आराधना अरगेंपु पहिलच टाई xx दिवसा वेनिकाल इटामंटप xxxx मलयेण स्वामी स्तन कवचे धारण करुन घेउन ...

**शेवट :** मे महिनेत्त बा तारिख १२ लगाईत तीनि देवळास रथाछेव होणे ते जाहाल्यानंतर पाच दिवस अध्यान उछव होणे हे नव्हतां...

## डी. नंबर ९१

**तिरुवाकरें कैफियत**

**THIRUVĀKARAI KAIFIYAT**

**कागद :** १३" x ८$\frac{१}{४}$". १५ ओळी. मोडी. चांगली स्थिती. जुने. वाच्य. पूर्ण.

डी. नंबर १६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत १२ पानांची असून ती पृ. २३वर सुरू होते.

तिरुवाकराई हे खेडे, त्याभोवतालच्या टेकड्या, शहरे व खेडी, आणि त्या खेड्यांतील मंदिरे यांचे मूळ व इतिहास यात वर्णिलेला आहे. अर्काट जिल्ह्यातील वलंदवूर तालुक्यात हे खेडे असल्याचे सांगितले आहे. जैन व बौद्ध यांचे मजबूत ठाणे मानले जाणारे हे खेडे तिथे मोठ्या संख्येने असलेली मंदिरे व शिलालेख यामुळे महत्त्वाचे ठिकाण मानले गेले आहे. हे गाव आणि त्यातील मंदिरे यांचे मूळ जुन्या पल्लव राजवटीपासून हैदर अलीपर्यंत शोधले गेलेले आहे. कैफियतीच्या पहिल्या पानावर ती १२ जानेवारी १८१७ रोजी नकलली गेल्याचे लिहिले आहे.

शेवटचा भाग हैदर अलीच्या स्वारीशी निगडित आहे. कर्नाटकराई आणि तिरुवन्नमलाई येथील मंदिरांशी संबंधित असलेल्या वेंकण्णाशास्त्री या ज्ञानी ब्राह्मणाने येथील इतिहास सांगणारे जुने दप्तर व अंतःपुरासाठी राजांनी देणगी दिलेले खत असलेले ताम्रपट विजयनगर येथे नव्याने बांधलेल्या एका मंदिरात दडविले असेही सांगितले आहे. ते मंदिर अजूनही अस्तित्वात असून तेथील देवाला सुंदर विनायक म्हटले जाते. अप्पा गुरुकुल व चंद्रशेखर गुरुकुल या तिरुवकराई येथील दोन ज्येष्ठ गुरुकुलांत असलेले काही दस्तऐवज आपण मिळवू शकलो, असे लेखकाने हे निवेदन संपविताना सांगितले आहे. आणि ते दस्तऐवज १२ जानेवारी १८१७ रोजी नकलले गेले.

ही कैफियत अतिशय रंजक असून ती खूप महत्त्वाची ऐतिहासिक माहिती देते. सबब ती अधिक खोल अशा अभ्यासासाठी योग्य आहे. ही कैफियत तीमधील प्रसंगाच्या तारखा देत नाही, तशीच ती नक्कलकाराचे नावही सांगत नाही.

**प्रारंभ** : पुर्वी काहा दिवसाखाले चेंदसेखर म्हणार एक राजा देश संचार करीत आसुन एक्या दिवसी हे कांचि देशास एऊन हे स्थळ भोंताले डोंगर त्या मध्ये आरण्य त्या मध्ये एक महाशिव लिंग सुंदर स्वयंभु होऊन निर्माण जाहलते पाहिला.

**शेवट** : हा कैफियत तेथाल आपा गुरुकळ ६० वरुषाचे व चेंद्रशेखर गुरुकळ ४८ वरुषाचे यानी दाघे आणि कोडेकुर म्हणाव्याची गावि कितेक लोकानी मिळून लिहिलो बार तारिख छ १० माहे जनवरी सन १८१९ इसवि मोकाम तिरुवाकरे.

## डी. नंबर ९२

### तिरुवाकरे कैफियत
### TIRUVĀKARAI KAIFIYAT

**कागद** : ७" x ४$\frac{१}{२}$". १४ ओळी. मोडी. खराब अवस्था. फाटलेले. जुने. पूर्ण.

देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. ३९ वर सुरू होते.

भोवतालची मंदिरे व त्यांतील शिलालेख यांसह तिनिवाकराई गावाचे मूळ व इतिहास सांगणारी ही कैफियत असून, कुण्या वेंकटरावाने स्कॉट ब्राउन यांच्यासाठी १८१७ मध्ये शिलालेख अनुवादित केले असे पहिल्याच पृष्ठावर सांगितलेले आहे.

याआधीची कैफियत आणि ही यात फारच थोडा फरक आहे. यात अंतर्भूत केलेले श्लोक त्या डी. नंबर ९१ च्या कैफियतीत गाळलेले आहेत. आधीच्या त्या कैफियतीतील श्लोक देवनागरी लिपीत लिहिलेले आहेत. यात १८ पृष्ठे आहेत. इतर वैशिष्ट्यांबाबत या कैफियतीचे अंतरंग आधीच्या कैफियतीप्रमाणेच आहे. प्रारंभ व शेवट तोच असल्याने इथे त्याची नोंद केलेली नाही.

## डी. नंबर ९३

### तोंडरमंडल व कांची कैफियत
### TONDARMANDAL VA KĀNCI KAIFIYAT

**कागद** : १८" x १६". २९ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. ७०९ वर सुरू होते. या निवेदनाचे स्वरूप स्पष्ट करणारी चार पाने त्यात आहेत. हस्ताक्षर बऱ्यापैकी वाच्य दिसत असले तरी चुकीचे लिहिलेले शब्द किंवा विरामचिन्हांशिवाय नक्कल केलेली, असा प्रकार तिच्यात दिसतो. हस्ताक्षर खराब असून मोठ्या प्रमाणात मुळातील लेखन गाळले गेलेले आहे.

चोल राजांच्या विजयाच्या आधी कुण्या एका राजाने (ज्याचे नाव किंवा इतर माहिती दिलेली नाही) तोंडरमंडलच्या काही वनवासी जमातींना जिंकून आपल्या आधिपत्याखाली आणले. दीर्घ काळपर्यंत हा राजा अपत्यहीन होता. कठोर तपश्चर्येनंतर परमेश्वराने त्याला पुत्र प्रदान केला आणि तोच पुढे त्याचा– त्या राजाचा– वारस झाला. तोंडरमंडलमचा चक्रवर्ती, असा त्याने स्वतःस अभिषेक करून घेतला. ब्राह्मणांच्या दैवी शक्तीच्या जोरावर त्याला प्रचंड संपत्ती, गुप्तधन प्राप्त झाले आणि त्याने त्याच्या राज्यात खूप सुधारणा केल्या. पुढे तो श्रीशैलम येथे गेला आणि तिथेच त्याने आपले उर्वरित आयुष्य कंठिले असे लिहिले आहे.

ही कैफियत श्रीरंग यादव रायलू, वीर नरसिंह रायलू आणि इतर काही सामर्थ्यवान राजे यांच्या नावांचा उल्लेख करते. मोगल आणि मराठे यांच्या स्वारीच्या वेळी या प्राचीन नगरीचे खूपच नुकसान झाले. नेमके कोण जिंकले आणि तिथे राज्य करू लागले, हे प्रस्तुत कैफियत स्पष्ट करीत नाही. नक्कलकाराचे नाव किंवा यातील घटनाप्रसंगांच्या तारखा दिलेल्या नाहीत.

या भागातील काही ज्येष्ठ व्यक्तींकडून मिळालेल्या ताडपत्रावरून (Palm Leaves) या कैफियतीतील माहिती मिळालेली आहे, असे अखेरीस सांगितले आहे.

**प्रारंभ** : तोंडमंडलचे कैफियत पुर्वि हे तार. तोंडमंडल म्हणावयाचे आरण्य होता. त्यांत चेव पुरी म्हणावयाचं एक लहान तळ होता.

**शेवट** : xxxx या पैकीं पिडी दर पिडी पासुन असणार यान xx अवध बादयस्व आपले xxx होते. तो ऐकिल ऐसे वृतांत सांगितला. ते तोंडमंडल कैफियत एका तेथील स्थळ कर्ण पुरातन वाला पाहुन लिहिवीलते.

## डी. नंबर ९४

**तोंडरमंडल व कांचि कैफियत**

**TONDARMANDAL VA KĀNCI KAIFIYAT**

**कागद** : ७" x ५". १६ ओळी. मोडी. चांगली स्थिती. जुने. वाच्य. पूर्ण.

डी. नंबर ४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. १२ वर सुरू होते. यात कांची व तोंडरमंडल येथील तीन राजांचा इतिहास सांगितलेला असून, विशेषतः त्यांनी दक्षिणेत जैन धर्माच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न आणि कांची, तिरनमलाई व तिरनमलाईभोवतालच्या टेकड्या या ठिकाणी त्यांनी कोरलेल्या शिलालेखांचे सारांश यांचे वर्णन केलेले आहे. ही कैफियत आणि ३० क्रमांकाची कैफियत या सलगपणे नोंदलेल्या आहेत. (दुसरी कैफियत पृ. १४ पासून सुरू होते)

थोंडामन नावाच्या उत्तर भारतातल्या कुण्या राजाने त्याच्या राज्यकारभाराच्या शेवटच्या काळात स्वारी करून इथल्या मनर भूत (Manar Bhut) याचा पराभव केला आणि त्यास ठार मारले. अतिशय कर्मठ शैव असलेल्या या थोंडामन राजाने तिरनमलाई येथे शिवाची ६४ मंदिरे बांधली. कांची येथील अनेक जैन मंदिरे त्याने जमीनदोस्त केली. कांची या नगरीला राजधानी करून थोंडामन चक्रवर्ती म्हणून त्याला अभिषेक करण्यात आला. पहिल्या पानावरील एका टिपेवरून असे समजते की, २८ ऑगस्ट १८१६ रोजी बाबुराव याने ही कैफियत अनुवादित केलेली आहे.

चतुरंगपट्टण येथील कुण्या वेंकटेश शास्त्री या रहिवाशाने २८ ऑगस्ट १८१६ रोजी ही नकलली असेही सांगितले आहे.

**प्रारंभ** : शालिवाहान सके ४०० नंतर शैवबळाल जेयेन राजा पश्चिम देशाहुन एऊन तोंडमंडल चोळमंडल वगैरे मंडलांत सैव मथ प्रबळ करून तरणामलेंत राजधानी बांधुन अनेक जेयेन देवालये xxx

**शेवट** : xxxx आनेक दिवस राज्य करित असुन जेयन दरोबस्तास हि शास्त्राक्त होऊन त्याचे देवालये पाडुन आपन कांचि देशे उहड बस्ती केला. यालाच तोंडमंडल चेलत्वर्ती म्हणताहेत.

## डी. नंबर ९५

**तोंडरमंडल कैफियत**

**TONDARMANDAL KAIFIYAT**

**कागद** : ९ $\frac{१}{२}$" x ५". १६ ओळी. मोडी. चांगली स्थिती. जुने. वाच्य. पूर्ण.

भाग १६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश कागदावर अतिशय सुवाच्य अशी लिहिलेली ही कैफियत पृ. १२ वर सुरू होते.

थोंडरमंडलम्च्या राजांचा इतिहास, त्यांची जैन धर्माविषयीची आस्था, त्यांचा उत्कर्षबिंदू व पतनावस्था, शैव मताचा प्रसार व मंदिरांची बांधकामे, त्यांतील शिलालेख आणि असेच ९४ व ३० क्रमांकांच्या सलगपणे लिहिलेल्या कैफियतीतील तपशील यात लिहिलेला आहे. त्याआधीच्या कैफियतीप्रमाणेच याचाही प्रारंभ व शेवट आहे. म्हणून तो इथे लिहिलेला नाही.

## डी. नंबर ९६

**तोंडरमंडालातील जैनाचे कैफियत**

**TONDARMANDALĀNTILA JĀNECĪ KAIFIYAT**

**कागद** : ९ $\frac{१}{२}$" x ५". १८ ओळी. मोडी. चांगली स्थिती. जुने. वाच्य. पूर्ण.

डी. नंबर १६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश कागदावर अतिशय सुवाच्य रीत्या लिहिलेली ही कैफियत पृ. १३ वर सुरू होते.

चोवीस तीर्थंकर, सोळा मनू, बारा चक्रवर्ती आणि जैन धर्माचे मूळ यांच्याशी यातील पहिला भाग संबंधित आहे. चामुंडी सागर राजाने दक्षिणेत कब्जा केलेले प्रदेश आणि जैन धर्ममताचा केलेला प्रसार दुसऱ्या भागात वर्णिलेला आहे. अनुक्रमे चोळ, पांड्य आणि विजयनगरचे नाईक यांच्या राज्यांची माहिती शेवटच्या तीन भागांत सांगितली आहे. तोंडरमंडल हे प्रत्येक समर्थ राजाचे लक्ष्य बनले आणि त्याला मोगल व मराठे यांच्या प्रखर हल्ल्यांना तोंड द्यावे लागले. भरभराटीला आलेल्या अनेक गावांची व शहरांची नावे ही कैफियत सांगते. त्यांचा इतिहासही थोडक्यात देते. कैफियत ३८ अ पृष्ठावर संपत असून तीत लेखक किंवा कैफियतीतील माहितीचे मूळ यांचा निर्देश केलेला नाही. तोंडरमंडलमच्या प्राचीन राजांचा इतिहास आणि जैन धर्ममतांचा उगम, विस्तार व पतन यांबद्दलची भरपूर माहिती सांगणारी म्हणून ही कैफियत महत्त्वाची मानता येईल.

**प्रारंभ :** तोंडरमंडलांत असणार जैनाच कैफियत सन १८२७ इसवि फिबरवारी तारिख २९. जेंबुद्विपांत भरत खांडामध्ये कितेक काळ भोग भुमि वाणिही कितेक काळ कर्म वाणि भुमिही ऐस अनादि हौऊन चालत आहे.

**शेवट :** बाकी बारा जात पुर्वि अनेक मतीचे किल्ले बांधुन पाळेगार वाणि होऊन अनेक टां दौलत केले. आतां त्यांचें वौंशस्त तेथ असल तरीही गवत विकण भाडा बैल घेऊन जाण चारा विकणे या प्रमाणे जीवन करीत आहेत.

## डी. नंबर ९७

### तोंडरमंडलातील जैनांचे कैफियत
### TONDARMANDALĀNTILA JAINĀCE KAIFIYAT

**कागद :** ७" x ५". २१ ओळी. मोडी. खराब अवस्था. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. २६ वर सुरू होत असून, तीत २६ पाने आहेत. भाग १९-६-१५ मधील डी. नंबर ९६ प्रमाणेच यातील आशय व भाषा आहे. म्हणूनच याचा प्रारंभ व शेवट इथे दिलेला नाही.

## डी. नंबर ९८

### तोळी देशाची कैफियत
### TOLI DEŚANCI KAIFIYAT

**कागद :** १२" x १०". २९ ओळी. मोडी. खराब अवस्था. फाटलेले. अपूर्ण.

डी. नंबर १२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

तोळी देश या प्रदेशाचा उद्भव व इतिहास आणि त्या देशात ब्राह्मणांतील एका नव्या शाखेची झालेली निर्मिती यांविषयी माहिती देणारी ही एक अपूर्ण कैफियत आहे. ती फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश कागदावर लिहिलेली असून, सामान्य दर्जाच्या शाईचा वापर केलेला असल्यामुळे दस्तऐवज फिकट झालेला आहे.

राजा कार्तवीर्य अर्जुन याच्याकडून झालेला अपमान, झालेल्या हत्या यामुळे संतप्त होऊन परशुरामाने सर्वच राजांना ठार केले आणि त्यांची मालमत्ता ताब्यात घेतली. कन्याकुमारीनजीक अतिदक्षिणेच्या कोपऱ्यात नवी भूमी मिळण्यासाठी त्याने जलदेवतेला आवाहन केले. थूलूदेश किंवा तोळी देश या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या नव्या भूमीचा राजा म्हणून मुसूर वर्मा याची परशुरामाने नेमणूक केली. त्यानंतर फारशा महत्त्वाच्या नाहीत अशा काही बोधकथा या कैफियतीत येतात. ही कैफियत चार पानांची आहे. लेखकाचे नाव आणि माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** कैफियत तोळी देशाची. वैवश्वतु मनुच अधीकारांत युग चतुर ७२ दफा जाहाल्या नंतर एक वैवश्वत मनु.

**शेवट :** प्रमाण ब्रह्मणास आणुन ठेविला म्हणता वेळेस देवेंद्र संतुष्ट होऊन आणि येज्ञादी चालवणे म्हणुन विश्वकर्मास बोलाऊन पाटऊन xxx विग्रह करुन मयुरवर्मास दिलेहे. ते विग्रह आणुन बहुत दिवस xx

## डी. नंबर ९९

### त्रिवदुर माहिती
### TIRUVĀTŪR MĀHĪTHY

**कागद :** ७$\frac{१}{२}$" x ५$\frac{१}{२}$". १६ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ४४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. पृष्ठ ४४ वर ही सुरू होते.

तिरुवरूरचे मूळ व इतिहास आणि मांगपूर येथील त्यागराजस्वामी व आदिपुरेश्वरस्वामी यांचे मूळ व इतिहास या कैफियतीत स्पष्ट केलेला आहे. हस्ताक्षर वाच्य असून चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत आठ पानांची आहे.

एके काळी हे तिरुवरूर घनदाट जंगलाने वेढलेले होते. देवता काली आणि आदिपुरेश्वरस्वामी यांची येथे प्रतिष्ठापना (incarnated) झाली आणि कालीमुळे या खेड्यातील जनता मोठ्या संख्येने मरण पावली. तिने एका सोनाराशी लग्न केले असा उल्लेख आहे. निर्मनुष्य झालेले हे खेडे नाईक राजघराण्यातील चेन्नाप्पा नाईक याने पुन्हा पुनर्वसित केले.

मांगपूर येथील जलाशयात थिय्याग्रजस्वामीचा लागलेला शोध (त्याचे सापडणे) आणि त्याची आदिपुरेश्वरस्वामीच्या मंदिरात झालेली प्रतिष्ठापना यांचा वृत्तान्त दुसऱ्या प्रकरणात येतो. तिसऱ्या भागात शंकराचार्यांनी केलेले कालीचे दमन येते. आपल्या स्वास्थ्यासाठी मोठ्या प्रमाणात देणगी दिलेल्या अनेकानेक राजांनी या जुन्या स्थानांना भेटी दिल्या, अशीही माहिती यात आहे. या संदर्भातील गौण महत्त्वाच्या काही दंतकथा या कैफियतीत नोंदलेल्या आहेत. त्या कमी उपयोगाच्या आहेत.

लेखकाचे नाव किंवा या कैफियतीतील माहितीचे मूळ यांचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ :** त्रेतायुगी हे त्रिवदुर म्हणावयाच गांव आरण्य होते. तेथे आधि पुरेश्वर वारुळांत अवतार घेऊन्न होते.

**शेवट:** तुतै पुजीत जालास तुजला मी ऐकय करून घेतों. म्हणुन प्रसन युत्क वालत च ऐकय जाहाला. xxxx त्या स्तली ब्र्ह्मण हो त्या. स्थळांत गुरु xxx आल्या स्थळवाले लोक या प्रहरी जात येत असत.

## डी. नंबर १००

### धारनगरांची कैफियत
### DHĀR NAGARĀNCI KAIFIYAT

**कागद :** इंग्लिश बनावट. २०" x १२". ३० ओळी. मोडी. चांगली स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ३७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ६७ वर ही कैफियत सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. संपूर्ण दस्तैवजात अशुद्ध शब्दलेखन आणि चुकीची विरामचिन्हयोजना दिसून येते. यातील प्रारंभीची व शेवटाची काही पाने गहाळ झालेली आहेत. धार नावाच्या नगरीचे मूळ व इतिहास सांगणाऱ्या एका मोठ्या .निवेदनातील हा नकललेला विभाग असावा असे दिसते. चोळ राजे व विजयनगरचे नाईक राज्यकर्ते यांची वंशावळ आणि त्या राजांचा काळ व नावे यांची माहिती यात दिलेली आहे. विक्रमादित्य व शालिवाहन या राजांच्या चरित्रकथा थोडक्या दिलेल्या आहेत. 'धार नगर कैफियत' असे जरी या कैफियतीचे शीर्षक असले तरी या नगरीबाबतची फार थोडी माहिती यात आलेली आहे. एके काळी हे ठिकाण चोर, लुटारू व वन्य श्वापदे यांच्या वसतीसाठीच प्रसिद्ध होते. हरिहर आणि बुक्क यांनी त्यांच्या संयुक्त प्रयत्नाने या प्रदेशातील जंगली भाग साफ केला, गाव वसविले आणि त्याला हिंदू नाव दिले, असे म्हटले जाते. हे नाव इथे वाचता येत नाही. मोगलांच्या स्वारीच्या काळात ही नगरी त्यांच्याकडून जिंकली गेली आणि तिचे धार नगर असे नाव ठेवण्यात आले. कालीमातेच्या एका छोट्या मंदिराचा यात उल्लेख आलेला आहे. वाचनीय म्हणावा असा यात फार थोडा मजकूर आहे. शिवाय ती अपूर्ण असल्यामुळे लेखकाचे नाव आणि माहितीचे मूळ याविषयी त्यात काहीही निर्देश नाही. फक्त 'रंगा' असा एक शब्द लेखनाच्या अखेरीस आढळतो.

**प्रारंभ :** xxx त्यानी कोणती कामा लिहील नाही कीं कळत नाहि. साब हा पांच तरहेच आहेत.

**शेवट :** xxx सिल सिला वगैरे पहिलेचया बस्ती लिहीलहि होत. रायटा व आपण जे लिहाली आहे कितेकजण मनभोत कडुन सदरि लिहीले ते राजाचे काम आपणास लिहुन दिलहे सामर्थी दाखल पडल आहे सावकीस नसतां वाईठे परवार पाववल म्हणुन पाटवीले आहे. आपण शोधुन विलेवारी करून घेतलें पाहिजें आपण व हजरत मेजर मर्किजी साहेबानी सांगितले कडोनं सेवन केली आहें श्रुत हाई रंगनाथ.

## डी. नंबर १०१

### नगर कैफियत
### NAGAR KAIFIYAT

**कागद :** ९$\frac{1}{2}$" x ५$\frac{1}{2}$" १६ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ७० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर वाच्य स्वरूपात नकललेली ही कैफियत पृ. ४९ वर सुरू होते. सर्व पृष्ठे

सुटी सुटी आहेत. यात केलंदी संस्थानाचा इतिहास सांगितला आहे. केलंदी संस्थानचा मूळ संस्थापक बसवप्पा याला केलंदीच्या जंगली भागात खूप गुप्त धन व रामेश्वर लिंगाची प्रतिमा गवसली. चौंडाप्पा व बद्रपल्लल (भद्रपाल?) यांनी त्यातील एक भाग बांधला आणि त्यास नगर (किंवा नगरम्) असे नाव दिले. चौंडाप्पाचा पुत्र सदाशिव नाईक हा अनेगोंदीच्या राजाचा जवळचा मित्र झाला आणि विजयनगरच्या रायलू घराण्याच्या प्रस्थापनेत त्याची मोठी मदत झाली, अशी माहिती यात आहे. श्रृंगेरी मठ आणि त्याच्या चार शाखा यांची निर्मिती व इतिहास यांच्याशी संबंधित कथाभाग (episode) तपशीलवार वर्णिलेला आहे. नाईक राजांकडून या मठांना चांगला आश्रय मिळाला असेही म्हटले आहे.

विरूपाक्ष स्वामींच्या उदयकाळातील परिस्थिती, मंदिराचे बांधकाम आणि नाईक राजवटीकडून मिळत गेलेले इतर लाभ हेही स्पष्ट केलेले आहे.

नगर व केलंदी येथील नाइकांचा उदय व अस्त, हैदर अलीची स्वारी आणि त्याने या दोन किल्ल्यांचा केलेला कब्जा यांचा उल्लेख केलेला आहे. एक-दोन ठिकाणी शालिवाहन शकातील तारखा दिलेल्या आहेत. लेखकाचे नाव, नक्कलकार आणि यातील माहितीचे मूळ यांविषयी काहीही उल्लेख नाही.

**प्रारंभ :** नगर च कैफियताच तपशील केळंदी समस्थान च कैफियत केळंदी तालुके च आरंभ पहिली मैदानमुलुख होने.

**शेवट :** xxx घेणे म्हणुन हुकुम केला तक्षणी आहेर निघुन मिमल तयार करीतां हे पाहुन आपले xxx कारणं आपले लोकास समस्त एके स्थळांत सीळकडुन हजुर जाऊन अर्ज करावे म्हणताना तक्षणी मनकी वालेनी एडुन धरुन गुलाम खानास पाहुरेंत टेऊन जेवन तयार वाले समस्थास xxx

## डी. नंबर १०२

**नगर कैफियत**
**NAGAR KAIFIYAT**

**कागद :** ९ $\frac{१}{२}$" x ५ $\frac{१}{२}$". १७ ओळी. मोडी. जुने. खराब अवस्था. अपूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. हा दस्तऐवज पृ. १६९ वर सुरू होत असून, तो फूलसकॅप आकाराच्या पातळ कागदावर लिहिलेला आहे. नगर संस्थानाचा उदय व इतिहास यांच्याशी तो संबंधित आहे. एके काळी हा सर्व भाग घनदाट जंगलाने भरलेला होता. कुण्या बसवप्पा नावाच्या व्यापाऱ्याने या किल्ल्याचा पाया घातला. परमेश्वरी शक्तीच्या अनुग्रहाने पत्नी व दोन मुले चौंडप्पा व बद्रपल्लाल (भद्रपाल) यांच्यासह त्याला भूमीत पुरलेले गुप्त धन व रामलिंगाची प्रतिमा मिळाली. सर्वसाधारणपणे प्रसिद्ध व्यक्तीबाबत सांगण्यात येणारी पौराणिक आख्यायिका इथे तपशीलवार सांगितलेली आहे. चौंडप्पाचा पुत्र सदाशिवराय याचा जन्म आणि हरिहर व बुक्क यांनी केलंदीस दिलेली भेट थोडक्यात वर्णिलेली आहे. ही कैफियत अपूर्ण असून लेखकाचे नाव, माहितीचे मूळ आणि घटनाप्रसंगांच्या तारखा यांचा उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ :** नागर कैफियतच तपशील केलंदी सवस्तानच कैफियत. केळंदी तालुकेच ग्रामच हाली मैधान मुलुक न होते. त्या मुलकी येक वारुळांत रामेश्वर लिंग उद्रभऊन असताना; ते जागेत बसवपा म्हणार पटेल व वेवसाये करुन घेउन होता.

**शेवट :** मुलुक हि दौलत करुन घेऊन अनेगोंदी रायलाची सिलसिला विद्यानगर म्हणावयांचे स्थलि हरिहर राव बुक राव अदि करुन एकाची वंसिक श्री भगवत पादाच्यारे नामी श्री जप करुण अमर ग्रंथही करुण xxx

## डी. नंबर १०३

**नंदवार गाव अग्रहार कैफियत**
**NANDAVĀR GĀVA AGRAHĀR KAIFIYAT**

**कागद :** ६ $\frac{१}{४}$" x ५ $\frac{१}{४}$". ६ ओळी, जुने, खराब अवस्था. अपूर्ण.

अतिशय खराब अवस्थेतील या अपूर्ण दस्तऐवजात ६० पृष्ठे असून, तो पातळ अशा देशी हातकागदावर लिहिलेला आहे. हस्ताक्षर पुष्कळसे वाच्य आहे. मध्यभागीची आणि शेवटची काही पृष्ठे हरवलेली आहेत. अगस्ती ऋषीने विंध्य पर्वताच्या केलेल्या गर्वहरणाची पौराणिक कथा पहिल्या भागात सांगितलेली आहे. या भूप्रदेशाच्या उत्तरेकडून ब्राह्मणांचे दक्षिणेकडे झालेले स्थलांतर आणि विंध्य पर्वताच्या दक्षिणेस अग्रहार व मंदिरे यांची झालेली स्थापना यांचे विस्ताराने वर्णन केलेले आहे. काही पाने गहाळ झालेली असल्याने हा (पहिला) भाग इथे संपतो. गयेच्या ब्राह्मणांचा उदय व इतिहास यांच्याशी दुसरा भाग संबंधित आहे. नंदनचक्रवर्ती नावाच्या राजाशी निगडित अशी एक आख्यायिका सांगितली आहे. आपल्या मृत्युपत्राच्या द्वारे या राजाने ब्राह्मणांना एक मोठे खेडे इनाम दिले आणि त्याला नंदवार गाव म्हटले जाऊ लागले, अशी ही माहिती दिलेली आहे. यानंतर पंचद्रविड आणि

गौड ब्राह्मणांबद्दलची संक्षिप्त माहिती या कैफियतीत येते. नंदीवर्म घराण्याबद्दलची संक्षिप्त हकीकत एका पृष्ठावर येते. मात्र योग्य अशा शेवटाशिवाय हे निवेदन इथेच संपते. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ आणि घटनाप्रसंगांच्या तारखा दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ :** विंदर्श पर्वतास उत्तर देष आर्य शतखंड पुण्य भुमी. तेथ गंगा येमुना योर मधे ब्रह्मवृतैक देष तेथ ब्रह्मा देवती सकळहि उपपत्ति झाले.

**शेवट :** xxx जिवन करुन घेउन होते. काहि दिवसानन्तरे हे नद वैदिक ब्राह्मणा मध्ये कित्तेक राजे लोक लौकी व्रितकडुन जिण करीत होते.

## डी. नंबर १०४

**नवाब असफशाह कैफियत**
**NAWĀB ASAFŚAH KAIFIYAT**

**कागद :** १२" x ८". १६ ओळी. मोडी. चांगली स्थिती. जुने. वाच्य. अपूर्ण.

डी. नंबर २ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

हे ऐतिहासिक निवेदन पृ. १३० वर सुरू होत असून, ते फूल्सकॅप आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेले आहे. ही कैफियत पृ. १३२ वर सुरू होते. असफजाहचे आईवडील, जन्म व त्याचे बालपण यांचे वर्णन यात येते. साहसी वृत्ती व हट्टी स्वभाव यामुळे त्याच्यावर त्याच्या मालकाचा रोष झाला आणि यामुळे त्याला तिथून पळून दिल्लीला अलमगीर बादशहाच्या दरबारात जावे लागले. दक्षिणेचा सुभेदार जहांदर शहा याच्या मृत्यूनंतर आलमगिराने असफजाहास दक्षिणेचा सुभेदार नेमले.

असफजाहाने लाहोरला केलेल्या चढाया, गोवळकोंड्यावर कब्जा, ठाणेश (Thanesh) व बहादूरशहा यांची युद्धे आणि विजापूरचा पाडाव व सामिलीकरण यांविषयीचा वृत्तान्त नंतर आलेला आहे.

पृ. २५९-२६० वर किलीच खानाची बडतर्फी व मृत्यू, अलि अबदुल शहाचा पराभव आणि त्याचे श्रीरंगपट्टणास पलायन यांचे वर्णन आलेले आहे. पृ. २६२ ते २६६ वर हैदरअलीखानाचा इतिहास, कामबक्ष व बहादूरशहा यांच्यातील युद्ध, कामबक्षाचा पराभव व मृत्यू आणि अशाच दिल्लीच्या मोगल दरबारातील इतर घटना यांचा वृत्तान्त सांगितला आहे. विजापूर व गोवळकोंडा येथील सुभेदार आणि असफजाह यांच्यातील अनेकविध करार, दक्षिण व कर्नाटक येथील परिस्थिती, हैदराबाबादच्या गादीसाठी अनेक इच्छुकांनी केलेले वारसा युद्ध यांचे अगदी तपशीलवार वर्णन केलेले आहे.

हैदराबादच्या गादीसाठी इच्छुक असणाऱ्या परस्पर-विरोधकांना मदत करण्याबाबत अर्काटचा नबाब, त्रिचनापल्लीचा नबाब, बुसी, लॉली आणि मराठे यांच्या भूमिकांबद्दलचे विवेचन यानंतर केलेले आहे. पेशव्यांचा इतिहास आणि मराठ्यांच्या पतनाची कारणे यांचा उल्लेखही कैफियतीत केलेला आहे.

नियामतुल्लाखान व सलाबतजंग यांच्या विरोधात नझरजंगाच्या बाजूने मराठ्यांनी केलेल्या लढाया आणि अस्करचा (Askher) किल्ला जिंकणे यांचे वर्णन शेवटच्या काही पृष्ठांत आलेले आहे. एका बाजूला जानोजी शिंदे, मल्हारराव होळकर आणि गायकवाड यांची भूमिका आणि दुसऱ्या बाजूला नानासाहेब व विश्वासराव यांची कोसळते मराठी राज्य सावरणारी भूमिका, मराठी राज्याचे भवितव्य निश्चित करणारे पानिपतचे निर्णायक युद्ध यांचे अतिशय रेखीव वर्णन केलेले आहे. इथेच हे निवेदन थांबते. तेव्हा लेखकाने पुढील भागांकडे जाणे टाळले किंवा गहाळ मजकूर मिळवता आला नाही हे सांगणे कठीण आहे. जरी अनेक घटनाप्रसंग विस्ताराने निवेदिले गेलेले असले तरी त्यांच्या तारखा मात्र दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ :** कैफियत नवाब असफशाह बहदुर दिल्लीमध्ये आलमगीर बादशाह वेळी कीलीच खान मानसबदार पादशाह हे होते. त्याचे उदरी पुत्र जाहाले.

**शेवट :** तेथ नवाबासलवदजंग व मोगल आलिखान व राजारामचेंद्र मीळुन फितुर करुन रघुनाथरायास पत्र लिहीली की अम्ही येऊन तुम्हास भेटतो मग आवेघ मिळुन निजामाली खानासी मारून घेउ मणौन लिहीले. त्यानी कबुल केले.

## डी. नंबर १०५

**नरसिंहपुर माहिती**
**NARSHIMAHPŪR MĀHITHI**

**कागद :** १२" x १०". २४ ओळी. मोडी. खराब स्थिती. पूर्ण.

घटिकाचलम् आणि नरसिंहस्वामी यांना समर्पित केलेले मंदिर यांचा उदय व इतिहास सांगणारी ही कैफियत पृ. ४० वर सुरू होते.

कुण्या वामदेव नावाच्या ऋषीने तपश्चर्या केली आणि नरसिंहाच्या रूपात आलेल्या विष्णू देवाचे आशीर्वाद तो संपादू शकला, हे प्रस्तुत कैफियत स्पष्ट करते. घटिकाचलमनजीकच्या

जंगलमय प्रदेशात त्याला हे आशीर्वाद वा कृपा लाभली असे सांगितले आहे. या आनंददायी घटनेचे चिरस्थायी स्मारक करण्यासाठी वामदेवाने आपले मित्र व सहकारी यांच्यासमवेत नरसिंहस्वामी यांचे एक मंदिर बांधले आणि तिथे नरसिंहपूर या नावाने एक खेडे उभे केले. या मंदिरानजीकच्या जलाशयात स्नान केल्याने घडणारे चमत्कार, इथल्या दैवतांची दैवी शक्ती आणि भक्तांची नावे याबद्दल ही कैफियत नंतर माहिती देते. विजयनगरच्या कृष्णदेवरायाने या मंदिरांची पुनर्रचना करून काही ऐसपैस इमारती व उत्तुंग मिनार बांधले. त्याने मंदिरासाठी मोठ्या प्रमाणात जमिनींचे दानही दिले असे सांगितले जाते. दोन-तीन ठिकाणी काही नावे आणि शालिवाहन शकातील तारखा यांचा निर्देश आलेला आहे, पण तो मजकूर वाच्य नाही. प्रस्तुत मंदिराच्या अंतर्भागातील भिंतीवरील शिलालेखावरून या कैफियतीचा आशय एकत्रित केलेला आहे, असे शेवटी सांगितलेले आहे. तारीख किंवा नक्कलकाराचे नाव यांचा निर्देश केलेला नाही. हे स्थळ नंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या देखरेखीखाली घेतले गेले असे सांगितले आहे. कैफियतीच्या अगदी शेवटच्या भागात दोन किंवा तीन तेलगू भाषेतील ओळी लिहिलेल्या आहेत.

**प्रारंभ :** श्री नरसिम्ह प्रसन श्रीमदनरसिम्हस्वामी देवालय आनदी. नृसिव्ह उदभव अरंभ करुन कुंपनी अमल-प्रामानुत नाम संवछर पावेतो. चालीलेते कैफियत. पुर्वि नारद माहामुनी रुद्रदेवाच हाती परमतमा देवता सिद्ध मनुष्य xxxx रूप होऊन जाहाले xxx

**शेवट :** xxx त्या परवतास पशोमभागी गोर्वदन गीरी पर्वत. त्याजवरी कृष्ण सामींच देवस्वान. १ गर्भमंटप १ मुखमंटप सदरह बांदीं विलते गोपाल नाईकाचे धर्म.

## डी. नंबर १०७

**नागुर कैफियत**
**NAGŪR KAIFIYAT**

**कागद :** १३" x ८$\frac{१}{४}$". १६ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

**डी. नंबर १६** मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या निळ्या इंग्लिश कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. ३३ वर सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे. यात ६ पाने आहेत आणि पहिल्या पानावर निवेदनाचा आशय थोडक्यात स्पष्ट करणारी एक इंग्रजी भाषेतील टीप आहे.

नागूर येथे राहणाऱ्या वृद्ध रहिवाशांकडून एकत्र केलेल्या अनेकविध घटनांची जंत्री असेच या रचनेचे स्वरूप आहेसे दिसते. प्रारंभी चंद्रशेखर राजाने नागूरच्या पश्चिमेकडील जंगल साफ करून तिथे एक सुंदर शहर आणि शिवाचे मंदिर बांधले. शहरातील आरोग्यास बाधा आणणाऱ्या परिस्थितीमुळे तेथील रहिवाशांनी पश्चिमेच्या या नव्याने बांधलेल्या शहरात स्थलांतर केले. जयकोंडा चोलन याच्या राजवटीत एक शहर उभे केले गेले आणि त्याला नागूर हे नाव दिले गेले. इथे निवेदनाची ही साखळी तुटते; आणि मीरासाहेब याच्या जीवनाची कथा सुरू होते.

नंतर मीरासाहेब म्हणून ओळखू लागलेला शाह महमद हमीद कादरसाहेब आपले वडील सय्यद हसन कादरसाहेब आणि आई फातिमा बिबी यांच्यासह हिजरी ८५६ मध्ये नागूरला आला. ते मुळात माणिकपूरचे रहिवासी असे सांगितले जाते. या महमद कादरने लहानपणापासून वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत केलेले चमत्कार या कैफियतीत मांडलेले आहेत. पुढे तो मक्केस गेला आणि संत सय्यद महमद गौर क्वालिंग (गुबालिरी) यांचा शिष्य बनला असे सांगितले आहे. या संताने आपल्या या विश्वासू शिष्यास आपली मुलगी पत्नी म्हणून देऊ केली. पुढे मीरासाहेब नागूरला परतला. परतल्याची तारीख किंवा स्थळ यांचा निर्देश केलेला नाही. तो नागूरच्या समुद्रकिनाऱ्यावर प्रार्थना करीत असे आणि त्यास भिन्न धर्मांचे भक्त येत असत. त्याला दोन मुलगे व दोन मुली होत्या. थोरल्या मुलाचे नाव युसुफ होते. मीरासाहेबाने आपल्या मृत्यूच्या तारखेचे भाकीत केले होते आणि जिथे आपला प्राण जाईल तिथेच आपले दफन करावे, असेही सांगितले होते. तो हिजरी ९२९ सालाच्या मोहर्रम महिन्याच्या १० तारखेस वयाच्या ६८ व्या वर्षी निवर्तला. वडिलांवर विशेष प्रेम असणारा त्याचा थोरला मुलगा युसुफ याने तिथे एक छोटी गोरी (Gori) बांधली आणि उपासना सुरू केली.

ईस्ट इंडिया कंपनीतील तिरुमल चेट्टी या अधिकाऱ्याची अफरातफर व खोट्या नाण्यांची निर्मिती या आरोपाखाली कशी चौकशी झाली आणि त्यास देहदंडाची सजा कशी फर्माविली गेली हा प्रसंग यात सांगितला आहे. आपले प्राण वाचविण्यासाठी त्याने मीरासाहेबाची करुणा भाकली. मग ही शिक्षा बाजूला सारावी लागेल अशी वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोणत्या परिस्थितीत पाळी आली त्या सर्व घटनेचे निवेदन इथे केलेले आहे. आपली सुटका साजरी करण्यासाठी म्हणून आणि आपल्या कृतज्ञेचे प्रतीक म्हणून तिरुमल चेट्टीने तिथे एक खूप मोठा मिनार आणि काही धडगी बांधली. हे सर्व हिजरी १०१० मध्ये घडले असे सांगितले आहे.

याशिवाय तेथे कोरीव शिलालेख असलेले सहा मिनार

असून त्यात बांधविणाऱ्याचे नाव, मिनाराची उंची आणि बांधण्याचे प्रयोजन स्पष्ट केलेले आहे. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ सांगितलेले नाही. २७ सप्टेंबर १८१७ रोजी ही कैफियत लिहिली गेल्याची नोंद केलेली आहे.

**प्रारंभ :** जेंबुद्वीपांत भरथ खंडामध्ये दक्षणे पारसी समीप पुर्वी चेंद्रसेखर राजा म्हणार एक राजा दक्षेण देशांत असणेच दिव्य स्थल दरोबस्तही दरुषणा निमित्य अल असताना ह्या देशांत आपले नाव आसावया सारिख एक ईश्वर लिंग प्रतीष्टा करावे xxx.

**शेवट :** हिजरी १२३७ तेदी १ मोहर माहमद बदरचे अमलदार दाउदाखादर नांदविलते १५ वरुष जाहल १५० पाउल पुर्व दीक्क हिजरी ११७७ तारीख १२ रबीसानी प्रतापव्ह माहराज पछ्मेकडील मणोरा २८० पाउल उनत बांदविला ५६ वरुष.

## डी. नंबर १०८

**नागूर कैफियत**
**NĀGŌŌR KAIFIYAT**

**कागद :** ७$\frac{१}{४}$ " x ४$\frac{१}{२}$". १५ ओळी. मोडी. जुने. खराब स्थिती. पूर्ण.

डी. नंबर १७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. ५७ वर सुरू होत असून ती देशी हातकागदावर लिहिलेली आहे. हस्ताक्षर वाच्य आहे, पण दस्तऐवजाच्या अतिजुनेपणामुळे कागद खराब झालेले आहेत. डी. नंबर १०७ मधील कैफियतीचीच ही नक्कल आहे. शब्द-रचनेमध्ये काही सामान्य बदल दिसतो, पण विषय तोच आहे. काही जादा दंतकथा किंवा चमत्कारांच्या कृती सांगितल्या आहेत, इतकेच. काही मशिदींची बांधकामे आणि मीरासाहेबाच्या चाहत्यांपैकी मोठ्या संख्येने काही जण कसे त्याचे शिष्य बनले हे स्पष्ट केले आहे. त्यानंतर ही कैफियत मीरासाहेबाने केलेल्या तीर्थयात्रेची माहिती देते. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ किंवा मीरासाहेबाने केलेल्या चमत्काराच्या वा आश्चर्याच्या कृतींच्या तारखा दिलेल्या नाहीत. कैफियतीच्या पहिल्या पानावर या निवेदनाचा विषय स्पष्ट करणारी इंग्रजीत लिहिलेली एक टीप आहे. या कैफियतीची ३४ पाने आहेत. याआधीच्या कैफियतींप्रमाणेच यातील शेवट आहे.

**प्रारंभ :** कैफियत नागुर सुभो तंज्याउर सन १८१७ इसवी तारीख २९ माहे सबेटंबर जंबुद्वीपांत भरतखंडामधे दक्षणे पारसी समीप पुर्वी चंद्रसेखर राजा दक्षेण देशांत असणेच दीव्य स्थल दरोबस्त ही दरुषणा निमित्य आल अस्ताना xxx

**शेवट :** हिजीरी ११७७ तारीख २२ रथी सानी प्रतापसीव्ह माहराज पछ्मेकडील मणोरा २८० पाउल उनत बांधवीला ५५ वरीष जाहले.

## डी. नंबर १०९

**नाणे जिन्नस कैफियत**
**NĀNE JINNAS KAIFIYAT**

**कागद :** ८" x ६". १७ ओळी. मोडी. जुने. खराब (दुरुस्त करून बांधलेले). अपूर्ण.

डी. नंबर ६० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

सदरहू कैफियत पृ. ५२ वर सुरू होत असून ती देशी बनावटीच्या हातकागदावर लिहिलेली आहे. तिच्यातील प्रारंभीची व शेवटाची काही पाने ती पूर्ण करण्यासाठी आवश्यक होती. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ आणि कैफियतीची तारीख यांचा निर्देश केलेला नाही.

पृष्ठ ५२ वर मराठा चलनाची किंमत व विनिमयाचे स्वरूप आणि मोगल व ईस्ट इंडिया कंपनीच्या चलनाशी त्याचे असणारे सममूल्य यांचे तक्ते दिलेले आहेत. मराठा मुलुखात वापरल्या जाणाऱ्या विविध सुवर्ण व रौप्य मुद्रांची नावे व परिमाणे (denominations) नोंदलेली आहेत.

त्यानंतरच्या दोन पृष्ठांत विभिन्न राज्यांची नावे आणि त्या राज्यांचे चलन– उदाहरणार्थ, सुरत व दिल्ली येथे वापरली जाणारी अनेक परिमाणांतील नाणी– यांचे स्पष्टीकरण केलेले आहे. दुसऱ्या प्रकरणात मराठा देशात वापरल्या जाणाऱ्या वजनमापांविषयी चर्चा केलेली आहे. वजने आणि मापे यांच्याविषयी नेमकी माहिती देऊ शकत नसल्यामुळे ही कैफियत तशी कमी महत्त्वाचीच मानायला हवी. शिवाय पृष्ठेही व्यवस्थित रचलेली नाहीत.

**प्रारंभ :** पृ. क्रमांक ५३.

x x x नागे जिन्नस चीटी x x x बाबत x x x नाणा १ सी ७७– धान दाणा २ सी गहु २११ x x x दोनी गुल गंजी या x x x ७ ॥= मुग ४ तुक होन १ हे च्यारी.

**शेवट :** x x x ह्या आयस एकेरीस सेकडा ३८ तीनी x x x उणे होन x x x स व फरगी होन ९०० स शेंभरीस सेंकडा पांच होन उणे आहे.

### डी. नंबर ११०

**नानासाहेब कैफियत**
**NĀNĀ SĀHIB KAIFIYAT**

**कागद :** १४" x ८". २९ ओळी. मोडी. चांगली स्थिती. जुने.

डी. नंबर ३७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. ६९१ वर सुरू होत असून तीत ३६ पृष्ठे आहेत. मूळ मराठा दप्तरावरून ही कैफियत नकललेली असल्याचे प्रारंभीच्या प्रास्ताविकात लिहिलेले आहे. (बखर क्र. ९२०- countermarked.....)

हा दस्तऐवज सविस्तर स्वरूपात मराठ्यांच्या इतिहासाशी– विशेषतः नानासाहेब, विश्वासराव आणि त्यांच्यासारख्या इतर महत्त्वाच्या व्यक्ती यांच्या जीवनचरित्राशी–संबंधित आहेत. (कुण्या) आबाजी साहेबांनी आपल्या वंशाच्या भूतकालीन इतिहासाबद्दल पृच्छा केली आणि लेखकाने त्याचे निवेदन केले, असे प्रारंभी सांगितले आहे. मराठा वीरांबद्दल जे जे ठाऊक होते ते अनेकांनी सांगितले आणि तो मजकूर देशी कागदाच्या सुरळीवर लिहून ठेवला असे म्हटले आहे. या कैफियतीत दोन तारखांचा उल्लेख केलेला आहे. पहिली तारीख आहे मूळ दस्तऐवज तयार केल्याची (सप्टें. १३ पौर्णिमा) माघ मासाची आणि दुसरी त्याची नक्कल केल्याची माघ-१, रौद्री नाम संवत्सर अशी. नाना फडणवीसाच्या मालकीच्या संग्रहातील एक म्हणजे मूळ हस्तलिखित असे सांगितले आहे. या कैफियतीत अनेक शब्द चुकीचे लिहिलेले असून, अनेक पृष्ठांवर रिकाम्या जागा सोडलेल्या दिसतात. 'रंगाप्पा' या शब्दाने ही कैफियत संपते. त्यावरून असा कयास करता येतो की, प्रस्तुत हस्तलिखित मिळविण्यासाठी या रंगाप्पाची योजना केलेली असावी.

नानासाहेबांचा इतिहास आणि त्यांना महत्त्व प्राप्त झाले ती परिस्थिती यांचे वर्णन पहिल्या दहा पृष्ठांत आलेले आहे. पुढच्या दहा पृष्ठांत दिल्लीचा मोगल सम्राट आणि कर्नाटक व हैदराबाद येथील नबाब यांच्या स्थितीचे वर्णन आलेले आहे. लढलेली युद्धे आणि राज्यविस्ताराबाबतचे पेशव्यांचे धोरण– विशेषतः बाळाजी बाजीराव व रघुनाथराव यांच्या काळातील– याविषयी निवेदन केलेले आहे.

सवाई माधवराव, इंदूराव घोरपडे, महादजी शिंदे, मुधोजी भोसले आणि ज्यांच्या नावांची इथे नोंद केलेली आहे असे अनेक नामवंत यांनी बजाविलेल्या मुत्सद्देगिरीच्या भूमिकेचे या कैफियतीत नंतर वर्णन आलेले आहे.

पेशव्यांचे पदारोहण व मृत्यू यांच्या आणि इतिहास दृष्ट्या विशेष महत्वाच्या प्रसंगांच्या तारखा शालिवाहन शकाच्या कालगणनेत दिलेल्या आहेत.

हा दस्तऐवज ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा मानता येईल आणि त्याचा सूक्ष्म अभ्यास मराठा दरबार व संघराज्य यांचा वैभवकाल दर्शविणाऱ्या काही गोष्टींवर प्रकाश टाकू शकेल.

मेजर मॅकेंझी याच्यासाठी खास विनंतीवरून हा दस्तऐवज नकललेला असल्याचे शेवटी लिहिलेले आहे.

**प्रारंभ :** श्रीनीवास प्रसन्न. श्रीमंत माहाराज श्री सवाई मांदवराव यानी आपले फडनीस चीटनीस व मंत्री आदी करून बोलन x x x पाच साहा वरुषा पुढीलेकी.

**शेवट :** x x x चिंतामण पंवार पुनेत नींवास दोघे जाऊन्न लीहुन घेऊन्न अले होते. ते बखर ते बखर भिमराव राणोनाहनी लिहुन फिरंगी सरदार हजरत मेजर मकंनजी साहेबास दिलहते दवस रउद्री नाम संवछर माघमास कृष्ण पक्ष १ दिवसी नकल उतरविलें.

### डी. नंबर १११

**नाना फडणविस यांचे पत्रे**
**NĀNĀ PHĀDNVIS YĀNCHI PATTRĀS**

**कागद :** १७" x ८". २३ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

चंद्रगिरीच्या यादव राजांचा वृत्तांत ६५७ ते ६९८ या प्रस्तुत भागातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. ६६५ वर सुरू होत असून ती फूल्सकॅप आकाराच्या कागदावर लिहिलेली आहे. देशी कागदाच्या एका सुरळीवर लिहिलेल्या मूळ कागदाची ही नक्कल असल्याचे सांगितले आहे. नाना फडणवीस याच्या राज्यकारभाराच्या इतिहासाशी ही संबंधित असल्याचे आणि शीर्षक, विशिष्ट खूण वा क्रमांक नसलेली ही कैफियत एका जुन्या देशी कागदाच्या सुरळीतील हस्तलिखितावरून घेतलेली असल्याचे प्रारंभी इंग्रजीत लिहिलेल्या टिपेत सांगितले आहे. कनिष्ठ अधिकाऱ्यांना दिलेल्या काही आज्ञांचाही यात निर्देश आहे. प्रारंभीच्या लांबलचक अभिवादनाच्या मजकुराने काहींची सुरुवात झालेली आहे. आणि काहींमध्ये रघुनाथराव पेशवे व निझाम यांच्यातील युद्धांची मोठी वर्णने आलेली आहेत. सर्वच पृष्ठांवर काही कोऱ्या सोडलेल्या जागा आहेत आणि त्यावरून असे समजायला हरकत नाही की, मूळ दस्तऐवजातच काही शब्दांचे लेखन झालेले नाही.

नाना फडणवीस आणि विश्वासराव यांचे व्यक्तित्व व

कारभारकौशल्य यांच्याशी शेवटचा भाग निगडित आहे. काही विश्वासू मित्रांच्या सैन्यप्रमुख व मुलकी अधिकारी म्हणून नेमणुका केल्याच्या घटना यात सापडतात.

कर्नल मॅकेंझी याच्या सेवेत असलेल्या रंगाप्पा नावाच्या कारकुनाने मुळावरून ही पत्रे नकललेली आहेत.

**प्रारंभ :** श्रीनिवास प्रस्न. श्रीमद माहाराजे श्री सवाई मादव राव यानी आपले फडनीसी, चिटणीस व मंत्रि आदीं करोन नमोले.

**शेवट :** सरदार हजरत मेजर मेकंजी साहेबास दिलह ते दीवस रुद्री नामस्वछर माघमास कृष्णपक्ष १ दिवसी नकल उतरविले.

## डी. नंबर ११२

**नायक राजांची कैफियत**

**NAYAK RĀJĀNCI KAIFIYAT**

**कागद :** ९$\frac{१}{२}$" x ५$\frac{१}{४}$". १६ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. २० वर सुरू होत असून, ती फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली आहे. ती बेंगळूर इलाख्यातील जहागिरी किंवा पालिपत यांच्या उभारणीसंबंधीचा तपशील सांगते. कांचीपुरम येथील रहिवासी असलेले थोरला (senior) वीर गौंडा व त्याचे सहा भाऊ उत्तरेकडे स्थलांतरित झाले आणि बेंगळूर इलाख्यात पाळेगार म्हणून वसाहती करून राहिले, अशीही माहिती त्यात आहे.

दुसऱ्या भागात एलाथम् येथील शालिवाहन शके १३८०-मधील वीर गौंडा याचा इतिहास आलेला आहे.

तिसरा भाग बेंगळूरचे मूळ आणि वीर गौंडा याने त्याचा कब्जा कसा केला याच्याशी संबंधित आहे. इन्नाप्पा गौंडा हा बेंगळूरचा मूळ संस्थापक म्हटला जातो. तो वीरप्पाकडून पराभूत झाला. काही मंदिरांची बांधकामे आणि अनेक संस्था व व्यक्ती यांना त्याने मोठ्या प्रमाणात केलेले जमीन वगैरे स्वरूपातील स्थावर दान यांचा उल्लेख केला आहे.

रणजुलूखान याच्या नेतृत्वाखाली मोगलांनी बेंगळूरवर हल्ला केला. मुथूकप्पा गौंडापर्यंतच्या वीराप्पा गौंडाच्या वंशजांच्या नावांचा उल्लेख यात केलेला आहे. हैदर अलीखान याचा हल्ला, म्हैसूर व श्रीरंगपट्टण यांचा कब्जा आणि त्याने आपल्या आधिपत्याखाली बेंगळूर कसे आणले या सर्वांचा मोठा रेखीव वृत्तांत यात वर्णिलेला आहे.

लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचा यात निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ :** श्रीरामा– मादस्त येलंदनाड प्रभु वंशावलीच तपसील. कंचिहून आलते भंडी सातासी तपशील– अंकुस गिरी पाळागार मास्ती मदे राहिल २ पुंगुनुर पाळे सुगुटुर मदे राहिले वळापुर पाळेगार हावती मधे राहिले.

**शेवट :** एक हजार तीनीसेहे संवछर लगाईत राजेपण केले ते संवछर २९० x x x सवस्थान जाऊन कीलक लगाईत आखेर विरोदी कृते संवछरास ६३ संवछर जाहल एकुन संवछर ३३३.

## डी. नंबर ११३

**नारायण राय व स्वामीमाहात्म्य**

**NĀRĀYANA RAI VA SWĀMI MAHATMYA**

**कागद :** ६" x ५". ६ ओळी. मोडी. जुने. खराब अवस्था. पूर्ण.

या भागातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :

१. स्वर्णमुखी माहात्म्य

२. या रचनेचे शीर्षक गळलेले आहे.

या भागाच्या पहिल्या पृष्ठावर प्रस्तुत कैफियत सुरू होते. ती चतकोर आकाराच्या पातळ कागदावर लिहिलेली आहे.

नारायणपुरीची स्थापना, श्री गोविंदराज स्वामींच्या प्रतिमेचा शोध आणि रामराज घराण्याचा संक्षिप्त इतिहास यांच्याशी प्रस्तुत कैफियत संबंधित आहे. कुलोतुंग आणि करिकल यांची जीवनचरित्रे थोडक्यात सांगितलेली आहेत. कुलोतुंगाने शेषाचलम् येथे तपश्चर्या केली आणि त्याला पुत्राच्या रूपाने ईश्वरी आशीर्वाद कसा प्राप्त झाला याची कहाणी कैफियतीत नंतर येते. या मुलाला चक्रवर्ती असे नाव देण्यात आले. यानेच तिरुपती येथील श्री गोविंदराज स्वामी मंदिर बांधले, असेही यावरून कळते.

नारायण राजापर्यंतची चोळ राजांची वंशावळ आणि तिरुपती टेकड्यांच्या अंर्तभागात नारायणपुरीची उभारणी यांविषयी काही पृष्ठांत मजकूर आलेला आहे.

नारायण राजा, अक्कण्णा राजा आणि मित्रवर्मा यांची अगदी थोडक्यात चरित्रे सांगितली आहेत.

तिरुपती टेकड्यांत राहणाऱ्या एका आदिवासी रानटी मनुष्याकडून नारायणपुरीचा शेवटचा राजा वेंकटराज कोणत्या परिस्थितीत पराभूत झाला याच्याशी शेवटचा भाग निगडित आहे. त्या रानटी आदिवाशाचे नाव दिलेले नाही. शेवटी रामराज घराण्यातील राजांच्या नावांची एक मोठी यादी दिलेली आहे.

या दस्तऐवजात ना नक्कलकाराचे नाव, ना कोणती तारीख, ना माहितीचे मूळ.

**प्रारंभ :** श्री माहा विष्टणु नाभा कमलांतुन उद्भविले ब्रह्मदेव त्याचे मनाकडुन xxx रुषी उत्पते जाहलें. त्याचें लेंक कषपरुषी त्याची श्री अदीती देवीस विवस्वान म्हणुन सुर्ये उबजला.

**शेवट :** त्यांचे संबंध केले. त्याप्रमाण xxxx व श्री कलयाण वेंकषस्वामीचे xxx वौंशाचा राजाचे वृतांत कितेक दाखल अस. वेंकटाचल माहात्म्यांत नारायण xx श्री स्वामीचे माहात्म्य दाहा अध्याये असे श्री कृष्णार्पणमस्तु.

## डी. नंबर ११४

**पंचवटी कैफियत**
**PAṄCAVATI KAIFIYAT**

**कागद :** ८" x ६ $\frac{१}{२}$". १२ ओळी. मोडी. जुने. खराब स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ६६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत चतकोर आकाराच्या पातळ कागदावर लिहिलेली असून ती पृ. १३२ वर सुरू होते. 'पंचवटी कैफियत' असे जरी या कैफियतीचे शीर्षक असले, तरी तीत नाशिक व त्रिंबकेश्वर यांचे स्थानीय इतिहास, मोडी लिपीचा जनक हेमाडपंत याचे चरित्र, गंगा व गोदावरी यांचे मूळ आणि त्यांच्या जलप्रवाहांनी घेतलेल्या दिशा असे तपशील स्पष्ट केलेले आहेत.

गंगा व गोदावरी यांच्या एका तीरावर हेमाडपंताने घाट बांधण्याचा प्रयत्न केला असे सांगितले जाते. त्याने जवळजवळ तीन मैलांचे घाट बांधले; पण त्यासंबंधी काही पुरावे वा तारखा दिलेल्या नाहीत.

या हेमाडपंताने बंदराच्या संरक्षणासाठी आणि तेथील रहिवाशांच्या सोयीसुविधांसाठी बऱ्याच सुधारणा केल्या असे सांगितले जाते. तो स्वतः एक प्रसिद्ध वैद्य होता असेही म्हटले जाते. लेखकाचे नाव, उल्लेख केलेल्या घटनाप्रसंगांच्या तारखा किंवा यातील माहितीचे मूळ यांची माहिती न देता प्रस्तुत कैफियत संपते.

**प्रारंभ :** नासीक व त्रियेंबक व पंचवटी कैफियत. नासीकेस पश्चमेस दाहा कोसावरी त्रियेंबक आहे गंगा गोदावरीची उत्पते त्रियेंबकाचे पर्वताचे टाई सिस्वरापासुन उत्पते. यासी कारण कोतम.

**शेवट :** xxx रामराजा हेमाडपंत यानी बहुत दिवस राज्य देवगीरीस राहुन केले देवगीरीच रचना हेमाडपंतापासुनच जाली, पुर्वी पर्वत मात्र होता. याप्रमाणे देवगीरीचा कथा पुर्वापासुन सांगातली. असे ये थोर देवगीरीचे बखर.

## डी. नंबर ११५

**पंचवटी कैफियत**
**PAṄCVATI KAIFIYAT**

**कागद :** ८" x ६ $\frac{१}{२}$". १४ ओळी. मोडी. जुने. खराब स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ६६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पातळ कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. ११० वर सुरू होते. बाबूजी उमाजी याने उत्तरादाखल गणेश राव याला लिहिलेल्या मूळ पत्राची ही नक्कल आहे असे दिसते. या पत्रात रामराजाचा इतिहास आणि देवगिरी राज्याच्या स्थापनेचे मूळ यांचे स्पष्टीकरण आहे. या पत्रावर लेखकाची सही किंवा पत्रलेखनाची तारीख लिहिलेली नाही. पृष्ठे सुद्धा योग्य तऱ्हेने रचलेली नाहीत.

ही कैफियत फक्त देवगिरीचा इतिहासच सांगत नाही, तर ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या व्यक्तींविषयीचे तपशील, पवित्र अशी तीर्थस्थाने आणि उत्तर हिंदुस्थानातील काही नद्यांचे तीर्थसदृश पवित्र पाणी यांसंबंधीही माहिती देते.

दुसऱ्या भागात देवगिरीच्या किल्ल्याचे बांधकाम आणि राज्याचा मंत्री म्हणून हेमाडपंताची नेमणूक याबद्दलचा मजकूर येतो. जूनथ (joonath) राज्य आणि तेथील राजे यांचा इतिहासही यात थोडक्यात सांगितलेला आहे. नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि पंचवटी येथे राज्य केलेल्या राजांची नामावळीही दिलेली आहे. मराठी राजांची नामावळी आणि मल्हारराव होळकर, पवार, त्र्यंबकराव, देवराव पिंगळे, रघुनाथ भट्ट, गोपिकाबाई, नारो शंकर आणि अहिल्याबाई यांसारख्या अधिकारी व्यक्ती आणि मंदिरे, मठ व धर्मशाळा यांची बांधकामे व सुधारणा करून त्यांनी यात्रेकरूंसाठी केलेल्या सुविधा यांचे अतिशय संक्षिप्त वर्णन केलेले आहे.

नक्कलकाराचे नाव, मूळ लेखनाची किंवा नकलेची तारीख, मूळ दस्तऐवज ज्याच्याजवळ आहे त्या व्यक्तीचे नाव वा पत्ता ही प्रस्तुत कैफियतीत दिलेली नाहीत.

**प्रारंभ :** श्रीराम– देवगिरी रामराजाची बखर– श्रीमंत माहाराज राजमान्य राजश्री गणेशरावजी स्वामीचे सेवेसी–

आज्ञादारक बाबुजी चेरणावर मस्तक टेवुन सीर साष्टांग नमस्कार विज्ञानपना की स्वामीणी आज्ञा केला की पुर्वी रामराजा देवगिरीस कैसा जाला त्याची हाकिगत मुफसल जाहिर करणे. त्याजवरुन हे निवेदण केली आहे.

**शेवट :** नासीक दरवाजेच तपसील. पुर्वेस नवे दरवाजा १- पश्चमेस असराचे दरवाजा १- उत्तरेस दिल्ली दरवाजा १- दक्षणेस भगोली दरवाजा १. त्रियेंबक दरवाजा १ लगर.

## डी. नंबर ११६

**पंदनलूर किला कैफियत**
**PANDANALLUR KILLĀ KAIFIYAT**

**कागद :** ७" x ५". १४ ओळी. मोडी. खराब स्थिती. पूर्ण.

डी. नंबर १७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. ८९ वर सुरू होत असून ती चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली आहे. तिची बांधणी सैल झालेली असून पानेही व्यवस्थित रचलेली नाहीत.

पंडनल्लूर आणि कदलंगुडी या दोन पाळेगारांचे मूळ व इतिहास यांच्याशी हे हस्तलिखित निगडित आहे.

तंजावर, त्रिचनापल्ली व मदुरा येथील राजा तिरुमलाई नाईक याच्या सेवेत कुमारगिरी नावाचा एक विश्वासू व शूर सेवक होता. या कुमारगिरीने वोडिअरपलायम् येथील जुलमी पाळेगार शिवाप्पा याचा पराभव करून त्यास नेस्तनाबूत केले. वोडिअरपलायमच्या या पाळेगारास नेस्तनाबूत करताना कुमारगिरीने दाखविलेल्या वीरोचित व अभिनंदनीय सेवेबद्दलची कृतज्ञता म्हणून तिरुमल नाइकाने त्यास काही खेडी बक्षीस म्हणून दिली. त्याने कुमारगिरीस तिथे किल्ला बांधण्यास, स्वतःचे सैन्य ठेवण्यास आणि जरुरीच्या वेळी मदतीस येण्यास विनंती केली. कुमारगिरीने बांधलेल्या किल्ल्यास पंडनल्लूर किल्ला म्हटले जाऊ लागले आणि तो त्या किल्ल्याचा पाळेगार झाला. या कदलंगुडीच्या पाळेगारास खूप मोठे गुप्त धन लाभले. त्याने मोठी रक्कम, मंदिरे व धर्मशाळा यांच्या बांधणीवर व सुधारणांवर खर्च केली, असे प्रस्तुत निवेदनाच्या शेवटी सांगितले आहे.

मंदिरे, जलाशय इत्यादींची नावे व संख्या सांगणारा पंडनल्लूरचा एक छोटासा भौगोलिक आढावा कैफियतीच्या शेवटच्या पानावर आढळतो. हा किल्ला हैदरने पाडून टाकला. नक्कलकाराचे नाव, तारीख किंवा यातील माहितीचे मूळ यांचा निर्देश नाही.

**प्रारंभ :** शालिवाहन शके १४०० नंतर तिरुमले नायेक म्हणार एक राजा तंज्याउर तिरुचेनापळी मधरे हे तीने संस्तान हि दौलत करीत असतां xxx

**शेवट :** ४ त्यास दक्षेण एक माहल आहे ५ त्यास दक्षेण एक लाहण माहल आहे. ६ त्यास पछमेस एक कुंट आहे ह नव्हता या किल्ल्यामधे दोनासहे नारळीच झाड अहेत.

## डी. नंबर ११७

**पंदनलूर किला माघणम कैफियत**
**PANDANALLUR KILLĀ MĀHĀNAM KAIFIYAT**

**कागद :** xxx १५ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर १६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

हे निवेदन पृ. ५० वर सुरू होत असून ते निळ्या रंगाच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेले आहे. हस्ताक्षर चांगले आणि वाच्य आहे. वर्ण्य विषय तोच ठेवून शब्दयोजनेत थोडासा फरक असलेले हे निवेदन आधीच्या निवेदनाचीच नक्कल आहे असे दिसते. डी. नंबर ११६ प्रमाणेच यातील प्रारंभ व शेवट आहेत.

## डी. नंबर ११८

**प्रसन्न प्रभुची बखर**
**PRASANNA PRABHUCI BAKHER**

**कागद :** १३" x १६ $\frac{१}{४}$" ओळी. मोडी. चांगली स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील रचना आहेत.

या भागाच्या पृ. ४५० वर हे लेखन दिसत असून त्याचा प्रारंभ गहाळ झालेला आहे. एका मोठ्या भागातील हा एक त्यापासून सुटलेला विभाग असावा असे दिसते. पहिल्या पृष्ठावर पान क्रमांक ६३ असे लिहिलेले आहे. प्रस्तुत कैफियत पुरी होण्याच्या दृष्टीने पहिली ६२ पृष्ठे आवश्यक आहेत, असे यावरून समजता येईल. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून निळ्या रंगाच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर याचे लेखन झालेले आहे. बांधणी सैल आहे. कथांमध्ये अप्रत्यक्षपणे ध्वनित केलेल्या सर्व प्राण्यांना नावे दिलेली आहेत. या कैफियतीचे सार सदुपदेश व चांगल्या मित्रांची निवड यांवर भर देणारे असून,

व्राईट संगतीचे दुष्परिणामही सांगितले आहेत. सांगितलेल्या सर्व कथा या बोधाची उदाहरणे आहेत.

अहमदनगर येथील भवानजी याच्याजवळ असलेल्या मूळ दस्तऐवजावरून प्रस्तुत कैफियत नकलली असल्याचे आणि ती २३ डिसेंबर १८०५ रोजी कर्नल मॅकेंझी याच्या खास आज्ञेवरून नकलल्याचे सांगितले आहे.

**प्रारंभ :** xxx नमस्कार करुन सांगता जाहालां की स्वामी आपल पुत्र बाहार xxx (नाव शत्रुण) मारुन नेल ऐस सांगता च कागं राजा श्रमी होऊन चिंतक्रांत बसतां जाहाला.

**शेवट :** xxx ऐसे बोळुन ब्रह्मण स्वस्तानासी गेला. ऐसे ते राजाचे सुसभाब कथा बखर लेखेनी केली असें कोणि हा पोता वाचतील लिहीतील तरी त्यास सर्व कार्ये सिधी होईल. कृष्णार्पणमस्तु. हे बखर भवांजी याजकडे होतीती नकल लिहीवीला असें साकीन अहमदनगर बिकलमं ईलाके मेजर मेकेंजी साहेब बा तारीख छहर माहे डिशंबर सन १८०५ ईसवींत जागा अहमदनगर.

## डी. नंबर ११९

### प्रसन्न प्रभुची बखर
### PRASANNNA PRABHUCI BAKHER

**कागद :** १३" x १६ $\frac{१}{४}$". १५ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ.४७६ वर हे अपूर्ण निवेदन दिसते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून, फूल्सकॅप आकाराच्या निळ्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर ते लिहिलेले आहे. लेखकाचे किंवा नक्कलकाराचे नाव आणि माहितीचे मूळ दिलेले नाही. मूळ दस्तऐवजाची तारीख किंवा नक्कल केल्याची तारीख दिलेली नाही. या निवेदनात दोन विषय येतात. विश्व नावाच्या आपल्या ब्राह्मण मंत्र्याच्या देखरेखीखाली प्रगत राजाने आपले पुत्र कसे सोपविले हे सांगणारा पहिला विषय दिसतो. गणेश देवाला वाहिलेल्या विशिष्ट गवतातील दूर्वांतील– अतिमानवीय व अद्भुत शक्तीमुळे एक मृत माणूस कसा जिवंत झाला याचा वृत्तांत दुसऱ्यात येतो. हे दोन्ही विषय इतिहास दृष्ट्या कमी महत्त्वाचे म्हणता येतील.

**प्रारंभ :** श्री गजानन प्रसन्न प्रसन्नप्रभुची बखर– कोणे एकें दिवसी प्रगट नामक नगरांत प्रभु राजा राज्यें करीत होता. त्यास बहुत कालि दोनी पुत्र जाहले.

**शेवट :** xxx ऐसे सांगुन आपल पक्षी घेउन कागा माष दावता जाहला. ते काग भयभीत होऊन आपले स्तलास जात जाहाला. तेव्हा आपल स्तली एऊन आपल समुदाये पाहतां त्यांत आपलें दोन पुत्रहि दिसनास जाहलें मग आपल दयास पुसता जाहला की माझे पुत्र आजही दिसत नाहित ऐसे समुदायास सांगताती xxxx.

## डी. नंबर १२०

### पाट्टणा व गुजरात कैफियत
### PATNA VA GUZRAT KAIFIYAT

**कागद :** ७" x ५". ११ ओळी. मोडी. खराब अवस्था. जुने. अपूर्ण.

डी. नंबर २० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. १५२ वर येत असून ती पातळ देशी कागदावर लिहिलेली आहे. हा सर्व भाग चतकोर आकाराच्या कागदाचा व अर्धवट बांधणीचा आहे. कैफियतीची पहिली २२ पाने गहाळ झालेली आहेत.

पट्टण व गुजरात यांच्या संस्थापकांचा शालिवाहन शक ५१५ पासून अरब, मोगल व शेवटी पेशवे यांच्याकडून जिंकले जाण्यापर्यंतचा वृत्तान्त चांगला तपशीलवार दिलेला आहे. तो देताना महत्त्वाच्या ऐतिहासिक प्रसंगांच्या तारखाही दिलेल्या आहेत. मूळ संस्थापक देवऋषी याच्यापासून शेवटच्या राजापर्यंत सर्वांची नावे आणि राज्यकारभाराचा काळ दिलेला आहे. काही जैन व बुद्ध कवींची नावे दिलेली असून पुढे जयसिंग राजाच्या काळात त्याला गुजरातमध्ये कसे सर्वोच्च स्थान प्राप्त झाले हे व्यवस्थितपणे मांडलेले आहे. राजा जयसिंग आणि त्याचा जावई वीरसेन यांच्या काळाला मोठे महत्त्व दिले गेलेले आहे. गुजरात व पट्टण येथील दरबारातील अनेक कटकारस्थाने आणि त्यामुळे राजे कसे सामर्थ्यहीन बनत गेले याचे अगदी रेखीव वर्णन केलेले आहे. राजा जयसिंग याने सभोवतालच्या शहरांचे सामिलीकरण केल्यावेळची परिस्थिती आणि कमी महत्त्वाच्या आख्यायिका किंवा दंतकथा कैफियतीच्या शेवटच्या काही पृष्ठांत सापडतात.

अरेबियाहून अहमद-उ-जंग याच्या नेतृत्वाखाली अरबांनी चढाई केली आणि देश जिंकला, असे या कैफियतीचा शेवटचा भाग सांगतो. हिंदूंनी केलेल्या प्रखर विरोधामुळे पट्टण व गुजरात पुन्हा ताब्यात घेण्याचे काम सुलतान-अजमद-जहा या वारसदारावर सोपवून अरबांना माघार घ्यावी लागली. शेवटी

बाजीराव पेशवा याने ही दोन्ही ठिकाणे जिंकली. मुळात गुजराती लिपीत लिहिलेले हे हस्तलिखित जैन कोशलेन (Koshalen)–वर्जेद्र जैन याच्या ताब्यात होते आणि मेजर मॅकेंझी याने खास इच्छा प्रकट केल्यामुळे ते मोडी लिपीत अप्पादी मेसूर याने मुलतान (Mula Multan– की मुळामुठा ?) येथे तारीख २४ जुलै १८०६ रोजी नकलले असे सांगितले आहे.

**प्रारंभ :** (दुसरी ओळ) समजाविसी प्राणास अपाये नाहिसे करुन राज्यासी आणिलें राजा हे वर्तमान ऐकुन बहुत संतोश होउन गणशा xxx म म्हणाला की.

**शेवट :** सन १८०६ इसवीक श्रावण सुत्ध ७ गुरुवार जयनाम संवछर शके शालिवाहन १७२८ दर जाग मुलनी मुलाटा नदी सगेम बोट मुतसांक्र बारुलहार बापु नकल मीशुद.

## डी. नंबर १२१

**पानिपत युद्ध (आणि नारायणराव) (थोराले माधवराव आणि नारायणराव)**
**PĀNIPAT ŪDD (THORLE MĀDHAV RAO AND NARAYAN RAO)**

**कागद :** १०" x ६". १५ ओळी. मोडी. खराब अवस्था. जुने. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ५३४ वर ही कैफियत सुरू होते. ती फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश कागदावर लिहिलेली आहे. कागद अगदीच जीर्ण व रंगाने तपकिरी झालेले आहेत. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे. मराठा आणि इंग्रज यांच्यात पानिपत येथे लढल्या गेलेल्या युद्धातील प्रसंगांचे वर्णन यात आलेले आहे.

सदाशिवराव भाऊ व विश्वासराव यांच्या युद्धातील भूमिका आणि सैन्याच्या हालचाली यांबाबत पेशव्यांकडून आलेल्या सूचना यांची माहिती दिलेली आहे.

युद्धाचा निकाल सांगितलेला नाही. त्रिंबकपंत आणि सखारामराव यांनी मोठे सैन्य जमवून कर्नाटकावर चढाई केली या निवेदनाशी बखर संपते. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचा उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ :** विस्वास राव भाउच कैफियत.

विस्वास रावजीनी आपल मुलकास व वाड्यासी रखवली टेउन चकोट माणुसास नेमुन बंदोबस्त करुन तमाम जुन उमराव लोकास बोलाउन कुल फौजचे हाजरी वसुल घेउन हुकुमाप्रमाणे मोहिमीस निघुन बंकापुरास गेले xxx.

**शेवट :** राजेश्री त्रायंबकराव काका व सखारामहरी वगैरे फौज जमा करुन कर्नाटिक प्रांती गेल त्याची तपसील सदर लिहील प्रो आसे हिंदुवी चुटत याने पिंड कुलयांत लिहिल तीतक लिहिणे जाहले.

## डी. नंबर १२२

**पाणिपत बखर**
**PĀNIPAT BAKHER**

**कागद :** १२" x ८". २० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत फूल्सकॅप आकाराच्या तपकिरी देशी कागदावर लिहिलेली असून ती पृ. १६८ वर सुरू होते. या सर्वच भागाची दुरुस्ती करून फेरबांधणी केलेली आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे. इंदूराव घोरपडे याला रघुनाथराव, जाधवराव चित्रगुप्त यांनी लिहिलेल्या पत्राच्या रूपातच हे सर्व निवेदन आहे. या पत्रात मराठे व अबदाली यांच्यात झालेली युद्धे व वेढे यांचा वृत्तान्त आहे. हे युद्ध मोहर्रमच्या २५ तारखेस झाले असे सांगितले आहे. वर्षाचा मात्र निर्देश नाही. मुसलमान सैन्याचे नेतृत्व करणाऱ्या इनायतुल्लाखान, नझरजंग, हैदर अलीखान आणि इतर यांच्या विरोधात मराठा सैन्याचे नेतृत्व करणाऱ्या सदाशिवराव भाऊ, विश्वासराव, नानासाहेब, मल्हारराव होळकर या सेनापतींची नावे दिलेली आहेत. ही लढाई दिल्ली येथे सुरू झाल्याचे सांगितले आहे. आपल्या प्राणांची किंमत देऊन विश्वासराव व सदाशिवराव भाऊ यांनी अबदालीचा पराभव करण्यात जी वीरोचित भूमिका बजावली त्याचे अत्यंत रेखीव वर्णन यात आलेले आहे. प्रत्यक्ष युद्धात दोन्ही बाजूंकडील जे योद्धे मरण पावले त्यांच्या नावांची यादी दिलेली आहे.

**प्रारंभ :** श्री मद्रमारमणचेरण परिचरण परायेण अतःकरण शौर्योदाये गांभीयादयेनेक गुण मणि गणनीर्कतन समस्त सामतां मुकुटमणी खचित निराजित चरण लीन गोद्विजे येंसंरक्षेण.

**शेवट :** साहेबचे सेवसा श्रुत होव वरकड सर्वत्रास कळावयास्तव कळलतो लिहील असें. यापेक्षा विशेषात्कयुधृ. जाहल तो तपसीली लिहिता पुरवना किंचित किंचित संक्षेपीन लिहिल त्या त्याचा विस्तार वाटला बहुतच पसरली जाहली या श्रवण करणार च चित xxx पावत या साव यथा युक्त xxx फार विस्तार आणोन लिहिल अस. सेवेसी विहीत होमे हे विज्ञापना.

## डी. नंबर १२३

**पाळेगार सायर कावळी व मावली**
**PĀLEGĀR SĀIYER KĀVALI VA MĀVALI**

**कागद** : ११" x ३". ३२ ओळी. मोडी. खराब स्थिती. जुने. अपूर्ण.

या भागात असलेल्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :

इंद्र बृहस्पती कथा
सीतास्वयंवर
फेरिस्त देहेय जंबर तालुका
येदास्त देहेय झड तालुका, मदुरा
येदास्त लसेगांव कैफियत, देवस्थान अलगिरी
अश्वत्थ वृक्ष पूजा कथा
लसेगांव अलगिरी देवस्थान कैफियत
येदास्त मदुराई मीनाक्षी कैफियत (th-द)
येदास्त मदुराई मीनाक्षी कैफियत
येदास्त मदुराई देवालय पूजा
लसेगांव, तालुका-तिरुमंगलम्
यादव कैफियत
सुब्रह्मण्यस्वामी कथा
येदास्त कथा कैफियत
वेंकटरमण दीक्षित पत्र

या भागाच्या ३० व्या पृष्ठावर ती रचना दिसते. आडव्या कापलेल्या देशी हातकागदावर ती लिहिलेली आहे. इतर काही कैफियती अशाच आडव्या आकाराच्या डेमी कागदावर लिहिलेल्या आहेत. पृष्ठे सुट्या अवस्थेत आहेत. ही कैफियत अपूर्ण असून तीत सहा पृष्ठे आहेत. पहिले सोडून इतर सर्व पाने गहाळ झालेली आहेत. ती तिरुपती देवस्थानाच्या वरिष्ठ व कनिष्ठ अय्यंगारांना दिलेल्या देणग्यांचा उल्लेख करते. त्यांच्या ताब्यात असलेल्या खेड्यांची नावे, देवालयातील नेमून दिलेले काम पुरे करण्यासाठी ठेवलेल्या नोकरांची नावे व संख्या, देवालयातील त्यांचे हक्क व अधिकार सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने संबंधित असे दस्तऐवज याविषयीचा तपशील या कैफियतीत दिसून येतो. तिरुपती देवस्थानाशी निगडित अशा अनेक इनामदारांच्या नावांचा उल्लेख यात केलेला आहे. तिरुपतीच्या इनामदारांना शिफारसीसाठी वा संदर्भासाठी ईस्ट इंडिया कंपनीने दिलेला हा अप्रत्यक्ष करारनामा असेही म्हणता येईल. या रचनेवर फसली १२१७ अशी तारीख आहे.

**प्रारंभ** : फरीस्त देहत ईनामदार तालुके पाा तीरुपती सरकार कुंपनी सन १२१७ फसली– कुल देह व सायर कावली व कैरे x x x x दिलाहा ईनामदार व कैरे

**शेवट** : भावनाच्यारे यांसी देह

x x x x

मो सेदीपलेयं गाव मौजमे जरा देखील २

## डी. नंबर १२४

**पुणे कैफियत**
**POONE KAIFIYAT**

**कागद** : ६" x ४" १५ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

चतकोर आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत १३८ पृष्ठ क्रमांकावर या भागात सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पहिला भाग पुणे शहराचा इतिहास व पुण्याच्या उपनगरांचा इतिहास याच्याशी संबंधित आहे. येथील मंदिरे आणि महत्त्वाची ठिकाणे यांची नावे व मूळ यांसंबंधी थोडक्यात टिपा लिहून माहिती दिलेली आहे.

मलिकंबर याने पुणे येथे प्रवर्तित केलेली वजन-मापे आणि नंतर शिवाजीने व पेशव्यांनी त्यांच्या परिमाणात केलेले बदल यांविषयीचा वृत्तान्त दुसऱ्या भागात आलेला आहे.

मराठा अधिकारी आणि त्यांच्यावर सोपाविलेले काम या संदर्भात त्यांना दिले जाणारे किताब यांविषयी तिसऱ्या भागात वर्णन येते. काही महसूल अधिकाऱ्यांची नावे व त्यांची कामे आणि शेतसारा आकारणे व रयतेकडून तो जमा करणे यांबाबतची पद्धत हे सर्व सविस्तरपणे स्पष्ट केलेले आहे.

शिवाजीच्या काळात अधिकाऱ्यांना प्राप्त झालेली आडनावे आणि त्यांना दिले गेलेले किताब, तसेच पेशव्यांच्या काळात लाभलेल्या या गोष्टी आणि त्यामुळे त्यांना मराठा दरबारात लाभणारा सन्मान यांचे वर्णन चौथ्या भागात आलेले आहे.

ही कैफियत अपूर्ण असून लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ किंवा तारीख यांचा उल्लेख नाही.

**प्रारंभ** : पुणेत आहते पेटची तपसील साबक पुणे बस्ती होती मग शरफजी शाहजीचे दीवसांत आधीक बस्ती होत.

**शेवट** : एकादे मोहम लढाईची जाहल्यास साबक सर जमीदारा व प्रमाणे कित्तेक फौज सरंजामी तालुकेंत गड किलेय हती याजीस हेवुन वरकडे फौज घेउन हजर होतात....

### डी. नंबर १२५

**पुणे पेठ कैफियत**
**POONAPET KAIFIYAT**

**कागद :** ९" x ६". १६ ओळी. मोडी. जुने. खराब अवस्था. पूर्ण.

या भागात असणाऱ्या इतर रचना खालीलप्रमाणे :
शहाजी राजा कैफियत
शिवाजी संभाजी कैफियत
शिंदे कैफियत
होळकर कैफियत

ही कैफियत देशी कागदावर लिहिलेली असून ती पृ.४१ वर सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे.

पुणे शहराच्या वसाहतीकरणापासून वसईचा तह आणि दुसऱ्या बाजीरावाचे पेशवेपद इथपर्यंतचा तपशीलवार वृत्तान्त यात दिलेला आहे. भोसले, आंग्रे, शिंदे, होळकर, पेशवे इत्यादी प्रमुख मराठा कुटुंबांचे मूळ व त्यांच्या पूर्वजांचा इतिहास या कैफियतीत सांगितला आहे.

विजयनगर, पाच सुलतान, कर्नाटकचे नबाब, हैदर अलीखान आणि त्याचा मुलगा टिपू यांच्यावषयीची माहितीही दिलेली आहे.

शिवाजीने औरंगजेबाच्या विरोधात लढविलेल्या तटबंद्या व केलेल्या चढाया आणि त्यात मराठा सेनापतींनी बजाविलेली भूमिका यांचेही स्पष्टीकरण केलेले आहे.

शिंदे, आंग्रे, वसई, गूडार्डची शरणागती, बाळाजी बाजीराव-बाजीराव-नारायणराव व थोरले माधवराव यांच्या राज्यकारभाराचा काळ, नारायणरावाचा वध आणि अशाच इतिहास दृष्ट्या महत्त्वाच्या घटना मोठ्या विस्ताराने वर्णिलेल्या आहेत.

विवाह, जन्म, राज्याभिषेक, युद्धे, तह, माघार आणि मृत्यू अशा महत्त्वाच्या घटनांच्या तारखा शालिवाहन शकात दिलेल्या आहेत.

कैफियतीच्या लेखकाचे नाव किंवा कैफियतीतील माहितीचे मूळ दिलेले नाही. काही पृष्ठांवरील काही ओळी कोऱ्या ठेवलेल्या आहेत. तसेच पृष्ठे सुटी आहेत.

**प्रारंभ :** कैफियत पुणे पेट

पुर्वी द्वापरांती दंडकारण्य क्षेत्री गोदावीत्धी गंगा गौतम रुषी त्रीयेंबक स्थलीं प्रसन्न जेठाजुर्न माहाराष्ट्र देशी तेथुन साटी कोस भुमीवरी अलीकडे दक्षणेस आरण्य बहुत असतां आणी त्या आरण्यांत मुला १ मुठा १ दोनी नद्या होते.

**शेवट :** येकुन ८. शेनामर्त बालाजी नानायास सचीव पंताकड सिंव्ह गड व पुरंदर व पुणे सुभा व जुनारे सुभा व साहोत्रा कुल दिलहा. प्रधान पंताकड लोहगड व राज्याची वगैरे कीले.

### डी. नंबर १२६

**पुणे पेट कैफियत**
**POONAPET KAIFIYAT (A MEMORANDUM OF POONA)**

**कागद :** ७" x ६". १६ ओळी. मोडी. जुने व खराब स्थितीत. अपूर्ण.

या भागात असलेल्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
बाजीराव व त्रिंबकराव यांच्यातील युद्धाची घटना.
बाजीराव व नझरजंग यांच्यातील युद्धाची घटना.
विश्वासराव व सदाशिवराव भाऊ यांच्यातील युद्धाचा वृत्तान्त.
शिंदे यांच्याशी संबंधित कैफियत.
होळकर यांच्याशी संबंधित कैफियत.

पुणे शहर आणि तेथील राज्यकर्ते यांचे मूळ व इतिहास सांगणारी ही कैफियत पृ. ३ वर सुरू होत असून, देशी हातकागदावर ती लिहिलेली आहे. पहिल्या काही प्रकरणांतील हस्ताक्षर नंतरच्या पृष्ठांपेक्षा वेगळे आहे.

पुणे शहर व त्याची उपनगरे यांच्या प्रारंभीच्या उभारणीपासून दुसऱ्या बाजीरावाच्या मृत्यूपर्यंतचा वृत्तान्त या कैफियतीत दिलेला आहे. यातील निवेदन मुळालाच हात घालते आणि भोसले, आंग्रे, होळकर अशा महत्त्वाच्या मराठा घराण्यांच्या वाडवडिलांचा इतिहास थोडक्यात सांगते. ही कैफियत पेशव्यांबद्दल पुष्कळ माहिती देते आणि मराठा संघराज्य स्थापन करण्यातील त्यांची भूमिका स्पष्ट करते. विजयनगर, पाच सुलतान आणि कर्नाटकचे नबाब यांचा विस्ताराने आणि हैदर व टिपू सुलतान यांचा संक्षेपाने वृत्तान्तही दिलेला आहे.

मुक्तेश्वरची (संगमेश्वर?) लढाई, संभाजी राजाची कैद, त्याची पत्नी व बाल-पुत्र शान (शाहू?) यांची कैद, त्याची (संभाजीची) चौकशी व मृत्युदंड यांचे अतिशय रेखीव वर्णन यात केलेले आहे.

(मराठ्यांच्या) स्वातंत्र्ययुद्धात राजाराम, बाळाजी विश्वनाथ व खंडेराव दाभाडे यांनी बजावलेल्या भूमिका, जिंजीच्या किल्ल्यात

मराठ्यांनी घेतलेली माघार, राजाराम व त्याचे धनाजी जाधव-संताजी घोरपडे- मोरोपंत पिंगळे व त्यांचा कर्तृत्ववान पुत्र निळो मोरेश्वर पिंगळे इत्यादी विश्वासू सहकारी यांनी नव्याने केलेले प्रयत्न यांचे वर्णन केलेले आहे.

मराठ्यांचा राज्यकारभार– त्यातही विशेषत्वाने पेशव्यांचा कारभार– विस्ताराने स्पष्ट केलेला आहे.

विवाह, जन्म, राज्यारोहण, युद्धे, वेढे, माघारी, तह आणि मृत्यू यांसारख्या महत्त्वपूर्ण घटनांच्या तारखा शालिवाहन शकात दिलेल्या आहेत.

लेखकाचे नाव किंवा या कैफियतीतील माहितीचे मूळ उल्लेखिलेले नाही. रेघा मारलेली काही थोडी पृष्ठे तशीच मोकळी सोडलेली आहेत.

**प्रारंभ :** कैफियत पुणे पट.

पुर्वी द्वापरांता दंडकारण्ये क्षेत्री गोदावृत्थी गंगा गौतम रुषी त्रिबक स्थळी प्रसन्न xxx माहाराष्ट्र देशी तेथुन साटी कोंसा भुमुवरी आलिकडे दक्षणेस आरण्य बहूत असतां आणी त्या आरण्यात दोही नद्या होत्या xxx

**शेवट :** एक झोपडी नाहीसे राजीक दैवीक (क्षामा) यामुळे आनेक लोक मृत्यु होऊन गेले ईकडे श्रीमंत बाजीराव साहेब मुस्तकीम होऊन पुणेत राहीले. ते दीवसा पासुन आध्याप बाजीराव कायम आहे व अमृतराव इंदुस्थान प्रांती कासीतच आहे.

## डी. नंबर १२७

**पुणे पेट कैफियत**
**POONĀ PET KAIFIYAT**

**कागद :** १०" x ५". १५ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर १२५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही अपूर्ण कैफियत पृ. ३८ वर सुरू होत असून, ती फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली आहे. पुणे शहराची स्थानिक स्थिती व परिसर याबद्दलची धावती सलग माहिती या कैफियतीत आहे. उरलेली तीन पृष्ठे रेघा आखूनही कोरी सोडलेली आहेत. लक्षात घेता येईल असे यात अधिक काही नाही. ही अपूर्ण कैफियत असून लेखकाने ती अपुरी का ठेवली हे समजत नाही.

**प्रारंभ :** कैफियत पुणे पेटे.

पुर्वी द्वापरआंतीं दंडकारण्ये क्षेत्री गौतम रुषी त्रीयेबक स्थली प्रसन्न जणेकुट माहाराष्ट्र देसी तेथून साटी कोस भुमीवरी आलीकड दक्षणेस आरण्ये बहुत असतां आणी त्या आरण्येंत मुटा १ मुला १ दोनी नध्य xxxx.

**शेवट :** (अपूर्ण असल्याने मजकूर नाही.)

## डी. नंबर १२८

**पेरिया पटण कैफियत**
**PERIYĀPATNA KAIFIYAT**

**कागद :** ७" x ५". १५ ओळी. मोडी. जुने. खराब स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ३६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फाटलेल्या व अस्ताव्यस्त स्वरूपातील ही कैफियत पृ. ५३ वर सुरू होत असून ती जाड्याभरड्या देशी हातकागदावर लिहिलेली आहे. हस्ताक्षर वाच्य आहे. बांधणी सैल झालेली असून पाने व्यवस्थित रचलेली नाहीत.

म्हैसूरच्या राज्यकर्त्यांतील रायर घराणे, भोज राजासारखे मध्येच आलेले काही वंश, त्यानंतरचे थेट युधिष्ठिराच्या कालापर्यंतचे राजे असा म्हैसूरच्या कृष्णराज ओडियारच्या वंशावळीचा शोध हा प्रस्तुत कैफियतीचा विषय आहे.

पेरियापट्टणचे रहिवासी नारायण भट व कवी भट यांनी आधीच्या काही कागदपत्रांवरून प्रस्तुत हस्तलिखित नकलले असल्याचे सांगितले आहे. जरी या कैफियतीचे शीर्षक वर सांगितल्याप्रमाणे असले तरी ती पेरियापट्टणच्या इतिहासाबाबत काहीच सांगत नाही. फक्त म्हैसूरच्या रायरांचा इतिहास सांगते. या नकलेची तारीखही सांगितलेली आहे.

**प्रारंभ :** कैफियत पेरीया पटण लिहीलते साबक तारीख रक्ताक्षी संवछर मार्गसीष शुद्ध पंचमी ५ पुर्वी युगांतरी कैलास पर्वती पार्वती परमेश्वर विवाहा काली ब्रम्हा विष्णु महेश्वर xxxx कोटी देवता देव रुधा महारुषी ब्रह्म रुषी देखील एक काली कैलास पर्वती आले होतें.

**शेवट :** हा भाग अतिशय खराब स्थितीत असल्यामुळे त्यातील मजकूर लावता येत नाही.

## डी. नंबर १२९

**पेरीया पट्‍ण कैफियत**
**PERIYAPATNA KAIFIYAT**

**कागद :** १३" x ८". २८ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ३६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. ६७५ वर सुरू होते. याआधीच्या डी. नंबर १२८ चीच ही (कर्नल मॅकेंझीच्या आज्ञेवरून तयार केलेली (सुधारित) नक्कल आहे. नकलेच्या शेवटी नक्कलकाराच्या नावाचा उल्लेख आहे. जरी आधीच्या डी. नंबर १२८ चा व या कैफियतीचा विषय एकच असला तरी उल्लेखिलेले काही कालखंड मुळाशी जुळत नाहीत. चुकीचे शब्द आणि चुकीची विरामचिन्हयोजना सर्व नक्कलभर मोठ्या प्रमाणात दिसते. म्हैसूरचे मूळ व इतिहास आणि तोही रायर घराण्याचा हा प्रस्तुत कैफियतीचा आशय आहे. नक्कलकाराने काही जागा कोऱ्या ठेवल्या आहेत आणि मुळातील शब्द नीट लागत नाहीत असे त्याचे कारणही दिलेले आहे.

डी. नंबर १२८ प्रमाणेच या कैफियतीचा प्रारंभ व शेवट आहे. या कैफियतीत ७ पृष्ठे आहेत.

## डी. नंबर १३०

**पेशवे यांची कैफियत (व वंशावळी)**
**PESWĀ YŪÑCI KAIFIYAT (AND VAMŚAVALI)**

**कागद :** ७" x ४". २२ ओळी. मोडी. जुने. खराब स्थिती. पूर्ण.

चतकोर आकाराच्या इंग्लिश कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. १०२ वर सुरू होत असून तिची बांधणी सैल झालेली आहे.

या कैफियतीत दोन स्वतंत्र भाग आहेत. पहिला भाग भोसल्यांचे मूळ व इतिहास यांच्याशी संबंधित असून दुसऱ्यात मराठा गादीवर पेशव्यांचा उदय कसा झाला याचा वृत्तान्त आहे. शके १५०० ते १६२२ दरम्यानचा मराठ्यांचा इतिहास आणि पेशव्यांचा बाळाजी बाजीरावाच्या मृत्यूपर्यंतचा इतिहास कालक्रमानुसार वर्णिलेला आहे.

पृ. एस. नंबर १२३ पासून पेशव्यांचा इतिहास सुरू होतो. सर्व पेशवे आणि त्यांचे सेनापती यांचे थोडक्यात जीवन व कार्य स्पष्ट करण्यात आलेले आहे. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ किंवा नकलेची तारीख यांचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ :** भोसले यांची वंशावळी व पेशवे यांची शख संवछर सुधा गोषवारा पटी शालीवाहन शेख १५०० पंधरासे बहुधान्यो संवछरा पासुन.

**शेवट :** शाहु माहाराजास दत होउन राज्यावरी स्थापिले. श्रीमंत बाळाजी बाजी राव पंत प्रधान यानी. एणे प्रमाणे आठी xxx मराहाटे यांचे ष्थापना ते साल मजकरी टविले असे कळावे.

## डी. नंबर १३१

**पेशवे यांची वंशावळी**
**PESWA YANCHI VAMŚAVALI**

**पेपर :** ७" x ४". ११ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

चतकोर आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या जाड कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ. ३६२ वर सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे. याआधीच्या कैफियतीस जोडून लिहिलेली ही कैफियत आहे. शाहूचा मृत्यू आणि पहिला पेशवा म्हणून बाळाजी बाजीराव याचे पदग्रहण यात संक्षेपाने मांडलेले आहे. सुदायतुल्लाखान व नजीबखान रोहिला आणि बाळाजी बाजीराव यांच्यात पानिपत येथे झालेले युद्ध आणि बाळाजी बाजीराव पेशवे याचा मृत्यू यांचे वर्णन केलेले आहे. नंतरच्या पेशव्यांचा वारस व राज्यकारभार हेही स्पष्ट केलेले आहे. मराठ्यांचे राज्य आणि पेशव्यांचे राज्य या काळात घडलेल्या सर्व महत्त्वाच्या घटनांसाठी शालिवाहन शकातील तारखा दिलेल्या आहेत. मराठी कवी ज्ञानेश्वर यांच्याबद्दल काही उल्लेख केलेले असून त्यांच्या मृत्यूची तारीखही दिली आहे. पैठणचे एक रहिवासी श्री. बचोबा यांच्याजवळ असलेल्या मूळ दस्तऐवजावरून नारायणराव व आनंदराव यांनी २५ जुलै १८०७ रोजी प्रस्तुत हस्तलिखित नकलले असे सांगितले आहे.

**प्रारंभ :** श्रीमंतराजाशहु कैलासवास जाला. राज्य राजश्री बालाजी बाजीराव व प्रधान यासी नीरवीले.

**शेवट :** नारायण राव आनंद राव ईलाखे मेजर कालेनल मकीजी सो सुपरीटेनंत्याट आफ दी मैसुर वीदा तारीख २५ माहे जुलाई सन १८०७ इसवी दर जागा मुलामुटानदी संगम मुतसील पुना.

## डी. नंबर १३२

**पोरुल वैतसंती पापा कोविल**
**PORUL VAITTAŚETI PĀPĀ KOVIL**

**कागद :** १३" x ८$\frac{१}{४}$". १६ ओळी. मोडी. चांगली स्थिती. जुने. पूर्ण.

डी. नंबर ८० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत पृ.५६ वर सुरू होते. पोरुलवैतसेती आणि पापा कोविल या दोन खेड्यांचा स्थानिक इतिहास यात आहे. तिरुवरूर येथे राज्य करणाऱ्या करुणाकर तोंडमन याच्या काळापासून या दोन खेड्यांच्या इतिहासाचा शोध घेतलेला आहे. या खेड्यांतील दोन मंदिरांचा तो निर्माता आहे असे सांगितले जाते. मंदिरांतील देवतांना दिल्या गेलेल्या देणग्या आणि जडजवाहीर त्या मंदिरांतील शिलालेखाच्या सारांशाच्या आधारे इथे सांगितलेले आहे. या देवतांशी निगडित अशा दंतकथा/पवाडे– विशेषतः त्यांच्या ठिकाणच्या दैवी शक्तीविषयीचे– यात दिलेले आहेत. या खेड्यांचा स्थानीय भूगोल, तिथे राहणाऱ्या लोकांचा संक्षिप्त इतिहास आणि काही युरोपिअन अधिकाऱ्यांना तिथे सापडलेले गुप्त भूमिगत धन इत्यादींबद्दलची माहिती तपशीलवार दिलेली आहे. ही दोन्ही खेडी तंजावर जिल्ह्यातील कीवलूर तालुक्यात आहेत. या खेड्यांतील वृद्ध रहिवाशांनी दिलेल्या माहितीवरून ही कैफियत २८ डिसेंबर १८१७ रोजी पुरी केली असे सांगितले आहे.

**प्रारंभ :** कैफियत पोरुलवैतसेती, पापा कोविल तालुके कीवलुर सुभे तंजावर सन १८१७ ईसवी तारीख छ २८ माहे डिसंबर. हे स्थल थोर आरण्य होऊन असताना श्री रामचेंद्रस्वामी वनवासास निघाले.

**शेवट :** हेच पोरुलवेतसेतीचे कैफियत गावचे करणं शामा वैंगार ७० वरुषाचा आलध पिले ५० वरुषाचा विनायक पिळा ५४ वरुषाचा हे तिघही सांगीतल्याप्रमाणे लिहाल असे तारीख छ २८ माहे डिसंबर सन १८१७ ईसवीं मोकाम दर पोरुलवेत सैती.

## डी. नंबर १३३

**फेरिस्त देहाये जामेवार तालुका**
**PERISTA DEHĀYE JĀMWĀR TALUK.**

**कागद :** ४" x १७". ३५ ओळी. मोडी. जुने. खराब स्थिती. पूर्ण.

डी. नंबर १२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या पृ. २७ वर सुरू होत असून त्यात मदुरा जिल्ह्यातील अनेक मंदिरांना दिलेल्या देणग्यांचा तपशील नोंदलेला आहे. १८०९ साली ईस्ट इंडिया कंपनीला सादर केलेल्या अहवालाची ही सत्य प्रत आहे असे दिसते. मदुरा जिल्ह्यातील मंदिरांना देणगी म्हणून दिल्या गेलेल्या खेड्यांचा संख्यावार तपशील यात आहे. सर्वमण्यम-अर्धमण्यम यासंबंधीची तपशीलवार माहिती– प्राधान्येकरून श्री मीनाक्षी व अलगिरीस्वामी यांच्या मंदिरांना देणगीदाखल दिलेले बगिचे व इमारती यांचे विस्तृत वर्णन केलेले आहे. मदुरा जिल्ह्यातील सेवाभावी संस्था व व्यक्ती यांना दिलेल्या इनाम जमिनींच्या आधारे या खेड्यातून जमा होणाऱ्या उत्पन्नाचे कच्चे अंदाज हिशेबासह दिलेले आहेत. पहिल्या पृष्ठाच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात काही उर्दू शब्द लिहिलेले दिसतात. ना लेखकाचे नाव ना माहितीचे मूळ दिलेले आहे.

**प्रारंभ :** यादास्त देहे झाडा ता. मथरे सुभा नथड नगर उरुफ त्रीचेनापली सुरसन १२०७ फसली. कुल देहे ६०२ सायेर वगैरे दफतर १.

**शेवट :** मेल वणीतमं.

कसब तीरमाणीकम. १ ताडयपटी. १ आधीकारी पटी. १ केतवारपटी. १ सडेपटी. १ देवीयकटले. १ संदनपुरमं.

## डी. नंबर १३४

**बखर सवाई माधवराव**
**BAKHER SAIWĀYĪ MĀDHAVARAO**

**कागद :** १२" x ७". २५ ओळी. मोडी. चांगली स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप डेमी आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेला हा दस्तऐवज पृ. २२६ वर सुरू होतो. सवाई माधवराव यांच्या सैन्याबद्दलचे तपशील यात दिलेले आहेत. खेड्यांची नावे व त्यातून नेमका जमा होणारा महसूल, प्रत्येक ठिकाणाहून नोंदलेले व नोकरीत असलेले सैनिक, त्यांना दिल्या जाणाऱ्या वार्षिक पगाराचा हिशेब यांचा निर्देश केलेला आहे. या

कैफियतीत नरसिंग खाडेराव याच्या हाताखालील सैन्याबाबत मोठ्या खुलासेवार रीतीने मजकूर आलेला आहे. पेशव्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिलेल्या जहागिरी आणि त्यांना नेमून दिलेले काम यांचे संक्षिप्त वर्णन यात आलेले आहे.

पेशव्यांच्या मूळ हिशेब-वह्यांतून हा सर्व मजकूर नकलून घेतला असल्याचे कैफियतीच्या अखेरीस सांगितले आहे.

लेखकाचे नाव किंवा नकलेची तारीख दिलेली नाही. काही ठिकाणी नुसत्या रेघा ओढून कागद रिकामा ठेवलेला आहे.

**प्रारंभ :** कैफियत सवारान ईलाखे सवाई मादव राव पंत प्रधान नरसिंव्हा खंडेराव ११५३२१५/ फौज सरंजाम सवाई ३४४.

**शेवट :** नकला लिहुन सेवेसी रवाना केल आहें. कृपानेत्रान पाहतां पेषवे दरबाराच कैफियत श्रृत होईल व कागदाचे मानुन समते कलु यईल. मातबर राजे लोकांची श्नेह अत्यंत जाहेलं मुले बखर काहडुन जे जे कागद मागुन मागुन नकला लिहील असे.

## डी. नंबर १३५

**बडा बलापुर कैफियत**

**BĀDĀ BALLĀPUR KAIFIYAT**

**कागद :** १२" x ५$\frac{३}{४}$" २३ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती.

हैदर व टिपू सुलतान यांची कैफियत ही या भागातील इतर रचना आहे. फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेला हा दस्तऐवज या भागाच्या पृ. ९० वर सुरू होतो. पृष्ठे तपकिरी रंगाची झालेली असून जीर्ण फाटायला आलेली आहेत. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे.

म्हैसूर इलाख्यातील बडा बल्लापूर या शहराचे मूळ व इतिहास प्रस्तुत कैफियतीत वर्णिलेला आहे.

फसली ९४८ पासून या शहराचे मूळ शोधलेले असून त्यानंतर क्रमाने त्याचा झालेला विकास स्पष्ट केलेला आहे.

कांचीपुरम येथील (बहिर गौंडा व इतर दोघे असे) तीन भाऊ उदरनिर्वाह अशक्य झाल्याने पईघाट येथे येऊन छोट्या झोपड्यांत राहू लागले, असे सांगितले आहे. एकदा देवांच्या मूर्ती असलेले तीन पेटारे नदीतून वाहत आले. ते जमा करून गौंडाने त्यांच्यासाठी मंदिरे बांधली. या मूर्ती सापडलेल्या (गौंडा) ला एका धातूच्या लगडीद्वारे गुप्त धन पुरलेली जागा दाखविणारा साक्षात्कार झाला आणि तिथे किल्ला व त्या मूर्तींसाठी मंदिरे बांधण्याची सूचनाही मिळाली. गुप्त धनाच्या जोरावर बांधल्या गेलेल्या किल्ल्याचे नाव बडा बल्लापूर ठेवले गेले. मूळ संस्थापकाच्या वंशजांची नावे आणि त्यांच्या कारभाराचा काळ या कैफियतीत दिलेला आहे.

शिवाजीने दक्षिणेत केलेल्या राज्यविस्ताराचे वर्णन तिसऱ्या भागात आलेले आहे. बडा बल्लापूरवर त्याने हल्ला केल्याची व तो ताब्यात घेतल्याची तारीख, नंतर किल्ल्याची व्यवस्था ज्यांच्यावर त्याने सोपविली त्यांची नावे यात सांगितलेली आहेत. पेशव्यांचा इतिहास आणि त्यांच्या दक्षिणेतील राज्याच्या कारभाराचा परशुरामभाऊ (पटवर्धना) पर्यंतचा इतिहास उठावदारपणे सांगितला आहे. हैदरचा उदय, म्हैसूरवर त्याने केलेला कब्जा वगैरे, टिपू सुलतानाचा कारभार, शेवटी बडाबल्लापूरसह इंग्रजांनी म्हैसूर इलाखा कसा जिंकला व ताब्यात घेतला, आणि कृष्णराज वोडियार याची राजा म्हणून कशी नेमणूक केली, हा सर्व उरलेल्या कैफियतीचा कथाभाग आहे. लेखकाचे नाव किंवा या कैफियतीतील मजकुराचे मूळ दिलेले नाही. मराठ्यांचा इतिहास आणि म्हैसूर प्रांतावरील त्यांचा कब्जा याचा संबंध येत असल्यामुळे ही कैफियत इतिहास दृष्ट्या महत्त्वाची मानता येईल अशी आहे.

**प्रारंभ :** कैफियत बलाबलापुर सु। १९४८ की. हेवलंबी संवछर वैशाख सुध ५ की, बडाबलापुर १ बाडहावली बहिर गौंडा, बचगौंडा चिकगौंडा हे तिघे जन पटले मजकुर तन घडं कंचिचे मुलुकाहुन दुषकाल पडले.

**शेवट :** चेनं पटणाहुन इंग्रजी बहदूर याणी फौज येऊन जगे करुन टीपुसुलतानासी मारुन श्रीरंगपटण टाणा घालुन xxx किसन राज वडोयार यांसी तत्खनिसी करुन ह्याचे दिवान पुर्णेया कडुन हाल अमीली जये मुनी राव मुतसहीस xxx राजे केल अहेत. कलम.

## डी. नंबर १३६

**बडा बल्लापुर कैफियत**

**BĀDĀ BĀLLĀPUR KAIFIYAT**

**कागद :** १४" x ८". मोडी. २८ ओळी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप डेमी आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत मॅकेंझी संग्रहातून मिळालेल्या भागातील पृ. ७५५ वर सुरू होते. इंग्रजीमध्ये या कैफियतीचे शीर्षक बरोबर

लिहिलेले नाही. ते 'बडाबल्लापूर' ऐवजी 'बल्ला बख्तपूर' असे लिहिलेले आहे. काही किरकोळ बदलांसह डी. नंबर १३५ या कैफियतीचीच ही सत्य नक्कल आहे. यात बरेच अशुद्ध शब्दलेखन आणि चुकीची विरामचिन्हयोजना दिसून येते.

नक्कलकाराचे नाव किंवा नकलेची तारीख दिलेली नाही.

डी. नंबर १३६ प्रमाणेच यात प्रारंभ व शेवट दोन्ही आहेत.

## डी. नंबर १३७

**बडा बापुल्लर कैफियत**
**BAḌĀ BĀLLĀPŪR KAIFIYAT**

**कागद :** १०"x६". १६ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती.

डी. नंबर ७२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश डेमी कागदांवर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या पहिल्या पृष्ठावर सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पृष्ठे सुट्या अवस्थेत आहेत. ही कैफियत आधीच्या डी. नंबर १३६ या कैफियतीची सत्य नक्कल दिसते. आधीच्या कैफियतीप्रमाणेच यातील आशय आहे.

शब्दयोजनेत केलेला थोडासा बदल या कैफियतीच्या शेवटच्या भागात दिसून येतो. नक्कलकाराचे नाव किंवा नकलेची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** कैफियत बडाबलापुर– सु ॥ ९४८ फसलीत हे विलंबी नाम संवछ्र वैशाख सुध ५ xxxx बाडाबलापुरचे बडाहवेली बहिर गौंडा १ बच गौंडा १ चिकपा गौंडा १ हे तिघे जण पटल लतधायं कंचीच मुलुकाहुने तु काल पङ्लसबब पायन घांटांसी एऊन अवनी नजदीक झोंपड बंधुन घेऊन होते.

**शेवट :** दीलवरखान सुबदार आमीन सन ११५३ फसली छ २१ जीलखाद लगाईत:– १ छे॥ २१ रबीसानी आखेर सालगुजस्ता साल आंखेर .... बादषाई दीवान दीलवरखान – १ छे ॥ २२ रबीसानी आवल ... लगाईत छ २२ माहे पाबान मा । सोबराये आमील.

## डी. नंबर १३८

**बडाबलापुर कैफियत**
**BĀḌĀ BALLĀPŪR KAIFIYAT**

**कागद :** १०" x. . . ." मोडी. १७ ओळी. खराब स्थिती. जुने. अपूर्ण.

डी. नंबर १ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या पृ.५९ वर सुरू होते.

हा दस्तऐवज छोटासाच आहे. बडा बल्लापूर किल्ल्याची निर्मिती, पुरलेल्या गुप्त धनाच्या प्राप्तीबद्दलचे दंतकथात्मक वर्णन, नदीतून वाहत आलेल्या मूर्तींची प्राप्ती, मग बहिर गौंडाने या मूर्ती ठेवण्यासाठी मंदिरांचे व किल्ल्याचे केलेले बांधकाम याबद्दल थोडी वेगळी माहिती यात दिलेली असली तरी आधीच्या कैफियतीत सुचविलेल्या माहितीशी ती बरीच मिळतीजुळती आहे. हा दस्तऐवज बहिर गौंडाला चिक गौंडा हा पुत्र होणे आणि काही देवळाचे बांधकाम होणे याविषयी माहिती देतो.

आपल्या शेवटच्या दिवसांत बहिर गौंडाने आपल्या मुलाचा अज्ञान पालनदार म्हणून आपला भाऊ तिम्मण्णा गौंडा यास बडा बल्लापूरचे राज्य करणारा उत्तराधिकारी म्हणून नेमले. या कैफियतीतील माहितीचे मूळ, लेखकाचे नाव किंवा नकलेची तारीख याबद्दलचा निर्देश नाही.

**प्रारंभ :** सु ॥ ९४७ फसली हेविलंबी नाम संवछर वैशाख सुत्ध ५ मी. बडाबलपुरचे हावेली बहीर गौंडा १ बोच गौंडा चीक गौंडा हे तीघे जणे पहले शों. कांचीचे मुलुकाहुन xxx सबब पायनं वाटासी एऊन अवनी नंजदीक झोपडी बांधुन घेऊन होते.

**शेवट :** काल पाहेचले कडुन हे तत्ख नीणी xxx बांदावे म्हणुन तजवीज करुन लागला. तेव्हा तगवाई तमणा गोंडा म्हणार येऊन अमच्या xx काये हे मुलास पुढे टेऊन घेऊन दौलत करीतों म्हणौन सांगीतला.

## डी. नंबर १३९

**बलाल कैफियत**
**BALLĀL KAIFIYAT**

**कागद :** १४"x ८$\frac{१}{२}$". मोडी. २८ ओळी. जुने. चांगली स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ३७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

निळ्या रंगाच्या फूल्सकॅप डेमी कागदावर मुळावरून उतरविलेली ही कैफियत या मोठ्या भागाच्या ६८० व्या पानावर सुरू होते. हस्ताक्षर खराब असून त्यात मोठ्या प्रमाणावर अशुद्ध शब्दलेखन आणि चुकीची विरामचिन्हयोजना झालेली दिसते.

हा बल्लाल रायदुर्गाचा लहानसा वृत्तांत आहे. प्रस्तुत

कैफियतीत या दुर्गाचा संस्थापक म्हणून भक्तल राय याचा उल्लेख केलेला आहे. त्याने पुढे दिलेल्या परिस्थितीत हे काम केले. या सर्व परिसराला एक जैन विरक्त साधू अतिशय त्रास देत असल्याचे सांगितले आहे. श्रीराम या देवाच्या कृपाप्राप्तीच्या जोरावर भक्तल रायाने या जैन साधूस ठार केले. त्यामुळे लोकांनी भक्तल रायाला या कृत्याचा मोबदला म्हणून खूप संपत्ती दिली. याच्या जोरावर त्याने आपले सामर्थ्य वाढविले. मोठमोठी ठाणी जिंकली आणि किल्ल्यामागून किल्ले बांधले. सर्वांत प्रथम आणि प्रमुख असा त्याने बांधलेला किल्ला म्हणजे राजदुर्ग. त्याला तीन पुत्र होते आणि त्यांनी क्रमाने राज्य केले. दुसऱ्या पुत्राच्या आरंभकाळी मोगलांनी हे ठिकाण जिंकले आणि त्यांच्या काळात जे काही झाले त्याची इथे नोंद केलेली आहे. होयसळ घराण्याच्या निर्मितीचा हा अपुरा वृत्तांत असावा असे दिसते.

**प्रारंभ :** कोपं हो बलीकले xxx मुलुक बला राय दुर्ग कैफियत. पुवी च्यार्रीसेंव्हे वरुषा खाले देवरबीउचे समस्थानी xxx वीर बलाल राजा यान या मुलुकास येऊन साबक आरणीत होता.

**शेवट :** xxx कितेकांनी निंबु फणस वाळुक ईत्यादी होण वरकड सांगीत(ले) xx होम वीशेष xxx होत नाहीत बहु निट होत नाहीत. खरीदीस कामा येत नाही गरीब लोक बसले असे. व्लप कामात येत आहे. वरकड कायेधने काही दील नाही.

## डी. नंबर १४०

**बलाल कैफियत**
**BALLĀLA KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. २०"x १२". मोडी. १२ ओळी. चांगली स्थिती. पूर्ण.

या भागाच्या पृ. ६७० वर ही कैफियत सुरू होते. या दस्तऐवजात अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्हयोजना मोठ्या प्रमाणात आहे. बल्लाळ नावाच्या एका वीरनायकाचे मूळ व इतिहास यांच्याशी ही कैफियत संबंधित आहे. बल्लाळाचा वारसा, बालपण आणि त्याचा लष्करी पराक्रम थोडक्यात वर्णिलेला आहे. तो एक श्रद्धाळू भक्त होता. आणि काही देवळांच्या बांधकामास तो जबाबदार होता असे सांगितले आहे. पृष्ठे फाटलेल्या अवस्थेत असल्याने विशिष्ट स्थाननामांची निश्चिती करता येत नाही. प्रारंभ व शेवट या दोन्ही जागा फाटलेल्या आहेत.

## डी. नंबर १४० अ

**बलाल राय दुर्ग कैफियत**
**BALLĀLA RĀYĀDURGA KAIFIYAT**

**कागद :** ७"x ५". मोडी. १३ ओळी. जुने. खराब अवस्था. पूर्ण.

डी. नंबर ३४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या पृ. ७३ वर सुरू होते. हा रायदुर्गाचा थोडक्यात दिलेला वृत्तांत आहे. या स्थानाचे मूळ आणि भक्तल रायाचा इतिहास यात वर्णिलेला आहे.

एक जैन मुनी या परिसरातील लोकांना अतिशय त्रास देत होता. राम या देवतेकडून मिळालेल्या कृपाप्रसादामुळे दैवी शक्तीच्या जोरावर भक्तल रायाने या जैन मुनीचा वध केला. हा वध करून केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता म्हणून लोकांनी भक्तल रायला खूप द्रव्य दिले. त्याच्या जोरावर त्याने मोठे सैन्य जमवून स्वतःचे सामर्थ्य वाढविले. मोठे जिल्हे जिंकले आणि अनेक किल्ले बांधले. त्याने बांधलेल्या पहिल्या किल्ल्याला राय दुर्ग असे नाव दिले गेले. कमी महत्त्वाचे अनेक तपशील नंतर या कैफियतीत येतात. या राजाची वंशावळही थोडक्यात दिलेली आहे. प्रथम मुस्लिमांकडून आणि नंतर मराठ्यांकडून हा किल्ला जिंकला गेला, असे सांगितले आहे. प्रस्तुत दस्तऐवज होयसळ घराण्याचा अपुरा वृत्तांत दिसत असून, त्याच्या शेवटच्या भागात त्या परिसरातील लागवडीखालील पिकांचे वर्णन आलेले आहे. नक्कलकाराचे नाव आणि यातील माहितीचे मूळ उल्लेखिलेले नाही.

**प्रारंभ :** (कैफियतीचे शीर्षक असावे असे वाटणाऱ्या पहिल्या दोन ओळी खराब झालेल्या आहेत.)

तिसरी ओळ : पुर्विच्यारींसे वरीषा खाले हलबीडुचे समस्थानी xx वीर बलाल रायांचे मुलुकास येऊन साबक आरण्य होत.

**शेवट :** फणस बाळुक ईत्यादी होण वरकड वांगी हलद xxx होण. विशेष काहीं नारल होत नाही. तंबाकु नीट होत नाही. मेथी ईड xxx कामा येत नाही. गरीब लोक असलीया ते स्वलप कामांत येत आहे. वरकड xxx काही दील नाही.

## डी. नंबर १४१

**बाजीराव थोरले व नवाब नासर जेंग युद्ध**
**BĀJIRAO THŌRLE VA NĀWĀB NĀZARJANG UDHA.**

**कागद :** ७"x ५". मोडी १४ ओळी. जुने. खराब स्थिती. पूर्ण.

डी. नंबर १२७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या पृ. ३२५ वर सुरू होते. चतकोर आकाराचा हा बांधीव भाग असून, त्याची विद्यमान अवस्था सैल झालेली आहे.

बाजीराव पेशवे याच्या जीवनातील ऐतिहासिक घटनाप्रसंगांचे यात वर्णन आलेले आहे. पेशवेपदी नियुक्ती झाल्यानंतर त्याने औरंगाबाद ताब्यात घ्यायचा विचार केला.

मराठ्यांशी युद्ध करण्यासाठी मोगल सम्राटाने नासरजंग याच्या नेतृत्वाखाली मोठे सैन्य रवाना केले. तुकोजी पवार, यशवंत पवार आणि राणोजी वाघ यांच्या मदतीने पिलाजी जाधव या मराठा सेनापतीने मोगल सैन्याचा पराभव केला. पण हे युद्ध दीर्घ काळ रेंगाळणार, असे दिसल्यावरून मराठ्यांनी नासरजंगाला पक्ष बदलण्यासाठी गळ घातली आणि त्याप्रमाणे तो मराठ्यांचा मित्र बनला. याप्रमाणे औरंगाबाद हे पूर्णपणे व यशस्वीपणे मराठा राज्याला जोडले गेले.

या युद्धाच्या संदर्भातील प्रमुख ठिकाणे आणि दोन्ही पक्षांकडून योजिली गेलेली सैनिकांची संख्या यांचे प्रस्तुत कैफियतीत तपशिलाने स्पष्टीकरण दिलेले आहे. नासरजंगाने केलेल्या योग्य वेळेच्या मदतीखातर मेहेरनजर म्हणून त्याला दिलेल्या देणग्यांची यादी इथे नोंदलेली आहे. बाजीराव पेशवा याचा उज्जैन येथे नर्मदा तीरावर झालेला मृत्यू आणि नाना फडणवीस याची पेशवेपदावरील नियुक्ती यांसारख्या घटना मोठ्या रेखीवपणे वर्णिलेल्या आहेत. या कैफियतीच्या एका वेगळ्या भागात मराठ्यांच्या पुणे दरबारातील राज्यकारभाराची माहिती दिलेली आहे.

अहमदनगर येथील कुलकर्णी शामराव याच्या ताब्यात असलेल्या दस्तऐवजावरून उपरोल्लेखित मजकूर जमा करण्यात आला आणि कर्नल मॅकेंझी याच्या विनंतीवरून २३ डिसेंबर १८०५ रोजी त्याची नक्कल करून घेण्यात आली, असे कैफियतीच्या शेवटी सांगितले आहे.

**प्रारंभ :** बखर श्रीमंत राजेश्री पंतप्रधान बाजीराव व नवाब नासर जेंग बहदर या उभयेतास लढाई जाहली तो वृतान्त लढाई कैसी जाहल म्हणीजे पहिल नवाब नासरजेंग यांनी अवरंगबादेची सुभेदारी करित होते.

**शेवट :** वस्त्र माहाराजा कडुन देऊन प्रधनिकास बसीवीला. माहाराज छेत्रपती शाहु यानी आपल्या खुषीन पुणेस रवणा केले. यैस बखर काही संक्षेपे कडुन लिहीला असे. या गोष्टीस पन्नास ५० वरुश जाहाली हे बखर अहमद नगरी कुलकर्णी शाम राव याकडे व्होंती. त्याची नकल लिहिली ते बिकलम ईलाके हाजरत मेजर कालन मकैजी साहेब बा तारीख छ २३ माहे डीसंबर सन १८०५ ईसवी दरजागा अहमदनगर.

## डी. नंबर १४२

**बाजीराव थोरले व त्रिंबकराव दाभाडे युद्ध**
**BĀJIRAO THORALE VA THIYAMBAKRAO DĀBADE UDDHA**

**कागद :** ७"x ५". मोडी. १४ ओळी. जुने. खराब स्थिती. पूर्ण.

डी. नंबर १२७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

चतकोर आकाराच्या पातळ इंग्लिश कागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या पृ. २ व ६ वर सुरू होते. हस्तलिखित बऱ्यापैकी व वाच्य असून या कैफियतीत १३६ पाने आहेत. बाजीराव आणि त्र्यंबकराव दाभाडे यांच्यात झालेल्या मोठ्या लढाईचा हा ऐतिहासिक प्रसंग विनंतीनुसार शाहू राजाला स्पष्ट केलेला असल्याचे पहिल्या पानावर सांगितले आहे. गुजरातमधील घडामोडींबाबत बाजीराव पूर्णपणे कर्ताकरविता नियंत्रक झालेला होता. शाहू राजाचा सेनापती त्र्यंबकराव दाभाडे यास तेतिंगण (Tetingana) जिल्ह्याचा– सुभ्याचा– सुभेदार म्हणून पदोन्नती दिलेली होती. त्याने (शाहू) राजावर दबाव आणून स्वतःची गुजरातचा सुभेदार म्हणून नेमणूक करून घेतली. हे सारे बाजीरावाच्या इच्छेविरुद्ध झाले. या किरकोळ कारणासाठी त्या दोघांनी परस्परांविरुद्ध युद्ध पुकारले. या युद्धातील प्रमुख घटना, युद्धाच्या तारखा आणि त्या स्थळांची नावे या कैफियतीत सांगितलेली आहेत. मराठा वीरांची नावे आणि प्रत्येक पक्षाचे संख्याबळही उल्लेखिलेले आहे. या युद्धात त्र्यंबकराव आणि त्याचे सहकारी मारले गेले. बाजीरावाने आपली गुजरातची सुभेदारी राखली. औरंगाबादचा एक रहिवासी गंगाराम याच्याजवळ असलेल्या मूळ दस्तऐवजावरून ही कैफियत कर्नल मॅकेंझी याच्या विनंतीवरून ३१ जानेवारी १८१६ रोजी नकलली गेली असे सांगितले आहे.

**प्रारंभ :** श्री गणेशाय नमः श्रीमंत पेशवे बाजीराव यास व त्रिंबकराव सेनापती यास युद्धे जाहली यांची बखर तवारीख व शेक माहे संवछर दरदर जागी दरदर तारीखेंत मोकाम केले ते आणि लढाई दरदर तारीखेत वर्तला तो वृतांत सुदा.

**शेवट :** हे बखर गंगाराम कासार साकीन शहर अवरंगाबाद राजकडुन नकल लिहीलते मुतसही इलाके मेजर कालन मकींजी सो. इंजनीर मुलक मैसुर बातारीख ३१ माहे जेनवरी सन १८०६ इसवी दर जागा शहर अवरंगाबाद.

## डी. नंबर १४३

**बारकुच किल्ला कैफियत**
**BĀRKUC KILLA KAIFIYAT**

**कागद :** ७"x ५". १४ ओळी. मोडी. जुने. खराब (पुनर्बांधणी), अपूर्ण.

डी. नंबर ४५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत पृ.७६ वर सुरू होते. सर्वच पृष्ठांची दुरुस्ती केलेली असून, बरेच शब्द एक तर पुसट झालेले आहेत किंवा दुरुस्तीच्या प्रक्रियेत पांढऱ्या चिठ्या चिकटविल्याने झाकले गेले आहेत. काही पृष्ठांवर अधिक ओळी लिहून घातलेल्या आहेत.

हा दस्तऐवज विजयनगर राजवटीच्या आरंभीच्या काळाशी संबंधित आहे. नाईक राजांचे शक्तिशाली घराणे प्रथमतः जिथे निर्माण झाले ती जागा म्हणजे बरकुची असे सांगितले आहे. पहिल्या दोन राजांची नावे दिलेली आहेत. चौंड गौंडा आणि त्याचा भाऊ भैरव गौंडा यांनी ही जागा सुधारून घेतली आणि सलगपणे अठरा वर्षे राज्य केले. प्रथम हे स्थान अनाई गोंडीच्या मांडलिकी राज्यात आणि मग विजयनगरच्या मोठ्या राज्यात सामील करून घेतले गेले. बरकुचीचा शेवटचा राजा सेवप्पा नाईक याने अनेक मंदिरे बांधली. त्यांतील काहींची नावे दिलेली आहेत. काही राजांना सापडलेल्या गुप्त धनाबद्दलच्या आख्यायिका आणि विक्रमादित्याच्या सिंहासनाशी संबंधित अशा कथांची कीर्ती हा यातील काही पानांचा विषय झालेला आहे. पुढे ही जागा जैनांनी जिंकली, असे नमूद करून या राज्याच्या अवनतीची कारणे वर्णन करून सांगितली आहेत.

लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचा उल्लेख नाही. ही कैफियत अपूर्ण आहे. भैरव गौंडाच्या राज्याच्या काही हद्दींचा उल्लेख निवेदनाच्या शेवटच्या अपूर्ण ओळींत येतो.

**प्रारंभ :** पुर्वी सुमेश्वर म्हण्याच लिंग श्वयं वेत्कस्थल. तेथ प्रथम गण मैसासुर मृणार दैव मग त्या स्थली मार्गडेये कषश्वर तपस केले.

**शेवट :** आलिकर्डे दक्षेणेस बलालराये दुर्ग अरंभ. उतरेस वलीदुर्ग पावेतो. पश्चमेस नगर देश देखील राज्यभार करीत होता. काहि कलिस चिलर जैन राजे लोकास हि तकरार xxxx यासीवाये पुत्र सेकीन नव्हते करीता राज्य xxx

## डी. नंबर १४४

**बीजापुर कैफियत**
**BIJĀPŪR KAIFIYAT**

**कागद :** १५"x ५". मोडी. २८ ओळी. जुने. पूर्ण.

डी. नंबर १४० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश कागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या ७२९ पृष्ठावर सुरू होत असून, ती मूळ दस्तऐवजाची नक्कल असल्याचे दिसते. हस्ताक्षर बऱ्यापैकी असले तरी मोठ्या प्रमाणात अशुद्ध शब्दलेखन झालेले आहे. या शहराशी निगडित अशा आख्यायिका पहिल्या पानावर दिलेल्या आहेत. विजापूरचे मूळ व इतिहास यात स्पष्ट केला असल्याचे प्रारंभी सांगितले आहे. हे ठिकाण मराठ्यांनी काबीज केले. मराठे आणि विजापूरचे सुलतान यांच्यातील संघर्षाच्या काही हकीकती सांगितल्या आहेत. शिवाजीचा मृत्यू, संभाजी या त्याच्या पुत्राचे राज्यारोहण आणि त्याने मराठा राज्य कसे घालविले याचा वृत्तांत यात आलेला आहे. नेमकी चौकशी व संभाजीचा वध, त्याची पत्नी व लहान मूल यांना ताब्यात घेऊन औरंगजेबाच्या कन्येच्या देखरेखीखाली ठेवणे आणि नंतर पेशवे कसे राज्यप्रमुख बनले याविषयीची माहिती नंतरच्या दोन पृष्ठांत दिलेली आहे. पेशव्यांच्या दरबारात नानासाहेब याला महत्त्वाच्या जागेवर पदोन्नती कशी मिळाली, याचा निर्देश शेवटच्या दोन पानांत केलेला आहे. हे निवेदन अपूर्ण आहे. लेखकाचे नाव आणि कैफियतीतील माहितीचे मूळ याबद्दलचा उल्लेख नाही.

**प्रारंभ :** पुर्वि हे राज्ये xxx अधीकार होता. प्रतापरुधराच कालावर त्यांचे नाश जाहल्या नंतर वेप्पल राजाभारी दिवसी अदीकार करीत असता xxx

**शेवट :** तुम्ही बेतले म्हणून बोलणे राजे यानी नाना ह्यास म्हणालेजे. तुम्ही xxxx आहा त्याकरीतां सीखा तेलीगांत घालुन घेउन तुमचे पौजांत जाऊन पावल्या नंतरे शाहर बंद बारचे

(कंशदंति) म्हणुन सांगुन वैकुंटवास केले xx मग घेऊन आपले राज्यांत मिळुन xxxx

## डी. नंबर १४५

**बिलगी देशचि कैफियत**
**BILEGI DESĀCHI KAIFIYAT**

चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या पृ. ६३ वर सुरू होते. हा अपूर्ण दस्तऐवज बेलिगी नावाच्या गावाचे मूळ व इतिहास यांच्याशी संबंधित आहे. ही जागा म्हणजे एक घनदाट अरण्य असून, मानवी वस्तीच्या दृष्टीने अयोग्य असल्याचे सांगितले आहे. नलुवक्क गौंडा या धर्मनिष्ठ माणसाने आपल्या गुरूसाठी तिथे एक मंदिर बांधले. या गुरूच्या आशीर्वादाने कृपेने नलुवक्क गौंडास मोठे गुप्त धन मिळाले. त्याच्या अनुयायांनी नंतर एक लहान खेडे उभे केले आणि त्याला बेलिगी म्हटले जाऊ लागले. म्हैसूरच्या कृष्णराज वोडियारने ही जागा नंतर ताब्यात घेतली, असे या दस्तऐवजात सांगितले आहे. याविषयी अधिक तपशील दिलेला नाही. शिवाय या कैफियतीचा इतर भाग गहाळ झालेला आहे. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ किंवा कैफियतीच्या लेखनाची तारीख यांचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ :** कैफियत बीलीगी साबक बीलीगी xxx तालुका पैकी आहे. xxx कोस पश्चम बागी मीलुन आहे.

**शेवट :** (पाहुन) गुरुस नमस्कार करून अम्हास नाही म्हणुन सांगर्णे यानी गुरू आपले शरीरापासुन xx दीलहे.

## डी. नंबर १४६

**बेडर लोकांची कैफियत**
**BEDAR LOKĀNCH KAIFIYAT**

**कागद :** ७"x ५". मोडी. १२ ओळी. जुने. खराब (दुरुस्त केलेले). पूर्ण.

यात असलेल्या इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
मद्रास, बालाघाट व श्रीरंगपट्टण कैफियत
एकेरी (Eakeri) तालुक्यातील वजन-मापे
चंद्रगुत्तीमधील लागवड-प्रक्रिया व त्यातील विविधता

चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या पृ. ५४ वर सुरू होते.

बेडर (की बेरड ?) जमातीतील अनेक उपपंथांतील सामाजिक चालीरीती, सण-उत्सव आणि व्यवसाय-धंदा ही कैफियत स्पष्ट करते. हे बेडर म्हणजे जंगलात राहणारे आदिवासी असे सांगितले आहे. शिकारी वंशातील चार संघटित जमातींबद्दलची जास्त माहिती यात दिलेली आहे. त्यातील प्रत्येक जमातीचे नाव, त्यांच्यात रूढ असलेल्या चालीरीती, ते भजत असलेल्या देवांची नावे दिलेली आहेत. ज्यांच्या चालीरीतींचे स्पष्टीकरण यात केलेले आहे त्या बेडर जमातींच्या स्थळाचा मात्र निर्देश केलेला नाही. शूद्र जमातीतील पुरुषवर्गाप्रमाणेच या बेडर वंशातील स्त्रिया वेशभूषा करतात, असे कैफियतीच्या अखेरीस सांगितले आहे.

लेखकाचे नाव किंवा या कैफियतीतील माहितीचे मूळ यांचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ :** बेडर लोकांचे कैफियत. या लोकांची च्यारी जात असताती. उरुबचडुरु म्हणार ?

**शेवट :** या दोघांचे बाईका लुगड वगैरे xxx सुद्राचे बाईकाप्रमाणे असतात. यास काहीं अदीक असणेच कलल नाही.

## डी. नंबर १४७

**बेडर लोकांची कैफियत**
**BĒDAR LOKĀNCĪ KAIFIAT**

**कागद :** १५"x८". मोडी. ३८ ओळी. जुने. खराब स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप डेमी आकाराच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या ७७७ व्या पृष्ठावर येते. आधीच्या कैफियतीचीच ही नक्कल असल्याचे दिसते. मोठ्या प्रमाणात अशुद्ध शब्दलेखन असलेल्या या सर्व लेखनात अतिशय चुकीची विरामचिन्हयोजना केलेली आहे. डी. नंबर १४७ प्रमाणेच या कैफियतीचा वर्ण्य विषय आहे.

कैफियतीचे शीर्षक गळलेले असून उजव्या बाजूचा समास आणि पृष्ठांचा तळाचा भाग जीर्ण अवस्थेत आहे. याआधीच्या कैफियतीप्रमाणेच प्रारंभ व शेवट आहेत. हा दस्तऐवज वाङ्मयीन दृष्ट्या किंवा इतिहास दृष्ट्या महत्त्वाचा वाटत नाही.

## डी. नंबर १४८

**बेलूर कैफियत**
**BELŪR KAIFIYAT**

**कागद :** ९"x ५". मोडी. १६ ओळी. जुने. खराब स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ७२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या १३ व्या पृष्ठावर येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी आणि वाच्य आहे. पृष्ठे सैल व सुट्या अवस्थेत आहेत.

अनेगोंदीच्या रामदेवरायाने दलप्रमुखाच्या (Chieftain) हुद्द्यावर पदोन्नती दिलेल्या वेंकटाद्री नाईक या पाळेगाराने बांधलेला बेलूरचा किल्ला व त्यातील मंदिरे यांच्या मुळाशी या लेखनातील मजकूर संबंधित आहे. आधीच्या काळात हा किल्ला आणि त्याचा परिसर यावर विष्णुवर्धनाचा नातू वीरबल्लाळ याचे राज्य होते. काही पाळेगार बलिष्ठ झाले आणि त्यांना वीरबल्लाळाचा अंमल झुगारून द्यावा असे वाटू लागले. त्यासाठी त्यांनी मोगलांची मदत घेतली. कृष्णा व तुंगभद्रा नद्यांच्या तीरावर झालेल्या त्यांच्यातील लढाईचे वर्णन यात केलेले आहे. अखेरीस वीरबल्लाळ जेरीस आला आणि त्याने मदतीसाठी पेनुकोंडाच्या अच्युतरायाला विनंती केली. पेनुकोंडाचा राजा आणि मोगल यांच्यात तह झाला. अच्युतरायाच्या मृत्यूनंतर त्याचे दोन भाऊ कृष्णदेवराय आणि रामराय यांनी क्रमाने सलगपणे राज्य केले. रामदेव रायाच्या काळात मोगलांनी पुन्हा हल्ला केला, पण ते पराभूत झाले. केलेली शूर कृत्ये आणि दाखविलेली स्वामिनिष्ठा यामुळे खूष होऊन रामदेव रायाने काही पाळेगारांना जहागीरदार बनविले. वेंकटाद्री नाईक हा त्यांपैकीच एक होय. त्याने एक किल्ला बांधला आणि त्याला बेलूर असे नाव दिले. त्याने काही मंदिरेही बांधली आणि त्यांना देणग्या दिल्या. मंदिरांच्या दगडी भिंतीवर या दिलेल्या देणग्या कोरून ठेवल्याचे सांगितले आहे. आपल्या अखेरच्या दिवसांत बेलूरचा शास्ता असलेल्या शिवाप्पा नाइकाने किल्ला घेतला. पण कृष्णदेवराय वोडियार याने तो पुन्हा जिंकून म्हैसूरच्या राज्यास जोडला.

ही कैफियत इथेच तुटल्यासारखी संपते. लेखकाचे नाव किंवा कैफियतीची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** कैफियत बेशर.

पुर्वी विष्टणुवर्दन रायानी देवास आणुन प्रतीष्टा करुन जेकणाच्यार्य यास सांगुन देवळही तयार करून तेथील झाड अवघ तराघुन षहर बांधुन दौलत करीत असतां कितेक दिवसाने राजा मार फैती जाहला.

**शेवट :** सेवपनाईकास xxx करार मोर पावलाजे व त्यात सरहद अहेते तुम्ही घेणे बेळर धरुन अम्हास ऐसे कार मोर पावल कडुन नेणे प्रमाण कबुल जाहल ते ११० वरुष पावेतो जाहल चित्रभानु संवछरी मोर दरल कडून ते देवास मैसुर वालेनी तगडनाड ३०० होनाची कायं टेवुन...

## डी. नंबर १४९

**बैर देशांची उत्तपन्न**
**BAIR DASĀNCE UTPANNA**

**कागद :** ७"x ५". मोडी. १५ ओळी. जुने. खराब स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ४५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या ८४ व्या पानावर सुरू होते.

बैयरनाड आणि त्यात जीनदत्ताने बांधलेली मंदिरे यांच्या मुळाविषयीचा मजकूर यात आहे. प्रस्तुत शहर पुढील परिस्थितीत उभे केले असे सांगितले जाते : जीनदत्ताचा पिता एका शिकारी (आदिवासी) कुळातील मुलीच्या प्रेमात पडला आणि त्याने तिच्याशी लग्न केले. राजा तिच्या पूर्ण कह्यात गेला आणि तिच्या ताटाखालचे मांजर बनला. पुढे तिला एक पुत्र झाला. त्याला राज्याभिषेक करावा असे तिच्या मनाने घेतले. योग्य अशा वारसदाराचे हक्क बाजूला सारण्यासाठी तिने राजाच्या प्रथम पुत्राला ठार करण्यासाठी राजाला यशस्वी गळ घातली. पण काही तरी चूक झाली आणि त्या आदिवासी स्त्रीचा पुत्रच मारला गेला. तिने जीनदत्ताला ठार करण्याचा विचार केला. पण जीनदत्त तिच्या तावडीतून पळाला आणि चित्रकूट येथे आला. तिथे त्याने काही किल्ले बांधले. बैयर किल्ला हा त्यांपैकी एक प्रमुख किल्ला होय. राजा किंवा ती आदिवासी स्त्री यांची नावे दिलेली नाहीत. तसेच लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचाही उल्लेख नाही. ही कैफियत अपूर्ण आहे.

**प्रारंभ :** बैरानाडांत असणार xxx या म्हणार xx गावचा गौड यासच हे गड म्हणताहेत यान लिहील ते कैफियत.

**शेवट :** जीनदत्त रायस xxx म्हणुन यास धरुन अणणेस घरास लोकास पाठविले घरी सोधून पाहता यान नाही म्हणुन

कलन बहरे फौज पाठवीत जाहले. ते फौज बाहर येउन यास पाटलाग करुन समीप येताना xxx

### डी. नंबर १५०

**बोर नाडांची कैफियत**
**BŌR NADĀNCI KAIFIYAT**

**कागद :** ७"x५". १४ ओळी. जुने. खराब स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ४५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

चतकोर आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली ही कैफियत या भागाच्या पृ. ६६ वर येते.

या ठिकाणी राज्य केलेल्या राजांच्या नावांशी ही संबंधित आहे. या प्रदेशाची भौगोलिक जागा नेमकेपणे सांगितलेली नाही. ही कैफियत छोटेखानी आहे आणि अपूर्णही आहे. या ठिकाणी राज्य केलेल्या राजांची नामावळ, प्रत्येकाचा राज्यकारभाराचा काळ, उत्पन्न आणि प्रत्येकाच्या अखत्यारीत असलेल्या किल्ल्यांची संख्या यांचा निर्देश केलेला आहे. प्रत्येक नाव बोइर (Boir) या शब्दाने संपते. तेव्हा यावरून असा निष्कर्ष काढायला हरकत नसावी की, हा शब्द आडनाव म्हणून वापरण्याचा या राजांचा प्रघात असावा.

लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही. साहित्य किंवा इतिहास यांपैकी कशालाही उपयोग नाही, असे या कैफियतीचे स्वरूप दिसते.

**प्रारंभ :** (पहिली ओळ वाचता येत नाही.)

देशाहुन अले ते क्षेत्री xx तेधुन जाहज बांधुन... मार्ग येऊन राज्य केले.

**शेवट :** आहे ते नाव नीसी व्यक्त करावा त्यानी साबक बंगारु चेवडुरु, मुल्लरु अवघे रुपये देत होते. मग.. संवछर... केकंदी वालेस जाहल.

### डी. नंबर १५१

**बौदमत खंडण**
**BAUDDHA MATA KHANDANA**

**कागद :** १०"x६". १४ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

फूल्सकॅप आकाराच्या पांढऱ्या इंग्लिश बनावटीच्या कागदावर लिहिलेल्या आणि या भागाच्या ३५८ व्या पृष्ठावर येणाऱ्या या कैफियतीत श्रीशंकराचार्यांचे जीवन व कार्य यातील एका प्रकरणाचे वर्णन आलेले आहे. श्रीशंकराचार्यांचे प्रारंभीचे दिवस, त्यांना परमेश्वराची कृपा कशी प्राप्त झाली आणि ते संन्यासी कसे बनले याचा वृत्तांत दिलेला आहे. काही संस्कृत ग्रंथांवर त्यांनी भाष्ये लिहिल्याचेही सांगितले आहे. हिंदू धर्माच्या विरोधी प्रचार करून बौद्ध व जैन यांनी आपापल्या धर्मात मोठ्या संख्येने हिंदूंना धर्मांतराद्वारे सामावून घेण्यास त्यांच्या काळात सुरुवात केली होती. आपल्या या नव्या धर्माची बाजू मांडणे व समर्थन करणे यासाठी त्यांनी काही उपदेशक वक्त्यांची योजनाही केली होती. शंकराचार्यांनी आपल्या धर्मनिष्ठेच्या व वक्तृत्वाच्या जोरावर धर्मांतरितांचे पुनर्धर्मांतर करून त्यांना त्यांच्या मूळ धर्मात आणले.

वेदातील अनेक अवतरणांचे स्पष्टीकरण करून त्यांनी या दोन्ही धर्मांबद्दल हिंदूंच्या मनात नकार ठसविला. वादविवादात भाग घेतलेल्या आणि हरलेल्या बौद्ध भिक्षूंची नावे दिलेली आहेत. शंकराचार्यांचा शिष्यपरिवार मोठा होता. त्यात सदानंद हा पट्टशिष्य होता. आपल्या गुरूबद्दलच्या त्याच्या निष्ठेच्या हकीकती आणि तो पद्मानंद म्हणून कसा ओळखला जाऊ लागला, याचे वर्णन केलेले आहे. या सर्व घटना म्हणजे पहिल्या प्रकरणाचा वर्ण्य विषय, असे सांगून कैफियत संपलेली आहे. लेखकाचे नाव किंवा ज्यातून हे प्रकरण नकलले त्या पुस्तकाचे नाव दिलेले नाही. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे.

**प्रारंभ :** या कारण कलियुगांत अवतारणार यैस सांगीतल होते. सांप्रत समाधी द्रिष्टीनही तोच तु ऐस जाहल्या प्रमाणे श्री गोविंद भगवत्पादानी म्हणतांच श्रीशंकर येतीनि त्याच पादारविंदास अर्चना करुन माहावाक्य उपदेश करावा म्हणुन प्रार्थीले.

**शेवट :** श्रीशेंकराचार्ये नित्ये श्रुती कामधेनु सदाचार हस्ते कडोन उचलुन स्वकुत भाषये वचनामृते कडुन परक्षाळान निर्शेके कडोन मोक्ष सायुज्य सन्मार्ग टेविते जाहाले. तेणे कडुन जगी प्रख्यात जाहले प्रथम अध्याये संपुर्णमस्तु.

### डी. नंबर १५२

**भरतपूर राजांचे पराक्रम**
**BHARATPŪR RĀJĀNCĀ PARĀKRAMA**

**कागद :** १६"x९". ३० ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

या भागात मोडी लिपीत लिहिलेली एकच मराठी रचना असून ती पृ. ६३३वर आहे. पहिल्या पानाच्या माथ्यावर मुळात अतिशय खराब झालेल्या मोडी हस्तलिखिताची ही नक्कल

असल्याचे लिहिले आहे. हस्तलिखित अतिशय वाईट असून अशुद्ध शब्दलेखनाचा यात मोठा भरणा आहे.

ही कैफियत सव्वीस प्रकरणांत विभागलेली असून तीत सर्वत्र कोऱ्या सोडलेल्या जागा दिसतात. भरतपूर येथे राज्य केलेल्या राजांच्या शृंगारकथा यात सांगितलेल्या असून त्याची महाभारतातील तशा उदाहरणांशी तुलनाही केलेली आहे. भरतपूर येथील काही राजांची नावे सोडली तर यात इतिहास दृष्ट्या महत्त्वाचे असे काहीही नाही. राजकुमारांना नीतिपाठ देणे, धोक्याच्या सूचना देऊन सावध करणे आणि दुष्कृत्यापासून दूर ठेवणे असा याचा उद्देश असावा असे वाटते. महाभारतातील काही कथा पुन्हा सांगितल्या आहेत. भरतपूरचे सौंदर्यही वर्णिलेले आहे. पुण्याचा एक रहिवासी नाना शंकर याच्याजवळ असलेल्या मूळ दस्तऐवजावरून कर्नल मॅकेंझी याच्या हाताखाली काम करणाऱ्या नारायणराव याने ही कैफियत २३ ऑगस्ट १८०६ रोजी नकलून घेतली. लेखकाचे नाव सांगितलेले नाही.

**प्रारंभ :** श्री सर्व देवस्त रुप परीकांदी अरंभास प्रधम गणेशा सरस्वती कुलदेवता... करावे.

**शेवट :** तारीख २४ माहे जुन सन १८०६ इसवी मुताबक अधीक माघ शुध ७ गुरुवार क्षेयनाम संवछर शेक शालिवाहन १७१८ दर जागा मुकाम मुला मुटा नदीचे संगेमे मुतसी बारुश... पुना... शुध रंगपा.

## डी. नंबर १५३

**भाऊगर्दी-पानिपत कैफियत**
**BHAUGARDI-PANIPAT KAIFIYAT**

**कागद :** १५"x ८". २५ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर ५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृ. १०४ वर सुरू होत असून ती फूल्सकॅप आकाराच्या देशी हातकागदावर लिहिलेली आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे. कैफियतीत ६२ पाने आहेत. रघुनाथ यादवाने रघुनाथ दादाला केलेल्या लांबलचक अभिवादनाने ही सुरू होते. पानिपत येथे झालेल्या मराठा व मोगल यांच्यातील युद्धाचे यात तपशीलवार वर्णन केलेले आहे. मराठा शिपायांनी दाखविलेल्या शौर्याचा यात खास करून उल्लेख असून भाऊगर्दी व सदाशिवराव भाऊ यांच्या वीरकृतीला मोठे महत्त्व देण्यात आलेले आहे. झडलेल्या चकमकींची नाववार यादी आणि दोन्ही पक्षांकडील जखमी व मृत सैनिकांची नावे दिलेली आहेत. पानिपतच्या युद्धातील काही महत्त्वाचे व बारीकसारीक तपशील दिलेले आहेत. कुण्या महादेव राव याने ही लिहिल्याचे शेवटी सांगितले आहे. यात वर्णिलेल्या घटनांच्या तारखा किंवा लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचा निर्देश नाही.

**प्रारंभ :** श्री. . . परायणांतःकरुण शौर्योदाय गंभीरदाय. . . गुणमंडति मणीनीकेत समस्थ समत मुख्य मणी मरीचीनी राजीत चरण नलीन गोद्वीज संरक्षणादी वदीत सत्कर्म धर्म परीपालनेक निधान समर्धाक...

**शेवट :** भिक्षा मागत स्वदेशात आले. कोण अगोदर निघाले ते मार्ग मव स्तनी बाग टाणेदारानी धरुन व भीलानी लुटुन मस्त केलें. काहिं जीव मारीले. मलहारजी होलकार– माधव.

## डी. नंबर १५४

**भीमन पाडु कैफियत**
**BHIMAN PADU KAIFIYAT**

**कागद :** ८"x ६". १८ ओळी. मराठी. जुने. खराब स्थिती. अपूर्ण.

या भागात काही इतर तेलगू रचना आहेत.

पृ. ३१ वर ही कैफियत सुरू होत असून ती देशी हातकागदावर लिहिलेली आहे. भीमन पाडू या खेड्याच्या स्थानिक इतिहासाशी ही संबंधित आहे. ही कैफियत काही जुन्या सीमा व आख्यायिका विस्ताराने स्पष्ट करते. स्वप्ने किंवा लोककथा या स्वरूपाच्या आख्यायिकासुद्धा सांगितल्या आहेत. नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही. प्रस्तुत हस्तलिखित लावणे फारच जिकिरीचे आहे.

**प्रारंभ :** भिमन पाडुचे कथा.

**शेवट :** शुक्रवारी संपळी.

## डी. नंबर १५५

**भोजराज पट्टण कैफियत**
**BHOJ RAJA PATNA KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावटीचा. १३"x ८ $\frac{१}{४}$". १३ ओळी. दुरुस्त केलेले. पूर्ण.

डी. नंबर १६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

समैवरम व भोजराजपट्टणम या दोन शहरांचे मूळ व इतिहास सांगणारी हकीकत पहिल्या पृष्ठावर येते. ही कैफियत

चार प्रकरणांत विभागलेली आहे. उत्तरेत राज्य करणाऱ्या भोजराजाने दक्षिणेचा प्रवास करणे, शिवाला समर्पित असे एक मंदिर व शहर समैवरमनजीक उभे करणे यामागील कारणे पहिल्या प्रकरणात येतात. समैवरम हे त्रिचनापल्ली जिल्ह्यातील एक शहर आहे.

दुसऱ्या प्रकरणात कवी कालिदासाचे जीवन थोडक्यात वर्णिलेले आहे. तिसऱ्या प्रकरणात विजयनगरच्या वीरदेव रंगाराय याने भोजराजाचा केलेला पराभव सांगितला आहे. विजयनगरहून भोजराजपट्टणमच्या सीमेवर मरिअम्मा या देवतेला कोणत्या परिस्थितीत आणण्यात आले याविषयीच्या वृत्तान्तावर कैफियत संपते. कालांतराने एक मोठे मंदिर बांधण्यात आले आणि या छोट्या खेड्याला समैवरम म्हटले जाऊ लागले. हे त्रिचनापल्लीतील एक उपनगर आहे. मंदिराच्या दगडी भिंतीवरील शिलालेखावरून या कैफियतीतील माहिती मिळालेली असल्याचे सांगितले आहे. नक्कलकाराचे नाव किंवा नकलेची तारीख यांचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ :** भोजराज पट्टण– पुर्वी या गावास विक्रमादीत्य पट्टण म्हणुन नावे एक विक्रम राजा राज्यभार करीत असताना एक्या दिवसी आपला प्रधान भेटीस बोलाऊन पाटवीला.

**शेवट :** त्यामध्ये पुर्वी बोजराजाचे हत्या वगैरे पापी पित होत करीता त्यास नाव द्राविड भाषने आनी कोळं म्हणोन नाव आहे. त्या टाईं आता थोडे बदखल मात्र आहे.

## डी. नंबर १५६

**भोसले यांची बखर**
**BHOSLANCI BAKHER**

**कागद :** इंग्लिश बनावट. ३ १/२" x ५". १४ ओळी. मोडी. चांगल्या स्थितीत पूर्ण.

डी. नंबर १३१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पहिल्या पानावर येते. या बखरीत भोसले घराण्यातील राजांचे मूळ व इतिहास सांगणारी ३६२ पाने आहेत. पहिली काही पाने बखरीची की बखरीचे भोसल्यांचे आणि त्यांचे पेशव्यांशी व मराठ्यांशी हे दोन मुद्दे जोडून स्पष्ट करतात. ही बखर म्हणजे या थोर शिवाजीचा वाढदिवस होय. याने केलेली कामगिरी आणि विजापूरचा सुलतान व दिल्लीचा बादशहा यांशी केलेली लढाई विस्ताराने वर्णिलेली आहे.

दुसऱ्या भागात शिवाजीच्या जीवनचरित्राचे वर्णन केलेले आहे. मालोजीपासून संभाजीच्या काळापर्यंत मराठ्यांनी कोणत्या परिस्थितीत किल्ले व तटबंद्या बांधल्या त्याचा उल्लेख केलेला आहे. किल्ल्यांची देखरेख ज्यांच्यावर सोपविली त्या व्यक्तींची नावे असून मोगलांच्या आक्रमणकाळात त्यांनी बचावकार्यात पार पाडलेली भूमिका यांचे मोठे रेखीव वर्णन केलेले आहे.

तिसरा भाग शिवाजी राजांचे खाजगी जीवन वर्णितो. अतिशय विश्वासू अशा अधिकाऱ्यांची नावे आणि मराठा संघराज्य बळकट करण्यात त्यांनी बजाविलेली भूमिका, याबद्दलची माहिती पुढे दिली आहे. संभाजीची कैद, औरंगजेबाने त्याचा केलेला निवाडा, त्याचा मृत्यू आणि औरंगजेबाने मराठा राज्य जिंकणे याचा वृत्तान्त कैफियतीच्या अखेरीस आलेला आहे. मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने ही बखर चांगली माहिती पुरविते.

बचोबा पैठणकर याच्याकडे असलेल्या मूळ दस्तऐवजावरून हा सर्वच भाग नारायणराव आनंदराव यांनी पुणे येथे २५ जुलै १८०७ रोजी नकलून घेतला असे सांगितले आहे.

**प्रारंभ :** प्रताप वंशावल भोंसले राजे यांची मुल पुरुष बावजी भोंसल पाटील मौजे दिगणी व देबुल गाव व वहरेडी वगैरे तालुके पावस प्रेंति पुणे यांची विस्तार त्यास पुत्रे दोघे तपसील.

**शेवट :** शके १६७७ शुक्ल संवछरी मार्गसीर्ष वद्य त्रितीयेस श्रीमंत राजा शाहु कैलासवास जाला. राज्य राजे श्री बालाजी बाजीराव प्रधान याली नीरवीले.

## डी. नंबर १५७

**भोंसले यांची वंशावळी**
**BHOSLE YANCI VAMSĀVALI**

**कागद :** इंग्लिश बनावट. ६" x ५". २० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १०२ वर ही कैफियत येत असून तिच्यात ५० पृष्ठे आहेत. ही दोन भागांत विभागलेली आहे. पहिल्यात भोसले घराण्याचा इतिहास आणि दुसऱ्यात पेशव्यांच्या अधिपत्याखालील मराठा राज्य यांचा वृत्तान्त येतो. शालिवाहन शके १५५० पासून निवेदनाचा प्रारंभ होतो. प्रत्येक वर्षांत घडलेल्या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना कालक्रमानुसार सांगितलेल्या आहेत व उल्लेखिलेल्या सर्व घटना शालिवाहन शकात सांगितलेल्या आहेत. भोसल्यांचा वंश, शिवाजींचे

माता-पिता, त्याचे बालपण, मोगलांना नमविण्यासाठी त्याने केलेल्या चढाया, मराठा राज्याची केलेली स्थापना हे सर्व अचूकपणे वर्णिले आहे. शिवाजीच्या वंशजापासून शाहूच्या नेतृत्वाखाली मराठा राज्याची पडझड सुरू झाली, येथपर्यंतची माहिती सदर कैफियत नंतर देते. ही इतिहासदृष्ट्या महत्त्वाची गणता येईल अशी असून, तिचे काळजीपूर्वक केलेले परीक्षण मराठ्यांच्या इतिहासावर मोठा प्रकाश टाकू शकेल. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** भोसले यांची वंशावली. व पेशर्वे यांची संवछर सुधा गोषवारा पटी शालीवाहन शेक १५०० पंधरासे... संवछत्रापासुन.

**शेवट :** शके १६३४ नंदन संवछरी राजा शाहु सातारा... होऊन राज्याचा बंदोबस्त अरंभीला. अष्टप्रधान केले. सातारा राहावयाचे स्थान केले.

## डी. नंबर १५८

**भोसले यांची वंशावली (राजेलोक)**
**BHONSLE YĀNCI VAMŚĀLI**

**कागद :** इंग्लिश बनावट. १३"x ८". १९ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर २ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पहिल्या पानावर ही कैफियत येत असून तिच्यात १३२ पाने आहेत. मराठा सैन्यप्रमुख बाळाजी भोसले आणि त्याचे विठोजी व मालोजी हे दोन पुत्र यांच्या मूळ उदयाचा तपशीलवार वृत्तान्त या हस्तलिखितात आहे. मराठा संघराज्य निर्माण करणाऱ्या साहसी वीरांना जन्म देणाऱ्या भोसले व जाधव घराण्यांच्या मुळाविषयीचा तपशील विस्ताराने दिलेला आहे. त्यांनी केलेले पराक्रम, दिल्लीचा पादशहा व विजापूरचा सुलतान यांची केलेली सेवा आणि ते क्रमाक्रमाने कसे समर्थ बनत गेले याबद्दलची माहिती दुसऱ्या भागात दिलेली आहे. थोर राजा शिवाजी याचा जन्मापासून मृत्यूपर्यंतचा इतिहास या कैफियतीत नंतर आलेला आहे. त्याच्या चढाया, त्याचा रायगडला झालेला राज्याभिषेक, त्याने केलेला राज्याचा विस्तार, जिंकलेले व नव्याने बांधलेले किल्ले असे अनेकविध घटनाप्रसंग अगदी तपशीलवारपणे उल्लेखिले आहेत. त्याच्या अनेक किल्ल्यांच्या व किल्लेदारांच्या नावांची यादीही दिलेली आहे. संभाजीचे राज्यारोहण, राजा म्हणून त्याच्यात असणाऱ्या उणिवा आणि तो औरंगजेबाकडून कसा पराभूत झाला व ठार मारला गेला या घटना, हा तिसऱ्या भागाचा आशय बनलेला आहे. सातारा व पुणे येथील राजारामाच्या वेळची राज्यस्थिती आणि पहिला पेशवा बाळाजी बाजीराव सत्ताधारी कसा बनला याची माहिती कैफियतीच्या शेवटच्या भागात येते. सर्वच घटनाप्रसंगांना शालिवाहन शकातील तारखा दिलेल्या आहेत. हा इतिहासदृष्ट्या एक महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून गणता येईल.

पुण्याच्या बचोबा पैठणकर याच्याकडे असलेल्या मूळ हस्तलिखितावरून आनंदराव नारायणराव यांनी २७ जुलै १८०७ रोजी ही कैफियत नकलली, असे शेवटी सांगितले आहे.

**प्रारंभ :** वंशावली भोसले राजांची. प्रताप वंशावली भोसले राजे यांची मुलपुरुष बाबजी भोंसलें पाटील मौ. हिंगणी व देवलगाव व वबोस्ड वगैरे तालुके पोट संप्रत पुणे यांची विस्तार त्यास पुत्र दोघ तपसील.

**शेवट :** श्री ज्ञानदेव उरुफ ज्ञानेश्वर भगवत गीताचे टीका प्राकृत केल होते. यानी समधी घेतली शेक १२१२ खर सावछर कार्तीक वध्ये ११. कलम १. हे थोर बखर समाप्त. हे बखर बच्योबा पैटणकर हाली वस्ती पुने याजकडुन प्रती लिहीले ते मुतसही नारायणराव व आनंदराव ईलास्वे मेजर कालन मेकेंजी सो. सुपरेंडेंट ऑफ दी मैसुर बा तारीख २५ माहे जुलैई सन १८०७ इसवी दर जगा मुला मुठा नदीसंगम मुतसील पुना.

## डी. नंबर १५९

**मगध देशाची कैफियत**
**MAGADHA DESANCI KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १८"x ८". २९ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृ. ६६९ वर येत असून, तिच्यावर तिचा आशय स्पष्ट करणारी इंग्रजीत एक टीप आहे. अशुद्ध शब्दलेखन आणि चुकीची विरामचिन्हयोजना या कैफियतीत मोठ्या प्रमाणावर आहे. वैष्णवपुराणा (की विष्णुपुराणा ?) संबंधीच्या काही कथा प्रारंभी दिसतात. काही प्रांतांच्या राजांची नावे आणि मगधावर त्यांनी राज्य केल्याचा काळ उल्लेखिलेला आहे. ऐतिहासिकदृष्ट्या कमी किंमत असलेली सामान्य माहिती कशीही दिलेली आहे. ही कैफियत विक्रमादित्य राजाचा इतिहास सांगते. तसेच त्याला थोरपणा कसा प्राप्त झाला वगैरे त्याच्यासंबंधी अधिक माहिती देणाऱ्या आख्यायिका/दंतकथाही

सांगितलेल्या आहेत. शक्य होतील ते प्रयत्न करून अनेक पुस्तकांतून जमा केलेल्या माहितीच्या आधारे ही कैफियत तयार केली असल्याचे अखेरीस म्हटले आहे.

**प्रारंभ :** १००० परीक्षीतु वगैरे राजे पांडव वंशस्त राजे राज्यभार केला साल. परीक्षीतु कलीयुगी वरुष ४५.

**शेवट :** सदरी लिहीले ते राजैचे... मनास लिहुन दिलहे. त्यामर्थी दाखल पडल आहे सावकास नसता परवार पावतील म्हणुन. . .आपण साधून विलेवारी करुन घेतल पाहिजें. अपण व हजरत मेजर मकींजी सार सांगीतले कडुन सोवान कली आहे श्रुत होई.

## डी. नंबर १६०

### मतुर स्थल कैफियत
### MĀTURSTHALA KAIFIYAT

**कागद :** १०"x ५$\frac{१}{४}$". इंग्लिश बनावट. २१ ओळी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३३ वर ही कैफियत येत असून तीत चार पाने आहेत. मतुर नावाच्या एका गावाचे मूळ व इतिहास यात सांगितला आहे. ही जागा एके काळी घनदाट जंगल होती. कतरी गौंडा नावाच्या कुण्या व्यक्तीने मंदिरे, इमारती, जलाशय, कालवे बांधून तिचे शहरात रूपांतर केले. हे शहर तुंगभद्रेच्या तीरावर वसले असल्याचे सांगितले आहे.

कुरुंब घराण्यातील गंगराज जेव्हा राज्य करीत होता तेव्हा कतरी गौंडाला मोठ्या प्रमाणात गुप्त धन सापडले. त्याने त्याबद्दल राजाला कळविले. गौंडाच्या प्रामाणिकपणाला दाद म्हणून राजाने ते सर्व धन गौंडाला दिले. त्यानेही मंदिरे, जलाशय इत्यादी लोकोपयोगी गोष्टींवरच ते धन खर्च केले. ही जागा मुतू ऋषीचे निवासस्थान होती, म्हणून गंगरायाने त्या ऋषीचे नावच त्या गावाला दिले. गौंडाने बांधलेल्या मंदिरांची नावे, जलाशयांची नावे किंवा लेखकाचे नाव किंवा कैफियतीची तारीख यांवर यात प्रकाश टाकलेला नाही.

**प्रारंभ :** श्रीमतुर स्तल कैफियत पुवी मतुर म्हणावयाच स्तल आरण्य होत. तेथ तुंगा नदी उतरवाहिनी तीरी मरुत मुनेश्वर म्हणारा रुपी या आरण्यात अश्रम बांधुन घेउन तपकरीत होता.

**शेवट :** गाव नाही वरी तुंगा नदी तीरी अग्रहार बांधुन दिलहे पहिले सदरी लिहलि खेडे मातुर म्हणाव यात जाणीजे.

## डी. नंबर १६१

### मद्रास बालघाट श्रीरंगपटण कैफियत
### MADRAS BALGHAT SRIRANGAPATNA KAIFIYAT

**कागद :** देशी ७"x ५". १३ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ४७१ मध्ये सांगितलल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पहिल्या पानावर ही कैफियत सुरू होत असून तीत १२ पाने आहेत. सय्यद अबदुल्ला भाई फकीर याचा नातू सय्यद याकूबसाहेब यास त्याने टिपू सुलतान व कर्नाटकचे नवाब यांचा पराभव करण्यात मदत केल्यामुळे जहागीर देतो, असे सांगून (पुढे ती न देता) ईस्ट इंडिया कंपनीने त्यास कसे फसविले याचा वृत्तान्त आलेला आहे. सय्यद अबदुल्ला फकीर याच्यात वसणाऱ्या अद्भुत शक्तीचे वर्णन काही परिच्छेदांत करण्यात आलेले आहे. तसेच त्याची मुले व नातवंडे कशी मोगल दरबारात व विजापूरच्या सुलतानाच्या दरबारात मोठे अधिकारी झाली, हाही वृत्तान्त त्यात आलेला आहे. त्याची काही नातवंडे मद्रास, बालाघाट व श्रीरंगपट्टण येथील समर्थ पाळेगार झाली. सय्यद याकूब हा टिपू सुलतानाचा विश्वासपात्र सेवक होता. जेव्हा ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकारी लॉर्ड मार्टिन याने श्रीरंगपट्टणावर हल्ला केला तेव्हा सय्यद याकूबने कंपनीस मदत केली व टिपू सुलतानाचा पाडाव शक्य केला. या मदतीचा मोबदला म्हणून ईस्ट इंडिया कंपनीने त्याला जहागीर देण्याचे मान्य केले होते असे सांगण्यात येते. या लॉर्ड मार्टिनने आश्वासन पुरे न केल्यामुळे सय्यद याकूबने पुन्हापुन्हा कंपनीकडे अर्ज पाठविले. पण कंपनीकडून त्याला काहीच उत्तर मिळाले नाही. या कैफियतीत लेखकाचे नाव, माहितीचे मूळ किंवा तारखा यांचा उल्लेख नाही.

**प्रारंभ :** कैफियत सैद याकूस सा बहदुर चेत्रपट्टण मुतालुके बालघाट श्रीरंगपटण वगैरे यानी लिहीवीला जुबानी.

**शेवट :** बगंलास जावुन अध्याय आला नाही. वरकड मजीली नकतर नामांत दरज केला आहे. त्या अमलदार एक रसीदी जाहर वाहावे. . .ऐसा यांचे कैफियत जुबानी सांगीतल्याप्रमाणे कलमति अल आहे. वरकड सनदावरी मोकुल आहे.

## डी. नंबर १६२

**मयुरवर्मा कैफियत**
**MAYURA VARMĀ KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ५ $\frac{१}{२}$ ". २६ ओळी. मोडी. जुने व खराब. पूर्ण.

डी. नंबर २७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

यात ४२ पाने असून ती या भागाच्या ३८ व्या पानावर सुरू होते. जयंती पट्टण या गावाचे मूळ आणि ते वसविणाऱ्या मयूर वर्मा याचे जीवन यांच्यासंबंधी प्रस्तुत कैफियतीद्वारे काही माहिती मिळते. हा मयूर वर्मा कुरुंब घराण्यातील असून विजयनगरजवळच्या काही भागांवर त्याचे राज्य होते असे सांगितले आहे. परशुराम हा रामाकडून कसा नमविला गेला आणि परशुरामाने एक नगर (कसे) उभे केले यासंबंधीची एक कथा या कैफियतीच्या दंतकथात्मक प्रस्तावनेत आलेली आहे. परशुरामाने काही ब्राह्मण निर्माण केले आणि त्यातील एक म्हणजे (या) मयूर वर्माचा आजोबा होय, असे पुढे सांगितले आहे. कुरुंब घराण्यातील पुरुषांच्या नावांची एक मोठी यादी दिलेली आहे. विजयनगरच्या घराण्याचा संस्थापक हरिहर याच्या स्वारीमुळे हे घराणे कायमचे नाहीसे झाले, असे अखेरीस सांगितले आहे. शालिवाहन शकात काही तारखा दिलेल्या आहेत. प्रस्तुत हस्तलिखित सुब्रह्मण्य अय्या यांच्या मालकीत होते. त्यावरून माधवराव याने २२ जुलै १९४२(?) रोजी ही नक्कल तयार केली. मराठी अर्थासह काही संस्कृत श्लोक या कैफियतीत दिसून येतात.

**प्रारंभ :** श्री गुरुभ्यो नमः, नैमीशारण्यात शौनकादी रुषाश्वरानी... विच्यारीले जें.

**शेवट :** माधवराव सदासीव तांबे सखे १७४२ खर नाम संवछर माहे जुलाई तारीख ईंग्रजी २२ सन १८२० मुकाम कनकता. बहुत काय लिहु कृपा लोभ किज हे विज्ञापना.

## डी. नंबर १६३

**मराट्यांची बखर**
**MARĀTTYĀNCI BAKHER**

**कागद :** इंग्लिश बनावट. ९ "x ५ ". २३ ओळी. जुने. खराब. पूर्ण.

या हस्तलिखितात १९२ पाने असून त्याद्वारे इ. स. १००० ते इ. स. १६७६ या काळातील मराठ्यांचा इतिहास सिद्ध होतो आहे. कॅप्टन ग्रँट डफने लिहिलेल्या 'मराठ्यांचा इतिहास' या इंग्रजी ग्रंथाचा कॅप्टन डेव्हिड कॅफेन याने जानेवारी १८३० मध्ये केलेला हा अनुवाद असल्याचे पहिल्या पानावरील छोट्याशा टिपेवरून लक्षात येते. या भागात पहिली तेहतीस प्रकरणे आलेली असून, प्रत्येक प्रकरणास एक छोटीशी प्रस्तावना आहे. पहिले प्रकरण पृ. ४२ वर सुरू होते. पृष्ठे सुट्या अवस्थेत असून त्यांतील काही फिकट व जीर्ण झालेली आहेत, तर काहींना पानकिड्यांमुळे भोके पडलेली आहेत. मोगल आणि पाच (सुलतान) शाह्या यांचा इतिहास आणि मराठ्यांचे मूळ हा या भागातील वर्ण्य विषय आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी आणि वाच्य आहे. नक्कलकाराचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** बखर मराठ्यांची क्यापटन ग्रांट डपू याणी इंग्रजीत केलेली तीचे भाषांतर क्यापटन डेविड केपनसाहेब याणी महाराष्ट्र भाषेत केले. मुंबाई जनवरी सन १८३०.

**शेवट :** सन सोलाशे शाहातरा पासुन ऐंशीपर्येंत झालेली वर्तमान मीलुन भाग नववा अनुक्रमाणिक शिवाजी कर्नाटक प्रांत घ्यावयास तो प्रकार गेला तो शिवाजीकडे जाताना वाटेत देवस्थान पाहुन तपस करावयास गेला.

## डी. नंबर १६४

**मराट्यांची बखर**
**MARĀTTYĀNCI BAKHER**

**कागद :** इंग्लिश बनावट. ९ "x ५ ". २३ ओळी. जुने. खराब. अपूर्ण.

या भागात १६८ पाने असून डी. नंबर १६३ मध्ये सांगितलेल्या ग्रँट डफने लिहिलेला मराठ्यांचा इतिहास या ग्रंथाच्या कॅप्टन डेविड कॅफेन याने मराठीत अनुवाद केलेल्या इतिहासाचा हा दुसरा भाग आहे. पृष्ठे सुटी असून त्यातील काही खराब अवस्थेत आहेत. हस्ताक्षर चांगलेच आहे. डी. नंबर १६३ मध्ये असल्याप्रमाणे प्रस्तावना किंवा प्रकरणांतील वर्ण्य विषयाची यादी यात नाही. आधीचे अपुरे राहिलेले नववे प्रकरण यात पुढे चालू केलेले आहे. पंधरावे प्रकरण हे यातले अखेरचे प्रकरण असून हा भाग अपूर्णच आहे. या भागातील वर्ण्य विषय मराठ्यांचा इतिहास हा आहे. नक्कलकाराचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** त्याणे कर्नाटकीं जाऊन युत्ध कोणे प्रकारें केलें ते आणि त्याचा सावत्र भाऊ व्यंकाजी याशी बोलणे जालें ते प्रकरण. मोगल आणि विजापुरकर मिलून गोवल कोडकैर यांचे राज्य बुडवा यास सेना पाठविले.

**शेवट :** असें (वला) जालें. शेवटी मराठ्यानी मसलत केली कीं, (एकटाच) पांच सुरुंग उडवुन तटास मोटी खेंडार पाडले म्हणजे मार्ग मोटा होईल. नंतर पांच सुरुंग तयार केलं.

## डी. नंबर १६५

**मराटी (लोकांची) अडनावाची बखर**
**MARĀTTI (LOCKĀNCI) ADANĀVĀCI BAKHER**

**कागद :** इंग्लिश बनावट. १०"x५ $\frac{१}{२}$". २५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर २७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृ. ३१ वर सुरू होत असून यात चार पाने आहेत. शिंदे, घोरपडे, भोसले, होळकर आणि पवार या प्रमुख व महत्त्वाच्या मराठा घराण्यांचे मूळ व इतिहास यात वर्णिलेला आहे. शिवाजीच्या हाताखाली काम केलेल्या महत्त्वाच्या व्यक्तींची नावे आणि शिवाजीकडून त्यांनी मिळविलेले मानमरातब यांचाही यात उल्लेख आहे. वर उल्लेखिलेल्या घराण्यांच्या मुळाबद्दलच्या छोट्या टिपा आणि शिवाजीच्या नेतृत्वाखालील अनेकविध मोहिमांत प्रत्यक्ष भाग घेतलेल्या काही व्यक्तींची नावे दिलेली आहेत. लेखकाचे नाव किंवा कैफियतीतील माहितीचे मूळ दिलेले नाही किंवा तारखाही दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ :** [illegible] लोकांचे [illegible]. पुर्वी श्रीमंत बाजीराव यांचे [illegible] त्यानी एक [illegible] टेविले होते.

**शेवट :** पेवार [illegible] अडनाव मराटे [illegible] अधिकार त्याचे नाव मुदोजी पेवार [illegible]. त्याचे लेक [illegible] पेवार त्याचे लेक देवराव पेवार त्याचे लेक हरिराव पेवार त्याचे लेक भवानीराव पेवार. त्यास [illegible].

## डी. नंबर १६६

**मराठी राजांची कैफियत**
**MARATTI RĀJĀNCI KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १०" x ८". ३१ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

हा दस्तऐवज [illegible] इतिहास आहे. [illegible]

**विशेषत्वाने** उल्लेख केलेला आहे. शिवाजीचे वाढते सामर्थ्य आणि त्याने मोगलांचे अनेक भूप्रदेश कसे ताब्यात घेतले याबद्दलचे निर्देश यात आहेत. या कैफियतीत मोठ्या प्रमाणात चुका आढळत असून विरामचिन्हांची योजनाही चुकीची आहे. ही मुळातील दस्तऐवजाची नक्कल दिसत असून तीत लेखकाचे नाव किंवा तारीख दिलेली नाही. या कैफियतीच्या प्रारंभी काही दंतकथात्मक आख्यायिका दिलेल्या आहेत.

**प्रारंभ :** पुर्वी हे राज्यांत जेयनाचे अधिकार होत. प्रताप रुद्र च काली त्याच नाष जाहल.

**शेवट :** नाना साहेबास म्हणाले जे तुम्ही (बाहर) चारानीसी आमल आहाकरीते... घालुन घेउन. तुमजे फौजातं जाऊन पावल्या नंतर शहर बंदोबस्त करुन घेणे म्हणुन सांगुन वैकुंट यात्रा केलें मग सिखा घेऊन आपल्या राज्यांत मिलुन...

## डी. नंबर १६७

**मराटी राजांची कैफियत (अडनावाची बखर)**
**MARATTI RAJANCI KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १०" x ५ $\frac{१}{२}$". २२ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर १ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. १३९ वर येत असून तीत ८ पाने आहेत. हा दस्तऐवज फिकट झालेला असून किंचित खराब अवस्थेत आहे. एक ब्राह्मण श्रीमंत कसा झाला आणि तो विजापूर, विजयनगर व हैदराबाद यांचा निर्माता कसा झाला याविषयीच्या आख्यायिकेने याची सुरुवात होते. आपल्या एका विश्वासू शिष्याहाती त्याने ही शहरे सोपविली. विजयनगरच्या इतिहासाचा एक छोटासा आराखडा दिलेला आहे. या कैफियतीत शहाजी व इतर मराठा नेते यांचे चरित्र सांगितलेले असून, मुळापासून मराठ्यांचा इतिहास सांगण्यास विशेष महत्त्व दिले आहे. विजापूरच्या सुलतानाच्या दरबारातील शहाजीचे जीवन, शिवाजीचे बालपण आणि तो त्याच्या [illegible] होत गेला हे सांगितले आहे. संभाजीने वाईट रीतीने हाकलेला राज्यकारभार आणि मराठा राज्याचे औरंगजेबाने आपल्या राज्यात करून घेतलेले सामिलीकरण याचे मोठे रोचक वर्णन केलेले आहे. नाना फडणवीसाचा कारभार [illegible] ही कैफियत संपते. यातील माहितीचे मूळ किंवा यातील प्रसंगांच्या तारखा दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ** : पूर्वी हे राज्यांत जेयनाचे अधिकार होत. प्रताप रुद्राचे काली त्यांचा नाष जाहाला नंतर नव चोल राज्यान फार दिवस अधिकार करीत असे.

**शेवट** : नाना साहेबास म्हणाले जे तुम्ही– अमल करीत असता सीखा घेऊन तुमचे राजांत जाऊन पावल्यानंतर शहर बंदोबस्त करू घेणे म्हणून सांगुन वैकुंट यात्रा केले...

## डी. नंबर १६८

**मराठी राजे**
**MARATTI RĀJÊ**

**कागद** : स्थानिक बनावट. १४" x ५". २२ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
चारी युगातील राजे
हस्तिनापूर राजे
हिंदूपती राजे
मुसलमान राजे
पेशवे

या भागाच्या पृ. २९ वर सुरू होणाऱ्या या कैफियतीत ३४७ पाने असून ती भोसल्यांच्या इतिहासाशी संबंधित आहे. तिच्या प्रारंभी दिल्लीच्या मोगल राजवटीबद्दलचे छोटे प्रास्ताविक आहे. थोडक्यात शिवाजीच्या पूर्वजांबद्दलची माहिती दिलेली आहे. कालानुक्रमाने शिवाजीच्या जीवनात घडलेल्या सर्व महत्त्वाच्या घटनांचा वृत्तांत नंतर दिलेला आहे. औरंगजेबाने शिरच्छेद करीपर्यंतच्या संभाजीच्या जीवनाचे मोठे रेखीव वर्णन केलेले आहे. राजाराम व ताराबाई यांच्या कारभारापासून बाळाजी बाजीरावाच्या उदयापर्यंत इतिहास कैफियतीच्या शेवटच्या भागात आलेला आहे. शालिवाहन शक १५०० ते १६६४ मधील सर्व घटना कालानुक्रमे वर्णिलेल्या असून त्यांच्याशी जुळणाऱ्या अरबी तारखा दिलेल्या आहेत. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ यांविषयी काही उल्लेख नाही.

**प्रारंभ** : सदरहू अमल हस्तनापूरी येवनानी हिंदुची पाद पातशाहात घेऊन त्यास्थळी यास दिल्ली नावे उप नावे आपल्या फारसी भाश्याने टेविले.

**शेवट** : शके १६७१ आले तो मार्गेस्वर (?) मासी सुध ७ शाहू महाराज यांचे काल जाला अवतार संपला शाहू कार कर्दी वरुष ४१ येके ताळीस.

## डी. नंबर १६९

**मराठे व पेशवे**
**MARĀTE VA PESVE**

**कागद** : स्थानिक बनावटीचा. १०" x ५". १८ ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर १६७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृ. ७५ ब वर येत असून, तीत २० पाने आहेत.

मराठ्यांचा इतिहास आणि पेशव्यांचे सत्ताग्रहण व १६३६ ते १६४१ पर्यंतचा कारभार यांच्याशी ही कैफियत निगडित आहे. घटना-प्रसंग कालानुक्रमाने योजिलेले असून महिने व तारखा यांचाही उल्लेख आहे. बाळाजीरावाचे पदग्रहण आणि त्यानंतर शेवटच्या पेशव्यापर्यंत मराठ्यांच्या कारभारातील घटना यांचे वर्णन यात आहे. साताऱ्याची गादी मिळविण्यात दौलतराव शिंदे कसा यशस्वी झाला, याची माहिती कैफियतीत दिलेली आहे. कैफियतीच्या शेवटच्या पृष्ठात भोसल्यांच्या वंशावळीचे वर्णन केलेले आहे. शेवटच्या पृष्ठाचा खालचा भाग गहाळ झालेला आहे. उरलेल्या भागात हा दस्तऐवज १२ एप्रिल १८०६ रोजी पुरा केला असे सांगितले आहे. नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ** : शके १६३६ तागायेत शेक १६४१ सालासें एक ताळीस शाहू माहाराज सातारांत आहेत.

**शेवट** : तारीख छ १२ माहे एप्रल सन १८०६ ईसवी दर जागा मुला मुटा नदी संगम मुतसील पुना पहिल्या पासून अजे तागायेत चालीले वृतांत सर्वही शेक संवछर दिन मास सुत्धा झाडुन आहे.

## डी. नंबर १७०

**मल्लपटण कैफियत**
**MALLAPTNA KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२" x ९". २४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ४२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

हा दस्तऐवज या भागाच्या १६ व्या पृष्ठावर सुरू होत असून, याचे हस्ताक्षर चांगल्यापैकी व वाच्य आहे. तेलंगणातील

मल्लापट्टणम् या गावाचे मूळ व इतिहास यांच्याशी ती निगडित आहे. या गावाचे भौगोलिक स्थानही सांगितले आहे. हे वेंकटगिरीनजीक वसलेले आहे. मल्लासुर या दैत्याच्या समर्थ जीवनाशी निगडित असणाऱ्या पौराणिक आख्यायिका आणि सुब्रह्मण्यम् या देवाकडून त्याचा निःपात व्हावा, अशी परिस्थिती यांचे वर्णन यात आलेले आहे. या दैत्याने केलेल्या खास विनंतीनुसार तो राहत असलेले ठिकाण मल्लपट्टण म्हणून संबोधिले गेले. देव सुब्रह्मण्यम् याचे मंदिर आणि त्याला जोडून बांधलेल्या इमारती या एका चोल राजाकडून निर्मिल्या गेल्या. राजांची नावे, तारखा किंवा या माहितीचे मूळ ही दिलेली नाहीत. या भागाच्या रहिवाशांच्या चालीरीती किंवा जगण्याच्या पद्धती या मात्र सांगितलेल्या आहेत.

**प्रारंभ :** पुर्वी मल्लपट्टण म्हणावयाच आरण्य वन होतें. त्या वनाच नाव वेणुवन यैसे असतां मल्लासुर म्हणार राछस आरण्यांत असुन बहुकाल ईश्वरा प्रती तपस केला.

**शेवट :** रटाच गुडार घालुन घेऊन्न कांवळ्याच गुडर घेऊन्न विकण तन्मुळे हे दोनी जाती वालेस भांडण तेणे कडुन उछव राहिल. हे नव्हतां द्रव्य बलही नाही उछब करणेस. हे कैफियत समाप्त जाहाल.

## डी. नंबर १७१

### माहाराष्ट्र ब्राह्मणांची पांच जातीची कैफियत
### MAHĀRĀSTRA BRAHMANĀNCI PANCJĀTICI KIFIYAT

**कागद :** स्थानिक बनावट. १३" x ८". २४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. १०२ वर ही कैफियत येते. ती मराठी ब्राह्मण जातीतील भिन्न भिन्न उपजातींशी संबंधित आहे. या उपजातींची नावे, त्यांचे मूळ व इतिहास, त्यांच्या सवयी, चालीरीती, जीवनपद्धती यांचे थोडक्यात वर्णन केलेले आहे. त्यांना पूजनीय असणाऱ्या देवता, या देवतांसाठी ते करीत असलेला त्याग (अनुष्ठाने) इत्यादींचाही निर्देश केलेला आहे. मराठी ब्राह्मणांतील काही जातींचा व्यवसायही वर्णिलेला आहे. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ यासंबंधी प्रस्तुत कैफियतीत काहीही सांगितलेले नाही.

**प्रारंभ :** कैफियत माहाराष्ट्र ब्राह्मणाचे ज्यातीचे. माहाराष्ट्र ब्राह्मण पांच. द्रावडांत एक. त्याचे तपशील.

**शेवट :** ब्राह्मणाचे घरीचे मुलिस वराहाड करून घेतात. परंतु त्याचे मुलीस चित पावन ब्राह्मणास देत नाहित. वरकड गोर गरीब आपल्यास त्या गोत्रांतच समध करीताती.

## डी. नंबर १७२

### माधो राजुल वंशावली
### MĀDŪ RĀJULU VAMSĀVALI

**कागद :** स्थानिक बनावट. ११" x ६". ३३ ओळी. मोडी. खराब स्थिती. पूर्ण.

या भागातील इतर रचना डी. नंबर ४८ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत

ही कैफियत या भागाच्या पृ. ४३ वर येते. हे सर्वच लेखन अतिशय खराब अवस्थेत आहे. राजे आणि त्यांनी राज्य केले ती शहरे यांची एक यादी इथे नोंदलेली आहे. एकूण १४५ नावे दिलेली आहेत. जागांचे तपशील व त्यांनी किती काळ राज्य केले ते सांगितलेले नाही. नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ याबद्दल काहीही उल्लेख नाही.

**प्रारंभ :** महाराज राजेश्री माधो राजुलु व गावाची तपशील व वंशावली.

**शेवट :** श्री कावेरी माहाराज. आचेद्रार्क वेंशाबी वृधीर्स्तु.

## डी. नंबर १७३

### मालोजी भोसले कैफियत
### MĀLOJI BHONSALE KAIFIYAT

**कागद :** स्थानिक बनावट. ७" x ५". १३ ओळी. मोडी. खराब स्थिती. अपूर्ण.

या भागातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :

| | |
|---|---|
| सिंहासन बत्तिशी | ३ ते २८४. |
| सुदामा चरित्र | २८५ ते ९१. |
| काशीविश्वनाथ कथा | २९२. |

या भागाच्या पृ. २९३ वर ही कैफियत येते. मालोजीचे धाडस व शौर्य आणि तो मनसबदार कसा झाला याचा वृत्तांत पहिल्या काही पानांत येतो. पुढे मालोजीने वाघाशी दिलेली लढत आणि त्याचे कुस्तीतील कौशल्य यांविषयीचे तपशील येतात. हा सर्व कथाभाग एकदमच इथे थांबतो. कारण इतर पृष्ठे गहाळ

झालेली आहेत. लेखकाचे नाव, प्रसंगांच्या तारखा किंवा यातील माहितीचे मूळ यांविषयी कसलाही निर्देश नाही.

**प्रारंभ** : पुर्वी द्वापरयुगी मांडवेरुषी उत्तर देशाहुन भुसंच्यार करीत अनेक दिवसांपरी दक्षेण प्रांती अहमदनगरास दक्षेण भागी दाह कोस जमीन घुर देखीलें.

**शेवट** : बगली बुकाणी होऊन वरी उडुं लागला... आगांस लाउ माग ती अवजा करुन पहीली... घीदला. तो मस्तकी वरी काहाडली...

## डी. नंबर १७४

**महाराष्ट्र ब्राह्मणांचे कैफियत**
**MAHĀRĀŚTRA BRĀMHĀNACE KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १७" x ८". २६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर १५३ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ६७९ वर ही कैफियत येते. महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजाच्या पाच उपजातींचे मूळ, इतिहास, त्यांच्यातील रूढ चालीरीती, जीवनपद्धती यांचे स्पष्टीकरण यात होते. या उपजातींतील व्यक्तींची निवासस्थले यानंतर सांगितलेली आहेत. महसूल-खाते व लष्कर यातील काही ब्राह्मण अधिकाऱ्यांची नावे सांगितलेली आहेत. माहितीचे मूळ किंवा लेखकाचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ** : कैफियत महाराष्ट्र ब्रह्मणाच जातीचे महाराष्ट्र ब्राह्मण पंचेद्र... एकच तपशील.

**शेवट** : घरचे... मुलीस चितपावणी ब्राह्मण यास देत नाहीत. वरकड गराब आपला घरास समीप करीताती...

## डी. नंबर १७५

**मुसलमान राजे**
**MUSALMĀN RAJE**

**कागद** : इंग्लिश बनावट. १३" x ५". २२ ओळी. मोडी, जुने. पूर्ण.

डी. नंबर ५३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या दहाव्या पानावर ही कैफियत येते. मुसलमानांच्या निर्मितीमागील पौराणिक स्पष्टीकरण महिना-दिवस अशा अरबी कालगणनेसह अगदी विस्ताराने निवेदिलेले आहे. काही ठिकाणी अर्थासह संस्कृत श्लोक मोडी लिपीत लिहिलेले आढळतात. शिवाचे आशीर्वाद मिळवून हस्तिनापूरचा बादशहा होणारा पहिला मुसलमान म्हणजे सुलतान रूम नूदानी असे यात सांगितले आहे. दिल्लीच्या सिंहासनावर बसलेल्या व्यक्तींच्या नावांची यादी आणि त्यांच्या राज्यकारभाराचा काळ सांगितलेला आहे. नक्कलकाराचे नाव किंवा या माहितीचे मूळ याबद्दल काहीही लिहिलेले नाही.

**प्रारंभ** : प्राकृतार्थ पाहतां श्री ईश्वर सदासीव यानी या निर्मल (शल्ल) पार्वतीस सांगितले.

**शेवट** : अहमद शा : १ १९-०-०
महमद शा : १ १९-१-८
आली गौदर पातशा १ ३९-०-०

## डी. नंबर १७६

**मैसुर कैफियत**
**MYSORE KAIFIYAT**

**कागद** : स्थानिक बनावट. १०" x ७". २१ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १४३ वर ही कैफियत येते. तिची पृष्ठे फाटलेली असून ती काळजीपूर्वक हाताळणे आवश्यक आहे. म्हैसूरचे मूळ व इतिहास ही स्पष्ट करते. राजा महाबलो भजत असलेल्या पालक देवतेकडून महिषासुर नावाचा दैत्य मारला गेल्याच्या पौराणिक कथेपासून हिचा प्रारंभ होतो. काही काळ उलटल्यानंतर वोडियार राजे बलिष्ठ झाले आणि त्यांनी यादव राजांकडून म्हैसूर ताब्यात घेतले असे सांगितले आहे. कृष्णदेव राज हा वोडियार घराण्यातील पहिला राजा म्हटला जातो. म्हैसूरला राज्य केलेल्या राजांची नावे या कैफियतीत तपशीलवार दिलेली आहेत. म्हैसूरवर मोगल व मराठे यांनी केलेल्या स्वाऱ्या आणि वोडियार घराण्यातील राजांचा कसा पराभव झाला हे थोडक्यात स्पष्ट केलेले आहे. कावेरी नदीला घातलेले बांध व बांधलेले घाट यांचा खास करून निर्देश केलेला आहे. तसेच आपल्या जमिनी पाण्याखाली आणून जास्त पीक घेण्यासाठी तेथील लोकांना मराठ्यांनी केलेल्या मदतीचाही निर्देश केलेला आहे. वोडियार राजांच्या कारकिर्दीतील लढाया, वेढे, विजय व पराजय यांविषयी लिहिलेल्या छोट्या टिपा कैफियतीच्या शेवटच्या भागात आढळून

येतात. सर्व महत्त्वाच्या घटना आणि प्रत्येक राजाचा कालखंड याबद्दल शालिवाहन शकात निर्देश केलेला आहे. नक्कलकाराचे नाव किंवा या कैफियतीतील माहितीचे मूळ यांचा उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ :** मैसुर संवस्थानचे कैफियत. तपसील हे राजे चंद्रवंशी अत्रीच गोत्र म्हणुन नाव झाले.

**शेवट :** अलिकडे मैसुर सवंस्थान सिधार्थी संवछर जेष्ट बहुल १ भानुवारी कृष्णराज वडयारासी पट्ट बंधीले आहे. ते शक १९२० या राजे लोकांची तपशील.

## डी. नंबर १७७

**मैसुरांतील देवालय**
**MYSORĀNTILA DĒVĀLAYA**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० " x ७". २१ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना आहेत.

या भागाच्या ७५९ व्या पानावर ही कैफियत येते. डी. १७६ मधील कैफियतीचाच हा दुसरा भाग असावा असे वाटते. म्हैसूर व श्रीरंगपट्टण येथे हैदर अली व टिपू सुलतान यांनी बांधलेल्या मशिदींचा इतिहास प्रारंभीच्या काही पानांवर येतो. त्यांना दिल्या गेलेल्या देणग्या आणि तेथे होणारा धर्मादाय खर्च थोडक्यात सांगितलेला आहे. इतर पानांत श्रीरंगपट्टण येथील हिंदू मंदिराबद्दलची माहिती सांगितलेली आहे. हिंदू राजांनी त्यासाठी दिलेल्या देणग्या, हैदर व टिपू यांनी दिलेल्या देणग्या आणि या मंदिरातील दैनंदिन पूजाअर्चा व उत्सव यांसाठी केलेल्या व्यवस्था यांचेही वर्णन केलेले आहे.

श्रीरंगपट्टण व म्हैसूर येथील मंदिरांत इतर इमारतींचे बांधकाम केलेल्या राजांची नावे दिलेली आहेत. पृष्ठांची नीट रचना केलेली नाही. प्रस्तुत कैफियतीचे शेवटचे पृष्ठ या भागाच्या प्रारंभीच्या पृष्ठांत आढळले. त्याला ७ हा क्रमांक दिलेला दिसतो. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ सांगितलेले नाही.

**प्रारंभ :** देवलाचे कैफियत. पटणांत असणेचा देवळ कदीम हजारे बरसाचे देवल–२ सी तपसील. रंगनाथच पुजा करणार वैष्टणव पुजारी रामानुज मत केल.

**शेवट :** १. त्या देवला नजंदीक बुलदं x x x आहे. मकानात वीरबद्रचे देवस्थान १०० वरुषा पासुन आहे त्यासी टीपुसुलतानानी त्यासी बेतरी बांधावे म्हणुन तजबिजदजविज देतव्होता हालि ते मकान खाली आहे. देवासी काडुन-पुजारीचे घरांत टेवणे म्हणुन सांगीत (ला).

## डी. नंबर १७८

**मैसुर कैफियत**
**MYSORE KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. ३८" x १०". २९ ओळी. जुने. अपूर्ण.

या भागाच्या पृ. ७६८ वर ही कैफियत येते. प्रारंभ व शेवट फाटलेल्या स्थितीत आहेत. म्हैसूरचा हैदर अलीखान याच्या राज्यकारभाराविषयीची माहिती यात येते. बंगळूरमधील आजच्या लालबागेच्या उभारणीस तो जबाबदार होता असे सांगितले आहे. त्याने बांधलेल्या काही इमारतींचाही उल्लेख केलेला आहे. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ सांगितलेले नाही.

## डी. नंबर १७९

**याददस्त आर्कट सुभा**
**YEDADAST ARCOT SUBA**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२" x ९". ३३ ओळी. मोडी. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ४२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २६ वर ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी आणि वाच्य आहे. हिच्या पहिल्या पानाच्या शिरोभागी काही इंग्रजी शब्द लिहिलेले दिसतात. अर्काट जिल्ह्याच्या सीमा, कंपनीच्या ताब्यात असलेली खेडी आणि ज्यांच्याकडून पेशकश वसूल केला जाई, अशा पाळेगारांची नावे यांच्याशी ही कैफियत निगडित आहे. खेड्यांची एक मोठी यादी स्वतंत्रपणे दिलेली आहे. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ किंवा ही कैफियत लिहिल्याची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** याददस्त. आरकाड दरोबस्त कर्नाक्ट x x x खालील वेरीज सुधा सुभा वगैरे परगणे वार पुर्वेस मैलापुर चन्नपट्टण सरहद पछेमेस घांची सरहद उतरेस पलनाड सरहद दक्षणेस नंजानाड रामेश्वर सरहद.

**शेवट :** १२२ परगणे अमानी व पेषकसी देणेच सुधां.

## डी. नंबर १८०

**याददस्त आरकाड सुभा बेरीज जाबीता**
**YEDADAST ARCOT SUBA BERIZ JĀBITHĀ**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x ९". ३८ ओळी. मोडी. चांगली स्थिती. पूर्ण.

**डी. नंबर ३** मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३० वर येणारी ही कैफियत अर्काटच्या नबाबाच्या मालकीच्या अर्काट जिल्ह्यातील अनेक खेड्यांतून जमा होणाऱ्या वसुलाच्या हिशेबाशी निगडित आहे. फसली १२१० मध्ये तीन तालुक्यांतील ९३ खेड्यांतून झालेल्या जमा रकमेचा हा हिशेब आहे. वेगवेगळ्या खात्यांतील येणे रक्कम व जमा रक्कम स्वतंत्रपणे नोंदलेली आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या अखत्यारीखालील खेड्यांची नावे व संख्या दिलेली आहेत. कॅप्टन ग्रिम, मास्टर सॅटर्न व वॅलेस अशा कंपनीच्या अधिकाऱ्यांची नावे आणि त्यांच्या देखरेखीखालील खेड्यांची नावे दिलेली आहेत. जहागीरदार व नबाबाचे नातेवाईक यांची नावे आणि त्यांच्या खेड्यांतून त्यांना येणे असलेली रक्कम यांची माहिती देऊन ही कैफियत संपते. नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ याबद्दल काही उल्लेख नाही.

**प्रारंभ :** याददस्त बेरीज जाबीता सुभा आरकाड सन १२१० फसली हाल इलाखे ३ सी कुल तालुके ६३ सी कुलहोन.

**शेवट :** हासन नवास खान अवलकोंडा वैगर होने १००००००७.

## डी. नंबर १८१

**याददस्त कच देह कैफियत**
**YEDADAST KATCH DEHA KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. १४"x ५". ३१ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. १३ वर ही कैफियत येते. पृष्ठे खराब स्थितीत आहेत. ही कैफियत चुकीच्या शीर्षकाने यात दाखल केलेली आहे. वास्तविक तिचे शीर्षक 'याददस्त कतली गाव कैफियत' असे हवे. पहिल्या पृष्ठाच्या शिरोभागी त्रुटित स्वरूपात लिहिलेले काही इंग्रजी शब्द दिसतात. मदुरेच्या श्री मीनाक्षी सुंदरेश्वर स्वामी मंदिरास मंजूर केलेल्या देणग्यांचा ही कैफियत तपशिलाने निर्देश करते. देणग्या दिल्याच्या तारखा शालिवाहन शकात दिलेल्या आहेत. देणगी दिलेल्या जमिनी मदुरा जिल्ह्यातील तिरुमंगलम तालुक्यातील असून ज्यांच्यावर त्यांची देखरेख सोपविलेली होती त्यांची नावेही दिलेली आहेत. याद्वारा मिळणाऱ्या उत्पन्नातून मंदिरात साजरे होणे आवश्यक असलेल्या पूजाअर्चेचे स्वरूप धर्मादाय आणि उत्सव यांचा उल्लेख नंतर केलेला आहे. कैफियतीच्या शेवटी तमिळमध्ये केलेली एक सही आहे.

**प्रारंभ :** कैफियत कटलेगाव (पुरमुली) तालुका तीरुमगल ईलाके वेंकटेश्वर कटले (यान) सुभकृतु संवछर.

**शेवट :** सटरहु कणेसं पीले पालेवचे– १
पापगुडी – १
पेली तीमन – $\frac{१}{४}$

## डी. नंबर १८२

**याददस्त कानगोइ मजुमु देशमुख कैफियत**
**YEDADAST KANGOYE MAJUMU DESMOOKH KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x ९". २४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ४२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या ३२ व्या पृष्ठावर ही कैफियत येत असून तिचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. १८१० मध्ये ती भाषांतरित केली असे म्हटलेले आहे. मोगल राजवटीतील महसूल अधिकाऱ्यांच्या कर्तव्याबद्दलची माहिती यात आहे व वरिष्ठ महसूल अधिकाऱ्याचा किताब (हुद्द्याचे नाव) व त्यांची कामे, त्यांनी ठेवायचे हिशेब ही आणि अशीच उपयुक्त माहिती थोडक्यात दिलेली आहे. शिरस्तेदार, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, ग्राम कनक संप्रती आणि नट्टवर यांना नेमून दिलेली कामेही स्पष्ट केलेली आहेत. हे हुद्दे अनुक्रमे हिशेब-प्रमुख, महसूल-निरीक्षक, ग्राम मुन्सफ आणि करणम् या हुद्द्यांशी समकक्ष होत. नक्कलकाराचे नाव, माहितीचे मूळ यांचा निर्देश नाही.

**प्रारंभ :** याददस्त मानगोयांच वृत्तान्त. मानगोईच हुदा काये म्हणाल तरी मोगलाईतं पादषाक्कडू दक्षण साडेसाहा सुभेस साहजण मानगोयांस मोकरोर केलें.

**शेवट :** पुर्वील राजे लोकांचे दिवसांत होत त्याचे वृतांत नाटेवार स्थल कर्णं त्यल मुजमु ग्रामकर्णं हे चोषजणही पुर्वील राजे लोकांच्या दिवसा पासुन नोकरोर पावलते.

## डी. नंबर १८३

**याददस्त कैफियत**
**YEDADAST KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट.१४"x ५".२८ ओळी.मोडी.जुने. पूर्ण.

डी. नंबर १३२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ.१४ वर ही कैफियत येते. सर्व पृष्ठे अतिशय खराब अवस्थेत आहेत. काही खास प्रकारच्या पूजाअर्चेसाठी श्री मीनाक्षी सुंदरेश्वर या मदुरेतील मंदिराला दिलेल्या देणग्यांचा इतिहास यात सांगितलेला आहे. अशा तीन देणग्यांची माहिती दिलेली आहे. एक अर्दजाम कतलाई आणि दुसरी पल्लकपू कतलाई (Arda Jama Katlai & Pallakapu Katlai). तिसऱ्या कतलाईचे नाव वाचता येत नाही. अगदी थोडक्यात अर्दजाम कतलाईचे मूळ वर्णिलेले आहे. फौजदार युसुफखान याच्याकडून जहागीर मिळालेला तंडवरया पिलाई हा दाता असून त्याने एक संपूर्ण खेडे देणगी म्हणून वर उल्लेखिलेल्या देवळास दिले. या दानाची तारीख दिलेली नाही. दानपत्राच्या अखेरीस तमिळ भाषेतील एक सही दिसते. खेड्याचे नाव वाचता येत नाही. मदुरेच्या विजय रंगा चोक्कनाथ नाईक याची पत्नी मीनाक्षी हिने दुसरी देणगी दिलेली आहे. मंदिरात साजऱ्या होणाऱ्या शिवरात्र उत्सवासाठी सर्व उत्पन्न खर्च करावे म्हणून एक संपूर्ण खेडे दान दिलेले असून ही सर्व व्यवस्था कुण्या गोपाल अय्यरने पाहायची असा उल्लेख आहे. या देणगीची तारीखही सांगितलेली नाही. अखेरीस एक तमिळ स्वाक्षरी असल्याचे दिसते. नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही. पानाच्या मागील बाजूस काही मिळकतीची तिसरी देणगी लिहिलेली आढळते.

**प्रारंभ :** याददस्त कैफियत कटले वा देवस्तान मीनाक्षी वगैरे. देवस्थान श्री मीनाक्षी देवीस अर्ध जाम कटले.

**शेवट :** पीले मजकुरास मार्गली मासी सोर्गोछवांत राव पतांत एक दीवसच उछव चालवीत आहे.

## डी. नंबर १८४

**याददस्त मधुरा मीनाक्षी कैफियत**
**YEDADAST MADURA MINĀKSHI KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट.१४"x ५".२८ ओळी.मोडी.जुने. खराब.पूर्ण.

डी. नंबर १३२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या १७ व्या पृष्ठावर ही कैफियत येते. सर्वच पृष्ठे फाटलेली असून त्यांना मोठ्या प्रमाणात छिद्रे पडलेली आहेत. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे. मदुरेच्या श्री मीनाक्षी अम्मन व सुंदरेश्वरस्वामी या मंदिराला दिलेल्या देणगीशी सदर कैफियत संबंधित आहे. कोसाकोलम् तालुक्यातील उपरोल्लेखित मंदिरास दिलेल्या जमिनींचा तपशील यात आहे.

श्री मीनाक्षी देवता वगैरेंच्या पूजाअर्चेसाठी देगणीदार दात्यांनी दिलेल्या जवळ जवळ १८ कतलाईंसाठी– म्हणजे पूजाविधी वगैरेंसाठी– दिलेल्या खास सूचना यात नोंदलेल्या आहेत. तिरुमल नाईकन कतलाई, मुजम्मा कतलाई, वेंकटकृष्ण नाईकन कतलाई, मदुरा नाईकन पिलाई कतलाई, मन्नराप्पा कतलाई, मीनाक्षी अम्मन कतलाई, पिलाई कतलाई, अलगप्पा मुदली कतलाई, पल्लकप्पू कतलाई, मुत्थुसेरवाई कतलाई, कोटेश्वरन अय्यान कतलाई, त्रिगुणनाशम बंदर कतलाई, मुताप्पा मुदली कतलाई, थानप्पा मुदली कतलाई आणि देवदासी कतलाई अशा नावांनी परिचित असलेले काही उत्सव संपन्न करण्यासाठी नाईक राजांनी दिलेल्या या देणग्या आहेत असे दिसते.

अशा या कतलाईंचे मूळ, देणग्या कशासाठी दिल्या, किती जमीन दिली, त्यातून मिळणारे अंदाजे उत्पन्न, त्यांद्वारा करायची नित्य व नैमित्तिक पूजाअर्चा आणि अशाच स्वरूपाचे तपशील छोट्या टिपांच्या आधारे दिलेले आहेत. तिरुमल नाईक, त्याची रक्षा व त्याचे नातेवाईक यांनी यांपैकी बहुसंख्य देणग्या– आणि त्याही मदुरेच्या मीनाक्षी मंदिरास– दिलेल्या आहेत असे दिसते. वर्ष, दात्याचे नाव आणि अशा तपशिलाबद्दलची टाचणे कैफियतीच्या उजव्या बाजूच्या समासात केलेली दिसतात.

नक्कलकाराचे नाव, माहितीचे मूळ किंवा नकलेची तारीख यांची नोंद केलेली नाही.

**प्रारंभ :** याददस्त कटले देह कैफियत इलाकें देवस्थान मधुरे मीनाक्षी वगैरे तालुका काशाकोलमं.

**शेवट :** देवदासी कटले च कैफियत. मुतुइरुलांडी म्हारीस साबक वीजयरगचोकनाथ नाईकाचे पापातमार, वगोल हे दोनी गाव ईनाम दीला (पान फाटलेले आहे).

## डी. नंबर १८५

**याददस्त मधुरा मीनाक्षी देवालय पुजा**
**YEDADAST MADRAI MINĀKSI DEVĀLAYA PUJĀ**

**कागद :** स्थानिक बनावट. १४"x ५". ३८ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर १३२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या चौथ्या पानावर या कैफियतीचा प्रारंभ होतो. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पहिल्या पानाच्या माथ्यावर इंग्रजीत लिहिलेल्या काही ओळी आणि डाव्या बाजूच्या समासात काही तमिळ स्वाक्षऱ्या केलेल्या दिसतात. मदुरेच्या श्री मीनाक्षी अम्मन या सुप्रसिद्ध मंदिरास समर्पित केलेल्या काही पूजा किंवा कतलाई यांचे यात स्पष्टीकरण केलेल आहे. तिरुमल नाईक, वेंकटकृष्णम्मा नाईक, कलंजी मदुरा नाईक पिलाई, अलगप्पा मुदली, ठाणप्पा मुदली, कोटेश्वरन आणि मुथ्थण्णा कतलाई यांनी दिलेल्या देणग्यांवर छोट्या टिपा लिहिलेल्या आहेत. मदुरेच्या श्री मीनाक्षी मंदिरात करायच्या दैनंदिन व उत्सव प्रसंगीच्या पूजाअर्चांची माहिती यात दिलेली आहे. देणग्या किंवा कतलाई यांची व्यवस्था पाहणारे व्यवस्थापक आणि अर्चक यांच्या नावांचा उल्लेखही केलेला आहे. काही दात्यांनी केलेली खरेदी आणि काही मंदिरांच्या व्यवस्थापनासाठी नक्की केलेले पगार यांचाही उल्लेख यात आहे. उत्सवांची नावे आणि त्यासाठी खर्च करायची रक्कम हीसुद्धा सांगितलेली आहेत. इतर धर्मादाय बाबी आणि ब्राह्मणांना सर्वमण्यम् म्हणून दिलेले इनाम यांचाही थोडक्यात निर्देश केलेला आहे. नक्कलकाराचे नाव, माहितीचे मूळ किंवा नकलेची तारीख यांबद्दल काहीही सांगितलेले नाही.

**प्रारंभ :** याददस्त कटले देह बाबताच कैफियत– देह बाबत देवस्थान देवल मीनाक्षीस चालवणेच गाव तिरुमलना कटले.

**शेवट :** ७२ मार्गली मासी तिरुवादोरे.
७२ तै मासी संक्रांती.
३७ कार्तीक मासी सीवरात्री.
४७३
४०७३

## डी. नंबर १८६

**याददस्त मधुरा मीनाक्षी देवालय पूजा**
**YEDADAST MATHURAI MINĀKSI DEVĀLAYA PUJĀ**

**कागद :** स्थानिक बनावट. १४"x ५". ३२ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर १३२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या दहाव्या पानावर ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे. इंग्रजीत लिहिलेल्या दोन ओळी आणि तमिळमध्ये केलेल्या सह्या पृष्ठांच्या माथ्यावर व तळाशी आढळतात. नाईक राजे व काही दानशूर दाते यांनी मदुरेच्या श्री मीनाक्षी अम्मन मंदिराला दिलेल्या कतलाई देणग्यांशी ही कैफियत संबंधित आहे. तिचा प्रारंभ अराई कतलाईच्या स्पष्टीकरणाने होतो. मदुरा तालुक्यातील कोढूर-मूलिअम कोलम या गावाचे दान (अराई कतलाईसाठी) कृष्णाप्पा मुथु वीराप्पा नाईक याने देणगी म्हणून दिलेले आहे. श्री मीनाक्षी आणि श्री सुंदरेश्वर स्वामी यांच्या मंदिरातील पूजाअर्चेचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे. देणग्यांची व्यवस्था पाहणे आणि मंदिरातील पूजेवर देखरेख करणे ही कामे करणाऱ्या प्रारंभीच्या लोकांच्या नावांचा निर्देश केलेला आहे. धर्मादाय कार्य सतत चालू राहण्यासंबंधीचे तपशील आणि सध्याच्या काळात खेड्यांवर देखरेख करणाऱ्या व्यक्तींची नावे यांचा उल्लेख केलेला आहे. नित्य कतलाई म्हणून ओळखली जाणारी दुसरी कतलाई थोडक्यात वर्णिलेली आहे. नाईक राजांच्या पदरी मंत्री म्हणून काम करणाऱ्या कुणा युसुफखानाने श्री मीनाक्षी मंदिरास काही खास पूजा करण्यासाठी दिलेली देणगी यात नोंदलेली आहे.

पैदलवार्चना (Piedlwarchana) कतलाई या नावाने ओळखल्या जाणाऱ्या देणगीच्या मुळासंबंधीची माहिती या कैफियतीत नंतर दिलेली आहे.

अर्धजाम कतलाई, शुक्रवार कतलाई आणि सोमवार कतलाई यांचे मूळ व इतिहास यांचे वर्णन केलेले आहे. दात्याचे नाव आणि श्री मीनाक्षी अम्मन व सुंदरेश्वर स्वामी यांच्या मंदिरांत वर उल्लेखिलेल्या कतलाई निरंतर स्वरूपात करणाऱ्यासाठी दिलेल्या जमिनीचे क्षेत्र यांचा निर्देश आहे. कैफियतीच्या शेवटच्या पानावर तंडवारय्या पिलाई याच्या कतलाईचे मूळ व इतिहास आणि ती मंजूर करण्यामागील काही ऐतिहासिक आख्यायिका व उदाहरणे कारणादाखल दिलेली आहेत. नक्कलकाराचे नाव, माहितीचे मूळ,

नकलेची तारीख यांचा उल्लेख नाही. कैफियतीतील तारखा शालिवाहन शकात दिलेल्या आहेत.

**प्रारंभ :** (अरपुर कोलमं) ? सुंदरेश्वर श्री मीनाक्षीस अरकटले मुतपामोदलीना. कटले रंग कृष्ण मुतुवीरपनाचे दीवसी. . . मधुरे अमीला मुतपा मोदली म्हणार धर्म करावे म्हणुन एजमान (मामुल गाव) मागुन घेऊन.

**शेवट :** पान क्रमांक १२ (वजा ५ कलमे)

१७ कार्तीक तीरु कार्तीक.

४७ मार्गली मास तीरुवंदातीरुपुलीचे दर्शन.

१७२ ते मास संक्रांती.

१५७ मासी सिवरात्री खर्च

३० चित्र मास कापील पलयेमं मंटपडी.

## डी. नंबर १८७

**याददस्त देह झाडा तालुका मधुरे व तिरुपती**

**YEDADAST DEH YĀDĀ TĀLUKĀ MADURAI VA THIRUPATHI**

**कागद :** स्थानिक बनावट. १४"x ५". ३८ ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर १२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पहिल्या पानावर ही कैफियत येते. आडवी घडी घालून केलेल्या चतकोर आकाराच्या कागदावर लिहिलेल्या या कैफियतीतील हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. काही देवळे, अग्रहार व खाजगी व्यक्ती यांना दिलेल्या देगण्यांशी ही निगडित आहे. एकंदरीने यात १८ दानपत्रे किंवा सनदा, दोन ताम्रपटांवर लिहिलेल्या टिपा आणि काही इनामे मिळण्यासाठी काही राजांना लिहिलेले ६ विनंतिअर्ज दिसून येतात. पहिली दोन दाने मदुरेच्या मीनाक्षी अम्मन या मंदिरासाठीची असून एक अलगर कोईल येथील श्री अलगिरीस्वामी मंदिरासाठीचे आहे. गोविंदराजस्वामी किंवा तिरुचन्नूर येथील अलमेलू अम्मन इत्यादी देवस्थानांतील श्री वेंकटेश्वर स्वामी व इतर देवता यांना सदाशिव रायलूने दिलेल्या दानाचे तपशील स्पष्ट केलेले आहेत. इनामदारांची नावे, तसेच संस्था व व्यक्ती यांची नावे अशी माहितीही दिलेली आहे. देणग्यांमागील उद्देश, तारीख आणि जागांच्या नेमक्या नामोल्लेखासह दान दिलेल्या जमिनींचे क्षेत्र इत्यादी माहिती विस्ताराने वर्णिलेली आहे. तिरुपतीच्या मंदिरात साजऱ्या केल्या जाणाऱ्या काही कतलाईसाठी केलेले तीन विनंतिअर्ज आणि त्यासाठी रोख रकमा मंजूर केल्याचा नाईक राजांचा निकाल यात आहे. कैफियतीतील तारखांची नोंद करताना शालिवाहन शकाचा वापर केलेला आहे. शेवटच्या पानावर काही पाळेगारांच्या मालकीच्या खेड्यांची नावे आणि कवल (Kaval) व अबकारी कराद्वारा त्यांना त्यांच्या (मालकीच्या) अधिकार क्षेत्रात मिळणारे उत्पन्न यांचा निर्देश केलेला आहे. नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ यांविषयी काहीही लिहिलेले नाही.

**प्रारंभ :** मौमजकुर रायपठांत दिलह ईनाम दानमं कंबलं श्री रंगाच्यारी यांच नावी.

**शेवट :** मो. कोटमंगलम. मो. कोतुर गाव. मो. नामपालयमं गाव.

## डी. नंबर १८८

**याददस्त पांडवगुडी वोरंगल कैफियत**

**YADADAST PĀNDAVGUDI VĀRANGAL KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. ७"x ५". २८ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

या भागाच्या चौदाव्या पानावर ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. वरंगळ व पांडवगुडी येथील काही मंदिरांना इनाम म्हणून दिलेल्या जमिनींचे नेमके क्षेत्र यात सांगितलेले आहे. ही दोन्ही ठिकाणे वेंकटगिरी जमिनीच्या अधिकार क्षेत्रात असल्याचे सांगितले आहे. देवळांची नावे, दान दिलेल्या व्यक्तींची नावे, बागाईत व जिराईत जमिनींचे क्षेत्र, त्यातून येणारे उत्पन्न आणि व्यवस्थापकांची नावे, विश्वस्तनिधी किंवा प्रतिष्ठान चालविले जाते की नाही, याबद्दलची काही निरीक्षणे नोंदविलेली आहेत. चितूर जिल्ह्याच्या शिरस्तेदाराने ही कैफियत फसली १२२५ मध्ये तयार केली, असा उल्लख केलेला आहे. यावर उर्दू, मोडी आणि इंग्रजी भाषांतून सह्या केलेल्या असून, ही कैफियत १० ऑगस्ट १८१५ रोजी ईस्ट इंडिया कंपनीकडे पाठविण्यात आली असे सांगितले आहे. देवालयांचे मूळ व इतिहास यांच्याबद्दलची छोटी टिपणे यात दिसून येतात. कुणी एक वेंकटराव शिरस्तेदार याने ही कैफियत तयार केल्याचे सांगितले आहे.

(शेरा- कैफियतीतील काही पाने या भागाच्या शेवटी आहेत)

**प्रारंभ :** यादादस्त पांडवगुडी व वरंगळ x x x म्हणावयाचे देवल असणेच कैफियत. तालुका वेंकटगीरी मोटा तुकडी चितुर सरकार कुंपणी सन १२२६ फसली.

**शेवट** : बातारीख छं १०. माहे अगष्ट सन १८१५ इसवी. आवटं वेंकटराव सीरस्तदार.

## डी. नंबर १८९

**यादी उत्तर हिंदुस्थान व काबुल**
**YEDHI UTTARA HINDUSTĀN VA KĀBOOL**

**कागद** : इंग्लिश बनावट. ९"x ६". १४ ओळी. मोडी. चांगली स्थिती. पूर्ण.

या भागात २२ प्रकरणे असलेला एकच दस्तऐवज आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पहिल्या पृष्ठावर मारल्या गेलेल्या शेऱ्यावरून असे समजते की, आनंदरावाने संग्रहित केलेल्यापैकी हा एक दस्तऐवज आहे. तेलगू आणि इंग्रजी भाषांत लिहिलेल्या काही ओळीही या पानावर दिसतात. याचा अगदी थोडक्यात आशय दुसऱ्या पानावरील प्रास्ताविक टिपणात सांगितलेला असून तो लक्षपूर्वक वाचण्यासाठी व आधार म्हणून पाठविला असल्याचे लिहिले आहे. तो पाठविणाऱ्याचे किंवा ज्याला पाठविला त्याचे नाव लिहिलेले नाही.

अकबराच्या सम्राटपदाच्या काळातील मोगल साम्राज्यात अंतर्भूत होणारी उत्तर हिंदुस्थान व काबूल या दोन्हींतील महत्त्वाची शहरे व गावे यांचे नावासह वर्णन यात आलेले आहे. शहरांच्या सीमा, जलप्रवाहांचे फाटे व उपनद्यांसह (मोठ्या) नद्यांची नावे, जलाशय, मोठे पाण्याचे साठे, लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र आणि जमा होणारा महसूल यांबद्दलची माहिती दिलेली आहे. या कैफियतीचा एक महत्त्वाचा विशेष असा की, यात शहरांची जुनी हिंदू नावे आणि मोगलांनी प्रचारात आणलेली नवी मुस्लिम नावे दोन्ही दिलेली आहेत. हस्तिनापूर दिल्ली म्हणून, अहमदाबाद मुस्ता करूलइभाबाद म्हणून, काशी बनारस म्हणून, प्रयाग इलाहाबाद म्हणून, पटणा बिहार म्हणून, मुलतान दमे अम्मान म्हणून आणि काबूल दमे मूला म्हणून म्हटले जात असल्याचे सांगितले आहे.

काही नद्यांची बदललेली नावेही या कैफियतीत नंतर दिलेली आहेत. नक्कलकाराचे नाव, माहितीचे मूळ आणि हा दस्तऐवज तयार करण्याची तारीख ही मात्र दिलेली नाहीत.

**प्रारंभ** : मुख विस्तार हिंदुस्थान सालो सुभे पैकीं पंधरा भुभाची सरकार व माहाल व बेरीज रुपयाची व दामाची व सरहद सुधां व नध्या चा तपशील.

**शेवट** : सदरहु नध्यातीला बेतमी रुजु तुरानाकडे जाता तलुमते (?) सुभा दारुल मुला उर्फ काबुल एक १.

## डी. नंबर १९०

**याददस्त तालुका काणकुपी**
**YADADAST TALUKA KĀNAKUPI**

**कागद** : स्थानिक बनावट. ७"x ५". १५ ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर ६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

तेलगू, कन्नड, मोडी व उर्दू यांत लिहिलेल्या कैफियती या भागात आहेत. पृष्ठे थोडीशी खराब झालेली असून, कैफियतीही क्रमाने लिहिलेल्या नाहीत. प्रस्तुत कैफियत तीन भागांत व तीन वेगळ्या ठिकाणी लिहिलेली दिसते. या भागाच्या अकराव्या पानावर सुरू होऊन ती २० व्या पानावर पोहोचते. मग तेवीस आणि नंतर चोविसाव्या पानावर संपते. महसूल खात्यातील आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांसाठी टिपू सुलतानाने जारी केलेले हे एक आज्ञापत्र असल्याचे दिसते. (यात पुष्कळ तारखा दिलेल्या आहेत.) ज्यांच्यासाठी या आज्ञा आहेत त्या अधिकाऱ्यांची नावे दिलेली आहेत. या आज्ञेद्वारा टिपू सुलतानाने आपल्या अधिकाऱ्यांना महसूल (Kist) वसूल करण्यासाठी वापरायची पद्धती; नंतर तो सरकारी खजिन्यात जमा करणे, जमाखर्च ठेवणे, ग्रामाधिकाऱ्यांना पगार देणे व त्यांच्याकडून अपेक्षित असलेले काम यांविपयीच्या सूचना केलेल्या आहेत. खास करून काणकुपीच्या तहसीलदारास त्याच्या अधिकार क्षेत्रातील महसूल जमा करण्याबाबत विशेष सूचना केलेल्या आहेत. म्हैसूर राज्यात वापरल्या जाणाऱ्या चलनांची नावे व त्यांचे सममूल्य यांविषयीची माहिती कैफियतीच्या शेवटच्या भागात दिलेली आहे. ५ मोहरम, फसली १२२१ (प्रमदिचा सुद्धा दिले आहे.) रोजी काणकुपी येथे जमा केलेल्या रकमेचा अहवाल दिलेला आहे.

नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ** : फेरीस्त कर्णमं बेच्यार पयादे पो. तुमचे जीमेस अहेत किल्लेस x x x जाहस्त जातांबाकी कदीम पयोदेकडोन तुमचे तालुक रयन्ताकडे घेऊन पाठविणे.

**शेवट** : ५४ ॥ ६ करक दसाप्ती सदर १७१ ॥
१७७ ॥ घुरली १ सी.
१७ ॥ पुली १ सी.
४८१ ॥ मामुर समानी ४७४.

## डी. नंबर १९१

**यादददस्त रावे बंदर व करे पट्टण कैफियत**
**YADADAST RAVAI BUNDER VA KARAIPATNA KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १३"x ७". २४ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

या भागाच्या पृ. २२ वर ही कैफियत सुरू होत असून, हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. जिथे देशी बोटी किनाऱ्यापर्यंत येऊन मालाची चढउतार होऊ शकेल असे नेल्लोर जिल्ह्यातील किनारे व उताराच्या जागा यात वर्णिल्या आहेत. उताराच्या अशा पंचवीस जागांचे थोडक्यात वर्णन केलेले आहे. शिवाय त्यांचे मूळ व इतिहास यांवर लिहिलेली छोटी टिपणेही आहेत. चढउतार केल्या जाणाऱ्या मालांची नावे, प्रत्येक उताराच्या जागी जमा केला जाणारा अबकारी व इतर कर आणि वस्तूंच्या जहाजबदलीसाठी खलाशांना द्यायची रक्कम यांचा निर्देश केलेला आहे. नंतर कैफियतीत अशा उताराच्या जागांच्या मालकांची नावे दिलेली आहेत. तसेच नेल्लोर व गंजाम या ठिकाणांहून इतर ठिकाणी पाठविण्याजोग्या वस्तूही सांगितल्या आहेत. नक्कलकाराचे नाव, माहितीचे मूळ किंवा तारखांसारखे इतर तपशील दिलेले नाहीत.

**प्रारंभ :** याददस्त खे बंदर करपठणांची व येतुमतीच दिगुमती जीनस कापडें वगैरे.

**शेवट :** सदरी लिहीले रेवात शुली वाळुप दवाळु म्हणार पडगे चालवीणारा चे गुंडशा उदंड आहेत. त्या त्याच गुंडशा अहेत की त्याच नाव पालेमले म्हणताती त्यांस बाटी बोगरी वीशषे धरीत नाही.

## डी. नंबर १९२

**याद्दस्त सदाशिव गड कैफियत**
**YADADAST SADĀSIVA GAD KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावटी. १०"x ६". १७ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर २७ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १७ वर ही कैफियत येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सदाशिवगड या डोंगरी किल्ल्याचे मूळ व इतिहास या कैफियतीत सांगितलेला आहे. विजयनगर साम्राज्यातील शोंडाई या तालुक्यानजीक तो असल्याचे सांगितले आहे. त्याची भौगोलिक रचनाही स्पष्ट केलेली आहे. ही कैफियत नऊ विभागांत विभागलेली असून, पहिले दोन विभाग नाईक राजांच्या काळातील अनेगोंदी आणि विजयनगर या साम्राज्यांचा इतिहास सांगतात. एका युद्धातील विजय साजरा करण्यासाठी विजयनगरच्या सदाशिव नाइकाने टेकडीवर एक किल्ला बांधला आणि त्याला सदाशिवगड असे नाव दिले. दुसऱ्या व तिसऱ्या विभागात नाईक व अदिलशाही राजवट यांच्या नाशाची माहिती दिलेली आहे. डचांचा हल्ला, सदाशिवगड येथील नाइकांच्या सोनापतीने केलेली फितुरी आणि त्याने किल्ला डचांच्या स्वाधीन केल्याबद्दलची माहिती यांनी चौथा व पाचवा विभाग बनलेला आहे. सातव्या विभागात हैदर अलीखान याने केलेला हल्ला आणि त्याने सदाशिवगड कसा जिंकला याचा वृत्तान्त येतो. हैदर अली व टिपू सुलतान आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्यातील युद्धांची वर्णनेही केलेली आहेत. बाबुराव साळुंके याच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी केलेली स्वारी आणि मराठे व टिपू सुलतान यांच्यांत झालेला तह आठव्या विभागात वर्णिलेला आहे.

शेवटच्या विभागात ईस्ट इंडिया कंपनीचा सदाशिवगडावर कब्जा आणि टिपू सुलतानाचा मृत्यू यांचे अतिशय रेखीव वर्णन आले आहे. इंग्रजांनी शालिवाहन शके ८९७ मध्ये सदाशिवगड जिंकला असे सांगितले आहे.

नक्कलकाराचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ स्पष्ट केलेले नाही. महत्त्वाच्या सर्व घटनांना शालिवाहन शकातील तारखा दिलेल्या आहेत. फ्रेंच, डच आणि इंग्लिश कंपन्यांतील मुख्य व्यक्तींची नावे दिलेली आहेत.

**प्रारंभ :** याददस्त सदासीव गडचें कैफियत. आनेगोंदी उर्फ विध्यानगर तेथील राजे नरपती राजा (भुवर) राम राजा यांकडुन षोदे स्वत्तानास रामचेंद्र नायक होता.

**शेवट :** सैद हाजी नामे किल्लेदार होता. त्याणी पाच च्यार राए लढाई करुन अखेर कोलाने (?) उतरुन किल्ल सरदार यांचे स्वाधीन केला. ते अमल जफरी (?) आहे कलम.

## डी. नंबर १९३

**याददस्त सुब्रह्मण्येश्वर स्वामी कैफियत**
**YADADAST SUBRAHMANYESVARSWAMI KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १०"x ६". २१ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या शंभराव्या पृष्ठावर येत असून पृष्ठे खराब झालेली व छिद्रे पडलेली आहेत. मदुरेच्या मीनाक्षी मंदिरात असलेल्या श्री सुब्रह्मण्यमस्वामी देवस्थान या एका गौण मंदिराला दिलेल्या देणग्यांची माहिती यात आहे. श्री सुब्रह्मण्यमस्वामीच्या पूजाअर्चेसाठी आणि देखभालीसाठी दोन खेड्यांचे दान देण्यात आलेले आहे. तिरुमंगलम् तालुक्यात ही खेडी वसलेली असून, अर (Ara) कतलाई धर्मादायासाठी ती मुथु वीरप्पा नाइकाने इनाम म्हणून दान दिलेली आहेत. या दात्याने एका चोकनाथ भट्टर या माणसाला दान दिलेल्या रकमेचा व्यवस्थापक म्हणून नेमल्याचे सांगितले आहे. धर्मादायासंबंधीच्या काही सूचनाही दिलेल्या आहेत. नक्कलकाराचे नाव किंवा नकलेची तारीख दिलेली नाही. कैफियतीच्या शेवटच्या भागात तमिळमध्ये केलेल्या काही स्वाक्षऱ्या आढळून येतात.

**प्रारंभ :** फेरीस्त श्री सुब्रह्मणेश्वर स्वामीस अरकटले मुतुवीर पनाईकाचे कटलें. वगैरे. कृष्ण मुतुवीरपनाईकाचे दिवसी मधुरे आमील मुतपामोदली म्हणार धर्म करवीले.

**शेवट :** सदरहु ईसवू खानाच दिवसा पासुन कटले राहुन गेला.

## डी. नंबर १९४

**याददस्त लासे गाव कैफियत**
**YADADAST LASĒ GĀVA KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. १३"x ४". ३२ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर १३२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृ. २५ वर येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. यात पाच सनदांची माहिती दिलेली आहे. मदुरा जिल्ह्यातील अलगर कोविल येथील श्री अलगर मंदिरात काही कतलाई धर्मादाय करण्यासाठी मदुरेच्या नाईक राजांनी देणगी म्हणून दिलेल्या खेड्यांचा तपशील यात आहे. तिरुमल नाईक व चित्रथंबी मुदली यांनी अलगर मंदिरात वूचिकल कतलाई धर्मादाय करण्यासाठी मदुरा जिल्ह्यातील एकूण पाच खेडी दान दिली, असे या कैफियतीच्या पहिल्या व तिसऱ्या विभागात नमूद केले आहे.

श्री अलगर स्वामी मंदिरात साईरक्षणपूजा कतलाई करण्यासाठी दिलेल्या देणग्यांचे वर्णन दुसऱ्या व चौथ्या विभागात आलेले आहे. या देणग्या चित्रा मुदली व थानप्पा मुदली यांनी दिलेल्या आहेत.

देणग्यांच्या रकमा आणि धर्मादाय यांच्यावर देखरेख करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तींची नावे कैफियतीच्या नंतरच्या भागात आलेली आहेत. शालिवाहन कालगणनेतील तारखा दिलेल्या आहेत. कैफियतीच्या शेवटच्या विभागात त्रिगुण नाशम् बंदस्वामींच्या मंदिराला दिलेल्या देणग्यांचा निर्देश केलेला आहे. खेड्यांची नावे व जमिनींचे क्षेत्र असा देणगी दिलेल्या दानाचा तपशील स्पष्ट केलेला आहे. कैफियतीत दोन ठिकाणी तमिळ स्वाक्षऱ्या येतात. नक्कलकाराचे नाव आणि यातील माहितीचे मूळ याबद्दल काही सांगितलेले नाही.

**प्रारंभ :** याददस्त कटलें गावच कैफियत देवस्थान अलगीरी वगैरे.

**शेवट :** ३६८ नित्यपडी रोजीना ८१ ॥
४८२ विशेष
२७७ मास विशेष
३७ अटवीषेश
―――――
४४२

## डी. नंबर १९५

**याददस्त सालवार कैफियत**
**YĀDADAST SĀLVAR KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ६ ". २८ ओळी. मोडी. जुने. चांगला. पूर्ण.

डी. नंबर ३९ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृ. ८८ वर येते. फसली १२०३ मध्ये तिरुपत्तुर तालुक्यातील रामसमुद्रम् येथील शेती आणि रयतेकडून जमा केला जाणारा (किस्ट) महसूल यांबद्दलची माहिती यात दिलेली आहे. लागवडीखाली असलेल्या पुंजाई (Punjai) जमिनीचे क्षेत्र आणि त्यापासून जमा होणारा नेमका महसूल यांचे वर्णन केलेले आहे. लागवडीखालील जमिनींचे पैमाष हिशेब सुद्धा दिलेले आहेत. जमिनीच्या लागवडीसाठी होणाऱ्या पाण्याचे मूळ आणि शेत कसणाऱ्या मालकांची नावे कैफियतीत नंतर दिलेली आहेत. नक्कलकाराचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** याददस्त स्थलवार पतकट तीर्वा मौ. रामसमुद्र तालुकें तीरुपतुर सन १२०३ फसली.

**शेवट :** एकुन बाजे बाबा १३. मैली २६ कास १९.

## डी. नंबर १९६

**यादवस्त स्थलवार कैफियत**
**YADADAST STHALVAR KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ६". ३२ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ५४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ४५ वर ही कैफियत येते. चोलैंगेवरम्-मधील पाळेगार व त्यांच्या मालकीच्या खेड्यांची नावे यात वर्णिलेली आहेत. ईस्ट इंडिया कंपनीने ही खेडी ताब्यात घेतली, तेव्हा फसली १३१७ मध्ये हा अहवाल तयार करण्यात आला. खेड्यांतील स्थानिक अधिकाऱ्यांनीच माहिती व आवश्यक हिशेब तयार केल्याचे सांगितले आहे. एकूण ७८ पाळेगारांची नावे आणि त्यांच्या मालकीच्या खेड्यांची संख्या सांगितलेली आहे. नक्कलकाराच्या नावाचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ :** याददस्त फेरीस्त स्थलवार व मन व वटा व गांवगाने तालुके चोंलगीवार.

**शेवट :** कसबा ०–१–० ईपासुन मनवाडे.

## डी. नंबर १९७

**याददस्त फेरीस्त जरीब राम समुद्र**
**YADADAST PERIST JAREEB RAMASAMUDRU**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ६". ३० ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर ३९ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ३० वर ही कैफियत सुरू होत असून पृष्ठे अतिशय खराब अवस्थेत आहेत. शिवाय कैफियत अपूर्णही आहे. रामसमुद्रम् व तोंडमंडलम् येथील काही मंदिरे व गावे यांचे मूळ व इतिहास यांविषयीची माहिती या कैफियतीत आलेली आहे. रामसमुद्रम्बद्दलची माहिती फारच थोडी आहे. काही मंदिरांची नावे, ती बांधणाऱ्या व्यक्ती आणि तिथे एकदा साजरे केले गेलेले उत्सव यांचे संक्षिप्त वर्णन केलेले आहे. पौराणिक आख्यायिकाही सांगितल्या आहेत. आवर्जून उल्लेख करावा इतक्या महत्त्वाचे यात काहीही नाही. नक्कलकाराच्या नावाचा निर्देश केलेला नाही.

**प्रारंभ :** x x x x किला पाडुन गाई बकरे समस्थ आपले श्री मागहासे ? स्थलांत... बेटा बसवीला.

**शेवट :** तोंडमंडलचे कैफियत समाप्तत तेथील कर्ण देखील पुरातन वाला पाहुन लिहीवीलते.

## डी. नंबर १९८

**याददस्त जरीब कृष्णगिरी**
**YADADAST JARIB KRSNAGIRI**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ६". १६ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

डी. नंबर ३९ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ४४ वर ही कैफियत सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे. कृष्णगिरी तालुक्यातील ग्रामाधिकाऱ्यांनी ठेवायच्या काही हिशेबांबद्दलची ही माहिती आहे. बारा तऱ्हेच्या हिशेबांचा उल्लेख केलेला आहे. जुन्या काळात ठेवल्या जाणाऱ्या काही हिशेबांची नावे सोडली तर राजकीय वा ऐतिहासिक दृष्ट्या उल्लेखनीय असे यात काहीही नाही. नक्कलकाराचे नाव, तारीख आणि यातील माहितीचे मूळ यांसंबंधी काहीही उल्लेख नाही.

**प्रारंभ :** याददस्त फेरीस्त ईसाब जरीब हुलस (वसुली) समजावपी वगैरे नमुना इलाके मुलुक कृष्णगिरी.

**शेवट :** हली पैमाप गुंटेनारी ईसेवार मौं करणेच तरमं पाहीले प्रमाणे.

## डी. नंबर १९९

**यादी सरंजाम फौज**
**YĀDI SARAÑJĀM FAUJ**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ७". १९ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृ. २०२ वर येत असून, हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सवाई माधवराव यांनी सन १८०४ मध्ये लष्करी अधिकाऱ्यांच्या एका तुकडीला दिलेल्या पगाराच्या रकमेशी ही संबंधित आहे. लष्करात नोकरीस असलेल्या लोकांच्या नावांची एक मोठी यादी त्यांचा हुद्दा व पगार यांसह

दिलेली आहे. पेशव्यांच्या घोडदळातील काही अतिशय विश्वासू अधिकाऱ्यांच्या नावांचा उल्लेखही केलेला आहे.

पेशव्यांच्या संग्रहात असलेल्या मूळ दस्तऐवजाचा हा एक भाग असल्याचे म्हटले आहे आणि नंतर तो कर्नल मॅकेंझी याच्यासाठी नकलला गेला आहे. नक्कलकाराचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** श्री रामचेंद्र प्रसंन्न. यादी सरंजाम फौज सवारी. रो. सवाई माधवराव पंत प्रधान यांचे कारखीर्दी नेमणुक सवार. सन अर्बा मयातैन व अलफ उरुफ सन १२४० फसली.

**शेवट :** सेवासी रवाना केली आहे पाहुतां एथीण दरबार प्रकर्ण श्रृत होईल.

## डी. नंबर २००

**यादी सरंजाम फौज**
**YADI SARANJAM FAUJ**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ७". २४ ओळी. मोडी. जुने. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २०९ वर ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे, पण काही पाने गहाळ झाली आहेत. पुरंदर येथील रहिवासी नीळकंठराव महादेवराव या आपल्या अधिकाऱ्यास पेशव्यांनी इनाम दिलेल्या खेड्यांचे तपशील यात आहेत. खेड्यांची नावे, तिथला नेमका महसूल आणि असाच इतर तपशील दिलेला आहे. इनामदारास सरदेशमुख म्हणून जाहीर केले गेले आणि देशमुखी पद्धतीने जमिनी देण्यात आल्या. काही एका विशिष्ट संख्येत या सरदेशमुखाने पेशव्यांच्या घोडदळासाठी घोडे व सैनिक द्यावेत, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. हे इनाम देणाऱ्या पेशव्याच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. या दस्तऐवजाचा शेवटचा भाग गहाळ झालेला असल्यामुळे नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ कळत नाही. हे इनाम फसली १२०४ मध्ये दिल्याचे सांगितले आहे.

**प्रारंभ :** यादी फौज सरंजामी सिल्लेदार सुदां सुरसन अर्बा भयातैन व अलफ उरफ फसली सन १२०४ फसली ईनाम गाव वगैरे.

**शेवट :** ११५ जमीन प्रांत पुर्णे पैकी.

## डी. नंबर २०१

**येंगुर कैफियत**
**ENGUR KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ७". २२ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २५ वर ही कैफियत येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. म्हैसूर प्रांतातील एंगूर या गावाचे मूळ व विकास यांचा इतिहास यात सांगितला आहे. महत्त्वाच्या सर्व घटनांना शालिवाहन शकाच्या तारखा दिलेल्या आहेत. एका आख्यायिकेने या कैफियतीचा प्रारंभ होतो. एक विष्णुवर्धन नावाचा राजा या गावाचा निर्माता असून, पुढे हे गाव एक महत्त्वाचा किल्ला बनले, असे सांगितले आहे. याचा कब्जा करण्यासाठी अनेक वेढे घालण्यात आले व लढाया करण्यात आल्या. विजयनगरच्या रायलू राजांनी हा किल्ला जिंकला, असे नंतर सांगितले आहे. मुसलमानी आक्रमणाच्या काळी व विजयनगर राजवटीच्या उतरत्या काळी म्हैसूरचा राजा कृष्णराज वोडियार याच्या ताब्यात हा एंगूरचा किल्ला गेला. चिक्कदेव राजापासून म्हैसूरच्या राजाची नामावळ यात शोधलेली आहे. हैदर अलीचा उदय व टिपू सुलतानाचे राजपदग्रहण मोठ्या रेखीवपणे मांडलेले आहे. मराठे, फ्रेंच व ईस्ट इंडिया कंपनी यांच्याशी टिपू सुलतानाचा संघर्ष, त्याचा अखेरीस झालेला पराभव व मृत्यू यांचे अतिशय सुंदर वर्णन केलेले आहे.

शेवटी म्हैसूर प्रांताची मालकी ईस्ट इंडिया कंपनीकडे आल्याचे सांगितले आहे. म्हैसूरचे राजे व कॉर्नवॉलिस यांच्यातील पूर्णय्याची लवादी आणि कृष्णदेवराज वोडियार हा म्हैसूरचा राजा कसा झाला यांचे स्पष्टीकरण केलेले आहे. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेली नाहीत.

**प्रारंभ :** येगुर च कैफियत पुर्वि दरोबस्त मुलुक विजयनगरचा रायेलाचे जिमां असतां हलि बेलरच जागे वरी पुर्वी झाडी वाहडुन होत कडुन विष्णुवर्दन राजा मजकुरानी दौलत करीत असतां.

**शेवट :** मेहणां पुट अरसें सहित सांपडला वरुन कर्नल वासली सो वहदुर यांनी त्या दोघास व त्यांचे सिल सीला वगैरे यांचा जण ऐस सात जाणावरी णल (?) चडवीले.

## डी. नंबर २०२

**येंगुर कैफियत**
**ENGUR KAIFIYAT**

**कागद** : स्थानिक बनावट. दुरुस्त केलेले. १३"x ९". १७ ओळी. मोडी. जुने. चांगल्या स्थितीत. पूर्ण.

डी. नंबर २ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २२९ वर ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पृष्ठे दुरुस्त केलेली असून भागाची पुनर्बांधणी केलेली आहे. डी. नंबर २०२ प्रमाणेच ही कैफियत असली तरी यात मराठे व ईस्ट इंडिया कंपनी यांच्याबद्दल अधिक महत्त्वाची ऐतिहासिक माहिती दिलेली आहे. हैदर अलीच्या उदयापर्यंतचा मजकूर तोच आहे. नारायणराव पेशवा व महादेवराव पेशवा यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी केलेली स्वारी आणि एंगूर ताब्यात कसे घेतले याचे अतिशय सुंदर वर्णन केलेले आहे. युद्धात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या मराठा सेनापतींच्या नावांचा यात उल्लेख आहे. टिपू सुलतानाला नमविण्यात ईस्ट इंडिया कंपनीने बजाविलेली भूमिका आणि शेवटी म्हैसूरचा केलेला कब्जा याबद्दलची काही अधिक माहिती चांगल्या प्रकारे सांगितलेली आहे. अखेरीच्या समझोत्यानुसार कृष्णदेवराज वोडियार म्हैसूरचा राजा झाला. सर्व महत्त्वाच्या घटनांसाठी शालिवाहन शक योजिलेले आहेत. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ सांगितलेले नाही.

**प्रारंभ** : येंगुरचे कैफियत. पुर्वि दरोबस्त मुलक. विजयनगर रायेलाचे जिमां असता हाली बेलरच जागे वरी पुर्वि झाड वाहडुन होत.

**शेवट** : त्या दोघासं त्या सीलसीला वगैरे पाच जण ऐसें सात जणासी नुंगेहाली जवल गलचडवीलेस जा पोंहचविले. कलम.

## डी. नंबर २०३

**येलनाड प्रभु वंशावली तपशील**
**ELLANĀDU PRABHU VAMSĀVALI TAPSIL**

**कागद** : स्थानिक बनावट. १३"x ९". १५ ओळी. मोडी. जुने. (दुरुस्त केलेले). चांगले. पूर्ण.

डी. नंबर २ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. २२१ वर ही कैफियत सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पाने दुरुस्त केलेली व व्यवस्थित बांधलेली आहेत. म्हैसूर प्रांतातील येलनाडू या नावाने ओळखला जाणारा किल्ला आणि त्याचे किल्लेदार (Chieftains) यांचे मूळ व इतिहास प्रस्तुत कैफियत सांगते. कांचीहून स्थलांतरित होऊन सात व्यक्ती म्हैसूरच्या सीमेवर मुक्कामास आल्या आणि केंपे गौंडाच्या आज्ञा मान्य करण्यास त्यांनी होकार दिला. काही दैवी सामर्थ्यामुळे हा केम्पे गौंडा अधिक सामर्थ्यशाली झाला आणि त्याने एक गाव व किल्ला बांधून त्यास येलनाड असे नाव दिले. वीरभद्र मंदिराचा (शके १३८०) तो संस्थापक मानला जातो. बेंगलोरच्या किल्ल्याचे मूळ व इतिहासही थोडक्यात सांगितला आहे.

शंकर नाईक या प्रक्षुब्ध पाळेगाराशी युद्ध करून त्याचा प्रदेश जिंकणारा हाच केंपे गौंडा. शेवटच्या गौंडापर्यंतची (?) गौंडा घराण्याची वंशावळ दिलेली आहे. या राजांनी बांधलेले किल्ले, देवळे आणि धर्मादाय संस्था यांची यादी यात दिलेली आहे. कुली खान (?) याच्या नेतृत्वाखाली मुसलमानांनी बेंगलोर व इतर किल्ले जिंकले. चिक्कदेवराय वोडियार याचा इतिहास आणि त्याने मूळच्या गौंडा घराण्याशी विवाहाद्वारे प्रस्थापित केलेले सोयरिकीचे संबंध यांचे वर्णन कैफियतीत पुढे आलेले आहे. हैदर अलीने खाल्लेली उचल आणि पुंगनूरसारख्या दूरच्या किल्ल्यात गौंडा राजांनी घेतलेली माघार याविषयीचा वृत्तान्त कैफियतीच्या शेवटच्या भागात येतो. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ सांगितलेले नाही.

**प्रारंभ** : कंचिहुन अलते बंदु ७ सी तपसील अंकुशगिरी पालेगार मास्तीमधे राहीलाते.

**शेवट** : येथ न होत म्हण. सदरी उतार राणी मलयापासुन बहदरचे अमल पावेतो चालन अल. तरी बहदराच दिवसात सदरहु उतारास जाहल टिपुसुलतानाचे दिवसी उतार जत्फती जाहल– कलम.

## डी. नंबर २०४

**येलनाड प्रभु वंशावली तपशील**
**ELLANĀD PRABHU VAMSĀVALI TAPSIL**

**कागद** : स्थानिक बनावट. १०"x७". २५ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २० वर ही कैफियत येत असून हस्ताक्षर

बऱ्यापैकी व वाच्य आहे. येलनाडू व बेंगलोरची (प्रथम) स्थापना व (नंतर) राज्य केलेल्या गौंडा घराण्याचे मूळ व इतिहास यांच्याशी प्रस्तुत कैफियत संबंधित आहे. कांचीहून आलेल्या व म्हैसूरनजीक स्थायिक झालेल्या केंपा गौंडाचा नातू केंपे गौंडा याच्याबद्दल बरेच सांगितले आहे. येलनाडू व बेंगलोर या गावांच्या उभारणीसाठी केंपा गौंडाला ज्या परिस्थितीत प्रारंभ करावा लागला त्याचे वर्णन विशेषतः चांगले उतरले आहे. मुकुडी गौंडापर्यंतची गौंडा घराण्याची वंशावळ दिलेली आहे. याच्या कारकीर्दीत रणदुल्लाखानाच्या नेतृत्वाखाली मोगलांनी हल्ला केला आणि गौंडास कैद केले. एका तहानंतर गौंडाला मुक्त करण्यात आले आणि बेंगलोर मोगल राज्यात समाविष्ट केले गेले.

ही कैफियत त्यानंतर म्हैसूरच्या चिक्कदेवराय याची स्वारी आणि मुकुडी केंपा गौंडाचा पराभव व कैद यांविषयी माहिती देते. चिक्कदेव रायाने गौंडा घराण्याशी तह केला, गौंडाची मैत्री पक्की केली आणि तो येलनाडू व बेंगलोर यांचा एकमेव राजा बनला. कैफियतीच्या शेवटच्या भागातील वर्ण्य विषय म्हणजे हैदर अलीखानाचा उदय व चिक्कदेव रायाचा पराभव हा आहे. नक्कलकाराचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ सांगितलेले नाही. सर्व महत्त्वाच्या घटनांना शालिवाहन शकाच्या तारखा दिलेल्या आहेत.

**प्रारंभ :** कंचीहून आलते भंदु सातासी तपशील. अकुस गिरी पालेगार मस्तीमधे राहिलते ? पुंगुनुर पाले सुगुटुर मधे राहिले ला ?

**शेवट :** एक हजार तीनीसेहे संवछर लगाईत राजे पण केले ते संवछर २७० मागडी सवस्तान किलक संवछर लगाईत आखरे विरोधीकृतु संवछरास ६३ संवछर जाहल. एकुन सवछर ३३३.

## डी. नंबर २०५

**रंग दुर्ग कैफियत**
**RANGA DURG KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १८"x१४". ३८ ओळी. मोडी. जुने. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर ३७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

श्रीरंगम् हे बेट आणि श्रीरंगनाथस्वामी यास समर्पित केलेले मंदिर यांचे मूळ व इतिहास यांच्याशी निगडित असणारी ही अपूर्ण कैफियत या भागाच्या ७६९ व्या पानावर येते. मोठ्या प्रमाणात अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्हयोजना यांनी युक्त असलेल्या या कैफियतीचे हस्ताक्षर दुर्वाच्य आहे. कर्नल मॅकेंझी याच्या मार्गदर्शनानुसार मूळ दस्तऐवजाची ही केलेली नक्कल आहे. या ठिकाणाची भौगोलिक रचनाही यात वर्णिलेली आहे. हे मंदिर व तेथील देवतेचे सामर्थ्य सांगणारी अतिशयोक्त आख्यायिका आणि काही कर्मठ भक्तांची नावे अगदी तपशीलवार दिलेली आहेत. या देवालयाच्या देखभालीसाठी देणगी दिलेल्या व्यक्तींची नावे कैफियतीत नंतर येतात. या लेखनातील कोणत्याही प्रसंगाची तारीख दिलेली नाही. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळही दिलेले नाही.

**प्रारंभ :** श्रीरंग देवालयाचें कैफियत. श्री नारायणजीयराचे हकीगत. xxx अवल आसुन देवाचे वस्त्र आभरणास अमचे हजर करणें मोहनी देणेच पैकेस सदरी आठ निशाणी करणे येणे प्रकारें वरी लिहीला मामुला प्रमाणे चालवणेच निज लिहुन दिल्ल आहे दरीयात्फ. करीणे वत्ख वरी लिहीला अस यास नाव निशी करणेस हजर आहे.

## डी. नंबर २०६

**रंग देवालयासंबंधी व्यवस्था**
**RANGA DEVĀLAYA SAMBANDHI VYAVASTHA**

**कागद :** स्थानिक बनावट. २२"x१६". २१ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ४८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पहिल्या पानावर ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी असले तरी शाई पुसट झालेली आहे. श्री रंगनाथस्वामी मंदिराचे मूळ, इतिहास व ट्रस्टच्या मालमत्तेची व्यवस्था वगैरेंबद्दल मंदिराच्या व्यवस्थापनाने एका अधिकाऱ्याला– ज्याचे नाव गळलेले आहे– दिलेला हा अहवाल असावा असे वाटते. यावर २८ जून १८२१ अशी तारीख लिहिलेली आहे. श्रीरंगनाथस्वामींविषयींच्या आणि श्रीरंगम् या बेटाविषयीच्या पौराणिक आख्यायिका चांगल्या तऱ्हेने वर्णिलेल्या आहेत. श्रीरामानुजाच्या काही गुरूंची व शिष्यांची नावे दिलेली आहेत. मंदिरातील काही अधिकाऱ्यांची कामे आणि काही उत्सवांची नावेसुद्धा उल्लेखिलेली आहेत. देवांच्या दैनंदिन पूजेसाठी व उत्सवप्रसंगांसाठी शेतजमिनीचे दान देणाऱ्या व्यक्तींची नावे सांगितलेली आहेत. काही मंदिर-सेवकांकडून अपेक्षित असलेली कामे आणि त्यांना दिले जाणारे मानधन यांचाही उल्लेख केलेला

आहे. नक्कलकाराचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ सांगितलेले नाही.

**प्रारंभ** : श्रीरंगदेवल विष्टणु स्थलापैकी अवल. श्री नारायणजियरांचे हकीगत.

**शेवट** : येणेप्रमाणे वर लीहीलाबाबत मामुलप्रेमाण चोलणच निज लिहीला आर्हे. दर्यात्फ करीते वेत्खती xx असलीया समजावसी हजर असें. तारीख २८ माहे जुन १८२९ ईसवी.

## डी. नंबर २०७

**राघोजी भोसले नागपूर**
**RĀGHOJI BHONSLE NĀGPUR**

**कागद** : स्थानिक बनावट. १२"x१०". २१ ओळी. मोडी. जुने. चांगली स्थिती. पूर्ण.

डी. नंबर ५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १५० वर ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सर्व पृष्ठे दुरुस्त करून नीट बांधलेली आहेत. डाव्या बाजूच्या माथ्यावर कोपऱ्यात कैफियतीचे नाव इंग्रजीतही लिहिलेले आहे. नागपूर येथे राज्य केलेल्या भोसले घराण्याचे मूळ व इतिहास यांच्याशी ही कैफियत निगडित आहे. रामराजापासून महादोजी भोसल्यापर्यंतचा वंशावळजन्य इतिहास तपशीलवार सांगितला आहे. नागपूर येथे मराठा राज्य निर्माण करण्यास रामराजा भोसलेच जबाबदार होता असे म्हटले आहे. राज्यविस्तारासाठी दक्षिणेत अर्काटपर्यंत स्वाऱ्या करणाऱ्या रघोजी भोसले याचे कर्तृत्व कैफियतीत पुढे सांगितले आहे. रघोजीच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र नानाजी भोसले गादीवर बसला. याने टिपू सुलतानाच्या विरोधात केलेल्या काही स्वाऱ्या थोडक्यात सांगितल्या आहेत. नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ** : श्री गणेशाय नमा. नागपुर वाले रघोजी भोसलेची उतपन रामराजेचे उधरी तीघे पुत्र जाहले. त्याचे शीवाजी व शाहाजी व भीकाजी भोसले.

...सयनेन करुन माधोजी नागपुरास आले वर पुनेवालेसी व टिपूसी सला जाहले वर चीमनाजी बोसले रुकसत होउन नागपुरास आले वर थोड दिवसामागुन माधोजी बोसलेनी नारायेण यात्रा केलेवर रघोजी बोसले राजावर कार्य जाहले आहेत. चीमनाजी व मानाजी त्यासव आहेत. पुढे जे होईल ते कलन येईल जाणीचे.

## डी. नंबर २०८

**राघोबा दाते व सवाई माधवराव कारकीर्दी**
**RAGHOBA DĀTĒ VA SAVAYEE MĀDHAVA RAO KĀRKIRDI.**

**कागद** : इंग्लिश बनावट. १०"x७". १३ ओळी. मोडी. बऱ्यापैकी. अपूर्ण.

या भागाच्या पान क्र. ४०० वर ही कैफियत येत असून हस्ताक्षर ठीक आहे. पृष्ठे मात्र नीट रचलेली नाहीत. मराठ्यांचा इतिहास सांगणाऱ्या एका मोठ्या लेखनाचा प्रस्तुत कैफियत हा वेगळा झालेला छोटासा भाग असावा. ही कैफियत विशेषत्वाने सवाई माधवरावाचा इतिहास सांगते. तसे कैफियतीला शीर्षक वेगळे आहे, पण ती सवाई माधवरावाचाच इतिहास सांगते. पुण्यातील यादवी युद्ध आणि सवाई माधवराव व नाना फडणवीस यांच्यात झालेला तह इथपासून हिचा प्रारंभ होतो. सवाई माधवरावास आपल्या वाडवडिलांचा इतिहास जाणून घेण्याची फार इच्छा होती. म्हणून त्याने नाना फडणवीस व श्रीपतराव दिनकर यांना आपल्या पूर्वजांचा वृत्तान्त लिहिण्याची विनंती केल्याचे सांगितले आहे. सवाई माधवरावाच्या विनंतीनुसार वर उल्लेखिलेल्या दोघांनी एक संक्षिप्त इतिहास लिहिला आणि तो पर्युदवी संवत्सर, माघ मास १३ शुक्ल पक्ष बुधवार रोजी पुरा केला. तुळापूरचे रहिवासी चिमणराव व रघुनाथ श्रीनिवासराव यांनी तो नकलला. कर्नल मॅकेंझी याच्या विनंतीवरून वर सांगितलेला इतिहास भीमराव रंगाराव यांनी उतरून घेतला.

**प्रारंभ** : त्यामध्ये विक्षेप पडावा म्हणौन परशराम भाउ श्रीमंत सवाई माधवराव याकड व हरीपंत फडक्या नाना फडनवीसाकड ऐस नाना प्रकार कर कर येउन गावांत मारामारी जाहल.

**शेवट** : रंगराव यानी लिहीउन आणउन फिरगी सरदार मेजर गाल मेकींनजीस दिलह ते दिवस रोद्री संवछर माघामास कृष्णपक्ष प्रतिपदा दिवसी नकल उतरविले.

## डी. नंबर २०९

**राजा गोपीचंद बखर**
**RĀJĀ GŌPICHAND BAKHER**

**कागद** : स्थानिक बनावट. ७"x५". १३ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १७ वर ही बखर सुरू होत असून पृष्ठे अतिशय खराब स्थितीत व भोके पडलेली आहेत. बंगालमध्ये राज्य केलेल्या एका हिंदू राजाच्या चरित्राशी ही निगडित आहे.

अहमदनगर येथील याच्या एका पुस्तकावरून ती ७ डिसेंबर १८०५ रोजी नकलली आणि कर्नल मॅकेंझी यास पाठविली, असे शेवटच्या भागात सांगितले आहे.

**प्रारंभ :** राजा गोपीचेंदाचे कैफियत. राजा गोपीचेंदाचे पीता श्री लोकचेंद व माता मयाणवती xxx

**शेवट :** नकल लिहीले असें दर जागा हमदनगर बातारीख ७ माहे डिशंबर सन ईसवी. जीवस्ते ईलाखे हजरत मेजर कलनल मर्कीजी साहेब.

## डी. नंबर २१०

**राजावळी गोवळकोंडा**
**RĀJĀVALI GOPALAKONDA**

**कागद :** स्थानिक बनावट. ५"x७". ८ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

'कैटादियुग राजावळी' भाग १ ही यातील इतर रचना आहे.

या भागाच्या पृ. ३६ वर ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. आधीच्या बखरीला जोडूनच ही लिहिलेली असून तिला शीर्षक नाही. गोवळकोंडा येथे राज्य केलेल्या काही राजांचे मूळ व इतिहास यांच्याशी ही संबंधित आहे. शके १६०८ ते १६९० मध्ये राज्य केलेल्या रायलू राजांचा संक्षिप्त इतिहास यात आलेला आहे. गोवळकोंडा येथे राज्य केलेले राजे, त्यांच्या राज्यारोहणांच्या तारखा आणि त्यांच्या कारभाराचा काळ यांविषयीचेच काही तपशील प्रस्तुत कैफियतीत सांगितले आहेत. इतर काही नाही. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही. पृष्ठे नीट दुरुस्त करून बांधलेली आहेत.

**प्रारंभ :** शेका १६०८ आंगुटी अक्ष्ये संवछर तागाईत प्रमादीच संवछर पावेतो अबदुल्ला कुतुवसाहेब राज्यभर वरुष xx उभयेता येकुन वरुष ३५.

**शेवट :** मधे आयुष प्रपाण होऊन्न जात आहेत. सखळ दर्मही राहुन जात आहे.

## डी. नंबर २११

**राजावळी पौराणिक चोळ यादव सुल्तान**
**RĀJĀVALI POURANĪK COLAYĀDAVA SULTĀN**

**कागद :** स्थानिक बनावट. ७"x१०". १० ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ४८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३१ वर ही कैफियत येत असून जवळजवळ सर्व पृष्ठे अतिशय खराब अवस्थेत आहेत. एका आख्यायिकेने हिचा प्रारंभ होतो. चोल, यादव व सुलतान या घराण्यांतील काही महत्त्वाच्या व्यक्तींचे मूळ व इतिहास यांच्याशी ही संबंधित आहे. प्रत्येक राजाच्या राज्यारोहणाची तारीख आणि प्रत्येक जण किती वर्षे जगला, त्याने किती वर्षे राज्य केले यांची यात माहिती दिलेली आहे. चोल राजांच्या इतिहासापासून कैफियत सुरू होते. त्यांनी बांधलेली महत्त्वाची मंदिरे सांगितलेली आहेत. दुसऱ्या भागात चोलांचे पतन आणि यादव राजांचे मूळ व संक्षिप्त इतिहास दिलेला आहे. पुढे मोगलांनी यादवांचा पराभ करून स्वतःचे राज्य स्थापल्याचा वृत्तान्त कैफियत संपविताना सांगितलेला आहे. सर्व महत्त्वाच्या घटनांना शालिवाहन शकातील तारखा दिलेल्या आहेत. नक्कलकाराचे लिहिलेले नाव दुर्वाच्य असले तरी कर्नल मॅकेंझीच्या सूचनेवरून ही कैफियत मुळावरून नकलून त्याला १८०६ इसवीमध्ये पाठविण्यात आली असे म्हटलेले आहे.

**प्रारंभ :** (चौथी ओळ) ४०० वरुष उजनी पटणांत हा राज्यभार केला.

**शेवट :** पाठवीले होते हुकम वामोजीबा पुर्वील हीसोब प्रमाणे लिहुन पाटवील ईसाब तपसील.

## डी. नंबर २१२

**राजा प्रतापरुद्र कैफियत**
**RĀJĀ PRATĀPA RUDRA KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. १६"x८". १७ ओळी. मोडी. जुने. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर २ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. १६४ वर ही कैफियत सुरू होत असून हस्ताक्षर

बऱ्यापैकी व वाच्य आहे. सर्व पृष्ठे नीट दुरुस्त करून एकत्र बांधलेली आहेत. ही कैफियत मराठ्यांच्या इतिहासाशी निगडित आहे. आख्यायिकेने तिचा प्रारंभ होतो. हिंदुस्थानाच्या इतिहासात दीर्घ काळपर्यंत जैन कळसावर होते. त्यांना चोल राजांनी नमविले असे म्हटले जाते. विजयनगरच्या राजघराण्याचा विकास यात थोडक्यात वर्णिला आहे. शेवटचा नाईक राजा वीर नरसिंह याने गोवळकोंडा शहर व तटबंदी बांधली असे सांगितले आहे. विजयनगरच्या साम्राज्याच्या पतनाचा इतिहास थोडक्यात स्पष्ट केला आहे. शहाजी भोसल्यांच्या नेतृत्वाखालील मराठा राज्याचा उदय व इतिहास सांगितला आहे. शिवाजीचे चरित्र स्पष्ट केलेले आहे. शाहूचे बालपण आणि अज्ञान वयात तो औरंगजेबाच्या कन्येकडून कसा वाढविला गेला, हे मोठ्या विस्ताराने सांगितले आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर सुरू झालेली यादवी व वारशासाठीच्या लढाया यांचे वर्णन या कैफियतीत केलेले आहे. शाहू मुक्त केला गेला आणि तो त्याच्या पूर्वजांच्या सिंहासनावर बसण्यात यशस्वी झाला, हा निष्कर्ष सांगितला आहे. मराठी राज्याचे भवितव्य घडविण्यातील बाजीराव, नाना फडणवीस, सदाशिवराव भाऊ यांनी बजावलेल्या भूमिका स्पष्ट केलेल्या आहेत. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही. प्रसंग स्पष्ट करण्यासाठी एखाददुसऱ्या ठिकाणी शालिवाहन शकातील तारखा दिलेल्या आहेत. जरी या कैफियतीचे शीर्षक 'राजा प्रताप रुद्र कैफियत' असले तरी या राजाबद्दल फारच थोडा मजकूर यात असून इतर सर्व भागात मराठ्यांचा इतिहासच सांगितलेला आहे.

**प्रारंभ** : कैफियत राजा प्रतापरुद्र जैनाच आधीकार केलतोवरी पुर्वि हे राज्यांत जेयन अधीकार होत. प्रतापरुद्राचे काली त्याच नाशन जाहला नंतरे नव चोळ राजयाने फार दिवस आधीकार करीत.

**शेवट** : (नानासाहेबास) म्हणाले जे तुम्ही दाह वारानीसी अले अहे करीतां तोंडांत घालन घेऊन तुमचे फौजांत जाऊन पावल्या नंतरे षहरचे बंदोबस्ती करून घणे म्हणुन सांगुन वैकुंट यात्रा केलें. मग सिख्या घेऊन आपले फौजांत मीळालें.

## डी. नंबर २१३

**राजा रणवाय गुडीचे कैफियत**
**RĀJĀ (RANA) VĀYAGUDICE KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १०"x५". २० ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ५ वर ही कैफियत येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. कागद थोडे खराब झालेले असून कैफियत अपूर्ण आहे. राजा राणा राय आणि त्याने चित्रदुर्गाच्या पश्चिमेस बांधलेला रणरायगड या दोहोंचे मूळ व इतिहास यांच्याशी ही कैफियत निगडित आहे. राणा राय हे दहा अपत्यांपैकी चौथे अपत्य असून त्यास विक्रमादित्याने दत्तक घेतले. राणा रायाच्या वडिलांचे किंवा त्याच्या गावाचे नाव दिलेले नाही. हा राणा राय विक्रमादित्यानंतर गादीवर बसला. या कैफियतीत उल्लेख केलेला किल्ला (तटबंदी) बांधण्याची राणा रायला इच्छा व्हावी असे काही प्रसंग यात स्पष्ट केलेले असून, इथे मध्येच हा दस्तऐवज संपतो. लेखकाचे नाव, यातील माहितीचे मूळ आणि उल्लेख केलेल्या घटना-प्रसंगांच्या तारखा दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ** : राण रायगुडच कैफियत. चित्रदुर्गास पछम भागी वारा कोसावरी पुर्वी श्वर्गोपती पटण मणहुन बहुत प्रख्यात पावलने विस्तारण औरस चौरस च्यारी कोस विस्तीरण.

**शेवट** : पाणि पाहुन पित नयेत. ते राजा पाहुन हे एक कार्ये कीं कारण आहे. मणहुन मंत्रीस विचारीताना मंत्रीने जबाब दिला. जे हे तळा बांधवीला तो पुर्व जन्मी त्याला पुत्र संतान xxx.

## डी. नंबर २१४

**राजा (रण) वायुगुडीचे कैफियत**
**RĀJĀ RANA VĀYOGUDICE KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १०"x६". १९ ओळी. जुने. खराब स्थिती. अपूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत प्रस्तुत भागाच्या पृ. १९७ वर येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. ती अपूर्ण आहे आणि राणा रायगुडी या डोंगरी किल्ल्याच्या इतिहासाशी संबंधित आहे. डी. नंबर २१३ या कैफियतीचे हे दुसरे प्रकरण असल्याचे दिसते. एका देवतेने कन्येच्या रूपाने एका राजावर कशी कृपा केली, हे सांगणाऱ्या आख्यायिकेने याचा प्रारंभ होतो. राजाच्या नावाचा उल्लेख नसला तरी मुलीचे नाव शांता परमेश्वरी असल्याचे सांगितले आहे. कैफियतीच्या दुसऱ्या भागात आठ चोल राजांचा इतिहास थोडक्यात सांगितलेला आहे. कैफियत संपविताना कारिकल चोलाचे चरित्र सांगितले आहे. नंतर इथेच निवेदन संपते.

पहिली व शेवटची काही पाने गहाळ झालेली आहेत.

कैफियतीवर शीर्षक नाही. तसेच लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** x x होत मणतात तंनमुल वगैरेरयानी बांदविला तलयांत पाणी पीत नाही म्हणुन सांगीतल्यास राजानी मनीं फार व्यसन कडुन आपल्या पटणास जाऊन चिंता कडुन नीजला.

**शेवट :** सांगीतल्य वेलेस जवाब दील्लाजे. आपले अधरुप कडुन (ज्यार परषाच) . . . बाहेर कडुन आपल हाताने सहार होऊन केला. ते पापाकडुन तरवार त्याचे डोसकें होनी दोनी हात.

## डी. नंबर २१५

**रामराजा देवगिरी बखर**
**RĀMĀ RĀJĀ DEVAGIRI BAKHER.**

**कागद :** स्थानिक बनावट. ७"x५". १३ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर ६६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १३६ वर ही बखर सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पहिली चार पाने गहाळ झालेली आहेत. देवगिरीचा संस्थापक रामराजा आणि त्याचा मंत्री हेमाड पंडित राजा यांचे मूळ व इतिहास यांच्याशी ही बखर निगडित आहे. एका फसव्या साधूच्या जीवघेण्या कचाट्यातून त्याने स्वतःला कसे वाचविले हे कैफियतीत पुढे स्पष्ट केले आहे. देवगिरीचा किल्ला बांधताना रामराजाने केलेले प्रयत्न आणि तो विद्वान ब्राह्मण असलेल्या हेमाड पंडिताच्या परिचयाचा कसा झाला याचा वृतान्त दुसऱ्या भागात आलेला आहे. शेवटच्या भागात हेमाड पंडिताने एक रोग बरा करण्यासाठी विभेषणा नगरीचा प्रवास केल्याची आख्यायिका सांगितलेली आहे. हाच हेमाड पंडित मोडी लिपीचा जनक असल्याचेही बखरीत स्पष्ट केले आहे.

लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ किंवा यात घडलेल्या अनेकविध प्रसंगांच्या तारखा बखरीत दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ :** ऐसी तयार करुन त्या मुलास तेथे नेले त्यासी म्हणुन ला... लाकी यास अग्नीस तिनी वेढा घालणे.

**शेवट :** देवगीरीस राहुन मेले. देवगीरीची षचना हेमाडपंता पासुनच जाहाली. पुर्वि पर्वत मात्र होता. या प्रमाणे देवगीरीचा कथ पुर्वि पासुन सांगीतली असें एथ्रोर देवगीरीचे बखर.

## डी. नंबर २१६

**रास्तल बेगंमपुर् जैन कैफियत**
**RASTAL BEGAMPUR JAIN KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १०"x६". १३ ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर ६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृ. ३२ (ब) वर येत असून हस्ताक्षर फारसे चांगले नाही. श्रीमुशनम् तालुक्यातील पल्लूर येथे राहणाऱ्या रामानुज अय्यंगार याने कैफियतीची नक्कल तयार केलेली आहे. या व्यक्तीबद्दलची इतर माहिती दिलेली नाही. ही कैफियत दोन ठिकाणांच्या मुळाशी संबंधित असून जैन धर्माबद्दल अतिशय संक्षिप्त माहिती देते. रास्तल राज्याच्या निर्मितीची माहिती पहिल्या भागात येते. चांगले व्यापारी केंद्र म्हणून हे राज्य ओळखले जात होते. बेगमपूरच्या राजासाहेबांच्या चरित्रावरून या राज्याबद्दलची माहिती जमविण्यात आलेली आहे. बेगमपूरचे मूळ व इतिहासही सांगितलेला आहे. अकबराने एका छोट्या खेड्याचे सुधारून मोठ्या गावात रूपांतर केले. औरंगाबादच्या पूर्वेस आठ मैलांवर ते वसलेले आहे. आपल्या मुलीचा जन्म साजरा करण्यासाठी अकबराने या गावाला बेगमपूर असे नाव दिले. कैफियतीच्या शेवटच्या भागात बंगालमधील जैन धर्मपंथाबद्दल थोडीशी माहिती दिलेली आहे. कैफियतीची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** हे कथा अवध लिहिलते श्रीमुष्ण जवली पालुर म्हणावयाच खेड्यांत रामानुज यैंगार लिहीवीलतें.

**शेवट :** जैन ज्यातीचा कैफियत बंनालांत मलुदाबाद देहेंत जेग सेटी गालां म्हणुन भारी वर्तक साहुकारपण करीत आहे.

## डी. नंबर २१७

**लालबाग कैफियत**
**LĀLBĀG KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १०"x६". १८ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १५७ वर ही कैफियत येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. बेंगलोरचे प्रसिद्ध उद्यान लालबाग आणि

त्यातील काही मशिदी यांच्याशी ही कैफियत संबंधित आहे. हैदर अलीने विचार केला की, प्रस्तुत जागा बाग तयार करण्याच्या दृष्टीने अतिशय योग्य अशी आहे. त्याच्या सूचनांनुसार मोठ्या प्रमाणावर खर्च करून व कामगार लावून एका प्रचंड बागेचा आराखडा तयार केला गेला. काबूलसारख्या दूरच्या ठिकाणाहून दुर्मिळ झाडे व रोपे आणविण्यात आली. हैदर अली व लॉर्ड (कॉर्न) वॉलिस यांच्या युद्धात या बागेचे अतिशय नुकसान झाले. टिपू सुलतानाच्या राजवटीत त्याने लालबागेची पुनर्बांधणी केली, आणि त्यात अधिक इमारती व मशिदी यांची भर टाकली. त्याने या बागेचे नाव 'दौलत बाग' असे ठेवले. टिपूने ही बाग व मशिदी यांच्या देखभालीसाठी मोठ्या प्रमाणात देणग्या दिल्या, असे ही कैफियत सांगते. या बागेचे काम नंदन वर्षात पुरे झाले असे सांगितले जाते.

लेखकाचे नाव, यातील माहितीचे मूळ किंवा तारखा दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ :** लालबागच कैफियत. लालुबाग (सांजि). . . राजेच बरवीत. . . एक आमराई जांब वगैरेच झाडी हाजोरी होत ते जागा बहदुरयानी पाहुन बाग करणेच तजवीज करुन झाड तमाम तोडुम जमीन कंपेष होत व बराबर करणेस हज्मारो कामाटी मजुरी देऊन लाख व्होन खर्च करु बाग तयार केला.

**शेवट :** जाऊन मिजाज करीत होते. खेरं खैरात हाजार रुपये फकर फकीरास खैरात होता. निजामासी अलते लोकास खाणा पाणी ही खीलावत होतें कालम.

## डी. नंबर २१८

**लासे गाव तालुके तीरुमंगलम्**
**LĀSEGĀVA TALUKE THIRUMANGALAM**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x४". ३० ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर १२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही अपूर्ण कैफियत पृ. ३ (ब) वर येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी आहे. मदुरेचे मीनाक्षी मंदिर व इतर काही सेवाभावी धर्मादाय संस्था यांना देणगीदाखल दिलेल्या शेतजमिनी मदुरा जिल्ह्यातील तिरुमंगलम् तालुक्यातील असून, ती खेडेगावे व चौक्या यांच्या नावांशी सदरहू कैफियत संबंधित आहे. मंदिराच्या मालकीच्या बागाईत व जिराईत जमिनीचे क्षेत्र आणि बागा यांची माहिती यात दिलेली आहे. दात्यांच्या नावांचा तपशील किंवा ज्यांना दाने दिली त्या व्यक्ती किंवा ही दाने दिल्याच्या तारखा यांचा या कैफियतीत उल्लेख नाही. तसेच लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचाही यात उल्लेख नाही.

**प्रारंभ :** परगणे तीरुमंगलम्. देह ८९ स्तयरे ३ परगणे मजकुर देवल तालुका. परगणे मजकुर देवल तालुका बाग. सी देवदायमं दात्वल.

**शेवट :** जाता बाकी. देह ४३ सयेर १ स परगणे देह ४३ सायेर १.

## डी. नंबर २१९

**लासे गाव तालुके तीरुमंगलम्**
**LĀSE GĀVA TALUKA THIRUMANGALAM**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x४". ३० ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर १२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृ. ३१ (ब) वर सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी आहे. ती अपूर्ण आहे. पृष्ठेही नीट रचलेली नाहीत. मदुरा जिल्ह्यातील तिरुमंगलम् तालुक्यातील एकूण बागाईत व जिराईत शेत जमिनीचे क्षेत्र आणि बागा यांची यात माहिती दिलेली दिसते. मदुरेतील श्री मीनाक्षी सुंदरेश्वर स्वामी मंदिरास सर्वमण्यम् म्हणून दान दिलेल्या जमिनीचे क्षेत्रही दिलेले आहे. खाजगी धर्मादाय संस्था व व्यक्ती यांना दान म्हणून दिलेल्या जमिनींचे तपशीलही दिलेले आहेत. दाता वा याचक यांची नावे किंवा दानाच्या तारखा इत्यादी इतर माहिती दिलेली नाही. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळही दिलेले नाही.

**प्रारंभ :** तीरुमंगलम दाखल तुरुनलुर. दाखल सेटी गेंदी वणीतम-३. सेटीगेंदी १. पापायोलम १. सीनसेटी गेंदी १.

**शेवट :** देवल कुरुवी तोटंम वगैरे.

## डी. नंबर २२०

**लासे गाव आणि गिरि देवस्थान कैफियत**
**LĀSĀ GAV AUNI GIRI DEVASTĀN KAIFIYAT**

**कागद :** १२"x४". ३० ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर १२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत प्रस्तुत भागाच्या पृ. १२ वर येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी असले तरी पृष्ठे कमालीच्या खराब स्थितीत आहेत. ती

मोठ्या प्रमाणात छिद्रांकित झालेली असल्यामुळे काही भाग वाचणे अशक्य आहे. श्री अलगिरीस्वामी व श्री मीनाक्षी या दोन मंदिरांना– देवस्थानांना– दिलेल्या देणग्यांचा तपशील ही कैफियत पुरविते. यातील पहिले मंदिर मदुरेनजीकच्या अलगर कोईल येथे वसलेले असून, दुसरे म्हणजे मदुरेतील श्री मीनाक्षीचे मंदिर हे सुप्रसिद्ध पवित्र स्थल होय. मदुरा येथेच असलेल्या स्थानिक फौजेचा सेनापती युसुफखान याने मदुरेच्या तांडवराय पिलाई यास खूप मोठी जमीन दोन प्रसंगपरत्वे दान दिली. म्हणजे खानाच्या अपत्याचा जन्म झाला तेव्हा. वर उल्लेखिलेल्या मंदिरांना दिलेल्या दानाच्या तारखा नोंदलेल्या आहेत. जमा होणारे भात (तांदूळ) आणि दैनंदिन पूजा व वार्षिक उत्सव वगैरेसाठी ठरविलेली रक्कम यांचे हिशेबही दिलेले आहेत. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही. हा सर्वच दस्तऐवज अगदीच जीर्ण फाटक्या अवस्थेत आहे.

**प्रारंभ :** याददस्त x x x कटला तपशील मधुरे श्री अलगिरी देवस्थानमा ईसफ खान म्हणार तंडवराय पिले मजकुरास लयोंक ठबजील.

**शेवट :** ၆ कर्णम २१३
१ । प्रा x x छ १ स ३११२
२७९ | |

## डी. नंबर २२१

**लिंगराज पट्टण कैफियत**
**LINGARĀJA PATNA KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x ४". २२ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १८० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ५ वर ही कैफियत येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. लिंगराज पट्टणम् या बंदराचे मूळ व इतिहास यांच्याशी ती संबंधित आहे. वस्तूंची आयात-निर्यात आणि गलबते-नौका यांची बांधणी यासाठी एक बंदर-गोदी हवी असे (विजयनगर घराण्यातील) दुर्वराज याला राज्य करीत असताना वाटले. दुर्वराजाच्या मृत्यूनंतर पेनुकोंडाच्या श्रीरंग रायलू याने ते बंदर जिंकले. पुढे हे बंदर गाव गोवळकोंड्याच्या मोगलांनी उद्ध्वस्त केले. ईस्ट इंडिया कंपनीचा एक अधिकारी अरुनिंजेल (Aruningel?) याच्या काळात त्याने ते गोवळकोंड्याच्या राजाकडून विकत घेतले आणि कंपनीच्या वापरासाठी तिथे एक मोठे दुकान व किल्ला बांधला. काही दिवसांनंतर ही जागा अयोग्य वाटल्याने कंपनीने सर्व बांधकाम पाडून टाकले आणि आपले बिऱ्हाड मद्रासला हलविले. गाव आणि त्याचा परिसर यांबद्दलचा एक छोटा वृत्तांत या कैफियतीत थोडक्यात सादर केलेला आहे. या कैफियतीत लिहिलेली माहिती तिथल्या एका रहिवाशाकडून मिळालेली आहे. लेखकाचे नाव किंवा यात अंतर्भूत असलेल्या घटनांच्या तारखा दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ :** लिंगराज पट्टणाच कैफियत. तेथेल स्तली कांनी पुर्वा पुर्वील पासुन चालत आल विध्येमान व करणमाकड या स्तलच अवघ उत्पती अवघ कुला कुशे दरयात्फत करुन लिहुन घेतीलते.

**शेवट :** पीक होर्णेच जिनस मुग साली सजगुरेरागी. ह्या गावच नंजीपुंजीचे जमीनास मेठा मागणी म्हणताहेत. ह्या गावांत तल एक अमराई चिंचाची दोनी एक उजयाड दुकान आहेत. कैफियत समाप्ती.

## डी. नंबर २२२

**लोहदंड उर्फ पंढरपूर क्षेत्र कैफियत**
**LŌHADANDA VURDHI PANDARPUR KSETRA KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. २"x ६". १० ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

डी. नंबर २४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २ वर ही कैफियत सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. हिचा प्रारंभ आख्यायिकेने होतो; पण नंतर मात्र इतिहास दृष्ट्या महत्त्वाचा मजकूर दिसतो. पहिल्या पृष्ठाच्या माथ्यावर उजव्या बाजूला इंग्रजीत लिहिलेल्या मजकुरावरून ही इ. स. १८०८ मध्ये नकलली व अनुवादली गेली असे समजून येते. ही कैफियत चार भागांत विभागलेली आहे. पंढरपूरच्या विष्णू विठोबाने धारण केलेल्या सगुणसाकार अवताराबद्दलच्या पौराणिक कथा पहिल्या भागात येतात.

पुंडलीक, नामदेव, तुकाराम आणि ज्ञानदेव (Gana Dev) यांसारख्या निस्सीम भक्तांच्या जीवनाचे वर्णन तिसऱ्या भागात येते. त्यांनी केलेले चमत्कारही थोडक्यात सांगितले आहेत.

या मंदिराला देणगी देणारे अनेक मराठा राजे, राजघराण्यांतील व्यक्ती आणि पेशवे यांच्या नावांचा उल्लेख चौथ्या भागात केलेला आहे. देवळाची सुधारणा आणि जादा इमारती व सभागृहे यांचे बांधकाम करून घेण्यास जबाबदार

असणारे मराठा राजे व पेशवे यांची नावे, जादा केलेल्या बांधकामांच्या तारखा आणि त्यांनी मंदिराला अर्पण केलेल्या भेटी यांचेही वर्णन आलेले आहे.

शेवटच्या भागात काही नाईक राजांनी पंढरपूरच्या मंदिराला दिलेल्या देणग्या लिहून ठेवलेल्या आहेत. काही अधिकाऱ्यांची नावे व त्यांच्याकडून मंदिरात अपेक्षित असलेली कामे आणि पंढरपूरची भौगोलिक रचना ही माहितीही यात दिलेली आहे. मल्हार भट व लक्ष्मण भट या बंधुद्वयाने कर्नल मॅकेंझी याच्या सूचनेवरून प्रस्तुत निवेदन नकलले असल्याचे कैफियतीच्या अखेरीस सांगितले आहे. नक्कल करण्याचे काम २७ ऑगस्ट १८०७ रोजी पुरे झाले आहे.

**प्रारंभ :** मुखवस्ते श्री लोहदंड क्षेत्र चेंद्रभागा तीर श्री पंढरपूर श्री विठोबा नामाभीदान श्री कृष्णस्वामी द्वारका वासी यांची चेरित्र व स्थल वर्णणा व संत लोकांची व राजा पंपातीर विद्यानगर नरपती व दामाजी पंत कारकुन ऐवजी राज्य (. . . कुल) या सर्वाची कारकिर्दी (वख)...केला आर्से.

**शेवट :** बा तारीख २८ माहें अगोष्ठ सन १८०७ ईस ईम्रेजी मु ॥ शेक शालिवाहन ११२७ श्रीव्य संवछर वदय ७ शुक्रवार तीसरा प्रहरा दर जागा मुकाम श्रीक्षेत्री लेहुन समाप्त जाला.

## डी. नंबर २२३

**वंदनपुरी पट्टण कैफियत**
**VANDANPURI PATNA KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. १३"x ८". २३ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर १८० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ७ वर ही कैफियत येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. नेल्लोर जिल्ह्यात पिनाकी नदीच्या तीरावर नंतरच्या विजयनगरच्या राजांनी बांधलेली काही मंदिरे व गावांचे मूळ व इतिहास यांचे वर्णन यात आलेले आहे. नव्याने बांधलेल्या वंदनपुरी या गावातील दोन मंदिरांचे मूळ व इतिहास यांचे वर्णन पहिल्या भागात आलेले आहे. या मंदिरांशी निगडित आख्यायिकाही सांगितल्या आहेत. विजयनगरच्या नाइक राजांनी ही मंदिरे बांधलेली आहेत. अच्युतप्पा नाईकर याच्या अच्युतपुरम् येथील किल्ल्याच्या बांधकामाबद्दलची माहिती दुसऱ्या भागात येते. कोदंड रामस्वामी व वीरभद्र यांची मंदिरे यानेच बांधली. शंकररावाच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी केलेल्या आक्रमणाची हकीकत तिसऱ्या भागात येते. या शंकररावाने या ठिकाणांवर जवळजवळ दहा वर्षे राज्य केले. पुढे औरंगझेबाने ही ठिकाणे ताब्यात घेतली. मोगल राज्याच्या पतनानंतर कर्नाटकाचा नबाब अहमदअली खान याने ही सर्व ठिकाणे जिंकली आणि आपल्या अमलाखाली आणली.

लेखकाचे नाव, या कैफियतीसाठी मिळविलेल्या माहितीचे मूळ ही दिलेली नाहीत. काही क्वचित प्रसंगांसाठी शालिवाहन शकाच्या तारखा योजिलेल्या आहेत.

**प्रारंभ :** कैफियत वंदनपुरी म्हणावयाचे नेलुरास दक्षणेस तीनी गाव या भाहेवरी आहे. आगदलांत त्यास वाकाड म्हणुन म्हणताहेत.

**शेवट :** सुभेचे फौजदारी केला. मग अनवर दीन खान सुभेची सुबेदारी केला मग महमद अली खान अरकाट सुभा केला. त्यानंतर ईग्रेज बहदुरचा मुलुक जाहाला. हे कैफियत समाप्ती.

## डी. नंबर २२४

**वहि कृतयुगातील राजे लोकांची वंशावली**
**VAHI KRTA VGANTILA RĀJE LOCKĀNCI VANSĀVALI**

**कागद :** इंग्लिश बनावट. १८"x ८". २६ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

मॅकेंझी संग्रहाच्या पहिल्या भागाच्या पृ. ६९३ पासून ही कैफियत सुरू होते. अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्ह-योजना यांचे वैपुल्य असलेली ही कैफियत फारच वाईट तऱ्हेने नकलली गेलेली आहे. विषय स्पष्ट करणारे एक छोटे इंग्रजी शीर्षक तिला दिलेले आहे. मूळ दस्तऐवजाची ही एक नक्कल आहे. चार युगांतील राजांशी ही संबंधित आहे. विष्णूने घेतलेल्या रामाच्या अवताराच्या आख्यायिकेपासून हिचा प्रारंभ होतो. रामायण-महाभारतातील कथा विस्ताराने सांगितल्या आहेत. हिंदुस्थानातील भिन्न भिन्न ठिकाणे आणि तिथे द्वापारयुगापर्यंत राज्य केलेल्या राजांची नावे दिलेली आहेत. चौथ्या प्रकरणापासून विजयनगरच्या राज्याच्या उदयापासूनचा हिंदुस्थानचा इतिहास वर्णिलेला आहे. नंतर तैमूरच्या काळापासून मोगलांनी केलेल्या स्वाऱ्यांपासून मोगल साम्राज्याच्या नाशापर्यंतचा मजकूर मांडलेला आहे. उदयापासून अधःपतनापर्यंतचा मराठ्यांचा इतिहासही सांगितला आहे. सातारा व तेथील मराठा राजे यांचे मूळ व इतिहास आणि पेशव्यांचा कारभार सुरू झाल्यानंतरच्या यादवी युद्धात त्यांनी बजावलेली भूमिका यांचा वृत्तांत दिलेला

आहे. वाचाव्यात अशा महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना या कैफियतीत दिसत नाहीत. अनेक पुस्तकांतून जमा केलेल्या अनेक विषयांचे हे एक संकलन झालेले आहे. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** वही कृतायुगांतेरायुग द्वापरयुग कली हे च्यार ४ युगी पैकी महाराटा फीरीदी दुमती राजे ब मुसलमान राजे कली युगी जालें.

**शेवट :** सुपरअंडेंट आफी दी मैसुर सरवी म्हणीजे जमीन मापीणार मुच्य मुलुक श्रीरंगपट्टणें वगैरे. कलमी लिहल दरजागा पुना रंगपा.

### डी. नंबर २२५

**वामुर कैफियत**
**VĀMUR KAIFIYAT**

**कागद :** फ्रेंच बनावट. ८"x ५". १७ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या चाळिसाव्या पानावर ही कैफियत सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. अहमदनगरहून औरंगाबादेस जाताना वाटेत दिसलेल्या महत्त्वाच्या ठिकाणांबद्दल नारायणराव आनंदराव याने कर्नल मॅकेंझी यास सादर केलेला हा अहवाल– वृत्तांत– आहे. वामूर या नावाच्या गावाचे मूळ व इतिहास यात स्पष्ट केलेला आहे. तेथील मंदिरे व जलाशय यांच्याशी निगडित आख्यायिका सांगितल्या आहेत. वाल्मीकी ऋषींना या ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली असे सांगितले जाते. कोल्ल (Kolla) तीर्थाबद्दल अधिक माहिती दिलेली आहे. या तीर्थाचे काठ व घाट बाजीराव पेशव्यांनी बांधले असे सांगितले जाते. अहमदनगरच्या अहमद निजाम शहाने बांधायला घेऊन अपुरा राहिलेला राजवाडा या गावात आहे. पमदूर येथील एक रहिवासी जोशी लिंगभट यांच्याकडून वर सांगितलेली माहिती आनंदराव नारायणराव याने जमा केलेली आहे. लेखक असे सांगतो की, आपण ११ जानेवारी १८०६ रोजी या ठिकाणी मुक्काम केला आणि त्याच दिवशी कर्नल मॅकेंझी यांना हा वृत्तांत दिला.

**प्रारंभ :** कैफियत अहमदनगराहुन शाहर अवरंगाबादास नारायणराव आनंदराव मुस्तैद ईलाखे हजरत मेजर मर्केजी साहेब यानी वार्टेत कैफियत मुकाम केल्या जागी लिहीलते वही.

**शेवट :** वामुर मुकामी तेथील जासी लिंग भट त्याकडुन कलुन घेऊन कैफियत लिहील असें. वामुरचा किला श्रीमंताकडुन अम्ही सदरहू लिहील आहे. त्याने बांदविला आसे वामुरचा कैफियत येथोर जाहला कलम.

### डी. नंबर २२६

**वारधानधीच कैफियत**
**VĀRADĀNADĪṈCI KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. ८"x ६". १३ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

या भागातील इतर रचना खालीलप्रमाणे आहेत :
परशराम क्षेत्र कथा
वालपूर्व श्रीनिवास क्षेत्र Mahainuya (माहात्म्य ?)

या भागाच्या पहिल्या पानावर ही कैफियत येत असून हस्ताक्षर चांगले असले तरी पानकिड्यांमुळे पृष्ठे अतिशय खराब झालेली आहेत. वरदा व सोमदा या दोन नद्यांचे मूळ आणि त्यांच्याशी निगडित दंतकथा यांबद्दलची माहिती प्रस्तुतची कैफियत देते.

या दोन नद्यांत स्नान केल्यामुळे मुक्ती प्राप्त झालेल्या ऋषींची व देवांची नावे दिलेली आहेत. या दोन्हींच्या पाण्यातील पावित्र्यामुळे घडलेले चमत्कार विस्तारपूर्वक सांगितले आहेत. (छिन्नभिन्न अवस्थेतील) देवळाचे नाव आणि तिथे पूजा वगैरेसाठी देणग्या दिलेल्या व्यक्तींची नावे यांचाही उल्लेख केलेला आहे. या दोन नद्यांच्या तीरावर वसलेल्या तीर्थस्थानांची स्थानीय भौगोलिक रचना व इतिहास सांगितलेला आहे. लेखकाचे नाव आणि यातील माहितीचे मूळ सांगितलेले नाही. काही ठिकाणी देवनागरी लिपीची योजना केलेली दिसते.

**प्रारंभ :** वारदा माहत्मय- - - - सहायाद्री पर्वत - - - - वरदांबीके माहात्में. श्री शौनिको वाच्या। सुवसुत माह प्राज्ञ ।- - । प्रजावाज वया - - -

**शेवट :** या दस्तऐवजाचा शेवटचा भाग वाचण्यापलीकडे खराब झालेला आहे. म्हणून शेवटच्या काही ओळी नोंदलेल्या नाहीत.

## डी. नंबर २२७

**विक्रमराजाचे बखर**
**VIKRAMA RĀJĀNCI BAKHER**

**कागद :** स्थानिक बनावट. २२"x १३". १४ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

यातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :
कालिक पुराणम्
हैदरची माहिती

प्रस्तुत बखर म्हणजे या भागाचा तिसरा विभाग आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. विक्रमादित्याचे जीवनचरित्र सांगणारी ही कथा आहे. ही बखर चार प्रकरणांत विभागलेली आहे. विक्रमादित्याच्या पूर्वजन्माबद्दल सांगितलेल्या काही पौराणिक आख्यायिका पहिल्या प्रकरणात येतात. तो कसा सामर्थ्यशाली होत गेला व अनेक राजांशी कसा लढला हे दुसऱ्या व तिसऱ्या प्रकरणांत सांगितले आहे. चौथ्या प्रकरणात त्यांच्याकडून झालेली अद्‌भुतरम्य कृत्ये सांगितली आहेत. अनेकविध प्रसंगांनी युक्त अशी ही जरी एक मोठी बखर असली तरी त्यात घटना-प्रसंगांच्या तारखा दिलेल्या नाहीत. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळही स्पष्ट केलेले नाही.

**प्रारंभ :** श्रीराम प्रसन्न. राजा विक्रम यांचे बखर– पुर्वि उज्येन नगर मातबर तेथील राजा विक्रम माहा पराक्रमी महा धार्मिक बहु बुध्धीवंत बतीस लक्षणी न्याये करून रंयेतीचे व साधुसंताचे संरक्षण करावे पराक्रमे करुन मोटे मोटे पुड पालगार यांचे हलाल करवे.

**शेवट :** तेव्हा इन्साफा केला. तदनंतर येकांती विक्रमराजा जाऊन कालाची प्रर्थान केली जे. मर्जे तुम्ही राज्य. वरुन काहडिल त्याप्रमाण श्थापना करावीयां प्रमाण प्रार्थना करीतांच तो काल मुर्तीमंत प्राप्तजाला, आणि विक्रमराजाची... अपूर्ण.

## डी. नंबर २२८

**विजयनगर कैफियत**
**VIJAYANAGAR KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. ३०"x १६". २७ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर ४० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

विजयनगरच्या इतिहासाशी संबंधित अशी ही अपूर्ण कैफियत या भागाच्या पृ. ७३० वर येते. हस्ताक्षर जरी चांगले असले तरी यात अशुद्ध शब्दलेखन आणि चुकीची विरामचिन्हयोजना मोठ्या प्रमाणात आहे. काही ठिकाणी आशय लक्षात येणार नाही अशा तऱ्हेने निष्काळजीपणे शब्द खरडलेले आहेत. विजयनगरच्या राजांचे एक संक्षिप्त चित्र-चरित्र ही बखर रेखाटते. विजयनगरच्या संस्थापकाचे वर्णन करणाऱ्या काही पौराणिक आख्यायिका प्रारंभी दिल्या आहेत. या घराण्यातील अनेक राजांचा जरी निर्देश केलेला असला तरी खास करून कृष्णदेवरायाच्या राज्यकारभाराबद्दलच सांगितले आहे. अनेक ठिकाणी त्याने केलेल्या युद्धांचे वृत्तांत दिलेले आहेत. त्याने केलेला राज्यविस्तार आणि मग त्या राज्याचा झालेला नाश यांचेही वर्णन आलेले आहे. या कैफियतीत उल्लेखनीय असे काही नाही. विजयनगरला राज्य केलेल्या राजांचा काळ व तारखा, यातील माहितीचे मूळ किंवा लेखकाची नावे ही दिलेली नाहीत.

**प्रारंभ :** यास विजयपुर तालुका जाहगीर देऊन दुसरास गोल मादीपुर (?) जागा मजकुर फादे (?) हैदराबाद देऊन देविले.

**शेवट :** बोल दिल्ले म्हणाले राजे यानी मजासो यास म्हणाले. जे तुम्ही बहार निसी ठाम (?) अम्हा फकीरता सीख तोंडात घालुन घेऊन तुमचे फौजात जाऊन पावल यानंतर शहर बंद बरच बंदीत म्हणुन आणुन सांगुन वैकुठा - - - मग सीपायी घेऊन आपला फौजांत मिळालण- - -

## डी. नंबर २२९

**विजापुर बादशाहा कैफियत**
**VIJĀPUR BĀDSĀHĀ KAIFIAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. ६"x ४". १७ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

डी. नंबर ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पहिल्या पानावर ही कैफियत येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. काही ठिकाणची पृष्ठे मात्र खराब झालेली आहेत. विजापूर व तेथील सुलतान यांचा इतिहास सांगणाऱ्या एका मोठ्या खंडातून अलग झालेला हा भाग असावा. फसली ८९५ पासूनची सुलतानांची वंशावळ, क्रमाने विजापूरवर राज्य केलेल्या सुलतानांची नावे आणि त्यांच्या राज्यकारभाराचा काळ यांचा इथे निर्देश केला आहे. सुलतानाने नेमलेल्या सुभेदारांची नावे, त्याच्या व्यवस्थापनाखालील सुभे आणि

विजापूरच्या सुलतानशाहीच्या अखत्यारीत असलेल्या गावांच्या व खेड्यांच्या नावांची यादी यांची नोंद इथे केलेली आहे.

काही महत्त्वाच्या शहरांना व गावांना दिलेली मुस्लिम नावे हा या कैफियतीचा एक विशेष बनलेला आहे. उदा. विजापूरला 'दारुल जफर' असे दिले गेलेले नाव. 'तेलंगणा' ला 'गोंडवन' किंवा दिल्लीला 'शहाजहानाबाद'. विजापूर येथील रहिवासी राम जोशी याचा पुत्र कृष्ण जोशी याच्या ताब्यात असलेल्या मूळ दस्तऐवजावरून कर्नल मॅकेंझी याचा प्रतिनिधी नारायणराव याने ही नकलून घेतलेली आहे. हे नक्कल करण्याचे काम १२ सप्टेंबर १८१७ रोजी संपले, असा उल्लेख आहे.

**प्रारंभ :** बिज्यापुर दखणी बादशाहाची वंशावली व शाहर मजकुरची अवरस चेवरस व बुरुज व कौरे व दरवाजें व तटे व बुरुज्याची नर्वे व बेरीज व देक्षण साडेसहा सुभेची गोषवारा व हिंदुस्थान १६ सुभेची नामनीसी वही १.

**शेवट :** येथोर बखर समाप्त. हि बखर बिज्यापुरी राहणार रामजोसीचे चिरंजीव कृष्णाजोसी याजकडुन नकल लिहीलते नारायणे राव मुतसही ईलाके मेजर कालनल मकींजी साहेब सुपरीटेंड आफ दी मैसुर सरविज बर जागा बिजापुर बा तारीख १२ माहे सबटेंबर सन १८१७ इसवि.

### डी. नंबर २३०

**विद्यानगर कैफियत**
**VIDYĀNAGAR KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ६ ". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

विद्यानगर आणि त्याचे संस्थापक हरिहर व बुक्क यांचे मूळ व इतिहास यांच्याशी संबंधित असणारी ही ऐतिहासिक कैफियत या भागाच्या पृ. ५७ वर सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व सुवाच्य आहे. हा एक मोठ्या लेखन प्रबंधाचा तुटून बाजूला झालेला भाग असावा. आणि यातील पहिली दहा पाने गहाळ झालेली दिसतात. श्रृंगेरीच्या आदी शंकराचार्यांनी वेगवेगळ्या दिशांना चार मठ स्थापन केले आणि चार शिष्यांना तेथे व्यवस्थापक म्हणून नेमले. विद्यानगरचे मूळ आणि हरिहर व बुक्क यांचे जीवनचरित्र यांचा यात निर्देश आहे. यानंतर सर्व पौराणिक आख्यायिकांसह श्री विरूपाक्षस्वामी यांना समर्पित केलेल्या मंदिराचे मूळ व इतिहास यांचे वृत्त यात आलेले आहे. रायलू राजांच्या इतिहासाचे संक्षिप्त वर्णन आणि रामराजाचा नाश यांविषयीचे वर्णन यात आलेले आहे. या कैफियतीच्या शेवटच्या भागात नगर असलेल्या विद्यानगरीचे महानगरीत झालेले रूपांतर वर्णिलेले आहे. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ यांबद्दलचा निर्देश यात नाही.

**प्रारंभ :** श्री शंकाराचार्येसी परंपरा पाद पद्माचार्य कालकाचार्ये हस्तमलाचार्ये, सुंदराच्यार्ये हे च्यार सिसाशहीं च्यार तेखेस च्यार मठबांधुत ते मठा पैकी हे चौध्याशीसास ठेऊन्न आपण विध्यासेंखर रहणार एक तिशास मोकरोर करुन घेऊन्न असतांना सेंकराच्यें कैलास वासी झाले.

**शेवट :** वेंकटपती राव यांचालेक षेद वेंकठपती राव, चिक्क वेंकटपती राव येणें प्रमाणें हे विध्यानगरचे दौलत करीणें छत्रपती होऊन्न राहिले. ते तरीहर राव व बुकरावजीचे सिल सालावार कलम १ एक.

### डी. नंबर २३१

**विरंचीपुर बेलूर माहिती**
**VIRANCIPŪR BELŪR MĀHITI**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ६ ". २२ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ४३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ११ वर ही कैफियत सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. वेलोर तालुक्यातील विरंचीपूर येथील काही जमीनदाऱ्या, जहागिरी व मंदिरे यांचे मूळ व इतिहास यांच्याशी प्रस्तुत कैफियत निगडित आहे. चंद्रगिरी, मूलकाडु, वीरवलम्, भूतमंगलम् आणि तिरुवरंगम् अशा काही जहागिरींतून जमा होणारा महसूल सांगितलेला आहे. विरंचीपुरमच्या सभोवताली असणाऱ्या खेड्यांची यादी दिलेली आहे. विरंचीपुरमच्या मुळाशी निगडित अशा पौराणिक आख्यायिका व दंतकथा थोडक्यात दिलेल्या आहेत. ही जागा एक पवित्र तीर्थस्थान गणले जात असून, श्री ब्रह्मदेव व विष्णू यांच्या मंदिरांमुळे प्रस्तुत जागेला मोठेच महत्त्व प्राप्त झालेले आहे.

दुसऱ्या प्रकरणात श्री मार्गसहाय व शयैस्वरस्वामी यांच्या मंदिरांचे मूळ व इतिहास वर्णिलेला आहे. वेलोरच्या राजाने हे सर्व खेडे जहागीर म्हणून एका गौडा मुथु रंगाप्पा नाईक यास बक्षीस दिलेले होते. विरंचीपुरमच्या मंदिराबद्दलच्या काही पौराणिक आख्यायिका विस्ताराने सांगितलेल्या आहेत. विरंचीपुरम् येथील

रहिवासी वैद्यनाथ गुरुक्कल व अय्या जोशी यांच्या ताब्यात असलेल्या स्थानिक दस्तऐवजावरून ही कैफियत तयार केली असल्याचे अखेरीस सांगितले आहे. तसेच ती २५ मार्च १८०० रोजी पुरी झाल्याची नोंद केलेली आहे. लेखकाचे नाव मात्र उल्लेखिलेले नाही.

**प्रारंभ :** वेलुरास चालायाच जाहगीर व त्याच बेरीज माहमत जाहगीर प्रमाणें वेलूर सरकार मजकूर.

**शेवट :** येंदरगोंडा मुतुरंगप नाईक यास सरकार वेलूर येथोर विरंजीपुरचे कैफियत अखरे येणे प्रमाणे येथील रामस्वामी अया ताकींद करून वैद्यनाथ गुरकल स्थानीक व पुरोहीत अया ज्योशी आखेर तेथी १५ विरंचीपुराहुन साहा घंटेस निघुन गुडीयातमं मजींल १२ घेंटेस येऊन पोहाचलो.

## डी. नंबर २३२

**विरलगुडी कैफियत**
**VIRALGUDI KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. ८" x ६". १५ ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

यात समाविष्ट झालेल्या रचना पुढीलप्रमाणे आहेत :
विक्रमचरित्र
पांडवगुडी विरलगुडी कैफियत
पांडवगुडी विरलगुडी कैफियत
पांडवगुडी विरलगुडी देवालय कैफियत

या भागाच्या १०१ व्या पानावर ही अपूर्ण कैफियत सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पानकिड्यांमुळे पृष्ठे खराब झालेली असून, ती व्यवस्थित रचलेली किंवा योग्य तऱ्हेने बांधलेली नाहीत. मॅकेंझीच्या हाताखाली काम करणारा नारायणराव याने तिरुपतीचा रहिवासी केशव राव याच्याकडे असलेल्या मूळ दस्तऐवजावरून हा सर्वच्या सर्व भाग नकलून घेतला असल्याचे प्रारंभी सांगितले आहे. पहिल्या पृष्ठाच्या डाव्या बाजूच्या माथ्यावर काळ्या शाईतील एक चौकोनी सील दिसते. त्यात देवनागरी लिपीतील 'रामीदूत सहाय बालकृष्ण नारायण राव' असे शब्द आहेत. ईस्ट इंडिया कंपनीच्या आज्ञेवरून फसली १२२६ मध्ये (चित्तूर तालुक्यातील एक खेडे असलेल्या) विरलगुडीची ही कैफियत तयार केली गेल्याचे प्रारंभी सांगितले आहे. फसली १२२५ मध्ये हा सर्वच तालुका ईस्ट इंडिया कंपनीने ताब्यात घेतलेला होता. विरलगुडीचा थोडक्यात इतिहास, त्याच्या क्षेत्रफळाचा हिशेब आणि त्यातील काही मंदिरे व महत्त्वाच्या जागा यांचे वर्णन केलेले आहे. काही मंदिरांच्या मालकीच्या शेतजमिनींचे क्षेत्रफळही दिलेले आहे. दिनांक ५ ऑगस्ट, फसली १२२६ मध्ये चित्तूरचा शिरस्तेदार अप्पू राव याने ही कैफियत मूळ दस्तऐवजाशी पडताळून घेतली असल्याचे शेवटी म्हटले आहे.

**प्रारंभ :** याददस्त विरलगुडी कैफियत. तालुके बागर वगैरे जत्फी पाले मजकुर सरकार कुंपणी सुरसन १२२६ फसलीं कुलदेह ३२ सी कुलदेहे ७४.

**शेवट :** २०२ नंबर तो कडप गुंडीं गावास उतर ५० गजाच फासल. नवमाचे षींमलांत वेलेंगुडीचे बाजुस जमीनेतं बाजुन आहे. ते थोडी दीसणेच गुंड ४.

## डी. नंबर २३३

**विरलगुडी कैफियत**
**VIRALGUDI KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. ८"x ६". २० ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर २३२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १४ वर ही कैफियत येते. विरलगुडी व पांडवगुडी या खेड्यांतील जमिनीच्या स्थानिक हिशेबाशी ही कैफियत संबंधित आहे. काही मंदिरांच्या नावांचे उल्लेख दिसतात, पण ते दुर्वाच्य स्थितीत आहेत. या दोन खेड्यांतील मंदिरांच्या मालकीच्या बागाईत व जिराईत शेतजमिनीचे क्षेत्र दिलेले आहे. या मालकीच्या जमिनीतून मिळणारे धान्य व रोख रक्कम नंतर दिलेली आहे. देणग्यांच्या सीमा आणि मालकांकडून जमा केला जाणारा किस्त करही उल्लेखिलेला आहे. दात्यांची नावे किंवा मंदिरांत करायचे विधी यांसारखे उल्लेख या कैफियतीच्या दहाव्या प्रकरणात आढळतात. तारीख, नक्कलकाराचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ यांपैकी कशाचाच निर्देश यात नाही.

**प्रारंभ :** याददस्त पांडवगुडी व विरलगुडी लिहिणेच देवालच कैफियत. तो कडपना पडी. . . पांडवगुडी देवाल वगैरे. देवल असणेच जागे.

| | |
|---|---|
| **शेवट :** एकुन गोषबारा पांडवगुडी | ९४ |
| विरलगुडी वविरकल्ल | ३९ |
| विरलगुडी | १३३ |

## डी. नंबर २३४

**विरलगुडी पांडवगुडी देवालय कैफियत**

**VIRALAGUDI PANDAVAGUDI DEVĀLAYA KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. ८"x ६". २२ ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर २३२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

विरलगुडी व पांडवगुडी येथील काही मंदिरांचे मूळ व इतिहास सांगणारी ही अपूर्ण कैफियत या भागाच्या पृ. १७ वर येते. सर्व पृष्ठे सुट्या अवस्थेत आहेत. वर उल्लेखिलेली खेडी चित्तूर जिल्ह्यात आहेत. काही खेड्यांची नावे आणि काही मंदिरांनी देणगी म्हणून दिलेल्या जिराईत व बागाईत जमिनींच्या क्षेत्रासह त्या खेड्यांच्या सीमा यात उल्लेखिलेल्या आहेत. मंदिराचे मूळ व इतिहास, तसेच त्यात प्रतिष्ठापना केलेल्या देव-देवतेचे नाव यांचे निर्देश केलेले आहेत. ईस्ट इंडिया कंपनीकडे रवाना करण्यासाठी चित्तूरच्या कलेक्टरच्या आज्ञेवरून फसली १२२५ मध्ये ही कैफियत तयार करण्यात आलेली आहे. या मंदिरांचे जुने अधिकारी आणि या भागातील जुने रहिवासी यांच्याकडून प्रस्तुत मंदिरांचे मूळ व इतिहास यांविषयी मिळालेल्या माहितीवरून ही कैफियत तयार केल्याचा उल्लेख शेवटच्या भागात आहे. कैफियतीच्या शेवटच्या पृष्ठावर उर्दू लिपीतील एक चौकोनी सील आहे.

**प्रारंभ :** याद पांडवगुडी विरलगुडी नसींदेचे देवालय असणेचे कैफियत तालुका वेंगटगीर कोट तुकडीं चीत्तुर सरकार कुंपणी सन १२२५ फसली.

**शेवट :** सदरी गुडीचे कैफियत सदरी गावचे लोकानही कलत नाही.

## डी. नंबर २३५

**विरलगुडी पांडवगुडी देवालय कैफियत**

**VIRALAGUDI PANDAVGUDI DEVĀLAYA KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. ८"x ६". २२ ओळी. मोडी. खराब. अपूर्ण.

डी. नंबर २३२ (?) मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २८ वर ही अपूर्ण कैफियत येते. पृष्ठे नीट रचलेली नसून बांधलेलीही नाहीत. पहिल्या पृष्ठाच्या तळाशी उर्दू लिपीतील एक चौकोनी सील आढळते. चित्तूर जिल्ह्यातील विरलगुडी या खेड्यासंबंधीचा हा अहवाल असावा असे दिसते. तो फसली १२२५ मध्ये चित्तूरच्या जिल्हाधिकाऱ्याने तयार करून ईस्ट इंडिया कंपनीस सादर केलेला आहे. विरलगुडीच्या परिसरातील लहान लहान खेडी, तेथील मंदिरांची नावे व संख्या आणि त्यांच्या मालकीच्या शेतजमिनीचे क्षेत्र यांची त्यात नोंद केलेली आहे. प्रत्येक खेडे व मंदिर यांचे मूळ व इतिहास सांगणारे छोटे टिपण आणि देणगी देणाऱ्या व्यक्तींची नावे अशी माहितीही यात पुरविलेली आहे. या खेड्यातील जुने रहिवासी आणि काही मंदिरांचे अधिकारी यांच्याकडून वर दिलेली माहिती जमा करण्यात आलेली आहे. यातील काही मंदिरे अतिशय पुरातन असून त्यांना पांडवांनी भेटी दिल्या होत्या असा उल्लेख यात आहे.

**प्रारंभ :** सदरी गुडीचे कैफियत. सदरी गावचे लोकांनी कलत नाही म्हणुन सांगताहेत.

**शेवट :** सदरहु गुडी पांडवान वनवास केले. तेव्हा तेथ गुडी बाँधुन घेवुन कितेक दिवस वास करुन होत म्हणुनही देवल बांदले म्हणातहोत.

## डी. नंबर २३६

**विश्वासराव व भाऊ साहेब कैफियत**

**VIŚVĀSA RAO VA BHAUSAHIB KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ६". २२ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ५८४ वर ही कैफियत येते. पृष्ठे तपकिरी रंगाची व जीर्ण झालेली आहेत. हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे. पानिपतची लढाई हा हिचा मुख्य विषय आहे. होळकर, शिंदे आणि घोरपडे हे सेनापती, त्यांचे लष्करी सामर्थ्य आणि त्यांच्या आधिपत्याखाली असलेले भौगोलिक अधिकार-क्षेत्र यांविषयीची माहिती पहिल्या चार पृष्ठांत येते. नंतरच्या पाच पानांचा विषय म्हणून दिल्लीच्या मोगलांचा व दक्षिणेतील सुलतानांचा छोटासा इतिहास येतो. उरलेल्या कैफियतीत बाळाजी बाजीरावाचा कारभार स्पष्ट केलेला आहे. पुण्याला नाना फडणविसाने बजाविलेली

भूमिका, नारायणरावाच्या निधनानंतर जन्माला आलेल्या माधवरावाचे पदग्रहण आणि शेवटी मराठ्यांच्या गटात झालेली फाटाफूट यांचे अतिशय रेखीव वर्णन केलेले आहे. ईस्ट इंडिया कंपनीची भूमिका, घडलेल्या ठळक घटना व लढाया आणि शेवटचा वसईचा तह यांच्या माहितीने कैफियतीचा शेवटचा भाग सिद्ध होतो.

लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ यांचा निर्देश केलेला नाही. जरी अनेक वेढे व लढाया स्पष्ट केलेल्या असल्या तरी कशाचीच तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** विस्वास राव भाउच कैफियत विस्वसा रावजीनी आपल मुलकास वाड्यास रखावाली टेउन चकोट माणुसास नेमुन बंदोबस्त करुन तमाम जुन उमराव लोकास बोलाउन कुल्ल फौजचे हाजरी वसुल घेऊन हुकुमाप्रमाणे मोहीमीस निघुन बंका पुरावरी जाऊन कुल तमाम सरंजामानीसी पोहचले.

**शेवट :** राजे श्री त्रियेंबक राव व काका व सखाराम हरी वगैरे फौज जमा करुन कर्नाट प्रांती गेलें त्याची तपशील सदर लिहील प्रमाणें असें हिंदवीच चुटते याने- - - कुलयात लिहील तितक लिहिणे जाहले.

## डी. नंबर २३७

### विश्वासराव सदाशीव राव भाऊ व अबदाली यांची लढाई
### VISVĀSA RAO SADĀŚIVA RAO BHAU VA ABDĀLLI YĀNCI LADAYI.

**कागद :** फ्रेंच बनावट. ८"x . . . (?)". १२ ओळी. मोडी. जुने. (खराब). पूर्ण.

डी. नंबर १२६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३४३ वर हा ऐतिहासिक प्रसंग येतो. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. मोगल व मराठे यांच्यात झालेले पहिले पानिपतचे युद्ध यात वर्णिलेले आहे. विश्वासराव, सदाशिवराव भाऊ आणि गायकवाड, आंग्रे, गोखले व पवार यांच्यासारखे त्यांचे विश्वासार्ह सहकारी यांनी बजाविलेली कामगिरी प्रस्तुत कैफियतीत मोठ्या उठावदारपणे चित्रित केलेली आहे. अंताजी माणकेश्वर, जनकोजी शिंदे व मुधोजी होळकर यांच्यासारख्या थोर मराठा योद्ध्यांचा नामोल्लेख यात गौरवाने केलेला आहे. मराठ्यांनी सोनपतच्या रोखाने केलेले कूच, मुक्कामांच्या जागा व तारखा आणि मोगलांशी त्यांच्या झडलेल्या चकमकी यांविषयीची माहिती ही कैफियत नंतर देते. याबरोबरच अहमदशहा अबदाली याच्या वीरांची माहितीही दिलेली आहे. वाटाघाटी, वेढे, लढाया, चढाई व माघार अशा घटनांच्या तारखा अरबी कालगणनेप्रमाणे दिलेल्या आहेत. शेवटच्या चार पानांत मराठ्यांचा पराभव वर्णिलेला आहे. मराठ्यांचा पराभव, सदाशिवराव व विश्वासराव यांचा मृत्यू आणि या युद्धाचे निकाल समजल्याने नानासाहेब कसे संतप्त झाले वा अडचणीत आले याविषयीचा वृत्तांत कैफियतीच्या शेवटच्या भागात आलेला आहे. औरंगाबादच्या गंगाराम तांबटकर याच्याकडे असलेल्या मूळ दस्तऐवजावरून कर्नल मॅकेंझी याच्या मार्गदर्शनाखाली ही कैफियत २९ जानेवारी १८०६ रोजी औरंगाबाद येथे नकलली गेली असे नमूद कलेले आहे.

**प्रारंभ :** श्री गणेशाय नमाः

श्री गणेशाय नमाः श्री सरस्वतीय नमाः श्री गुरुभ्यो नमाः श्री माताय नमाः श्री दत्तात्रै पांडुरंगाये नमाः राजमान्ये सभामान्ये देवमान्ये रजोश्री दरदोंघ जगाची लढाई हकीगत सन ११६० रवीलवल.

**शेवट :** भाई सदाशिवराव व विश्वासराव वगैरे गणीमास मोगलासी लढाई जाहाली बंदगी रोशन होये. हे अर्जदस्त हे बखर यांची आर्से. त्याचे नकल लिहीलते मुतही इलाके मेजर कलनल मकंजीसाहेब इंजनेर मुलक मैसुर बातारीख २७ माहे जेनवरी सन १८०६ इसवी दर जागा अवरंगाबाद.

## डी. नंबर २३८

### विष्णु शार्मा कैफियत
### VISNO ŚARMĀ KAIFIYAT

**कागद :** इंग्लिश बनावट. १०"x ६". १५ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या ४५८ व्या पानावर ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी पृष्ठे योग्य क्रमाने रचलेली नाहीत. तसेच ती योग्य तऱ्हेने एकत्र बांधलेलीही नाहीत. ही कैफियत दोन विभागांत विभागलेली आहे. पहिला भाग ४५८ आणि दुसरा भाग ४१८ पानांवर सुरू होतो. जरी ही कैफियत एक व्यक्तिनाम शीर्षक म्हणून मिरवीत असली तरी तीत कोणाही व्यक्तीबद्दल काहीही सांगितलेले नाही. यात अतिशय रंजक पद्धतीने सांगितलेल्या काही नीतिकथा आहेत. या एकूण पाच कथा असून यातील सर्व व्यक्तिरेखा म्हणजे मानवीकरण केलेले प्राणी आहेत.

असे वाटते की या सर्व नीतिकथांचा विष्णु शर्मा हा लेखक असावा. सर्वच कथा संवादशैलीत लिहिलेल्या आहेत. हा दुसरा भाग मध्येच संपत असल्यामुळे लेखकाचे नाव, माहितीचे मूळ किंवा लेखकाने सांगून संपविलेल्या या कथांच्या तारखा यांबद्दल काहीही सांगणे शक्य नाही. माकडे, सुसरी, गाढवे आणि सिंह असे पुन्हा पुन्हा उल्लेखिले जाणारे प्राणी आहेत.

**प्रारंभ :** श्री गणेशाये नमः श्री सरस्वत्ये नमः श्री गुरुभ्यो नमः श्री पांडुरंगाये नमः निर्विघ्नमस्तु (आताल बाध) काहाणीचे वेदांत तंत्र अरंभीतो, विष्णु शर्मा ब्राह्मणा प्रती सांगतो.

**शेवट :** त्याप्रती तीन भशुने पुष्ट जाहली. तीच बल कमी जाहल. तेव्हा ते कुंभारनित्ये तीचें दुध काहडुन आपले कुटुंब पोषण करीता जाहाला आणि प्रितोस्तवे त्या गुजनीं पुत्राचे गल्यांत मोठी घांठीही बांदण जाहले. आणि बीम आणिखी खाये प्रयोजन ईचा पालण करून माझे कुटुंबचे रक्षण होत...

## डी. नंबर २३९

**व्येंकटरमणस्वामीस टेकरराजे दिल्लते बाबतीचे कैफियत**
**VENKATRAMANSVĀMISĀ TEKAR RAJA DILLATE BĀBATHICE KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. १४"x५". २८ ओळी. मोडी. जुने. खराब.

डी. नंबर ८० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

तिरुपती येथील श्री श्रीनिवासस्वामी मंदिरातील अधिकारी वर्ग, त्या मंदिरास मिळालेल्या देणग्या आणि तिथे अनेक राजांनी इमारती वगैरेंचे केलेले बांधकाम यांच्याशी ही मोठी कैफियत संबंधित आहे. तिरुपतीचे मंदिर, जवळपासचे डोंगर व जंगले आणि मंदिराला जाण्याचे मार्ग यांचे मोठे रेखीव वर्णन यात केलेले आहे. नाईक राजे व तोंडरमंडलचे चक्रवर्ती यांनी बांधलेल्या मंडपांची व उंच स्तंभांची नावेही दिलेली आहेत. तोंडमन व चोल यांची वंशावळही दिलेली आहे. तिरुपती मंदिरास दिलेल्या धर्मादाय देणग्या आणि तिथे साजरे केले जाणारे उत्सव यांच्याशी वर उल्लेखिलेल्या दोन घराण्यांतील राजेच प्रामुख्याने निगडित असल्याचे यात सांगितले आहे. तेलगू व तमिळ भाषेतील शिलालेखांतील उतारेही दिलेले आहेत. मंदिरातील सोन्याच्या दालनांच्या बांधकामासाठी देणग्या दिलेल्या काही श्रद्धाळू व्यक्ती व मंत्रीगण यांची नावे, तसेच मंदरातील काही ब्राह्मण अधिकारी व सेवक यांच्या कामाचे स्वरूप, तसेच काही नावे हे सर्व मोठ्या विस्ताराने सांगितले आहे. डोंगरावरून मंदिराकडे जाणारा रस्ता आणि त्यावरील विश्रांतिस्थळाचे बांधकाम करणाऱ्यांची नावे सांगितलेली आहेत. डोंगरांची भौगोलिक रचना आणि त्याचे आसमंतही वर्णिलेले आहे. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही. राजांची नावे लिहिलेल्या जागांवर भोके पडल्यामुळे चिठ्या चिकटविलेल्या आहेत. सबब ती सांगितलेली नाहीत. देणगी म्हणून दिलेल्या खेड्यांची नावे आणि तेथील बागाईत व जिराईत शेतजमिनीचे क्षेत्र होही यात दिलेली आहेत.

**प्रारंभ :** श्री गणेशाय नमः श्री वेंकटेश चरीत्र. श्री वेंकटेश चरीत्र भवीशोत्तर पुराण जे ऐसकी.

**शेवट :** आलवार तीघांस श्री कृष्णस्वामी अळेंकार जगे उद्हार करणेस श्री वेंकटनाथ स्वामीस श्री गोविंदराजस्वामी - - भीनादी करणस्त जाहली यादी श्री वेंकटेस आगम प्रमाण मणलागेला.

## डी. नंबर २४०

**व्येंकटरमण दीक्षित पुत्रांची कैफियत**
**VENKATARAMANA DIKSITA PUTTRANCI KAIFIYAT**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x४". २१ ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर १८८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २ वर येणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे; पण पृष्ठे मात्र खराब झालेली आहेत. वेंकटराम दीक्षित व त्याचा पुत्र श्रीनिवास दीक्षित यांचा संक्षिप्त इतिहास यात दिलेला आहे. जरी या दोघांचे मूळ व उल्लेखनीय कृती ही स्पष्ट केलेली नसली तरी मील कूट (Meela Koonta) येथील अग्रहाराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या या दोन महत्वाच्या व्यक्ती असल्याचे प्रस्तुत कैफियतीत सांगितलेले आहे. हे ठिकाण म्हणजे चित्तूर जिल्ह्यातील एक छोटेसे खेडे असून ते तिरुपतीच्या श्री गोविंद राजस्वामी मंदिरास नाईक राजांनी दान म्हणून दिलेले होते. याशिवाय जवळपासच्या सहा अग्रहारांतील अनेक ब्राह्मणांना नाईक राजांनी दिलेल्या बक्षिसांचा तपशील यात दिलेला आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या सूचनेवरून या ठिकाणाच्या तहसीलदाराने तपास करून इनामी स्वरूपाच्या अस्तित्वात असलेल्या मूळ देणग्यांचा अहवाल तयार केलेला

आहे. तिरुचन्नूर येथील पद्मावती मंदिर आणि तिरुपतीचे वेंकटेश्वर मंदिर यांना दिलेल्या दानपत्रांतील काही मजकूर स्पष्ट केलेला आहे. देणग्यांची नावे आणि त्यांचे व्यवस्थापन करणाऱ्या व्यक्तींची नावेही दिलेली आहेत. वर उल्लेखिलेली दाने माघ १२, प्रथमी नाम संवत्सरे, शालिवाहन शके १६५५ रोजी दिलेली आहेत. ही कैफियत लिहिणाऱ्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ** : वेंकटराम दिक्षीत याच लेंक श्रीनिवास दिक्षीत वगैरेस चालत वेहेवार... गाव चालत आहे.

**शेवट** : चाता बाकी सरकार पतकट दाखल गाव–

१ कोट मंगल

२ मौ कोनूर गाव

३ मो तनपलय गाव

## डी. नंबर २४१

**वेरूळ घृष्णेश्वर माहिती**
**VĒRŪLA GHRISNĒSWARA MĀHITI**

**कागद** : फ्रेंच बनावट. ८"x ६". २० ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ६६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पहिल्या पृष्ठावर ही कैफियत येत असून पृष्ठे अतिशय खराब अवस्थेत आहेत. खरे तर तातडीने त्यांच्या दुरुस्तीची आवश्यकता आहे. विजापूर आणि दौलताबाद या दोन शहरांचे मूळ व इतिहास यांच्याशीच ही कैफियत निगडित आहे. ती चार भागांत विभागलेली असून पहिले दोन विभाग विजापूरशी, तर उरलेले दोन दौलताबादेशी निगडित आहेत. विजापूर व दौलताबाद यांचे मूळ व इतिहास यांत स्पष्ट केलेला आहे. या दोन्ही ठिकाणांच्या सत्ताधाऱ्यांनी ज्याची पूर्जाअर्चा केली त्या घृष्णेश्वर मंदिराच्या वर्णनालाच यात महत्त्व दिलेले आहे. प्रस्तुत मंदिराच्या भिंतीवरील शिलालेखातील मजकूर यात उद्धृत केलेला आहे. भोसले, होळकर व काही प्रमुख मराठा सरदार यांनी या मंदिरातील काही इमारतींचे बांधकाम केल्याचे व त्यांना देणग्या दिल्याचेही यावरून दिसून येते. शिवाजीने विजापूरचा केलेला पाडावही या कैफियतीत सांगितलेला आहे.

देवगिरी या नावाने आधी ओळखल्या जाणाऱ्या दौलताबादचे मूळ व इतिहास यांनी या कैफियतीचा दुसरा भाग व्यापलेला आहे. देवगिरी किल्ल्याचा निर्माता म्हणून कुणा खंडेराव होळकर याची नोंद केलेली आहे. शिवाजीने जे मराठा राज्य निर्माण केले त्यात त्याला मदत करणाऱ्या काहींचा संदर्भही यात स्पष्ट केलेला आहे. शके १६७२ मध्ये होळकरांपैकी कुणा एकाने घृष्णेश्दर मंदिराची पुनर्बांधणी केल्याचाही यात निर्देश आहे. विजापूर व दौलताबाद यांची भौगोलिक स्थिती कैफियतीच्या शेवटच्या भागात स्पष्ट केलेली आहे.

घृष्णेश्वर मंदिरातील एक रहिवासी केशव भट याने जपून सांभाळलेल्या दस्तऐवजावरून कर्नल मॅकेंझी याच्या आज्ञेनुसार ही कैफियत २६ फेब्रुवारी १८०६ मध्ये नकललेली आहे.

**प्रारंभ** : दरवाणी बादशा दहर विजापुर याची वंशावली व शाहर मजकुची अवरस व चेवरस व बुरुज व कंगोर व दरवाजे व तटे व बुर्ज्या व बाजार किल्ले आदरान व बाहेरुन व बेरीज देक्षण साडेसा छा. सुभेची गोषवारा व हिंदुस्थान १६ सोला सुभेची नावनीसी व नामी गुमट अवली याचे शाहर बिज्यापुरी.

**शेवट** : येणे प्रमाण लिहीलते केशवभट पुराण आणि कितेक कैफियत. पर्वतांतील लिहीलते रामजी गुरोंल. . . . (?) डा गुरो म्हणजे या मुलुकांत ज्यातीचे शुद्र त्यांनी इश्वराच पुजा करीताहेत. त्यास गुरो म्हणताहेत. आणि त्यानी जानवही घालीतात बा तारीख २५ माहे फेरवरी सन १८०६ दर जागा अवरंगाबाद नारायण राव मुतसही इलाखे मेजर कलनल मकिंजी सो. सुपरअंडटेंट आफ दी मैसुर सखी.

## डी. नंबर २४२

**वेलुर किला कैफियत**
**VELŪR KILLĀ KAIFIYAT**

**कागद** : स्थानिक बनावट. ६"x ६". १५ ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर १६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २० वर ही कैफियत सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सर्वच पृष्ठांची डावी बाजू अतिशय खराब झालेली असून ती सर्व सुट्या अवस्थेत आहेत.

वेलोर येथे मराठ्यांनी बांधलेल्या काही किल्ल्यांचे मूळ व इतिहास यांच्याशी प्रस्तुत कैफियत निगडित आहे. यात चुकीने वेरूळ असा निर्देश केलेला असून खरा तो उत्तर अर्काट जिल्ह्यातील वेलोर किल्ल्याचाच निर्देश आहे. प्रारंभी हा प्रदेश जंगलमय होता. कुण्या एका बोमय्या रेड्डीने आपल्या भावाच्या मदतीने जंगल साफ केले आणि सेजराई येथे डोंगरावर एक छोटासा किल्ला बांधला. बोमय्या रेड्डीला तेथे मोठ्या प्रमाणात

गुप्तधन कसे प्राप्त झाले याविषयीची एक पौराणिक आख्यायिका इथे विस्ताराने सांगितलेली आहे. आता अस्तित्वात असलेले मंदिर व खंदक या बोमय्या रेड्डीने केलेल्या कामातील काही अवशिष्ट गोष्टी होत. शिवाजी महाराजांचा भाऊ व्यंकोजी याच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी दक्षिणेत केलेली चढाई आणि तेथील काही राजप्रमुख व मराठे यांच्यातील लढाई यांची माहितीही दिलेली आहे. वेलोर व अर्णी येथील किल्ल्यांना वेढा देणाऱ्या काही महत्त्वाच्या व्यक्तींची नावे आणि शेवटी मराठेच कसे वेलोरचे एकमेव अधिपती झाले याचे मोठे रेखीव वर्णन केलेले आहे. मराठ्यांनी बेंगलोरहून कूच केल्यानंतर जिंकलेली गावे आणि त्यांनी केलेली व्यवस्था अशा काही विषयांबद्दलचे लेखन यात येते. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ देण्यात आलेले नाही. कर्नल मॅकेंझी याच्या आज्ञेवरून नारायणराव याने वेलोर येथे या कैफियतीची नक्कल तयार केली असा उल्लेख यात सापडतो.

**प्रारंभ :** पुर्वि वेलुर किल्ले व शहर वगैरे दरोबस्त राण होते. ऐसे असतां तिमरोज बैमया या दोघे भाऊ सार्कीन कलहस्ती यानी तेथुन दोनींसीं सींखारीं कुत्री घेऊन किल्ला वेलुरीं उतरुन किल्लाचे सरहद रागास सिखारींस आले.

**शेवट :** मजकुरचा मुनसी व मन्या - - - करुन घेतलें. खान मजकुरचे इलाखेदार बाकी होता त्यास अवल- - - जाहीर मोकरुर करुन ठेविलें. तधी पासुन अद्यापीं इथपंरही ईगरेजच बावटा ज्यारी आहे.

## डी. नंबर २४३

### वेलुर किला व नगर कैफियत
### VELŪR KILLĀ VA NAGAR KAIFIYAT

**कागद :** स्थानिक बनावट. ६"x ६". २० ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर ६६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत दोन भागांत असून पृ. १६ वर पहिला आणि पृ. २६ वर दुसरा भाग सुरू होतो. याआधीच्या कैफियतीत मांडलेला विषय याही कैफियतीत असला तरी अर्काटच्या नबाबाची चढाई आणि वेलोर आपल्या ताब्यात येईपर्यंत नबाबाला मदत करण्याबाबत इंग्रजांनी घेतलेली भूमिका यांविषयीचा काही अधिक ऐतिहासिक मजकूर तीत आलेला आहे. कैफियतीच्या दुसऱ्या भागात नगरी किल्ल्याविषयीची माहिती आलेली आहे. वेलोर व नगरी येथील हिंदू व मुसलमान प्रार्थनामंदिरांची वर्णने आणि काही जमीनदारांची नावे कैफियतीच्या शेवटच्या भागात दिलेली आहेत. या दोन्ही स्थळांची भौगोलिक रचनाही स्पष्ट केलेली आहे. लेखकाचे नाव, यातील माहितीचे मूळ किंवा यात वर्णिलेल्या प्रसंगांच्या तारखा ही दिलेली नाहीत. कर्नल मॅकेंझी याच्या आज्ञेवरून नगरीजवळ राहणाऱ्या एका जमीनदाराजवळ असलेल्या मूळ कागदपत्रांच्या आधारे नारायणरावाने प्रस्तुत कैफियत तयार केली असे अखेरीस सांगितले आहे.

**प्रारंभ :** कैफियत पुर्वि वेर किला व शहर वगैरे दरोबस्त राण होत.

**शेवट :** सदर कैफियत छ २७ माहे क्षेब्री सन १७०९ इसवी नारायण राव लिहील असे.

## डी. नंबर २४४

### व्यवहारिक माहिती संवछर
### VYAVAHARIKA MAHITI SAMVATSARA

**कागद :** इंग्लिश बनावट. ८"x ६". १८ ओळी. मोडी. जुने. दुरुस्त केलेले. पूर्ण.

डी. नंबर ८१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ९८ वर ही कैफियत सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. तेलगू लिपीत शीर्षक लिहिलेले आहे. यातील इतर दस्तऐवजांच्या हस्ताक्षरापेक्षा याचे हस्ताक्षर वेगळे आहे. पृष्ठावर सर्व बाजूंनी भूमिती पद्धतीने सुबक समास रेखलेले आहेत. वर्षे, महिने, ऋतू, सप्ताहातील दिवस यांची हिंदू नावे आणि त्यांचे समान उर्दू अनुवाद दिलेले आहेत. मूळ व पुढे रूढ झालेल्या पद्धती स्पष्ट करणाऱ्या छोट्या टिपांसह हिंदू उत्सवांची यात नोंद केलेली आढळते. काही देवदेवतांची नावे आणि त्यांनी वाहन म्हणून योजिलेल्या जनावरांची नावे उल्लेखिलेली आहेत. महत्त्वाचे पर्वत व नद्या यांची नावे, पुराणोक्त विधी आणि प्रसिद्ध भक्तांची नावे यांचाही इथे उल्लेख केलेला आहे. यानंतर महत्त्वाचे कवी, लेखक व शहरे यांचा नामनिर्देश यात केलेला आढळतो. शेवटच्या काही पृष्ठांवर गणिती पाढे दिलेले आहेत. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** हे साटीही वरुषाची नावें. प्रभव, चित्रभानु, हेवलंबी, परीधावी.

**शेवट :** अडीचकी. ६२ ॥, १२५, १८७ ॥, २५०.

## डी. नंबर २४५

**शंकराचार्य चरित्र**
**ŚANKARĀCĀRYA CHARITRA**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x६". १५ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. २१० वर प्रस्तुत लेखन येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पृष्ठे व्यवस्थित रचलेली नसून एकत्र बांधलेलीही नाहीत. याचे दोन भाग असून पहिला २१० पानावर, तर दुसरा २४१ पानावर सुरू होतो. पहिल्या भागातील पहिली सात पाने गहाळ झाली आहेत, तर दुसऱ्या भागातीलही काही पाने गहाळ झालेली आहेत.

शंकराचार्यांच्या जीवनकाळात घडलेल्या अनेक दंतकथा-प्रसंगांसह शंकराचार्यांचे चरित्र विस्ताराने इथे स्पष्ट केलेले आहे. अद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रसार आणि बौद्ध धर्मीयांच्या आक्रमणापासून वैदिक धर्माचा बचाव असा उद्देश असलेले शंकराचार्यांच्या जन्मामागचे कारण स्पष्ट करणाऱ्या आख्यायिकेने या कैफियतीचा प्रारंभ झालेला आहे. शंकराचार्यांचे बालपण, गुरुकुलातील त्यांचे अध्ययन येथपासून जगाचा त्याग व संन्यासाश्रमाचा स्वीकार येथपर्यंतचा मजकूर हा पहिल्या भागाचा विषय आहे.

त्यांनी केलेल्या तीर्थयात्रा आणि त्यांच्या शिष्यांची नावे दुसऱ्या भागात येतात. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ** : . . मित्र व पिताहीं उभयेताही ब्रह्मणा कारणे अनेक धन भूरी वांटीत जाहले. तदनंतर व्याही ज्यामाता सहित परीवारास भक्ष भोज्येस युत्क गंध पुष्पादी उपचारासहित च्यारी दिवस हि भोजन करऊन चौथ दिवसीं लेंकीस निरऊन देऊन कंखणा सहित भोजन करऊन वस्त्राभरण इत्यादीक आपण देऊन गावास निरोप दिदली.

**शेवट** : . . . भुषण करुन सुमूहुर्त धारा पुर्वक आर्पीता जाहाला की स्वरुप नामक मंडनही उभये भारतीच पाणीग्रहण करुन मांगलये सूत्र बांधुन आनंद युत्क लाजा होमद्दी करीत जाहला. . . .

## डी. नंबर २४६

**शंकराचार्य चरित्र**
**ŚANKARĀCĀRYA CARITRA**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x६". १५ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. या भागाच्या पृ. १४४ वर ही अपूर्ण कैफियत येत असून तिचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. प्रारंभीची व अखेरची काही पाने गहाळ झालेली आहेत. पृष्ठे नीट रचलेली व बांधलेली नसल्यामुळे ही कैफियत या भागाच्या दोन ठिकाणी येताना दिसते. ही कैफियतही श्री शंकराचार्यांच्या जीवनाशी व कार्याशी निगडित आहे. याआधीच्या कैफियतीत सांगितलेल्या आख्यायिका इथेही सांगितलेल्या आहेत. शंकराचार्यांनी बौद्ध भिक्षूंशी वादविवाद कसे केले आणि वैदिक धर्माचे मोठेपण सिद्ध करून त्यांचा पराभव कसा केला याचा वृत्तान्त यात आलेला आहे. शंकराचार्यांनी भेटी दिलेल्या तीर्थस्थानांचा निर्देश काही ठिकाणी केलेला आहे; पण तो नीट वाचता येईल असा नाही. त्यांनी काही दरबारांना व शहरांना भेटी दिल्याची अतिशयोक्त वर्णने इथे आढळतात. असे दिसते की एका मोठ्या लेखन प्रबंधाचा हा एक छोटा भाग असावा. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ किंवा यातील घटनाप्रसंगांच्या तारखा दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ** : . . . युत्की आणि वेदमार्ग कडुन बौध सिधांत युत्की चालऊन देईनास बोधमत-वृक्ष खंडण करीतां ते पाहुन जय अपजय विद्यादीका मुलें व युत्की व सामर्थ मुलें होत आहे.

**शेवट** : जामतास अर्ध पाक्षे मधुपाकादी पुजा करुन स्वकनेस सर्वाभरण भूषण करुन सुमुहुर्त धारा पूर्वक अर्णिता जाहला की स्वरुप (नामक मंडन) उभये भांरतीचा पाणीग्रहण करुन मांगल्य सूत्र बांधुन आनंद युत्क लाज्या होमादी करीतां जाहाला.

## डी. नंबर २४७

**शांडीपती गाव कैफियत**
**SANDIPATI GĀVĀ KAIFIYAT**

**कागद** : स्थानिक बनावट. ८"x६". २९ ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

या भागात असणारा हा एकमेव मराठी दस्तऐवज होय. कारण इतर सर्व रचना तेलगू भाषेतील आहेत. ही कैफियत

पृ. ३७ वर येत असून त्याचे शीर्षक मोडी व तेलगू अशा दोन्ही भाषांत लिहिलेले आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. जरी याला 'शांडीपती गाव कैफियत' असे शीर्षक दिलेले असले तरी शांडी हे गाव किंवा तेथील राजे यांसंबंधीची काहीही माहिती यात दिलेली नाही. चेदेद (ceded) जिल्ह्यातील हे ठिकाण म्हणजे एक लहान गाव असावे असे दिसते. हिंदू पंचांगाप्रमाणे काही वर्षे, महिने व दिवसांच्या तारखा नोंदलेल्या आहेत; पण अशी नोंद करण्याची कारणे मात्र सांगितलेली नाहीत. यात नेमकेपणे स्पष्ट करावे असे काही नाही; पण असे गृहीत धरायला हवे की, या तारखा शांडीच्या राजकर्त्यांच्या घरगुती घटनांच्या संदर्भातील आहेत. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ किंवा नकलेची नेमकी तारीख यात दिलेली नाही. शिवाय ही कैफियत अपूर्ण आहे.

**प्रारंभ :** शांडीपती गावचे कैफियत. बखर... पैकी येलाऊन्न.

**शेवट :** तेदी बागवी. २३ छ १५ शेनीवार.

## डी. नंबर २४८

**शालिवाहनाची बखर**
**SĀLIVĀHANACI BAKER**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x६". १५ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही अपूर्ण कैफियत या भागाच्या पहिल्या पानावर येत असून तिचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे; पण या कैफियतीला पूर्णत्व येत नाही. कारण यातील शेवटच्या भागातील काही पाने गहाळ झालेली आहेत.

बहिष्कृत केलेल्या एका ब्राह्मण कन्येच्या जीवनवृत्तान्ताबाबतच्या आख्यायिकेने या कैफियतीचा प्रारंभ होतो. तिने जंगलात व्यतीत केलेले जीवन आणि तिला एका कुंभाराने कसे संरक्षण दिले याविषयीचा वृत्तान्त मोठ्या रेखीवपणे यात लिहिलेला आहे. या काळातच तिने एका मुलाला जन्म दिला आणि ते मूलच पुढे शालिवाहन म्हणून प्रसिद्धीस आले. या शालिवाहनाचे बालपण मोठ्या विस्ताराने वर्णिलेले आहे. एका मुलीच्या मालकीबद्दलचा कुणी ब्राह्मण व राक्षस यांच्यातील झगडा नंतर सांगितला आहे. निकालासाठी लवाद म्हणून पोरसवदा शालिवाहन मानला जातो आणि हा शालिवाहन त्यांच्यापैकी न्याय्य वा कायदेशीर हक्कदार नेमकेपणे ओळखतो. त्या राक्षसाला शापमुक्त करण्यासाठी ब्राह्मणाने केलेल्या उपकाराचे वर्णन कैफियतीच्या अखेरच्या भागात आहे. पैठण येथे राहणाऱ्या एका भास्कर भट या मनुष्याकडे असणाऱ्या दस्तऐवजावरून प्रस्तुत कैफियत नकललेली आहे. लेखकाचे नाव किंवा नकलेची तारीख नाही.

**प्रारंभ :** श्री शालीवाहनाची बखर अर्जतस्त अर्जबंदे (कमीनी) शालीवाहन शक उत्पन्न वेदमूर्ती राजे श्री भास्कर भटजी अग्नीहोतीती ब्राह्मण वास्तवय पैटण गंगा तीरी राहात होते.

**शेवट :** तुजला द्रव्य देतो. माझा सार्थक तुम्ही कराव ऐसे बोलु लागला तो ब्राह्मण म्हणला कीं द्रव्ये द्यावी तुजे सार्थक मी करीतो असा करार वचन प्रमाण आणि शेपत शालीवाहनाचें विध्यमाने ठरलें कीं आता या ब्राह्मणास द्रव्य देतो...

## डी. नंबर २४९

**शालिवाहनाची बखर**
**SĀLIVĀHANĀCI BAKHER**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x६" १५ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ४८२ वर ही कैफियत येत असून तिचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पृष्ठे योग्य अनुक्रमाने रचलेली व बांधलेली नाहीत. असे वाटते की शालिवाहनाच्या इतिहासाचा हा पुढचा भाग आहे. प्रारंभीची काही पाने शालिवाहनाची शौर्यभरी कृत्ये स्पष्ट करतात. त्याच्या बहिष्कृत मातेशी व त्याच्याशी तिच्या वडिलांची भेट, तिच्या बहिष्कारामागील कारणे, एका कुंभाराने त्याला व त्याच्या आईला केलेली मदत आणि तो त्या समाजाचा विश्वासार्ह नेता कसा बनला याबद्दलचा वृत्तान्त विस्ताराने वर्णिलेला आहे. आपल्या जन्माचे रहस्य शालिवाहनाने कसे जाणले आणि गंगेच्या तीरावर आपल्या वंदनीय पित्याशी त्याची भेट कशी झाली याबद्दलचा वृत्तान्त यात आलेला आहे. विक्रमादित्याचा पराभव करण्यासाठी शालिवाहनास सर्पराजाने-नागराजाने मदत कशी केली याचा रेखीव वृत्तान्त यात वर्णिलेला आहे. शालिवाहनाचे व्यक्तिमत्त्व आणि त्याचे कर्तृत्व यांविषयी तपशीलवार विवेचन करून ही कैफियत संपते. तशी ही एकदमच संपते, कारण लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ यांचीही ती नोंद करीत नाही. ४९७ क्रमांकाच्या शेवटच्या पृष्ठावरील शेवटच्या दोन ओळींत हे काम अहमदनगर येथे १० डिसेंबर १८७० रोजी पुरे केल्याची फक्त नोंद केलेली दिसते.

**प्रारंभ :** म्हणौन चालिलें. तो तीस कोसावरी जाऊन उतरले. घोडेस घास दाणा करीतां तो राजाकडील फौज तमाम आली.

**शेवट :** कालचे मसलइत आपण चुकले म्हणौनही खराबी जाहली. आता येथुन लवकर निघाव. नाहीतरी हे बातमी शालीवाहनास गेले तरी तोच आपल्यावरी येऊन पडेल आपली फौज थोडी आहे. तो आम्हास उचलुन घेऊन नाईल मण लोक बोलीले कीं माहाराज हे खरे आतां आपण चलाव ऐसें....

### डी. नंबर २५०

**शाहाजी राजाचे कैफियत**
**ŚAHAJI RAJANCI KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ६". १६ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १२७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पहिल्या पानावर येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. शहाजीपासून संभाजीच्या मृत्यूपर्यंतचा मराठ्यांचा इतिहास व मूळ यात संगितलेले आहे. भोसले घराण्याचे मूळ आणि त्यातील शहाजीसारखा प्रमुख यांकडे विशेष लक्ष दिलेले आहे. त्याच्या तीन बायकांची नावे, शिवाजी, एकोजी व संभाजी असे त्याचे तीन प्रसिद्ध पुत्र आणि मराठी राज्य उभे करण्यात साहाय्यकारी झालेल्या इतर महत्त्वाच्या व्यक्ती यांचे उल्लेख केलेले आहेत. त्यानंतर औरंगजेबाच्या आधिपत्याखालील मोगल राजवटीचे श्रेष्ठत्व यात स्पष्ट केलेले आहे. पाचव्या प्रकरणात शिवाजीचे जीवनचरित्र वर्णिलेले आहे. शिवाजीचा राज्याभिषेक, त्यासाठी केलेला खर्च आणि राज्याभिषेकाच्या निमित्ताने साजरे झालेले उत्सव व कार्ये या सर्वांचे मोठे विस्तारपूर्वक वर्णन केलेले आहे. शिवाजीच्या राज्यकारभार पद्धतीचे विवरण एका स्वतंत्र प्रकरणात केलेले आहे. संभाजीचा राज्याभिषेक येथपासून त्याचा पराभव व मृत्यू येथपर्यंतचा वृत्तांत तिसऱ्या प्रकरणात आलेला आहे. शिवाजी व संभाजी यांच्या ताब्यात असणारे किल्ले व ठिकाणे, शस्त्रास्त्रांचे स्वरूप व संख्या आणि त्यांच्या काळात कार्यवाहीत असलेले विभाग यांचा विचार चौथ्या प्रकरणात केलेला आहे. शेवटच्या प्रकरणात राजारामाचे जिंजीस पलायन आणि मराठा राज्यातील वारसा युद्ध यांविषयीची हकीकत सांगितलेली आहे. नक्कलकाराचे नाव किंवा लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांपैकी कशाचाच यात निर्देश नाही; पण कर्नल मॅकेंझी याच्या विनंतीवरून १७ डिसेंबर १८०५ रोजी अहमदनगर येथे ही कैफियत नकलली गेली आणि ते काम श्रावण महिन्याच्या १० बहुल रोजी पुरे झाले, एवढा उल्लेख आहे.

**प्रारंभ :** शाहाजी राजेचा कैफियत. माहराज राजेश्री षाहाजी राजे भासले यांस पुत्र राजेश्री शिवाजीराजे एक व राजेश्री यकोजी एक व राजेश्री संभाजी राजे एक ऐस तीषे पुत्रें.

**शेवट :** पुढे वर्तीले ते सर्वांस ठाऊक आसे एथोर लिहीले जाहलें. बिकलम इलाखे मेजर मेकेंनजी साहेब पैमायष सरदार मुलुक जमीन श्रीरंगपट्टण वकैरे बा तारीख छे १७ डासबर सन १८०५ इसवी दर जागा मोकाम अहमदनगर कलमी शूद नकल लिहीणे श्रावण बहुल १० गुरुवार तमाम जाहलें.

### डी. नंबर २५१

**शाहु राजाची उत्तपती**
**SAHU RAJANCI UTPATHI**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ६". २६ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ५१४ वर ही कैफियत येत असून तिची सर्व पृष्ठे फाटलेली व भुऱ्या रंगाची झालेली आहेत. तशीच ती सुट्या अवस्थेत आहेत. मोडीशिवाय तेलगू व उर्दू लिपीत हिचे शीर्षक लिहिलेले आहे. मराठ्यांचे व भोसले घराण्याचे मूळ, शिवाजीचा नातू शाहू याचे चरित्र आणि पेशव्यांचा संक्षिप्त इतिहास हा या कैफियतीचा विषय आहे. नागपूर या शहराचा संस्थापक लुकजी जाधवराव याचे जीवनही यात विस्ताराने वर्णिलेले आहे. मराठ्यांचा इतिहास आणि शिवाजी व औरंगजेब यांच्या काळातील मोगलांचा इतिहास यामध्ये स्पष्ट केलेला आहे. शिवाजीचा मृत्यू आणि संभाजीचे पदग्रहण व तो कसा पराभूत झाला, त्याचा शिरच्छेद कसा झाला याचे मोठे रेखीव वर्णन केलेले आहे. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व बाळाजी बाजीराव यांच्याबद्दल संक्षिप्त वृत्तांत दिला आहे. बाजीरावाचा मृत्यू व निजामाकडून रघुनाथरावाचा झालेला पराभव यांविषयीच्या विवेचनावर ही कैफियत संपते. लेखकाचे वा नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचा उल्लेख नाही. तसेच यातील घटनांच्या तारखाही दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ :** कैफियत षाहुराजा बहदुर. कैफियत षाहुराजाचे उप्तती. दिली मंध्ये अकबर बादशहा होते त्या वेलेची तोड गडा

मध्ये उदयसींग व जेययेल व राते सींग अस्वपती राज्य करीत होते.

**शेवट :** निजां अली खान अवरंगबादावरुन कुच करुन पुनेस जाऊन पुना अवघ जालून टाकीले. रघुनाथ राव हैदराबादेसी चौथ घेऊन माघ परंतुन जात असतां त्यास हे वर्तमान कलले.

## डी. नंबर २५२

**शाहु राजे व निजाम मुल्लमुलक कैफियत**
**SAHU RAJA VA NIZAM MUL MULK KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १६"x १०". १७ ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर २८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १३५ वर ही कैफियत येते. कागद फिकट व जीर्ण झालेला असून अक्षरे अगदी पुसट अवस्थेत आहेत. शाहूचे शेवटचे दिवस, मराठ्यांची स्थिती, दक्षिणेच्या व कर्नाटक प्रांताच्या निजाम उल मुल्काची स्वारी या इतिहासाशी ही कैफियत निगडित आहे. संभाजीचा पुत्र शाहू आणि कोल्हापूरचा राजाराम यांच्यातील वारसा युद्धाचे यात वर्णन केलेले आहे. मराठे व निजाम यांच्या फौजांचे कूच व मुक्काम यांचे तपशीलवार वर्णन, तसेच युद्ध केलेल्यांची नावे व प्रत्यक्ष कामावर असताना मारले गेलेल्यांची नावे अशी माहिती यात दिलेली आहे. शाहूचा मृत्यू आणि बाळाजी बाजीराव याने मराठा देशाचा केलेला कारभार थोडक्यात वर्णिला आहे. कैफियतीच्या शेवटच्या भागात शाहूचा मृत्यू आणि ताराबाई व सकवारबाई यांच्या नातवाने सांगितलेला हक्क याविषयीची माहिती दिलेली आहे. सकवारबाई व बाळाजी बाजीराव यांच्यातील तह आणि पेशवे सत्ताधीश कसे झाले याविषयी अधिक माहिती या भागातच दिली आहे. लेखकाचे वा नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचा कुठेही उल्लेख नाही, तसेच तारखाही दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ :** कैफियत शाहुराजे व निजांमुलमुलुक. श्रीमंत सावाई माधव राव बहदुर यास जागीर होणेस्थव नारोराघव मंत्री वगैरे लिहुन गुजरवीले.

**शेवट :** x x x यास गडावरी न घेतां तमाम मराटेस x x x x सारे एक होऊन मजकड आलीयां पाहिजे ते खर्च वेचास तहप्रमाणे राजाचे वास जाहले. व त्यास खुशाल करु उर्जीत करीतो ब्राह्मणास उबजल्यान x x x x

## डी. नंबर २५३

**शाहू राजाची माहिती**
**SAHU RAJACI MAHITI**

**कागद :** इंग्लिश बनावट. १६"x १०". १७ ओळी. मोडी. जुने. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर ५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १५५ वर ही कैफियत सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी कागदांचा रंग विटलेला व अवस्था जीर्ण झालेली आहे. पृष्ठे व्यवस्थित रचलेली व बांधलेली आहेत. या दस्तऐवजाचे इंग्रजीत भाषांतर केलेले आहे असे सांगणारी एक छोटीशी टीप यात दिसते. जरी या कैफियतीचे शीर्षक शाहू कैफियत असे असले तरी ती फक्त शाहूच्या इतिहासाशी निगडित नाही, तर ती भोसले घराणे व मराठा राज्य यांच्या मुळापासून सुरू होते आणि रघुनाथरावाच्या शेवटच्या दिवसांपाशी संपते. डी. नंबर २५२ प्रमाणेच या कैफियतीचाही विषय तोच असला तरी पेशव्यांच्या काळातील मराठा साम्राज्याच्या कारभाराविषयीचे काही जादा तपशील विस्ताराने वर्णिलेले आहेत. शिवाजीचे जीवन थोडक्यात सांगितलेले आहे. संभाजीचा पराभव व वध आणि औरंगजेबाचा राज्यकारभार या कैफियतीच्या तिसऱ्या भागात वर्णिलेला आहे. चौथ्या भागाचा विषय म्हणजे औरंगजेबाचा मृत्यू आणि मराठा राज्याच्या सिंहासनासाठीचा शाहू व राजाराम यांच्यातील कलह. बाळाजी विश्वनाथापासूनचा पेशव्यांचा इतिहास आणि ते मराठी साम्राजाचे सर्वसत्ताधीश कसे झाले याविषयीचा वृत्तांत यातच सांगितलेला आहे. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, बाळाजी बाजीराव व रघुनाथराव यांचा मराठा राज्याचा कारभार थोडक्यात वर्णिलेला आहे. यास शाहू कैफियत असे म्हटले असले तरी एकूण मराठ्यांच्या इतिहासाशी ती संबंधित आहे. पेशवे वंशातील काही व्यक्ती, नाना फडणवीस आणि सदाशिवराव भाऊ यांच्या छोट्याशा व्यक्तिरेखा यात रेखाटलेल्या आहेत. लेखकाचे नाव, नक्कलकाराचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ याबद्दल कसलाही उल्लेख यात नाही. काही ठिकाणी शालिवाहन शकातील तारखा दिल्या आहेत.

**प्रारंभ :** श्री गणेशाय नमः प्रसन्न शाहुराजाची उतपत दीली मधे अखबरशाहा बादशा होता. त्या वेली तोडमंडला मध्ये उदेसींग जयमल व फुतासिंग राजा अश्वपती राज करीत होते.

**शेवट :** शेंमशेर बहादरचा पुत्र आली बहादुर खान पादशा जवळ आहे जाणीजे बाजीराव एक कलवांतनीस ठेवीला होता. तीचे उदरी शेमशेर बहादर जाहला जाणीजे.

## डी. नंबर २५४

**शिंदे कैफियत**
**SINDE KAIFIYAT**

**कागद :** फ्रेंच बनावट. १४"x ८". १० ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १२६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३६७ वर ही कैफियत सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पृष्ठे सुटी सुटी असून त्यांतील काही पानकिड्यांचे भक्ष्य बनलेली आहेत. हा दस्तऐवज फक्त शिंद्यांचे मूळ व इतिहास सांगत नाही, तर पेशव्यांच्या काळातील साऱ्या मराठा राज्याच्या इतिहासाचे आलोडन करतो. जेव्हा दुसरा शाहू पुण्याला राज्य करीत होता तेव्हा पुण्याच्या पूर्वेस तीस मैलांवर फलटण येथे राहणारा सावजी शिंदे हा पहिला शिंदे होय. सावजी शिंदे याने उमाबाईशी लग्न केले आणि त्यांना राणोजी नावाचा मुलगा झाला. साताऱ्याचे राज्य उभे करण्यात या राणोजीने मोठी भूमिका बजावली असे म्हटले जाते. बाळाजी विश्वनाथ व नझर जंग यांच्यातील तसेच मोगलांबरोबर झालेल्या युद्धात सावजी शिंदे व दत्ताजी शिंदे यांनी केलेली कामगिरी आणि यात राणोजीने प्रत्यक्ष केलेले कार्य यांचे वर्णन या कैफियतीत नंतर आलेले आहे. पुढे शके १६८२ मधील बाजीरावाचा मृत्यू, बाळाजी बाजीरावाचे पदग्रहण आणि राणोजीच्या या काळात झालेल्या लढाया यांचे वर्णन आलेले आहे. राणोजीनंतर त्याचा पुत्र जयसिंग याने सूत्रे आपल्या हाती घेतली. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, बाळाजी बाजीराव व माधवराव अशा पेशव्यांचा इतिहास नंतर वर्णिलेला आहे. पानिपत-सोनपतची लढाई व दत्ताजी शिंदे यांनी त्यात बजाविलेली भूमिका यांचे मोठे रेखीव वर्णन यात आलेले आहे. सवाई माधवरावाच्या काळातील मराठा देशाचे वर्णन यात आहे. वारशाबद्दल रघुनाथरावाने उभा केलेला वाद आणि शेवटी नारायणराव कसा पेशवा झाला हा या कैफियतीच्या शेवटच्या भागाचा विषय आहे. ही कैफियत पुण्याचा रहिवासी असलेल्या कोण्या रघुनाथराव नावाच्या वृद्धाने दिलेल्या माहितीबरहुकूम १० एप्रिल १८०६ रोजी तयार केली असून कर्नल मॅकेंझी याजकडे रवाना केली गेलेली आहे.

**प्रारंभ :** कैफियत सिंध्या बुनीपादे पासुन x x x २०० वरुषपासून पुनेस अग्नीभागी तीस कोसावरी पलठण प्रांती कसबा कणेसरे परगणे फालठर्णे या गावी बहुत दिवसापासुन सावजी सिंदीया मराटा जातीचा क्रिशीमुल करुन जिवन उपाये करीत होता.

**शेवट :** पुर्नेत राजेश्री रघुनाथराव सुखवासी ब्राह्मण जाणता माहातारा होता. त्याकडुन कैफियत कळुन घेऊन्न कुलकुशे लिहीली असे शके १७२८ शालीवाहन क्षेय नाम संवछर.

## डी. नंबर २५५

**शिवाजी राजांची कैफियत**
**SIVAJI RĀJĀNCI KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १८"x १०". २५ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

डी. नं. १५३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ५३१ वर ही कैफियत येते. तिचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून तीत मोठ्या प्रमाणात अशुद्धलेखन व चुकीची विरामचिन्हयोजना आहे. पहिल्याच पृष्ठावर इंग्रजीमध्ये असे लिहिले आहे की, या कैफियतीत शिवाजीचा इतिहास आणि त्याने मोगलांशी केलेल्या युद्धाचा वृत्तांत एका क्र. १९/९३१ च्या मराठी कैफियतीवरून नकललेला आहे. या मोठ्या कैफियतीत १६ प्रकरणे आहेत. पहिल्या दोन प्रकरणांत भोसले घराण्याचे मूळ आणि शिवाजीच्या वाडवडिलांचा इतिहास यांचे वर्णन आहे.

पुढच्या तीन प्रकरणांत शिवाजीचे बालपण व तो सामर्थ्यशाली कसा होत गेला याविषयीचे वर्णन आहे. त्याने केलेला अनेक ठिकाणांचा कब्जा, बांधलेले किल्ले आणि योग्य अशा विश्वासू अधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्याने मोगलांकडून जिंकलेले किल्ले कसे राखले यांविषयीचा वृत्तांत पुढच्या दोन प्रकरणांत येतो. दहाव्या व अकराव्या प्रकरणातही एकूण देशाची स्थिती आणि मराठा राज्यातील कारभार ही स्पष्ट केलेली आहेत.

बाराव्या व तेराव्या प्रकरणात शिवाजीने औरंगजेबाविरुद्ध आखलेल्या मोहिमांविषयीचा वृत्तांत दिलेला आहे. शेवटच्या दोन प्रकरणांत शिवाजीचा मृत्यू व संभाजीचे पदग्रहण वर्णिलेले आहे. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचा उल्लेख यात नाही. काही महत्त्वाच्या ऐतिहासिक प्रसंगांबाबत शालिवाहन शकातील तारखा दिलेल्या आहेत.

**प्रारंभ :** श्री गुरु सर्व देवस्त रूप परी कांही आरंभास प्रथम गणेश सरस्वती कुल देवतांची कारावा. गुरु प्रसादाचे सहाय यास्तव सर्व देवतांचा वंदन करु.

**शेवट :** आपल्या बापांसही - - - - ऐसे यवनीचे यभ न धरीता आपण मारीत होते. - - - सखल प्रयवींत स्वाधीन करुन घेणे पासून - - - म्हणजि.

## डी. नंबर २५६

**शिवाजी राजे व दिल्ली बादशा लढाई**
**SIVAJI RĀJĪ VA DILHI BĀDVSĀ LADĀYI**

**कागद :** इंग्लिश बनावट. १४"x ८". २७ ओळी. मोडी. जुने. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १२६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही अपूर्ण कैफियत पृ. ७२४ वर येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी तीत अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्हयोजना यांचे प्रमाण फार आहे. मराठ्यांनी मोगलांशी केलेल्या एका युद्धाचा वृत्तांत इथे दिलेला आहे. शिवाजीच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी आणि औरंगजेबाच्या नेतृत्वाखाली मोगलांनी योजिलेल्या व्यक्ती व युद्धसाहित्य यांची एक मोठी यादी दिलेली आहे. नेमके युद्धाचे वर्णन केलेले नाही, पण चकमकी मात्र दीर्घ काळ चालू राहिल्याचे सांगितले आहे. ज्या ठिकाणी या दोन्ही पक्षांच्या सैन्यांचे मुक्काम झाले ती ठिकाणे सांगितली आहेत, पण नीटपणे लिहिलेली नाहीत. लेखकाचे वा नक्कलकाराचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही. कर्नल मॅकेंझीला ही कैफियत रवाना केल्याची तारीख दिलेली आहे.

**प्रारंभ :** राजे लोकांचे तपशील ७०० हत्ती सुमार ५००० घोडे पाच हजार (स्वार पाच हजार ४०० रथ सुमार च्यारीश. १५००० पायंदल म्हणजे पयदे पंद्रा हजार.)

**शेवट :** तारीख २४ जुलै सन १७१८ इसवी ..... गुरुवार क्षेयनाम संवछर शखे शालीवाहन १७१८ दर जागा मुला मुठा संगमात ---- बहदुर पुने दर कलमीशुध.

## डी. नंबर २५७

**शिवाजी राजे व निजाम मुलमुलक**
**SIVAJI RAJE VA NIZAM MUL-MULK**

**कागद :** इंग्लिश बनावट. १४"x ९". १५ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर २ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ९८ वर ही कैफियत येते. हा एका मोठ्या रचनेचा अलग झालेला भाग असावा. पहिली काही पाने गहाळ झालेली आहेत. वर लिहिल्याप्रमाणे या कैफियतीचे शीर्षक असले तरी यात ना शिवाजीचे जीवन, ना निजाम-उल-मुल्काचे जीवन सांगितले आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी असले तरी शाई व कागद अनुक्रमे फिकट व तपकिरी बनले असून काही ठिकाणी तर अक्षरे अदृश्य झालेली आहेत. कैफियतीला एक उर्दू शीर्षकही दिलेले आहे. शाहूचे पदग्रहण आणि मराठा गादीच्या प्राप्तीसाठी झालेली वारसा युद्धे यांचे वर्णन पहिल्या काही पानांत केलेले आहे. नंतरच्या पाच पानांत पेशवा म्हणून बाळाजी विश्वनाथाचा झालेला उदय आणि त्याने मोगल व नबाब यांच्याशी केलेली युद्धे यांचे वर्णन आहे. निजाम-उल-मुल्काचा मृत्यू आणि त्याच्या मुलांत वारशासाठी झालेले युद्ध मोठ्या विस्ताराने वर्णिलेले आहे. सवाई माधवरावापर्यंतच्या काही पेशव्यांचे जीवन व कारभार यांचे स्पष्टीकरण यात केलले आहे. ईस्ट इंडिया कंपनीने बजाविलेली भूमिका आणि या काळात त्यांनी केलेला क्षेत्रविस्तार थोडक्यात सांगितला आहे. सवाई माधवरावाच्या विनंतीवरून श्रीपतराव दिनकर व नाना फडणवीस यांनी सोमवार, १३ माघ परिधावी (Parithavi) संवत्सर रोजी ही कैफियत सिद्ध केली असे सांगितले आहे. तुळापूर येथील एक रहिवासी श्रीनिवास राव याने ती लिहिली. कर्नल मॅकेंझी यांच्या सूचनेनुसार ती भीमराव रंगाराव याने नकलली आणि ते काम कृष्ण पक्षाच्या पहिल्या दिवशी, माघ महिना, रुधिरोदगारी संवत्सर रोजी पुरे केले.

**प्रारंभ :** कैफियत सिवाजी राजे व निजाम मुलमुलक... त्याचे सेवा करुन राहणे ऐसें कागद पत्र सर्वत्रास लिहुन पाठऊन बार सीपाई तमाम माहाराज शाहु छत्रपती स्वामीचे लेंकीं निंबलकर घरी धीदले.

**शेवट :** हे बखर परिधावी संवछर माघामासी शुकल पक्षे १३ भोमवार श्रीपयराव दिनकर चिंचनवीस व नाना फडनवीस यानी मीलून लिहुन दाखवील बखरचे नकल तुलीपूरचा चिमणपा व रघुनाथ श्रीनिवास दोघ भाऊ लिहुन घेऊन आलें होतें. ते बखर भीमराव व रंगराव यानी लीहुन आणुन फिरंगी सरदार मेजर गालनल मेकेंजीस दिलह ते दिवस रौद्री संवछर माघमास कृष्णपक्षे प्रतिपदा दिवसी नकल उतरविले.

## डी. नंबर २५८

**शिवाजीचे वंशावली माहिती**
**SIVĀJICE VAMŚAVALI MĀHITI**

**कागद :** इंग्लिश बनावट. १४"x १०". १८ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर ५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृष्ठ एकशे एकवर येते. हस्ताक्षर कमालीचे दुर्वाच्य असून काही ठिकाणी पुसट झालेले आहे. दोन ओळींमध्ये अनेक दुरुस्त्या व नव्या ओळी घालण्यात आलेल्या आहेत. प्रारंभ व शेवट गहाळ झालेला. हा भाग एका मोठ्या रचनेतील अलग झालेला तुकडा असावा. मोगलांचा मुलूख व कर्नाटक येथे शिवाजीने केलेले पराक्रम पहिल्या भागात सांगितलेले आहेत. त्याने बांधलेल्या व सर केलेल्या किल्ल्यांची नावे दिलेली आहेत. चंदनगडावर मुक्काम करून असलेल्या मोगल फौजेवर पन्हाळगडाहून कूच करून शिवाजीने हल्ला केला आणि मोगलांचा पराभव करून चंदन व वंदन हे किल्ले ताब्यात घेतले. शिवाजीने जिंकलेले किल्ले व बंदरे यांची यादीही दिलेली आहे. पन्हाळा किल्ल्यावर मानसबाई व तानाबाई अशा दोघींशी शिवाजीने लग्न केले असे सांगितले आहे. या दोघींपासून झालेल्या संततीची नावेही दिलेली आहेत. आपल्या मंत्र्यांशी सल्लामसलत करून त्याने आपल्या तीन मुलांत सर्व मराठा राज्य विभागून दिले. प्रत्येकाने घ्यायच्या ठिकाणांची नावेही दिलेली आहेत. तंजावर येथे राज्य केलेल्या एकोजी ते तुळाजी या मराठा राजांची नामावळी दिलेली आहे. इथेच कैफियत थांबते. ही कैफियत विनाअखेर असल्याने लेखकाचे नाव किंवा नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ यांचे निर्देश कळत नाहीत.

**प्रारंभ :** शिवाजी राजे प्रताप गडाऊन चेंदन वंदन किल्यास फौजानिसी आर्ले. किल्यांतून पाहिल्या वेलेस किल्या खाली सर्त तो पाहुन आपले निशान घालुन किल्ला बदोबस्त केले.

**शेवट :** संभाजी राजासही खास लक नाही. एकोजी राजे तंजावुराचेस एक लाक तुकोजी राजे याचे नाव. त्यार्चे लोंकाचे नाव. शेरफोजी राजा. त्याचा ल्योक प्रतापसिंव माहाराज. त्याचे ल्याकाच नाव तुलजामाहाराज.

### डी. नंबर २५९

**शिवाजी व शाहु व निजाम मुल मुलक**
**SAVĀJI VA SĀHU VA NIZĀM MUL MULK**

डी. नंबर ५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत पृष्ठ एकशे सतरावर येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी असले तरी कागद जीर्ण झालेले आणि शाई पुसट झालेली असल्याने काही पानांवरील मजकूर वाचणे अशक्य झालेले आहे. शिवाजीचा शीर्षकात नोमोल्लेख असला तरी त्याच्यासंबंधी कैफियतीत काहीच सांगितलेले नाही. पहिल्या काही पानांत मराठा देशाची स्थिती सांगितलेली आहे. दुसऱ्या भागात औरंगजेबाचा मृत्यू आणि मोगल तख्तासाठी त्याच्या मुलांत झालेले वारसा युद्ध यांविषयीचा वृत्तांत येतो. शाहूची सुटका आणि त्याने राजारामाच्या प्रखर विरोधाशी मराठा गादीसाठी केलेला मुकाबला थोडक्यात सांगितलेला आहे. मराठे आणि निजाम-उल-मुल्क यांच्यातील लढायांचा वृत्तांत कैफियतीच्या उरलेल्या भागात सांगितलेला आहे. या सर्व कैफियतीत उल्लेखिलेल्या घटना-प्रसंगांच्या तारखांची नोंद केलेली नाही. कैफियत अपूर्ण असल्याने लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ यांविषयी नेमके निदान करता येत नाही.

**प्रारंभ :** कैफियत शिवाजी व शाहु व निजाम मुलमुलक बहदुर. . . होऊन जेंबुखंडी ते स्थल पाच- - - मोकाम करुन कृष्णे तुंगबद्रे मधील राज्य करवीरा पासी संभाजी राजे त्या राज्यांत खंडणी घेणे - - -

**शेवट :** - - - यास गडावरी न घेतां तमाम मराटेस उबज्याले. मराटे सार एक होऊन मजकड आलीयां जे पाहिजे ते खर्च वेचास तुहासी व सीबंदीसही राजाचे वासना जसी असेल त्यास खुषाल करुन उजींत करीतो ब्रह्मणास उबज्याल- - -

### डी. नंबर २६०

**शिवाजी व संभाजी यांची बखर**
**SIVĀJI VĀ SĀMBAJI YANCI BAKHER**

**कागद :** स्थानिक बनावट. ८"x ५". ९ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

या भागात फक्त वर निर्देशिलेली कैफियत आहे. इतर काही रचनांची नोंद करणारी एक अनुक्रमणिका इंग्रजी भाषेत या कैफियतीच्या पहिल्या पृष्ठावर लिहिलेली आढळते; पण प्रत्यक्षात त्या रचना या भागात आढळत नाहीत. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी पृष्ठांवरील काही जागा पानकिड्यांनी टोकरलेल्या दिसतात. ही सर्व कैफियत मराठ्यांचा इतिहास सांगते. पहिल्या भागात औरंगजेबाच्या अमलाखालील हिंदुस्थानाची स्थिती विशद केलेली आहे. विजापूरच्या सुलतानाच्या दरबारात चाकरी करणाऱ्या काही महत्त्वाच्या मराठा घराण्यांचे मूळ व इतिहास यात येतात. शिवाजीचे बालपण वर्णिलेले आहे. पुढच्या काही पृष्ठांत शिवाजीने जिंकलेले काही किल्ले आणि त्याने औरंगजेबाकडून काही किल्ले कसे मिळविले यांविषयीचा वृत्तांत आहे. रायगड येथे शिवाजीला झालेला राज्याभिषेक, त्यासाठी

केलेला खर्च आणि त्या वेळी केले गेलेले विधी मोठ्या विस्ताराने सांगितले आहेत.

शिवाजीने नव्याने स्थापिलेल्या राज्याचा कारभार आणि राज्याची व्यवस्था पाहण्यासाठी त्याने नेमलेल्या अष्टप्रधानांची नावेसुद्धा दिलेली आहेत. शिवाजीच्या आधिपत्याखाली असलेल्या किल्ल्यांची व बंदरांची नावे आणि त्यांची देखभाल करण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांची नावे नोंदलेली आहेत. शिवाजीचा मृत्यू आणि संभाजीचे सत्ताग्रहण अगदीच संक्षेपाने मांडले आहे. राज्याभिषेकापासून ते औरंगजेबाने वध करीपर्यंतचे संभाजीचे चरित्र एका स्वतंत्र प्रकरणात मांडले आहे. शिवाजी व संभाजी यांच्या राजेपदाच्या काळात घडलेल्या महत्त्वाच्या घटना-प्रसंगांना शालिवाहन शकातील तारखा दिलेल्या आहेत. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही. कर्नल मॅकेंझी याच्या आज्ञेवरून १७ डिसेंबर १८०५ रोजी ही कैफियत तयार केली गेली असे अखेरीस म्हटले आहे. तीनहून जास्त ठिकाणी ही कैफियत लिहिलेली आहे.

**प्रारंभ :** माहाराज राजे श्री शाहजी राजे भोसले यास पुत्र राजेश्री सिवाजी राजे १ एक व राजेश्री एकोजी राजे १ एक व राजेश्री संभाजी राजे १ एक, एकूण तिघे पुत्र.

**शेवट :** येथोर पुर्त जाहाले. बिकलम ईलार्के मेकेंजी मेजर साहेब पैमायेषी सरदार मुलुक जमीन श्रीरंगपटण वगैरे बा तारीक छ २७ डिसंबर १७०३. सन १८०५ इसवी दर जाग मुकाम अहमदनगर कलम शुध.

## डी. नंबर २६१

### शिवाजी व संभाजी यांची बखर
### ŚIVĀJI VA SĀMBĀJI YĀNCI BAKHER

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x ५ १/२". १६ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १२७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृष्ठ तेरावर ही कैफियत येत असून तिचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. मात्र पहिली बारा पृष्ठे गहाळ झालेली आहेत. शिवाजीचे बालपण व त्याने औरंगजेबाच्या विरोधात केलेले पराक्रम यांच्या वर्णनाने हिचा प्रारंभ होतो. पुढच्या काही पानांत औरंगजेबाचा राज्यकारभार स्पष्ट केलेला आहे. शिवाजी व त्याचे सेनापती यांनी केलेला राज्यविस्तार, बांधलेले व जिंकलेले किल्ले यांचाही निर्देश केलेला आहे. नव्याने नेमलेले अष्टप्रधान आणि नव्याने ताब्यात घेतलेल्या प्रदेशाची देखरेख करण्यासाठी नेमलेले सेनाधिकारी यांच्या नावांची नोंद केलेली आहे. शिवाजीचे शेवटचे दिवस आणि संभाजीने सत्ता कशी मिळविली यांचे विस्ताराने वर्णन केलेले आहे. संभाजीचा मृत्यू आणि जिंजीत असलेल्या राजारामाच्या मदतीने ताराबाई व शाहू यांनी जारी केलेली युद्धे यांचा वृत्तांत दिलेला आहे. पहिल्या पेशव्याच्या कारभाराच्या उदयाबरोबर ही कैफियत संपते. मराठा संघराज्य उभे करण्यासाठी ज्या अनेक मराठा वीरांनी धडपड केली त्यांची नावेही यात दिलेली आहेत. लेखकाचे नाव किंवा यातील कैफियतीचे मूळ दिलेले नाही. काही ठिकाणी शालिवाहन शकातील तारखा दिलेल्या आहेत. ही कैफियत कर्नल मॅकेंझी याच्या विनंतीवरून तयार करण्यात आली. अहमदनगर येथे ती श्रावण बहुल दशमी रोजी पुरी करून १७ डिसेंबर १८०५ रोजी रवाना करण्यात आली. दोन वेगळ्या ठिकाणी हा इतिहास आला आहे.

**प्रारंभ :** उठून गेली. राजे यान आंग पिलोन पिछवायान रफाटा फाकडुन आपणास सोडविले. पोट तैसेच सावरुन फरगं घेऊन्न सिवाजीवरी हात ठाकिला.

**शेवट :** . . . विकलम ई ॥॥. मेजर मेकंजी साहेब पौमाषी सरदार मुलुक जमीन श्रीरंगपठण वगैरे बा तारीख छ १७ डीसेंबर सन १८०५ ईसवी दर जागा मोकाम हमदनगर कलमी षुद नकल लिहीणे श्रावण बहुल गुरुवार तमाम जाहल.

## डी. नंबर २६२

### शेमयपुर माहिती
### ŚAMAYAPURA MAHITI

**कागद :** स्थानिक बनावट. ७"x ५". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर १७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृष्ठ एकवर ही कैफियत सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी पृष्ठे थोडीफार खराब झालेली असून सर्व भाग सुट्या अवस्थेत आहे. षण्मुगापुरम् येथील मरिआमन मंदिर आणि भोजराजपट्टणम् हे गाव यांचे मूळ व इतिहास यात वर्णिलेला आहे. (जो कुठे राज्य करीत होता याचा उल्लेख केलेला नाही असा) एक भोज राजा दक्षिणेकडे प्रवासास निघाला आणि विक्रमादित्य पट्टण येथे मुक्कामासाठी थांबला. नरसिंह मूर्तीची पूजाअर्चा केल्यामुळे या राजाचा एक जुनाट

मुरलेला आजार नाहीसा झाला. कृतज्ञता म्हणून हे जुने व छोटे खेडेगाव भोजराजाने नव्याने बांधले आणि त्यास भोजराजपट्टणम् असे नाव दिले. त्याने शिवाचे एक वेगळे मंदिर बांधून त्यास भोजराजेश्वरीस्वामी असे म्हटले.

प्रस्तुत मंदिराच्या भिंतीवरील शिलालेखावरून कालिदासाचे चरित्र वर्णिलेले आहे. प्रस्तुत मजकूर शके १००० मध्ये कोरला गेला असे सांगितले आहे. पाच ठिकाणी हे प्रसंग येतात. कन्ननूर मरिआमन याचे मूळ व इतिहास यांशी संबंधित असा दुसरा प्रसंग जवळजवळ सहा पृष्ठांवर पसरलेला आहे. विजयनगरच्या विजयरंग राजाला कडुनिंबाच्या झाडाची भक्ती करायची विनंती केली गेली. त्या झाडात मरिअम्माची मूर्ती कोरण्यात आली आणि दुष्काळाने जेव्हा विजयनगरमध्ये धुमाकूळ घातला तेव्हा तिची पूजाअर्चा केली गेली. ती मूर्ती दक्षिणेकडे कुठे तरी हलविण्यास नाईक राजाने आपल्या मंत्र्यांना सांगितले. त्या मंत्र्याने त्रिचनापल्लीस जात असताना भोजराजपट्टणच्या जवळपास एका ठिकाणी ती मूर्ती ठेवली. नंतर ती तेथून हलविणे त्यांना अशक्य झाले. ईश्वरी संकेतानुसार त्यांनी मरिअम्माची मूर्ती छोटे खेडे असलेल्या सविवरम् येथे सोडली. तेथे तिच्यावर एक भले मोठे मुंग्यांचे वारूळ तयार झाले म्हणून त्या ठिकाणाला कन्ननूर म्हणण्यात येऊ लागले. मदुरा येथे राज्य करणाऱ्या विजयरंग चोक्क नाईक याने या देवतेची दीर्घकाळपर्यंत उपासना केली. देऊळ बांधले, किल्ला बांधला आणि मंदिराच्या देखभालीसाठी मोठ्या देणग्या दिल्या. या दोन्ही स्थानांची भौगोलिक रचनाही स्पष्ट केलेली आहे. लेखकाचे नाव किंवा घटना-प्रसंगांच्या तारखा या कैफियतीत दिलेल्या नाहीत. महालीगुडी (तालुका : लालगुडी, जिल्हा- त्रिचनापल्ली) येथे शेती करणाऱ्या साठ वर्षे वयाच्या कुणा चिदंबर पिल्ले याने ही कैफियत लिहिलेली आहे. वर उल्लेखिलेली दोन्ही स्थळे त्रिचनापल्ली जिल्ह्यात आहेत. १५ डिसेंबर १८२० रोजी ही शामियापूर येथे लिहिली गेली आहे.

**प्रारंभ :** पूर्वि या गावास विक्रमादित्य पटण म्हणुन नाव. येथ विक्रम राजा राज्य करीत अस्तना यक्केया दिवसी आपल प्रधान भेंटीस बोलावुन सांगीतलां कीं.

**शेवट :** गावंचे द्रींवाड भाष्येन फीरंगी मोडु म्हणन म्हणताहेत. ह्या भाज राजयान पटण बांधविल्यास अस्थी भार मात्र दिसत आहें. खंदक होत. ते राव थोडथोड बघखल पाणी दिसताहे. हा लिहीवीलते लालगुडी तालुका माहाक्राळी. गुडीच रयेत सितंबर पीळा छ वरुषाचा लिहीलतें.

बा तारीख ६१५ माहे दिशंबर सन् १८२० इसवी माकाम शेमयपुर.

## डी. नंबर २६३

### श्रीरंग पटण कैफियत
### ŚRIRANGPAṬṆA KAIFIYAT

**कागद :** इंग्लिश बनावट. १०"x८". २० ओळी. मोडी. जुने. खराब. अपूर्ण.

डी. नंबर २८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३९ वर ही कैफियत सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी काही ठिकाणी पृष्ठे खराब झालेली आहेत. दंतकथेने तिची सुरुवात होते. त्रिचनापल्ली जिल्ह्यातील श्रीरंगम आणि म्हैसूरमधील श्रीरंगपट्टण या दोन गावांचे मूळ व इतिहास यात सांगितलेला आहे. श्रीरंगम या बेटावर घनदाट जंगल होते आणि श्री रंगनाथाची मूर्ती त्या गर्द राईत होती. पेनुकोंडाच्या वीरचंद्र रायलू याच्या स्वप्नात तिचे दर्शन झाले. उत्खनन करून त्याने ती बाहेर काढली आणि तिच्या सोबत सापडलेल्या धनाचा वापर करून एक मंदिर बांधले. पेनुकोंडाच्या राजांची वंशावळ आणि ज्यांनी आणखी देणग्या दिल्या किंवा मंदिरात अधिक इमारतींचे बांधकाम केले अशा राजांच्या नावांची यादी हीही यात दिलेली आहेत. मंदिरातील काही मिनार व प्रवेशद्वारे यांची नावे दिलेली आहेत. कैफियतीच्या दुसऱ्या भागात श्रीरंगपट्टणाचे मूळ व इतिहास सांगितलेला आहे. विजयनगरचा कृष्णदेवराय व अनेगोंदीचा रामदेवराय यांनी येथील श्री रंगनाथाच्या मंदिरास दिलेल्या देणग्या वर्णिलेल्या आहेत. शेवटच्या भागात काही राजे व नाईक अधिपतीं यांनी मंदिराच्या केलेल्या व्यवस्थेविषयीचे विवेचन आहे. ही कैफियत अपूर्ण असल्यामुळे लेखकाचे नाव किंवा घटना-प्रसंगांच्या तारखा दिलेल्या नाहीत. चार भिन्न ठिकाणी ही कैफियत आढळून येते.

**प्रारंभ :** पुर्वी हजारो वरषा खाले श्रीरंग म्हणावयाचे गावास . . . म्हणुन हली एक गाव जाहले आहे. त्याचे कषरीख एक कोसावरी अरंब.

**शेवट :** कैफियत सदरह पालेवट मजकुरानी ऐकुन आपणची. . . रयेतानी सी येणारास कुमको बदल जाऊन त्यास कुमुक मिळवुन भारी जमीयत मीसी...

## डी. नंबर २६५

**श्रीरंगपट्टण कैफियत**
**SRIRANGAPATNA KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x ७". २२ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

या भागातील इतर रचना वरील कैफियतीशी संबंधित आहेत आणि फारसे महत्त्व नसलेल्या या बोधकथाच असल्यामुळे स्वतंत्रपणे त्याची नोंद केलेली नाही.

या भागाच्या पृष्ठ एकवर ही कैफियत सुरू होते. अनेकविध ठिकाणांच्या राजांबद्दल लिहिलेल्या एका मोठ्या रचनेची ही नक्कल असावी असे दिसते. काही नाईक राजांना त्यातही विजयनगरच्या नाईक राजांना फार महत्त्व दिलेले दिसते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्हयोजना मोठ्या प्रमाणात आहे. पहिल्या भागात सर्वसाधारण स्वरूपाच्या पौराणिक आख्यायिका आहेत. त्रिचनापल्ली जिल्ह्यातील श्रीरंगम येथील श्रीरंगनाथाच्या मंदिराचे मूळ व इतिहास ही यात वर्णिलेली आहेत. विजयनगरच्या राजांनी नित्य पूजाविधी व वार्षिक उत्सव साजरे करण्यासाठी या मंदिरास देणगी म्हणून मोठ्या प्रमाणात शेतजमीन दान दिलेली आहे. ज्यांनी देणग्या दिल्या किंवा मंदिरात जादा इमारती बांधून दिल्या अशा काही राजांची किंवा इतर व्यक्तींची नावे दिलेली आहेत.

म्हैसूरमधील श्रीरंगपट्टणच्या बेटाचाही उल्लेख यात केलेला आहे. थोडक्यात त्या बेटाची भौगोलिक रचना सांगितली आहे. कैफियत अपूर्ण असल्यामुळे लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ यांचा पत्ता लागत नाही.

**प्रारंभ** : रायरे खेपं दया श्री रामयनु १. संतंता श्री गारनु १. राज्यान व या १. ञ प्र कार मुं....

**शेवट** : के २० मोकर सु मा २०७ टकसाले १० वरहाकरुन बल्या १. हारुद याईचालु तंगी गेमणी हा पैका कुतुतु २६० वरहाऊ......(अपूर्ण)

## डी. नंबर २६६

**श्रीरंग पटण कैफियत**
**ŚRI RANGAPATNA KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १०"x ६". १६ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर ७२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृष्ठ तेवीसवर ही कैफियत येत असून पहिले पृष्ठ व शेवटची काही पृष्ठे गहाळ झालेली असल्यामुळे ही अपूर्ण आहे. या कैफियतीत तीन विभाग आहेत. त्रिचनापल्ली जिल्ह्यातील श्रीरंगम बेटावरील श्री रंगनाथ मंदिराचे मूळ व इतिहास पहिल्यात सांगितला आहे. दुसऱ्यात म्हैसूर, बेंगलोर व तेथील राजे यांचे मूळ व संक्षिप्त इतिहास ही येतात. तिसऱ्यात श्रीरंगपट्टण येथील श्री रंगनाथ मंदिराचे मूळ व इतिहास स्पष्ट केलेला आहे. मंदिरातील काही मिनार व प्रवेशद्वारे यांची नावेही दिलेली आहेत.

विक्रम रायलू, वीरचंद्र रायलू आणि दुसरा गंग राजुलू यांची छोटेखानी चरित्रे दुसऱ्या भागात वर्णिली आहेत. शंकरलिंगपट्टण आणि श्री नीलकंठ व श्री रंगनाथ यांच्या मंदिरांचे बांधकाम मोठ्या रेखीवपणे मांडलेले आहे. म्हैसूरच्या ओडियार घराण्याचे मूळ आणि कृष्णराज ओडियार, नरसराज ओडियार, रामराज ओडियार, दोडा देव राजुलू ओडियार व चिक्कदेव राजुलू ओडियार यांचे संक्षिप्त इतिहास दिलेले आहेत. बेंगलोरच्या विकासास चिक्कदेव राजा ओडियार हा जबाबदार होता. जोगी घनलके (Ghanlake) व निंबाजी पटनाईक या दोन मराठा पाळेगारांच्या मदतीने त्याने बेंगलोरमध्ये सुधारणा केल्या. विजयनगरचे राजे आणि नाईक अधिपती यांच्यात झालेली युद्धे अगदी थोडक्यात सांगितली आहेत.

श्री रंगनाथाचे मंदिर आणि त्यास हिंदू राजांनी व हैदर आणि टिपू या दोहोंनीही दिलेल्या देणग्या थोडक्यातच स्पष्ट केलेल्या आहेत. कैफियत अपूर्ण असल्याने लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ ही कळत नाहीत. काही महत्त्वाच्या घटना-प्रसंगांना शालिवाहन शकाच्या तारखा दिलेल्या आहेत.

**प्रारंभ** : - - - ते गाईच मालख खालंदास स्वपन्न जाहलेजें. श्री रंगनाथस्वामीनी ब्राह्मण रुप घेऊन सांगुन लागला जें अम्हीं ते वारुलांत अवतार केले गाईच नावघेण गरज नाही.

**शेवट** : कितेक म (क) ड तयार जाहल. आणि कितेक म (क) ड होणेच होत. धर्माजी बच्यारी किक्के - - येने प्रमाण चहोवे.

## डी. नंबर २६७

**श्रीरंगपटण कैफियत**
**ŚRI RANGAPATNA KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १०"x ६". २१ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

या भागातील इतर रचना पुढीलप्रमाणे आहेत :

या भागाच्या पृ. २७७ व ३५४ वर ही कैफियत येत असून, हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे; पण पृष्ठे नीट रचलेली व बांधलेली नाहीत. असे दिसते की ८७ परिच्छेद असलेल्या एका मोठ्या कैफियतीची ही नक्कल आहे.

याचा वर्ण्य विषय दोन विभागांत विभागता येऊ शकेल. पहिल्यात दुसऱ्या म्हैसूर युद्धाचे वर्णन येते. नागपूर व पुणे येथील मराठा राजकर्त्यांची व निजामांची नावे या कैफियतीत अप्रत्यक्षपणे ध्वनित केली आहेत. तहामुळे मराठे व निजाम यांचा कसा फायदा झाला हे शेवटच्या परिच्छेदावरून समजते. काही महत्त्वाच्या प्रसंगांना इसवी सनाच्या तारखा दिलेल्या आहेत. अतिशय कमी महत्त्वाचे असे पाठविले वा स्वीकारले गेलेले खलिते व त्यांवरील स्पष्टीकरणात्मक टिपा हाच काही परिच्छेदांचा विषय आहे. कैफियतीच्या शेवटच्या भागात कृष्णराज ओडियार याचा पुत्र करचुरी नैनराज ओडियार याचे एप्रिल १७६६ मधील सत्ताग्रहण वर्णिलेले आहे. टिपूचा पराभवही थोडक्यात सांगितला आहे. कैफियत अपूर्ण असल्यामुळे लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ ही दिलेली नाहीत.

**प्रारंभ :** नंतर तमाम मुलकचे बंदोबस्ती करुन कोणेते रीतीनीही फीर्याद जाहाले तारीखे बहुता ईलाखेस ठेऊन दर एक स्थली टार्णे मोकरुर केला.

**शेवट :** मरिआली खानास सवार च्यारी हजार सवार साहा हजार बार कडुन राहते होत. पेषवा माधव राव एक एकास सत्तर ऐसि हजार स्वारकडुन सन १७६६ ईसवींत मजल कुच करुन सीरत दाखल जाहाला त्या वेली खान मजकुर गाफिल होता आशा समई....

## डी. नंबर २६८

**श्रीरंगपटण शहर व किल्ला कैफियत**

**SRI RANGAPATNAM SAHAR VA KILLA KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १६"x १०". १५ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर ४८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १०७ वर ही कैफियत सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पहिले पृष्ठ व शेवटची काही पृष्ठे गहाळ झालेली आहेत. श्रीरंगपट्टण व त्यातील मंदिरे यांचा इतिहास आणि हैदर अली व टिपू सुलतान यांनी बेंगलोर येथे बांधलेली तटबंदी व मिनार यांचे मूळ व इतिहास यांच्याशी प्रस्तुत कैफियत निगडित आहे. आज अस्तित्वात असलेला किल्ला बांधून टिपू सुलतानाने बेंगलोर शहराची तटबंदी उभी केली असे पहिल्या दोन पानांत सांगितले आहे. काही प्रमुख प्रवेशद्वारे आणि मिनार यांचा त्यांच्या नावांसह उल्लेख आहे. स्वतःसाठी व आपल्या नागरी व लष्करी अधिकाऱ्यांसाठी टिपूने काही प्रासादतुल्य इमारतीही बांधल्या. या इमारतींचे वर्णनही केलेले आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्नल वॉलिस याच्याकरवी टिपूच्या झालेल्या पराभवानंतर व मृत्यूनंतर या इमारती लष्करी अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिल्या गेल्या.

आपल्या कारकीर्दीत हैदरने प्रचंड खर्च व श्रम वेचून एक भली मोठी बाग तयार केली. नंतर 'लाल बाग' म्हणून ओळखली गेलेली हीच त्याची 'दौलत बाग.' ही बाग व त्यातील मशिदींचे वर्णन आणि त्यांच्या देखभालीसाठी दिलेल्या देणग्या यांचेही वर्णन केलेले आहे. शारगंज व ईद मसजिद यांसारख्या अतिमहत्त्वाच्या जागा असलेला शहर-विस्तार त्याच्या काळात झाला. टिपूने त्याच्या काळात श्रीरंगपट्टण येथील श्री रंगनाथ व श्री गंगाधरस्वामी यांच्या आणि बेंगलोर येथील नरसिंह स्वामी व वराहस्वामी यांच्या मंदिरांत सुधारणा केल्या. देवांच्या पूजाअर्चा जास्त चांगल्या व यथासांग करण्यासाठी त्याने जुन्या देणग्यांचे नूतनीकरण केले. शिवाय नव्या देणग्या मंजूर केल्या. काही खेड्यांची भौगोलिक रचनाही स्पष्ट केलेली आहे. दौलत दरिया बाग (लाल बाग), मिनार व बेंगलोरची तटबंदी यांसारख्या महत्त्वाच्या रचनांबाबत शालिवाहन शकाच्या तारखा दिलेल्या आहेत. ही कैफियत अपूर्ण असल्यामुळे लेखकाचे नाव, माहितीचे मूळ किंवा या कैफियतीच्या लेखनाची तारीख ही दिलेली नाहीत.

**प्रारंभ :** कैफियत श्रीरंग पटण षहर में किल्ला—

१ सूख तीर्थ,

१ कळी दीडी,

१ जीबीमघर्दानी दिडी,

४ येकून ६

या प्रमाणे टीपुसुलतानानी मोकरोर करुन टेविलते मैसुरचे दरवाजे येक गंजंम च दरवाजा १. बाकी दरोबस्त दिडी २४ दरवाजे वाडा...डी तोडुन दरवाजे दिडीया वगैरे मोंकुफ केला.

**शेवट :** वरहास्वामीचे देवलें दोनी सख साल सदरहु देव हूत कदीमां तंजाऊर च मुलकेत श्रीमुष्टी म्हणुन गाव आहे. तेथुन घेऊन येऊन राजे नीट टेविले होतें. त्यास राजेच दिवसात हाजार होनाचे

मुलक ज्यागीर चालवीत होतें. हाली १०० होन नगद देत होतें. हाली तीनी सालाखाले त देव काहाडुन रंगनाथाचे देवलांत दाखाल करुन ते दवल वोस करुन तोडुन टाकलें. ते देवळ दाउज - - - मोकरोर केल आहेत.

## डी. नंबर २६९

**श्री वेंकटेश्वर स्वामी कैफियत**
**ŚRI VENKATESWARA SWĀMI KAIFIYAT**

या भागात फक्त एकच रचना आहे.

श्री वेंकटेश्वर स्वामींचे मंदिर, शेषाचल पर्वतराजी आणि तिरुपती येथील चंद्रपुष्करणी यांच्या इतिहासाशी निगडित असलेली ही कैफियत या भागाच्या पहिल्या पृष्ठावर सुरू होते. पृष्ठे सुट्या अवस्थेत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. शेषाचल टेकड्यांची भौगोलिक रचनाही स्पष्ट केलेली आहे. चंद्रपुष्करणीचे मूळ आणि ती तिरुपती येथील महत्त्वाचा जलाशय कशी बनली हे थोडक्यात सांगितलेले आहे. कलहस्तीच्या राजांच्या देखरेखीखाली हे मंदिर होते. कलहस्तीच्या रंगनाथ राजाने या मंदिरास मोठ्या देणग्या तर दिल्याच, शिवाय जादा इमारती व गोपुरे बांधली. रंगनाथ तोंडमन याने मंदिरातील व्यवस्थापनाची फेररचना केली आणि दिवसाच्या व रात्रीच्या पूजा, पाक्षिक-मासिक-वार्षिक उत्सव साजरे करणे यांची एक पद्धती तयार केली. तिरुपती येथील मंदिरांचे व्यवस्थापन पाहणाऱ्या काही गीर मंडळींच्या (geers) नावांचा उल्लेख केलेला आहे. श्री वेंकटेश्वराच्या उपासनेसाठी दान दिलेल्या काही नबाबांच्या नावांचाही निर्देश केलेला आहे. तिरुपती व तिरुचन्नूर येथे अनेगोंदीच्या राजांनी अनेक मंडप व धर्मशाळा बांधल्या, तसेच या दोन्ही मंदिरांना मोठ्या देणग्याही दिल्या. ही कैफियत जरी पूर्ण असली तरी लेखकाचे वा नक्कलकाराचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** कैफियत श्रीवेंकटेश्वर स्वामीयानी श्रीशेषाचल पर्वतांवरी उधभव जाहल वर्तमान.

**शेवट :** वडीलांनी म्हणुन घेत अहेत. श्रीवेंकटेश्वर स्वामी च वृत्तांत येणे प्रमाण अष्टादसशा पुराणांत दाखल आहे. वेंकटेश्वर स्वामी च स्तोत्रं संपूर्णमस्तु.

## डी. नंबर २७०

**श्री शिवाजी चरित्र संस्कृत शिव भारताचा मराठी अनुवाद**
**ŚRI SIVĀJI CARITRA SAMSKRTA ŚIVA BHĀRATAÑCI MARATHI ANUVĀDA**

**कागद :** इंग्लिश बनावट. १६"x १०". २० ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पहिल्या पृष्ठावर सुरू होणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून या सर्व भागाचीच पुनर्बांधणी करण्यात आलेली आहे. भोसले घराणे व शिवाजी महाराजांची पत्नी यांचा इतिहास सांगणारी सोळा पूर्ण प्रकरणे यात आहेत. प्रश्नोत्तराच्या शैलीत ही लिहिली गेली आहे. प्रत्येक प्रकरणाच्या अखेरीस रचनाकाराचे नाव दिलेले आहे. संस्कृत 'शिवभारत' या रचनेचा हा मोडी लिपीत लिहिलेला सत्य मराठी अनुवाद आहे. या रचनेचा मूळ लेखक म्हणजे बनारस येथील परमानंद हा ब्राह्मण होता. प्रस्तुत हस्तलिखित २ डिसेंबर १८०२ रोजी कुण्या रेड्डी राव या ब्राह्मणाकडून मिळविण्यात आल्याचे पहिल्या पानावर लिहिलेले आहे. नेमका स्थलनिर्देश मात्र केलेला नाही. यात परमेश्वराचा अवतार म्हणून शिवाजीचे चित्रण केलेले आहे.

पहिल्या दोन प्रकरणांत भोसले घराण्याचा इतिहास व शिवाजीचे संक्षिप्त चरित्र दिलेले आहे. तिसऱ्या व चौथ्या प्रकरणात देशाची एकूण स्थिती व मुस्लिमांचे वाढते सामर्थ्य यांचे वर्णन आहे. शिवाजीचे बालपण, काही डोंगरी किल्ल्यांवर त्याने केलेला कब्जा, मोगलांशी केलेला संघर्ष, युद्धे व वेढे असे शिवाजीच्या जीवनाचे वर्णन इतर प्रकरणांत येते. अफझलखानाचा पराभव व मृत्यू या घटनेवर कैफियत संपते. शिवाजीच्या बाबतीतील इतर इतिहास सांगितलेला नाही. नक्कल करणाराचे किंवा या सोळा प्रकरणांच्या भाषांतरकर्त्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** ॥श्री शंकर प्रसन ॥ ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ ग्रंथारंभ. श्री गुरु सर्व देवता रुप परी काही आरंभास प्रार्थना गणेश सरस्वती कुल देवतांची करावयास गुरुप्रसादाचा सहाये यास्तव सर्व देवांचा वंदन करुन कथेला प्रवर्तलो.

**शेवट :** ऐसे सोनाजीचा वाक्य ऐकुन फार मान्ये केले व त्यांसही बहुत सन्तान केले. त्यानंतर शिवाजीराजे त्रीलोक्य संवरण करणार आपले बांपासीही द्वेष धरणार ऐसा येवन जे त्याचे भये न धरीतां त्यास आपण मारीता होऊन सकळ पृद्वी म्हणाजे सीधी जाहाले ऐसा अध्याये कवीन्द्रांनी निरोपीला, सौवळा अध्याये संपूर्ण.

## डी. नंबर २७१

**श्री शिवाजी चरित्र संस्कृत शिव भारतांची मराठी अनुवाद**
**ŚRI SIVAJI CARITRA SAMSKRITA SIVA BHARATANCI MARATI ANUVADA**

**कागद** : इंग्लिश बनावट. १६"x १०". २१ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर ५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ४७ वर सुरू होणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून या सर्व भागाची पुनर्बांधणी करण्यात आलेली आहे. काही पानांवरील लेखन पुसट झालेले आहे. कैफियत सोळा प्रकरणांची असली तरी भोसले घराणे व शिवाजीची पत्नी यांचे मूळ व इतिहास कथन करणाऱ्या तिसऱ्या प्रकरणापासून ती सुरू होते. प्रत्येक प्रकरण प्रार्थना आणि आधीच्या प्रकरणाचे सारांशकथन यांनी सुरू होते. प्रश्नोत्तराच्या स्वरूपात या कैफियतीचे लेखन झालेले आहे. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी 'परमानंद कवी' असे कर्त्याचे नाव लिहिलेले आहे. काही शाब्दिक फरक सोडले तर याआधीच्या कैफियतीप्रमाणेच हिचा आशय आहे. हीसुद्धा संस्कृत शिवभारताचे मोडी लिपीत लिहिलेले मराठी भाषांतर आहे. शेवटच्या प्रकरणात अफझलखानाचा पराभव व मृत्यू वर्णिलेला आहे. नक्कलकाराच्या नावाचा निर्देश नाही.

**प्रारंभ** : श्री सद्गुरु चरण स्मरणं विस्मरण सर्व सोडुन कर जोडन अतीशये आनंद कडुन प्रार्थला नंतर तीसरा लेखनार्थ सादर जाहला.

**शेवट** : श्री सिवाजीराजे त्रिलाके संरक्षण करणार आपले बापासीही द्वेष धरणार ऐसा येवन जे त्यांचे भयें न धरीता त्यास उपपण मारीता होऊन्न सकल पृध्वी म्हणेजे सिध जाहालें ऐसा अध्याये कवीद्रानी कबीद्राने निरोपले स्वके या अध्याये संपूर्ण.

## डी. नंबर २७२

**श्री शिवाजी बखर**
**ŚRI SIVAJI BAKHER**

**कागद** : इंग्लिश बनावट. १६"x १६". २० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ४० वर सुरू होणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून पृष्ठांची पुनर्बांधणी करण्यात आलेली आहे. काही कागद अगदी फिकट झालेले असून काही ठिकाणचे हस्ताक्षर नीट दिसत नाही. वास्तविक या कैफियतीत मोठ्या संख्येने प्रकरणे असणार, पण त्यांपैकी पहिली फक्त पाच प्रकरणे इथे उपलब्ध आहेत. बनारसच्या रहिवाशांच्या आग्रहावरून कवी परमानंद याने शिवाजी व त्याचे पूर्वज यांचे चरित्र व इतिहास कथन केल्याचे प्रारंभी सांगितले आहे. हा इतिहास कथन केल्याची तारीख दिलेली नाही. प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभी एक छोटीशी प्रार्थना व आधीच्या प्रकरणाबद्दलचे मथिताथ-कथन आहे. मोडी लिपीत लिहिलेला हा मूळ संस्कृत शिवभारताचा मराठी अनुवाद आहे. नक्कलकाराचे नाव किंवा अनुवादाची तारीख ही दिलेली नाहीत. देशाची स्थिती, मोगलांचे विजय आणि भोसले घराण्याचे मूळ व इतिहास यांनी ही कैफियत सुरू होते. शहाजीचा जिजाबाईबरोबर झालेला विवाह, शिवाजीचा जन्म आणि बालपण यांची वर्णने अगदी ओघवती आहेत. शिवाजीचे विजय व त्याचा राज्यविस्तार दुसऱ्या प्रकरणात वर्णिला आहे. शिवाजीच्या एका विवाहाच्या वर्णनाबरोबर ही कैफियत संपते. नक्कलकाराचे नाव किंवा यातील घटना-प्रसंगांच्या तारखा दिलेल्या नाहीत. ही कैफियत अपूर्ण आहे.

**प्रारंभ** : श्री गुरुदेवता प्रसन्न. बखैर शिवाजीराजे. श्री गुरुदेवता सर्वरुपा परी काही आरंभास प्रार्थना गणेश सरस्वती कुलदेवताची कारावयास गुरुप्रसादच सहाये यास्तव सर्वांचे वंदन करुन कथालेखनी प्रवर्तलो.

**शेवट** : अखंडीत कमलमंडीत विराजमान होऊन्न सन्मान व आपले अज्ञेत सर्व राज्यास येकायातन करुन राहीले म्हणुन परमानंद ब्राह्मण काशीवासी ब्राह्मणास कथाचे चेरित्र दुरीत हारीच ऐस निवेदन केले. ऐसा दुसरा अध्ययें संपूर्ण.

## डी. नंबर २७३

**श्री हरिकोट कैफियत**
**ŚRI HARIKOTTA KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १६"x १०". २२ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर ४३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पहिल्या पृष्ठावर ही कैफियत सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. तेलंगण इलाख्यातील एका

महत्वाच्या शहराचे मूळ, उदय व ऱ्हास यांचे वर्णन यात येते. तीर्थयात्रेला निघालेल्या त्रिशंकू राजाने एक सुंदर असे शिवलिंग पाहिले आणि त्याला झालेल्या ईश्वरी दृष्टान्तानुसार त्याने एक सुंदर शहर उभे करून त्यास हरिकोट असे नाव दिले. मंदिराजवळच्या विहिरीत एक विचित्र असा शंख सापडल्याचे कैफियतीत नंतर नमूद केलेले आहे. प्रारंभी मोगल, नंतर नबाब, मराठे, नाईक आणि शेवटी ईस्ट इंडिया कंपनी या क्रमाने हे शहर कसे जिंकले गेले याचा थोडक्यात वृत्तांत यात दिलेला आहे. येथील वृद्ध रहिवासी व ग्रामाधिकारी यांनी दिलेल्या तोंडी माहितीवरून ही कैफियत तयार केल्याचे प्रारंभी सांगितले आहे; पण लेखकाचे नाव किंवा नक्कलकाराचे नाव किंवा तारखा दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ :** श्रीहरीकोटाच कैफियत गावच स्थळ कर्णमाकडुन व पुरातान पृथ्काकडुन लिहीवीलते. पुर्वी हे श्री हारी कोट म्हणावयाच आरण्य वाणी होते. येस असता त्रीशेकुमहाराज म्हणार सुर्ये वैंशाच लावी राज्यभार करीत असतां.

**शेवट :** या प्रमाण म्हगुन पुर्वी आता ते काहि नाही. ह्या गावांत दोनी तीनी अमराई चींचाची आहे. ते वरकड कोणत अमराई नाहिं. विष्टचवि देवल धाकट आहे शेक्तीच देवळ येक आहे. कैफियत समाप्ती.

## डी. नंबर २७४

**श्री हरिकोट कैफियत**
**SRI HARIKOṬṬA KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १६"x १०". २५ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर ४३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृष्ठ ३ वर सुरू होत असून तिचा प्रारंभ आधीच्या, म्हणजे डी. नंबर २७३ प्रमाणेच आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून काही ठिकाणी काही दुरुस्त्या केलेल्या दिसतात. रामेश्वराजवळ रामाने खाडीवर पूल बांधल्याचा प्रसंग प्रथम वर्णिलेला आहे. आधीच्या कैफियतीत सांगितलेल्या शंखाने हरिकोटा नगरीत गोंधळ उडविला असल्यामुळे तो सापडलेल्या श्री पांडुरंग मंदिराजवळच्या विहिरीनजीक रामाने लंकेहून परतताना दोन शिवलिंगांचे एक मंदिर बांधले. अशी दोन शिवलिंगे एकाच मंदिरात स्थापन करण्याचे कारण स्पष्ट केलेले आहे. या गावाची भौगोलिक रचना, जवळचा समुद्र आणि तेथील रहिवाशांच्या चालीरीती व सवयी यांचाही यात उल्लेख आहे. येथे राज्य केलेल्या काही राजांची नावेही सांगितलेली आहेत. निर्जन वस्ती व ज्यांच्या भिंतीवर अनेक शिलालेख कोरलेले आहेत अशी दोन उजाड मंदिरे यांनी युक्त असलेल्या या ठिकाणाचे यात वर्णन केलेले आहे. या देवळातील शिलालेखावरून मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कैफियत तयार केलेली आहे. लेखकाचे नाव, नक्कलकाराचे नाव यांचा उल्लेख नाही. काही आख्यायिका आणि गावाचे वर्णन याशिवाय या कैफियतीत महत्त्वाचे असे काही नाही.

**प्रारंभ :** श्री राम प्रसन्न. श्री हरिकोट चे कैफियत. पुर्वी श्री हरिकोट पटणांत पांडुरंगाचे देवळास तिनी घटिकाचे वाट अग्नीय भागी समुद्रांत कोडीकाना म्हणावयाचे जागा आहे. त्याची वृत्तांत काये म्हणालिया.

**शेवट :** प्रती वरुषी यतुमती होऊन्न बालेश्वरास जात असता तेथील लोक ह्या शंकाचे वस्त भाव करुन घालुन घेऊन्न घेताहेत म्हण. ह्या प्रांती कैस सोन्याची वस्ता करुन घेताहेत की.

## डी. नंबर २७५

**सातारा राजांचे कैफियत**
**SATARA RAJANCI KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १७"x ११'. २३ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर २२५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ७१४ वर ही कैफियत येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे; पण अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्हयोजना मोठ्या प्रमाणात आहे. डी. नंबर २२५ मध्ये वर्णिलेल्या कैफियतीचा हा एक भाग असावा असे वाटते. मराठ्यांचे मूळ व इतिहास यांच्या वर्णनापासून हिचा प्रारंभ होतो. मुळामध्ये मोगलांवर हल्ला करण्याच्या दृष्टीने सातारा ही मराठ्यांची दबा धरून बसण्याची जागा होती असे यात स्पष्ट केलेले आहे. शिवाजीचे जीवनही रेखीवपणे वर्णिलेले आहे. सातारा येथे किल्ला उभा करण्याबाबत सैदोजी होळकर हाच प्रमुख असल्याचे येथे नमूद केलेले आहे. मराठा गादीबद्दल राजाराम व सातारा यांच्यात झालेला संघर्ष अतिशय रेखीवपणे वर्णिलेला आहे. पेशव्यांच्या काळातील सातारा व पुणे येथील एकंदर स्थिती येथे सांगितलेली आहे. सातारा येथे राज्य केलेल्या भोसले घराण्यातील व्यक्तींची वंशावळही दिलेली आहे. काही

मराठा प्रमुख, बाळाजी, नाना फडणवीस आणि सवाई माधवराव यांची छोटी व्यक्तिचित्रे यात टिपलेली आहेत. अखेरीस असे सांगितले आहे की, पुण्याचे एक प्रौढ रहिवासी मॅक (Mack) देशपांडे यांच्याकडे प्रस्तुत कैफियत होती. कर्नल मॅकेंझी याच्या खास विनंतीवरून देशपांडे यांनी तिची नक्कल तयार केली आणि १२ एप्रिल १८०६ रोजी म्हैसूरला रवाना केली. 'रंगाप्पा' असा एक शब्द या कैफियतीच्या शेवटी आढळतो.

**प्रारंभ :** श्री सीवाजी गजे मलै. राजाराम राज्यांत होता. यानी मेले त्या आखीर - -२६ - - शेके पंदरास १५०० बहुधान्य संवछर सन १७०८ गौस आट सुर सत्र समैन तीसा मया पासुन बाबाजी भोंसले त्यांचे पुत्र मालोजी राज्य करीतात.

**शेवट :** देशपांडे पुने चे राज. बरी भीमराव याजकड होती. बहूत महीमत करुन - - संपादुन - - लिहीलीते बिकलम ईलाके हजरत मेजर माकींजीसो बहदूर सुपरअंडेंट आफ दी मैसुर सखी म्हणीजे जमीन माफी करणार.

### डी. नंबर २७६

**सदाशिवगड कैफियत**
**SADĀSIVA GADA KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १६"x ११". २३ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर २८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही कैफियत या भागाच्या पृ. १२६ वर सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सदाशिवगड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका किल्ल्याचे मूळ व इतिहास यांच्याशी ही निगडित आहे. विजापूरच्या सुलतानाकरवी रामचंद्र नाईक याचा झालेला पराभव व मृत्यू यांचा इतिहास थोडक्यात सांगितलेला आहे. रामचंद्र नाइकाचा पुत्र सदाशिव नाईक हा उत्तरेकडे पळाला आणि त्याने त्याच्या पाठीराख्यांच्या मदतीने काही शहरे व किल्ले उभे केले. सदाशिवगड हा यातील सर्वांत प्रमुख होता. इंदू सदाशिव नाइकाच्या काळात युरोपिअन लोकांनी इंदूवर चढाई केली. शेवटी त्यांच्यात एक तह झाला. राज्यविस्तार करण्यासाठी हैदर अलीने या इंदू सदाशिव नाइकावर हल्ला केला आणि त्याचा पराभव करून त्याचे सर्व किल्ले ताब्यात घेतले. मग सदाशिव नाईक याने ईस्ट इंडिया कंपनीशी करार करून सदाशिवगडाशिवाय इतर सर्व किल्ले पुन्हा ताब्यात घेतले. मराठा अधिकारी आणि टिपू यांच्या ताब्यात हा किल्ला क्रमाने होता. शेवटी ईस्ट इंडिया कंपनीने टिपूवर निर्णायक विजय मिळविला आणि दुसऱ्या म्हैसूरच्या लढाईत त्याचा मृत्यू झाल्यानंतर सदाशिवगड हा केवळ ईस्ट इंडिया कंपनीच्या मालकीचा झाला. शालिवाहन शकातच सर्व घटना-प्रसंगांच्या तारखा दिलेल्या आहेत. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ सांगितलेले नाही. सदाशिवगडाची भौगोलिक रचना दिलेली आहे.

**प्रारंभ :** कैफियत सदासिव गड. अनेगोंदी उर्फ विध्यानगर येथील राजे नरपती राजा मुवर रामराज याजकड षोंदे संवस्तानास रामचेंद्र नायेक होता. त्यास अली अदन षाह वगैरे यानी नरपती रामराजे यास मारुन बिज्यापुर षाहर हस्तगत करुन राहिले.

**शेवट :** सीधार्ती संवछर चैत्र मासी कुंपणी तालुक फौजा पटणांत यऊन लढाई होऊन टिपु सुलतान लढाईत षहीद जाहालावरी तमाम मुलुकांत तो सरदार नेमषाहे यानी येऊन सदासिव गडास मोर्चे दिलहे. किल्लेदार सैद हाजी नामे किल्लेदार होता. त्यान पांच च्यार रोज लढाई करुन आखेर कौलान उतरुना कील्ला. सरदार याचे स्वाधीन केला ते अमल ज्यारी आहे कलम.

### डी. नंबर २७७

**सिंदे कैफियत**
**SINDE KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १३"x ७". २१ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १२५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ६६ वर सुरू होणाऱ्या या कैफियतीतील हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी कागद जीर्ण व जुनेपणामुळे तपकिरी रंगाचे झालेले आहेत. शिंदे घराण्याचे मूळ व इतिहास यात सांगितलेला आहे. वरुणाबाईशी लग्न केलेल्या शिवाजी शिंदे यास राणोजी शिंदे हा पुत्र झाला. नंतर तो दुसऱ्या शाहू राजाचा विश्वासू सहकारी बनला. हा राणोजी म्हणजे बाजीरावाची पादत्राणे सांभाळणारा म्हणून नेमला गेला होता असे म्हणतात. जयाजी शिंदे, दत्ताजी शिंदे व आनंदराव शिंदे अशी या राणोजीस तीन अपत्ये होती. शके १६७८ या काळात बाजीरावासमवेत राणोजी शिंद्याने राज्यविस्तारासाठी लढाया केल्या. बाळाजी बाजीराव याचे पदग्रहण आणि राणोजी शिंद्याच्या मृत्यूबाबतची कारणीभूत स्थिती यांचे स्पष्टीकरण नंतर येते. शिंदे, होळकर व पवार यांच्या मदतीने बाळाजीने उदेपूर ताब्यात घेतले. दत्ताजी शिंदे व महादजी (Magadeyis) शिंदे यांच्या

जीवनचरित्राचा इतिहास थोडक्यात वर्णिलेला आहे. पानिपत व सोनपत येथील युद्धात मोगलांविरुद्ध जनकोजी शिंदे याने सदाशिवराव भाऊ व विश्वासराव यांना केलेली मदत फारच थोडक्यात वर्णिलेली आहे. शिंद्यांच्या अधिकारक्षेत्राची मर्यादा ठरविण्याबाबत ईस्ट इंडिया कंपनीने स्वीकारलेले धोरण यानंतर या कैफियतीत स्पष्ट केलेले आहे.

कर्नल मॅकेंझीच्या खास विनंतीवरून रघुनाथराव नावाच्या पुणे शहरातील एका अतिशय आदरणीय वृद्ध व्यक्तीकडून या कैफियतीसाठीची सर्व माहिती मिळवलेली आहे. शके १७२८ मध्ये ही कैफियत पुरी झालेली आहे. लेखक किंवा नक्कलकार यांच्या नावांचा उल्लेख नाही. शालिवाहन शकगणतीनुसार सर्व तारखा दिलेल्या आहेत. १० एप्रिल १८०६ रोजी ही कैफियत पुरी झालेली आहे.

**प्रारंभ :** कैफियत सींदया

पुर्वी दोनसिहे वरुषा पासुन पुनेस अग्नेय भागी तीस कोसावरी पलटणे प्रांती कासबे कणेसरे परगणे फालटणे यागावी बहुत दिवसापासुन सांवाजी सीध्या मरहटे जातीचा कृषीमुल कडुन जीवनोपावे करीत होता.

**शेवट :** मेकींजी साहेब बहदुर सुपरंडयाट आफ दी मैसुर सरवी म्हणजे श्रीरंगपटणच मुलुक जमीन माफणार बा तारीख छ १० माहे एप्रेल सन १८०६ इसवी दर जागा मोकाम पुना मुतसी मुलामुटा नदी संगमे पुर्नेत राजेश्री रघुनाथ राव सुखवासी ब्रह्मण जाणता माहातारा होता त्या कडुन कैफियत नीह कलुन घेऊन कुळंकुश लिहील असे सखे १७२८ शालीवाहन क्षेयनाम संवछर समाप्ती.

### डी. नंबर २७८

**सिल्लेदार इनाम कैफियत**
**SILLEDAR INAM KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १०"x ६". १७ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

या भागात फक्त हीच कैफियत आहे. १६४ पानांच्या या कैफियतीत मराठा राज्यकर्त्यांनी त्यांच्या हितचिंतकांना व विश्वासू अधिकाऱ्यांना दिलेल्या देणग्यांच्या नोंदी आहेत. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून प्रारंभी काही पृष्ठांवर फक्त एकाच बाजूस लेखन केलेले दिसते. कुण्या एका नारायणरावाच्या आज्ञेनुसार मुळावरून ही नक्कल तयार करण्यात आल्याचे पहिल्या पृष्ठावर इंग्रजी व तेलगू भाषेत लिहिलेले आढळते. कोण्या नीलकंठ महादेव पुरंदरे यास मराठा राज्यकर्त्यांनी दिलेल्या जहागिरीपासून देणग्यांच्या नोंदींचा प्रारंभ झालेला दिसतो. खेड्यांची नावे, त्यांचे तालुके, तसेच जहागिरीच्या जमिनीपासून मिळणारा नक्त महसूल यांचा उल्लेख केलेला आहे. रघुपंतराव नारायण राजबहाद्दुर, रघुनाथराव बळवंत, गणपतराव भिकाजी, चिंतामण हरी, चंद्रराव पवार आणि अमरसिंग जाधव या व्यक्तींना मोठ्या संख्येने खेडी जहागीर म्हणून देण्यात आलेली आहेत. पुणे येथे फसली १२०४ मध्ये हा फतवा जारी करण्यात आला. काही धर्मादाय संस्था व व्यक्ती यांना, अशा दिलेल्या जहागिरींशिवाय, काही खेड्यांतून नक्त रक्कम जमा करून देणगी म्हणून देण्यात आली. ती त्यांच्या निर्वाहासाठी दिलेली होती. शेवटच्या पृष्ठावर दोन ओळींमध्ये काही शब्द लिहिलेले आढळतात. या सनदेवर ती अमलात आणणाऱ्याची सही किंवा शासकीय शिक्का नाही.

**प्रारंभ :** यादी फौज सरंजामी सिलेदार सुहुरसन अर्बा मयातैन आलफ १२०४ फसली इनाम वगैरे. २४६५२७ ॥= ॥। नीलकंट माहादेव पुरंदरे

**शेवट :** २०३७०१/१ चंदरराव पवार याजकडे माहाल व गावचा मोकासाचा अमलपैकीं हिस्त.

### डी. नंबर २७९

**शिवाजी राजे व निजां मुलमुलुक**
**SIVAJI RAJE VA NIZAM UL MULK**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२" x ६". १३ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १४८ वर ही कैफियत येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. कागद योग्य तऱ्हेने रचलेले व बांधलेले नाहीत. या भागात दोनांहून जास्त ठिकाणी ही कैफियत येताना दिसते. पुणे येथे प्रस्थापना झालेल्या मराठ्यांच्या इतिहासाचा तपशील यात पूर्णपणे चित्रित झालेला दिसतो. सवाई माधवरावाने पुण्याच्या जुन्या राज्यकर्त्यांच्या इतिहासाविषयी पृच्छा केल्यावरून तो लेखकाने आनंद (Annand) संवत्सरात सांगितला आहे. शिवाजी महादेवराव व सदाशिवराव भाऊ यांनी सैन्यासह हल्ला करून कोल्हापूरला मोगलांचा केलेला पराभव यात वर्णिला आहे.

शिवाजी हा मराठ्यांचा मान्य नेता कसा झाला आणि त्याने मोगलांशी केलेला संघर्ष यांचे लेखकाने वर्णन केले आहे.

शिवाजीचा मृत्यू, त्यानंतर संभाजीचे राज्यारोहण, त्याचा पराभव, कैद, चौकशी आणि शेवटी औरंगजेबाकडून झालेला त्याचा शिरच्छेद यांचे अतिशय रेखीव वर्णन केलेले आहे. शाहूची सुटका, महाराष्ट्रात सुरू झालेले वारसायुद्ध आणि पेशव्यांचा उदय हा त्यानंतरच्या काही पृष्ठांचा वर्ण्य विषय आहे. विश्वनाथराव, बाजीराव, बाळाजी बाजीराव, चिमाजी अप्पा यांनी बजाविलेल्या भूमिकांचेही विवेचन केलेले आहे. शिवाजीच्या काळापासून मराठ्यांच्या इतिहासाचे समालोचन करणारे हे सारे लेखन इतिहासदृष्ट्या विशेष महत्त्वाचे आहे. लढाया, पराभव, विजय, किल्ले जिंकणे व सोडणे यांसारख्या घटनांना शालिवाहन शकाच्या तारखा दिलेल्या आहेत. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ या ऐतिहासिक कैफियतीत दिलेले नाही.

**प्रारंभ :** कैफियत सिवाजी राजा नीजांमुलक. श्रीमंत सवाई माधव राव बहदुर यांस जाहीर होर्णेस्तव नारो मंत्री वगैरे लिहुन गुजरावीलर्ते आनंद नाम संवस्छर श्रीमंत माहाराज शिवाजी राजे पादषाइ पुर्ढे होऊन फौज षुमार जमायत करून तमाम मुलकांत प्रसीध जाहले.

**शेवट :** x x प्रख्यात त्या मगस्तीने ऐसे हरामखोरी करीती काये चिंता आहे तुमची तैनात ऐसी हजार फौजदार कारीक करुन देतो लाखो फौजाच भर्ती जाहला म्हणजे त्याच हमजीर वाणे अगाध नाही ऐसे म्हणुन आज्ञा करुन घरीस निरोप दिलहे.

## डी. नंबर २८०

### शिवाजी राजे व निजां मुलमुलुक
### ŚIVĀJI RAJE VA NIZĀM UL MULK

**कागद :** इंग्लिश बनावट. १२" x ६". १५ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील रचना आहेत.

या भागाच्या पृ. १५ वर ही कैफियत सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व सुवाच्य असून पाहिली काही पृष्ठे गहाळ झालेली आहेत. शिवाय या भागातील पृष्ठेही व्यवस्थित क्रमाने रचलेली नाहीत. निजाम-उल-मुल्काच्या विरोधात सदाशिवराव भाऊ व चिमाजी अप्पा यांनी केलेल्या मोहिमांच्या स्पष्टीकरणापासून या कैफियतीचा प्रारंभ होतो. दोन्ही बाजूंच्या सैन्यांची आगेकूच, वेढे, लढलेली युद्धे आणि त्यांचे शेवट हे सर्व विस्ताराने व स्पष्टपणे मांडलेले आहे. बाजीराव पेशव्यांनी त्यांच्या दरबारात राखलेले अहवाल यांचा आधार काही प्रकरणांना आहे. रामचंद्र शेणवी, रघोजी भोसले, महादजी शिंदे, मुरारराव घोरपडे आणि असेच काही मोगल सेनाप्रमुख यांच्या चरित्रांचे लेखन यात यानंतर येते. बाजीरावाने कर्नाटकात व दक्षिणेकडे केलेल्या स्वाऱ्या हा पुढील काही पानांचा विषय आहे. महत्त्वाची ठिकाणे, पवित्र जागा व मंदिरे अशांना या स्वारीदरम्यान बाजीरावाने भेटी दिल्या. त्यांची नावे व विशेषतः तिरुपतीचे वेंकटेश्वर मंदिर, वेंकटगिरी, वेलोर, अर्काट, त्रिचनापल्ली आणि तिनेवेल्ली यांचे उल्लेख केलेले आहेत. बाजीरावाने तिरुपतीच्या वेंकटेश्वरस्वामी मंदिरास भारी किमतीचे जडजवाहीर अर्पण केले; तसेच वेंकटेश्वरस्वामींच्या वार्षिक उत्सवातील एका दिवसाच्या खर्चाकरिता देणगीची व्यवस्थाही केली.

शेवटच्या काही पानांत शाहू, बाजीराव आणि चिमाजी अप्पा यांच्या मृत्यूसारख्या घरगुती प्रसंगांचा निर्देश केलेला आहे. निजाम-उल-मुल्काशी सदाशिवराव भाऊ व नानाराव यांनी केलेली युद्धे, तसेच नाझर जंग याच्याशी केलेली युद्धे यात उल्लेखिली आहेत. या कैफियतीत इतिहासदृष्ट्या महत्त्वाची, पण अप्रकाशित अशी पुष्कळच माहिती आहे. ही कैफियत अपूर्ण असल्यामुळे लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिसत नाही. काही महत्त्वाच्या घटना-प्रसंगांना शालिवाहन शकाच्या तारखा दिलेल्या आहेत.

**प्रारंभ :** कैफियत सिवाजी राजा व निजां मुलमुलक, फौज निसी व दादाजी सीलके पंध्रा हजार फौजे व नारायण राव मोहीतेचे दाहा हजार फौज श्रीपतीराव प्रतीनीधी यांचे भाऊ हुजुरचा पायेगाद आणि कित्येक फौज एकुन पंचेवीस हजार व बाजीराव चिमाजीअपा यांचे पंचेवीस हजार फौज एकुन लाखो फौज ऐसी जीमाव करुन या सर्वत्रास महाराजानी बोलीले की.

**शेवट :** तेथ बसुन आपल फोजेस तमाम बोलाऊन पाटऊन सिंदे होलकर आधी करुन जातां जातां दोनी अडीच लाख फौज जमा करीत गेलें.

## डी. नंबर २८१

### सुभे बिजापुर शहर व बातशाचे कैफियत
### SUBHE BIJĀPŪR ŚAHAR VA BĀDUSĀCI KAIFIYAT

**कागद :** इंग्लिश बनावट. ८" x ६" १३ ओळी, मोडी, खराब, पूर्ण.

डी. नंबर ६६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पहिल्या पानावर ही कैफियत सुरू होत असून

हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. विजापूर व देवगिरी यांचे मूळ स्पष्ट करणारी एका ऋषीने दिलेली उत्तरे, त्यासाठी त्याच्या शिष्यांनी विचारलेले प्रश्न असे या कैफियतीच्या लेखनाचे स्वरूप आहे. ही दोन्ही नगरे आठवणींच्याही पलीकडच्या काळापासून भिन्न नावांनी आणि भिन्न राजघराण्यांच्या आधिपत्याखाली अस्तित्वात आली. मराठा राज्यकर्त्यांच्या काळापासूनची त्यांच्याबद्दलची माहिती या कैफियतीच्या लेखकाने मोठ्या रेखीवपणे दिलेली आहे. या दोन्ही ठिकाणचे मूळचे रहिवासी म्हणजे मराठा शेतकरी व धनगर लोक होत. या ठिकाणांची भौगोलिक रचना स्पष्ट करण्यात आलेली आहे. विजापूर व देवगिरी येथील किल्ले बांधण्यात एक धनगर रामोजी गायकवाड हा कसा सूत्रधार होता हे यात स्पष्ट केलेले आहे. गायकवाड घराण्याचा एक संक्षिप्त इतिहास इथे सादर केलेला आहे. मोडी लिपीचा जनक हेमाड पंडित याचे जीवनचरित्र आणि मुलकी व लष्करी कामे करण्यात त्याने गायकवाडांना कशी मदत केली हे थोडक्यात सांगितले आहे. अरब, तुर्क व मोगल यांच्या स्वाऱ्या व राजांची नावे दिलेली असून शालिवाहन कालगणनेनुसार काळही नोंदलेला आहे. विजापूर व देवगिरी या शहरांनजीक असलेल्या गावांची जुनी हिंदू नावे आणि नंतर मोगलांनी त्यांची बदलून ठेवलेली नावे दिलेली आहेत. तीर्थयात्रेची व पवित्र ठिकाणे नंतर दिलेली आहेत.

मंदिरे बांधलेल्या आणि त्यासाठी देणग्या दिलेल्या राजांच्या नावांचा उल्लेख यात आहे. त्या मंदिरांत सापडलेल्या काही शिलालेखांचाही उल्लेख केलेला आहे. काही ठिकाणी असलेल्या पवित्र स्थानांना भेटी देण्यासाठीचे डोंगरचढणीचे काही मार्ग यात नोंदलेले आहेत. यात लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नसले, तरी विजापूरच्या दोन अतिशय वृद्ध व आदरणीय असलेल्या केशव भट व रामोजी या रहिवाशांकडून ही सर्व माहिती मिळालेली असल्याचे नमूद केलेले आहे. ही कैफियत कर्नल मॅकेंझी याच्या खास विनंतीवरून तयार केली गेली आणि ती २५ फेब्रुवारी १८०६ रोजी औरंगाबाद येथे नारायणराव याने नकलून पुरी केली असेही नमूद केलेले आहे.

**प्रारंभ :** दखणी बादशा शहर बीज्यापुर यांची वंशावळी व शहर मारची अवरस व सवरस व बुरुण व कंगोरा व दरवाजे व तटे व पुरज्यांत व बाजार हाय किल्ले आधारोन व बाहेरुन व बेरीज व दक्षण साडेसा ६ ॥ सुभेची गोषवारा व हिंदुस्थान १६ सौला सुभेची नावनिसी व जमीन गुमट अवलीयाचे शाहरे बीज्यापुरी वही १.

**शेवट :** गुष म्हणजें या मुलुकांत ज्यातीचे शुध्र त्यानी ईश्वररास पुजा करीताहेत. त्यास गुरा म्हणतात. आणि त्यानी जानवही घालीतात. बा तारीख २५ माहे फरवरी सन १८०६ जागा अवरंगाबाद नारायण राव मुतसही. इलाके मेजर कलनल माकींजी साहेब बहदुर सुपरंडेंट आफ दी मैसुर सरवीज.

## डी. नंबर २८२

**सुभे बिजापुर व बादशहा सरकार तपशील**
**SUBHE BIJĀPUR VA BĀDUSĀ SARKĀR TAPSÍL**

डी. नंबर ६६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १६७ वर सुरू होणाऱ्या या कैफियतीची पृष्ठे खराब व सुट्या अवस्थेत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पहिल्या काही पृष्ठांत रामायणातील काही प्रसंग वर्णिलेले आहेत. विजापूर, देवगिरी आणि दौलताबाद ही शहरे वेगवेगळ्या नावांनी इतिहासपूर्व काळापासून अस्तित्वात होती असे यात सांगितलेले आहे. ती नावेही दिलेली आहेत. हिंदू राजे व त्यांचा काळ कालानुक्रमाने दिला आहे. सुलतानांकडून जिंकले जाण्याआधीचा विजापूरचा हिंदू राजा म्हणून रामदेव गायकवाड या नावाची नोंद केलेली आहे. सुलतान निझामशहा याने त्याचा पराभव केला. सुलतानांची वंशावळ आणि त्यांचा राज्यकारभाराचा काळ यात दिलेला आहे. विजापूर व देवगिरी या शहरांची भौगोलिक रचना, तेथील मंदिरे व तीर्थस्थाने, तिथे ज्यांनी बांधकामे केली व देणग्या दिल्या त्या हिंदू राजांची नावे, तसेच त्यांनी काही मंदिरांतील दगडी भिंतींवर कोरलेले शिलालेख यांची नोंदही यात केलेली आहे.

विजापूरच्या तुघलख (Thokalak) बादशहा सुलतानापासून ते शेवटच्या महमदशा बादशहा सुलतानापर्यंतचा त्यांचा राज्यकारभार व राज्यविस्तार यांसह इतिहास दिलेला आहे. ही दोन्ही ठिकाणे मराठ्यांनी काही काळ ताब्यात घेतली आणि त्यांना मराठा संघराज्यास जोडण्याचे काम सदाशिवराव भाऊंच्या काळात पुरे झाले.

विजापूरचे रहिवासी असलेले कुलकर्णी खंडोजी अप्पा व भीमाभट्ट या दोन वृद्धांकडून यासंबंधीची माहिती मिळालेली आहे. कर्नल मॅकेंझी याच्या विशेष विनंतीवरून ही कैफियत २५ फेब्रुवारी १८०६ रोजी औरंगाबाद येथे लिहिली गेली.

**प्रारंभ :** पुर्वी कृतयुगांती दंडकारण्ये क्षेत्री रामचेंद्र स्वामीस व दश शिरस रावणासूर राक्षसास युत्तचा प्रसंग घडला तेव्हा रावणान

लक्ष्मण स्वामीस एक वीरा नामक अयुत्धयुत्क असणेचा बारंची नामे आयुध घेउन प्रयोण केला.

**शेवट** : तयार केली. ते बीकलम इलार्के मेजर कलनल मेकेजी साहेब बहदुर सुपर अंडयांट आफ दि मैसुर सर्वी पैमायष साज मुलुक श्रीरंगपटण वगैरे बा तारीख छ १९ माहे पेब्रवरी सन १८०६ इसवी दर जागा अवरंगाबाद मुकामाहुन लिहलि असें शके १७२७ क्रोधन संवछर.

## डी. नंबर २८३

### सूर्ये वंशातील राजांची कैफियत
### SŪRYA VAMSĀNTILA RĀJĀNCI KAIFIYAT

**कागद** : इंग्लिश बनावट. २०" x १२". २९ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ६९५ वर येणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी त्यात अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्हयोजना मोठ्या प्रमाणात आहे. सूर्यकुलातील हिंदू राजांचा इतिहास सांगणाऱ्या मोठ्या दस्तऐवजातील हा एक नकललेला भाग असावा. सूर्यकुलातील राजांशी ही कैफियत निगडित आहे असे म्हटलेले असले तरी रामायण व महाभारत यांतील पुराणकथा यात मोठ्या प्रमाणात समाविष्ट केलेल्या आहेत. हरिश्चंद्रासारख्या इतिहासपूर्व कालातील सूर्यकुलवंशीय हिंदू राजाचे मूळ यात स्पष्ट केलेले आहे. एखाद्या राक्षसाला ठार मारणे किंवा राजाने संन्यासी होणे अशा दंतकथा अगदी रंगवून सांगितलेल्या आहेत. शेवटच्या काही पानांत शालिवाहन व विक्रमादित्य यांचा इतिहास थोडक्यात सांगितलेला आहे. चोळ, पांड्य, चेर यांचा इतिहास आणि राज्यकारभाराच्या काळात त्यांनी केलेली काही गौरवशाली कृत्ये थोडक्यात वर्णिलेली आहेत. जरी ही कैफियत आकाराने मोठी असली तरी त्यात ऐतिहासिक माहिती फारच थोडी आहे. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ स्पष्ट केलेले नाही. काही राजांचे आयुर्मान सांगताना शालिवाहन कालगणनेचा अवलंब केलेला आहे. कैफियतीच्या शेवटी नक्कलकाराची सही आढळते.

**प्रारंभ** : श्री गुरुभ्यो नमः श्री गणेशाय नमः चोळ राजांची कथा. श्री पहिलें कथां आरंभ बखर तंजाऊर माहात्म्य चोळ देशाचा.

**शेवट** : मार्गळी मास तेदी १० बुधवारी संपले असे कळपाहिजे हे लिहीलते वेंकाजी अर्के यानी व्हा मधे काही काना मात्रा चुकल असल्यां क्षेमा करुन वाचील पाहीजें हे वही वेंकाजी अको यांच. अस कळ पाहिजें सेवेसी श्रुत होये. श्रीकृष्णार्पणमस्तु.

## डी. नंबर २८४

### सुरापुर संस्थानाची व गुट्टी संस्थानाची तपशील
### SURĀPŪR SAMSTĀNĀCI VA GUTTI SAMSTĀNĀCI (RĀJĀNCI) TAPSIL

**कागद** : फ्रेंच बनावट. ८" x ८". १२ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

या भागात फक्त हीच एक रचना आहे.

हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून काही कागदांवर चुकीचे क्रमांक टाकलेले आहेत. काहींवर ते अधिक खराब होऊ नयेत म्हणून कागदाचे तुकडे चिकटविलेले आहेत. कर्नल मॅकेंझी याच्या सूचनेवरून ही कैफियत नकलविण्यात आलेली असून नक्कल करण्याचे काम त्याचा एक कारकून वेंकटराव याने केलेले आहे. हे काम पुरे करण्याचे वर्ष १८२० असे दिलेले असले तरी महिना व तारीख दिलेली नाहीत. सुरापुर व गुटी या दोन संस्थानांचे मूळ व इतिहास ही या कैफियतीत विशद केलेली आहेत. कुणी वीर नंबी नाईक हा या दोन्ही ठिकाणांचा संस्थापक होता. मुळात विष्णुकांची येथे राहणाऱ्या वीर नंबी नाईक या प्रतिष्ठित गृहस्थाने प्रथम शिवकांचीस स्थलांतर केले, कृष्णेच्या तीरावर बस्तान बसविले आणि तुंगभद्रेच्या तीरापर्यंत आपले अधिकारक्षेत्र वाढविले. या नाइकाची वंशावळ नंतर यात दिलेली आहे. विजापूरच्या सुलतानाचा एक मांडलिक हूलिगलचा नबाब याने जोराचा हल्ला करून ही दोन्ही शहरे ताब्यात घेतली. विजापूरच्या सुलतानाचा ऱ्हास, मराठ्यांचा उदय आणि ही दोन शहरे मराठ्यांनी कशी ताब्यात घेतली यांचा मोठा रेखीव वृत्तान्त पुढे दिलेला आहे.

कैफियतीच्या उत्तरार्धातील मोठा भाग पेशव्यांच्या काळातील इतिहासाशी संबंधित आहे. पेशवे सवाई माधवराव आणि नाना फडणवीस यांनी गुटीस दिलेली भेटही सांगितलेली आहे. सवाई माधवरावांनी या इलाख्यावर राज्य करण्यासाठी नेमलेल्या लिंगाप्पा नाईक व चोक्कप्पा नाईक या दोघांचा कैफियतीत निर्देश केलेला आहे. या दोन्ही जागांची भौगोलिक रचनाही स्पष्ट केलेली आहे. या दोन भागांतील खेड्यांची आणि जमीनदारांची नावे दिलेली आहेत. शेवटच्या काही पानांत मोफत भेट म्हणून नाईक राजांनी व मराठ्यांनी ज्यांना जमीन दिली त्यांची

नावे दिलेली आहेत. महत्त्वाच्या घटना-प्रसंगांना शालिवाहन शकातील तारखा दिलेल्या आहेत. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही. या कैफियतीत फक्त नाईक राजांबाबतच्याच नव्हे, तर पेशव्यांशी संबंधित अशा ऐतिहासिक घटना नोंदलेल्या आहेत.

**प्रारंभ :** कैफियत प्रारंभ पुर्वी वालमीकी रुषीयाचे अनवयें मधे राम... गुह रुषी यांचे वंशांत पेरमाल नायड याचे अनवयें मधे कोणी एक राजा याचें वंशींत सुरापुर संमस्थान व गुतु गुटी समस्थानासी मुल पुरुष नंबर १ विरंबा नाईक.

**शेवट :** चांगले ब्रांह्मण संतर्पण वगैरे करीत आहे. दे बात सरकार सम्स्थाना कडुन वरुशासन करून दिलहे. आणि आपले दरगी होऊन काही घालुन संपुर्ण उछव मोदकरीत आहे. पुजा दुरंदर परमनिष्टाने चालता अहे. सदरहु समस्थानाचे कैफियत संपुर्ण जाहले सन १८२० इसवी ५.

## डी. नंबर २८५

**सोंडूर घोरपडे कैफियत**
**SONDUR GHORPADE KAIFIYAT**

**कागद :** देशी बनावट. ८" x ६". १५ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

या भागात मोडी लिपीतील दोन मराठी कैफियती असून इतर तेलगू दस्तऐवज आहेत. या भागाच्या पृ.८४ वर ही सुरू होत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. देशी हातकागदावर भारतीय बनावटीच्या शाईने ती लिहिलेली आहे. सोंडूर व तेथील मराठा राज्यकर्ते यांचे मूळ व इतिहास हा या कैफियतीचा विषय आहे. विजापूरच्या सुलतानाच्या सेवेतील एक सेनाधिकारी मालोजीराव घोरपडे याच्या वंशजांची नामावली यात प्रारंभीच दिलेली आहे. त्याचे तीन पुत्र संभाजी, भिर्जी (की बहिर्जी ?) व मालोजी यांनी शिवाजी महाराजांचा नातू शाहू याच्या सेनेतील चाकरी पत्करली. परिस्थिती व ईश्वरी कृपा यांची बहिर्जीला असलेली मदत, त्यामुळे त्याला मिळालेले एक बहुमोल शिवलिंग, तसेच सापडलेले मोठे गुप्त धन यामुळे त्याने स्वतःचे उभारलेले लष्कर यांचे प्रस्तुत कैफियतीत वर्णन आलेले आहे. सोंडूर संस्थानाचा संस्थापक मुरारराव घोरपडे या आपल्या पुत्रासह संताजी घोरपडे याने केलेला क्षेत्रविस्तार नंतरच्या काही पृष्ठांत मांडलेला आहे. मुरारराव व त्याचे वंशज यांचा इतिहास, हैदर व टिपू यांची स्वारी आणि सोंडूर गमावण्याची वेळ कशी आली आणि मग सवाई माधवरावाच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी ते परत ताब्यात कसे घेतले या सर्वांचा संक्षिप्त वृत्तान्त यात आलेला आहे. नाना फडणवीस व सदाशिवराव भाऊ यांच्या भूमिकांचा उल्लेख केलेला आहे. दुसऱ्या इंग्रज-मराठे युद्धाच्या काळात सोंडूरचा इलाखा ईस्ट इंडिया कंपनीने जिंकला. वसईच्या तहानुसार सोंडूरचा किल्ला मुरारराव घोरपडे याचा दत्तक पुत्र शिवराव घोरपडे याला परत देण्यात आला. सोंडूर व गुटी यांची भौगोलिक रचना, तेथील मंदिरे व पवित्र वास्तू आणि अशीच पुरातन स्थळे इथे दिलेली आहेत. रामप्पा नाईक यास सोंडूरच्या मराठा राजाने बक्षीस म्हणून दिलेल्या जहागिरीबद्दल तेलगू लिपीत लिहिलेला मराठी शिलालेख मंदिराच्या दगडी भिंतीवर आहे, तो या हस्तलिखिताच्या चौथ्या पानावर दिसतो. कर्नल मॅकेंझीच्या हाताखाली पैमायष अधिकारी असलेल्या वॉड्बी साहेबाचा दुय्यम साहाय्यक असलेल्या नारायणरावाने ही नक्कल तयार केलेली आहे. ती ८ डिसेंबर १८०९ रोजी पूर्ण झाली. या हस्तलिखितातील अनेक घटना-प्रसंगांबाबत शालिवाहन शकाच्या तारखा दिलेल्या आहेत. लेखकाचे नाव वा माहितीचे मूळ यात दिलेले नाही.

**प्रारंभ :** मुखही, घोरफडे याचे मुल पुरुष मालोजी रावयाचे पोटी १ वडील संताजीराव १ दुसरे बहीरजी राव १ तीसरे मालोजीराव.

**शेवट :** बस्तुर नारायेण राव मुतसही मुतैन मेस्तर वारलीस सो अशिष्टेंट पैमाईष सरदार इलाके मेजर कलनल मकींजी सो बातारीख ८ माहे डीशेंबर सन १८०७ इसवी.

## डी. नंबर २८६

**सोनाई**
**SONAYI**

**कागद :** इंग्लिश बनावट. ८" x ६". १३ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ४६ वर सुरू होणाऱ्या या कैफियतीची पाने तळाशी व उजव्या समासाच्या कडेशी खराब झालेल्या अवस्थेत आहेत. हस्ताक्षर बऱ्यापैकी वाच्य असले तरी पृष्ठांना नीटपणे क्रमांक दिलेले नाहीत. सोनाई नदीच्या तीरावरील सोनाई व चिंचोली या दोन ठिकाणांचे मूळ व इतिहास यात वर्णिला आहे. आख्यायिकेनेच निवेदनाचा प्रारंभ होतो. मुळात जंगलमय प्रदेश

असलेल्या या ठिकाणी सोनाई नावाचा ऋषी वास्तव्य करून होता, म्हणून ती नदी व तीरावरील गाव यांना सोनाई म्हटले गेले. या दोन्ही ठिकाणांची भौगोलिक रचना थोडक्यात दिलेली आहे. तेथील मंदिरांची नावे, लोकसंख्या अशा स्थानिक महत्त्वाचे तपशील दिलेले आहेत. बाबूजी अमील या जहागीरदाराने जहागिरीत किल्ला बांधला. तो नंतर दौलतराव शिंदे याने आपल्या ताब्यात घेतला. या कैफियतीत घटनांच्या तारखा, लेखकाचे नाव वगैरे तपशील सांगितलेला नसला तरी यात नोंदलेली माहिती सोनाईचा कुलकर्णी दामाजी या वृद्ध रहिवाशाकडून मिळाली असल्याचे सांगितले आहे.

**प्रारंभ :** छ १८ मुकाम सोनाईच कैफियत. पुर्वि द्वापरांती कलियुग प्रारंभी सोनाई रुषी यांनी दंडकारण्ये क्षेत्रास भुमी संच्यार करीत करीत या वनास आले.

**शेवट :** ऐस तेथील वर्तमान कुलकरणी दामाजी या कडुन लिहिली आहे कलम.

## डी. नंबर २८७

**सृष्टीक्रम राजे (भोसले)**
**SRSTIKRAMA RAJE BOṈSALE**

कागद : इंग्लिश बनावट. ८" x ६". ९ ओळी. मोडी. खराब. पूर्ण.

डी. नंबर ६६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १६७ वर सुरू होणाऱ्या या कैफियतीची पृष्ठे सुट्या अवस्थेत असून पानकिड्यांनी कुरतडल्यामुळे त्यांना छिद्रे पडलेली आहेत; तसेच हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी काही थोड्या ठिकाणी दोन ओळींमध्ये शब्दलेखन केलेले आहे. या कैफियतीच्या पहिल्या भागात दंतकथा आणि घटना यांचे एकत्रीकरण केलेले दिसते. चौथ्या कलियुगातील शालिवाहनापर्यंतचे तीन युगांतील राजे आणि शहरे यांच्याबद्दल आख्यायिकापर लेखन केलेले आहे. श्री महाविष्णू याचे अनेक अवतार आणि विश्वाचा बचाव करण्यासाठी त्याने वध केलेल्यांच्या नावांची यादी सादर केलेली आहे. हिंदू राजांची नावे आणि मोगलांकरवी पराभव होईपर्यंतचा त्यांच्या राज्यकारभाराचा काळ हा दुसऱ्या भागाचा वर्ण्य विषय आहे. शेवटच्या भागात भोसले आणि इतर मराठा घराण्यांची माहिती आलेली आहे. शिवाजीचा जन्म, औरंगजेबाशी झालेल्या युद्धातून प्रकट झालेला त्याचा पराक्रम, रायगड येथे त्याला झालेला राज्याभिषेक आणि त्याने मराठा संघराज्याची केलेली स्थापना यांचे थोडक्यात वर्णन यात आलेले आहे. रामरायाच्या पतनापर्यंतच्या विजयनगरच्या राजांचा इतिहासही यात उल्लेखिला आहे. शिवकालातील संतांची नावे कैफियतीच्या शेवटच्या भागात येतात. पुण्याच्या बुधवार पेठेत राहणाऱ्या रामानंद बाबा या ब्राह्मणाकडे असलेल्या मूळ दस्तऐवजावरून कर्नल मॅकेंझीच्या सूचनेनुसार ही कैफियत नकलली गेली आणि १० मे १८०६ रोजी ती त्याच्याकडे पाठविण्यात आली.

**प्रारंभ :** आदि श्रीष्टीक्रमा पासुन आजी परीयेंत येथानुक्रम जाला तो आत्यादरें करून शेवेसी विहीत करावां म्हणौन इछा जाहाली. त्यावरुन शेवेसी विनंती लिहीली दिली असें.

**शेवट :** मुनसीब जाणुन त्याची नकल लेहुन सिर्दे केलि असें बिकलम इलाके हजरत मेजर मेकेंजी साहेब सुपरंअड्यांट आफ दी मैसुर सरवी म्हणीजे श्रीरंगपटणाचे मुलुक जमीन पैमाईष करणार बा तारीख छ १० माहे मे मास सन २५०६ इसवी मुकाम दर जागा मुला मुटां नदी संगम मुतबारुलहार उरुफ पुना.

## डी. नंबर २८८

**सैयद याकुफ मधरे चेन्नपटण कैफियत**
**SAIYAD YĀKŪF MADHURAI CENNAPATNA KAIFIYAT**

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ९५ वर सुरू होणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सय्यद याकूबचे जीवनचरित्र, तसेच त्याचा व त्याच्या पूर्वजांचा इतिहास यात वर्णिलेला आहे. याकूबचा आजोबा सय्यद अब्दुल हाई हा दीर्घ काळपर्यंत विजापूरला राहत होता. औरंगजेबाने विजापूरच्या सुलतानावर स्वारी केली त्या काळात आपल्या पाच पुत्रांसह अब्दुल हाई हा दिलवरखान राज्य करीत असलेल्या बसवपट्टण येथे गेला. त्याचा मोठा मुलगा फकीर झाला. त्याने केलेले चमत्कार यात वर्णिलेले आहेत. म्हैसूरच्या हैदर अलीने असरफशहा या प्रस्तुत फकिरास आपल्या राज्यात पाचारण केले आणि त्याचा ज्येष्ठ पुत्र सय्यद याकूब यास सैन्यात अधिकारी नेमले. हा सय्यद याकूब टिपूच्या काळात महत्त्वास आला. कोणत्या परिस्थितीत या सय्यद याकूबला टिपू सुलतानाने म्हैसूरहून कायमचे बाहेर जाण्यास फर्मावले त्याविषयीचा वृत्तान्त यात सांगितला आहे. त्यानंतर सय्यद याकूब मद्रासला आला आणि काही काळपर्यंत मैलापूर

येथे राहिला. पुढे तो ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याधिकाऱ्यास भेटला आणि टिपूचा पराभव करण्यात त्याने त्यास मदत केली. म्हणून लॉर्ड वॉलिस व याकूब यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली मोठ्या सैन्याने हल्ला करून श्रीरंगपट्टणास वेढा घातला. या सय्यदने दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कमजोर जागांमुळे ईस्ट इंडिया कंपनीचे सैन्य टिपूचा पराभव करू शकले आणि श्रीरंगपट्टणाचा ताबा घेऊ शकले. कृतज्ञता म्हणून कंपनीकडून याकूबला एक छोटीशी जहागीर मंजूर झाली.

लेखकाचे वा नक्कलकाराचे नाव किंवा यातील घटना प्रसंगांच्या तारखा किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही. अखेरीस असे सांगितले आहे की, काही सनदांवरून प्रस्तुत कैफियत तयार करण्यात आलेली आहे.

**प्रारंभ :** पुर्वी दीडसहे १५० वरुषाखाले उतर दिसेस दिल्लीचे पादषाईत करणार आदमगीर बादषाह उर्फ अवरंगजेब बादषहाचे आयमांत या सैयद याकुब याचे पणजे सैयद अबदुल है म्हणार सैद-जातींचा विजापुरी षहरांत षरदार जीदिगी नीसि अनेक दिवस फकीरीनीस सुखरुप असता.

**शेवट :** ऐसेच करारनामा आहें करीतां बंगलास जाऊन दोनी वरुषे जाहलें. अद्यापी आला नाही वरकड मजमुन करारनामेंत दरज केल आहें. त्याज वरून दर येकासहीं जाहीर होईल यैसा याचे कैफियत जुबानी सांगीतल प्रमाणें कलमीत आला आहे. वरकड सनदावरी मौकुफ केले आहे कळावें.

## डी. नंबर २८९

### हरनाहली तालुका कैफियत
### HARANAHALLI TALUK KAIFIYAT

**कागद :** इंग्लिश बनावट. १२" x ६". १६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ७२ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ७४ वर येणाऱ्या या कैफियतीतील अक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी पृष्ठे तपकिरी व जीर्ण झालेली आहेत. म्हैसूर संस्थानातील हमहल्ली (हरनहल्ली) या गावाचे मूळ व इतिहास यांच्याशी ही कैफियत निगडित आहे. प्रारंभी रामायण व महाभारत यांच्यातील प्रसंग सांगितले आहेत. काही राजघराण्यांतील राजांची नावे यात दिलेली आहेत. यात उल्लेखिलेले पहिले ऐतिहासिक नाव म्हणजे विजयनगर घराण्यातील सोमेश्वरराजा. त्याने रूपगिरी पर्वतास भेट दिली असता तेथे त्याला जुने जनार्दनस्वामींचे मंदिर सापडले. त्याने त्याच्या बांधकामात दुरुस्त्या करून त्यास नवे रूप दिले आणि तेथे एक गाव वसविले. हेच गाव हमहल्ली म्हणून नंतर ओळखले गेले. ब्रह्मपुरी या दुसऱ्या एका गावाची निर्मितीही या सोमेश्वराच्या नावावरच मोडते. आणि हे सर्व गाव ब्राह्मणांना दान दिल्याची सनदही यात उल्लेखिलेली आहे. हमहल्ली येथे राज्य केलेल्या या सोमेश्वराच्या वंशजांच्या नावांची यादी दिलेली असून त्यांचे राज्यारोहण व मृत्यू यांच्या तारखा शालिवाहन शकात दिलेल्या आहेत. कृष्णराजाने हे ठिकाण विजयनगरच्या राज्यास जोडले. याच्या काळात नरसिंह राजाने नाठाळ पाळेगारांना पायबंद घालून नियंत्रणाखाली आणले. यानंतर ही दोन्ही ठिकाणे म्हैसूरच्या हैदर अलीने जिंकली आणि टिपू सुलतानाच्या श्रीरंगपट्टण येथील पाडावानंतर ही गावे ईस्ट इंडिया कंपनीच्या मालकीची झाली. लेखकाचे नाव, नक्कलकाराचे नाव किंवा यातील माहितीचे मूळही यात दिलेले नाही.

**प्रारंभ :** नैमशारंण्ये वैसीक चेंद्रद्रोण पर्वतास पुर्वभाग अमरगिरी वासीक वसीष्ट रुषी यानी जेनार्धन मुर्तीच आराधना करीत असतां श्री रामचंद्र स्वामी यानी पित्र वाक्ये परीपालनार्थ पटाभीषेक सोडुन सीता लक्षमण समेत आयोध्या पटणाहुन पंचवटी तीरास आले असतां.

**शेवट :** तदनंतर सिध्याथी संवछर चैत्र वद्य अमावशया दिवसी इंग्रजे बहदुर यानी श्रीरंगपटण घतीला करीतां मैसुर सिव्हासनारूढ कृष्णराज वडयार यांच हवाला होऊन चालत येत आहें. शालीवाहन शके १७२६ प्रवर्तमान रत्काक्षी संवछर.

## डी. नंबर २९०

### हासन गंगु बाईमाम
### HASANGANGU BOI IMAM

**कागद :** इंग्लिश बनावट. १२" x६". १७ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २७४ वर सुरू होणाऱ्या या कैफियतीतील हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. एका सलग अशा रचनेचा हा तुटलेला भाग असावा असे वाटते. मात्र यातील पहिली बत्तीस पाने गहाळ झालेली आहेत. शिवाय पृष्ठे नीट रचलेली वा बांधलेली नाहीत. पहिली चार प्रकरणे सलगपणे लिहिलेली असून बाकी कैफियत या भागात इतरत्र आढळते. पहिला बहामनी राजा हसन इमाम गंगू बाइमाम आणि देवगिरीचा किल्ला यांचे मूळ व

इतिहास यांच्याशी ही कैफियत संबंधित आहे. याशिवाय बहामनी राज्याचा विस्तार आणि बहामनी राजांच्या उत्तरकाळात काही महत्त्वाच्या नगरांचा विकास करण्यास जबाबदार असणाऱ्या काही व्यक्तींचे मूळ व इतिहासही यात वर्णिला आहे. अतिशय गरीब आई-बापांच्या पोटी जन्माला आलेला हसन तारुण्यात एका मुस्लिम संताचा शिष्य झाला. या मुस्लिम संताकडून हसनला मिळालेली वागणूक आणि आशीर्वाद यात विस्ताराने स्पष्ट केलेला आहे. हसन व त्याचा ब्राह्मण गुरू यांनी वीर गौंडा व बल्लाळ राय यांसारख्या व्यक्तींची मदत घेऊन तुकडे पडण्याच्या अवस्थेत असलेल्या विजयनगरच्या साम्राज्यातील काही गावांवर कब्जा मिळविला. तिसऱ्या प्रकरणात मुस्लिम संताच्या नावाचा उल्लेख आहे. तो हजरत बादशहा म्हणून ओळखला जात होता. त्याची लाभलेली कृपा संस्मरणीय करण्यासाठी हसनने जाफराबाद नावाचे गाव वसवून ते गुरूस अर्पण केले. हसनने केलेला राज्यविस्तार आणि त्याची स्थानिक नाईक राजांशी झडलेली युद्धे विस्ताराने स्पष्ट केलेली आहेत. हसनने वसविलेली शहरे आणि बांधलेले किल्ले यांची यादी दिलेली आहे. लेखक किंवा नक्कलकार यांची नावे दिलेली नाहीत; तसेच घटनांच्या तारखाही दिलेल्या नाहीत.

**प्रारंभ** : ...बकरी कोणाचरतोस तुझें नाव काय ते सांगणें मग धनगर मजकुर बोलीलाजे हजरत बादषाहा सलाम माझा नाव राम गोंडा. माझा बापाच नाव कृष्टण गोंडा.

**शेवट** : मग बादषाहान बहुत काही त्यास सरफराज करुन हुकुंम फर्मावले कीं आता तुमचे समागमें फौज मातबर घेऊन मुलकार्चे बंदोबस्त करणें. त्याप्रमाणें हुकुम कबुल करुन बादषाहास नवरस सलाम करुन निरोप घेऊन डेरांत दाखल जाहाले. समागमें फौज सरंज्याम घोडे राऊत...

## डी. नंबर २९१

**हासन गंगु बाईमाम**
**HASAN GANGU BAIMAM**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x६". १७ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३०६ व ३३२ अशा दोन ठिकाणी ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी मोठ्या संख्येने पर्शियन व अरेबिक शब्द यात येतात. दक्षिणेतील राज्यविस्तारासाठी हसनने वापरलेल्या लष्करी साधनसंपत्तीची माहिती यात दिसते. संभाजी अनंत आणि अंताजीपंत या हसनच्या दोन विश्वासू मित्रांची व सल्लागारांची चरित्रे दिलेली आहेत. संभाजी अनंत याचा वध ज्या कारणामुळे झाला तो स्पष्ट करणारी घटना यात दिलेली आहे. बहामनी राज्यात उद्भवलेली बंडे व यादवी आणि कुतुबशहाने ती कशी कौशल्याने शमविली यांचेही वर्णन केलेले आहे. अंताजी पंताने केलेल्या लष्करी मोहिमा या शेवटच्या काही पृष्ठांत आल्या आहेत. हसनच्या दरबारात तयार झालेल्या आणि एका सद्गृहस्थांच्या ताब्यात असलेल्या मूळ दस्तऐवजावरून ही कैफियत नकलली असल्याचे शेवटी म्हटलेले आहे. १५ जानेवारी १८१७ रोजी कर्नल मॅकेंझी याच्या आज्ञेवरून नारायणरावाने ही नक्कल तयार केली. यात उल्लेखिलेल्या घटनांच्या तारखा सांगितलेल्या नाहीत.

**प्रारंभ** : Folio 307. एकुन जमा सात लाख बेतालासे हजार यैस षुमार गणीति जाहाल याज उपरी लंकाणी कुलतानी व बेस्वडे वगैरे लोक गणीती नाही. या प्रकार यैस बादषाहीचे जाहाले.

**शेवट** : हे नकल संपुर्ण तारीख छ १५ माहे जनवरी सन १८१७ इसवी मुताबक शालीवाहन १७३८ धात्रुनाम संवछर पुष्य बहुल १३ बुधवार. हे बखर नकल लीहीलते नारायणराव गुमाते ईलाके कर्नल मार्कीजी साहेब सर्वायेर जर्नल निसीबत कुंपणी इंग्रज बहादुर.

## डी. नंबर २९२

**हस्तिनावली दिल्ली कैफियत**
**HASTINĀVALI DILLEE KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२" x७". १८ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर १ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १२५ वर सुरू होणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून काही ठिकाणची शाई फिकट झालेली आहे. भरत व भागवत राजांच्या नावांचा उल्लेख या कैफियतीत आहे. दिल्लीला सलगपणे शालिवाहन व विक्रम या कालखंडांत राज्य केलेल्या हिंदू राजांच्या नावांचा निर्देशही यात केलेला आहे. विजयनगरच्या राज्याचे मूळ व इतिहास, हरिहरापासून शेवटच्या नारायणपुरम् वेंकटपथी रायल या राजापर्यंत सर्वांचे नामोल्लेख आणि प्रत्येक राजाचा कारभाराचा कालखंड यात दिलेला आहे. कैफियत नंतर विजयनगरच्या राज्याचा ऱ्हास आणि मोगली सत्तेचा उदय यांचा खुलासा करते.

मराठ्यांचा इतिहास आणि ईस्ट इंडिया कंपनीने दिल्ली ताब्यात घेईपर्यंत तिच्यावर पकड ठेवून राहिलेल्या (मराठा) राजांची नावे हा कैफियतीतील विवेचनाचा शेवटचा मुद्दा आहे. दिल्लीवर राज्य करणाऱ्या मोगल राज्यकर्त्यांनी नेमलेले सुभेदार व मूळ सुभे यांची नावे आणि प्रत्येक सुभ्यातून जमा होणारा महसूल दिलेला आहे. पंढरपूर येथे राहणाऱ्या एका नारायणरावाकडे असलेल्या मूळ दस्तऐवजावरून ही नक्कल करण्यात आल्याचे शेवटी सांगितले आहे. कर्नल मॅकेंझी याचा दुय्यम मदतनीस वेंकटराव याने प्रस्तुत नक्कल सिद्ध केलेली आहे.

**प्रारंभ :** हस्तिनावली उर्फ दिल्लीचा कफियत सखवार राजेनी दौलत केलते तपशील. राजे लोकांनी दौलत केलची. कलीयुग प्रारंभ प्रमादि संवत्छर चैत्र सुध १ प्रतिपदा सुक्रवार.

**शेवट :** सदरहू दिल्लीच कैफियत पंढरपुराचे नारायणराव म्हणार महस्तनी पषजी येथे आलहोते त्याजकडून लिहुन घेतले असें. व्येंकट राव मुनसी रेसीडेंटं उलसीसाहेब ह्यानी सांगितलेप्रमाणें.

### डी. नंबर २९३

**हस्तिनावली दिल्ली कैफियत**
**HASTINĀVALI DĒLHI KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२" x८". २२ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर १ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १३९ वर सुरू होणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी तिचा शेवटचा भाग गहाळ झालेला आहे. दिल्ली येथे राज्य केलेल्या जैन व नंद राजांची नामावली प्रारंभी दिलेली आहे. नरसिंह वर्माच्या कारकीर्दीत नावारूपाला आलेल्या शहरांची नावेही दिलेली आहेत. विजापूरच्या सुलतानाकडून झालेला उच्छेद त्याचप्रमाणे विजयनगरच्या राज्याचे मूळ व इतिहास दुसऱ्या भागात सांगितला आहे. औरंगजेबाच्या काळातील दिल्लीची एकूण स्थिती पुढच्या काही पृष्ठांत स्पष्ट केलेली आहे. शिवाजीच्या नेतृत्वाखाली झालेला मराठी सत्तेचा उदय व विकास तिसऱ्या भागात वर्णिलेला आहे. संभाजीची कैद, त्याची चौकशी आणि वध फारच रेखीवपणे निवेदिला आहे. औरंगजेबाचे शेवटचे दिवस आणि राजाराम व शाहू यांच्यात मराठा राजसिंहासनासाठी झालेली वारसा युद्धे या कैफियतीच्या शेवटच्या भागात लिहिलेली आहेत. ती तिथेच संपते. शेवटची काही पृष्ठे नसल्यामुळे लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ समजून येत नाही. यातील घटना-प्रसंगांना तारखांची जोडही दिलेली नाही.

**प्रारंभ :** पुर्वी हे राज्यांत जेयनांचे अधीकार होतें. प्रताप रुद्राच काळीं त्याचा नाष जाहाल्यानंतरे नव चोळ राज्यान फार दिवस अधीकार करीत असें.

**शेवट :** भुठान गोदान इत्यादी नीट करणे म्हणुन सांगुन व तुम्ही पेशवे म्हणुन घेणे म्हणुन नाना साहेबास म्हणाले जे तुम्ही बाहार नीसी..... घालुन घेऊन तुभच फौजांत जाऊन पावावयानंतर शहर बंदोबस्ती करुन घेणे म्हणून सांगुन वैकुंठ यात्रा केले.

### डी. नंबर २९४

**हस्तिनापूरचे राजे**
**HASTINĀPURACE RĀJE**

**कागद :** इंग्लिश बनावट. १५"x८". २० ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

• डी. नंबर १७६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १९ (ब) वर सुरू होणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी पृष्ठे व्यवस्थित रचलेली नाहीत आणि सुटीसुटीही आहेत. दिल्ली येथे राज्य केलेल्या मोगल राजांचा इतिहास यात सांगितलेला आहे. मुस्लिम संत व सरदार (pccr) यांची जीवनचरित्रे, संतांनी केलेले चमत्कार आणि त्यांचे निधन झाल्याची ठिकाणे थोडक्यात वर्णिलेली आहेत. यानंतर दिल्लीच्या राजांकडून ज्यांना देणग्या व जहागिरी मिळाल्या अशा व्यक्तींची नावे दिलेली आहेत. विजापूरच्या सुलतानांचा इतिहास, मराठ्यांचा उदय, शिवाजीने बांधलेल्या किल्ल्यांची नावे आणि शिवाजी व औरंगजेब यांच्यात झालेल्या युद्धांच्या तारखा हे सर्व मोठ्या रेखीवपणे स्पष्ट केलेले आहे. अकबरापासून औरंगजेबापर्यंत दिल्लीला राज्य केलेल्या मुस्लिम राजांचा अनुक्रम ही कैफियत देते. कर्नाटकाचे नबाब व विजापूरचे सुलतान यांचा संक्षिप्त इतिहास आणि काही पेशव्यांविषयीचा थोडक्यात वृत्तान्त यात दिलेला आहे. पृ. २९ वर ही कैफियत पूर्ण होते. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ स्पष्ट केलेले नाही.

**प्रारंभ :** एवनी पातशा होतें दिल्लीस जाली शेक पांचशे तेरा ५२३ त्यापासोन दक्षणेत एवनी अमल चालीला. त्यात शेक १९६८ अकरासे अडसष्टे सन ६५६ साहासें छेपन्न यात पीर पेगदार फकार आवुलीया पुण्यजवळी आले.

**शेवट :** संवस्थान मौजे सासवडी असें मोरयादेवाचे चिंतामण देव त्वाचे नारायण देव त्यास चिंतामणी उपरांत धरणीधर हाली नारायण देवं आसें बहुत विध्यावान आहेत कलम.

## डी. नंबर २९५

**हिंदुपती राजे**
**HINDUPATI RĀJE**

**कागद :** इंग्लिश बनावट. १५"x८". २० ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १७६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ५ वर येणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी पृष्ठे सुट्या अवस्थेत आहेत. हस्तिनापूर येथे राज्य केलेल्या राजांबद्दलची माहिती यात आहे. हिंदू राजांच्या नावांची यादी आणि विक्रमापासून दिल्लीला त्यांनी राज्य केल्याचा काळ दिलेला आहे. प्रत्येक राजाच्या काळात घडलेल्या महत्त्वाच्या गोष्टींबद्दल थोडक्यात माहिती दिलेली आहे. विक्रम शकाच्या काळात राज्य केलेल्या महत्त्वाच्या व्यक्तींची नोंद स्वतंत्रपणे केलेली आहे. रक्ताक्षी वर्षापासून यादी सुरू होत असून पहिला राजा म्हणून राजा राजश्री चंद याचे त्याच्या इतिहासासह नाव दिलेले आहे. राजघराणी व त्यांनी हस्तिनापुरास राज्य केल्याचा काळ यांची एक एकत्र यादी शेवटच्या पानावर दिलेली आहे. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** या उपरी हस्तीनापुरी युत्धीष्टू शेकाचें अंती हिंदुपती राजे याची घालमेल होऊन राजे जे झाले ते तपसील.

**शेवट :** यानंत विक्रम शेक इंद्रप्रस्तों व नर्मदा उतर तीरापासुन दक्षणेस सालीवाहन शेक चालत असतां शेक शालीवाहन ५२२ पांचसे बारा यात इंद्रप्रस्थी मोकुम जाते तो विसार हमल शास्त्र द्रीष्टीस पडला ते श्लोदक गीरवाणे करुन.

## डी. नंबर २९६

**हिन्दुराजे लोकांचे तपशील**
**HINDU RĀJE LOKĀNCE TAPSIL**

**कागद :** इंग्लिश बनावट. २०"x १२". २८ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ११४ वर ही कैफियत येते. जरी हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्हयोजना मोठ्या प्रमाणात आहे. काही सूर्यवंशीय व चांद्रवंशीय हिंदू राजांचे मूळ व इतिहास सांगणाऱ्या मोडी लिपीतील मोठ्या दस्तऐवजावरून त्यातील एका भागाची केलेली नक्कल म्हणजे प्रस्तुत कैफियत असावी. विक्रमादित्य व शालिवाहन यांची चरित्रेही थोडक्यात वर्णिली आहेत. चोळ घराण्यातील राजे व त्यातील प्रत्येकाचा काळ सांगितलेला आहे. यादव घराण्यातील व विजयनगर येथील राजांची नावे दिलेली आहेत. दक्षिणेत हिंदू राज्यांचे झालेले पतन, दिल्लीचे बादशहा व विजापूरचे सुलतान यांनी मोगल राजवटीचा केलेला प्रसार, तसेच प्रत्येक सुलतानाचा राज्यकारभाराचा काळ स्पष्ट केलेला आहे. कैफियतीत फक्त हिंदू व मुसलमान राजांची नावे व काळ यांचाच निर्देश असून त्यांच्या काळात घडलेल्या इतिहासदृष्ट्या महत्त्वाच्या घटना सांगितलेल्या नाहीत. शालिवाहन शकात सर्व तारखा दिलेल्या आहेत. काही जुन्या कागदपत्रांवरून ही कैफियत नकललेली असून कर्नल मॅकेंझी याजकडे रवाना करण्यात आलेली आहे. लेखकाचे नाव किंवा हे कागदपत्र ज्याच्याकडे होते त्याचे नाव किंवा असाच इतर तपशील स्पष्ट केलेला नाही.

**प्रारंभ :** द्वापरयुग प्रकारे ८ आट हजार वरुष अक्षय दिवसी मछयावतार (माछणावतार) कुर्मावतार वराहअवतार नरसीव्हावतार तेरायुगी तीघे पुरुषे कारणें वराहक्षेत्राकडें कालींदी पुरुष प्रमाणे २१ अयुष ४०० वरुषा पुर्वी उजेनी पटणांत राज्यभार केर्ले.

**शेवट :** वरुष ४८७८ हे ही तो नवाब बालाज्यानी कलीयुग उबजल पासुन देवतापुर प्रकार हिशाब लिहुन पाटवणे म्हणुन ईनामयत नामा पाटवीले होत. हकुम ५ बामोजीबा पुर्वाक ईसाब पाहुन लिहन पाटवीले हिसाबाचा तपशील.

## डी. नंबर २९७

**हेबहाळी कैफियत**
**HEBAHĀLI KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. २०"x १२". २८ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ६८१ व ६८६ वर ही कैफियत येते. जरी बऱ्यापैकी व वाच्य हस्ताक्षर असले तरी मोठ्या प्रमाणात अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्हयोजना यात दिसून येते. तिचा पहिला भाग पृ.

६८१ वर येत असून इतर भाग पृ. ६८६ वर येतो. म्हैसूर राज्यातील हेबहल्ली येथील बल्लाळ रायदुर्ग याच्याविषयीचा काही वृत्तांत यात सांगितलेला दिसतो. वीरबलार्य राय याने हा किल्ला बांधला. वीरबलाचा थोडक्यात इतिहास विशेषतः इनामे व जहागिरी देण्याबाबतीत तो कसा दानशूर होता हे यात नोंदलेले आहे. यानंतर बल्लाळ रायने बांधलेल्या मंदिरांचा निर्देश येतो. ही स्थाने व तिथे केली गेलेली शेतीची लागवड यांची भौगोलिक रचना स्पष्ट केलेली आहे. पृ. ६८६ वर सुरू होणाऱ्या दुसऱ्या भागात दिल्लीच्या बादशहाची स्वारी व बल्लाळ रायाचा पराभव वर्णिलेला आहे. या बादशहाचे नाव सांगितलेले नाही, पण त्यांच्यातील युद्धाचे मात्र तपशीलवार वर्णन केलेले आहे. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ स्पष्ट केलेले नाही.

**प्रारंभ :** हे राजा आनेक देवर युक्त पराक्रम होऊन असतां हिंदुचे पादषाहाचे लेंकही पराक्रमी शुर रुजु प्रतीच आहे. तैशास लग्न करुन घ्यावा म्हणुन असताना x x x

**शेवट :** (६८२) वरकड सांगितल देवल पाहणेस विशेष x x होत नाहीत. बहु नीट होत नाही. ते खेरीज समाम येत नाहीत तही. गरीब लोक बसलीयत. कामात येत आहें वरकड येथ काही दिलनाही.

## डी. नंबर २९८

### हेमाडपंताची बखर
### HEMĀDA PANTĀCI BAKHER

**कागद :** इंग्लिश बनावट. ८"x ६". १२ ओळी. मोडी. खराब. पूर्ण.

डी. नंबर ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ८७ वर ही बखर येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सर्वच पृष्ठांची उजवी बाजू आणि डाव्या बाजूचे माथ्यावरील कोपरे अत्यंत खराब अवस्थेत आहेत. सर्वच बखरीत पानकिड्यांनी कुरतडल्यामुळे पडलेली छिद्रे दिसतात. जरी यास हेमाडपंताची बखर असे शीर्षक असले तरी मोडी लिपीचा जनक असलेल्या हेमाडपंताबद्दल फारच थोडी माहिती यात दिलेली आहे. पन्हाळा (Panahal) किल्ल्याचे मूळ व इतिहास यांसंबंधी माहिती देण्यासाठी हेमाडपंताला अदिलशाही बादशहाने विचारलेल्या प्रश्नापासून या बखरीचा प्रारंभ होतो. हेमाडपंताने त्या किल्ल्याची माहिती दिलेली आहे. पहिल्या काही पानांत एक मोठा नाग व साधू यांच्यातील झगड्याचे वृत्त दिलेले आहे. त्या नागसर्पाचे मूळही स्पष्ट केलेले आहे. एका जलाशयात दडविलेल्या गुप्तधनाची माहिती सर्पाकडून साधूस समजते. मग एका पोरक्या मुलाच्या मदतीने तो ती संपत्ती बाहेर काढायचा प्रयत्न करतो. तो हुशार मुलगा संपत्तीसह पळ काढतो आणि काही लहान किल्ले बांधतो. त्या मुलाचे नाव नेमके वाचता येत नाही. यानेच भवानी मातेचे मंदिर बांधले. शिवाजी महाराजांची पालक देवता म्हणून नंतरच्या काळात ही भवानी पूजिली गेली. यात आलेल्या कोणत्याच घटनांच्या तारखा दिलेल्या नाहीत. जुन्नर जिल्ह्यातील खेड तालुक्याचा रहिवासी नारायणजी याच्याकडे हा दस्तऐवज होता. तो कर्नल मॅकेंझी याच्या खास विनंतीवरून नारायणरावाने नकलला. हे काम १३ जानेवारी १८०७ रोजी पुरे झाले. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** पुर्वी त्रेतायुगी व द्वापरांती एवनश्व राजा नामक पांच हजार ५००० वरुष पावेतो आनेक अयुटे करुन बहता दशैन्येमधा विशेष दीवस राज्येभार करीत होता.

**शेवट :** कुलकरणी नारायेणजी मौजे खंडी ता के नारायणे गाव सरकार जुनार याकडे होती. त्याची नकल केली असे बिकलम ईलाके हजरत मेजर मेकेंजी साहेब सुपर अर्डेट आफ दी मैसुर वगैरे बातारीख छ १२ माहे जेनवारी सनः- १८०७ मुताबिक पुष्ये बहळु १० दसेमी क्रोधन नाम संवस्छर शेक २७२७ शालिवाहने जागे हमदनगर.

## डी. नंबर २९९

### हेलबिडुर कैफियत
### HELA BIDUR KAIFIYAT

**कागद :** देशी. ८"x ६". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर २५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ९५ वर येणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी पानकिड्यांनी पृष्ठांची खराबी केलेली आहे. रामलिंगेश्वर स्वामीच्या मंदिराचे मूळ व इतिहास आणि मंदिराच्या पुजाऱ्याने काही कर जमा करावा अशी परिस्थिती यांचे विवरण पहिल्या दोन पृष्ठांत केलेले आहे. हे मंदिर एका निबिड जंगलात वसलेले होते. वर उल्लेखिलेल्या पुजाऱ्याने एक वाघ पकडला होता. त्या पुजाऱ्याने कर जमा करून काही इमारती आणि नंतर एक छोटा किल्ला बांधला. त्यानंतर ही जागा बिदनूर म्हणून ओळखली जाऊ लागली. या खेड्याची भौगोलिक रचना स्पष्ट केलेली आहे. अनंगपालाच्या कारकीर्दीत

हे गाव त्याच्या राज्याशी जोडले गेले. अनंगपाल, विष्णुवर्धन व त्याचा भाऊ विंध्यार्थी यांच्या राज्याचे वर्णन दुसऱ्या भागात येते. अनंगपालाच्या काळातील जैन धर्माचा प्रसार आणि बिदनूर येथे तो रुजविण्याचा जैन भिक्षूंनी केलेला प्रयत्न मोठ्या विस्ताराने वर्णिलेला आहे. बिदनूर इलाख्यातील होयसळ ईश्वराचे मंदिर व त्याजवळचा जलाशय बांधण्याची कारणे व परिस्थितीसुद्धा विस्ताराने मांडली आहे. जकणाचार्य, बलदेव राय आणि वीरबल राय यांची जीवनचरित्रे नंतर सांगितलेली आहेत. लेखकाचे नाव, नक्कलकाराचे नाव किंवा माहितीचे मूळ स्पष्ट केलेले नाही. उल्लेखिलेल्या घटनांच्या तारखा दिलेल्या नाहीत. शेवटी शिवाप्पा नाईक याच्यासंबंधीची काही माहिती दिलेली आहे.

**प्रारंभ** : पुर्वि हेक्ष बीडु बलाक्ष राये यानी आधीकार करीत जाहल. ते वीलाती साबक येगुर मुलुकामधे शरकापुर यास प्रतीनामक मधये अंगुडी म्हणाव्यांचे गावीं एक जैन मुनीश्वर व संत म्हणावयाची दिवसी उपासना करीत होता.

**शेवट** : x x x तेव्हा हसन खन म्हणार वादषाह कडिल सरदार येऊन सुमार तीनी लाख होनाचे मुलुक बांधुन घेतला. ह्यानी तीनीचारी वरीसें आसुन आपलें मुणकास पावला. मग एकेरी व नगरचे राजे सेवपनायेक यांचे स्वाधीन जाहल मग कित्तेक दिवसा नंतरे मैसुरास पावले.

## डी. नंबर ३००

**हेलबिदुर कैफियत**
**HELA BIDUR KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १८"x १०". २७ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर २५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या ७४६ व्या पृष्ठावर ही कैफियत येते. हस्ताक्षर जरी बऱ्यापैकी असले तरी यात अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्हे मोठ्या प्रमाणात आहेत. मूळ दस्तऐवजाची ही नक्कल असून शेवटी 'रंगाप्पा' असे नक्कलकाराचे नाव लिहिलेले आहे. म्हैसूर इलाख्यातील बिदनूर व तेथील राज्यकर्ते यांचे मूळ व इतिहास यात स्पष्ट केलेला आहे. रामलिंगेश्वरस्वामीच्या मंदिरात जमा केलेल्या कराच्या रकमेतून हा किल्ला बांधला गेला आणि नंतर अनंगपालाने तो आपल्या राज्यात समाविष्ट केला. अनंगपाल, विष्णुवर्धन आणि काही राजे यांचे जीवनचरित्र नंतर स्पष्ट केलेले आहे. काही जैन भिक्षूंची नावे दिलेली असून त्यांनी बिदनूरमध्ये जैन धर्माचा प्रसार कसा केला हे स्पष्ट केले आहे. बिदनूर भागातील होयसळ ईश्वराच्या मंदिराचे मूळ व इतिहास थोडक्यात दिलेला आहे. बिदनूर येथे राहणाऱ्या जकणाचार्य व इतर काही व्यक्ती यांचे चरित्र यात सांगितले आहे. याआधीच्या कैफियतीत सांगितलेली माहिती यातही ग्रथित केली गेली आहे. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही. यातील घटनांच्या तारखा दिलेल्या नाहीत. एका वाईट नक्कलकाराने लिहिलेला हा एक अपूर्ण दस्तऐवज आहे.

**प्रारंभ** : - - - त्याचे मुलुक सोडून आपण मुर्तीवालेस निरोप देऊन आपण नीवरपेटास दाखल जाहला.

**शेवट** : - - - याप्रमाणे अवचीत येक द्रोह आला कोणी त्याय - - - - कालयुक्ती संवछर लगाईत सीधार्ती नाम स्वंछर पावेते ७ मी घेत होती.

## डी. नंबर ३०१

**हैदर व टिपू सुलतानं कैफियत**
**HYDER VA TIPU SULTAN KAIFIYAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x ८". १८ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

डी. नंबर १३१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पहिल्याच पृष्ठावर येणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी काही पृष्ठे सुट्या स्थितीत आहेत. हैदर अली व टिपू सुलतान यांचे तपशीलवार चरित्र यात दिलेले आहे. प्रारंभीची एक-दोन आणि शेवटची काही पृष्ठे गहाळ झालेली आहेत. हैदर अलीच्या पूर्वजांची नावे दिलेली असून सामान्य स्थितीतून तो इतका मोठा कसा झाला हे मोठ्या रेखीवपणे वर्णिलेले आहे. दुसऱ्या भागात त्याचे लष्करी कौशल्य आणि सुभेदाराच्या हुद्द्यावर त्याची झालेली पदोन्नती स्पष्ट केलेली आहे. (इतर लोकांच्या) चुकांमुळे त्याला प्राप्त झालेली अधिक सत्ता, म्हैसूरच्या आधीच्या वोडियार राजास बाजूला सारणे आणि स्वतःला म्हैसूरच्या गादीवर बसविण्याच्या दृष्टीने त्याने केलेली युद्धे हे सर्व तपशीलवारपणे मांडलेले आहे. हैदरच्या बायकांची नावे आणि प्रसिद्धीस येण्याआधीचे अर्काटचे त्याचे गृहजीवनसुद्धा वर्णिलेले आहे. वर्णिलेल्या प्रत्येक घटनेस शालिवाहन शकाच्या तारखा दिलेल्या आहेत. फ्रेंच किंवा डच अशा परकीयांशी हैदरचे असलेले संबंध सांगून इंग्रजांबद्दल तो कसा नाखूष होता हे स्पष्ट केलेले आहे. कर्नाटक व त्रिचनापल्ली

येथील नबाबांच्या युद्धातील हैदरची भूमिका विस्ताराने वर्णिलेली आहे. हैदरच्या लष्करी सामर्थ्याचा तपशील आणि त्याची राज्यकारभारक्षमताही स्पष्ट केलेली आहे.

तिसऱ्या भागात टिपू सुलतानाचे म्हैसूरचे सिंहासनारोहण वर्णिलेले आहे. त्रिचनापल्लीला घातलेल्या वेढ्यापासून निवेदन सुरू होते. दक्षिणेतील काही प्रांतांचा कब्जा, मद्रास ताब्यात घेण्याचा टिपूचा मनसुबा, मराठ्यांशी त्याने केलेल्या वाटाघाटी आणि त्याच्यावर हल्ला करण्याबाबत मराठ्यांना परावृत्त करण्यात त्याने मिळविलेले यश हे सर्व रेखीवपणे मांडलेले आहे. यानंतरच्या पृष्ठांत टिपूच्या विशेषतः इंग्रजांविरुद्धच्या हालचाली तपशीलवार वर्णिल्या आहेत. वेलोरचे त्याचे वागणे, इंग्लिश कैद्यांना दिलेली गैरवर्तणूक आणि फ्रेंचांशी केलेली मैत्री हीसुद्धा यात आलेली आहे. दक्षिण हिंदुस्थानात टिपूने आखलेल्या मोहिमांबद्दल विशेष तपशील न देताच ही कैफियत संपते. काही ठिकाणी इंग्रजीमध्ये 'हैदर व टिपू यांचे जीवन' असे लिहिलेले आढळते. ज्यात पराभूत होऊन टिपू सुलतान मारला गेला ती त्याची इंग्रजांबरोबरची श्रीरंगपट्टणची लढाई कैफियतीच्या अखेरीस वर्णिलेली आहे. या युद्धानंतर ईस्ट इंडिया कंपनीने कृष्णदेवराज वोडियार यास म्हैसूरचा राजा म्हणून घोषित केले. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ यात स्पष्ट केलेले नाही.

**प्रारंभ :** पुर्वी मोगलाईत सरची सुभे दाखल होतां कोलार वगैरे परगणे सीर खालील होत. फते नाईक व हैदर नाईक दोघ भाई या मकानात होतें. सीरचे सुभ कुराडी महमद खान म्हाणार करुन घेउन होता.

**शेवट :** बेरीज ५०००७ हजार होनास दिलहे. त्या ब्याज सीधार्थी संवछर चैत्र बहुल ३५ मीलुन चेत्रपठणाहुन ईग्रजी बहदुर याणी फौज येऊन जगें करुन टीपुसुलतानीसी मारुन श्रीरंगपटण ठाणा घालुन कर्तस्तजा कृस्नराज वाडेयार यांसी तत्खनीसी करुन ह्याची दीवान पुर्णेयाकडुन हाल अमीली जेममुनी राव मा तसहीस राजा केले आहेत.

## डी. नंबर ३०२

### हैदर व टिपू
### HYDER VA TIPU

**कागद :** फ्रेंच बनावट. १२"x ८". १८ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

या भागात फक्त हीच एक कैफियत आहे आणि ती पृष्ठ दोनवर सुरू होते. हस्ताक्षर बऱ्यापैकी वाच्य असले तरी जुनेपणामुळे पृष्ठे तपकिरी रंगाची झालेली आहेत. शाईसुद्धा पुसट झालेली आहे. कालानुक्रमानुसार साऱ्या कैफियतीचे लेखन झालेले असून प्रत्येक घटनेसाठी वेगळा परिच्छेद आहे. टिपू सुलतानाचे म्हैसूरचे राज्यारोहण, लष्करी सामर्थ्याची पुनर्रचना आणि राज्यातील त्याने केलेल्या इतर सुधारणा यांच्या वर्णनापासून या कैफियतीचा प्रारंभ होतो. यानंतर त्याने ईस्ट इंडिया कंपनी, मराठे व कर्नाटकचे नबाब यांच्याशी केलेल्या युद्धांचा वृत्तांत येतो. त्याने केलेले तह आणि काही मोहिमांत त्याला मिळालेले विजय व पराजय मोठ्या रेखीवपणे वर्णिलेले आहेत. प्रत्येक प्रसंगाला शालिवाहन शकातील दिवस, तारीख, महिना व वर्ष यांची जोड दिलेली आहे. इंग्रजांविरुद्ध त्याने केलेल्या चाली, मुक्काम, माघारी आणि अशाच स्वरूपाच्या इतर हालचाली अतिशय काळजीपूर्वक नोंदलेल्या आहेत. त्याने जिंकलेल्या किंवा गमावलेल्या ठिकाणांची नावे, तसेच दोन्ही बाजूंकडून लढलेल्या व्यक्तींची नावे यांचीही नोंद केलेली आहे. त्यात ईस्ट इंडिया कंपनीतील, त्याचप्रमाणे फ्रेंच व मराठा अधिकाऱ्यांच्या नावांचाही समावेश आहे. अर्काटचे नबाब आणि मराठे यांनी बजाविलेल्या भूमिकाही स्पष्ट केल्या आहेत. बेलूर येथे तळ ठोकण्याबाबत इंग्रजांनी केलेल्या व्यवस्थेची माहिती शेवटच्या परिच्छेदात दिलेली आहे. जरी ही कैफियत हैदर व टिपू यांच्या राज्यकारभाराबद्दल मोठी सुरस माहिती देत असली तरी लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ दिलेले नाही. म्हैसूरच्या इतिहासाशी निगडित असलेल्या एका मोठ्या दस्तऐवजातील छोट्या भागाची ही नक्कल असावी असे वाटते.

**प्रारंभ :** समस्थानांत काय काम कज्याकठुन घेतले ते तपसील बहदराचे कैफियत लिहीले अस.

**शेवट :** त्या उपरांती इंग्रजेची फौज - - - बहदुर फौजसुधां निघुन वारी घाटास येत आहे म्हणुन बातमी अनंतरीं.... माघ सुध १० रोजी निघुन मतुर ता बलुराजवली उतरुन तेथ घोडे फौज सिलहेदार तमाम दरोबस्त सुदां मीर मोइनुदीमास पुर्णया व कितेक मीर मीरा वगैरास हुंडु दुर्गाजवली जातेस पाटऊन दिलहे. इतकीयांत कोडगाकड इंग्रेजाचे फौज आल म्हणुन वर्तमान ऐकुन- - - -

## डी. नंबर ३०३

**हैदर व टिपू सुलतान हकिगत**
**HYDER VA TIPU SULTAN HAKIGAT**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x १०". २१ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १३७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ६५ वर ही कैफियत येत असून तिचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. कागद तपकिरी रंगाचे व फाटलेले, काही पाने सुटी व त्यांतील काही अगदी खराब झालेली असे या हकीकतीचे स्वरूप आहे. ती अनेक परिच्छेदांत विभागलेली असून प्रत्येक परिच्छेदात हैदर व टिपू यांच्या जीवनातील एकेक महत्त्वाचा ऐतिहासिक प्रसंग वर्णिलेला आहे. घटना कालक्रमानुसार योजिलेल्या असून त्यांना शालिवाहन शकाच्या तारखा दिलेल्या आहेत. पहिल्या तीन पृष्ठांत हैदरची त्रिचनापल्लीवरील स्वारी वर्णिलेली आहे. दोन्ही बाजूंच्या सैन्याची संख्या आणि लढलेली युद्धे रेखीवपणे वर्णिलेली आहेत. याच्या दुसऱ्या भागात टिपू सुलतानाचा इतिहास सांगितला आहे. ईस्ट इंडिया कंपनी व टिपू सुलतान यांच्यातील वैरभाव मोठ्या समर्पक शब्दांत उघड केला आहे. फ्रेंचांशी केलेला तह आणि चढाई, मुक्काम व हल्ले यांच्या उल्लेखासह ईस्ट इंडिया कंपनीशी केलेल्या युद्धांची वर्णने विस्ताराने केली आहेत. अधिकाऱ्यांची नावे आणि दोन्ही बाजूंकडील सैन्यसंख्याही सांगितलेली आहे. श्रीरंगपट्टणाच्या वेढ्याच्या वेळी ईस्ट इंडिया कंपनीने जिंकलेल्या ठिकाणांसह एकूण युद्धाची प्रगती कैफियतीत नंतर वर्णिली आहे. बेलूर येथे मुक्काम करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीच्या तोफखान्याने केलेल्या व्यवस्थेची माहिती शेवटच्या भागात दिलेली आहे. लेखकाचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ याबद्दल काहीही उल्लेख न करताच प्रस्तुत कैफियत संपते.

**प्रारंभ** : नंदराजा हमद बहदर त्रिचीनापलीचे माहिमेवरी असाता आंगीरस संवछर मार्गसृषये बहुल २ रोजी देवनहलीत याच तवलुद जाहाला त्यावरी विक्रम संवछरी हैदरावरी राजेयानी राजकारण करीतां टिपुसुलतान यांसी वाबष्ट सुधां किले वाहेर आपले गावी सोडुन बेंगुलुरास गेलेवरी राजे यानी टिपुसुलतानासी बंदोबस्ते सुधा किल्लेत आणुन टेवीले होते.

**शेवट** : जवली आल असतांना सुलतानाकरीतां आणिल सरज्याम घोडी व पालखंति जावाहीर वगैरे आणुन घेऊन कागद सुधां आणऊय घेऊन पंदरा रोज होते त्या ब्याज या सरदारास सुलतानानी खिलीत जवाहीर देखील देऊन विलायतीसीही भारसीषा कडुन जावाहीर खिलीत कागद सुधां या सरदारचे हमारा देवुन जाहाजावरी रवना केला त्या व्याज तेथुन निघुन माहे मजकुरचा निघुन साधरण संवछर निज आषाड सुध १३ सोमवारी पटणासी दाखल तेव्हा होत ते लौजदार च्यालीस हजार घोडे, तहसीलदार सुंधा पंदरा हजार आटाशे - - - - - प्यादे सुदा पंदरा हजार तोफ ५० .

## डी. नंबर ३०४

**हैदराची माहिती**
**HYDARĀCI MĀHITI**

**कागद** : देशी बनावट. १२"x ८". २१ ओळी. मोडी. जुने व खराब. पूर्ण.

पुढे स्पष्ट केलेल्या हैदराच्या माहितीशिवाय या भागात दोन इतर रचना आहेत. प्रस्तुत कैफियत पृ. २९ वर येते. पानकिड्यांनी कुरतडल्यामुळे पृष्ठे फारच खराब झालेली असून काही भागांचे तर तुकडे पडायला आले आहेत. या कैफियतीत हैदरचे जीवन व कार्य यांबद्दलचा काहीसा मोठा वृत्तांत आलेला आहे. प्रारंभी काली मंदिराचे मूळ व इतिहास वर्णिलेला आहे. जिथे हे मंदिर होते तो भाग उद्ध्वस्त झाल्यामुळे कुठे नोंदला गेलेला नाही. हिंदू राजा राज्य करीत असलेले गोलकडवलम् या नावाचे खेडे म्हणजेच हे ठिकाण होय. त्या नावाने ते पूर्वी ओळखले जात होते.

इथे राज्य केलेल्या काही हिंदू राजांची नावे कालानुक्रमानुसार दिलेली आहेत. त्यानंतर अर्काटच्या सुभेदारांच्या निर्मितीबद्दलचा संक्षिप्त वृत्तांत यात येतो. हझ्वाबाद येथील श्री गंगाधरस्वामी मंदिराचे मूळ व इतिहास थोडक्यात स्पष्ट केलेला आहे. या मंदिराबद्दलची माहिती तेथील अर्चकांकडून मिळविलेली आहे. हैदर अलीच्या कुटुंबाचे नातेसंबंध, सामान्यत्वातून त्याचा झालेला उदय आणि त्याच्या आधीच्या मालकांना– राजाला– बाजूला सारण्यासारखे अधिक सामर्थ्य येण्याच्या दृष्टीने त्याने टाकलेली पावले यांचे वर्णन त्यानंतरच्या लेखनात येते. तो लढलेली युद्धेही नेमकेपणाने सांगितली आहेत. ईस्ट इंडिया कंपनीचे मद्रास व इतर ठिकाणे जिंकण्याचे त्याचे मनसुबे, मराठ्यांना दूर ठेवण्यासाठी त्यांच्याशी त्याने केलेली बोलणी आणि मराठ्यांनी समझोत्यासाठी घातलेल्या शर्ती यांचे थोडक्यात वर्णन केलेले आहे. असे दिसते की, यातील काही पृष्ठे गहाळ झालेली आहेत. हैदरच्या लष्करी व नागरी अधिकाऱ्यांची एक पूर्ण तपशीलवार यादी त्याच्या

अखत्यारीत असलेल्या जिल्ह्यांसह दिलेली आहे. हैदरला पाठिंबा देणाऱ्या काही फ्रेंच अधिकाऱ्यांचाही उल्लेख केलेला आहे. हैदरच्या चारित्र्याविषयीची माहिती थोडक्यात दिलेली आहे. लेखकाचे किंवा नक्कलकाराचे नाव किंवा यातील माहितीचे मूळ दिलेले नाही. काही थोड्या प्रसंगांना शालिवाहन शकाच्या तारखांची जोड दिलेली आहे.

**प्रारंभ :** - - - घेतले होत. त्याचे बथकोन - - - घ्यावे यासीच - - उतरले तो - - - आडनको - - हाराचे - - - सीगंवली तो मैसुराजवल एवुन राहिला.

**शेवट :** तरीही इनसाफ तोंफा होईल व तो राज्य - - - तोफा देवुन - - ऐसे ऐकून राज्याचे - - - माघारी सांगोन लागला.

## डी. नंबर ३०५

**हैदरांची माहिती**
**HIDARĀNCI MĀHITI**

**कागद :** इंग्लिश बनावट. २० "x १२". २८ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ५६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ७२९ वर ही कैफियत येते. जरी हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी अशुद्धलेखन व चुकीची विरामचिन्हे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. म्हैसूर राज्य आणि त्याचे हैदर आणि टिपू यांच्यासारखे राजे यांचा इतिहास सांगणाऱ्या मूळ दस्तऐवजावरून ही कैफियत नकललेली दिसते. याआधीच्या कैफियतीप्रमाणेच हिचाही तोच विषय असल्याचे दिसते. इंग्रजांना मद्रासच्या किनाऱ्यावरून हुसकून लावण्यासाठी हैदरने फ्रेंचांबरोबर जो बेत ठरविला त्याचे काही अधिक तपशील यात दिसून येतात. त्याने फ्रेंचांशी केलेला तह आणि काही फ्रेंच अधिकाऱ्यांची नावे यांचाही इथे उल्लेख आहे. हैदरच्या जीवनातील घटना पूर्णपणे सांगितल्या नसल्या तरी त्याच्या चारित्र्याबद्दलचे काही उल्लेख शेवटी दिसतात. त्याने ईस्ट इंडिया कंपनी व मराठे यांच्याशी केलेली युद्धेही उल्लेखिलेली आहेत. या युद्धांच्या तारखा, त्यांची कारणे व निकाल किंवा वरील युद्धांस जबाबदार असणाऱ्या प्रमुख व्यक्तींची नावे दिलेली नाहीत. बेंगलोर येथे एक भलीमोठी बाग तयार करण्याविषयी हैदरने सूचना दिल्या हे सांगून कैफियत संपते. लेखकाचे वा नक्कलकाराचे नाव किंवा या माहितीचे मूळ दिलेले नाही.

**प्रारंभ :** - - - होता लोकांनी फार (चिंता) फीतर - - - जाहाले तो - - - तेराई आणि घडपडी हजार व सात माहाल सरंज्याम एक वीर दुर्गवालेस सांपडले.

**शेवट :** श्रीमंत राव साहेबानी - - - तेथेल ते पाहुन संतोष जहाला. घडासमीप येतांच हैदर आलिखानास भोवंत घेत पडला. एक घोडानासी - - - - हैदर आलि खान पळुन नगरस गेला. तमाम फौज गारत जाहाले - - - हैदर आलि खनानी निसटुन घेऊन्न पळाला.

## डी. नंबर ३०६

**होलकार कैफियत**
**HOLKĀR KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. १० "x ६". १६ ओळी. मोडी. चांगले हस्तलिखित. पूर्ण.

डी. नंबर २५ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ८३ वर ही कैफियत येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. मराठ्यांचा एक प्रभाग असलेल्या होळकरांचे मूळ व इतिहास यांचे वर्णन यात येते. मल्हारजी होळकर व यशवंतराव होळकर यांच्या इतिहासावर विशेष भर देण्यात आलेला आहे. या ऐतिहासिक घराण्याचा इतिहासाला ज्ञात असणारा पहिला पूर्वज म्हणजे खंडोजी होळकर होय. व्यवसायाने शेतकरी असणाऱ्या या खंडोजीने जुन्नर जिल्ह्यातील वडगाव येथे स्थलांतर केले. या स्थलांतराचे कारण सांगितलेले नाही. त्याचा पुत्र मल्हारजी होळकर शाहू राजाच्या पदरी सामर्थ्यवान लष्करी अधिकारी झाला. उत्तरेत मल्हाररावाने केलेल्या लष्करी मोहिमांची माहिती नंतर दिलेली आहे. मल्हारराव होळकराची देशभक्ती, त्याची वीरकृत्ये, त्याने केलेला राज्यविस्तार आणि अशीच इतर ऐतिहासिक माहिती विस्ताराने मांडलेली आहे.

दुसऱ्या भागात यशवंतराव होळकर याचा इतिहास सांगितलेला आहे. या व्यक्तीचा जन्म व बालपण यांविषयी ही कैफियत फारच थोडी माहिती देते. त्याने पानिपतच्या युद्धात बजाविलेल्या भूमिकेचे वर्णन ही कैफियत करते. या युद्धाचे वर्णन करून पेशवे व मराठे यांच्यातील झगड्यात मराठा गादीची इच्छा करणाऱ्या मराठा प्रमुखांची नावे मोठ्या विस्ताराने दिलेली आहेत. काही महत्त्वाच्या घटना-प्रसंगांच्या तारखा शालिवाहन शकात दिलेल्या आहेत. पुणे येथे राहणाऱ्या कुणा रघुनाथराव नावाच्या वृद्ध गृहस्थाने दिलेल्या माहितीवरून ही कैफियत तयार केल्याचे अखेरीस सांगितले आहे. कर्नल मॅकेंझी याच्या खास विनंतीवरून

ही कैफियत १० एप्रिल १८०६ रोजी पूर्णपणे तयार करण्यात आली असेही लिहिलेले आहे.

**प्रारंभ :** कैफियत होलकार बुनीया पासुन लिहीणजाहल आहे. पहिले दिडशे वरुषा पासुन पुनेस उत्तर भागी, सोला कोसावरी मौ. बाद गावे परगणेजुनर या स्थली बहुत दिवसा पासुन आणि रयतेवा करुन जिवनोपाय करीत होता.

**शेवट :** बिकलम इलाके हजरत मेजर मेकींजी साहेब बहदुर सुपरंडयंट आफ दी मैसुर सरवीस म्हणीजे श्रीरंगपटणाचे मुलुक जमीन पैभाष करणार बा तारीख छ १० माहे एप्रल सन १८०६.

## डी. नंबर ३०७

**होलकार कैफियत**
**HŌLKĀR KAIFIYAT**

**कागद :** फ्रेंच बनावट. ७"x ८". १२ ओळी. मोडी. जुने. खराब. पूर्ण.

डी. नंबर १२६ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ४०३ वर येणाऱ्या या कैफियतीचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सर्वच पृष्ठे पानकिड्यांमुळे छिद्रे पडलेली व सुट्या अवस्थेत असून अतिलेखन व दोन ओळींमधील दाटीवाटीचे लेखन अनेक ठिकाणी दिसून येते. होळकरांचे मूळ व इतिहास या कैफियतीत येतो. याआधीच्या कैफियतीचाच विषय यात असला तरी काही अधिक माहिती यात दिलेली आहे. याआधीच्या कैफियतीत दिल्याप्रमाणेच मल्हारराावजी होळकर व यशवंतराव होळकर यांची माहिती आहे; तसेच प्रारंभ व शेवट हेही याआधीच्या कैफियतीप्रमाणे आहे.

## डी. नंबर ३०८

**होलकार कैफियत**
**HOLKĀR KAIFIYAT**

**कागद :** इंग्लिश बनावट. ८"x १०". १५ ओळी. जुने व खराब. अपूर्ण.

डी. नंबर १४० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ४९ वर ही कैफियत येते. हस्ताक्षर वाच्य असले तरी पृष्ठे अतिशय खराब अवस्थेत आहेत. डी. नंबर ३०६ मध्ये सांगितल्याप्रमाणेच या कैफियतीचाही आशय आहे.

प्रारंभ व शेवट त्याप्रमाणेच आहेत.

■

# मद्रासची मराठी हस्तलिखिते

## गव्हर्नमेंट ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररी
## मद्रास

मराठी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची

## विभाग दुसरा

१. आज्ञापत्रे : डी. नंबर ३०९ ते ३२२.

२. ऐतिहासिक पत्रे : डी. नंबर ३२३ ते ४४४.

# प्रस्तावना

मद्रास शासनाच्या आज्ञेवरून या ग्रंथालयाने मराठी हस्तलिखितांच्या वर्णनात्मक सूचीचा तयार केलेला हा दुसरा खंड. पृष्ठ व दप्तर यांचे क्रमांक पहिल्या खंडाशी जोडून त्यानंतरचे यात दिलेले आहेत. या ग्रंथालयातील मराठी विभागातील हस्तलिखितांचे विषयानुसार वर्गीकरण केलेले आहे. या खंडातील हस्तलिखिते मोडी लिपीत लिहिलेली असून 'आज्ञापत्रे, सनदा आणि ऐतिहासिक पत्रे' असे त्यांचे स्वरूप आहे. अकारविल्हे आणि विषयानुसार अशा अनुक्रमणिका आधीच प्रकाशित केलेल्या आहेत. हस्तलिखिताची स्थिती, एकूण स्वरूप, त्यातील मजकुराचा सारांश आणि प्रारंभीच्या व अखेरीच्या काही ओळी अशा नोंदी केलेल्या आहेत. सर्वच हस्तलिखिते मोडी लिपीत लिहिलेली असून खराब अवस्थेत आहेत. त्यांतील काहींची दुरुस्ती करून बांधणी केलेली आहे. त्यांतील भाषेचे स्वरूप स्पष्ट व्हावे म्हणून मोडीचे देवनागरीत लिप्यंतर केलेले आहे. त्यांतील बहुसंख्य हस्तलिखितांत अशुद्ध शब्दलेखन व चुकीची विरामचिन्हयोजना केलेली आढळते. त्यांचा आशय बिनचूक मांडावा म्हणून खूप काळजी घेण्यात आलेली आहे.

ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची ठरतील अशी यांतील काही पत्रे पुढीलप्रमाणे आहेत :

१. कुण्या अवधानी भीमाचारी यास श्रोत्रीय म्हणून काही जमीन दान देण्याविषयी कडाप्पा जिल्ह्यातील पुलिवेंडल येथील अधिकाऱ्यास उद्देशून बल्लाळ याने काढलेले आज्ञापत्र — डी.नंबर ३०९.

२. बेल्लारी जिल्ह्यातील नरसिंहस्वामी मंदिराच्या योगक्षेमासाठी सर्वमान्यम् म्हणून गुटकोलम या खेड्याचे दानपत्र — डी.नंबर ३१०.

३. कदिरीपती नायडू यास गूर्मकोंडा तालुक्यातील काही खेडी दान दिल्याबद्दलची माधवराव बल्लाळ याची सनद — डी.नंबर ३१९.

४. गूर्मकोंडाचा सुभेदार अंबाजी बाबूराव याचे वर्धम भट्ट यास अर्धी सुवर्ण (वा रौप्य) मुद्रा-दान — डी.नंबर ३३५.

५. वेमपल्ली खेड्यातील वेंकटकृष्ण भट्ट यास दोन सुवर्णमुद्रांचे दान — डी.नंबर ३४३.

६. संगलपट्टणम् येथील ह ल रेड्डी यास दिलेला कौलनामा (Kavulname) — डी.नंबर ३६०.

७. कडाप्पाच्या नबाबाने कडाप्पा येथील तेरा मशिदींना मंजूर केलेले दान-(Yoemias) — डी.नंबर ३६५.

८. जमलमडुगू तालुक्यातील अब्दुल सय्यद खान याच्या दर्ग्यास टिपू सुलतानाने मंजूर केलेली देणगी (किंवा दान - Yoemia) — डी.नंबर ४२२.

मद्रास
१२-१०-१९५७

टी चंद्रशेखरनन्
(ग्रंथपाल)

# आज्ञापत्रे व सनदा

## डी. नंबर ३०९

**आज्ञापत्र माधवराव बल्लाळ प्रधान**
**A̲JN̄APATRA MĀDHAV RAO BAL̲Ā̲L PRADHAN.**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x ६". १९ ओळी. मोडी. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पुणे मुक्कामी असणारे पंतप्रधान महादेवराव बल्लाळ यांचे हे आज्ञापत्र या भागाच्या पृ. ३७४ वर येते. हस्तलिखित बऱ्यापैकी व वाच्य आहे. काही उर्दू शब्द असलेले काळ्या शाईतील वर्तुळाकार सील पानाच्या– कागदाच्या– वरच्या उजव्या कोपऱ्यात दिसून येते. मराठा राजांचे हे दरबारी सील आहे असे गृहीत धरता येईल. दानपत्र किंवा सनद असे या आज्ञापत्राचे स्वरूप आहे. फसली व पर्शियन या दोन्ही कालगणनांत तारखेची नोंद केलेली आहे. मूळ अस्सल दस्तऐवजाची ही नक्कल असावी, पण त्यावर दान देणाऱ्याची सही नाही. मल्याळ परगण्यातील देशमुख-देशपांड्यांना उद्देशून पेशव्यांनी काढलेले हे आज्ञापत्र आहे. पुलिवेंडल गावचा रहिवासी कुणी अवधानी भीमाचारी यास मलपई खेड्यातील शेतजमीन वगैरे श्रोत्रीय कराराने दिली असल्याचा मजकूर त्यात आहे. भीमाचारीच्या विनंतीवरूनच सनदेची अंमलबजावणी होत आहे. सरकारात श्रोत्रीय कराराप्रमाणे भरायचा नजराणा आणि खेड्यात इनामदारास असणारे भोगवट्याचे हक्क यांची नोंद नेहमीच्या मराठी वाक्प्रचारांनी केलेली आहे. या सनदेची नक्कल करून घेऊन मूळ प्रत इनामदारास परत करावी आणि वार्षिक नूतनीकरणासाठी ती (इनामदाराने) पेशव्यांपुढे सादर करण्याची जरुरी नाही असे सनदेच्या शेवटी म्हटलेले आहे. नक्कलकाराचे नाव किंवा सनदेची नक्कल कशी मिळाली वगैरेबद्दलची माहिती दिलेली नाही.

**प्रारंभ :** आमीलन हाल व इस्तकबाल व देसमुख व देसपांडीय परगणे मल्याल बीदांनद सुहुर सन ११४७ फसली. बाईसम अवधानी भीमाच्यार्ये साखीन पुलीवेंदल यानी हुजुर एऊन सरकारयाकडून श्रोत्रीयं गाव पाहिजें म्हणोने अर्ज केला करीतां.

**शेवट :** हाल अवलाद पौ बे हुजुर चालवीतें जाणें. दरसाल ताजे परवानाचे हुजूर न करणें. सनदेची नकल लिहुन घेऊन असल आच्यासें देणे. जाणीजें. छ १७ माहे जमादिलवल सन १२५१, हिजरी मोर्नबुसुद.

## डी. नंबर ३१०

**आज्ञापत्र माधव राव बालाल प्रधान**
**A̲JN̄APATRA MĀDHAVA RAO BALĀL PRĀDHĀN**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x१०". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पुणे येथील पेशवे माधवराव बल्लाळ यांनी एक ब्राह्मण वेदमूर्ती नरसिंहाचारी यास इनाम दिल्याबद्दल जारी केलेले हे एक आज्ञापत्र आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. अरबी आणि शालिवाहन शक अशा दोन्ही तारखा या आज्ञापत्रावर आहेत. गूर्मकोंडा येथील नरसिंहस्वामी मंदिरात दैनंदिन पूजाअर्चेसाठी लागणारे साहित्य विकत घेण्यासाठी बेल्लारी येथील बळवंतराव गणपतराव याने गूटकोलम हे बेल्लारी जिल्ह्यातील संपूर्ण खेडे कायम देणगी म्हणून दिले. ही देणगी मीर राजा अलीखान याच्या काळातही चालू होती, पण नंतर काहीही कारणे न देता दान जमिनी राज्याने ताब्यात घेतल्या. प्रस्तुत आज्ञेच्या द्वारा प्रधान (पेशवे) यांनी जाहीर केले की, हे खेडे नरसिंहाचारी यास कायम दान म्हणून दिलेले असून नरसिंहस्वामींची पूजाअर्चा चिरंतन काळपर्यंत करण्यासाठी हे दान आहे. नूतनीकरणासाठी हे आज्ञापत्र हुजुरांपुढे पुन्हा सादर करण्याची जरुरी नसल्याचेही लिहिले आहे. मूळ सनदेची तारीख विकृती शके १६९२ असून प्रधानांनी त्याची अंमलबजावणी केल्याची तारीख २६ जमादिलवल, सन १७७२ इसवी अशी आहे.

**प्रारंभ** : आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्रि माधवराव पंडित प्रधान, तालुके मोकदमा मौजे कोंडमनायेक पाळयम पैकी अनंतर कुंटाकुळ सरकार गाजीकोटा सुहुरसन इहदे सबैन मया व अलफ शेके १६७२ विक्रती संवछर श्रि नरसींव्ह देव वास्तव्ये कसबा बल्लारी.

**शेवट** : श्रीचे पूजेस साहित्यास करार करुन देऊन हे आज्ञापत्र तुम्हास सादर केले असें. तरी मौजे मजकूरी हा गाव श्रीचे पूजेच साहित्य पेषजी पासून चालत अल असे. त्याप्रमाणे चालवणे. दर साल ताजे सनदाच हुजूर नकरणें या सनदेचा प्रती लिहुन घेऊन असल सनद भोगवठास परतून देणें जाणीजें छ २७ जमादिलावल. आज्ञामनणे.

## डी. नंबर ३११ (अ)

### आज्ञापत्र माधवराव बलाळ प्रधान
### ĀJNĀPATRA MĀDHAV RAO BALĀL PRĀDHAN

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x १०". १९ ओळी. मोडी. चांगले पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

कुण्या एका वेदमूर्ती नरसिंहाचारी यास पेशवे माधवराव बल्लाळ यांनी दिलेले हे इनामपत्र आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. अरबी व शक या दोन्ही तारखा प्रस्तुत आज्ञेवर आहेत. गूर्मकोंडा येथील नरसिंहस्वामींच्या दैनंदिन पूजेअर्चेच्या साहित्याच्या खरेदी व्यवस्थेसाठी बेल्लारीच्या कुणा बळवंतराव गणपत याने बेल्लारी जिल्ह्यातील गूटकोलम हे जवळजवळ सर्व खेडे कायम देणगी म्हणून दिल्याचे सांगितले आहे. ही देणगी मीर राजा अलीखान याच्या काळातही चालू होती. वेदमूर्ती नरसिंहाचारी याच्या विनंतीवरून प्रधान पेशवे यांनी या आज्ञापत्राद्वारे गूटकोलम हे सर्वच खेडे नरसिंहस्वामी मंदिरातील दैनंदिन पूजाअर्चेच्या व्यवस्थेसाठी देणगी म्हणून दिले. याबरोबरच प्रस्तुत इनामपत्राचे दर वर्षी नव्याने नूतनीकरण करून घेण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले आहे. सनदेवरील तारीख विकृती शक १६९२ असून दानपत्राच्या नूतनीकरणाची तारीख २६ जमादिलावल, १७७२ इसवी अशी आहे.

**प्रारंभ** : आज्ञापत्र समस्त राजकार्ये धुरंदर विस्वासनिधी राजमान्येश्रि माधवराव पंडित प्रधानें तालुका मोकदमा मौजे कोंडमनायेक पाळयम पैकी (उनबर) कुंटा कुळे सरकार गंजी कोठा सुहुरसन इहिदे सबैन मया व अलफ शके १६८२ विक्रती संवछर श्री नरसिंव्ह देवस्थान कसबा बेल्लारी.

**शेवट** : श्रीचे पूजसे साहित्यास करार करुन देऊन हे आज्ञापत्र तुम्हास सादर केले असें. तरी मौजे मजकुरी हा गाव श्रीचे पूजेच साहित्यास पेषेजी पासुन चालत अल आसेल त्या प्रमाणे चालवणे. दर साल ताजासनदाचे हुजुर नकरणें यां सनदच प्रती लिहुन घेऊन असल सनद भोगवटास परतून देणें. जणीजें छे २७ जमादिलावल आज्ञा मानणे.

## डी. नंबर ३११ (ब)

### आज्ञापत्र माधवराव बल्लाळ प्रधान
### AJNĀPATRĀ MĀDHAVA RAO BALĀL PRADHĀN

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x१०". १६ ओळी. मोडी. चांगले पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृष्ठ ३९२ वर येणाऱ्या पेशव्यांच्या या इनामपत्राचे हस्ताक्षर बऱ्यापैकी असून वाच्य आहे. गंजीकोटा येथील कसाविसदारास लिहिलेल्या पत्राच्या स्वरूपात हे इनामपत्र असून त्यावरील तारीख इ. स. १७१२ म्हणजे विकृती शके १६९२ अशी आहे. मीर राजा अलीखान याने कदरी तालुक्यातील तीन खेडी गूर्मकोंडा येथील श्री नरसिंहस्वामी यांस इनाम दिली होती. वेदमूर्ती नरसिंहस्वामी यांच्या विनंतीवरून सदरहू देणगीस मराठा राज्याकडून नूतनीकरणासह मान्यता दिली गेली आहे. देणगी म्हणून मंजूर झालेल्या जमिनींचा तपशीलही सांगितलेला आहे. मालकाचे नाव किंवा ही नक्कल मिळविण्याबाबतची माहिती दिलेली नाही. नक्कलकाराच्या नावाचाही उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ** : १. तालुका कमावीसादार वर्तमान व भावी परगणें कदरीं सरकार गेजीकोटा गोसावी यांस. अखंडीत लक्ष्मी अळंकृत राजमान्ये राजेश्री माधवराव बल्लाळ प्रधान आसीर्वाद. (५ नंबर) व नमस्कार. सुहुरसन इहिदे सबैन मया व अलप शके १६७२ विक्रती नाम संवछर श्री नरसींम्ह देव वास्तवे कसबे कदरी प्रगणे मजकुर येथील पूजेच साहित्यास कसब कदरी.

**शेवट** : श्रीकडे चालवणे दर साल ताजा सनदेचि हुजुर न करणे. या सनदेचि प्रती लिहुन घेऊन असल सनद भोगटायास परतून देणे जाणीजें छे २६ जमादिलावल आज्ञामानणे.

## डी. नंबर ३११ (क)

**आज्ञापत्र माधवराव बल्लाळ प्रधान**
**AJNAPATRA MADHAV BALAL PRADHAN**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x१०". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

महनद येथील ग्रामाधिकाऱ्यासाठी माधवराव बल्लाळ पेशवे यांनी काढलेले हे आज्ञापत्र या भागाच्या पृ. ३८३ वर येत असून त्याचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. गूर्मकोंडा ओलांडून जाणाऱ्या वस्तूंवर जकात कर बसवून तो वसूल करण्याचे अधिकार नरसिंहस्वामी देवस्थानाच्या व्यवस्थापकास द्यावेत असा एक विनंती अर्ज कुणी एका गुरुस्वामी नरसिंहस्वामी याने पेशव्यांकडे केलेला होता. त्यावरून असा कर वसूल करण्यास परवानगी देणारे हे आज्ञापत्र काढले गेले. यात हे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, देवाच्या पूजाअर्चेचे साहित्य खरेदी करण्यासाठी या करातून जमणाऱ्या रकमेचा विनियोग झाला पाहिजे. या आज्ञापत्रावर अरबी व शालिवाहन शकातील तारीख दिलेली आहे. हे आज्ञापत्र ७ जमादिलावल १७७२, विकृती शके १६९२ या तारखेस काढले गेले आहे. नक्कलकाराचा किंवा ही आज्ञा जारी करणाऱ्याच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. तसेच मूळ अस्सल कागद कोठून मिळाला याचाही खुलासा नाही.

**प्रारंभ** : राजश्री कमाविषदार व वर्तमान व भावी परगणे कदरी व तालुका कुटाकुळी व xxxx तालपुल सरकार गंजीकोटा गोसावी यास.

**शेवट** : या सनदेच प्रती लिहुन घेऊन असल सनद भोगवटा यास परतून देणे जाणिजे. छे ७ जमादीलवल आज्ञा मानणे.

## डी. नंबर ३१२

**आज्ञापत्र माधवराव बल्लाळ प्रधान**
**AJNAPATRA MADHAVA RAO BALAL PRADHAN**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x१०". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

हीसुद्धा २६ जमादिलावल, इ. स. १७९२ (?) म्हणजे विक्रम संवत १७९२ अशी तारीख असलेली पेशव्यांनी जारी केलेली आज्ञा आहे. या भागाच्या पृ. ३८४ वर येणाऱ्या या आज्ञापत्राचे हस्ताक्षर बऱ्यापैकी असून सुवाच्य आहे. ज्यामध्ये कदरी तालुक्यातील प्रजेकडून ते साजरे करतील त्या प्रत्येक विवाहामागे एक रुपया वसूल करण्याची गूर्मकोंडा येथील व्यवस्थापक श्रीनरसिंहाचारी यास पेशव्यांनी दिलेल्या मूळ अस्सल आज्ञापत्राची ही नक्कल आहे. यासोबतच जमा होणारी सर्व रक्कम गूर्मकोंड्याच्या नरसिंहस्वामी मंदिराच्या पूजाअर्चेसाठी खर्च केली पाहिजे असेही सांगितलेले आहे. या आज्ञापत्रावर ना सील आहे, ना त्याची अंमलबजावणी करणाऱ्याची सही आहे.

**प्रारंभ** : राजेश्री कमावसीदार व वर्तमान व भावी प्रगणे कुट कुळम सरकार गंजीकोंटा गोसावी यास.

**शेवट** : भोगवटा पासून चालत आल्या प्रमाणें एक रुपया सदरहु चालवणें. दरसाल नवी सनदेची हजुर न करणें. या सनदेचे प्रती लीहुन घेऊन असल सनद भोगवटा यास परतून देणें. जाणीजे. छे २५ जमादीलवलु आज्ञानमानणें.

## डी. नंबर ३१३

**आज्ञापत्र माधव राव बल्लाळ प्रधान**
**AJNAPATRA MADHAV RAO BALAL PRADHAN**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x१०". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

७ जमादिलावल १७९२ म्हणजे विकृती १६९२ अशी तारीख असलेला हा दस्तऐवज म्हणजे पेशव्यांच्या आज्ञापत्राचीच नक्कल आहे. या भागाच्या पृ. ३८५ वर हा कागद येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. त्यावर ना दरबारी सील आहे, ना कार्यकारी अधिकाऱ्याची सही. यात गूर्मकोंडा येथील नरसिंहस्वामीच्या मंदिराचा व्यवस्थापक नरसिंहाचारी याची खास विनंती पेशव्यांनी मान्य केलेली आहे. कदरी तालुक्यातून जमा होणाऱ्या वसुलापैकी काही रक्कम माफ करून ती मंदिराच्या व्यवस्थापनासाठी खर्च करावी अशी त्या आज्ञापत्रात सूचना आहे.

**प्रारंभ** : अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री माधव राव बल्लाळ प्रधान आसीर्वाद नमसकार सुहरसन इहिदे सबैन मया व अलफ शके १६९२ विकृती संवछर.

**शेवट** : होन अर्धा मोकार करुन देऊन सनद तुम्हास सादर

केल असे. मीर आली यानें करार करुन दिलहे त्याप्रमाणे आज पर्येतर चालत आले यांची भोगवटा मनास आणून त्याप्रमाणे चालवणें दर साल नवी सनदाचे हुजुर न करणे. याची प्रती घेऊन असल सनद परतून देणे छे ७ जमावीलवल आज्ञामानणें.

## डी. नंबर ३१४

**आज्ञापत्र माधव राव बळाल प्रधान**
**ĀJÑĀPĀTRĀ MĀDHAVA RAO BALĀL PRADHĀN**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x६". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३८६ वर पेशव्यांचे हे आज्ञापत्र येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. रामस्वामी मंदिरातील पूजाअर्चा व पुजाऱ्यांचे पगार यासाठी गूर्मकोंडा येथील श्री नरसिंहस्वामी मंदिराच्या व्यवस्थापकास जमविलेल्या व कोट्टाकलमद्वारा निर्यात केलेल्या मिठावरील काही जकात कर जमा करण्याच्या अधिकाराचे नूतनीकरण पेशव्यांनी या आज्ञापत्राद्वारे केलेले आहे. या सनदेवर १२ रमझान १२१४ हिजरी अशी तारीख आहे. मूळ अस्सल दस्तऐवजाची ही नक्कल असली तरी तीवर सील नाही, तसेच कार्यकारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

**प्रारंभ** : आमीलन ईस्तकबाल तालुका कदरी समत कुंटकुळ बिदनद. दरीविल्ला मोबलग निमक फलम कटेराई कदरी रामस्वामी देवळास योमीया मोकरोर करुन दिलह आसे तरी देवळ मजकुर पूजारी जिमेस राजे मजकुर....

**शेवट** : त्यास कबज घेत जाणेजे. कबजप्रमाणे मुजरयेईल दरी बाबाद ताकीद आला आहे ते जाणुन दर साल ताजे सनदची उहुजर न करीतां सरकारवाले सनद नकल लिहून घेऊन असल भोगवटास वापस देणे वा तारीक छे १७ रमजान.

## डी. नंबर ३१५

**आज्ञापत्र माधवराव बळाल प्रधान**
**ĀJÑAPATRĀ MADHĀV RAO BĀLAL PRADHĀN**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x१०". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३८६ वर येणाऱ्या या आज्ञापत्राचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. कूर्मकोंडा येथील श्री नरसिंहस्वामी मंदिरास पूजाअर्चेसाठी मंजूर केलेली रोख रक्कम पूर्वीप्रमाणेच नियमितपणे चालू ठेवावी असे यात सांगितलेले आहे. मंदिर-प्रमुखांना अशी सूचना देण्यात आलेली आहे की, त्यांनी स्वतःच पैसे जमा न करता तालुक्याच्या कार्यालयातून पैसे न्यावेत. सनदेची तारीख १५ रमजान १२१४ हिजरी, म्हणजे १५ माघ मास सिद्धार्थ नाम संवत्सर अशी दिलेली आहे. ही सनद काढणारा किंवा ज्यांच्यासाठी ही नक्कल तयार केली गेली त्यांपैकी कुणाचीच नावे वा सविस्तर माहिती दिलेली नाही.

**प्रारंभ** : आमीलान इस्तकबाल ताळुके कदरी कुटकुलम बिदनद.

**शेवट** : देत जावून मोबलगे मा पावल त्यास कबज घेत जाणें म्हणजे कबजे प्रमाणे मुजरा येईल हर वाबद ताकीद जाणौन दर साल ताजे सनदाचे हुजुर न करीतां सालदरसाल चालवेण. सिधार्थ नाम संवछर.

## डी. नंबर ३१६

**आज्ञापत्र माधव राव बलाळ प्रधान**
**ĀJÑAPATRĀ MĀDHAV RAO BALĀL PRĀDHAN**

**कागद** : इंग्लिश बनावट. १२"x ६". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३५७ वर येणाऱ्या या सनदेचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सोमनपल्लीचा पाळेगार वेंकटमल्लप्पा नायडू याच्याजवळ असलेल्या मूळ अस्सल सनदेची ही नक्कल आहे. सोमपल्लीचा पाळेगार कुमार मल्लाप्पा नायडू यास २४ सफर १७७२ रोजी माधवरावाने लिहिलेले पत्र असे या सनदेचे स्वरूप आहे. या सनदेद्वारे पाळेगारास असे कळविण्यात आलेले आहे की, त्याच्या व्यवस्थापनाखाली दिलेल्या जमिनींच्या मोबदल्यात त्याने सरकारी खजिन्यात विशिष्ट रक्कम भरावी; पण अट म्हणून घातलेली नेमकी रक्कम आणि त्याला दिलेली ठिकाणे किंवा खेडी यांची नावे दिलेली नाहीत. या सनदेवर माधवराव पेशवे यांची स्वाक्षरी आहे. ही सनद ज्याच्याजवळ होती त्याचे नाव किंवा हिच्या नक्कलकाराचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** नकल अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री कुमार मलप नायडु साहबे सोमनपळी गोसावीयास. श्री माधवराव बलाळ प्रधान आसीर्वाद. सुरसन इहींदे सबैन मया व आलफ तुम्ही राजेश्री राजा गोवीदं व किल्ल्यास पाटवीले यानी हुजुर येऊन कितके संस्ताना जूची नातवानी निवेदन करुन.

**शेवट :** दिलहें आहें त्याप्रमाणे सदरहु ऐवज सरकारांत पावत करुन पावल्योच जवाब घेऊन सुखरुप राहणें. या विपइ जास्ती उपसर्ग लागणार नाहीं जाणिजें. छ २४ सफर आज्ञाप्रमाणें. राजाराम नरपती हरुष निधान माधवराव बलाळ पंतप्रधान.

## डी. नंबर ३१७

आज्ञापत्र माधव राव बलाल प्रधान
**AJNAPATRA MADHAV RAO BALAL PRADHAN**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x६". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

सोमनपल्लीचा पाळेगार कुमारस्वामी नायडू यास माधवराव बल्लाळ यांनी दिलेली ही सनद या भागाच्या ३८८ व्या पृष्ठावर येते. हस्तलिखित बऱ्यापैकी व वाच्य आहे. हा एक कडाप्पा जिल्ह्यातील पाळेगार होता. सनदेवर १ जमादिलावल १७७२ अशी तारीख आहे. एका तहान्वये दर वर्षी अशी काही विशिष्ट रक्कम या पाळेगाराने पेशव्यांना देणे ठरलेले होते; पण काही अनाकलनीय कारणांमुळे तो तसे करू शकला नाही. त्यासाठी रक्कम न भरण्याची कारणे देण्याविषयी पेशव्यांनी त्यास लिहिलेले असून मुळात ठरलेल्या अटी न पाळल्यामुळे त्यास पाळेगारीवरून का कमी करण्यात येऊ नये अशी 'कारणे दाखवा' नोटिस दिलेली आहे. पाळेगाराने प्रत्यक्ष भेटून केलेल्या खुलाशामुळे पेशव्यांचे समाधान झाले आणि पाळेगाराकडे दिलेली दौलत पूर्ववत ठेवलेली असून बाकी रक्कम त्याने चार समान हप्त्यांत भरावी असे हे नवे आज्ञापत्र आहे. या सनदेवर कुण्या बाजीराव रघुनाथाची सही आहे.

**प्रारंभ :** अखंडित लक्ष्मी अलकृतं राजमान्ये राजेश्री कुमार मलहनायडे साकीन सोमनपळी गोसावीयाहांस राजेश्री बाजीराव रघुनथ नामजाद सरकार कुरमकोंडा वगैरे प्रांत कडपा आसीर्वाद.

**शेवट :** (तरी) दफ्तर बंदी प्रमाणे ऐवज पावत करुन पावल्याचे जवाब घणे व सरकारास एक निष्टेन वर्तणुक करुन सुखरुप राहाणें. छ १ जमादीलवल. बहुत काय लीर्णे. श्री बलकृष्टण चेरणी तत्पर बाजी राव रघुनाथ निरंतर लेखन सीमा.

## डी. नंबर ३१८

आज्ञापत्र माधवराव बल्लाळ प्रधान
**AJNAPATRA MADHAV RAO BALAL PRADHAN**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x ६". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. १६५ वर येणाऱ्या या आज्ञापत्राचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. गूर्मकोंडा येथील कद्रीपती नायडू याला २२ रमजान १७७२ ही तारीख असलेल्या व मोडी लिपीत लिहिलेल्या माधवराव बल्लाळ पेशवे यांनी दिलेल्या सनदेची ही नक्कल आहे. याच्या पहिल्या पृष्ठावर वरच्या मध्यभागी पेशव्यांचे त्यांच्या किताबांसह सील आहे. तालुका व जिल्हा यांच्यासह त्यांतील ठिकाणांच्या नावांचा उल्लेख या सनदेत केलेला आहे. पाळेगाराने पेशव्यांना पेशकश (नजराणा) म्हणून त्या काळातील मराठा चलन असलेल्या (चकर) या नाण्यात विशिष्ट रक्कम द्यायची असे नक्की करण्यात आले होते. किस्त (कर) जमा करणे, पेशकशचा भरणा करणे आणि खेड्यातील मंदिरांची देखभाल याविषयीची सनदेतील सहा कलमे काटेकोरपणे नोंदविलेली आहेत. काही कुटुंबांतून केलेली जमा, भविष्यात जमा करायची रक्कम, शेतजमिनीचा सुपीकपणा आणि अशाच इतर काही गोष्टी यांचा एक तौलनिक तक्ताही यात मांडलेला आहे. यात दात्याची सही किंवा ज्याच्याकडून ही सनद नकलून घेतली त्याचे नाव दिलेले नाही. शेवटी 'शेवट' अशी अक्षरे असलेले एक गोल सील दिसते.

**प्रारंभ :** राजाराम नरपती हरष निधान माधवराव बलाळ पंत प्रधान. श्री आज्ञा पत्र राजेश्री पंतप्रधान मोकदमं देहाये. परगणे हसनापूर गुरमकोंडा सुर सन इहीदे सबैन मया व अलफ कद्रीपती नायडु सामील सोमनपलीकार याचकड परगणे मजकुर पौ देहाये येथील कावली वगैरे करार करुन दिलहे कलमे बीत तपसील.

**शेवट :** येकून साहा कलम पैकी कावली संमध पांच गावचे इजारीयाद येक यणे प्रमाणे करार करुन देवून हे आज्ञा पत्र सादर केले असे. तरी सदरहू लिहील्या प्रमाणे दणे जाणिजे. छ २२ रमजान आज्ञा पत्र प्रमाणे.

## डी. नंबर ३१९

**आज्ञापत्र माधव राव बल्लाळ प्रधान**

**AJNAPATRA MADHAV RAO BALAL PRADHAN**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x ६". १९ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये लिहिल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ.१७२ वर दानपत्र वा सनद याची ही नक्कल येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. माधवराव बल्लाळ यांच्या किताबाची अक्षरे धारण करणारे एक वर्तुळाकार मोठे सील पहिल्या पृष्ठाच्या वरच्या मध्यभागी दिसते; तसेच एक छोटे सील शेवटच्या पृष्ठाच्या खालच्या भागात जणु 'अखेर'ची सूचना देताना दिसून येते. या सनदेत जवळजवळ सात विभाग असून त्यांत खेड्यांची नावे, त्यांच्यातून येणारे उत्पन्न आणि त्यांतून जमा होणारा 'कवल' कर इत्यादी गोष्टी नोंदलेल्या आहेत. पदपल्ली हसनपूर या जिल्ह्यातील गूर्मकोंडा तालुक्यातील काही खेड्यांचे सर्वाधिकार उपभोगण्याचे हक्क कद्रीपती नायडू यास माधवराव बल्लाळ पंतप्रधान यांनी दिले असल्याचे सनदेच्या पहिल्या परिच्छेदात नमूद केलेले आहे. अरबी कालगणनेनुसार तारीख दिलेली असून ती २२ रमजान १७७२ अशी आहे. पाळेगारास अशी सूचना दिलेली आहे की, त्याने रयतेकडून 'कवल' कर जमा करावा आणि त्या बाबतीत ठरलेल्या पेशकशच्या रकमेसोबत तो पेशव्यांच्या खजिन्यात भरावा. मराठ्यांमध्ये रूढ असलेल्या पद्धतीप्रमाणे जमीनमोजणीचा हिशेब आणि सनदेत लिहिलेले चलन आहे. या सनदेवर पेशव्यांची स्वाक्षरी नाही किंवा ज्याच्याकडून ही नकलून घेतली त्याचेही नाव नाही. मंजूर केलेल्या खेड्यांच्या नावांची यादी, त्यांचा नेमका जमा होणारा महसूल, 'कवल' कर पेशकश म्हणून भरणा करण्याची नेमकी रक्कम, भरणा करण्याची शेवटची तारीख आणि असेच इतर काही तपशील विस्ताराने दिलेले आहेत.

**प्रारंभ :** श्री राजाराम नरपती हरष निधान माधव राव बळाल पंत प्रधान. नमर आज्ञापत्र श्री पंतप्रधान ता माकेदम. देहाय (प्रगणे), पडपली हसनापुर सा. (सामील) गुरमकोंडा, सुरसन इहिदे सबैन मया अलफ कद्रीपत नायडु कोलापळी कर याजकड परगणे मजकूर पैकि देहहाये येथील कावली व गैरकरार करुन केलते. कावली कदीम दर होनास मामलीस चेकरे था प्रमाणें.

**शेवट :** चोवीस चकरे उत्तम मध्यम कनीष्ट मीळुन येकुन सरासरी दर फडीस चकरे आठ प्राण अकरा चकरे चौसष्ट चकरे आट कुंडा जमीनचे आजमायष अकार सदरहु चौसष्ट चकरे कलम एक १ येकुन पांच कलमपैकी कावली संमध्ये चकरे गावच इजाराचे एक आणे प्रमाणे करुन देवुन हे आज्ञापत्र सादर केलें असें तरी सदरहू लिहिले प्रमाणें देत जाणे जाणिजे छ २२ रमजान आज्ञा प्रमाणे. लेखन सिखा.

## डी. नंबर ३२०

**आज्ञापत्र माधवराव बलाळ प्रधान**

**AJNAPATRA MADHAV RAO BALAL PRADHAN**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x ६". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३४४ वर येणाऱ्या या दस्तऐवजाचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. हीसुद्धा कद्रीपती नायडू यास 'कवल' कर जमा करण्यासाठी माधवरावाने दिलेल्या परवान्याचीच नक्कल आहे. या सनदेनुसार तो गूर्मकोंडा तालुक्यातील काही खेड्यांचा पाळेगार नेमला गेलेला आहे. प्रस्तुत सनदेची तारीख १२ रमजान १७७२ अशी आहे. ही तारीख अरबी कालगणनेप्रमाणेच आहे. सोमनपल्ली येथील पाळेगार कद्रीअप्पा नायडू यास जिल्हाकूंबार कलव, तालुका गंजीकोटा यातील चार खेड्यांचे दान या आज्ञापत्राद्वारे पेशव्यांनी केलेले आहे. या खेड्यांची नावे, त्यांची वाढ व वाढलेल्या चतु:सीमा आणि तेथील रयतेकडून जमा होणारा 'कवल' कर, पेशव्यांकडे भरणा करायचा पेशकश आणि असेच इतर तपशील विस्ताराने वर्णिलेले आहेत. हा पेशकश भरण्याबाबत पाळेगाराने जास्त तत्पर असावे आणि कोणत्याही परिस्थितीत त्याने यास उशीर लावू नये वा त्यात सुटीची मागणी करू नये अशीही सूचना यात दिलेली आहे. पेशव्यांची सही किंवा ही सनद ज्याच्याकडून मिळाली-नकलली गेली त्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** श्री राजाराम नरपती हरपनिधान माधवराव बलाळ पंत प्रधान. आज्ञापत्र राजेश्री पंतप्रधान ता । मोकदम देहाये प्रा। कुंभार कालवा सां। गंजीकोटा सुरसन इहिदे सबैन मया व आळफ ११७१ कद्रीपत नायड कोलापलीकर याजकड परगणे मजकुर पौकि देहाये येथील कावली वगैरे करार करुन कलम बातपसील.

**शेवट :** येकून देहाय २ येथील इजारा करार करुन नायडु मजकुर याजकड कमाविषां सांगीतले आसे तरी नायडु मजकुर यांसी रुजु होवून मैजेमजकुरच अमल वसूल सुरळीत देणें कलम १. एकुन दोनी कलमे करार करुन देऊन हे आज्ञापत्र सादर केले असे तर सदरहु लिहील्याप्रमाणे देत जाणे जाणीजे. छ २२ रमजान आज्ञापत्र प्रमाणे लेखन सिमा.

## डी. नंबर ३२१

**आज्ञापत्र माधव राव बलाळ पंत प्रधान**
**AJNAPATRA MADHAV RAO BALĀL PANT PRĀDHĀN**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x ६". १९ ओळी. मोडी. चांगले. पूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३४४ वर येणाऱ्या सनदेचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. माधवराव पेशव्यांनी कद्रीपती नायडू यास 'कवल' कर जमा करण्यासाठी दिलेल्या सनदेची ही नक्कल आहे. या सनदेअन्वये त्याला गूर्मकोंडा तालुक्यातील काही खेड्यांचा पाळेगार नेमले गेले आहे. सनदेची तारीख १२ रमजान १७७२ ही आहे. याआधीच्या सनदांत उल्लेखिलेली सर्वसाधारण कलमेच यात आहेत. खेड्यांची नावे, चालू काळात जमा होणारी 'कवल' कराची रक्कम आणि जमा करणे आवश्यक असा पेशकश नजराणा इत्यादी स्वरूपाचा इतर तपशील यात नोंदलेला आहे. ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव किंवा ज्याच्या ताब्यात ही सनद होती त्याचे नाव नमूद केलेले नाही.

**प्रारंभ :** राजाराम नरपती हरष निधान बाजी राव रघुनाथ मुख्य प्रधान आज्ञापत्रा.

**शेवट :** सरकारचे कौल साल दर साल ह्यास मौजे मजकुराचे पावील कुलकर्णी हजुर येणार म्हणुन त्याज वरुन हे अभये पत्र साधर केले आहे तरी कोणते विषर वपास नकरीतां बेवापस हुजुर येणे जाणिजे. छ २४ रबला खर आज्ञाप्रमाणें.

## डी. नंबर ३२२

**आज्ञापत्र माधव राव बलाळ प्रधान**
**AJNAPATRĀ MĀDHAV RAO BALĀL PRĀDHĀN**

**कागद :** इंग्लिश बनावट. १२"x ६". १९ ओळी. मोडी. चांगले. अपूर्ण.

डी. नंबर १० मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या सनदेचा दस्तऐवज या भागाच्या पृ. ३८९ वर येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. माधवराव बल्लाळ पेशव्यांनी सोमनपल्लीचा पाळेगार कुमार मल्लाप्पा नायडू याला दिलेल्या सनदेची ही नक्कल आहे. या पाळेगारास दिलेल्या खेड्यांची नावे लिहिलेले पृष्ठ गहाळ झाले आहे. इनाम दिलेल्या खेड्यातील उत्पन्न पाळेगाराने उपभोगायचे असून पेशकश नजराणा पेशव्यांना द्यायचा आहे. पेशकशची रक्कम, ती भरण्याची वेळ आणि असेच इतर तपशील यात उल्लेखिलेले आहेत. खेड्यांतून जमा केला जाणारा पेशकश आणि 'कवल' कर यांचा तपशीलवार हिशेब दिला गेला आहे. या सनदेची तारीख १३ रबिलवल १७७२ आहे. सनद जारी करणाऱ्याचे किंवा ती ताब्यात असणाऱ्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** अखंडीत लक्ष्मी अळंकृत राजमानय राजेश्री कुमवमलप्प नायडे सा सोमपळी गोसावीयास.

**शेवट :** ३ छ रबीलवल सुरसन इहिद सेबन मया व अलप.

■

## डी. नंबर ३२३

**ऐतिहासिक पत्र**
**AITIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. ७"x६". १६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागात मोडी लिपीत लिहिलेली ३४ मराठी पत्रे आहेत. अशा सनदांशिवाय या भागात तेलगू व उर्दू भाषांत लिहिलेले काही दस्तऐवज आहेत.

या भागाच्या पृ. ७ वर येणारी सनद वा दानपत्र याची ही नक्कल आहे. पृष्ठे दुरुस्त केलेली असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. वेपालीपल्ली तालुक्यातील वृषभाचलम या गावातील श्रीअंजनीयस्वामी मंदिराला दिलेल्या रोख रकमेच्या दानाशी ही सनद संबंधित आहे. दात्याचे नाव किंवा प्रस्तुत गाव ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्ह्याचे नाव दिलेले नाही. त्या भागात जमा केल्या जाणाऱ्या आयात करातून मंदिराच्या देखभालीसाठी दिली गेलेली ही रोख देणगी जमा केली जाणार होती; पण जादा रक्कम देण्यास लोकांनी विरोध केला. तेव्हा आधीच्या शिरस्त्याप्रमाणेच लोकांनी करातील काही हिस्सा द्यावा आणि मंदिराच्या देखभालीच्या खर्चासाठी ती रक्कम वापरण्यात यावी असे ही सनद देणाऱ्याने जाहीर केले आहे. सनदेची तारीख ७ रजब १२०५ हिजरी अशी आहे. ही सनद काढणाऱ्याचे किंवा ती ज्याच्या ताब्यात होती त्याचे नाव दिलेले नाही. या मराठी दस्तऐवजाच्या वर आणि खाली काही तेलगू वाक्ये लिहिलेली आढळतात.

**प्रारंभ :** इजत असार आमीलान हल व इस्तकबल परगणे वेपली बिदनैद दरीविल्ला वृषभचले स्वामी गावचे आंजनेये स्वामीस परगणे मजकुरचे सायरा वरी दर रोजीना अफरंजी ६१ व एक फलमं.

**शेवट :** तकियुद करुन देवीजेस कींजें जाणिजें. छ ७ रजब पासून हे दरजेस ताकीद जे छ १४ माहे रजब सन १२०५ हिजरी. नकल येऊन्न असल त्यास देंणे बा तारीख सदर.

## डी. नंबर ३२४

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. ७"x६". १६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ६ वर येणारा हा दस्तऐवज म्हणजेसुद्धा एका सनदेची नक्कल आहे. पृष्ठे दुरुस्त केलेली असून मजकूर स्पष्ट दिसेल असा आहे. आयात कराशिवाय काही जादा रक्कम जप्त करून ती वृषभाचलमच्या श्रीअंजनीय मंदिराच्या देखभालीसाठी खर्च करावी असे सांगणाऱ्या आधीच्या सनदेशी निगडित आहे. मंदिरात नोकरीस असलेल्या व्यक्तींची नावे आणि जमलेल्या रकमेतून त्यांच्यासाठी नक्की केलेला मासिक पगार यांचा या सनदेत निर्देश केलेला आहे. २६ जमादिसानी १२०७ हिजरीपासून या सनदेतील आज्ञांची अंमलबजावणी करावी असे अखेरीस सांगितले आहे. शेवटच्या पृष्ठाच्या तळाशी काही तेलगू व उर्दू भाषांतील ओळी लिहिलेल्या आढळतात. दात्याचे किंवा ज्याच्याजवळ ही होती त्याचे नाव सनदेत आढळत नाही. सनदेची तारीख २५ जमादिसानी १२०७ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** मोबलग हनमंत गोपाळ राव अमील पेमपलि दर्वीला. परगणे मजकूर सायर ऐवजी योमीयादारास साबकचे सनदा प्रमाणे योमीया चालत असें.

**शेवट :** छ १० जामादिलवल लागायेत माहे दर माहे देऊन्न कबज देणे बा तारीख छ २१ माहे जमादिसानी सन १२०८ हिजरी.

## डी. नंबर ३२५

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". १० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ.९ वर येणाऱ्या या दस्तऐवजाचा कागद फार जुना असून दुरुस्त केलेला आहे. १६ रजब हिजरी १२१० ही तारीख असलेल्या एका सनदेची ही नक्कल आहे. कुणी गुरुचारी नावाच्या वृषभेश्वर गावाच्या रहिवाशास दररोज १० आणे असे जमलेल्या करातून निवृत्तिवेतन मिळत होते; पण काही अनाकलनीय परिस्थितीमुळे हे वेतन थांबविले गेले. तेव्हा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्यास त्या निवृत्ताने सनदेच्या नूतनीकरणासाठी आणि त्याचे दैनंदिन निवृत्तिवेतन त्याला मिळावे म्हणून विनंती केली. त्यानुसार त्याला ही सनद मंजूर करण्यात आलेली आहे. त्या मंजूर करणाऱ्याचे किंवा सनद ताब्यात असणाऱ्याचे नाव दिलेले नाही. सनदेच्या शेवटी तेलगू भाषेतील काही ओळी दिसतात.

**प्रारंभ** : आमीलान हाल व इस्तकबाल परगणे वेमपळी बीदनद मोबलग गुरु आचारी.

**शेवट** : हजूर मनुर मषगुल करीतो व हे दरीवदाचे ताकीद पदनंद नकल सनदाचे घेऊन्न असल वापस देणे. तारीख छ १६ माहे रजब सन १२७० हिजरी.

## डी. नंबर ३२६

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHASIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १२"x १०". १२ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ७ वर ही सनद येते. वृषभेश्वरम येथे राहणाऱ्या काही व्यक्तींना पेन्शन म्हणून काही रोख रक्कम मंजूर केल्याची ही सनद आहे. या सनदेअन्वये असेही सुचविले गेले आहे की, वेमपल्ली येथील अधिकाऱ्यांनी काही जादा रक्कम आयात कर व जकात ही जमा करावी आणि हे पैसे द्यावेत. शासनाने सांगितल्याप्रमाणे व्यक्तींना पेन्शन देण्याइतकी ही रक्कम असावी. मंजूर करणाऱ्याचे किंवा ज्यांना पेन्शन द्यायचे त्यांची नावे दिलेली नाहीत. ज्याच्याकडे या नकलेची मूळ सनद होती त्याचाही नामोल्लेख नाही.

**प्रारंभ** : आमीलान हाल व इस्तकबाल परगणे वेमपळी बीदनंद मोबलग च्यारी आने मीनसीफार.

**शेवट** : नवा हजर नुजुरु मषगुल करीताहेत. सदरी दाकीद बीदन नकल सनदचे घेऊन्न असल वापस देणे. तारीख छ १५ माहे रजब सन १२९० हिजरी.

## डी. नंबर ३२७

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHASIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १२"x १०". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

डी. नंबर ३२६ मध्ये सांलितल्याप्रमाणेच ही एका सनदेची नक्कल असून या भागाच्या पृ. ९ वर ती येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पृष्ठे दुरुस्त केलेली आहेत. वेमपल्ली येथील अधिकाऱ्यास कुणा एका वेंकटस्वामी नावाच्या व्यक्तीस काही रक्कम रोज पेन्शन म्हणून देण्याची आज्ञा करणारी ही सनद आहे. सनदेची तारीख १ शाबन हिजरी १२१२ अशी आहे. वर उल्लेखिलेल्या व्यक्तीस ही रक्कम त्या अधिकाऱ्याने आयात कर व जकात यांतून मिळणाऱ्या उत्पन्नातून द्यायची आहे. सनद मंजूर करणाऱ्या व्यक्तीचे नाव किंवा ज्याच्याकडील मुळावरून ही नकलली आहे त्याचे नाव दिलेले नाही. शेवटी तेलगूत लिहिलेल्या काही ओळी आढळतात.

**प्रारंभ** : अमीलान हाल व इस्तकबाल परगणे वेबली निविशेन xxx अमदीनी सायर तालुका मजकूर बा वेंकटस्वामीस बा तारीक मदद xxx

**शेवट** : दौलत मशकुल नावे सनदाच नकल परतुन देणे असल बा नफरास वापस देईजे सानी हाल सनद सदरी जाणीजे मासुद छ १ शाबोन सन १२९२ ईजरी.

## डी. नंबर ३२८

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHASIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १२"x १०". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

आधीच्या दस्तऐवजाप्रमाणेच हीसुद्धा एका सनदेची नक्कल आहे. या सनदेद्वारे उदरनिर्वाहासाठी कुण्या मूकियापराण्णास रोजच्या रोज रोख रक्कम दिलेली आहे. वेमपल्लीच्या ग्रामाधिकाऱ्यास अशी सूचना दिली गेलेली आहे की, त्याने जकात कर व इतर जमा रकमेतून हे दररोजचे पैसे द्यावेत. सनदेची तारीख

१ शबान हिजरी १२१२ अशी आहे. सनदेचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सनदेच्या खाली तेलगू भाषेत लिहिलेल्या काही ओळी आढळतात.

**प्रारंभ :** अमीलानहाल व इस्तकबाल.

## डी. नंबर ३२९

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. ७"x ६". १६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ११ वर ही सनद येते. तिच्या वर आणि खाली काही तेलगू शब्द लिहिलेले आहेत. काही ओळींत रिकाम्या जागा सोडलेल्या दिसतात. याचे कारण मूळच्या अस्सल कागदाची खराब अवस्था असेल किंवा नक्कलकाराला मुळातील काही शब्द लागले नसतील. परिणामी काही जागा मोकळ्या सोडणे भाग पडले असावे. महादेवराव बाळाजी याने कुण्या दुसऱ्या व्यक्तीला (ज्याच्या नावाचा यात निर्देश केलेला नाही) लिहिलेल्या पत्राचे स्वरूप प्रस्तुत सनदेत दिलेले आहे. तिची तारीख इ. स. १७८१ अशी आहे. आयात कराच्या रूपाने जमणाऱ्या पैशांतून एका विशिष्ट व्यक्तीस रोज एक सुवर्णमुद्रा द्यावी असे यात सांगितलेले आहे. ज्याला हे द्यायचे त्याचे नाव किंवा या दानपत्राची नक्कल ज्याच्याकडून मिळाली त्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** अखंडीत लक्ष्मी राजमान्ये राजेश्री नंदीमंडल वगैरे यासी सेवक माधवराव बालाजी नमस्कार.

**शेवट :** मजकूरचे अमल सरकार xx त्यास सुप्तमद प्रमाण अफरंजी फलम दर रोजी एक भलग मणुहुन आम्हासी xxx देऊन विहीत कोणी येथील मुला xxx वरुन पेषजी कसबा मजकूरचे अपरंजी सायरे सनद.

## डी. नंबर ३३०

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. ७"x ६". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

२५ सफर १७७० अशी तारीख असलेली हीसुद्धा एका सनदेची नक्कल आहे. कडाप्पाचा सुभेदार महिपतराव कृष्णा याने रामचंद्र नारायण गोस्वामी यास काही विशिष्ट रोख रक्कम मंजूर केल्याबद्दल लिहिलेले पत्र असे याचे स्वरूप आहे. रायकोट्टी तालुक्यातील सर्व मशिदी व दर्गे यांना दिवे लावण्यासाठी प्रत्येकी रोज एक पनम द्यावा असा याद्वारा सुभेदाराने आदेश दिलेला आहे. रायकोट्टी येथे जमणाऱ्या आयात कराच्या रकमेतून यासाठी लागणारे पैसे उभे करावेत. ही कायमस्वरूपी देणगी देण्यासाठीची आज्ञा आहे. ज्याच्या ताब्यात मूळ आज्ञापत्र आहे त्याचे किंवा नक्कलकाराचे नाव दिलेले नाही. सनदेच्या शेवटी तेलगू भाषेत लिहिलेल्या काही ओळी आढळतात.

**प्रारंभ :** राजेश्री विराजीत राज मानय राज श्री रामचेंद्र नारायण स्वामी गोसावी यासी पो महिपती राव कृष्टण सुभेदार सरकार गुरमकोंडा वगैरे प्रांत कडपा नमस्कार.

**शेवट :** व दरग्यास दर रोज चिराख बदल फलम अपरंजी १ एक चालत असल्याच दाखला मनास आणुन चालत आल असल त्या प्रमाणें सुरळीत चालवणें तागायेत छ २५ माहे सफर सुरसन सैबन मया अलफ बहुत काय लिहीणें.

## डी. नंबर ३३१

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ७". १० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

हीसुद्धा एका सनदेचीच नक्कल आहे. तिच्या खालच्या भागात तेलगू भाषेतील दोन ओळी आहेत. वेमपल्ली येथील मशिदीत दिवा लावण्यासाठी एक पनम मंजूर करण्यात आलेला आहे. ही देणगी कडाप्पाच्या नबाबांपासूनच मंजूर करण्यात आलेली होती. मशिदीच्या व्यवस्थापकाकडून केली गेलेली विनंती कडाप्पाच्या सुभेदाराने मान्य केली आणि वेमपल्ली येथील अधिकाऱ्यास ही मंजूर रक्कम जमा केलेल्या आयात करातून देण्यास सांगितले आहे. मंजूर करणाऱ्याचे नाव किंवा ज्याच्याकडून मूळ सनदेवरून ही नक्कल करून घेण्यात आली त्याचे नाव दिलेले नाही; तसेच सनदेच्या तारखेचाही उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ :** इजत अजार आमीलान हाल व ईस्तकबाल परगणे वेमपली बीफीयत बाशेद हरिवीला–

**शेवट:** हरकत नकरीतां पोहचवीत जाणें. दर रोजीना एक फलम १ पोहचावणे. तुम्ही नकल लिहुन घेऊन असल याच हवाले किजे.

## डी. नंबर ३३२

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ७". १० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

दरमहा द्यायची सेवानिवृत्तीची रोख रक्कम आणि विशिष्ट मशिदीला द्यायच्या रोख रकमा यांविषयीच्या सनदेचीच ही नक्कल आहे. या रकमांचे स्वीकारकर्ते म्हणून ती मशीद व तिचा व्यवस्थापक यांचा उल्लेख असून त्यांची नावेही दिलेली आहेत. ही मशीद म्हणजे वेमपल्लीची मशीद असून तेथील अधिकाऱ्याने आयात कराच्या जमा रकमेतून ठरविलेली रक्कम अदा करावी असे दान देणाऱ्याने सांगितलेले आहे. १६ रजब १२१० हिजरी अशी सनदेवर तारीख आहे.

**प्रारंभ :** आमीलानी हाल व इस्तकबाल षरगणे वमेपली बीदान माबलग च्यारी आणि मेनीस आधोनी आणे बाबत योमीया एकास व मसीदा सहि जगे xxx

**शेवट :** मषगुल करीतहे करीता बाबी ताकीद षीनास सनद नक सनद घेऊन असल वापस देणें. तारीख छ ६६ माहे रजेब सन १२९० हिजरी.

## डी. नंबर ३३३

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ६". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

वेमपल्ली येथील अहमद मौला यास उदरनिर्वाहासाठी काही रक्कम मंजूर करणाऱ्या सनदेची ही नक्कल आहे. कडाप्पावर राज्य करणाऱ्या मुस्लिम राजकर्त्यांच्या काळात त्याला रोख रक्कम मंजूर करण्यात आलेली होती. त्यानंतर काही राजकीय कारणास्तव हे निवृत्तिवेतन थांबविले गेले. या सनदेनुसार त्या जुन्या मंजुरीचे नूतनीकरण करण्यात आले आहे. १ शाबान १२१२ हिजरी अशी तीवर तारीख आहे. ही सनद देणाऱ्याचे नाव किंवा ही ज्याच्या ताब्यात होती त्याचे नाव दिलेले नाही. याच्या शेवटी तेलगू भाषेत लिहिलेल्या काही ओळी आढळतात.

**प्रारंभ :** अमीलामी हाल व इस्तकबाल परगणें येंपली निषस्त xxxx स्तयर ताळुके मजकुर बा अहमदमुला महमद अषराब xx

**शेवट :** हे सनदाचे नकल लिहुन घेऊन असल दानम मजकुरास वापस देणें. जाणीज प्रो. सुदिवय छ १ माहें षाबान १२१२ हजरी.

## डी. नंबर ३३४

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ६". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

हीसुद्धा एका सनदेची नक्कल असून ती या भागाच्या पृ. ५२ वर येते. अक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून पृष्ठांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. पानाच्या माथ्यावर मध्यभागी उर्दू लिपीत लिहिलेले शब्दांचे तीन गट दिसून येतात. नंदीमंडल येथील देशमुख, देशपांडे व तालुकदार यांना उद्देशून जारी केलेल्या आज्ञापत्राच्या स्वरूपात ही सनद आहे. त्यांना असे कळविण्यात आलेले आहे की, कुण्या भट नावाच्या व्यक्तीच्या जप्त केलेल्या जमिनी मुक्त करण्यात आलेल्या असून त्या जमिनी करमाफ रीतीने त्यास इनाम देण्यात आलेल्या आहेत. एखादे इनाम देताना घातल्या जाणाऱ्या नेहमीच्या अटीही उल्लेखिलेल्या आहेत. सरकारी आज्ञेवरून दस्तऐवज लिहिणाऱ्या रंगाराव याने ही सनद लिहिली असल्याचे शेवटच्या परिच्छेदात लिहिले आहे. या सनदेची तारीख १८ रमजान १८०० अशी आहे. इनाम मंजूर करणाऱ्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इस्तकबाल देषमुखानी व देशपांडीयानी मोकद मानी मुजारीयानी जमादारानी ताळुक नंदिमंडल सरकार दारुसलतनत कचेरी दफ जफत्रबाद उरुफ गुरुकोंडा.

**शेवट** : नकरीता xxx चालवणे. सदरहु सनाद नकल घेऊन असल सनद नांबुईस वापस देणें अफरंजीचे. xxx जमीन १८ बातारीख आतकी जिलखत रंगराव मुनषी हजुर.

## डी. नंबर ३३५

ऐतिहासिक पत्र
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. ९"x ७". १३ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २० वर येणारा दस्तऐवज म्हणजे एका सनदेची नक्कल आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. हा कागद दुरुस्त केलेला आहे. अर्जदाराने केलेल्या अर्जाचे प्रत्युत्तर असे याचे स्वरूप आहे. गूर्मकोंडाचा सुभेदार अंबाजी बाबुराव याचा कोमंडी येथे मुक्काम असताना वेमपल्लीचा रहिवासी वेदमूर्ती वर्दमभट्ट याने आपल्या निर्वाहासाठी रोजी रोख भत्ता मिळावा म्हणून अर्ज केलेला होता. सुभेदाराने उत्तरात असे कळविले आहे की, वेदमूर्तीस आणि त्याच्या वंशजास दररोज अर्धी सुवर्ण वा रौप्यमुद्रा कायम स्वरूपात मंजूर करण्यात आनंद होतो आहे. या परगण्यातील आयात कर जमा करण्याच्या कार्यालयातून त्याला ही रक्कम मिळावी अशी ही आज्ञा आहे. या सनदेवर तारीख किंवा हे दान मंजूर करणाऱ्याचे नाव दिलेले नाही. तिच्या शेवटी तेलगू भाषेतील काही शब्द आढळतात.

**प्रारंभ** : वेदमूर्ती राजेश्री वरदभट बिनद कृष्टणभट उपनाम अयलाल गोत्र विश्वामित्र सुत्र अश्वलायन वास्तवये कसबे वेमपळी गोसावी यासी सेवक अंबाजी बाबु राव सदर सुबेदार तालुका सरकार गुरमकोंडा वगैरे प्रांत कडपा नमस्कार.

**शेवट** : राज्यास अबिष्ट चिंतून सुखरूप राहाणे जाणीजे छ ५ माहे रमणान बहुत काय लिहीणें.

## डी. नंबर ३३६

ऐतिहासिक पत्र
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ७". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. २१ वर येणारी ही एका सनदेची नक्कल आहे. वेमपल्ली येथील एक ब्राह्मण रहिवासी वेंकट वरदाचार यास त्याच्या उदरनिर्वाहासाठी रोज अर्धी सुवर्ण वा रौप्य मुद्रा अशी छोटी तैनात या सनदेद्वारे दिलेली आहे. मंजुरी देणाऱ्याची वा इतर कुणा अधिकाऱ्याची यावर सही नाही. १० रजब हिजरी १२९५ अशी सनदेवर तारीख आहे.

**प्रारंभ** : इजत अजार अमीलान हल व इस्तकबाल परगणे वेमपळी बिदनद हरिविला.

**शेवट** : राजब पासुन देवीत जाणे जाणिजें छ १० रजब सन १२७५ हिजरी. नकल घेऊन असल दीजे जाणिजा तारीखसदर.

## डी. नंबर ३३७

ऐतिहासिक पत्र
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ७". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही सुद्धा एका छोट्या सनदेची नक्कल असून तीत वेमपल्लीच्या करसंकलन अधिकाऱ्यांना अशी आज्ञा केलेली आहे की, त्यांनी वर्दम भट्ट या ब्राह्मणास दररोज अर्धी सुवर्ण किंवा रौप्य मुद्रा द्यावी आणि हा खर्च गूर्मकोंडा येथे जमा होणाऱ्या आयात करातून करावा. २० शवाल हिजरी ११८८ अशी या सनदेवरील तारीख आहे. यावर कुणाचीही स्वाक्षरी नाही.

**प्रारंभ** : आमीलान व हाल ब इस्तकबल परगणे नंदिमडल बिदनद मोबलग० ॥ अर्धा फलम योमीया बरदंभट सायर पैकी देणें मजकूर.

**शेवट** : नकल घऊन असल परवाना फिरुन देणें तारीख २० माहे षवाल सन ११८८ हिजरी.

## डी. नंबर ३३८

ऐतिहासिक पत्र
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ७". १० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३३ वर ही सनद येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. नंदीमंडल वर्दमभट्ट यास रोजचा भत्ता मंजूर केलेला असल्याचे गुर्मकोंड्याच्या सुभेदाराचे हे आज्ञापत्र आहे. करसंकलनाच्या रकमेतून संबंधित अधिकाऱ्यांनी ही रक्कम वर्दम भट्ट यास द्यायची आहे. ही आज्ञा या सनदेच्या तारखेपासूनच अमलात आणायची असाही हुकूम आहे. सनदेवरील तारीख १५ शवाल हिजरी ११९० अशी आहे.

**प्रारंभ :** मषरुल अनाम टंकसाळ वेकटराव मुसतजर सायर दोबस्त बाफियत तबषांद सुरुसन ११८५ ईफ्रसली हरिवीला व यालाल वरदंभट यासी षरगणे नंदिमंडल सायर पैकी.

**शेवट :** नकल लिहुन घेऊन असल परवाना मजुमुदार यासी देणें. बा तारीख छ १५ माहे षवाल सन ११७० हिजरी मोकाम गुरमकोंडा.

## डी. नंबर ३३९

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ७". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

उदरनिर्वाहासाठी काही व्यक्तींना रोजचा भत्ता मंजूर केल्याविषयी देशपांडे, देशमुख आणि खेडे व तालुका येथील अधिकारी यांना उद्देशून काढलेल्या एका आज्ञापत्राची ही नक्कल आहे. त्यांनी त्यांच्या त्यांच्या खेड्यात वा तालुक्यात करापोटी जमणाऱ्या रकमेतून हा खर्च करायचा आहे. सनदेवर १५ सफर हिजरी ११६९ अशी तारीख आहे. तिच्या तळाशी काही तेलगू वाक्ये आढळतात.

**प्रारंभ :** देशमुस्वानी देशपांडेयान व मोकदमाने व मुसारीयान व xxx परगणे नंदिमंडल सरकार गुंडी कोट बिदनद छ८१ एक फलम.

**शेवट :** देत जाणे तबहर माह सफर सन ११६७ हिजरी सन ११६५ फसली.

## डी. नंबर ३४०

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ७". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

एका व्यक्तीस त्याच्या उदरनिर्वाहासाठी मंजूर केलेल्या दैनंदिन ठराविक भत्त्यासाठीच्या सनदेची ही नक्कल आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. सनदेवर व खाली काही तेलगू व उर्दू शब्द लिहिलेले आढळतात. सनदेवर स्वाक्षरी नसून ती आज्ञापत्राच्या स्वरूपात आहे. ज्याने ही सनद मंजूर केली त्या व्यक्तीच्या नावाचा उल्लेख नाही. पूर्वी दिलेल्या सनदेप्रमाणे लाडशहा यास उदरनिर्वाहासाठी दररोज एक पनम द्यावा असे नंदीमंडल येथील अधिकाऱ्यांना या सनदेद्वारे फर्माविले आहे. याची तारीख १४ रहबीलाखर ११७ (की ११७१ ?) हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** देशमुखानी व देशपांडयानी व मोकदमानी व मुजारीयानी पा नंदिमंडल सकार गंडीकोटा बिदनद मोबलग.

**शेवट :** करार जाहाली हे निरोपाचे नकल घेऊन असल परवाना फिरुन देणे छ १४ रबीलाखर ११७१.

## डी. नंबर ३४० अ

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ७". १८ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

हीसुद्धा एका सनदेची नक्कल आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. उदरनिर्वाहासाठी खलीलशहा यास एक पनम असे रोखीचे निवृत्तिवेतन द्यावे असे यात लिहिलेले आहे. रक्कम रोजच्या रोज देण्यात यावी. नंदीमंडल येथील ग्रामाधिकारी आणि कौलीकोट्टाई येथील मुख्य कचेरीतील अधिकारी यांना सनदेतील मजकूर कळविण्यात आलेला आहे. सदरहू व्यक्तीस दिले जाणारे पैसे आयात कर व खेड्यातून मिळणारा कर यांच्या जमा रकमेतून

खर्ची टाकावेत. या सनदेवर स्वाक्षरी नसून ती जारी करणाऱ्या व्यक्तीच्या नावाचा निर्देश नाही. यावरील तारीख २९ शबान ११७१ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ** : अमीलान हाल व ईस्तकबाल परगणे नंदीमंडल बीदनद हरीवीला. मोबलग १ एक फलम कलीलशा नफरासी ईत्फ बायेस मोकसर आहे.

**शेवट** : (काहीही मजकूर दिलेला नाही.)

## डी. नंबर ३४१

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ७". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

यातील इतर रचना डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे.

हीसुद्धा एका सनदेची नक्कल असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. यातील काही शब्द खराब झालेले असून नीट वाचता येत नाहीत. दान दिलेल्या किंवा ही सनद ताब्यात असलेल्या व्यक्तीच्या नावाचा यात उल्लेख नाही. नंदीमंडल परगण्यातील देशपांडे व देशमुख यांना उद्देशून काढलेल्या आज्ञापत्राचे स्वरूप या सनदेस आहे. सरकारातून एका ब्राह्मणास मंजूर झालेल्या रोख निवृत्तिवेतनाशी ही संबंधित आहे. एका वंशजाने याची मूळ अस्सल प्रत हरविल्यामुळे पैसे देणाऱ्या अधिकाऱ्याने पेन्शन देण्यास नकार दिला. त्यामुळे त्या अर्थाची नवी सनद देण्याची विनंती संबंधिताने केली. या विनंतीनुसार शासनातर्फे चौकशी करण्यात आली आणि नारायणराव या अर्जदाराची विनंती मान्य करून त्याला रोजचा भत्ता मिळण्यास परवानगी देण्यात आली. यावर १४ रबिसनी १२१८ हिजरी अशी तारीख आहे. सनदेच्या शेवटी तेलगू भाषेतील काही ओळी लिहिलेल्या आढळतात.

**प्रारंभ** : अमीलान हाल इस्तकवाल देशमुखानी देशपांडीयानी मोकदमानी मुजरीयानी परगणे नंदीमंडल तालुके वेमपली सरकार दारुल सुलतान कचेरी अत्फ बहदुर.

**शेवट** : मोबलग साडे अटाफन ५८॥ होन अफरंजी माहचली जाणीजे छ १ माहे वमीसन १२१८ हिजरी सालास तोजे xxxx देणें.

## डी. नंबर ३४२

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ७". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२४ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

कडाप्पाच्या राजाने नंदीमंडल येथील अधिकाऱ्यास लिहिलेल्या पत्राचे स्वरूप असलेल्या एका सनदेची ही नक्कल आहे. त्या अधिकाऱ्याच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. वेमपल्ली येथील रहिवासी चल्लम दीक्षित, पुत्र वेंकटनारायण जोशी याच्या विनंतीनुसार त्याला रोज एक सुवर्णमुद्रा असे निवृत्तिवेतन मंजूर करण्यात आलेले आहे. त्याबरोबरच देय अशी थकबाकी मिळण्यासही तो पात्र असल्याचे कळविलेले आहे. राजवाड्याच्या हिशेबपत्रकात नोंद केल्यानंतर सनदेचा अस्सल दस्तऐवज अर्जदाराने अधिकाऱ्याकडून परत न्यायचा आहे. यावरील तारीख १० मोहरम १७७० अशी आहे. ज्याने या सनदेचे फर्मान काढले त्याची यावर सही नाही; तसेच ज्याने मुळावरून ही नक्कल काढली त्याच्या नावाचाही यात निर्देश नाही.

**प्रारंभ** : राजे श्री मगदार लेखन वर्तमान भावी परगणें नंदिमंडल सरकार गंजीकोट गोसावी यांसी अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्ये राजे श्री ह्यांस.

**शेवट** : जोसी बावाकड पुत्र पौत्रादी वंशपरंपरा चालवणें. तुम्हांस सदरहु सालाचे बेरीज सरकार हिसाब मजुरा पडील्या ह्या पत्राचे प्रती लेहुन घेऊन्न असल जोसी बावास भोगवटी यासी परतुन देणे जाणीजे छ १० माहे मोहरम बहुत काय लिहीणें.

## डी. नंबर ३४३

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ७". १२ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. २८ वर येणारा दस्तऐवज म्हणजे एका सनदेचीच नक्कल आहे. या कागदाच्या वर आणि तळाशी

तेलगूतील काही ओळी आढळतात. वेमपल्ली तालुक्यातील नंदीमंडल येथील रहिवासी वेंकटराम भट्ट याचा पुत्र वेंकटकृष्ण भट्ट याला त्याच्या उदरनिर्वाहासाठी दररोज दोन सुवर्ण पनम सेवानिवृत्तिवेतन म्हणून मंजूर करण्यात आलेले आहेत. त्या तालुक्यात जमा होणाऱ्या आयात करातून ही रक्कम दिली जावी, असेही सांगण्यात आलेले आहे. अशीही सूचना देण्यात आलेली आहे की, नक्कल करून घेतल्यानंतर मूळ अस्सल सनद परत करण्यात यावी. सनद देणाऱ्याचे नाव किंवा ती ज्याच्या ताब्यात आहे त्याचे नाव उल्लेखिलेले नाही. सनदेची तारीख १४ रबिसानी ११९८ हिजरी अशी दिलेली आहे.

**प्रारंभ :** सुहुरसन दस्तगोहा सैद अला व लीहीले आमीलान परगणे नंदिमंडल वगैरे घा. हरिवेंकटराम भट जोसीयांचें पुत्र वेंकट कृष्ण भट वास्तव्य परगणे नंदिमंडल.

**शेवट :** असल वापस देणें जाणीजें. बातारीख छ १४ माहे रबीसानी सन ११७८ हिजरी साल १ की सोभकृतु संवत्छर फालगुण मास.

## डी. नंबर ३४४

**ऐतिहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x ७". १६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ३६ वर येणारा हा दस्तऐवज म्हणजे एका सनदेची नक्कल आहे. याच्या दोन्ही पृष्ठांच्या तळाशी तेलगूत लिहिलेल्या काही ओळी आढळतात. नंदीमंडल येथील रहिवासी वेंकटकृष्ण भट्ट, वेंकटराम यांचा पुत्र, यास दरदिनी दोन सुवर्ण पनम विवृत्तिवेतन म्हणून मंजूर करण्यात शासनास आनंद होत असल्याचे ग्रामाधिकाऱ्यास पत्ररूपाने लिहिलेल्या या सनदेत म्हटलेले आहे. या वेतनाची थकबाकी मिळण्यासही हा निवृत्त सेवक पात्र असल्याचे यात लिहिलेले आहे. १ रमजान हिजरी १६९८ अशी तारीख यावर आहे. त्यावर मंजूर करणाऱ्याची वा अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

**प्रारंभ :** (मोहरबा बास्तवासल आलीखास) दरीवीला. कालावा वेंकटराम भट ज्योशी यांचे पीसर वेंकटकृष्ण भट वास्तव्यें परगणे नंदीमंडल कसबे वेमपळीचा सायर वरी योमीया रोजीना २ दोनो फलम देईजें.

**शेवट :** हे सनदाचे नकल लिहुन घेऊन असल ज्योसी मजकुराचें आदा करणें जाणीजें बातारीख छ १ रोज माहे रबीसानी सालमजकुर सन ११७८ हिजरी साल बाबत सोबकृतु संवस्छर फाहलगुण मास.

## डी. नंबर ३४५

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x ७". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

याआधीच्या सनदेत ज्याचा उल्लेख केलेला आहे त्या कृष्णभट्ट याला दिलेल्या सनदेचीच ही नक्कल आहे. त्याला जे दररोजचे निवृत्तिवेतन द्यायचे ते खेड्यातून जमा होणाऱ्या किस्त कराच्या रकमेतून द्यावे असे इथे आज्ञापिले आहे. या सनदेची तारीख ११ रजब ११२० हिजरी अशी आहे. मोडी लेखनाच्या तळाशी काही तेलगू ओळी या सनदेत लिहिलेल्या आढळतात.

**प्रारंभ :** दरीवीला. वेंकट कृष्टण भट जोजी यासी कसबेचे सायेरवरीं योमीया दर रोजीना २ दोनी भलम आहे म्हणुन सनद वगैरे दाखवीला करीता.

**शेवट :** नकरीतां देईजेस ताकीद फरमावीले पाहिजे काल लिहुन घेऊन असल योमीया वाले पासी परतुन देणे. तारीख माहे रजब सन १२८५.

## डी. नंबर ३४६

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x ६". १३ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

याआधीच्याप्रमाणे हीसुद्धा एका सनदेची नक्कल असून ती या भागाच्या पृ. ३० वर येते. या सनदेत दोन आज्ञापत्रे जारी करण्यात आलेली आहेत. काही तेलगू ओळीही यात आढळतात. पहिले आज्ञापत्र नंदीमंडल येथील अधिकाऱ्यास उद्देशून काढलेले आहे. राजाने इच्छा व्यक्त केल्याप्रमाणे त्याने काही व्यक्तींना

त्यांच्या उदरनिर्वाहासाठी दररोज एक पनम प्रत्येकी द्यायचा आहे. तालुक्याच्या अधिकाऱ्याने जमा केलेल्या कराच्या रकमेतून हे निवृत्तिवेतन द्यायचे आहे. सय्यद फक्रुद्दीन याने नंदीमंडल येथील अधिकाऱ्याकडून आपले निवृत्तिवेतन घ्यावे असे दुसऱ्या आज्ञापत्रात सांगितलेले आहे. या दोन्हींवर कसलाही दरबारी शिक्का नसून ती जारी करणाऱ्या अधिकाऱ्याची सहीसुद्धा नाही.

**प्रारंभ** : अमीलान हाल व इस्तकबाल परगणे नंदिमंडल बिदनद १ येक फलम योमीया वेंपळचा सायेर वरी सैद फकरुदिन खातीबी यास देविल आहे बायख मुदती मामुल व सुबामदरीती बा मजकुरास पोहचवीत जाणें. बा तारीख छ १५ माहे रबिलवल सन ११७५ हिजरी सन ११७१ फसली.

**शेवट** : आमीलान हाल. ईस्तकबाल प्ररगणे नंदिमंडल बिदनद मोबलग येक फलम योमीया वेंपलीच सायेर वरी सैद फकरुरुदीन खीतीबायास पेसजी पासुन चालत आहे म्हणुन जाहेर केल यैसीयासी बामोजीबा असनद पेबीर जाहलें आहें. ता पा मजकुर पौ गावफीक मा आमल ईफदायं गुरे रंजान सन ११८८ हीजारी पासुन नमबुदेस रोज मस्तुरा पोहचवीत जाणे दरिबाबद ताकीद समजणे तारीख छ ७ रंजमान सन ११८८ हिजरी.

## डी. नंबर ३४७

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ७". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

डी. नंबर ३४६ मधील सनदेशी निगडित अशा सनदेची हीसुद्धा नक्कल असून, तिचे स्वरूप नंदीमंडल व वेमपल्ली येथील अधिकाऱ्यांना उद्देशून काढलेल्या आज्ञापत्राचे आहे. याद्वारे बाई फकरुद्दीन खतीबा हिच्या दैनंदिन निर्वाहवेतनाचे नूतनीकरण केल्याचे आणि हिशेबाच्या कोणत्या विभागात ती खर्ची टाकावी हे सांगणारे प्रस्तुत आज्ञापत्र आहे. याआधीच्या सनदेप्रमाणेच याचेही स्वरूप असून वेगळी महत्त्वाची अशी काही माहिती यात नाही. या सनदेची तारीख ५ हिजरी ११६१ म्हणजे फसली ११५८ अशी आहे. या भागाच्या पृ. ३१ वर ही सनद येते.

**प्रारंभ** : अमीलांनी हल व इस्तकबाल पो (परगणे) नंदिमंडल बीदनद मोबलग १ येक फलम योमीया सायेर मौजे वेंपली ब ॥ (बाई) फकरुदीन खतीबा बीदनद वेंपळी देवल आहें. बाई बकरुदी(न) कस(बा) मामुल सुदामद खातीबा मजकुर पोहचावीत.

**शेवट** : (काहीही मजकूर नाही.)

## डी. नंबर ३४८

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ७". १२ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

पृ. ३२३ वर ही सनद येत असून वेगळी व्यक्तिनामे सोडली तर याआधीच्या सनदेप्रमाणेच सर्व मजकूर आहे. नाव लिहिलेला भाग अत्यंत खराब झालेला असल्यामुळे वाचणे अशक्य आहे. ज्याच्या नावावर ही सनद आहे त्याच्या रोख तनख्याचें नूतनीकरण केले असल्याचे नंदीमंडल व वेमपल्ली येथील संबंधित अधिकाऱ्यांना कळविलेले आहे. हिजरी गणनेची तारीख या आज्ञापत्रावर आहे. याखेरीज उल्लेखनीय असे या सनदेत काही नाही. इतर काही सनदांत सांगितल्या गेलेल्या मंजुरीबद्दलच्या शर्ती यातही सांगितलेल्या आहेत. यावर कुणाचीही स्वाक्षरी नाही; तसेच ती कुठून मिळाली याबद्दलही लेखक काही सांगत नाही.

**प्रारंभ** : आमीलानीहलव इस्तकबाल प्ररगणे नंदिमंडल बिदनद मोबलग १ येक फलम योमीया सायर मौजें वेंपली बाई फुकारदीन दोनी खाखीबा बिदनद वेमपळी देवले आहें बाई बुकरुदिन कसबा मामुल सुदामद कीताबा मजकुर पोहचवित.

**शेवट** : (काहीही मजकूर नाही.)

## डी. नंबर ३४९

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १२ "x ७". १६ ओळी. मोडी. जुने. चांगले पूर्ण.

पृ. ८२ वर येणाऱ्या या सनदेचे हस्ताक्षर बऱ्यापैकी असले तरी कागद थोडे खराब झालेले आहेत. याआधीच्या सनदेप्रमाणेच याचा आशय आहे. रोख दान घेणाऱ्याचे नाव म्हणून वेमपल्ली खेड्यातील मंदिराचा निर्देश केलेला आहे. देणगीची तारीख, दात्याचे नाव किंवा दानाचे कारण दिलेले नाही.

डी. नंबर ३२३ प्रमाणेच प्रारंभ व शेवट आहेत.

## डी. नंबर ३५०

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x ७". मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

याचकाने विनंती केल्यावरून त्याच्या उदरनिर्वाहासाठीच्या रोख रकमेच्या मंजुरीचे नूतनीकरण केल्याविषयीच्या मूळ अस्सल सनदेची ही नक्कल आहे. त्या व्यक्तीचे नाव कुणी वेंकटराम शास्त्री आहे. त्याच्याविषयीची इतर काही माहिती आढळत नाही. आधीच्या सनदांतील शब्दप्रयोग यातही दिसून येतात. ही सनद मंजूर करणाऱ्या व्यक्तीचे नाव किंवा स्वाक्षरी करणाऱ्याचे नाव या सनदेवर दिलेले नाही.

डी. नंबर ३२३ प्रमाणेच प्रारंभ व शेवट आहेत.

## डी. नंबर ३५१

**ऐतिहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x ७". १६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

दैनंदिन पूजेसाठी मनिक विनयगार यास काही रक्कम देण्याबद्दलच्या सनदेची ही एक नक्कल आहे. मंजूर करणाऱ्याचे नाव किंवा मंदिर असलेले ठिकाण यांचा उल्लेख नाही. मंदिराच्या पुजाऱ्यास (Archaka) रक्कम देण्यात यावी असे सांगितलेले आहे. ही देणगी तात्पुरती की कायमस्वरूपी हेही स्पष्ट केलेले नाही. यावरील तारीख १७५५ अशी आहे. ज्याने असे रोख इनाम मंजूर केले त्याचे नाव किंवा ही सनद जारी करणाऱ्याचे नाव दिलेले नाही. डी. नंबर ३२३ प्रमाणेच प्रारंभ व शेवट आहेत.

## डी. नंबर ३५२

**ऐतिहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x ७". १६ ओळी. मोडी. जुने पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

उदरनिर्वाहासाठी मोहमद हुसेन यास दिलेल्या रोख देणगीविषयीच्या सनदेचीच ही नक्कल आहे. या रोख देणगीमागचे कोणतेही कारण या सनदेत स्पष्ट केलेले नाही; तसेच देणगीदाराचे वा ही सनद जारी करणाऱ्याचे नावही दिलेले नाही. अशा सनदांत आढळणारे शब्दप्रयोग, तसेच याआधीच्या सनदांप्रमाणेच प्रारंभ व शेवट यातही दिसून येतात.

## डी. नंबर ३५३

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x ७". मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणेच यातील इतर रचना आहेत.

गुलाम दस्तगीर यास रोख देणगी मंजूर केल्याबद्दलच्या सनदेचीच ही नक्कल आहे. ही सनद मंजूर करण्याचे कारण उल्लेखिलेले नाही; तसेच रक्कम मंजूर करण्यामागचे कारण किंवा उल्लेख केलेल्या व्यक्तींसंबंधीचा तपशील ही स्पष्ट केलेली नाहीत. सनदांमध्ये आढळणारे नेहमीचे शब्दप्रयोग यातही दिसून येतात. डी. नंबर ३५२ प्रमाणेच यातही तोच प्रारंभ व शेवट आहे.

## डी. नंबर ३५४

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x ७". १२ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

उदरनिर्वाहासाठी ज्याला काही रोख रक्कम मंजूर करण्यात आली होती त्या नारायण भट याच्याकडेच असलेल्या मूळ अस्सल सनदेचीच ही नक्कल आहे. शालिवाहन शकाप्रमाणे तारीख दिली आहे. ही देणगी देणाऱ्याचे नाव व देणगीचे कारण दिलेले नाही.

डी. नंबर ३५३ प्रमाणेच प्रारंभ व शेवट आहेत.

## डी. नंबर ३५५

**ऐतिहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x ७". १६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

सुंदर अवधानी यास उदरनिर्वाहासाठी मंजूर केलेल्या देणगीच्या सनदेची ही नक्कल आहे. आधीच्या सनदांप्रमाणेच देणगीदार वा देणगी देण्यामागील कारण यांबद्दलची माहिती दिलेली नाही. शालिवाहन शकाप्रमाणे तारीख दिलेली आहे. सनदांत नेहमी आढळणारे शब्दप्रयोग यातही आढळतात.

प्रारंभ व शेवट मूळ सनदेप्रमाणे आहेत.

## डी. नंबर ३५६

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x ७". १६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

दैनंदिन पूजाअर्चेच्या खर्चासाठी नंदीवरमच्या विश्वनाथस्वामी मंदिरास मंजूर केलेल्या सनदेची ही नक्कल आहे. या मंदिराचे नेमके ठिकाण सांगितलेले नाही; तसेच दात्याचे नावही समजत नाही. ही रोख देणगी तात्पुरती की कायमची हेही स्पष्ट होत नाही. मंदिरात काम करणाऱ्या पुजाऱ्यास सरकारी खजिन्यातून नगद रक्कम मिळावी अशी यात सूचना दिलेली आहे. शालिवाहन शकानुसार यात तारीख दिलेली आहे. दात्याचे नाव गाळलेले आहे. डी. नंबर ३५२ प्रमाणेच यातील प्रारंभ व शेवट आहेत.

## डी. नंबर ३५७

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x ८". २४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

यात याशिवाय पाच जास्त ऐतिहासिक पत्रे आहेत. नरसापूरमधील हनुमनगुडी व कळसपाडी येथील जमीनदार कृष्ण रेड्डी यास दिलेली ही सनद आहे. याची तारीख २४ रबिसानी ११९३ हिजरी अशी आहे. या जमीनदाराने केलेल्या विनंतीनुसार वर उल्लेखिलेले दोन्ही तालुके त्याच्या व्यवस्थापनाखाली देण्यात येत असून, त्याने तेथील किस्त कर जमा करायचा आणि पेशकश म्हणून रु. १००० प्रतिवर्षी स्थानिक राज्यात भरायचे आहेत; तसेच जमीनदाराने या जमिनींचा कायमस्वरूपी उपभोग घ्यायचा आहे. हे दानपत्र देणाऱ्याचे नाव किंवा हे जारी करणाऱ्या अधिकाऱ्याची यावर स्वाक्षरी नाही. यावर दोन अष्टकोनी शिक्के आहेत. एक काही तेलगू शब्द असलेला कागदाच्या तळाशी उजव्या कोपऱ्यात आणि दुसरा काही उर्दू शब्द असलेला आज्ञापत्राच्या शेवटी आढळतो.

**प्रारंभ :** कौल बातै कृष्टण रड्डी जमोदार हनुमनगुडी व कळसपाडी नरसापुर (अंके) तुम्ही हजुर एवुन माधिले मोकळम पेंषकष व नजर कबुल केले.

**शेवट :** सुभा वगैरे अनुभवुन कोणे बातची विसवास न करीता सदर जमीन अनुभवणें. दरीबद कौल जाणीजे बा तारीख छ २८ रबीसानी सन ११७३ हिजरी.

## डी. नंबर ३५८

**ऐतिहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

कागद : स्थानिक बनावट. १०"x ८". २४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

पेशकशच्या शर्तीवर एका जमीनदाराच्या ताब्यात काही खेडी देण्यास मंजुरी देणाऱ्या एका छोट्या पत्राची ही नक्कल आहे. हस्ताक्षर अतिशय बारीक आहे. असे दिसते की, याच पानावर उर्दू लिपीत लिहिलेल्या एका सनदेतील हा उतारा आहे. शासनामध्ये भरायचा पेशकश नजराणा रु. ३००० गणला गेला आहे. खेड्यांची नावे वाचता येतील अशी लिहिलेली नाहीत. सनदेची तारीख ११ जमादिलाकर असून तिच्यावर योग्य अशा अधिकाऱ्याची मान्यतादर्शक स्वाक्षरी नाही.

**प्रारंभ :** तु (तु) बबुल आमासीलवाल एकरे न लारडी म्हण xxx पांडाया वगैरे देहाये अजहनारी मालतासीर xxx

**शेवट :** तुजे जिमे अस. हजुर तलव केलीया बाजमीये दानसिही जार होणे जाणीजे छ ११ माहे जमादिलाकर......

## डी. नंबर ३५९

**ऐतिहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १८ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

हीसुद्धा एका सनदेची नक्कल आहे. उर्दू व तेलगू भाषेतील काही ओळी आणि काही तेलगू शब्द असलेला गोल शिक्का या पानावर आढळतो. पुढे स्पष्ट केलेल्या मोडी सनदेचीच ही नक्कल आहे. मल्ला रेड्डी याच्या विनंतीनुसार करटूर तालुकाही त्याला देण्यात आलेला आहे. त्याने त्याच्या जमीनदारी खेड्यांत हा तालुकाही समाविष्ट करावा आणि मंजूरकर्त्यास पेशकश देत जावे अशी त्यास सूचना देण्यात आलेली आहे. ही जमीन संगपट्टण प्रभागात असल्याचे सनदेच्या शेवटच्या ओळीत सांगितले आहे. या दस्तऐवजाची तारीख ४ रजब ११११ हिजरी अशी आहे. पहिल्या ओळीत पर्शियनमध्ये लिहिलेले मंजूरकर्त्याचे अनेक किताब लिहिलेले आहेत. पेशकश आणि जहागीरदारीच्या सर्वसाधारण शर्ती या सनदेत दिसतात. मंजूरकर्त्याचे सील किंवा स्वाक्षरी यावर नाही.

**प्रारंभ :** सुमायत तहार दस्तगाद दौलत सवाहादत वजहरत खातर उम दवार बुई बीदानं दर मोकदमे मदळु जागीर व फौजदारी मुताळुके जुबद मुल ऐकंदर.

**शेवट :** xxx व फौजदारी मुताळुके जद बहु एकरां मजल मल्लाराडी वत सन ११११ फसली वर हजुर ईस ॥ साल मौजे संगापठण परगणे चले xxxx माबेलग एक देहास....

## डी. नंबर ३६०

**ऐतिहासिक पत्रे**
**AITHIĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० " x ८". १८ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. १९ वर येणारा हा दस्तऐवज म्हणजे एका दानपत्राचीच नक्कल आहे. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. या मोडी पत्रावर काही तेलगू ओळीही आढळतात. मोडी रचनेचाच हा अनुवाद आहे. याशिवाय काही उर्दू शब्द असलेले एक चौकोनी सील मोडीत लिहिलेल्या मजकुराच्या वर आढळते. संगपट्टणच्या हल्ल रेड्डीला मंजूर केलेला हा कौलनामा आहे. त्याला संगपट्टणमधील व्यवस्थापनासाठी दिलेल्या काही तालुक्यांच्या बदल्यात शासनाने ठरवून दिलेला पेशकश त्याने वक्तशीरपणे भरायचा आहे. या कौलनाम्याची तारीख ४ रबिसानी १२१२ हिजरी अशी आहे. हा कौलनामा जारी करणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी किंवा मंजूरकर्त्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** कैलनामा बाईसम मजरी देहे मल्लरडी जमीदार उवाल वाडा संगापठण सुर सन १२०७ फसली तुमचे ताळुकेचे चेषकषी सालेहाल.

**शेवट :** प्रमाणे ज्या ब्याज कावली इनाम घेऊन बास सरकारचे कामांत सरगर अवहरहणे परी बाद काले मातबर जाणीजे मारे सुद ४ छ रबीसानी माहे सन १२९२ हिजरी.

## डी. नंबर ३६१

**ऐतिहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८" ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. २० वर येणारा दस्तऐवज म्हणजे एका कौलनाम्याची नक्कल आहे. काही उर्दू शब्द असलेले चौकोनी सील कागदाच्या माथ्याच्या मध्यभागी, तसेच तळाशी मध्यभागी आढळून येते. याआधीच्या सनदेत उल्लेखिलेल्या मल्ला रेड्डीशीच ही सनद संबंधित आहे. या कौलनाम्याद्वारे काही तालुक्यांचा पेशकश नजराणा वाढविलेला असून नेमकी रक्कम निश्चित केलेली आहे. जहागीरदारास असे कळविण्यात आलेले आहे की, त्याने ठरवून दिलेल्या वेळेत पेशकशची रक्कम भरण्यात फार तत्पर राहिले पाहिजे. याची तारीख २२ रबिसानी १२१३ हिजरी अशी आहे. मंजूरकर्त्याचे किंवा जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव सांगितलेले नाही.

**प्रारंभ :** कौल नामा बाईसम जरीदेहे मल्लारडी जमीदार उयलवाड संगपटण आकी सन १२०७ फसली तुमचे ताळुकेंच साले हाल पेषकष बामोजीब मोगली रुपये १६००० मोबलग सोळा हजारसी फैसला.

**शेवट :** कावल इनाम घेवुन देवास व सरकारचे वामांत सदर गराच कावली राद्ये दारीबाद कौल मोतबर जाणीजें. मो म्हदु सुहर सन छ २५ माहे रबीसानी १२१३.

## डी. नंबर ३६२

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १८ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

**ही सनदही या भागाच्या पृ. २० वर येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे.** संगपट्टण येथील जमीनदार मल्ला रेड्डी यास कडाप्पाचा कलेक्टर मॅनरो याने जारी केलेले हे आज्ञापत्र आहे. जमीनदारीच्या अटींप्रमाणे द्यायचा तो पेशकश कंपनीस देण्यास जमीनदार चुकलेला आहे. तसेच यासाठी जमीनदाराने कलेक्टरला केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे त्यास ताकीद देण्यात आलेली आहे. रयतेला त्रास न देता जमीनदाराने जास्तीत जास्त रक्कम जमविण्याचा प्रयत्न करायला हवा. शेवटी कलेक्टरने जमीनदारास कळविले आहे की, त्याने भरणा केलेल्या पेशकशच्या पावत्या तहसीलदाराकडून घ्याव्यात.

**प्रारंभ :** कुंपनी सरकारहुन हजरत मेजर मनरोसाहिब कलेक्टर सुभा कडपा वगैरे. बाईसम मजरी मल्लरडी जमेदार त ॥ उसल वाडी अमीत ॥ मजकुरच ऐवन पैके तुम्हाकडुन पावणेचे २०००० विस हजार पाटवणेचे आहे. तरी ऐवेज पोहचवणे.

**शेवट :** xxx कडपाचे पैशे पावत करुन रसीद घेणे सिबंदी कळुबु वगैरे गावकरी जमादि आपले हाल हावाली खुद राहुन सदरी मुदत प्रमार्णे पैके पोहचुन रसीद घेणे. जाणीजे बातारीख छ २८ माहे मे सन १८०१ इसवी.

## डी. नंबर ३६३

**ऐतीहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

कागद : स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागात फक्त मोडी हस्तलिखिते नसून तेलगू व उर्दू हस्तलिखितेही आहेत. हा विशिष्ट दस्तऐवज या भागाच्या पृ. १४ वर येतो. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. तेलगू भाषेतील दोन ओळी आणि उर्दू मजकूर असलेला एक परिच्छेद या मोडी सनदेच्या वरच्या भागात आढळतो. मोडी लेखाच्या उजव्या बाजूच्या कोपऱ्यात एक, अगदी प्रारंभी डाव्या बाजूस दुसरे आणि अगदी शेवटी तिसरे अशी पर्शियन शब्द असलेली व शासकीय शिक्क्याशी साम्य दर्शविणारी तीन वर्तुळे यात आढळतात. असे दिसते की, कडाप्पाच्या नबाबाने शेख मुकद्दम देश इमाम मशिदीस दिलेल्या सनदेची ही नक्कल आहे. आधीच्या मंजुरीप्रमाणेच मशिदीच्या देखभालीसाठी नबाबाने दररोज एक रुपया अशी तैनात आधीच्या वर्षांसारखी करून दिली आहे. यावरील तारीख २६ शवाल ११७१ हिजरी अशी आहे. मंजूर करणाऱ्याचे नाव किंवा ही सनद जारी करण्याचा अधिकार असलेल्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** (xxx) माहेबत हाल व इस्तकवाल सायेर लबाकर बाजार कसबे कडपा बीदनव मोबलग १ एक रुपया योमीया जहत आखरा ज्यान जुमा कसबे कडापा.

**शेवट :** योमीया मसबुरते रोज बीला जागा नानापुर देस पोहचाऊन महजल वसुल घेत जाणीजे बा तारीख २६ शाबान सन ११७१ फसली.

## डी. नंबर ३६४

**ऐतीहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

भाग क्र. २६५ मधील पृ. १४ (अ) वर ज्यातील काही ओळी दिसतात अशा एका सनदेची ही नक्कल आहे. त्यातील इतर भाग इतरत्र स्पष्ट केलेला आहे. तेलगू आणि पर्शियन भाषेतील काही ओळी या कागदावर आढळतात. कागदाच्या वरच्या भागात पर्शियन शब्द असलेला एक चौकोन दिसतो. कदाचित मंजूर करणाऱ्याच्या शासकीय शिक्क्याची ही प्रतिकृती असावी. कडाप्पाच्या नबाबाने कडाप्पा येथील जहत अखर जान मशिदीस रोजी एक रुपया अशा असलेल्या सनदेचे नूतनीकरण आनंदाने केलेले आहे. असेही सांगितले आहे की, ही रक्कम मशिदीच्या देखभालीसाठी खर्च केली जावी. या सनदेची तारीख १२ मोहरम ११७६ हिजरी अशी आहे. मंजूर करणाऱ्याची किंवा ती काढणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी यावर नाही.

**प्रारंभ :** इजंत हजार व मायुखदार सायेर व लस्कर सायर बाजार कसबा कडपा बिदनद माबेलग १ एक रुपया योमीया जहत अखरज्यान मसजीद कसबे कडपा व वजहे हमईशा.

**शेवट :** (बुरुस) पोहचुन घेऊन कबज वसुल घेत जाणे. किना बुरुद बकार खुदबुदीन जमे (हेसर) गरम मीलाईत छ १५ माहे जमादिलाखर तारीख १२ माहे मोहरम ११७६ ईजरी सन ११७२ फसली.

## डी. नंबर ३६५

ऐतीहासिक पत्रें
AITHIHĀSIC PATTRA

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. अपूर्ण.

या क्र. २६५ च्या भागाच्या पृ. १५ (अ) वर हा दस्तऐवज येतो. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून पृष्ठे दुरुस्त केलेली आहेत. याच्या शेवटी थोडे पर्शियन शब्द आढळतात. कडाप्पा जिल्ह्यातील तेरा मशिदींना कडाप्पाच्या नबाबाने मंजूर केलेली ही सनद आहे. ज्यांच्या नावांचा उल्लेख केलेला आहे त्या मशिदींना देखभालीसाठी ३-४-० इतकी रक्कम मंजूर केलेली आहे. एकूण मंजूर केलेल्या रकमेतून सर्व मशिदींना सारखी रक्कम मिळाली पाहिजे असा आदेश दिलेला आहे. शासनातून सर्व रक्कम घेणे आणि सनदेत ज्यांचा उल्लेख आहे त्या मशिदींना ती समान प्रमाणात वाटणे यासाठी नबाबाने अब्दुल माजिद या मशिदीच्या व्यवस्थापकाची नेमणूक केलेली आहे. सनदेवर ७ शाबान १२०५ हिजरी अशी तारीख आहे.

**प्रारंभ :** इजतहषार (सीनपा) मुस्तभा लषकर कडपा बिदानद मोबलग तीनी स्पथा च्यारी आणे योमीया (बासक) अबदुल नबी वगैरे महजीदच बस्त बाराये रोशन तेल चीरग बदल.

**शेवट :** मौबलग तीनी रुपये च्यारी आणेत सदर बा तारीख छ ८ माहे शावान सन १२०५ इजरी मोर्त बसुद काजीचे मोहरनसी नक्कल घेऊन्न असल परतुन तेईजे.

## डी. नंबर ३६६

ऐतिहासिक पत्रें
AITHIHĀSIC PATTRA

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

मूळ अस्सलाची नक्कल अशी ही छोटीशी सनद आहे. पर्शियन शब्द असलेला एक काटकोन चौकोनी शिक्का आणि तेलगू व पर्शियन भाषेतील काही ओळी या पृष्ठावर आढळतात. या सनदेद्वारे कडाप्पाच्या नबाबाने पीर मोहम्मद मशिदीस तिच्या देखभालीसाठी योमिया म्हणून दोन रुपये तैनात करून दिलेले आहेत. यावरील तारीख १ जमादिलावल ११६५ हिजरी अशी आहे. मंजूर करणाऱ्याची किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याची यावर स्वाक्षरी नाही. पृ. १७ (अ) वर ही सनद येते.

**प्रारंभ व शेवट :** इजत असार विळे मुस्ताजर सायेर कडपा चावडी बीपानंद ७ रुपयेचे दानी आणि योमीया रबापीरमहमद लावजीन मसजीद ज्यामे अंकील कडपा भिन ईत्फ जायेर रबीलावल सन ११६५ हिजरी पोहचवीत जाणे हरीबा दकी बिदानद छ ९ जमादिलवल सन ११६५ हिजरी मुतबला सन ११७५ फसली.

## डी. नंबर ३६७

ऐतिहासिक पत्रें
AITHIHĀSIC PATTRA

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ५" ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

मूळ अस्सल सनदेची हीसुद्धा एक नक्कल आहे. आधीच्या सनदेप्रमाणे यातही तेलगू व पर्शियन शब्द दिसतात. पृ. १८ वर सुरू होणाऱ्या या सनदेतील काही ओळी खराब झालेल्या असून कागदाने चिकटविलेल्या आहेत. पीर महमदशा आजीन मशिदीस देखभालीसाठी कडाप्पाच्या नबाबाने सात आणे मंजूर केल्याविषयीची ही सनद आहे. याची तारीख ४ जमादिलावल ११८० हिजरी अशी आहे. मंजूर करणाऱ्याचे किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही. सनदेच्या प्रारंभी शाही शिक्क्याप्रमाणे भासणारा आणि काही पर्शियन शब्द असलेला छोटा चौकोन आढळतो.

**प्रारंभ :** इजत असार वामा मुशेरीफ सायेर लश्कर बाजरि कडापा माळुम बाद xxx पिर महमदसा आजीन महजाद कीले कडपा यास.

**शेवट :** सात आणे. एक रुपया चे देत जाणे दरीबाद फीरमाली शान पोहचत ताकीद ममालस मजणे तारीख छ ४ माहे जमादिलावल सन ११८० हिजरी सन ११७५ फसली.

## डी. नंबर ३६८

ऐतीहासिक पत्रे
AITHIHĀSIC PATTRA

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x १". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

पृ. १८ (अ) वर येणारी ही एका छोट्या सनदेची नक्कल आहे. प्रारंभीचे काही शब्द खराब झालेले आहेत. मोडी सनदेच्या

थोडेसे वर काही पर्शियन शब्द असलेला आणि नबाबाच्या शिक्क्याशी साम्य असलेला लंबचौकोन एका पर्शियन परिच्छेदासह आढळतो. कडाप्पा किल्ल्यात असलेल्या मशिदीच्या देखभालीसाठी आणि तिथे दिवा लावण्यासाठी कडाप्पाच्या नबाबाने या सनदेद्वारे काही रक्कम देणगी म्हणून दिलेली आहे. मशीद, मंजूर करणारा किंवा ही सनद जारी करणारा अधिकारी यांपैकी कुणाच्याच नावाचा उल्लेख नाही. सनदेची तारीख ४ जमादिलावल ११८० हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** इजत असर कोंडा मुस्तजर सायेर कसबा कडपा xxxx सुरसन ११८९ फसली कसबा कडापा किलेंतील मसजीद तेल चिराग.

**शेवट :** xxxपोहचवुन रसीद घेन जाणे जाणीचे तरिख १४ माहे मोहरम सुरसन ११७३ हिजरी परवानेचि नकल लिहुन घेऊन असल परवाना भोगवटास अणर्णे.

## डी. नंबर ३६९

**ऐतिहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

पृ. १९ वर येणारी हीसुद्धा एका मूळ अस्सल सनदेची नक्कल आहे. तेलगू व पर्शियन भाषांतील काही ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेला शिक्क्यासारखा चौकोन मोडी सनदेच्या वर आढळतो. शेख इमाम कादर मशिदीच्या व्यवस्थापकास मशिदीच्या देखभालीसाठी एक रुपया देण्याबद्दलची ही कडाप्पाच्या नबाबाची आज्ञा आहे. सनदेची तारीख दिलेली नाही, पण त्यासाठी कोरी जागा सोडलेली आहे. ११८१ असे हिजरी वर्ष दिलेले आहे. मंजूर करणाऱ्या नबाबाचे नाव किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** अमीलान हाल व इस्तकबाल सायरे लषकर बाजार कसबा कडपा बिदनद मोबलग एक रुपया योमीया बाईसम अबुदल महमद बलदसे सेख ईमाम खादर मसजीदास.

**शेवट :** xx दौलत मशगुल बाशद दरीवाद ताकीद अकीदं हस बुल मसुर जाणर्णे.

## डी. नंबर ३७०

**ऐतीहासिक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". ६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. २० वर येणारी ही एका सनदेची नक्कल आहे. देखभालीसाठी शेख इमाम बकरी मशिदीस कडाप्पाच्या नबाबाने या सनदेद्वारे तीन सुवर्णमुद्रा मंजूर केलेल्या आहेत. मंजूरकर्ता नबाब किंवा ही सनद जारी करणारा अधिकारी यांची नावे दिलेली नाहीत. १४ मोहरम ११९३ हिजरी अशी सनदेवरील तारीख आहे.

**प्रारंभ :** इजत हसार हामु कुमळु कोंडा मस्तुजर सायेर कसबा कडपा सिधवट्टळुर सन ११८७ फसली.

**शेवट :** माहे १४ सन ११७३ हिजरी परवानाचे नकल लिहुन घेऊन असल परवाना इनामदारास देणें.

## डी. नंबर ३७१

**ऐतिहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. २१ वर ही सनद येते. तेलगू व पर्शियन भाषांत लिहिलेल्या काही ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेला शिक्क्यासारखा चौकोन या मोडी सनदेच्या वर आढळतो. मुळातील अस्सल सनदेची ही नक्कल आहे. नक्कलकाराचे नाव किंवा या सनदेविषयीच्या माहितीचे मूळ दिलेले नाही. कडाप्पाच्या नबाबाने चंजूर तालुक्यातील देशमुख व देशपांडे यांना उद्देशून काढलेल्या आज्ञापत्राचे स्वरूप या सनदेला आहे. करमली महमद अली मशिदीच्या व्यवस्थापकाने ११९३ फसलीमध्ये केलेल्या विनंती अर्जानुसार त्या मशिदीस दिल्या जाणाऱ्या अनुदानाची नबाबास खातरजमा झालेली आहे. त्यानुसार वर उल्लेखिलेल्या तालुक्यातील अधिकाऱ्यांना भावी मार्गदर्शनासाठी ही गोष्ट कळविण्यात येत आहे. ७ रबिलाखर ११७३ फसली अशी सनदेवरील तारीख आहे. नबाबाचे नाव किंवा अधिकाऱ्यांची नावे दिलेली नाहीत.

**प्रारंभ :** देशमुखानी व देशपांड्याने व मोकदमाने व मुजरे

यानी पो चंदुर सरकार सित्धोट बिधनद चुमजेरसतेरा पलीं अमल पुराणा कडपा मुताळुक पोमार बामुत्क जायेजे

**शेवट :** खुद कसेबे बादुवाये दौलत आबदमुदतक राहुन मवजीफावाषद मो अनक xxx सदरहतर छ ७ माहे रबीलाखर सन ११७७ हिजरी सन ११७३ फसली.

## डी. नंबर ३७२

**ऐतिहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". २४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

नरसापूर तालुक्यातील हनुमंतगुडी व कलसुपडी यांचा जमीनदार कृष्णा रेड्डी याला अनुकूल अशी ही सनद आहे. सनदेची तारीख २४ रबिसानी मास ११९३ हिजरी अशी आहे. सदरहू जमीनदाराने विनंती केल्यावरून वर उल्लेखिलेली दोन ठिकाणे त्यास इनाम म्हणून मंजूर केली असून त्याने त्याखातर निजामाकडे दरसाल रु. १००० पेशकश म्हणून भरायचे आहेत. जमीनदाराने वंशपरंपरागत या जमिनीचा उपभोग घ्यायचा आहे. या सनदेवर ज्याने ती मंजूर केली त्याची वा ज्याने ती जारी केली त्या अधिकाऱ्याची सही वा नावे नाहीत. कागदाच्या तळाशी उजव्या कोपऱ्यात एक आणि सनदेच्या अखेरीस दुसरा असे दोन अष्टकोनी शिक्के यावर आढळतात. डी. नंबर ३५७ मध्ये सांगितल्याप्रमाणेच यातील प्रारंभ व शेवट आहेत.

## डी. नंबर ३७३

**ऐतिहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. २२ वर ही कडाप्पाच्या नबाबाने दिलेल्या सनदेची नक्कल येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. मात्र पृष्ठ दुरुस्त केलेले आहे. उर्दू भाषेतील काही ओळी आणि काही पर्शियन शब्द व तेलगू भाषेतील एक ओळ असलेला दरबारी शिक्क्यासारखा चौकोन मोडी लेखनाच्या वर व खाली आढळतो. मुकलकोंडा येथील बंदीलाल मशिदीच्या व्यवस्थापकास मशिदीच्या देखभालीसाठी मंजूर केलेल्या विशिष्ट रकमेच्या अनुदानाचे नबाबाने यात नूतनीकरण केलेले आहे. नबाबाचे नाव किंवा त्या व्यवस्थापकाचे नाव किंवा सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव ही दिलेली नाहीत; तसेच ही सनद कशी मिळाली वगैरेबाबतची माहितीही दिलेली नाही. तारीख ७ मोहरम ११९३ फसली अशी आहे.

**प्रारंभ :** इजत हत्तगाद मुकुळ कोंडा मुस्ताजर सायरे कसबा कडपा वासीत्धोट बाफीयेत बाषद सुरसन ११८७ फसली महजीद.

**शेवट :** रोज दरोज पाहेंचवुन रसीद घेत जाण. परवाना नकल घेऊन असल भोगवटास देणे जाणिजे बा तारीख छ १७ माहे मोहरं सन ११७३ हिजरी.

## डी. नंबर ३७४

**ऐतीहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

कडाप्पाच्या नबाबाने शेख इमाम मशिदीस अनुकूल अशा दिलेल्या सनदेची ही नक्कल बऱ्यापैकी हस्ताक्षरात व वाच्य असून पृ. २२ (ब) वर येते. पर्शियन भाषेतील काही ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेला कडाप्पाच्या नबाबाच्या शिक्क्यासारखा चौकोन या पृष्ठाच्या माथ्यावर व तळाशी आढळतो. मशिदीच्या देखभालीसाठी तिच्या व्यवस्थापकाला (दररोज) एक 'फनम' द्यावा अशी नबाबाने खजिनदारास आज्ञा केलेली आहे. २७ मोहरम ११७७ हिजरी अशी तारीख सनदेवर आहे. नबाबाचे किंवा त्या अधिकाऱ्याचे नाव नाही. ही सनद मिळाल्याबद्दलचा तपशीलही दिलेला नाही.

**प्रारंभ :** इजत असार वेंकामुपरीफ सायेर लषकर बाजार कसबा कडपा बीदनद मोबलग १ येक फलम रोज पर बारा येकुद लायेत मुत सेखईमाम मवजा मसजीद.

**शेवट :** xx दौलत मशगुल राहून बारखी हमत भवजी नीदर मसजीद हजर व सरकार बाषद तबारार छ २७ मोहरम ११७७ हिजरी ११७३ फसली.

## डी. नंबर ३७५

**ऐतिहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

मुळावरून नकललेली ही छोटी सनद या भागाच्या पृ. २३ वर येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. पर्शियन भाषेतील काही ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेला (सरकारी) शिक्क्यासारखा चौकोन या मोडी सनदेच्या शिरोभागी आढळतो. देखभाल व दिवाबत्ती यांच्यासाठी शाईपेठ मशिदीस कडाप्पाच्या नबाबाने एक फनम देण्याविषयीची सूचना यात दिलेली आहे. ही मशीद कडाप्पामधील कोडकोंडा तालुक्यातील आहे. नबाबाचे किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव किंवा या सनदेविषयीची माहिती ही दिलेली नाहीत. १० मोहरम ११९३ हिजरी अशी या सनदेची तारीख आहे.

**प्रारंभ :** इजत हस्त गाहकोंडा मुस्तजर सायेर कसबा कडपा वासीध्दाटे बीधनत सुरसन सन ११८७ फसली महजीद शाई पेट यास तेल चीराख व राषनाई वगैरेबाबत.

**शेवट :** पाहोचाऊन रसीद घेणे. परवानेची नकल लीहुन घेऊन असल परवाना परतुन देणे जाणीजें. तारीख छ १० मोहरम सुर सन ११७३ हिजरी.

## डी. नंबर ३७६

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट १०" x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. २३ (अ) वर ही छोटी सनद येते. हीसुद्धा मूळ सनदेची नक्कल आहे. दैनंदिन देखभालीसाठी चार मशिदींना प्रतिदिनी चार फनम देण्याची ही कडाप्पाच्या नबाबाची आज्ञा आहे. मशिदींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :

१. अब्दुल हूरिअन पेश इमाम
२. हुसेन खान
३. बुऱ्हान शहा
४. महमद पेश इमाम

या मशिदींना त्यांचे जे रोजचे अनुदान मिळेल त्यातून त्यांनी दिवाबत्ती व रोजचा धूप जाळणे हे करायचे असून नबाबास दीर्घ आयुष्य व भरभराट प्राप्त व्हावी म्हणून प्रार्थना करावी अशी आज्ञा यात आहे. सनदेची तारीख १७ मोहरम ११८६ हिजरी अशी आहे. नबाबाचे किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही. तेलगू व पर्शियन भाषांतील थोड्या ओळी आणि नबाबाच्या शिक्क्यासारखा एक चौकोन यात आढळतो. या मोडी दस्तऐवजाच्या वर व खाली काही पर्शियन शब्द दिसतात.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इसाकबाल सायेर कस्बा बुलद कडपा बिदनद ४ च्यार फलम योमीया बाईसम देह इमाम मवजे xx बा ज्यारु बकशवा आदा अबरदार मुसमात तालुक मुद्दल मसजीद.

**शेवट :** ८१ मसार फेतल मसीद महमये देशईमामः तारीक १७ माहे रबीलावल सन ११८६ हिजरी.

## डी. नंबर ३७७

**ऐतीहासीक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x ८". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

ही सनद मूळ सनदेची नक्कल असून पृ. २४ (ब) वर येते. पर्शियन भाषेतील काही ओळी आणि पर्शियन शब्द असलेला एक चौकोन या मोडी सनदेत पहिल्याच पानावर आढळतो. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून पृष्ठे दुरुस्त केलेली आहेत. या सनदेद्वारे कडाप्पाच्या नबाबाने कुमलकोंडा येथील मूंडल मशिदीस दिवाबत्तीसाठी रोजी एक सुवर्ण फनम अनुदान दिलेले आहे. नबाबाचे नाव किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही. सनदेवर १४ मोहरम ११९३ हिजरी अशी तारीख आहे.

**प्रारंभ :** हजस्त दस्तगाह मुकुमळाकोंडी मुस्ताजर सायहेर कसबा कडपा विसिदोट बाफीयेत बाबत सुरसन ११८७ फसली मुड्ला महजीत दरजागा कसबे मजकुर.

**शेवट :** घेत जाणीजे दर परवानाचे नकल लिहुन घेऊन असल परवाना भोगवटास देणे. जाणीजें तारीख १४ मोहरम सन ११९३ हिजरी.

## डी. नंबर ३७८

**ऐतीहासिक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

मुळावरून नकललेल्या या छोट्या सनदेच्या नकलेचे हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून पृष्ठे दुरुस्त केलेली आहेत. पर्शियन भाषेतील काही थोड्या ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेला व सरकारी शिक्क्यासारखा भासणारा एक चौकोन या

कागदावर मोडी लेखनाच्या वरच्या भागात आढळतो. चंदूर (की चेन्नूर) येथील सय्यद बक्ष बाई इमाम मशिदीस या सनदेद्वारे कडाप्पाच्या नबाबाने रोज एक फनम असे अनुदान मंजूर केलेले आहे. मशिदीची देखभाल व दिवाबत्ती यांसाठी सदरहू रक्कम वापरायची आहे. सनदेची तारीख १३ मोहरम ११७६ हिजरी अशी आहे. नबाबाचे किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही. पृ. २५ वर ही सनद येते.

**प्रारंभ :** अमीलान हाल व इस्तकबाल प्रगणे चेनुर सरकर सिघाट बीधनद मसिद येक फलम योमीया सैद शेख बाइमाम मसजीद बाहदर खान मरहुम.

**शेवट :** दौलत अवाद मुदत मशगुल व मवुजुफशपद मीलईण. तारीख छ १५ रंजान सन ११७६ हिजरी छ १३ मोहरम जेबासन ११७६ हिजरी ११८२ फसली.

## डी. नंबर ३७९

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. २६ (ब) वर ही सनद येते. पर्शियन भाषेतील पाच ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेला शिक्क्यासारखा चौकोन या कागदावर आढळतो. हस्ताक्षर वाच्य असून पृष्ठांची दुरुस्ती केलेली आहे. बहादूरखान मशिदीस दिवाबत्ती व देखभाल यांसाठी कडाप्पाच्या नबाबाने दररोज एक फनम असे अनुदान मंजूर केलेले आहे. ही रक्कम देऊन दर्ग्याच्या व्यवस्थापकाकडून पावती घ्यावी आणि आयात कराच्या जमा रकमेत ही रक्कम खर्ची टाकावी अशी मुकुमलकोंडाच्या अधिकाऱ्यास आज्ञा केलेली आहे. ही सनद मंजूर करणाऱ्या नबाबाचे किंवा तालुकाधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही. सनदेची तारीख १० रमजान ११९३ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** इजत दस्तय xxx मुकमळ कोंडा मुस्तुजर सायेर कसबा कडपा वासीध्तोट बिदनद सुहरसन सन ११८९ फसली दरीवीला. महजीद बहदुर खान कसबा कडपा यासी.

**शेवट :** आज ऐवज सायर रोज दररोज पोहचऊन रसिद देत जाणे परवानेच नकल लिहुन घेऊन असल परवाना नाम बुईसी देण जाणीजे छ १० रमजान सन ११९३ हिजरी.

## डी. नंबर ३८०

**ऐतीहासक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. २६ वर ही मूळ सनदेची नक्कल येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. तेलगू व पर्शियन भाषांतील काही ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेले व शासकीय शिक्क्याशी साम्य असलेले वर्तुळ व चौकोन या कागदावर आढळतात. चेंदूर जिल्ह्यातील देशमुख व देशपांडे यांनी सुलतान दरवेश मशिदीस कोंडापल्ली येथे जमणाऱ्या महसुलातून नेहमीचे अनुदान द्यावे अशी कडाप्पाच्या नबाबाने या सनदेद्वारे आज्ञा दिलेली आहे. सनदेची तारीख १२ रजब ११८६ फसली अशी आहे. नबाबाचे नाव किंवा मशिदींना द्यायची अनुदानाची रक्कम सांगितलेली नाही.

**प्रारंभ :** देशमुखानी व देशपांडे यानी मोकदमानी मुजारी यानी परगने चेंदुर बिंदनद मजरे कोंडापली बा आराजीये कीस्तकार लगायत्त सन ११८१ फसली.

**शेवट :** तारीख १२ माहे रजब सन ११८५ हिजरी सन ११८१ दफ्तर नकल सुद, बा-मुस्तफी नकल सुद दाखल दफ्तर मानगों.

## डी. नंबर ३८१

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १४ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

हीसुद्धा कडाप्पाच्या नबाबाने मंजूर केलेल्या सनदेची नक्कल असून ती या भागाच्या पृ. २७ वर येते. तेलगू व पर्शियन भाषेतील काही ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेला नबाबाच्या शिक्क्यासारखा चौकोन यात दिसून येतो. चेदूर येथील निजामशा दरवेश (मशिदीच्या) देखभालीसाठी अर्धी सुवर्णमुद्रा असलेल्या अनुदानाचे नूतनीकरण करण्याविषयी कडाप्पा जिल्ह्याच्या नबाबाने श्रीरंगपट्टण येथील देशमुख-देशपांडे यांना उद्देशून दिलेली सूचना या सनदेत आहे. १३ जमादिलावल १३२० हिजरी अशी यावरील तारीख आहे. नबाबाचे किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** अमीलान हाल व इस्तकबाल देशमुखानी व देशपांडी यानी तालुका कडपा सरकार दारुज सलतन श्रीरंगपठण बीदनद चुमोबलग अपरंजी नगद योमीया परगणे चेद्रर.

**शेवट :** छ १ माहे अहमद सालषा पलवां संवछर दफ्तर दिवानी हजर केशव राव दाखलसुद.

## डी. नंबर ३८२

**ऐतीहासिक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट.१० "x ८".१० ओळी.मोडी.जुने. पूर्ण.

पृ.२८ (ब) वर येणारी हीसुद्धा एका सनदेची नक्कल आहे. पर्शियन भाषेतील काही ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेले शिक्क्यासारखे एक वर्तुळ या कागदावर आढळते. या सनदेद्वारे कडाप्पाच्या नबाबाने देखभालीखातर असनदशहाच्या मशिदीस एक फनम अनुदान मंजूर केलेले आहे. नबाबाच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. रमजान १२०५ हिजरी अशी सनदेची तारीख आहे.

**प्रारंभ :** इजत असार सीनाप स्तजर सायेर कडपा बिदनद मोबलग दोन अणेचे बीया बेसय नीजामशाहा बामाजी बा असनद साबक बामोजी जारी केल असे.

**शेवट :** बातारीख छ १२ माहे रंजान सन ११०५ हिजरी नकल काजीचे माजी घेऊन्न असल परतून देण मासुद.

## डी. नंबर ३८३

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट.१० "x ८".१० ओळी.मोडी.जुने. पूर्ण.

पृ.२९ (अ) वर ही सनद येते. या पृष्ठावर काही तेलगू आणि पर्शियन ओळी आहेत. कडाप्पा येथील अब्दुल नबीखान मशिदीस देखभालीसाठी अर्ध्या फनमचे अनुदान या सनदेद्वारे देण्यात आलेले आहे. ही मशीद कडाप्पा येथे आहे. ही रक्कम मशिदीची देखभाल व दिवाबत्ती यांसाठी वापरली जावी असे सांगितलेले आहे. नबाबाचे नाव लिहिलेले नाही. १३ मोहरम ११९७ हिजरी अशी सनदेवर तारीख आहे.

**प्रारंभ :** इजत हस्तगाहा कोंडा मुस्तजर सायेर कसबा कडपा वासीध्तटे बिधनह सुरस्न ११८७ फसली अबदुल नबीखान साहेबाचे मोकर बेसलतेल चीराग वगैरे.

**शेवट :** माहे मोहरम छ १० ताराख हिजरी ११७३. परवानेचा नकल लिहुन घेऊन्न असल परवाना परतून देणें तारीख सदर.

## डी. नंबर ३८४

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट.१० "x ९".१८ ओळी.मोडी.जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ३१ वर येणारी ही एका सनदेची नक्कल आहे. आधीच्या सनदेत सांगितल्याप्रमाणे येथेही पर्शियन व तेलगू भाषांतील काही ओळी आढळतात. या सनदेद्वारे कडाप्पाच्या नबाबाने मासापेट येथील मशिदीस देखभाल व दिवाबत्ती यांसाठी प्रतिदिनी एक फनम असे अनुदान मंजूर केलेले आहे. ही सनद जारी करण्याबाबतचे काही तपशील सांगितले आहेत. १० रमझान ११४३ हिजरी अशी सनदेची तारीख आहे; पण नबाबाचे नाव सांगितलेले नाही.

**प्रारंभ :** इजत असार दस्तगाद मुकुमळ कोंडा. मुस्तजर सायेर कडपावासी ध्तोद बिधनद सुरुसन ११८९ फसली मसीद मासापेट कसबा कडापा.

**शेवट :** असल परवाना परतुन देणें. जाणीजे तारीख १० माहे रमजान सन ११७३ हिजरी.

## डी. नंबर ३८५

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट.१० "x ८." १४ ओळी.मोडी.जुने. पूर्ण.

कडाप्पाच्या नबाबाने जारी केलेल्या सनदेची ही नक्कल या भागाच्या पृ. ३२ (अ) वर येते. पृष्ठाच्या प्रारंभी पर्शियन भाषेतील काही ओळी आढळतात. याद्वारे देखभाल व दिवाबत्ती यांसाठी नबाबाने हजरत ताशीमखान मशिदीस प्रतिदिनी दोन फनम असे अनुदान मंजूर केलेले आहे. सनदेची तारीख १३ मोहरम ११७२ हिजरी अशी आहे. नबाबाच्या नावाचा उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ :** अमीलान हाल व इस्तकबाल चंदुर सरकार सिध्तोट सुभा फदार खुद बुनिया xxx बिदनद १२ फलम योमीया नसीद हजरत तखुम स्तोहकायेक मारुफ.

**शेवट :** बातारीख छ ३ मोहरम सन ११७२ हिजरी फलसन ११६८ फसली.

## डी. नंबर ३८६

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ३३ वर मूळ सनदेची ही नक्कल येते. काही पर्शियन ओळी या पृष्ठावर दिसतात. देखभाल व दिवाबत्ती यांसाठी कडाप्पाच्या नबाबाने अमिलसाहेब मशिदीच्या व्यवस्थापकास प्रतिदिनी दोन फनम अनुदान मंजूर केलेले आहे. या सनदेची तारीख ९ रबिलावल ११७२ फसली ही आहे. नबाबाच्या नावाचा उल्लेख नाही.

**प्रारंभ :** अमीलान हाल व इस्तकबाल परमणे चेदुर सरकार सिध्वोट कर्नाटक सुभे फारखुद बुनिया.

**शेवट :** तहसील सायेर कडपा पार्हे चवीत जाणे छ ९ मोहरम बीलवल सन ११७२ फसली.

## डी. नंबर ३८७

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ३३ (अ) वर ही सनद येते. काही थोड्या पर्शियन ओळी आणि नबाबाच्या शिक्क्याप्रमाणे असणारा एक चौकोन या कागदावर दिसतो. अमिलसाहेब मशीद व सय्यद हुसेन मशीद यांना देखभाल व दिवाबत्ती यांसाठी प्रत्येकी प्रतिदिनी एक फनम देण्यासाठी मोकलकोंडा येथील अधिकाऱ्यास कडाप्पाच्या नबाबाने या सनदेद्वारे सूचना दिलेली आहे. नबाबाच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. सनदेची तारीख १० रमझान ११९३ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** इजतअसार दस्तगाहा मुकमदकोंडा मुस्ताजर सायरे कसबा कडपा व सीध्वोट बिदनद मण सन ११८९ फसली मसजीद आमीन साहेब.

**शेवट :** रीवाज दररोज पोहचउन रसीद घेत जार्णे परवानाचा नकल घेऊन अस्सल परवाना नामबु देत जाणे जाणीर्जे छ १० रमेजान सन ११९३ हिजरी.

## डी. नंबर ३८८

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ३४ वर येणारी ही मूळ सनदेची सत्य नक्कल आहे. तेलगू व पर्शियन भाषेतील काही ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेला शिक्क्यासारखा चौकोन या पृष्ठावर आढळतो. देखभाल व दिवाबत्ती यांसाठी एक रुपयाचे अनुदान या सनदेद्वारे मंजूर करण्यात आलेले आहे. व्यवस्थापकांची नावे आणि इतर तपशील दिलेला आहे. नबाबाचे नाव दिलेले नाही. सनदेची तारीख ७ शबान ११७६ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** आमालान हाल व इस्तकबाल प ॥. चंदुर सरकार सिध्वोट सुभेदार खुद बुनीया हैदराबाद बिदनद मोकस्त ऐक १ रुपया योमीया जहत अखेरज्यात दर्गाह मसउद साबक.

**शेवट :** बाद तारीख छ ९ शाबान सुरसन ११७२ फसली.

## डी. नंबर ३८९

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

पृ. ३४ (अ) वर ही सनद येते. कडाप्पा येथील साहेब मुतुसिल साहेब मशिदीस कडाप्पाच्या नबाबाने दिलेली ही सनद आहे. देखभाल व दिवाबत्ती यांसाठी या मशिदीस एक फनम अनुदान मंजूर केल्याचे सांगणारी ही सनद आहे. ही रक्कम कमलकोंडा येथे जमा होणाऱ्या रकमेतून द्यायची आहे. या सनदेत पर्शियन भाषेतील पाच ओळी आणि नबाबाच्या शिक्क्यासारखा एक चौकोन काही पर्शियन शब्दांसह आढळतो. नबाबाचे नाव किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव यात दिलेले नाही. १० रमझान ११९३ हिजरी अशी यावर तारीख आहे.

**प्रारंभ :** इजत दस्तगाहमु कुमळकोंडा मुस्ताजर सायरे कसबा कडपा वासीध्वोट बाफीयत सन ११८९ फसली मसीजील सुद साहेब मुतसील मासाहेब कसबा कडपा.

**शेवट :** देऊन रसीद घेत जाणे. तारीख १० माहे रमजान सन

११९३ हिजदरी असल परवानेचे नकल घेऊन असल परवाना परतुन देणें.

## डी. नंबर ३९०

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ३५ वर येणारी ही सनद आहे. हिजरात कादरसाहेब व शेख इस्माइल या दोन मशिदींस कडाप्पाच्या नबाबाने दिलेल्या सनदेची ही नक्कल आहे. देखभाल व दिवाबत्ती यांसाठी या दोन मशिदींना प्रतिदिनी दीड फनम रोख देण्यासंबंधीचे हे आज्ञापत्र आहे. या दोन्ही मशिदींच्या व्यवस्थापकांच्या नावांचा उल्लेख यात आहे. नबाबाच्या नावाचा मात्र उल्लेख नाही. १९ मोहरम ११७९ हिजरी अशी या सनदेवरील तारीख आहे.

**प्रारंभ :** इजत हसार वर्मां xxx सायरे षहर बाजार कसबा कडपा बिदनद मो ॥ ३ तीनी फलम योमीया. खुद करुन मजीद हजरत कादर साहेब ह्यांस.

**शेवट :** १ मसीद सैद हतीबा दरवेष ईमाम १ ॥ सेख ईसमईल मवजान फराष ८ ॥ समा. छ १५ माहे मोहरम सन ११८४ हिजरी सन ११७९ फसली.

## डी. नंबर ३९१

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ३६ वर ही सनद येत असून तीवर काही पर्शियन ओळी आणि शब्द असलेले चौकोनी सील आढळते. या सनदेद्वारे कडाप्पाच्या नबाबाने मुतसीलपेट मशिदीस दिवाबत्तीसाठी प्रतिदिन एक फनम असे अनुदान मंजूर केलेले आहे. मुकुलकोंडा येथील अधिकाऱ्यास ही रक्कम मशिदीच्या व्यवस्थापकाला द्यावी अशी सूचना दिलेली आहे. नबाबाचे वा या अधिकाऱ्याचे नावे सांगितलेले नाही. १० रमजान ११९३ हिजरी अशी सनदेवर तारीख आहे.

**प्रारंभ :** इजत दस्तगद मुकहलकोंडा मुस्तजर सायेर कडपा वासीध्तोट बीदनद सुहरसन ११८९ फसली दरीवीला. महजीद मुतसीलपेट फातुमीया कसब कडपा.

**शेवट :** भोगवटासी देणें बरहत ताकीद पानद जाणीजें छ १० रमजान सन ११९३ हिजरी.

## डी. नंबर ३९२

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ३६ (ब) वर येणारी ही सनदही कडाप्पाच्या नबाबानेच मंजूर केलेली आहे. काही पर्शियन ओळी आणि शब्द असलेले दोन शिक्के या कागदावर दिसतात. चन्नुपक्कणमधील दौदपूर येथील जमिनींचा काही भाग नबाबाने महादेव भटाचा पुत्र चंद्रशेखर भट यास देणगी म्हणून दिल्याचा उल्लेख या सनदेत आहे. या ब्राह्मणांनी केलेल्या विनंतीनुसार कडाप्पाच्या नबाबाने मूळ अस्सल सनदेचे नूतनीकरण केले आहे. मंजूर केलेल्या जमिनीच्या नेमक्या क्षेत्राचा उल्लेख केलेला नाही; तसेच नबाबाचे किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही. या सनदेच्या नूतनीकरणाची तारीख १७ शाबान ११६७ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** अमीलान हाल इस्तकबाल परगणे चंनुर सरकार सिध्तोट तालुके कर्नाटक सुभे फारखुध बुनीया हैद्राबाद बिदनद मौजे दाउदफर असल परगणे मजकुर मोबलग.

**शेवट :** xxx मुफदाभात पोहचबणे तेहरीख छ १७ माहे शाबान सन ११६९ मुस्तैद ११६४ फसली.

## डी. नंबर ३९३

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ४५ वर ही सनद येते. या पृष्ठाच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात काही थोड्या पर्शियन ओळी लिहिलेल्या आहेत. कडाप्पाचा नबाब सय्यद खमनखान साहेब याने चंगूर येथील काझी सय्यद शेख इमाम मशिदीस दिलेल्या रोख देणगीचे मोठ्या आनंदाने नूतनीकरण केलेले आहे. दिवाबत्तीसाठी

मशिदीस ही रक्कम रोजच्या रोज दिली जावी अशीही आज्ञा आहे. सनदेची तारीख २० जमादिलावल ११९९ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** राम राज बाफी पादवाफर काजी सैदमामसाले अमीलाने हाल व इस्तकबल देषमुखानी देषपांड्याना तालुक कडपा सरकार श्रीरंगापटण बीदनद.

**शेवट :** २० माहे यैजदी साले सन ११७८ हिजरी विश्वासु संवत्छर खलाखर दफ्तर रुजु हिंदवी दफ्तर कनडी दफ्तर सु ॥ सलासैन.

### डी. नंबर ३९४

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने.

या भागाच्या पृ. ४५ (ब) वर ही सनद येत असून तिच्या प्रारंभी पर्शियन शब्द असलेला सरकारी शिक्क्यासारखा एक चौकोन आढळतो. राजमपल्लीच्या काझी गुलाम मोहिद्दीन याच्याकडून बाकी येणे असलेला पेशकश जमा करावा आणि त्याची मालमत्ता पुन्हा स्वतःच्या अधिकाराखाली घ्यावी अशी आज्ञा या सनदेद्वारे चंदूरचा तालुकाधिकारी भुजंगराव यास दिलेली आहे. नबाबाच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. जमादिलाकर ११९४ हिजरी अशी तारीख सनदेवर आहे.

**प्रारंभ :** अजत बसत गाई भुंजगराव आमील परगणे चेनुर बाफीयत बाबध दरीवीला परगणे मजकुर मौजे xxx राजमपली बयादवाफर दरदोगाव सन ११७० फसली पासुन गुलाम मोहीदीन.

**शेवट :** नकल घेऊन असल परवाना ममबुर देणे जाणीजे. छ २४ माहे जमादिलाकर.

### डी. नंबर ३९५

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x८". १० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

पृ. ४७ वर ही सनद येते. तेलगू व पर्शियन भाषेतील काही ओळी आणि आतमध्ये काही पर्शियन शब्द असलेले नबाबाच्या शिक्क्यासारखे एक वर्तुळ या कागदावर दिसते. शेख मोहिद्दीन व इमाम किद्ब मशीद यांच्याकरवी रक्कम दिली जावी, अशी नबाबाची सूचना असून ही रक्कम काही मूर्तींद्वारे जमा करावी असे यात सांगितलेले आहे. १६ रबिलावल ११२२ हिजरी अशी सनदेवर तारीख आहे. नबाबाचे नाव सांगितलेले नाही.

**प्रारंभ :** अमीलान हाल व इस्तकबाल पाचनु सरकार सीध्तोट बीदनद सुहरसन अशर मया अलफ दितरवाजह इनाम.

**शेवट :** एकुन एक रुपया जमीनीचं वार येक सह दहु बारजी सबत इनामदार मजकुरास देत जाणे छ १९ रबीलवल ११२२ हिजरी.

### डी. नंबर ३९६

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १२ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

पृ. ४८ वर ही सनद येते. पर्शियन भाषेतील काही थोड्या ओळी आणि पर्शियन शब्द असलेला गोल शिक्का या पृष्ठावर आढळतो. ही अर्काटच्या नबाबाने मंजूर केलेल्या दोन देणग्यां-बाबतची सनद असून एकीचे स्वरूप रोज द्यायच्या रोख रकमेचे, तर दुसरी देणगी म्हणजे एक जमिनीचा तुकडा आहे. दाऊदखान याने केलेल्या खास विनंतीनुसार नबाबाने त्यास प्रतिदिनी अर्धा रुपया आणि २० बीदा जमीन मंजूर केलेली आहे. चन्नूरच्या अधिकाऱ्यासाठी ही आज्ञा काढलेली आहे. १६ रबिलावल ११२२ हिजरी अशी ,याची तारीख आहे. नबाबाचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** अमीलानी हाल इस्तकबाल परगणे चेनुर सिध्तोट बीधनंद सुहुरसन अशर मैया अलफ दरवाज बदल ईनाम व रोजीना फातिया वगैरे.

**शेवट :** एकुन रुपया $\frac{१}{४}$ बीदा २० सदरहुबार नियबात इनामदार मजकुरास देत जाणे छ १६ माहे रबिलवल सन ११२२ हिजरी माते सुद.

### डी. नंबर ३९७

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १६ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ.४९ वर ही सनद येते. काही थोड्या पर्शियन ओळी आणि काही शब्द असलेला गोल शिक्का या कागदावर दिसतो. कसबे कडाप्पा येथील अब्दुल गफूर, कतिबजमे मशिदीस देखभाल व दिवाबत्ती यांसाठी रु. १-३-० प्रतिदिनी योमीया म्हणून देण्यात यावे असे चन्नूर येथील अधिकाऱ्यास कडाप्पाच्या नबाबाने या सनदेद्वारे कळविले आहे. याच सनदेत नबाबाने असे सांगितले आहे की, खतबाई मशिदीस जादा आठ आण्यांची रक्कम नबाबाने मंजूर केली आहे. २७ शाबान ११७७ हिजरी अशी सनदेची तारीख आहे. नबाबाच्या नावाचा उल्लेख नाही.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इस्तकबाल परगणे चेंनुर सरकार सीध्ताटे सुभे फारखुध बुनीयाद हैद्राबाद बीदनद मोबलग रुपय दिड रुपया योमीया अबदुल्ला गपुर खदर.

**शेवट :** बा तारीख २७ माहे शाबान सन ११९९ हिजीरी सन ११९३ फसली मोरदबुसुद सुरुसुद.

## डी. नंबर ३९८

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ.५० वर एका सनदेची नक्कल येते. पर्शियन भाषेतील काही ओळी आणि काही शब्द असलेला गोल वर्तुळाकार शिक्का या पृष्ठावर आढळतो. कडाप्पा येथील गुलाम हुसेन कद्‌ब जुमा मशिदीस प्रतिदिनी रु. १-८-० योमीया म्हणून देण्यात यावेत, असे या सनदेद्वारे कडाप्पाच्या नबाबाने चन्नूरचा तालुकाधिकारी गोविंदराव यास कळविले आहे. सनदेच्या नूतनीकरणासंबंधीच्या काही गोष्टीही यात स्पष्ट केलेल्या आहेत. मशिदीची देखभाल व दिवाबत्ती यांसाठी ही रक्कम खर्च करावी अशी सूचना दिलेली आहे. सनदेची तारीख २९ जमादिलावल १२०५ हिजरी अशी आहे. कडाप्पाच्या नबाबाच्या नावाचा उल्लेख केलेला नाही.

**प्रारंभ :** खसुदीसीयेत दस्तगाह गोवींदराव अमीलान परगणे चेनुर सरकार सीध्तोट सुभे फारखुद बुनीया हैद्राबाद फीयेत बाषद दरीवीला ११९० दिडरुपया योमीया दररोज गुलाम हुसैन खतीब जुमाससजींद.

**शेवट :** खाधीचे ममाहेरने नकल घेऊन्न असल माघारे देणें मोरदबुसुद छ २७ माहे जमादिलवल सन १२०५ हिजरी पौ छ १९ माहे जमा दीसानी सन १२०५ हिजरी.

## डी. नंबर ३९९

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ५२ वर ही सनद येते. मनायपेट परगणा खेड्यातील जमिनीचा काही हिस्सा कादर मीरा अलिखान यास 'श्रोत्रियम्' म्हणून आपण मंजूर केला असल्याचे या सनदेद्वारे कडाप्पाच्या नबाबाने चन्नूरच्या तालुकाधिकाऱ्यास कळविले आहे. प्रस्तुत इनामदाराकडून तालुकाधिकाऱ्याने 'श्रोत्रियम्'ची रक्कम जमा करायची असून तातडीने त्याच्याकडे जमिनीचा कब्जा द्यायचा आहे. सनदेची तारीख १ शाबान ११९५ हिजरी अशी आहे. नबाबाचे नाव सांगितलेले नाही.

**प्रारंभ :** हामीलान इस्तकबाल कोलादमाने मजरी याने व कुल करुणा याने ताळुके चेंनुर बीदनद चुंमौजे मानेपली परगणे मजकूर–

**शेवट :** दरसाल ताजा सनदध हुजूर न टेवितां या सनदाचे नकल घेऊन्न असल वापस देण बातारीख १ माहे शाबान सन ११४४ हिजरी.

## डी. नंबर ४००

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ५३ वर ही सनद येते; तसेच या पानाच्या वरच्या भागात पर्शियन भाषेतील काही ओळी लिहिलेल्या आढळतात. कडाप्पा येथील कोदंड रामस्वामी मंदिराचे मूळ व इतिहास यांविषयीचा मजकूर या दस्तऐवजात आहे. या मंदिराच्या देणग्या व जंगम (movable) मालमत्ता नबाब व कंपनीचे काही अधिकारी यांनी जप्त केलेली होती. अब्दुल मसजिदच्या कारकीर्दीत श्रीकोदंडरामस्वामीचे मंदिर कालपरत्वे पडझडीस आलेले होते. देवतेची मूर्ती देवळातून हलविली गेली होती. पुढे नबाब अब्दुल हकीमखान याने आपल्या हिंदू व मुस्लिम अधिकाऱ्यांना उद्देशून एक फर्मान काढले. त्यात त्याने कोदंड रामस्वामी मंदिराच्या पुजाऱ्यांनी मूळच्या जागी नवे मंदिर बांधावे,

मंदिराच्या (जप्त केलेल्या) देणग्या व स्थावर जंगम मालमत्ता परत करण्यात यावी; तसेच पूजाअर्चा वगैरे पार पाडण्यासाठी सेवकांचे पगार चुकते करावेत वगैरे सूचना दिल्या आहेत. सनदेवर तारीख लिहिलेली नाही. यातील शेवटच्या ओळीत कडाप्पा येथील एक अधिकारी मनाजी याने ही सनद लिहून घेतल्याचे नमूद केले आहे.

**प्रारंभ :** सखळ कारीस्तेजे समस्त बाजीदराने षादर व अतराफ वगैरे हिंदु व मुसलमान साहेबानी जी कैफियताची षहिदा करीतां मोहबर बा। रामाच्यारी.

**शेवट :** प्रख्याती होऊन आणि धर्म स्थापना घडे ज्याज्यास रुसुम व जमीन व इनाम योमीया देवळ केलेले असे त्यात्यानी बराई दिल्ला इस्तफरं प्रियाद कागदा वरी ब यानी नींषानी करीत जाण कबर कलाबाईल १. रुजु नानाजी गुमास्ते कडापाचा चावडी.

## डी. नंबर ४०१

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १२ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ५४ (अ) वर ही सनद येते. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य आहे. अरबी व तेलगू भाषांतील काही ओळी आणि काही अरबी शब्द असलेला एक गोल शिक्का या कागदाच्या वरच्या उजव्या भागात दिसतो. खालच्या भागातील काही ओळी पुसट झालेल्या आहेत. कडाप्पा येथील अब्दुल्ला याकूब मशिदीस दिवाबत्तीसाठी एक फनम देणगी देण्याविषयी कडाप्पाच्या नबाबाने मुसर चावडीच्या श्रीनिवास वेंकण्णा या अधिकाऱ्यास सूचना दिल्याबद्दलची ही छोटीशी सनद आहे. हे फर्मान काढणाऱ्या अधिकाऱ्याची सही किंवा ती जारी केल्याची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** इजर असार आनिवास वेंकणा मुषरफ चावडी कडपा अमीके बीगे एक फलम योमीया दर राजे.

**शेवट :** करुन बादगन दौलत आबद xxx बाबात ताकीद जाणीजें तारीख खुस्तफी नकल कुद दुफ्तरसुद दफ्तर दाखल मानगो.

## डी. नंबर ४०२

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १२ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ५५ (अ) वर ही सनद येते. पर्शियन भाषेतील काही ओळी आणि काही शब्द असलेला गोल शिक्का सनदेच्या प्रारंभी आढळतो. सिदोती चावडीच्या अधिकाऱ्यास उद्देशून कडाप्पाच्या नबाबाने काढलेल्या फर्मानाचे स्वरूप या सनदेला आहे. त्यात भीमाचारीच्या योगक्षेमासाठी नबाबाने प्रतिदिनी एक फनम असे अनुदान मंजूर केल्याचा उल्लेख आहे. ही रक्कम नियमितपणे दिली जावी असा आदेशही आहे. सनदेवर नबाबाचे नाव किंवा ती काढणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव किंवा ती काढल्याची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इस्तकबाल च्यावडी सायरे सिध्धेट बीदनद मोबलग एक फलम योमीया बासम भीमाच्यारी कोमल.

**शेवट :** देवल असती. मोबलग मजकुर रोजदरोज देत जाण नामबु ईमाम अष खुद रुजु दरगुन बादगन अये दौलत राहिल जाणीजे व तारीख माहे सन.

## डी. नंबर ४०३

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १२ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ५७ वर ही सनद येते. तेलगू भाषेतील काही ओळी सनदेच्या शेवटी लिहिलेल्या दिसतात. आत कसलेही शब्द नसलेला एक काटकोन चौकोन कागदाच्या वरच्या भागाच्या मध्यावर दिसतो. या सनदेद्वारे कडाप्पाच्या नबाबाने भीमाच्यार्यास त्याच्या योगक्षेमासाठी प्रतिदिनी सोन्याचा अर्धा फनम असे अनुदान मंजूर केलेले आहे. कडाप्पाच्या चावडी कार्यालयातून ही रक्कम द्यायची आहे. हे अनुदान मंजूर करणाऱ्या नबाबाचे नाव किंवा अधिकाऱ्याची स्वाक्षरी सनदेवर नाही. तारीख ११ रमजान ११९४ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** अमीलान हाल व ईस्तकबाल कडपा च्यावडी

बीदनद मोबलग अर्धा फलम अपरंजी योमीया भीमाच्यारी यासं.

**शेवट** : मामुल नामा बुईदे सफोद चावडी जार्णे बारी बावता ताकीद समजणें तारीख गुरे रमजान सन ११९४ हिजरी नकल घेऊन असल परवाना नाला बुईस देणें.

## डी. नंबर ४०४

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ८". १० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ६६ (ब) वर ही सनद येते. काही पर्शियन ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेले मोठे वर्तुळाकार सील कागदाच्या मध्यभागी असून सनदेच्या शेवटच्या ओळीनंतर काही पर्शियन शब्द असलेला छोटा चौकोन आढळतो. विजापूरच्या सुलतानाने काझी महम्मद हबीबुल्ला यास आदिलशाही राज्यातील काही खेडी आणि त्याच्याकडून काही करांच्या वसुलीचे अधिकार मंजूर केल्याची ही सनद आहे. वाचता येतील अशा तऱ्हेने खेड्यांची नावे लिहिलेली नाहीत. काढल्या जाणाऱ्या सनदांच्या बाबतीत विजापूर दरबाराचा हा नेहमीचा नमुना आहे. सुलतानाच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. सनदेची तारीख १० शाबान ११८९ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ** : (अरीहुन) हाल व इस्तकबाल देशमुख व देशपांडे याजवरी अया व मजरी याने व मजकुर सकलास xxx सुबे दारुल जफ बिजापुर व परगणे सरकार.

**शेवट** : असल मस्तुर अमल अरदे हरीफी तारीख चाबु गुरे माहे शाबान अलमौजम सन ११८९ हिजरी.

## डी. नंबर ४०५

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ८". १८ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

१३९ क्रमांकाच्या भागातील पृ. ७० वर ही सनद येते. तेलगू भाषेतील काही थोड्या ओळी या सनदेच्या वर व खाली आढळून येतात. कडाप्पाच्या नबाबाने कोइलकुट्टल येथील महसूल वसुली अधिकाऱ्यांच्या प्रमुखास दिलेली ही आज्ञा आहे. हजरत अब्दुल हाजी काझी यास इनाम दिलेल्या काही गावांतून जमा केलेल्या रकमेतून त्याने पैसे द्यावेत, अशी ही आज्ञा आहे. इनाम दिलेल्या गावांची नोंद केलेली आहे. नबाबाचे किंवा सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही. ३ रबिलाखर, ११७४ हिजरी अशी सनदेची तारीख आहे.

**प्रारंभ** : इजत असार अशवया इजारदार परगणे कोईल कुठला मालम बा तारीख हरीवीला हजरत अबदुल हाजी काजी साहेबाचे इनाम व रसुम तुमचे तालुके गांवी आहे म्हणुन हजुर जाहर जाहले असें.

**शेवट** : व तीनी गावाच इनाम तुमाल करणें माहे तारीख छ ३ रबीलाखर सन ११८४ हिजरी.

## डी. नंबर ४०६

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

या भागाच्या पृ. ७२ वर ही सनद येते. तिच्या प्रारंभी व शेवटी पर्शियन भाषेतील काही थोड्या ओळी दिसतात. कागदाच्या वरच्या उजव्या भागात काही पर्शियन शब्द असलेला एक षटकोनी शिक्का दिसतो. काही व्यक्तींना बक्षीस म्हणून तीन खेडी दिल्याचे याद्वारे कडाप्पाच्या नबाबाने पसपल विभागाच्या मुख्य अधिकाऱ्यास कळविले आहे. संबंधित व्यक्तींनी तेथील शेतजमिनी लागवडीखाली आणल्यानंतरच अधिकाऱ्याने करवसुली करावी असे यात सांगितले आहे. या व्यक्तींची नावे, खेड्यांची नावे किंवा इनाम दिलेल्या जमिनींचे क्षेत्र यांचा यात निर्देश नाही. नबाबाचे नाव किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नावही सांगितलेले नाही. सनदेची तारीख १८ मोहरम ११७८ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ** : अमीलान हाल व इस्तकबाल परगणे पसपल सरकार गाजीपुर बीदनद चुमवजी तीनि देते बा काजी आलीत जावलद xxxx यास दामोखत जाये करम फजल करुन बा तारीख इनाम.

**शेवट** : जीरायेत बामोजी नीलेस दाखवुन देवणे तासरफ मैपत खुद करुन बादुवये दौलत आदा मुदत मषगुल बाषद मोहर तीनिखंडी बा तारीख छ १८ माहे मोहरम सन १०७८ हिजरी सन ११९४ फसली मोहरतपसुद.

## डी. नंबर ४०७

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHASIC PATTRA**

या भागाच्या पृ. ७६ वर कडाप्पाच्या नबाबाने दिलेल्या सनदेची ही नक्कल आहे. तिच्या प्रारंभी पर्शियन भाषेतील दोन ओळी दिसतात. स्वतःचा योगक्षेम व काही सेवाभावी कार्यासाठी अब्दुल कादर दरवेश याला कडाप्पाच्या नबाबाने या सनदेद्वारे काही जमिनी इनाम दिल्या आहेत. आपल्या इनामक्षेत्रात आणल्या जाणाऱ्या व बाहेर पाठविल्या जाणाऱ्या वस्तूंवर काही ठराविक आयात-निर्यात कर आकारण्याचा अधिकार या सनदेद्वारे दिलेला आहे. खेड्यांची नावे, त्यांचे क्षेत्रफळ, नबाबाचे नाव किंवा सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव ही दिलेली नाहीत. सनदेची तारीख ७ रबिलाखर ११७७ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इसाकवाल परगणे कडपा बीदनद रुसुम बा तपसील जैल अबदुल खादर दरवेष यास आजरईत्फ दायेम मासुल आदा म्हणुन जाहाली होती.

**शेवट :** xxx दौलत आमद तमशऊन व नव जुफ कर्दा हरीबाबत कीद अमल हजा खुन हस बुलमु मस्तुर अमले ते आणणे गोणी येकास रुपया, मोठ येकास येक कास : छ १ रबीलाखर ११ सन हीजरी.

## डी. नंबर ४०८

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". २० ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ८१ (ब) वर ही सनद येते. पर्शियन भाषेतील काही ओळी दिसतात. गाजीपूरच्या नबाबाने सय्यद अली दरवेश यास काही इनाम मंजूर केलेले आहे. हे इनाम पूर्वी विजापूरच्या सुलतानाने दिलेले होते आणि ते नूतनीकरणासाठी नबाबापुढे ठेवण्यात आले. मशिदीची देखभाल व दिवाबत्ती आणि काही सेवाभावी कृत्ये यांसाठी इनामदार सय्यद अली दरवेश यास रोख रकमेशिवाय काही शेतजमिनीही मंजूर करण्यात आलेल्या आहेत. मशिदीच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. दान दिलेल्या जमिनींचे क्षेत्र, खेड्याचे नाव, मशिदीचे नाव आणि असेच इतर तपशील वाचता येतील असे लिहिलेले नाहीत. सनदेची तारीख किंवा ती जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** मुतरा दीयाने मोहि xxx त हाल व देशमुखाने व देशपांडीयाने मोखदमाने व रुपाये व मुजारी याने परगणे कोईल कुट्टलम सरकार गाजीपुर.

**शेवट :** xxx अरदतहारीर फींतरीख गुरे जमादीलवल सन ११xxx स वाला कलमे षुद जमीन खंडी २ रोजी ना ७ ॥ तेल वजन.

## डी. नंबर ४०९

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ८२ वर ही सनद येते. तिच्या माथ्यावर व तळाशी काही थोड्या पर्शियन ओळी दिसतात. हिच्यावर कोणतेही शब्द नसलेला एक वर्तुळाकार शिक्का असून अर्ध्या चंद्राची एक ओबडधोबड आकृती सनदेच्या शेवटच्या ओळीवर आढळते. इनायत फकीर यास कल्लकोटलम या खेड्यातील जमिनी इनाम म्हणून या सनदेद्वारे मंजूर केलेल्या आहेत. या इनाम जमिनींतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही हिस्सा त्याने गावकऱ्यांना द्यायचा आहे. या सनदेत अधिकाऱ्याचे नाव किंवा ती जारी केल्याची तारीख दिलेली नाही.

**प्रारंभ :** देशमुखाने व देशपांडेयाने परगणे कोईल कुटम साई इनायत फकीर यासी लिहुन दिलह ऐसीजे.

**शेवट :** गावकारास देवुन बा अवलाद चालीलहे लिहुन दिलह सहि दिव बाग चालील लिहुन दिलहे असे.

## डी. नंबर ४१०

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १० "x ८". १८ ओळी. मोडी. जुने. चांगले. पूर्ण.

या भागाच्या पृ. ८२ वर ही सनद येते. पर्शियन भाषेतील काही ओळी सनदेच्या प्रारंभी दिसतात. गाजीपूर येथील इब्राहीमशाहा मशिदीस काही रोख रक्कम या सनदेद्वारे मंजूर केलेली आहे. ही सनद देण्याचे कारण, मशिदीच्या व्यवस्थापनासाठी नेमलेल्या व्यक्तींची नावे आणि दिवाबत्तीसाठी तेल वगैरे वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या व्यक्ती या सनदेत

सांगितलेल्या आहेत. रोजंदार व कायमस्वरूपी नोकरांना द्यायचा पगार वा मजुरी शेतजमिनीतून जमा होणाऱ्या साऱ्यातून द्यायची आहे. कडाप्पा जिल्ह्यातील कोईलकुट्टलम् येथील ही मशीद असून सनदेची तारीख ५ जमा दिलावल १०४० फसली ही आहे.

**प्रारंभ** : नकल परवाना मोहरजमेद सल मुलुक मदरुल मोहमद के बा तारीख पाच हुकुम षाहर जमादीलवल सन ४०.

**शेवट** : सरकार गाजीपुर सुबदोरुल जफर बीजापुर बीदनद चुबी जावार वस्तोके सौद इनायेत वल्लद अली दरवेष अजरत कमाल गुजारा नामे.

### डी. नंबर ४११

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ८". १५ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

या भागाच्या पृ. ८३ वर ही सनद येते. सय्यद इनायत व सय्यद अलीवर घोष मशिदीस दिलेली ही सनद आहे. कडाप्पा जिल्ह्यातील कोईलकुटला येथे ही मशीद आहे. तीमध्ये दिवाबत्ती व धर्मादाय कृत्ये करण्यासाठी कडाप्पाच्या नबाबाने या सनदेद्वारे काही जमीन मंजूर केलेली आहे. काही व्यक्तींचा नामनिर्देश केलेला असून त्यांनी मशिदीच्या व्यवस्थापक मंडळावर देखरेख करायची आहे. ५ रबिलावल ११५० फसली अशी सनदेची तारीख असून ती जारी करणाऱ्याचे नाव व स्वाक्षरी त्यावर नाही.

**प्रारंभ** : सदर हाल अमाद तीर जागीर बाराईत तकया सौदमजबुर महमद दरवेष (फाटलेले) इबराहिम (फाटलेले) जिमेस जेदक मसीदके अदरु केले.

**शेवट** : मजकुर दर सैद मामर मुख बादशाहा बायदमे xxxx बा ताकीद मामवानद मोकरुर सुद.

### डी. नंबर ४१२

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ८". १८ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना आहेत. पृ. ८५ (ब) वर हा दस्तऐवज येतो. तेलगू भाषेतील काही ओळी आणि काही अरबी शब्द असलेली पाच रेखाटणे (drawings) या पृष्ठावर वेगवेगळ्या ठिकाणी दिसतात. कोईलकुट्टल येथील रहिवासी राम जोशी याला प्रतिदिनी मंजूर केलेले छोट्या रकमेचे अनुदान स्पष्ट करणाऱ्या कडाप्पाच्या नबाबाच्या सनदेची ही नक्कल आहे. तिची तारीख १२ रजब ११८४ हिजरी अशी आहे. सनद मंजूर करणाऱ्या नबाबाचे नाव दिलेले नाही. ज्याला अनुदान दिले त्याचेही नाव दिलेले नाही; तसेच प्रतिदिनी रक्कम देण्यासाठी ज्या अधिकाऱ्यास सूचना केली गेली आहे त्याचेही नाव दिलेले नाही.

**प्रारंभ** : सुजावत दस्तगाइ अमानत खा माहमनजै. ता. कोईलकुठला बिदनद दरीवीला. सीताराम जोशी मजुमी यासी.

**शेवट** : नकल घेवुन असल परवाना फिरुन देणे. छ. १२ माहे रजेब सन ११८४ हिजरी ११८० फसली.

### डी. नंबर ४१३

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १० "x ८". १८ ओळी. मोडी. जुने. पूर्ण.

हीसुद्धा पृ. ८५ (ब) वर येणारी एका सनदेची नक्कल आहे. हा दस्तऐवज अगदीच संक्षिप्त असून तो डी. नंबर ४१२ शी संबंधित आहे. सीताराम जोशी याचे थांबविले गेलेले अनुदान या सनदेद्वारे पुन्हा सुरू करण्यात आलेले आहे. प्रतिदिन दिले जाणारे अनुदान पुन्हा सुरू करावे, असे नबाबाने तहसीलदारास कळविले आहे. १९ शावाल ११८७ फसली अशी यावरील तारीख आहे. मंजूरकर्ता वा स्वीकारणारा यांची सही यावर नाही. काही अरबी शब्द असलेला एक छोटा वर्तुळाकार गोल याच्या शेवटी आढळतो.

**प्रारंभ** : मौजे मतुल खिदमत महमद आली मुस्तदर जर हे हात दोनी पाडी बाबात रयात दरीवीला. सिताराम जोसी योमीया ८ आट पैसे मामुल चालत आहे.

**शेवट** : गुरे शवाल सन ११८७ हिजरीपासुन रोज बा रोज दर माहे पोहचावित आहे. परवानाचे नकल घेऊन असल परवाना फिरुन देणे छ १९ माहे शवाल सन ११८२ फसली.

## डी. नंबर ४१४

ऐतिहासीक पत्रें
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट.१२"x ८".१६ ओळी.मोडी.जुने. पूर्ण.

गंजीकोटच्या नबाबाने सीताराम जोशी यास त्याच्या उदरनिर्वाहासाठी मंजूर केलेल्या छोट्या रकमेच्या अनुदानासंबंधीची ही सनद आहे. तालुक्यातून जमा होणाऱ्या महसुलातून ही मंजूर रक्कम देण्यात यावी असे नबाबाने कोईलकुट्टलाच्या तहसीलदारास या सनदेद्वारे कळविले आहे. काही दिवस अशी रक्कम देणे थांबले होते, पण आता या सनदेच्या तारखेपासून पुन्हा रक्कम देणे सुरू करावे अशी सूचना आहे. सनदेवर मंजूरकर्त्याची स्वाक्षरी नाही; तसेच नबाबाचे नाव किंवा यात उल्लेखिलेल्या व्यक्तीचे निवासस्थान वगैरे तपशिलाचा निर्देश नाही. सनदेची तारीख २ शावाल ११९३ हिजरी अशी आहे. कडाप्पा येथून ही सनद जारी करण्यात आलेली आहे.

**प्रारंभ :** मषरुल दानम सिवाजी मोरेश्वर मुस्तजार परगणे कोइल कुटळा सरकार गंजीकोटा बा जाराईत सुर सन ११८९ फसली दरविला.सितारम ज्योसी सेकीन परगणे मजकुर.

**शेवट :** मजकुर जीनाइफ्त दाये गुरे शवाल सन मजकुर पासुन रोज दररोज पोहचवुन कबज देत जाणे. परवानाचे नकल घेऊन्न असल नामाबाईसम देणे जाणीचे छ २. शवाल सन ११९३ हजरी मुकाम कडपा.

## डी. नंबर ४१५

ऐतीहासीक पत्रें
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट.१२"x ८".१५ ओळी.मोडी.जुने. पूर्ण.

कडाप्पाच्या नबाबाने सीताराम जोशी यास मंजूर केलेल्या दैनंदिन रोख अनुदानाच्या सनदेची ही नक्कल आहे. तालुक्यातून जमा होणाऱ्या महसुलातून प्रस्तुत व्यक्तीस प्रतिदिनी रोख रक्कम द्यावी अशी सूचना या सनदेद्वारे नबाबाने गंजीकोटच्या तहसीलदारास दिलेली आहे. सनदेची तारीख २ शावाल ११९३ फसली अशी आहे. कडाप्पा येथे मुक्कामास असताना नबाबाने ही सनद दिलेली आहे. सनदेवर अनुदान मंजूर करणाऱ्याची सही नाही.

**प्रारंभ :** मषरुल बानाम सुभराव मद्वाजी मुस्ताजा देहाये बींन पाड सरकार गंजीकोट xxxx सुरसन ११८० दरीवीला सीताराम ज्योसी सायर परगणे कोईल कुटलू यासी

**शेवट :** मोकरोर करुन दिदले xxx सायेर मजकूर गुरे शवाल सन मजकूर पासून रोज दरोज पोहचावुन रसीद हाल करीत जाणे. परवानाचे नकल घेऊन्न असल परतुन देणे जाणीजे छ ५ शवाल सन ११९३ मोकाम कडपा.

## डी. नंबर ४१६

ऐतीहासीक पत्रें
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट.१० "x ८".१८ ओळी.मोडी.जुने. पूर्ण.

ही सनद या भागाच्या पृ. ८६ (ब) वर येत असून या भागातील इतर रचना डी. नंबर ३२३ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत. दैनंदिन उदरनिर्वाहासाठी सीताराम जोशी यास कडाप्पाच्या नबाबाने मंजूर केलेली ही सनद आहे. काहीही कारण नसताना हे अनुदान बंद करण्यात आलेले होते; ते या सनदेद्वारे नबाबाने सुरू केले. बेनीपाडूच्या तहसीलदारास बाकी रकमेसह ते पुन्हा सुरू करण्यास यात फर्माविले आहे. काही पर्शियन शब्द असलेला व नबाबाच्या दरबारी शिक्क्याप्रमाणे दिसणारा एक चौकोन व वर्तुळाकार गोल उजव्या कोपऱ्यात आणि सनदेच्या शेवटच्या ओळीजवळ आढळून येतो. नबाब किंवा त्याचे अधिकारी यांपैकी कुणाचीही स्वाक्षरी सनदेवर नाही. १० रमजान हिजरी अशी त्यावर तारीख आहे.

**प्रारंभ :** सुरदस्तगई हासनमाहाल बदवी अमील तालुक बेनीपाड बाबत दरीविला सीताराम ज्योसी यासी साबक नवाब षहबीनी यासी रोजीना अर्धा फलम अफरंजी मोकरोर करुन दिलह आहे तरी.

**शेवट :** तालुकचे इजारे पैकी मुजरा दिलह जाईल हे सनदाचे नकल लिहुन घेवुन असल सनद जोसी मजकुरासी देणे जाणीजें बा तारीख छ १० रोज जीलहेज साल जमीस सन ११९७ हिजरी साभक सन छ ९ माहे मोहरम.

## डी. नंबर ४१७

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट.१० "x ८".१८ ओळी.मोडी.जुने. चांगले.पूर्ण.

या भागाच्या पृ.८६ (ब) वर ही सनद येत असून इतर रचना डी. नंबर ३५५ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत. याआधीच्या सनदांमध्ये उल्लेखिलेल्या सीताराम जोशी याला मंजूर झालेल्या दैनंदिन अनुदानाबाबत ही सनद आहे. आधीच्या डी. नंबर ४१६ प्रमाणेच हिचाही विषय आहे. फक्त काही थोडे शब्द या सनदेत जास्त आहेत. वर उल्लेखिलेल्या म्हणजे कोईलकुट्टल तालुक्यातून होणाऱ्या जमा रकमेतून तेथील तहसीलदाराने हे दैनंदिन अनुदान द्यायचे आहे. सनदेची तारीख १ रमजान ११९८ हिजरी अशी आहे. अरबी शब्द असलेला आणि नबाबाच्या दरबारी शिक्क्यासारखा दिसणारा एक चौकोन व एक वर्तुळाकार गोल सनदेच्या प्रारंभी व शेवटी आढळून येतो. कडाप्पा येथे मुक्कामास असताना नबाबाने ही सनद काढलेली आहे.

**प्रारंभ :** ईजत असार xxx आमील तालुका कोईल कुटल बादषाहा दरीवीला. सीताराम ज्योसीस रोज दररोज ज्योसी यासी साबाक नवाबशाहा बारायेद दील्ला असे योमीया दर रोजीना अर्धा अफरंजी मोकरोर दिल असें.

**शेवट :** इजारा पैकी मुजरा दिलहा जाईल. हे सनदाचे नकल लिहुन घेवुन असल सनद ज्योसी मजकुरासी देणे जाणीजें बातारीख छ २० जीलहेज साल सन ११४ हिजरी सुभानु संवत्छर माघ मास माहे रबीलवल.

## डी. नंबर ४१८

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट.१० "x ८".१२ ओळी.मोडी.जुने. चांगले.पूर्ण.

या भागाच्या पृ.८७ वर ही छोटी सनद येत असून यातील इतर रचना डी.नंबर ३५३ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत. पहिल्या ओळीच्या मध्यभागी नबाबाच्या शिक्क्याप्रमाणे भासणारा एक चौकोन आढळतो. ही सनद सीताराम जोशी यास मंजूर केलेल्या दैनंदिन भत्त्याशी निगडित आहे. कोईलकुट्टल येथील तहसीलदार जंगू रेड्डी याने सदरहू व्यक्तीस रोज ठरलेली रक्कम द्यावी आणि त्याच्याकडून त्याची पावती घ्यावी असे नबाबाने सांगितले आहे. सनदेवर नबाबाची किंवा तहसीलदाराची सही नाही. १ जमादिलावल १२०५ हिजरी अशी सनदेवर तारीख आहे.

**प्रारंभ :** येवल xx दस्दगाद जेंगरेडी तालुका कोईलकुटला बावची येत बाषेद दरीवीला सीताराम ज्योसी यासी षुदद योमीया ८ आट पैसे बामोजीबा चालत आलयास.

**शेवट :** सदरहु योमीया रोज दरोज पोहचवुन रसीद घेतले पाहिजे यांचे नकल लीहुन घेवुन असल वापस देइजे छ १ गुरे माहे जमादि लवल सन १२०५ हिजरी.

## डी. नंबर ४१९

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट.१० "x ८".१२ ओळी.मोडी.जुने. पूर्ण.

डी. नंबर ३५५ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना आहेत. भाग क्रमांक १३९ च्या पृ.८८ (ब) वर ही सनद येते. पर्शियन व तेलगू भाषांतील काही थोड्या ओळी आणि काही पर्शियन शब्द असलेले दोन वर्तुळाकार गोल– एक पृष्ठाच्या वरच्या भागातील उजव्या बाजूस व दुसरा मोडी लेखनाच्या अगदी प्रारंभी– असे आढळतात. ही सनद जारी करणाऱ्या कडाप्पाच्या नबाबाचे हे शिक्के असावेत. काझी सय्यद कादर यास चार कोंडा जमीन द्यावी अशी आज्ञा कडाप्पाच्या नबाबाने तहसीलदारास या सनदेत केलेली आहे. यासोबतच वर उल्लेखिलेल्या व्यक्तीस, त्याने त्याच्या अखत्यारीत असलेल्या मशिदीत काही धर्मादायी व सेवाभावी कृत्ये करावीत म्हणून, जमिनीही दिल्या आहेत असे सांगितले आहे. एकंदर खर्च आणि मशिदीत करायची धर्मकृत्ये यांचा तपशील दिलेला आहे. १५ जमा दिलावल ११११४ हिजरी अशी या सनदेवर तारीख आहे.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इस्तकबाल परगणे अवला साकीन गंजीकोटा बिदनद मवजी च्यारी कुंडा जमीन खेरीज जमा लायक जीरायते चाहार एक नवरस योमीया सरफराष नाईक वगैरे.

**शेवट :** वगैरे मजकुरा वदस्तर साबक षुद xxx जमीन गुंठे ७४ योमीया दर रोज तेल चीराग सदरी येककास १.

## डी. नंबर ४२०

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". १२ ओळी. मोडी. जुने. पूर्ण. हस्तलिखित दुरुस्त केलेले आहे.

या भागातील इतर रचना डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत. हा दस्तऐवज म्हणजे या भागातील अखेरचा मोडी दस्तऐवज आहे. पृ. ११७ च्या खालच्या भागापासून याचा प्रारंभ होतो. या पृष्ठाचा मोठा भाग पर्शियन लिपीत लिहिलेल्या सनदेने व्यापिलेला आहे. या सनदेत मोठ्या संख्येने अरबी व पर्शियन शब्द आणि संक्षिप्त रूपे आढळतात. या सनदेची पहिली ओळ म्हणजे शीर्षकच झालेली आहे. ती ओळ म्हणजे पेशव्यांच्या ताब्यात असलेल्या सनदेची ही नक्कल आहे; पण पेशव्यांचे नाव, त्यांचे वास्तव्याचे ठिकाण किंवा कोणत्या परिस्थितीत ही सनद पेशव्यांच्या ताब्यात आली किंवा असेच इतर काही तपशील दिलेले नाहीत. शिवाय मूळ सनदेचा लेखनिक किंवा तिचा नक्कलकार यांचाही उल्लेख नाही. सनदेवर कुणाचाही शिक्का किंवा ती जारी करण्यास कारणीभूत ठरलेल्या व्यक्तीचे नाव नाही.

कडाप्पा जिल्ह्यातील गूर्मकोंडा प्रभागाचा सुभेदार अबाजी बाबुराव याने पुलिवेंदन येथील (तहसीलदार या पदाशी समकक्ष असलेल्या) कमाविसदार हरिनारायण यास लिहिलेल्या पत्राचे स्वरूप प्रस्तुत सनदेस आहे. दीर्घायू व भरभराट याबद्दल आशीर्वादपूर्वक शुभचिंतन व्यक्त करून सुभेदाराने या पत्राचा प्रारंभ मोठ्या प्रेमळपणे केलेला आहे. कृष्णगिरी येथे राहणाऱ्या कुण्या आनंद तीर्थाचारी यास पोलाईपल्ली प्रभागातील खदरपट्टी हे खेडे दान देण्याविषयीची ही सनद आहे. हे खेडे श्रोत्रियम् कराराने देण्यात आलेले आहे. हे इनाम ज्याने दिले त्याच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. इनामदाराकडून येणे बाकी असलेल्या रकमेबद्दल काही तंटा निर्माण झालेला होता. आता कमाविसदाराने या श्रोत्रीय-इनामदाराकडून बाकी रक्कम वसूल करावी आणि वर दोन रुपयेही वसूल करावेत अशी या सनदेद्वारे सुभेदाराने कमाविसदारास आज्ञा केलेली आहे. इतर इनामदारांकडून घेण्यात येते तशी कागद-शाई वगैरेसाठीही (दोन रुपयांची) जादा रक्कम घ्यायची आज्ञा आहे. कमाविसदाराने या दोन्ही रकमा जमा करून सरकारी खजिन्यात जमा करायच्या आहेत. ही सनद २७ रबिलाखर, सूरसेन फसली ११७५, म्हणजे इसवी सन १७७५ रोजी काढलेली आहे. नक्कलकाराचे नाव किंवा नकलेचे मूळ वगैरेसंबंधी काही उल्लेख नाही.

**प्रारंभ :** पेषवे याजे कडील सनदाची नकल. चीरंजीव राजेश्री हरीनारायणे कमावीसदार परगणे पुलीवेंदल प्रांत अंबाजी बाबुराव, सुबेदार सरकार गुरमकोंडा वगैरे प्रांत कडपा अनेक आसार्वाद उपरी वेदशास्त्रसंपन्न राजेश्री आनंद तीर्थच्यारी कृष्णगीरी यासी पोलेपली मजरा काचेवारपली श्रोत्रीयम पुर्वी च्यार पांच होनाचा चालत आहे म्हणुन सुभांतुन विहीत केले.

**शेवट :** त्यास हाली तुम्हास पत्र सादर केले असे. तरी आच्यारी याज कडोन मजरा पळी अवछीन चालवर्णे व सादिलवार पैकी रुपये दोन च्यार फलमी दर माहे चालत आहे तर सुदामत प्रमाणें चालवर्णे सदरहु श्रोत्रीय व दरमाहा दोनी रुपयेंचा राजे श्री भगवंतराव त्रींबक याचे अमलाचा दाखला मनास आणौन हे पत्र तुम्हास लिहिले आहे तरी लिहिल्याप्रमाणे चालवणे छ २७ रबीलाखर सुहुर सन खमस सबैन मया अलफ बहुत काये लिहिणें हे आसीर्वाद.

## डी. नंबर ४२१

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x १२". १८ ओळी. मोडी. जुने व खराब अवस्थेत. पूर्ण.

१४० क्रमांकांच्या या भागातील पृ. ४३ वर ही सनद येते. १४० पृष्ठे असलेला हा सर्वच भाग अतिशय खराब अवस्थेत आहे. मोडी, तेलगू, पर्शियन व अरबी अशा लिप्यांमधील दस्तऐवज यात आढळतात. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असून ते Sakistha पद्धतीने नोंदलेले आहे. पृष्ठे खराब झालेली, शिवाय पानकिड्यांमुळे छिद्रे पडलेली असल्यामुळे ती वाचणे हे एक अतिशय अवघड काम होते. प्रस्तुत सनदेच्या पृष्ठाच्या खालच्या भागावर तेलगू भाषेत लिहिलेल्या तीन-चार ओळी आढळतात. सनदेची पहिली ओळ म्हणजे तिचे शीर्षकच झालेली आहे.

काही मुस्लिम धार्मिक संस्थांना मंजूर केलेल्या रोख अनुदानासंबंधी असलेल्या सनदेची ही नक्कल असून ती जलबखानाचा पुत्र बदूखान याच्या ताब्यात होती, असे पहिल्या वाक्यात सांगितलेले आहे. त्याच्या वास्तव्याचे ठिकाण किंवा सदर बदूखान कोणत्या रीतीने धर्मसंस्थेशी जोडलेला होता हे स्पष्ट केलेले नाही. (ज्याचे नाव अगर राज्यकारभाराचा भूप्रदेश यांचा उल्लेख केलेला नाही अशा) नबाबाने चेदेद (cedcd) जिल्ह्यातील जमलमडुगू भागातील अब्दुल सय्यद खान दर्ग्यास

या सनदेद्वारे काही रोख रक्कम अनुदान म्हणून मंजूर केलेली आहे. हा दर्गा जेथे आहे ते ठिकाण सांगता येत नाही, कारण कागदाचा तो भाग अतिशय खराब झालेला आहे. कुण्या एका मीरसाहेबास दरमहा साडेतीन सुवर्णमुद्रा (Pagoda) रोखीने द्यायच्या असून त्याने दर्ग्याची काळजी घ्यायची आहे. या रकमेतून त्याने दर्ग्याची देखभाल व दिवाबत्ती यांसाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदीही करायची आहे; तसेच तेथील परिसर स्वच्छ ठेवायचा आहे.

२४ रमजान ११९३ हिजरी म्हणजे २ जमादिलावल ११८८ फसली अशी या सनदेची तारीख आहे. मोठ्या प्रमाणात अरबी व पर्शियन शब्दांची व वाक्प्रचारांची योजना करून काढल्या जाणाऱ्या सनदांप्रमाणेच या सनदेचे स्वरूप आहे. तीवर कसलाही शिक्का किंवा नबाबाचे नाव नाही. नक्कल करून या भागात ती अंतर्भूत करणाऱ्याचे नावही दिलेले नाही.

**प्रारंभ :** जेलाराज खानच लेक बुदुखानचे जवळ आहेते सनद.

मीर साहेबाचे सनद. आमीलान हल व इस्तकबाल परगणें जमलमडुगु सरकार गंजीकोट बिदानंद सुरसन ११८ परगणे मजकुर पैकी अबदुल सैद खान साहेबाचे दरगायास सदर माहेर करुन दिलते.

१ ॥ कबरा नजदीक रोषनाइ बाबत.

२ ॥ जेमा रोज खासखेल सैदखान नजंदीकचे योमीया कबरा नजंदिक झाडु काहाडणार यासी.

**शेवट :** तारीख गुरे जमादिलवल सन ११७३ हिजरी लगाइत मोबलग मजकुर माहे बा माहे पोहंचावुन रसीद घेत जाणीजें तारीख २४ माहे रबीसानी सन ११७३ हिजरी पौ छ २ माह जमादिलवल सुरसन ११८८ फसली.

## डी. नंबर ४२२

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x १२". १८ ओळी. मोडी. जुने व अतिशय खराब अवस्था. पूर्ण.

भाग क्रमांक १४० मधील पृ.४३ च्या खालच्या भागावर ही सनद सुरू होते. पृष्ठे अतिशय खराब अवस्थेत आहेत. पानकिड्यांनी पाडलेल्या छिद्रांमुळे सनद वाचणे अतिशय अवघड होते. तिच्या प्रारंभी व शेवटी तेलगू भाषेत लिहिलेल्या काही ओळी दिसतात. ही टिपू सुलतान याने दिलेली सनद असल्याचा पहिल्याच ओळीत निर्देश केलेला आहे.

अब्दुल सय्यद खान दर्ग्याची देखभाल व व्यवस्था यांसाठी योमिया अनुदान देण्याबाबत जमलमडुगू तालुक्याच्या तहसीलदारास पाठविलेले हे आज्ञापत्र आहे. या दर्ग्यास कुण्या नबाबाने याआधी दोन पॅगोड्यांचे अनुदान दिलेले आहे आणि आता टिपू सुलतानाने या दर्ग्याच्या व्यवस्थापकास योमिया अनुदान मंजूर केलेले आहे. मूळच्या मंजूरकर्त्याचे किंवा मंजुरी स्वीकारणाऱ्याचे नाव सांगितलेले नाही. नूतनीकरण केलेल्या या सनदेद्वारे दर्ग्याची देखभाल करणाऱ्या मीरसाहेबास अनुदानाची रक्कम देण्यात यावी अशी टिपू सुलतान याची सूचना आहे. २९ रमजान ११९६ हिजरी अशी या सनदेवर तारीख आहे. शाही शिक्का, सुलतानाची स्वाक्षरी किंवा कुणा अधिकाऱ्याची स्वाक्षरी या सनदेवर दिसत नाही. तेलगू भाषेतील चार ओळी आणि आत काहीही लिहिलेले नाही असा एक वर्तुळाकार गोल सनदेच्या शेवटी आढळतो. या सनदेच्या नक्कलकाराचे नाव किंवा मूळ सनद ज्याच्या ताब्यात आहे त्याचे नाव सांगितलेले नाही. इतर सनदांप्रमाणेच खूप मोठ्या प्रमाणात अरबी व फारसी वाक्प्रचार आणि संक्षिप्त रूपे यांचा यात सढळ वापर केलेला दिसतो.

**प्रारंभ :** टिपु सुलतानाचे सनद. दानमं xxxx जमलमुडुगु आमीन माळुम करणेसे बाबद हरवीला जमलमडुगुचें कसबेत अबदुल सैद खान साहेबाचे दरग्यासी रोषनाईस दरमाहें गौराई १ एक होत्र व झाडुकरासी दर माहै २ ॥ आडिच होन जुमला सोडुन दोनी गौर शाई मोकरोर आहें.

**शेवट :** त्यास मीर साहेबोचें साईदे यांचे असनाद असणारे बामोजीबाब असनाद जारी राहाणे जाणीजें. तारीख २७ माहे रंजान सन ११८५ हजारी.

## डी. नंबर ४२३

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". १५ ओळी. मोडी. जुने व खराब झालेले हस्तलिखित. पूर्ण.

डी. नंबर ४२८ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना आहेत. या भागाच्या पृ. ४० वर ही सनद येते. कागद तपकिरी रंगाचा, फाटायला आलेला आणि अतिशय खराब अवस्थेत आहे. हस्ताक्षर चांगले असले तरी अनेक छिद्रे पडलेली असल्यामुळे दस्तऐवजातील मजकुराचे वाचन अतिशय कठीण झालेले आहे. सनदेच्या शेवटी अरबी व फारसी लिपीतील काही

ओळी आढळतात. संपूर्ण सनदभर अरबी व फारसी भाषेतील वाक्प्रचार व संक्षिप्त रूपे मोठ्या प्रमाणात आढळतात. या कागदाच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात काही तेलगू ओळी लिहिलेला काटकोन चौकोन दिसतो. अनुदान मंजूर करणाऱ्या व्यक्तीचे ते नाव असावे. पहिल्या ओळीवरूनच हे लक्षात घ्यावे लागते की, प्रस्तुत दस्तऐवज म्हणजे कोण्या बहादूरशाहा याच्या ताब्यात असलेल्या मूळ सनदेची नक्कल आहे. या बहादूरशाहाबद्दलचा इतर तपशील दिलेला नाही. हा बहादूरशाहा म्हणजे ज्याला अनुदान मंजूर केले गेले ती व्यक्ती की फक्त ही सनद ताब्यात असलेली व्यक्ती हे सांगणे कठीण आहे. सनदेच्या दुसऱ्या ओळीत असे सांगितले आहे की, मूळ अस्सल सनदेवर अमीनसाहेब बहादूरशाहा याचा शिक्का आहे.

अमीनसाहेबाच्या थडग्याच्या देखभालीसाठी प्रतिदिनी दोन आणे अनुदानाची मंजुरी आधीच्या सनदेद्वारे दिलेली होती. हे थडगे जमलमडुगू तालुक्यात आहे. या सनदेद्वारे जमलमडुगूच्या तहसीलदारास वर उल्लेखिलेल्या दर्ग्यास ठरविलेली रक्कम पोचविण्यास सांगण्यात आलेले आहे. अनुदान स्वीकारणाऱ्या योमियादाराला ही रक्कम प्रतिवर्षी मिळायची असून त्याने कबरीबद्दलची सर्व कामे, तसेच नबाबाला दीर्घायू व भरभराट प्राप्त व्हावी म्हणून प्रार्थना करायची आहे. सनदेच्या नूतनीकरणाची तारीख ११ शबान १२१० हिजरी अशी आहे. नबाबाची स्वाक्षरी वा शिक्का किंवा नबाबाचे नाव किंवा ज्याच्यासाठी सनद काढण्यात आली त्या व्यक्तीचे नाव यांचा उल्लेख नाही. दस्तऐवजाच्या शेवटी काही तेलगू शब्द आढळून येतात.

**प्रारंभ :** बहदरषा जवळे (असणेचे) सनद असल (अर्से) आमीन साहेबच कबराने सनद (Telagu) आमीलाने हाल व इस्तकबल परगणे जमलमडुगु बिदानंद मोबलग २ दोनी अर्णे देणेस एक परवाना वापद बाबद योमीया तकीयदार बहदरषा बामोजीबा.

**शेवट :** बामोजीबा परवान येक फारमावील असी म्हणुन xxxx खुद पोटवीले अस. सरफ मोहीष्ट खुद करुन बदलाय दौलत मुदग सालाबाद हुजुर पुरनुर मपगुल करीत असर्णे. बा तारीख नखल सनद घेहुन असल वापस देण.

## डी. नंबर ४२४

**ऐतिहासीक पत्रें**
**AITHIHASIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". मोडी. जुने आणि खराब अवस्था. पूर्ण.

डी. नंबर ४३१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. या भागाच्या पृ. ४७ वर ही सनद येत असून पर्शियन भाषेतील काही ओळी व काही शब्द असलेला एक आयत आकाराचा शिक्का पृष्ठाच्या मध्यभागी आढळतो. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी पानकिड्यांमुळे कागदाची अतिशय दुरवस्था झालेली असून, सर्वत्र पडलेल्या छिद्रांमुळे हस्तलिखित वाचणे अतिशय त्रासाचे झालेले आहे. सनदेच्या शेवटच्या भागात काही तेलगू ओळी दिसून येतात. मूळ अस्सल सनदेची ही नक्कल असावी असे दिसते; पण मूळ अस्सल ज्याच्या ताब्यात आहे त्याचे नाव किंवा ही नक्कल सिद्ध करण्यास कारणीभूत झालेल्या व्यक्तीचे नाव इत्यादी माहिती दिलेली नाही.

कुण्या महमदखान शाहासाहेब यास त्याच्या उदरनिर्वाहासाठी नबाबाने मुळात चार आणे निवृत्तिवेतन मंजूर केलेले होते, असे जमलमडुगू येथील अधिकाऱ्यास या सनदेद्वारे किंवा आज्ञेद्वारे कळविलेले आहे; तसेच ते प्रतिदिनी द्यायचे आहे. काही अनाकलनीय कारणांमुळे नंतरच्या नबाबांनी हे निवृत्तिवेतन देणे थांबविले. नंतर महमदखान शाहासाहेब याच्या वंशजाने आपल्या वाडवडिलांस मिळणारे हे अनुदान आपणास मिळावे आणि मूळ मंजुरीचे नूतनीकरण करावे अशी विनंती (प्रस्तुत) नबाबास केली. या विनंतीनुसार जमलमडुगू तालुक्याच्या अधिकाऱ्यास नबाबाने अशी सूचना केलेली आहे की, अर्जदारास वंशपरंपरा म्हणून रोजी दोन आण्याचे रोख वेतन सुरू करावे. सनदेची तारीख १६ रजब १२१० हिजरी अशी आहे. सनदेवर नबाबाची किंवा जमलमडुगूच्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इस्तकबाल परगर्णे जमलमडुगू बीदानंद मोबलग च्यारी आण इनासफ निमे दोनी आर्णे बाषद बाबत योमीया येबर बाईस महमदकानषाह बामोजीबा असनाद साबक इजारा ठेवीले आहे.

**शेवट :** आजत तहसीलदार तालुक खुदेंत xxx ता सरफ मोईपत खुद करुन बादवये दौलत आदर मुदग हजुर पुनुर मषगुल राहर्णे. बाब ताकीद षीनासंदनगल. सनदेचे नकल घेऊन असल परतुन देर्णे. तारीख छ १६ माहे रजब सन १९२० हिजरी.

## डी. नंबर ४२५

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". २० ओळी. मोडी. जुने व खराब अवस्था. पूर्ण.

या भागातील इतर रचना डी. नंबर ४३१ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत. ही सनद या भागाच्या पृ. ४८ वर येत असून कागद अगदीच खराब झालेला आहे. काही ठिकाणचे शब्द पानकिड्यांमुळे अगदी छिद्रांकित झालेले आहेत. तेलगू व फारसी भाषांतील काही थोड्या ओळी सनदेच्या अगदी प्रारंभी व शेवटी आढळतात. ती कदाचित सनदेची तेलगू वा फारसी आवृत्ती असावी. यावर कुणाचीही स्वाक्षरी, शिक्का किंवा जारी करणाऱ्या व्यक्तीचे नाव नाही. ही मूळ अस्सल सनदेची नक्कल असावी असे दिसते, पण ती कुठून वा कुणाकडून नकलली गेली याविषयीची काही माहिती दिलेली नाही. काही थोडे अरबी व फारसी शब्द आणि संक्षेपरूपे या सनदेत आढळतात.

म्हमू फकीरसाहेब यास काही जमिनी मुळात इनाम म्हणून दिलेल्या होत्या असे नबाबाने या सनदेद्वारे जमलमडुगू येथील तहसीलदार व्यंकाशंकर व त्याच्या खालचे अधिकारी यांना कळविले आहे. या इनाम जमिनी जमलमडुगू तालुक्याच्या अधिकारक्षेत्रात येतात. भूतकाळात हे इनाम जसे होते तसेच ते आताही चालू ठेवण्याकडे तहसीलदाराने लक्ष द्यावे अशी आज्ञा आहे. सनदेची तारीख ९ जेलहज १२५७ हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** इजतअसार वैका संखर व कारकुन ताळुके जमलमडुगु मालुम बिदानंद दरीवील्ला. म्हमु फकीर साहेबा कडोंन कसबे मजकुर सोहबचे इनाम हजरत नवा साहेबाचे बकबीले जाल्लाता अमलांत समेक्ष पासुन साबक सुधां हमेषा माफक चालवत जाणें.

**शेवट :** छ ७ जीलहेज सन १२५९ हिजरी.

## डी. नंबर ४२६

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". २० ओळी. मोडी. जुने व खराब अवस्था. पूर्ण.

या भागातील इतर रचना डी. नंबर ४३१ मध्ये सांगितल्याप्रमाणे आहेत. या भागाच्या पृ. ४८ वर ही सनद येत असून हस्ताक्षर जरी बऱ्यापैकी व वाच्य असले तरी पानकिड्यांमुळे पडलेल्या छिद्रांनी ती वाचणे अवघड झालेले आहे. काही थोड्या तेलगू व फारसी ओळी सनदेच्या शेवटी आढळतात. अरबी व फारसी शब्द आणि अनेक संक्षेपित रूपे या सनदेत सापडतात. मुळातील सनदेची ही नक्कल असून तीवर शिक्का, स्वाक्षरी किंवा मंजूरकर्त्याचे नाव दिलेले नाही. मूळ सनदेसंबंधीची काही माहिती दिलेली नाही. काही योमिया रकमेच्या वाटपासंबंधी दानम वेंकट यास दिलेल्या आज्ञांशी ही संबंधित आहे. मुळात कोण्या सुभान बर्दमू फकीर यास रोजी दोन आणे योमिया अनुदान द्यावे अशी नबाबाची आज्ञा होती. सदरहू व्यक्तीस दिले जाणारे हे अनुदान पुढील आज्ञा मिळेपर्यंत थांबविण्याची सूचना या सनदेद्वारे तहसीलदारास देण्यात आलेली आहे. तसेच या गोठवलेल्या वेतनाच्या एकूण रकमेचा हिशेब तहसीलदाराने शासनास कळवायचा आहे. या सूचनेकडे त्याने खास वा विशेष लक्ष देऊन ती अमलात आणा, असा आदेश आहे. यावर २४ जमादिलाखर ११६७ हिजरी ही तारीख आहे.

**प्रारंभ :** दानम बालम बेकट मुस्तजार प्रगणे जमलमडुगू बिदानद २ = दोनी आणे योमीया देणेस xxx अर्ज xx सुभान बदरदमु फकीर मोकरन आहें, बामोजीब सुबामद ज्यारी ठेवणे जें कायें बाकी काहि असल ते हाजर हिसाबाचे ठेवणें. दरीयात्फ ताखीत जाणुन हंसबुल मस्तुर अमलेंत आणणे.

**शेवट :** छ २४ माहें मोहरम. जमादिलाखर सन ११६७ हिजरी मुताबक सन १२६३ फसली.

## डी. नंबर ४२७

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". १८ ओळी. मोडी. जुने व खराब अवस्थेत. पूर्ण.

डी. नंबर ४३१ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना आहेत.

या भागाच्या पृ. ६७ वर ही सनद येत असून तिचे हस्ताक्षर बऱ्यापैकी वाच्य असले तरी पानकिड्यांनी पोखरल्यामुळे कागद अतिशय खराब स्थितीत आहे. सनदेच्या प्रारंभी व शेवटी अनुक्रमे तेलगू व फारसी लिपीत लिहिलेल्या काही ओळी आढळून येतात. सनदेच्या शेवटच्या ओळीनंतर काही फारसी शब्द असलेला लंबवर्तुळाकार शिक्का दिसून येतो. ही सनद देणाऱ्या नबाबाचे

नाव, जी कुणी व्यक्ती लाभार्थी असेल तिचे नाव, तिचे राहण्याचे ठिकाण, कुणाकडून वरील सनद नकलून घेतली इत्यादी माहिती दिलेली नाही; तसेच सनदेवर शिक्का किंवा ती जारी करणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. कुण्या एका सुभान बर्दमू फकिरास दिलेल्या इनामाबद्दलच्या जमलमुडुगूच्या बालम वेंकट या तहसीलदारास दिलेल्या सूचना या सनदेत आहेत. सदरहू व्यक्तीस आधीच इनाम मंजूर केलेले होते. आठ बिघे जमीन आणि रोज दोन आणे असे त्याचे स्वरूप होते. त्या इनामदाराने केलेल्या विनंतीनुसार जमिनीचे क्षेत्र आठऐवजी वाढवून दहा केलेले आहे. नेमकी कुठली जमीन वगैरे तपशील दिलेला नाही. फकिराने या जमिनीचा उपभोग घ्यायचा असून नबाबाला दीर्घायुष्य व भरभराट लाभावी म्हणून प्रार्थना करायची आहे. सनदेची तारीख २५ जमादिलाखर ११७४ हिजरी आहे.

**प्रारंभ** : दानम बालवेंकटा मुस्तुजार प्रगणें जमलमडुगु बीदानंद मोबलग २ दोनी आणे रुपये योमीया व आठ बीग जमीन कुषकी अजपुबान बारदमु फकीरन मोकरारुन आहे. बालवेंकट xxx सब xx दाहा बिगे फकीर मजकुरास.

**शेवट** : xx गुजारद सरकम इपगत खुद करोन बाद नवाब उमर दौलद आसवाद मुदन मषगुल माहे मोकरोर योमीया रुपये ०७-जमीन दस बीगे १० तारीख २३ माहे जमादीलाखर सन १२९४ हिजरी.

## डी. नंबर ४२८

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १२"x १०". १८ ओळी. मोडी. जुने व खराब अवस्था. पूर्ण.

डी. नंबर ४३१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत.

ही सनद या भागाच्या पृ. ६८ वर येत असून हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी पानकिड्यांनी पोखरल्यामुळे कागद अगदी खराब स्थितीत आहे. काही अरबी शब्द (कदाचित हे सनद देणाऱ्याचे नाव असेल) आत असलेला एक लंबवर्तुळाकार शिक्का सनदेच्या पहिल्या ओळीच्या उजव्या बाजूस आढळतो. ही कडाप्पाच्या नबाबाने मंजूर केलेली सनद आहे; पण त्या नबाबाच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. अगोदर प्रतिदिन द्यायच्या रोख रकमेची योमिया अनुदाने एका किंवा दोघा फकिरांना मंजूर करणारी सनद काढण्यात आलेली होती. या मूळ सनदेचा फाटून नाश झाल्यानंतर जमलमडुगूच्या तहसीलदाराकडून अनुदानाची रक्कम देण्याबाबत प्रश्न उभे केले गेले. तहसीलदार बालम वेंकट (एक व्यावसायिक) याने आधीप्रमाणे फकिरांना योमिया रक्कम द्यावी असे सनदेत सांगितले आहे; तसेच प्रस्तुत सनद म्हणजे जुन्याचे नूतनीकरण आहे.

सय्यद रेहमान, सैय्यद नैयन आणि सय्यद अमीरजान अशी या फकिरांची नावे असून त्यांच्यापैकी प्रत्येकास दोन आणे मंजूर झालेले असून त्यांनी जमलमडुगूच्या तहसीलदाराकडून ते घ्यायचे आहेत. त्यांनी या मंजूर अनुदानाचा स्वीकार करावा आणि नबाबास दीर्घायू व भरभराट प्राप्त होण्यासाठी देवाची प्रार्थना करावी अशी अपेक्षा आहे.

या सनदेची तारीख ११६७ फसली आहे. या सनदेवर नबाबाची किंवा कुण्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही; तसेच ही सनद कुठे मिळाली याची माहिती किंवा नक्कलकाराचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ** : दानम बालम वेंकटा मुसाजार परगणे जमलमडुगु माळ्ठं. सन ११६९ फसली दरीवील्ला. बाबत वगैरे रोजदारज रोजीना साबक हस्तुर बमजीब चालत नाहि म्हणुन जाहिर जाहाले. सुदामद बमजीबा सनद पाहुन पोंचवीत असे जाणें. यास सालीना देणे दरीबाब कदिम. जाणीजें तपसील

६। = सबशामत योमीय दर राजे दो आणें
०।० सैद रहिमान च्यारी आणे
०। = । सैद नईन दर रोज दिड कलम

**शेवट** : ०॥- सैद अमीन फलम-२ स दोनीआणें मोबलग सवा रुपया सवा अना बा तारीख छ २० माहे रमजान सन ११३६ हिजरी.

## डी. नंबर ४२९

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १२"x १०". १६ ओळी. जुने. खराब अवस्था. पूर्ण.

या भागाच्या पृ. ६९ वर ही सनद येत असून डी. नंबर ४३१ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. सारी पृष्ठे खराब अवस्थेत आहेत. सनदेच्या प्रारंभी व शेवटी तेलगू भाषेतील काही थोड्या ओळी दिसून येतात. काही अरबी लिपीतील ओळी आणि त्याच लिपीतील शब्द असलेले दोन

लंबवर्तुळाकार शिक्केसुद्धा दिसतात. त्यातील एक कागदाच्या वरच्या भागात उजव्या बाजूला आणि दुसरा तळाशी उजव्या बाजूला दिसतो. मोठ्या प्रमाणात अरबी शब्द, वाक्प्रचार आणि संक्षेपित रूपे आढळतात. कागदाच्या वरच्या उजव्या बाजूला 'अब्दुल अली हसन खान साहेब नबाब' असे नाव लिहिलेले आढळते. प्रस्तुत नबाबाने ही सनद जारी केली असल्याची ही एकमेव खूण या सनदेत आढळते.

कुण्या एका फकिरास उदरनिर्वाहासाठी प्रतिदिनी काही रोख अनुदान आधीच एका सनदेद्वारे मंजूर करण्यात आलेले होते. जमलमडुगूच्या तहसीलदाराकडून त्याला ही रक्कम दिलीही जात होती; पण त्याच्या मृत्यूनंतर ही रक्कम त्याच्या मुलांनी मागितली असता तहसीलदाराने त्यास नकार दिला. कारण ही सनद मृत फकिराच्या नावे दिलेली होती. अर्जदारांनी केलेल्या खास विनंतीनुसार नबाबाने खुषीने नवी सनद दिलेली आहे. त्यात मृत फकिराला मंजूर झालेली रक्कम त्याच्या मुलांना देणे चालू ठेवावे, शिवाय त्यांची लग्ने साजरी करण्यासाठी काही जादा रक्कम द्यावी असे फर्माविले आहे.

ज्याच्या नावे पहिली सनद दिलेली होती, त्याचे नाव वाचता येत नाही इतके खराब झालेले आहे. नव्या अर्जदारांची नावे सांगितलेली नाहीत. ही सनद ५ रबिलाखर ११७७ हिजरी रोजी जारी करण्यात आलेली आहे. यावर मंजूरकर्त्याची स्वाक्षरी नाही.

**प्रारंभ** : दानम वेंकटा मुस्तदार परगणे जमलमडुगु बिदानद दरीवीला. दाकीद योमीयादार फिकीर यांचे बेढाच शादिबदल च्यारी होन देविले आहें. या देतसें हरकत नकरवीण पोंहचविणें.

**शेवट** : याच इनाम जमीन आहें. कसबेचें रेडि येतप नारायणें हरकत करीत आहें म्हणुन जाहेर जाहले आहें ऐसे नकरीता ताकीद करुन देणे. याचे नाकाष हजुर ठेवुन घेणें छ ५ माहे रबीलाकर सन ११७७ हिजरी.

## डी. नंबर ४३०

**ऐतीहासीक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** :स्थानिक बनावट. १२"x १०". १५ ओळी. मोडी. जुन्या व खराब अवस्थेत. पूर्ण.

डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर सनदा असून या भागाच्या पृ. ७० वर प्रस्तुत सनद येते. पृष्ठे अगदी खराब स्थितीत आहेत. या पृष्ठावर तेलगू व अरबी भाषेतील काही ओळी दिसून येतात. पृष्ठाच्या मध्यभागी शाही शिक्क्याप्रमाणे दिसणारा, पण आत काहीही मजकूर नसलेला लंबवर्तुळाकार चौकोन आढळतो. कुण्या नबाबाने जमलमडुगूच्या तहसीलदारास धाडलेले आज्ञापत्र या सनदेत असून तो नबाब किंवा तहसीलदार यांच्या नावांचा उल्लेख यात केलेला नाही.

जमलमडुगू येथे राहणाऱ्या कुण्या सय्यद अबदुल रहिमान या फकिरास चार आणे योमिया अनुदान मंजूर केलेले होते. काहीही कारण नसताना ते बंद करण्यात आले. फकिराने अनुदान बंद झाल्याचे नबाबास कळविले. त्यावर पूर्वीप्रमाणे ही रक्कम (त्या फकिरास) देण्यात यावी अशी सूचना नबाबाने तहसीलदारास केलेली आहे. फकिराने नबाब व त्याचे राज्य यांना दीर्घजीवन व भरभराट प्राप्त व्हावी अशी प्रार्थना करावी अशी अपेक्षा बाळगण्यात आलेली आहे. सनदेची तारीख २२ जमादिलाखर ११७५ फसली अशी आहे.

**प्रारंभ** : दानम हाल व इस्तकबल मौजे जमलमडुगु सरकार कंजीकोट बिदानंद चु ० । ० चायारी आणा योमीया सैद अबदुल रहीमान मुताबक साकीन जमलमडुगु की आज साबक मोकरोर केल अर्से की.

**शेवट** : सन ११९५ इजरी बमोजीबा पोंचवत जाणें. तसरफ दुवा दरोज बदवाइ दौलत आबाद मुदत मषगुल नामे मोकरोर रोजीना ० ०.बा तारीख छ १२ जमादिलाकर सन ११९५ हजरी.

## डी. नंबर ४३१

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद** : स्थानिक बनावट. १२"x १०". २० ओळी. जुने व खराब. पूर्ण.

डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना असून प्रस्तुत सनद पृ.७० वर येते. हस्ताक्षर वाच्य असले तरी मोठ्या प्रमाणात अरबी व फारसी शब्द व वाक्प्रचार यांची यात योजना झालेली दिसते. कागद अगदीच वाईट स्थितीत आहे. तेलगू व अरबी लिपीतील काही थोड्या ओळी मोडी लेखनाच्या तळाशी लिहिलेल्या आढळतात. काही अरबी शब्द असलेला व शाही शिक्क्यासारखा भासणारा एक छोटा चौकोन सनदेच्या शेवटी आढळतो. मूळ अस्सल सनदेची ही नक्कल असावी असे दिसते.

कडाप्पाच्या आधीच्या नबाबांनी महमद कासीम साहेब या फकिरास मंजूर केलेल्या योमिया अनुदानाचे नूतनीकरण करण्यासाठी जमलमडुगूचा तहसीलदार बेनकुमार यास कडाप्पाच्या नबाबाने दिलेली ही आज्ञा आहे. ही सनद गहाळ

झाल्यामुळे फकिराचे योमिया अनुदान बंद करण्यात आले. तेव्हा फकिराने या सनदेची नक्कल मिळावी आणि पूर्वीचे अनुदान पुन्हा सुरू करण्याची तहसीलदारास आज्ञा करावी अशी विनंती नबाबास केली. या विनंतीनुसार नबाबाने थांबविलेले अनुदान पुन्हा सुरू करण्यास तहसीलदारास सूचनापत्र पाठविले आणि १७ जमादिलावल ११६३ फसली रोजी मूळ सनदेची नक्कल देण्यात आली.

नबाबाचे किंवा सनदेची नक्कल देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव दिलेले नाही. नक्कलकाराचे नाव किंवा नक्कल करण्यासाठी मूळ अस्सल सनद कोठून मिळाली याविषयीची माहितीही दिलेली नाही.

**प्रारंभ :** इजत असार वेंकामु मजमदार परगणे जमलमडुगु बिदानंद ० ८ = दोनी आणे योमीया व दस बिगे जमिन अज शुभाद अहमद फकीर मोकरोर आहे.

**शेवट :** हजरतास इसाब पोचवणे दरगा बाग मसीद सब मालुम करणें. तारीख छ १९ जमादिलवल सन ११६३ हिजरी.

## डी. नंबर ४३२

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". २० ओळी. जुने व खराब अवस्था. मोडी. पूर्ण.

या भागातील इतर रचना डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे असून प्रस्तुत सनद पृ. ७१ वर येते. हा कागद अतिशय खराब अवस्थेत आहे. काही थोड्या तेलगू व अरबी लिपीतील ओळी आणि शाही शिक्क्याप्रमाणे दिसणारा एक लंबवर्तुळाकार चौकोन या सनदेच्या प्रारंभी दिसून येतो. या शिक्क्यात काही फारसी शब्दही दिसून येतात.

जमलमडुगूच्या तहसीलदारास कडाप्पाच्या नबाबाने धाडलेले आज्ञापत्र अशी ही सनद आहे. जमलमडुगू येथे राहणाऱ्या सय्यद अब्दुर्रहमान यास प्रतिदिनी चार आणे योमिया अनुदान मंजूर केलेले होते. ते तहसीलदाराने बंद केले. बंद करण्याचे कारण दिलेले नाही. सदरहू योमियादारास ते अनुदान मूळ सनदेप्रमाणे भविष्यकाळातही द्यावे अशी या आज्ञापत्राद्वारे सूचना केलेली आहे. १२ सफर ११६९ हिजरी अशी या सनदेची तारीख आहे.

नबाबाचे किंवा तहसीलदाराचे वा नक्कलकाराचे नाव सनदेवर नाही. याची मूळ अस्सल प्रत कोठून मिळाली किंवा ती कुणी नकलली याचाही खुलासा लेखकाने केलेला नाही.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इसाकबाल परगणें जमलमडुगू सरकार गंजी कोट बिदानंद चु ० । ० च्यारी आणे रुपये योमीया सैद अबदुर इमाम मुताबिक साकीन जमलमडुगू यासी.

**शेवट :** रोज दरोज पाहेचवीत जार्जे तारीख १५ माहे सबर सन ११६७ हिजरी.

## डी. नंबर ४३३

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x १२". २० ओळी. मोडी. जुने व खराब अवस्थेतील हस्तलिखित. पूर्ण.

या भागातील इतर रचना डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे असून प्रस्तुत सनद पृ. ५१ वर येते. पानकिड्यांनी पोखरल्यामुळे कागद अतिशय खराब झालेला आहे. सनदेच्या प्रारंभी फारसी भाषेतील काही ओळी दिसतात. असे दिसते की, ही मोडी सनदेची फारसी आवृत्ती आहे. कंजीकोटाच्या नबाबाने जमलमडुगूच्या तहसीलदारास धाडलेले हे आज्ञापत्र आहे.

बोंबीसा फकीर यास प्रतिदिनी दोन आण्याचे आधी मंजूर झालेले योमिया अनुदान आता व पुढे भविष्यातही देत जावे असे याद्वारे तहसीलदारास कळविण्यात आलेले आहे. तहसीलदाराने या सनदेची नक्कल स्वतःजवळ ठेवून मूळ सनद फकिरास परत करावी अशी आज्ञा आहे. फकिराने नबाबास दीर्घायुष्य व भरभराट प्राप्त होण्यासाठी प्रार्थना करायची अशीही सूचना आहे.

सनदेवर अनुदान मंजूर करणाऱ्याचा शिक्का किंवा स्वाक्षरी नाही. असे दिसते की मूळ सनदेची ही नक्कल असावी. अधिकाऱ्याचे किंवा नबाबाचे नाव सांगितलेले नाही. मूळ सनदेचा ठावठिकाणा किंवा नक्कलकाराचे नाव याबद्दलही काही उल्लेख नाही.

**प्रारंभ :** आमीलान हलव इस्तकबाल परगणें जमलमडुगु बिदानंद मोबलग दो अर्णे राजी सफ (अक) आनाबाद षाषद योमीया बोमीसदाष फकीर ताकीयद अर्से. जाद साबद इजार ठेवीले असे.

**शेवट :** तालुके खुद पोहचत जाजे व तरकी आदाई खद मरुज शबाद व दौलत आन बागमाने मपगुल असणे बा ताकीद मानास आणणे. तालीक सनदाचे लिहुन घेऊन असल वापस करणे.

## डी. नंबर ४३४

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". २० ओळी. मोडी. जुने व खराब अवस्थेतील हस्तलिखित. पूर्ण.

डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना असून प्रस्तुत सनद पृ. ५२ वर येते. हा कागद अगदी खराब अवस्थेत आहे. सनदेच्या प्रारंभी व शेवटी फारसी व तेलगू भाषांतील काही ओळी दिसतात. जमलमडुगूच्या तहसीलदारास कडाप्पाच्या नबाबाने लिहिलेले हे आज्ञापत्र आहे.

जमलमडुगू येथे राहणाऱ्या शेषभट्ट यास उदरनिर्वाहासाठी नबाबाने आनंदाने प्रतिदिनी अर्धा रुपया असे अनुदान मंजूर केलेले होते. तहसीलदारास याद्वारे कळविलेले आहे की, त्याने सदरहू भट्ट यास हे योमिया अनुदान आता तर द्यावेच, पण ११८३ फसलीपासून भविष्यकाळातही चालू ठेवावे. नबाबासाठी दीर्घायुष्य व भरभराट यांची परमेश्वराजवळ प्रार्थना करावी अशी शेषभट्ट याजकडून अपेक्षा आहे. तहसीलदाराने या सनदेची नक्कल करून घेऊन मूळ अस्सल प्रत भट्ट यास परत करावी अशी आज्ञा आहे. सनदेची तारीख ३ शाबान ११८३ हिजरी अशी आहे.

नबाबाचा शाही शिक्का अगर नाव सनदेवर नाही. नक्कलकाराचे नाव किंवा या सनदेच्या मुळासंबंधीची माहिती दिलेली नाही.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इस्तकबाल परगणे जल्लमडुगु वगैरे बिदानंद सुरसन xxx फसली दरीविला. सेषाभट जुनारदार योमीयास दर रोजीना ० ||० आर्दाफलम दीदला आसे साल मोकशेर करुन दिलहा आहे. तारीख गुरे षाबान सन ११८३ हिजरी पासुन.

**शेवट :** रोज दरोज माहे बाद माहे पोहचुन देणे जाणेजे. तासरफा मैषगुल खुदास तरकीं आवुर दौलत मषगुल करणे. तारीख छ ३ माहे षाबान सन ११८३ हिजरी सनद दिदले आसे.

## डी. नंबर ४३५

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x १२". २० ओळी. मोडी. जुने व खराब अवस्था. पूर्ण.

डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना असून प्रस्तुत सनद पृ. ५३ वर येते. हा कागद फारच खराब अवस्थेत आहे. फारसी लिपीतील काही थोड्या ओळी सनदेच्या प्रारंभी दिसून येतात.

जमलमडुगूच्या तहसीलदारास उद्देशून गंजीकोट्टाच्या नबाबाने काढलेले हे आज्ञापत्र आहे. उदरनिर्वाहासाठी शेषभट्ट यास प्रतिदिनी अर्धी सुवर्णमुद्रा (Pagoda) मंजूर केल्याची सनद आधीच काढलेली होती; पण या ब्राह्मणाने या रोख अनुदानाऐवजी जमीन मिळावी म्हणून अर्ज केल्याने नबाबाने खुषीने त्यास जमीन मंजूर केली आहे. जर या ब्राह्मणाने पुन्हा रोख योमियाची मागणी केली तर ते रोख अनुदान सुरू करावे असेही नबाबाने तहसीलदारास कळविले आहे. या ब्राह्मणाने नबाबासाठी दीर्घायुष्य व भरभराट मिळण्याबाबत देवाची कृपा भाकावी अशी अपेक्षा आहे; तसेच या सनदेची नक्कल तहसीलदाराने स्वतःजवळ ठेवून मूळ अस्सल सनद इनामदार ब्राह्मणास परत करावी अशी आज्ञा आहे. सनदेची तारीख २३ रजब १२१० हिजरी अशी आहे.

नबाबाचे, तहसीलदाराचे किंवा नक्कलकाराचे नाव दिलेले नाही. मूळ सनदेच्या मालकाचे नाव किंवा ती कोठून मिळविली याचा खुलासाही लेखक करीत नाही.

**प्रारंभ :** xxxx बाइमाम आमीलान हाल व इस्तकबाल परगणे जमलमडुगु सरकार गंजीकोट, सुभें फरलां बुनीया हैद्राबाद बिदानंद मोबलग निमे फलम ० ||० अफरंजी स आदा फलम बाषद योमीया सेषाभट जुनारदार बामोजीबा असनद हुकुम फरमावीला आसे.

**शेवट :** कबीज वसुल मांतबर घेणे. ताजे खुद हुद करुन बाईकम दोलत तरकी मुद xxxx मषगुल करणें. सालीना हाल बाकी चीटी व कबीज जमाकरुन खर्च मुजरा मालुम होईल नकल घेऊन असल वापस करणें. बा तारीख छ २६ माहे रजब सन १२९० हिजरी.

## डी. नंबर ४३६

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". २० ओळी. मोडी. जुने व खराब अवस्था. पूर्ण.

या भागातील इतर रचना डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे असून प्रस्तुत सनद पृ. ७६ वर येते. कागद

अगदीच खराब, छिद्रे पडलेल्या स्थितीत आहे. काही थोड्या तेलगू व फारसी लिपीतील ओळी आणि दोन लंबवर्तुळाकार शिक्के– एकात काही फारसी शब्द असलेले व दुसऱ्यात काहीही शब्द नसलेले– कागदावर दिसून येतात. काही शब्द असलेला शिक्का कागदाच्या वरच्या डाव्या भागात, तर दुसरा रिकामा शिक्का कागदाच्या खालील भागाच्या मध्यावर आढळतो.

स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी कुण्या सुब्बा भट्ट यास दररोज अर्धी सुवर्णमुद्रा अनुदान म्हणून मंजूर केली असल्याचे कांजीकोटा येथील नबाबाने जमलमडुगूच्या तहसीलदारास या सनदेद्वारे कळविले आहे. तहसीलदाराने ब्राह्मणास आयात करातून जमणाऱ्या रकमेतून दररोज हे योमिया अनुदान द्यायचे अशी ही आज्ञा आहे. नबाबासाठी परमेश्वराजवळ या ब्राह्मणाने दीर्घायुष्य व भरभराट मागावी यासाठी हे अनुदान दिलेले आहे. तहसीलदाराने या सनदेची नक्कल काढून घेऊन अस्सल सनद त्या ब्राह्मणास परत करावी, असेही म्हटले आहे.

या सनदेची तारीख ७ रजब १२०५ हिजरी अशी आहे. सनदेवर मंजूरकर्त्याची वा नक्कलकाराची सही नाही; तसेच मूळ सनदेबाबतची काही माहिती दिलेली नाही. ती कोठे मिळाली वगैरेबद्दलही काही माहिती नाही.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इस्तकबाल परगणें जमलमडुगु बिदानंद दरीवीला. कसबा मजकुर रगं वडी अग्रहार सुभा भट यांस सायर तरकि दर रोजींना योमीया अपरंजी अर्धा भलम आहे.

**शेवट :** म्हणुन साबाक सनद वगैरे देवीला करीता बाराई हल मालुम बामोजीबा हुकुम केला आहे. तरी हरकत न करीतां देवत आला पाहिजें. नकल लिहुन घेऊन असल वापस करणे जाणीजें तारीख छ ९ माहे रजब सन १२०५ हिजरी.

## डी. नंबर ४३७

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १०"x १२". २० ओळी. मोडी. जुने व खराब अवस्था. पूर्ण.

डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना असून प्रस्तुत सनद पृ. ५४ वर येते. कागद खराब अवस्थेत आहे. काही थोड्या तेलगू ओळी आणि काही फारसी शब्द असलेले व शाही शिक्क्याप्रमाणे दिसणारे दोन लंबवर्तुळाकार गोल यावर दिसतात. त्यातील एक कागदाच्या वरच्या उजव्या भागात व दुसरा तळाशी मध्यावर आहे.

हीसुद्धा जमलमडुगूच्या तहसीलदारास नबाबाने धाडलेल्या आज्ञापत्राच्या स्वरूपातील सनद आहे. मीर जनालाउद्दीन यास प्रार्थनास्थळ बांधण्यासाठी इनाम देण्यात आलेले होते. देणगी म्हणून काही जमीन इनाम दिलेली होती. प्रस्तुत इनामदारास या सनदेद्वारे दररोज अर्धा फनम जादा अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. ही रक्कम तहसीलदाराने इनामदारास देत जावे; तसेच या जागेसाठी तहसीलदाराने भाडेपट्टी म्हणून थोडीशी रक्कम इनामदाराकडून घ्यावी. प्रस्तुत सनदेची नक्कल स्वतःजवळ ठेवून तहसीलदाराने मूळ अस्सल सनद इनामदारास द्यावी. यावर २२ जमादिलवल ११७७ हिजरी अशी तारीख आहे.

ही नक्कल तयार करण्यासाठी मूळ सनद कोठून मिळविली याबद्दलची माहिती किंवा नबाब वा नकलकार यांची नावे दिलेली नाहीत.

**प्रारंभ :** दानम बालम वेंकटा मुस्ताजर परगणे जमलमडुगू वगैरे मालुम दरीवीला. मीर जुमला आबदिन याचे दर्दागाचे इमान जमीन सुदामद फारम चालत आहे हाल अजरायेत करुन कसबेच महजीदचे चिरा बांदल असे.

**शेवट :** बा तारीख गुरे मोहरम सन ११७८ हिजरी पासुन दर ऐवन ताळुके खुद करुन पोहांचवथे. कबीज रसुल करणे जाणीजें. तारीख छ २२ माहे जमादिलवल फसली सन ११७७ हिजरी.

## डी. नंबर ४३८

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". २० ओळी. मोडी. जुने व खराब स्थितीत. पूर्ण.

डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना असून पृ. ५४ वर ही सनद येते. कागद अतिशय खराब अवस्थेत आहे. काही थोड्या तेलगू ओळी आणि काही फारसी शब्द असलेली शाही शिक्क्यासारखी एक गोलाकृती या पृष्ठाच्या तळाशी मध्यावर दिसून येते.

जमलमडुगूच्या तहसीलदारास नबाबाने पाठविलेले हे एक आज्ञापत्र आहे. आधी मंजूर केलेल्या एका सनदेनुसार जमलमडुगू येथील मशिदीस काही रक्कम व जमिनी देणगी म्हणून दिलेल्या होत्या; तसेच जनीनुलाबद्दीन यास त्या मशिदीचा व्यवस्थापक म्हणून नेमलेले होते.

पण नंतर नबाबाच्या असे लक्षात आणून दिले गेले की, कुणी एक अब्दुल रसूल या मिळकतीवर काही हक्क सांगतो आहे. तेव्हा

याबद्दलची सर्व परिस्थिती लक्षात घेऊन नबाबाने अब्दुल रसूल यास मशीद व मालमत्ता यांचा व्यवस्थापक म्हणून नेमलेले आहे.

या सनदेवर नबाबाची स्वाक्षरी किंवा शाही शिक्का दिसत नाही; तसेच नक्कलकाराचे नाव किंवा मूळ सनदेविषयीची माहिती दिलेली नाही. सनदेची तारीष २० रमजान ११७९ फसली अशी आहे.

**प्रारंभ :** इनाम बालम वेंकटया मुस्तजार जमलमडुगु वगैरे हरीवील्ला कसबा जमलमडुगू चे। मसुदिचे इनाम व मामुली वगैरेचे रोख जैनालु आबुदिन यास चालत असें.

**शेवट :** जैनुलाबदिनास बदल केला असें सुभान रहिमाचा रोख व मगुली वगैरे इनाम यास चालत जाणे. बा तारीख छ २ माहे रंमजान सन ११७९ इजरी.

## डी. नंबर ४३९

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". २० ओळी. मोडी. जुने व खराब अवस्था. पूर्ण.

डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना असून ही सनद पृ. १०७ वर येते. हस्ताक्षर जरी बऱ्यापैकी व वाच्य असले तरी या सनदेत मोठ्या प्रमाणावर अरबी व फारसी शब्दांचा भरणा आहे. यावर कसलाही शाही शिक्का जसा नाही, तशाच मंजूरकर्ता किंवा नक्कलकार यांच्या स्वाक्षऱ्याही नाहीत.

गंजीकोटच्या नबाबाने राम पंडिताचा पुत्र रामकृष्ण याच्यासाठी मंजूर केलेली ही सनद आहे. श्रोत्रीय दाने व इनाम यांसाठीच केवळ असलेले (दनवपंडी प्रभागातील) धर्मपुरी हे खेडेगाव वरील व्यक्तीस अनुदान म्हणून मंजूर केलेले आहे. खेड्याच्या उपभोगाच्या बदल्यात अनुदानप्राप्त व्यक्तीकडून ७० होन घेतले जावेत अशी नबाबाची सूचना आहे. सनदेची तारीख २१ शाबान ११८० हिजरी अशी आहे.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इस्तकबल परगेणे हवली गजीकाटो बिदानद हरीविला. मौजे दान वलपाडीचे मजरा धर्मापूरच जमीन तीर्वा खुपकी बामाजीबा दान पत्रे रेडी करणमानी मौजे मजकुर अग्रहार बदल बातारीख श्रोत्रीये सिकये इनाम कुलमतख सालीयना बेरीज जाहली होन ७० सत्तर होना मावफ मामुल मुत्क नायेफन.

**शेवट :** श्रोत्रीयें चालऊन सिस्तम सरकारचे पैसे घेत जाण की दाजी सनदाचे हजुर न करीतां हरी बाबा ताकीद जाणुन हसल मस्तुर अमद करण जाणीजें, बातारीख छ २१ माहे शाबान सन ११८० हिजरी सन मोर्दबुसुध.

## डी. नंबर ४४०

**ऐतीहासीक पत्रें**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. २०"x १०". २० ओळी. मोडी. जुने व खराब अवस्था. पूर्ण.

या तीन सनदा असून त्या एकसारख्या, त्याच मजकुराच्या आहेत. त्या एका (जफर सतुबे या) मुस्लिम माणसासाठी काढलेल्या आहेत. कागदाच्या अतिखराब अवस्थेमुळे नाव नीटपणे वाचता येत नाही. सनदेची तारीख, नबाबाचे नाव किंवा अनुदानप्राप्त व्यक्तीचे नाव इत्यादी वाचता येतील अशा स्थितीत नाहीत.

डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना असून प्रस्तुत सनद पृ. १२४ वर येते. तेलगू व फारसी लिपीत लिहिलेल्या काही ओळी यात दिसतात. त्या म्हणजे खाली लिहिलेल्या सनदेचे फारसी भाषांतर असावे. आत काहीही मजकूर नसलेला पण शाही शिक्क्याशी जुळणारा एक काटकोन चौकोन कागदाच्या अखेरीस आढळतो. मंजूरकर्त्याचे किंवा ही सनद जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे किंवा नक्कलकाराचे नाव उल्लेखिलेले नाही. ही सनद कोठून मिळविली याविषयीची माहितीही लेखक देत नाही. हस्ताक्षर जरी बऱ्यापैकी व वाच्य असले तरी अरबी व फारसी वाक्प्रचार व संक्षेपित रूपे यांचा भरणा मोठ्या प्रमाणात प्रस्तुत सनदेत झालेला दिसतो. जमलमडुगूच्या संबंधित अधिकाऱ्यास उद्देशून गंजीकोटाच्या नबाबाने काढलेले हे आज्ञापत्र आहे. महंत रसिफसाहेब यास जमलमडुगू फिक्रमधील दुकटपल्ली हे खेडेगाव आधीच इनाम म्हणून मंजूर झालेले होते. आता दुसऱ्या सनदेनुसार फकीर महंत रसिफसाहेब या व्यक्तीस कशीरबाग नावाची बाग इनाम म्हणून दिलेली आहे. या दोन्ही जागा उपभोगासाठी त्या फकिराच्या व्यवस्थापनाखालीच ठेवायच्या आहेत. या दोन्ही खेड्यांतील मिळकतीचा उपभोग फकिराने घ्यायचा असून त्याने नबाबाला दीर्घायुष्य व भरभराट लाभावी यासाठी प्रार्थना करायची आहे.

११८१ फसली अशी मंजुरीची तारीख असून दुसऱ्या मंजुरीची तारीख ११८५ हिजरी अशी आहे. या सनदेची नक्कल करून घेऊन मूळ सनद इनामदारास परत देण्याबद्दल नबाबाने सूचना केली आहे.

**प्रारंभ :** देशमुखानी व देशपांडीयान व मोकदमाने व मजारीयाने म्हदाये परगणें जमलमडुगु सरकार गंजीकाटो बिदानद मौजे युगट पळी अमल परगणे मजगुर बराईदल्ला मनई साल सन ११७१ फसली बामायमे मारुफ अशाद रईसाहेब यास दिलहे आ.

**शेवट :** अकसरफे मईशा खुद करुन दुवाये दौलत आवद मुदग मशगुल दुबाकरोन मौजे एकत आबवर्णे. तारीख छ ७ माहे रमजान मुबरख सन ११८६ इजरी सन ११८१ फसली मोर्दबुसुध—

## डी. नंबर ४४१

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". १८ ओळी. मोडी. जुने व खराब झालेले. पूर्ण.

डी. नंबर ३६३ मध्ये सांगितल्याप्रमाणे या भागातील इतर रचना असून ही सनद पृ. १२५ वर येते. जरी हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी फारसी व अरबी वाक्प्रचार आणि संक्षेपित रूपे फार मोठ्या प्रमाणात यामध्ये दिसतात. कागदाला असंख्य छिद्रे पडलेली असल्याने तो वाचणे जरा अवघड झालेले आहे. कागदाच्या वरील उजव्या भागात काही फारसी शब्द असलेला एक काटकोन चौकोन आढळतो. ही आकृती म्हणजे शाही शिक्क्याची खूण म्हणता येईल. एक-दोन तेलगू ओळी सनदेच्या शेवटी दिसतात.

नबाबाने तहसीलदार कोन्नेरी राव याच्या नावे काढलेले हे आज्ञापत्र आहे. या तहसीलदाराचे अधिकारक्षेत्र जरी दिलेले नसले तरी तो जमलमडुगूचा तहसीलदार असल्याचे गृहीत धरता येते. रसिफसाहेब यास इनाम दिलेल्या जमिनी दुनगपटपल्ली या खेड्यातील असून सदरहू खेडे या तहसीलदाराच्या अधिकारक्षेत्रात येत असल्यामुळे त्याने फकिरास या जमिनी हस्तांतरित करून देण्याबाबत योग्य ती व्यवस्था करायला हवी अशी आज्ञा केलेली आहे. सदरहू फकिरास दान दिलेल्या जमिनींबाबत कुणी कसलाही अडथळा निर्माण करू नये म्हणून मुद्दाम हे आज्ञापत्र लिहिण्यात आलेले आहे. तहसीलदाराने याची नक्कल करून घ्यावी आणि मूळ सनद फकिरास परत करावी, असा आदेश आहे. या सनदेवरील तारीख १६ रजब १२०५ हिजरी अशी आहे.

सनदेवर नबाबाचे किंवा नक्कलकाराचे ना नाव आहे, ना स्वाक्षरी. ही नक्कल सिद्ध करताना मूळ सनद कोठून मिळविली याची माहिती दिलेली नाही.

**प्रारंभ :** इजत असार कोनेरीराव वाफीरोत बाषीद दरीवीला. रफाई साहेब याचे खेडा तुमचे ताळुकेंत तुगुटपली मौजे मजकुर याचे आहे.

**शेवट :** ते त्याचे जिमें केला पाहिजे या बाद बदील हरकत नक्रिजे लिहिले बामाजीब अमलेंत आणणें जाणीजें छ १६ माहे रवब सन १२०५ हिजरी.

## डी. नंबर ४४२

**ऐतीहासीक पत्रे**
**AITHIHĀSIC PATTRAS**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". १६ ओळी. जुने. मोडी. दुरुस्त केलेले. पूर्ण.

या भागात ८९ पृष्ठे असून त्यात ४५ सनदांचा किंवा मंजुरीपत्रांचा समावेश आहे. कागदांचा रंग तपकिरी झालेला, ते फाटत आलेले आणि पानकिड्यांनी पोखरल्यामुळे छिद्रे पडलेली अशी त्यांची अवस्था आहे. सर्वच भागाची दुरुस्ती करून पुनर्बांधणी केलेली असल्यामुळे पृष्ठावरील मजकूर वाच्य झालेला आहे. सनदेवर शाही शिक्का नाही, पण कागदाच्या वरच्या उजव्या भागात काही थोडे फारसी शब्द दिसतात.

सनदेत असे सांगितलेले आहे की, कुणी एक भीमाचारी पुलिवेंदल येथे नबाबास भेटला आणि आपणास श्रोत्रियम् अटीवर काही जमीन इनाम मिळावी अशी त्याने नबाबास विनंती केली. अर्जदाराच्या विनंतीनुसार नबाबाने पुलिवेंदल जिल्ह्यातील मलयालम तालुक्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांना अशी सूचना पाठविली आहे की, कलपाई हे संपूर्ण खेडे श्रोत्रीय इनाम म्हणून दिलेले आहे. याखातर इनामदार भीमाचारी याने सरकारास २५ होन द्यायचे आहेत.

नबाबाचे किंवा ज्यांना ही सनद पाठविली गेली त्या अधिकाऱ्यांची नावे सांगितलेली नाहीत. १९ जमादिलावल ११५१ हिजरी रोजी ही सनद जारी करण्यात आली आहे. प्रस्तुत दस्तऐवजावर कुणाचीही सही नाही. ही मूळ सनदेची नक्कल असावी असे दिसते. या भागात ही सनद अंतर्भूत करण्याबाबतची माहिती दिलेली नाही.

**प्रारंभ :** आमीलान हाल व इस्तकबाल व देशमुखानी व देशपांडेयाने परगणें मलयाल बिदानंदे सुहुर्सन ११४९ फसली बाबत अवधानी भिमाच्यारी साखीन पुलीवेंदलायाणी हुजर येऊन सरकार कडुन श्रीत्रीये गाव पाहिजे म्हणुन अर्ज केला करीतां अणराहाकर मफजल करुन मशारनिलेस परगणे मजकुर देहात

पैकीं मौजें कलपाई गाव दमये मजरा देखील व रुसुम ईनाम व सिवाये कुल कानु व मोदतर्फ सालीना माहाल चायाळीस होन आधा पंचवीस होण मोकरारे केला असें.

**शेवट :** मैजे मजकुर अचार्यास व याचे अल अवलाद पावेतों देऊन चालवत जाणें. दर साल ताजा परवानचा हुजर न करणें. सनदाची नकल लिहुन घेऊन असल अर्च्यास देत जागे जाणीजें. छ १७ माहे जमादिलावल सन ११५१ हिजरी मोर्दबुसूद.

## डी. नंबर ४४३

**ऐतीहासीक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". २० ओळी. मोडी. जुने. दुरुस्त केलेले. पूर्ण.

२५५१ क्रमांकाच्या या भागाच्या पृ. ५ वर ही सनद येते. हस्ताक्षर जरी बऱ्यापैकी व वाच्य असले तरी अरबी व फारसी वाक्प्रचार आणि संक्षेपितरूपे यांचा भरणा मोठ्या प्रमाणात आहे. या भागाची बांधणी अशा तऱ्हेने केलेली आहे की, सनदेतील काही पृष्ठे गहाळ झालेली आहेत. त्यामुळे अनुदान वा इनाम देणे व स्वीकारणे या दोन्ही बाबतींत जबाबदार असलेल्या व्यक्तींची नावे दिलेली नाहीत. काही खेड्यांच्या नावांचा उल्लेख केलेला आहे, पण ती कडाप्पा जिल्ह्यातील असावीत का याबद्दल शंका आहे. आंध्र प्रदेशापेक्षा ही खेडी तमिळनाडूला जास्त जवळची वाटतात. काही थोडे अरबी शब्द असलेली एक लंबवर्तुळाकार आकृती आढळते. या आकृतीच्या शेजारी डाव्या बाजूला 'रझाअल्ली' अशी मोडी अक्षरे आहेत. त्या वर्तुळात रझाअल्ली हाच शब्द अरबी लिपीत लिहिल्याचे यावरून गृहीत धरायचे. आता हा नबाब होता की सनदा जारी करण्याचे अधिकार असणारा महत्त्वाचा अधिकारी होता हेही सांगणे कठीण आहे.

कलपल तालुक्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांनी श्रोत्रीय अनुदान म्हणून भीमाचारी यास दिलेल्या जमिनी राज्याकरिता ताब्यात घ्याव्यात आणि त्याबदली चिन्नय्या नाईक याच्या ताब्यात असलेल्या तितक्याच जमिनी भीमाचारी यास द्याव्यात अशी आज्ञा या सनदेत दिलेली आहे. इतरांच्या कसल्याही आक्षेप-हरकतीशिवाय भीमाचारी याने या जमिनींचा उपभोग घ्यावा अशी नबाबाची सूचना आहे. ही सनद ३ जिलखद ११९३ हिजरी या तारखेस जारी करण्यात आली असून ही कशी मिळवली किंवा नक्कलकार कोण याबद्दलची माहिती दिलेली नाही.

**प्रारंभ :** इजत दस्तगोः शेषा आचुत मुस्तजार ताळुक मलयाल चिंवकुंट बफियत बशाद हरीविला. तुम्हासी ताळुका इजारा देते व त्या इनाम व रुस्तुम श्रोत्रीयम गाव सिवाय इजारा मोकरोर करुन दिलह अस.

**शेवट :** कलपाल ताळुक मदल पाइगाव इतफ्तदाये पासुन चालत अलते हाली चालवणेस हरकत करींत म्हणुन जाहीर जाहाले येसे यास लगाईत पासुन चालत अलेते कामासी हरकत न करीतां बशनीब मालुम ज्यारी ठेवण जाणीजे छ ३ जिलखद सन ११७२ हिजरी.

## डी. नंबर ४४४

**ऐतीहासीक पत्र**
**AITHIHĀSIC PATTRA**

**कागद :** स्थानिक बनावट. १२"x १०". २० ओळी. मोडी. जुने. दुरुस्ती केलेले. पूर्ण.

प्रस्तुत सनद २५५७ क्रमांकाच्या भागाच्या पृ. ५ वर येत असून डी. नंबर ४५७ मध्ये सांगितल्याप्रमाणे यातील इतर रचना आहेत. हस्ताक्षर बऱ्यापैकी व वाच्य असले तरी या सनदेत फार मोठ्या प्रमाणात अरबी शब्द आहेत. भीमाचारीस चिंतकुट्टा तालुक्यातील काही जमिनी इनाम देण्याबाबत कडाप्पाच्या नबाबाने काढलेली ही सनद आहे.

काही अरबी शब्द असलेला एक वर्तुळाकार गोल या कागदाच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात आढळतो. याला जोडूनच मोडी लिपीत नबाब मीर रझाअल्ली असे लिहिलेले आहे. यावरून असे लक्षात येऊ शकते की, भीमाचारीस इनाम मंजूर करणारा नबाब हाच आहे.

चिंतकुट्टा तालुक्याच्या तहसीलदारास असे कळविण्यात आलेले आहे की, भीमाचारी याच्या विनंति-अर्जानुसार त्यास याआधीच जमिनी मंजूर करण्यात आलेल्या आहेत आणि या सनदेने मल्याळ तालुक्यातील जमिनीही मंजूर केलेल्या आहेत. कडाप्पाच्या चिन्नाप्पा नाईक याने या जमिनी श्रोत्रीय करारानुसार इनाम म्हणून मंजूर केलेल्या होत्या, असे समजते. आता तहसीलदाराने हेच पाहायचे की, या इनाम जमिनीचा कब्जा घेतांना भीमाचारीच्या मार्गात कसलीही अडचण वा अडथळा उभा राहणार नाही. आधीच्याप्रमाणेच या जमिनींचा उपभोग इनामदाराने घ्यायचा आहे.

या सनदेची तारीख ३ जिलखद ११९३ हिजरी अशी आहे. नक्कलकार किंवा नबाब यांचे नाव सनदेत दिलेले नाही. असे

दिसते की, ही मूळ अस्सल सनदेची नक्कल आहे. या सनदेविषयीची इतर माहिती किंवा ही ताब्यात असणाऱ्या व्यक्तीचे नाव दिलेले नाही.

**प्रारंभ :** इजत दस्तगो शेषो अचुत मुस्ताजर ताळुक मलयाल चिंतकुटे बाफीरत बंषद दरिवीला. तुम्हासी ताळुका इजरा देत व इनाम व रुसुन श्रोत्रीये गाव सिवार्ये. इजरा माकोर करुन दिलह असतां म ॥. सिनपानायेकाचे बाकम भिमाच्यारे नार्मेस मलयाल ताळुक मदल पाइ गाव इफ्तबादपासुन चालत आले.

**शेवट :** ते हाली चालवणेस हरकत करीताहेत म्हणुन जाहिर जाहाल. ऐसी यास लगाईता पासुन चालत आलर्ते कामासी हरकत नकरीतां दाशेनी मामुल ज्यारी ववर्णे जाणीजें छ ३ जिलखाद सन ११७३ हिजीरि.

■

# मद्रासची मराठी हस्तलिखिते

## गव्हर्न्मेंट ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररी
## मद्रास

### मराठी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची

### विभाग तिसरा

### ऐतिहासिक पत्रे

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाभारत : अनुशासन पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| २ | अश्वमेध पर्व, आश्रम-आश्रमवासी पर्व, मौसक्त पर्व, महाप्रस्थान पर्व, स्वर्गारोहण पर्व. | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ३ | आदिपर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ४ | उद्योग पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ५ | ऐषिक पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| | सौप्तिक पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| | विशोक पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| | स्त्री पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| | गदा पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| | शल्य पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ६ | कर्ण पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ७ | द्रोण पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ८ | भीष्म पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ९ | वन पर्व-आरण्यपर्व भाग १ | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| १० | वन पर्व-आरण्यपर्व भाग २ | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूण |
| ११ | विराट पर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| १२ | महाभारत-विराट पर्व अध्याय दुसरा | वामन | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| १३ | शान्ति पर्व-राजधर्म Vol. I | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| १४ | अपाध्दर्म. Vol. II | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| १५ | मोक्षधर्म Vol. III | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| १६ | सभ ापर्व | माधव | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| १६अ | कथाकल्पतरू-भाग १, स्तबक १,२,३. प्रसंग १-१७ | कृष्णयाज्ञवल्की | कथा | मोडी | पूर्ण |
| १६ब | कथाकल्पतरू-भाग २, स्तबक ४,५ प्रसंग २२-१५ | कृष्णयाज्ञवल्की | कथा | मोडी | पूर्ण |
| १६क | कथाकल्पतरू-भाग ३, स्तबक ६,७ प्रसंग १६,२४ | कृष्णयाज्ञवल्की | कथा | मोडी | पूर्ण |
| १७ | नारायणराव रिपोर्ट इ.स.१-१०-१३ | नारायणराव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १८ | जंत्री इ.स.१२-१३-१५ | नारायणराव | गणित | मोडी | अपूर्ण |
| १९ | वेताळपंचविशी– कथा २६ | नारायणराव | कथा | मोडी | पूर्ण |
| २० | महाराष्ट्र वृत्तमाला | नरसिंह शास्त्री ? | Prosody | मोडी | पूर्ण |
| २१ | जंत्री याददस्त १८०६-१८११ | ? | गणित | मोडी | अपूर्ण |
| २२ | विवेकसिंधु | मुकुंदराज | वेदान्त | देवनागरी | पूर्ण |
| २३ | पुणे पेठ कैफियत | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| २३ | बाजीराव थो. व त्रिंबकराव दाभाडे युद्ध बखर. पृ. १-३९ | कृष्णराव वकील | इतिहास | मोडी | पूर्ण |
| २३ | बाजीराव थो. व नवाब नासरजंग युद्ध बखर पृ. १९ | ? | इतिहास | मोडी | पूण |
| २३ | विश्वासराव सदाशिवराव भाऊ यांची आबदाली यासी लढाई बखर पृ. १-२३. | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| २३ | शिंदे कैफियत पृ. १३३ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| २३ | होळकर कैफियत १-८ १७-२४ | ? | कथा | देवनागरी | अपूर्ण |
| २४ | कथाकल्पतरू भाग १ स्तबक १ ते ३ | कृष्णयाज्ञवल्की | कथा | देवनागरी | पूर्ण |
| २५ | कथाकल्पतरू-भाग २ स्तबक | कृष्णयाज्ञवल्की | कथा | देवनागरी | पूर्ण |
| २६ | नीतिकथा ५५ (१३-६७) | ? | कथा | मोडी | अपूर्ण |
| २६ | बारनिशी-पत्रे १४. मद्रास गव्ह. इलाके कॉलेज | ? | पत्रव्यवहार | मोडी | पूर्ण |
| २७ | कडसणी दशावताराची | वेंकट दास | पुराण कथा | मोडी | पूर्ण |
| २७ | सीता स्वयंवर | अरणीबाबा | पुराण कथा | मोडी | अपूर्ण |
| २८ | कडसणी दशावताराची | वेंकटदास | पुराण कथा | मोडी | पूर्ण |
| २८ | सीतास्वयंवर | अरणीबाबा | पुराण कथा | मोडी | अपूर्ण |
| २९ | बडा बलापूर कैफियत पृ. १-१२ | ? | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| २९ | बेळुर कैफियत पृ. १-१० | ? | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| २९ | श्रीरंगपट्टण कैफियत पृ. २-२७ | ? | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| २९ | केलेदी संस्थान कैफियत | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| २९ | नगर संस्थान कैफियत | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| २९ | टिपु सुलतान संस्थान कैफियत पृ० २ | ? | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| २९ | टिपु सुलतानाची ताकियाची नकल पृ. १-९ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| २९ | रसीद पृ० ३ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| २९ | हरपनहळी ता. कैफियत पृ. १-११ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | भोजराज पटण पृ. १० | चिंदबरदत्त | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | तोडरमल (तोंडमंडल) कैफियत पृ. ११-२३ | वेंकटशास्त्री | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | –जैन– पृ. २४-४४ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | तिरुवाकेरे कैफियत पृ. ४६-५६ | अप्पा आणि चंद्रशेखर गुमकल | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | कफिस्तक– पृ. ५८-६३ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | नागऊर– पृ. ५८-६३ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | कडसणी कंडआरसी काटोपाळे कैफियत पृ. ९१-९८ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | पदनेलुर किलामाधाण पृ. ९९-१०४ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ३० | तिरुनागेश्वर कैफियत पृ.१०५-११० | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | पोरुळवनसेदी पा.पा.कोविल कै.पृ.१११-११६ | श्यामाख्याय मथाह विनायक मथाह | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | दिपंगुडी कैफियत | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३० | घोरपडे-सोंडूर पृ.१२१-१३८ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३१ | हैदर व टिपू | ? | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ३२ | विदुरनीती अध्याय ८ | व्यास | नीतिकथा | मोडी | पूर्ण |
| ३२ | यक्षप्रश्न | व्यास | नीतिकथा | मोडी | पूर्ण |
| ३३ | रामायण-अयोध्याकांड १-१९ | वाल्मिक ऋषी | पौराणिक-इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३३ | अरण्यकांड | वाल्मिक ऋषी | पौराणिक-इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३३ | किष्किंधाकांड | वाल्मिक ऋषी | पौराणिक-इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३३ | सुंदरकांड | वाल्मिक ऋषी | पौराणिक-इतिहास | मोडी | पूर्ण |
| ३४ | पांडुरंग महात्म्य पृ.५-१२५ | श्रीधर | भक्तिकथा | देवनागरी | अपूर्ण |
| ३५ | आदिपुराण | महीचंद्र | जैनपुराण | मोडी | पूर्ण |
| ३६ | कालिका माहात्म पृ.१-४८ | देववीर कुटी | जैनपुराण | मोडी | पूर्ण |
| ३७ | कालिका माहात्म अ.२६-४८ | देववीर कुटी | जैनपुराण | मोडी | अपूर्ण |
| ३८ | विनोदाच्या कहाण्या | ? | नीतिकथा | मोडी | अपूर्ण |
| ३९ | महाराष्ट्र शब्दमाला | ? | व्याकरण | मोडी | पूर्ण |
| ३८ | नीतिवाक्यावळी | नवरत्न पंडित | नीतिकथा | मोडी | पूर्ण |
| ३९ | वेताळ पंचविशी पृ.४-३८,कथा १-६ | ? | कथा | मोडी | अपूर्ण |
| ४० | हरिविजय अ.१-२ | श्रीधर | भक्तिकथा | देवनागरी | पूर्ण |
| ४१ | शिवलीलामृत अ.१-१४ | श्रीधर | भक्तिकथा | देवनागरी | पूर्ण |
| ४२ | श्रेणिक महाराज चरित अ.५ | भ त गुदर | जैनपुराण | देवनागरी | पूर्ण |
| ४३ | मंत्ररामायण | मोरोपंत कवि | पुराण काव्य | देवनागरी | पूर्ण |
| ४४ | निगमसार | वामन गोविंद शिष्य | वेदान्त | देवनागरी | पूर्ण |
| ४५ | हिशोब,सरस्वती भांडार,तंजावर | Sadashivbhau Ganapathibhau Lumdhyc | ग्रंथनामावली | मोडी | पूर्ण |
| ४६ | मराठ्यांची बखर भाग १ | ग्रॉटड आणि बाबा साने | इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ४७ | मराठ्यांची बखर भाग २ | ग्रॉटडफ आणि बाबा साने | इतिहास | देवनागरी | अपूर्ण |
| ४८ | परशुराम चरित्र श्रीमंतोत्कर्ष अ.१-६ | ? | इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ४९ | नायक राजे कैफियत पृ.२४-२८ | ? | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | रणेवायगुडाची कैफियत पृ.२ | ? | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | श्रीरंगपट्टण कैफियत पृ.२ | ? | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | मैसूरातील देवालय | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | तीरवल कैफियत | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ४९ | तिरुअनंबी कैफियत | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | श्रीरंगपट्टण कैफियत पृ.४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | येलनाडप्रभु वंशावळी पृ.८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ४९ | मतुरस्थल कैफियत पृ.४ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ४९ | पतिव्रता प्रभाव पृ.२ | अनाम | कथा | मोडी | अपूर्ण |
| ४९ | आनेगोंदी कैफियत पृ.३ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ४९ | कर्णिक पूर्णय कैफियत पृ.१२ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ४९ | टिपु सुलतान पृ.२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | विध्यानगर कैफियत पृ.११-२० | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | इरिकेलस्थल माहात्म | अनाम | कथा | मोडी | अपूर्ण |
| ४९ | हैदर व टिपुसुलतान कैफियत २९ ते ४२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | श्रीरंगपटणाची कैफियत पृ.२०-३३ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | केलंदी संस्थान कैफियत पृ.६-३८ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | नागर कैफियत | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | चित्रदुर्ग कैफियत | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | लालबाग कैफियत | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | रणेवायगुडी कैफियत | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ४९ | मैसुर कैफियत | | | | |
| ५० | शहाजीराजे-शाहुराजे | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| | कैफियत पृ.१ ते १२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ५० | शिवाजी व संभाजी कैफियत | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ५० | पुणे पेठ (अथवा मराठ्यांची बखर) | | | | |
| | महाराष्ट्र बखर | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ५० | सिंदे-सिंदे कैफियत पृ.१९ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ५० | होळकर कैफियत पृ.१९ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ५१ | चार युगांचे राजे इति. | | | | |
| | अथवा श्रीरंगपट्टण कैफियत | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ५२ | विवेकसिंधु | मुकुंदराज | वेदान्त | देवनागरी | पूर्ण |
| ५३ | पंचतंत्र | अनाम | नीतिकथा | मोडी | अपूर्ण |
| ५४ | ज्ञानेश्वरी कूटशब्दार्थ | अनाम | कोश | देवनागरी | पूर्ण |
| ५५ | शिवलीलामृत | श्रीधर | भक्तिकथा | देवनागरी | अपूर्ण |
| ५६ | वैराग्यसंदीपनी | तुलसीदास | वेदान्त | देवनागरी | पूर्ण |
| ५७ | उषाचरित्र | Mahuvaja | कथा | देवनागरी | पूर्ण |
| ५८ | सत्रुंजयविलास | अनाम | कथा | देवनागरी | पूर्ण |
| ५९ अ | जंत्री पृ.१२-२२ | अनाम | ग्रंथ | मोडी | पूर्ण |
| ५९ब | जंत्री पृ.१८ | अनाम | ग्रंथ | मोडी | पूर्ण |
| ६० | जंत्री पृ.१२ | अनाम | ग्रंथ | मोडी | पूर्ण |
| ६१ | जंत्री पृ.१२२५-५४ | अनाम | ग्रंथ | मोडी | पूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ६२ | मराठी शब्दार्थ कोश | अनाम | कोश | देवनागरी | अपूर्ण |
| ६३ | मराठी शब्दार्थ कोश | अनाम | कोश | देवनागरी | अपूर्ण |
| ६४ | भावार्थ रामायण : भाग १ बालकांड, अयोध्याकांड | एकनाथ | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ६५ | भावार्थ रामायण : भाग २ आरण्यकांड ते किष्किंधाकांड | एकनाथ | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ६६ | सुंदरकांड | एकनाथ | पुराण/इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ६७ | दासबोध | रामदास | भक्तिमार्ग | देवनागरी | पूर्ण |
| ६८ | भागवत स्कंध ११ (अ.१ ते १५) | एकनाथ | कथा | देवनागरी | पूर्ण |
| ६९ | हरिविजय अ.३६ | श्रीधर | भक्तिकथा | देवनागरी | पूर्ण |
| ७० | महाराष्ट्र प्रयोग चंद्रिका | अनाम | व्याकरण | मोडी व देवनागरी | अपूर्ण |
| ७१ | मराठी व्याकरण | अनाम | व्याकरण | मोडी व देवनागरी | अपूर्ण |
| ७१ | महाराष्ट्र शब्दानुशासन | वेंकट भीम | व्याकरण | मोडी व देवनागरी | अपूर्ण |
| ७१ | रामायण : बालकांड : अ.१ ते १८ | एकनाथ | पुराण | देवनागरी | पूर्ण |
| ७२ | मराठी इंग्रजी भाषादीपक | सुभाजी शेष | व्याकरण | मोडी | अपूर्ण |
| ७३ | भागवत अ.११ ते ३१ | एकनाथ | पुराण | देवनागरी | अपूर्ण |
| ७४ | भक्तिविजय भाग १– अ.१ ते २८ | उमापति ? (महिपती ?) | भक्तिकथा | देवनागरी | पूर्ण |
| ७५ | भक्तिविजय भाग १– अ.२९ ते ५७ | उमापति ? (महिपती ?) | भक्तिकथा | देवनागरी | पूर्ण |
| ७६ | विजापूर बादशहा सरकार पटगणे शहर पृ.११९ | अनाम | इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ७६ | राजा गोपीचंद बखर कैफि.पृ.१ ते ३२ | अनाम | कथा | देवनागरी | पूर्ण |
| ७६ | गुजरात प्रांत, गड, शहर व राजा पृ.१-८ | अनाम | इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ७६ | वायुर कैफि.पृ.१-१० | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | सोनाई पृ.११-१२० | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | सोनाई पृ.कासगाव १४-१८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | कासगाव १४-१८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | तुरुकाबाद-औरंगाबाद | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | अहमदनगर कैफि.पृ.१-३४ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | हेमाडपंताची बखर पृ.१८८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | रोजा १-११ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | अहमदनगर कैफियत | नारायणराव आनंदराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | भोसले यांचे वंशावळ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | पेशवाईचा वृत्तान्त पृ.१-७० | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७६ | पुणे कैफि.पृ.१-३८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ७७ | भोसले यांचे बखर व पेशवे यांचे बखर पृ.१३-८७ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७८ | शिवाजी व संभाजी भोसले बखर | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ७९ | यादी फौज सरंजाम सिलेदार इनाम | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८० | चार युगातील राजे हस्तिनापूर, हिंदुपती राजे, मुसलमान राजे, मराटे व पेशवे | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८१ | यादी उत्तर हिंदुस्थानचे सुभे १५ बकामुल | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८२ | शालिवाहनाची बखर पृ.१-१४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | शिवाजी शाहूराजे | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | निजाम उल्मुलुक बखर पृ.१६-४४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | सैद याकूब मदुर चेन्नपट्टणकर कैफियत पृ.१-१७ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | चंद्रगुत्ति तालुका कैफियत जीराइत करणेचे पृ.१२-४९ | अनाम | शेती | मोडी | पूर्ण |
| ८२ | अज्ञापत्र माधवराव बलाळ | | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८२ | मृदंग करावयाचे कसब– पृ.४५-४७ | प्रसन रामया | संगीत | मोडी | पूर्ण |
| ८२ | बेडर लोक कैफियत | अनाम | सामाजिक | मोडी | पूर्ण |
| ८२ | सरापू नगद नाणे जोख | अनाम | व्यापार | मोडी | पूर्ण |
| ८२ | शिवाजी राजा (शाहु) | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | निजाम उल्मुलक कैफि.१-१४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | दानपत्र पृ.३३,३४,३५ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८२ | आज्ञापत्रे माधवराव बलाळ | माधवराव बल्लाळ | इतिहास | पार्शी | पूर्ण |
| | प्रधान शके १६९२ | प्रधान | इतिहास | पार्शी | पूर्ण |
| ८२ | फारशी पत्रे ३ | Sicha Malet Kamandi Khan Raja | इतिहास | पार्शी | पूर्ण |
| ८२ | तुळास्थान महात्म पृ.७९-८० | | धार्मिक | मोडी | अपूर्ण |
| ८२ | दाऊदखान कैफि.पृ.९१-१०२ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८२ | यादी सरंजाम फौज पृ.१०५-१०९ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८२ | यादी सरंजाम फौज पृ.१०५-१०९ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८२ | शंकराचार्य चरित्र पृ.१२७ = ४२ | अनाम | चरित्र | मोडी | अपूर्ण |
| ८२ | सवाई माधवराव कैफियत सवार पृ.१११-११२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | शंकराचार्यकृत बौद्धमत खंडण पृ.१२३-२८ | अनाम | वेदान्त | मोडी | पूर्ण |
| ८२ | अहमदशाह हसन गंगु बहमनी पृ.१-१६ | मन्शाअलीखान | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | तुला महात्म अगस्त | अनाम | कथा | मोडी | अपूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ८२ | सत्य हरिचंद्र संवाद पृ.६३-७८ | अनाम | कथा | मोडी | अपूर्ण |
| ८२ | हसन गंगु बाहमनी अहमदशा पृ.३३-४६ | मन्शाअलीखान | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | ऐतिहासिक पत्रे १४ | घोरपडे-पेशवा | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८२ | हसन गंगु बाहमनी पृ.५७-६२ | मन्शाअलीखान | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | सत्य हरिचंद्र कथा पृ.५७-६२ | अनाम | पौराणिक कथा | मोडी | अपूर्ण |
| ८२ | हसन गंगु बहामनी पृ.१७-३२ | मन्शाअली खान | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | ऐतिहासिक पत्रे पृ.१५-२६ | बाजराजमहीपाल | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८२ | श्रीरंगपट्टणवृत्त पृ.३७-३८ | मीर कमरुद्दिन | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | शंकराचार्य चरित्र पृ.१४३-५२ | अनाम | चरित्र | मोडी | अपूर्ण |
| ८२ | ऐतिहासिक पत्रे पृ.१-१६ | प्रधान महादेवराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८२ | शिवाजी महाराज व निजाम | घोरपडे | इतिहास | मोडी | पूर्ण |
| | मुलमुलक बखर पृ.९७-१०८ | नाना फडणवीस | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| | राघोबादादा व सवाई माधवराव | श्रीपतराव चिटणीस | | | |
| ८२ | पंचतंत्र पृ.१११-१६ | विष्णुशर्मा | नीतिकथा | मोडी | अपूर्ण |
| ८२ | पंचतंत्र पृ.९५-११० | विष्णुशर्मा | नीतिकथा | मोडी | अपूर्ण |
| ८२ | पंचतंत्र पृ.७९-९४ | विष्णुशर्मा | नीतिकथा | मोडी | अपूर्ण |
| ८२ | प्रसन्नप्रभुची बखर पृ.६३-७० | अनाम | नीतिकथा | मोडी | अपूर्ण |
| ८२ | विष्णुशर्मा कैफि. पृ.६३-७० | विष्णुशर्मा | नीतिकथा | मोडी | अपूर्ण |
| ८२ | पंचपंत्र पृ.७१-७८ | विष्णुशर्मा | नीतिकथा | मोडी | अपूर्ण |
| ८२ | दामाजीपंताची बखर पृ.४७-५५ | अनाम | | मोडी | पूर्ण |
| ८२ | प्रसन्नप्रभुची बखर | अनाम | | मोडी | अपूर्ण |
| ८२ | दुर्वास महात्म पृ.५७-६२ | अनाम | | मोडी | अपूर्ण |
| ८२ | शालिवाहनाची बखर पृ.३१-४६ | अनाम | इतिहास-कथा | मोडी | अपूर्ण |
| ८२ | शालिवाहनाची बखर पृ.१५-३० | अनाम | इतिहास-कथा | मोडी | अपूर्ण |
| ८२ | शाहुराजाची उत्पत्ती कैफियत पृ.१-१२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | विश्वासराव व भाऊसाहेब कैफियत पृ.१-२८ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८२ | पानिपतयुद्ध थोरले माधवराव आणि नारायणराव | अनाम | व्याकरण | मोडी | अपूर्ण |
| ८२ | महाराष्ट्र अक्षरलक्षणाची पोथी | अनाम | व्याकरण | मोडी | अपूर्ण |
| ८२ | अनंतपुर तालुकेत जिरायत लावणेचे विधान | अनाम | शेती | मोडी | अपूर्ण |
| ८२ | महाराष्ट्र अक्षरलक्षणाची पोथी | अनाम | व्याकरण | मोडी | पूर्ण |
| ८३ | सुभे खुजस्तेबुनि याद ऊर्फ औरंगाबाद १-२७०; सकरिमहाल तनखा | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८४ | लोहदंड ऊर्फ पंढरपूर क्षेत्र कैफि. | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| | हमदनगर तालुकेत जीरायत जोखी वजन नाणे कापडे पृ.१-३८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| | कमरआलीखान वतने आजमेर हिंदुस्थान कैफि.१-८- | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८४ | आनंदराव रिपोर्ट पृ.१३-२२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| | कमरअलीखान पृ.७-१२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| | पाटणा गुजरात कैफियत १-१२६ | अनाम | कथा | मोडी | पूर्ण |
| | विक्रम कथा | अनाम | कथा | मोडी | अपूर्ण |
| ८५ | शिवालय महात्म पृ.१-४३ | अनाम | पुराणिक कथा | मोडी | पूर्ण |
| ८५ | वेरूळ घृष्णेश्वर महात्म पृ.४४-१०८ | अनाम | पुराणिक कथा | मोडी | पूर्ण |
| ८५ | रामराजा देवगिरी बखर पृ.१-४. | इमाजी | इनिहास | मोडी | अपूर्ण |
| ८५ | नासीक व त्रिंबक पंचवटी कैफि.पृ.१-४ | अनाम | पौराणिक कथा | मोडी | अपूर्ण |
| ८५ | रामराज देवगिरी बखर पृ.५-१२ | | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८५ | जाबिता सिरस्तेदपूर बादशहा विजापुरी कैफियत | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८५ | सुभे बिजापूर बादशहा सरकार शहर जाबित पृ.१-१२ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८५ | देवगिरी महात्म पृ.१-३५ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८५ | सृष्टीक्रम,राजे भोसले,संतधर्म इ. | अनाम | पौरा/इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८५ | सुबे बिंजापूर शहर व बादशहा कैफि. | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ८६ | सिंहासन बत्तिस पृ.३-२८४. | अनाम | नीतिकथा | देवनागरी | पूर्ण |
| ८६ | सुदामचरित्र पृ.६ | अनाम | पौराणिक कथा | मोडी | अपूर्ण |
| ८६ | काशीविश्वेश्वर कथा पृ.१ | अनाम | पौराणिक कथा | मोडी | अपूर्ण |
| ८६ | मालोजी भोसले काही माहिती पृ.३ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ८७ | महाराष्ट्र पंचोपाख्यान तंत्र | अनाम | नीतिकथा | मोडी | पूर्ण |
| ८७ | सुधाचरित्र पृ.१-४४ | अनाम | कथा | मोडी | पूर्ण |
| ८८ | नारायणराव आणि रिपोर्ट इ.१८०६ आनंदराव पुणे कामाचे १८०६-१८०७ | नारायणराव व अनंतराव | अहवाल | मोडी | पूर्ण |
| ८९ | वेताळ पंचविसी कथा १३ पूर्ण,१४ अपूर्ण | अनाम | कथा | मोडी | अपूर्ण |
| ९० | कालिकापुराण वृत्तांत | अनाम | पुराणकथा | मोडी | अपूर्ण |
| ९० | हैदराची माहिती | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९० | विक्रमराजा बखर | अनाम | कथा | मोडी | अपूर्ण |
| ९१ | ध्रुवराय चरित्र पृ.१२ | चिंतामणि कवि | पुराणकथा | मोडी | अपूर्ण |
| ९१ | पद्मणी हस्तिनी इ.स्त्रीलक्षणे पृ.६ | अनाम | कामसूत्र | मोडी | अपूर्ण |
| ९१ | भूगोल खगोल तत्त्व प्रमेयसागर | अनाम | पुराण | मोडी | पूर्ण |
| ९१ | ध्रुवराय चरित्र पृ.३४ | चिंतामणि कवि | पुराण | मोडी | अपूर्ण |
| ९१ | दामाजीपंताची चरित्र पृ.१-५ | अमृतराज कवि | कथा | मोडी | पूर्ण |
| ९१ | अभंग पृ.५ | तुकाराम | भक्ती | मोडी | पूर्ण |
| ९१ | श्रीकृष्णलीला | अनाम | भक्तिकथा | मोडी | पूर्ण |
| ९१ | भक्तिपर पद | केशव कवि | भक्तिकथा | मोडी | पूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ९१ | भक्तिपर पद | सूरदास | भक्तिकथा | मोडी | पूर्ण |
| ९१ | भक्तिपर पद | कबीर | भक्तिकथा | मोडी | पूर्ण |
| ९१ | भक्तिपर पद | मधुसूदन | भक्तिकथा | मोडी | पूर्ण |
| ९१ | भक्तिपर पद | रविराय देव | भक्तिकथा | मोडी | पूर्ण |
| ९१ | मूलस्तंभ प्रसंग | दत्तात्रय अवधूत | वेदान्त | मोडी | पूर्ण |
| ९२ | नारायणराव रिपोर्ट इ.१८१४ पृ.१-६ | नारायणराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९२ | नारायणराव रिपोर्ट इ.१८१५ पृ.१-२० | नारायणराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९२ | नारायणराव रिपोर्ट इ.१८१५ पृ.१-२० | नारायणराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९२ | नारायणराव रिपोर्ट इ १८१५ पृ.१-१३५ | नारायणराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९३ | चंद्रगिरी कैफि.पृ.१-१२३ | कृष्णराजा | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९४ | इंद्र-बृहस्पती कथा | अनाम | पुराण-कथा | मोडी | अपूर्ण |
| ९४ | सीतास्वयंवर | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९४ | फेरिस्त देहाये जामदार तालुके | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९४ | यादास्त देहझाडा तालुके मधारी | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९४ | यादास्त देहझाडा तालुके लासेगाव कैफि. देवस्तान आलगिरी | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९४ | अश्वत्थवृक्षपूजा कहाणी | अनाम | पुराण-कथा | मोडी | पूर्ण |
| ९४ | लासेगाव अलगिरी देवस्थान कैफि. | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९४ | याददस्त मधुरा मिनाक्षी कैफि. | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९४ | देवालय पूज्य लासेगाव ता.तिरुमंगल पृ.१ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९४ | याददस्त कैफियत पृ.१ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९४ | सुब्रह्मण्येश्वर स्वामी पृ.१ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९४ | पाळेगार सायरे कावली मावली इ. | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९४ | व्यंकटराम दिक्षित पुत्र | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९५ | आनंदराव व नारायणराव रिपोर्ट इ.१८०९ पृ.१-१६५ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९६ | नारायणराव वनश्रीस्वामी महात्म अ.१० | अनाम | इतिहासकथा | मोडी | पूर्ण |
| ९६ | स्वर्णमुखी महात्म.अ.५ | अनाम | इतिहासकथा | मोडी | पूर्ण |
| ९६ | शमयपूरची माहिती पृ.१-१२ | सीतांबर | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९७ | तोडरमंडल कांची देश कुरण्डुर कैफि. पृ.१-१६ | वेंकटेश शर्मा कुलकर्णी | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९७ | तोडरमंडलातील जैनांची कैफियत | विनायक | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९७ | मनु तीर्थंकर चक्रवर्ती अलदेवर इ. पृ.१-२६ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९७ | तिस्वाकोरे कैफि.पृ.१-१८ | अप्पा चंद्रशेखर | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९७ | कफिस्तल कैफि.पृ.१-१२ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९७ | नागपूर कैफि.पृ.१-३४ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |

| ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|
| ९७ कडआरसी कोटापलि कैफि. पृ. १-१२ | पिल्ले | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९७ पदनेनुर किला कैफि. पृ. १-९ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९७ तिरुनागेश्वर कैफि. पृ. १-१० | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९७ दिपंगुडी कैफि. पृ. १-७ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९७ घोरपडे-सोंडूर कैफि. पृ. १-२० | नारायणराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९८ कृतादियुगातील राजावळी भाग १ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ९८ राजावळी गोवळकोंड | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ९९ सुरापूर संस्थानची गुडीगुटी संस्थानच्या राजे वंशावळीसह कैफि. पृ. १-१८, १९०-३०५ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०० अर्काटची कैफि. पृ. १-३२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०१ श्रीहरीकोट कैफि. | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०१ लिंगराजपटण पृ. १-८ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०१ वंदनपुरीपटण पृ. १-२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०१ वंदनपुरीपटण पृ. १-२ गुंडालिद्वीपाचे डोंगर कैफि. १-४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०१ मलपटण कैफि. | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०१ याददस्त रवेबंदर करपटण कैफि. | अनाम | व्यापार | मोडी | अपूर्ण |
| १०१ याददस्त अर्काट सुभा परगणे १-५ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०१ बेरीज जबिता १-४ | अनाम | जमाबंदी | मोडी | अपूर्ण |
| १०१ याददस्त कानगोई मुजुम देशमुख | अनाम | Thalcs | मोडी | अपूर्ण |
| १०१ दरोबस्तमुलख कर्नाटक पैनघर दंडकारण्य १३३ | अनाम | कथा | मोडी | अपूर्ण |
| १०२ रंगदेवळसंबंधी व्यवस्था व माहिती १-८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०२ चोल राजांची कथा तंजावर | वेंकाजी | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०२ चित्रगिरी कथा १ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०२ विक्रमकथा १ | अनाम | कथा | मोडी | अपूर्ण |
| १०२ गोलिमंडल कैफि. १-१९ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०२ राजावळी पौराणिक चोल यादव सुलतान १-१८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०२ नससिंहजूर माहिती पृ. १-१६ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०२ चोलगी इनामगाव १-२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०२ माधोराजल वंशावळी १-१३ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०२ याददास्त फेरिस्त अग्रहार मनवर पृ. १-४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०३ दस्तरुल अमलमुलुख १-८० | अनाम | जमाबंदी | मोडी | अपूर्ण |
| १०३ याददस्त फेरीसा जरीब कृष्णगिरी-१ | अनाम | जमाबंदी | मोडी | अपूर्ण |
| १०३ याददस्त फेरीसा जरीब कृष्णगिरी-१ | गोविंदराव | जमाबंदी | मोडी | अपूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| १०३ | याददस्त फेरीसा जरीब रामसमुद्र-२ | गोविंदराव | जमाबंदी | मोडी | अपूर्ण |
| | १-४६ | पार्थसारथी | जमाबंदी | मोडी | अपूर्ण |
| १०३ | खुषकी जमीन वृ. | वेंकटराव रंगाराव | जमाबंदी | मोडी | अपूर्ण |
| १०३ | खतावणी रामसमुद्र | सुबाजी श्रीनिवास | जमाबंदी | मोडी | अपूर्ण |
| १०३ | याददस्त स्तलवार १-४ | सुबाजी श्रीनिवास | जमाबंदी | मोडी | अपूर्ण |
| १०४ | याददस्त पांडवगुडी वरकल कैफि.१ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०४ | जलकंठेश्वर निर्माण कथा पृ.१-६ | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०४ | सहजेश्वर कैफि.पृ.१ | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०४ | गुडियातल कैफि.पृ.१ | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०४ | विरंचीपूर वेलुर माहिती पृ.१ | अनाम | पुराण-कथा | मोडी | पूर्ण |
| १०४ | वेलुर किले कैफि. | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०४ | चेंगलपटण बखर १३१ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०४ | चेदरंगपटण कैफि.पृ.१-१२ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०४ | वेलुरकिले व नगर पृ.१-६ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०४ | जयसिंगराजाची बखर पृ.१-१० | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०५ | श्री वेंकटेश्वरस्वामी कैफि. | अनाम | पुराण-कथा | मोडी | पूर्ण |
| १०६ | श्री शिवाजी चरित्र संस्कृत शिवभारताचा | | | | |
| | मराठी अनुवाद अध्या.१-१४.पृ.१-७६१ | ? | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०६ | शिवाजी चरित्र बखर | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०६ | शिवाजी वंशावळी व माहिती पृ.१ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०६ | महाराष्ट्र ब्राह्मणांचे पाच जाती | | | | |
| | कैफि.१-४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०६ | भाऊगर्दी पानपत कैफि.१९५-२९० | रघुनाथराव यादव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०६ | रघोजी भोसले नागपूर | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०६ | अनेगोंदीची कैफियत कैफि.२९५-३० | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०६ | शाहुराजा माहिती ३०१-३२६ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०६ | पानिपत बखर ३२७-३७५ | रघुनाथ यादव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०७ | भोसले वाले राजे वंशावळ | | | | |
| | बखर पृ.१-१३० | रघुनाथ यादव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०७ | शिवाजी (शाहू) राजे व निजामुलमुलक | श्रीपादराव,चिटणीस | | | |
| | कैफि.पृ.१३५ | नाना फडणीस | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०७ | श्रीरंगपट्टण शहर व किले | | | | |
| | कैफि.२१३-२८० | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०७ | येलहनाड प्रभु वंशावळ | | | | |
| | तपशील २२१-२२८ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०७ | यंगुर कैफि.२२९-४१ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०७ | तंबाकुच कैफि.२४२ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०७ | गोवा कैफि.४३-४८ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| १०७ | किरिस्ताव कैफि. | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०७ | सदाशिवगड कैफि. २५१-५८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०७ | नबाब असफजाहा २५९-३२६ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०७ | राजा प्रतापरुद्र कैफि. ३२७-४५ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०७ | हस्तिनावती-दिल्ली कैफि. ३४५-५६ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०७ | आनागोंदी कैफियत पृ. ३३४-३९ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १०८ | आनंदराव रिपोर्ट स. १८११ | आनंदराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०८ | नारायणराव रिपोर्ट स. १८११ १३-१२-११ | नारायणराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १०९ | वारदानदी महात्म अध्याय पृ. १-५२ | अनाम | पुराण/इतिहास | मोडी/देवनागरी | पूर्ण |
| १०९ | प्रशतमक्षेत्र कथा अ. १-५५ १-४० | अनाम | पुराण/इतिहास | मोडी/देवनागरी | पूर्ण |
| १०९ | बालपुरी व श्रीनिवास क्षेत्र महात्म अध्याय पृ. १-३३ | अनाम | पुराण/इतिहास | मोडी/देवनागरी | पूर्ण |
| ११० | अनंतपूर तालुका जिरायत करण्याचे विधान पृ. १० | अनाम | शेती | मोडी/देवनागरी | पूर्ण |
| ११० | अनंतपूर तालुका जिरायत ताडपत्री ३-११ | अनाम | शेती | मोडी/देवनागरी | अपूर्ण |
| ११० | ताडपत्री तालुकेत जिरायेत करण्याचे विधान | अनाम | शेती | मोडी | अपूर्ण |
| ११० | दौंडिपली पाळेगर नायेग कैफि. ११२ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११० | कुंडा नृसिंहस्वामी | अनाम | पुराण-कथा | मोडी | अपूर्ण |
| ११० | जगन्नाथपूर व सिंहाद्रिपूर कैफियत १-११ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११० | ताडपत्री तालुका कापड होणेचे विधान १-२० | आनंदराव | व्यापार | मोडी | पूर्ण |
| ११० | ताडपत्री पाळेगार कैफियत पृ. १-२८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११० | नृसिंहस्वामी देवालय कैफि. पृ. १-५६ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १११ | नंदेवरगाव अग्रहार | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११२ | जोहनसिंग तासिलदार अर्ज ६२-६३ | जोहनसिंग | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११३ | आनंदराव रिपोर्ट | आनंदराव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ११४ | भीमन पाडु ? | अनाम | इतिहास | मोडी | ? |
| ११५ | सोंडूर घोरपडे कैफियत पृ. १-२६ | Tenaji Venkaji Patnars | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११५ | संक्रांतीपत्र | नारायण पांडुरंग | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११६ | आनंदराव रिपोर्ट | आनंदराव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ११७ | नारायणराव रिपोट | नारायणराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११८ | शांडीपती गाव कैफियत पृ. १ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११९ | आनंदराव व नारायणराव रिपोर्ट पृ. ६६. द. १८०६ | आनंदराव नारायणराव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ११९ | गोरक्षनाथाची कथा पृ. १-७ | कुरक्षेत्रनाथ | इतिहास | मोडी | अपूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ११९ | पेरियापटण कैफियत पृ.१-२४ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११९ | पोर्णमंगल कामाक्षी कथा पृ.३-६ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ११९ | कपालीमत तपशील पृ.१-१३ | कुरुक्षेत्रनाथ | पुराण-इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११९ | बलालराय दुर्ग कैफि.पृ.१-११ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| ११९ | चेंद्रगुत्ती क्षेत्र मात्य्म पृ.१-१६ | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | पूर्ण |
| ११९ | केळंदी रामेश्वर महात्म अध्याय ३ पृ.१-२२ | अनाम | पुराण-इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ११९ | हळेबिडु कैफियत पृ.१-२८ | अनाम | इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ११९ | कोंप कैफियत पृ.१-२८ | अनाम | इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| ११९ | कलबु तालुके बुळ्ळकरे १-१४ | अनाम | इतिहास | देवनागरी | पूर्ण |
| १२० | जमाबंदी हुकूम पृ.१-६ टिपू | टिपू | इतिहास | देवनागरी | अपूर्ण |
| १२० | याददास्त तालुके कणकुपी टिपू.पृ.१-३ | टिपू | इतिहास | देवनागरी | अपूर्ण |
| १२१ | हैदर व टिपू सुलतान हकीकत पृ.१-१३ | टिपू | इतिहास | देवनागरी | अपूर्ण |
| १२१ | बडा बाळापूर कैफि.पृ.१-१६ | अनाम | इतिहास | देवनागरी | अपूर्ण |
| १२२ | मदरास बालघाट श्रीरंगपट्टण इ.कैफि.पृ.१-१२ | सयद याकुबखान | इतिहास | देवनागरी | अपूर्ण |
| १२२ | येकेरी सागर ता जो बी मापणीचे तपसील पृ.१-३ | अनाम | शेती | देवनागरी | अपूर्ण |
| १२२ | चेंद्रगुत्ती तालुके शतोविधा पृ.१-४५ | अनाम | शेती | देवनागरी | अपूर्ण |
| १२२ | भागायत सुपारी तपसील पृ.१-२५ | अनाम | शेती | देवनागरी | अपूर्ण |
| १२२ | मृदंग करणेचा तपसील पृ.१-५ | Pamshivi and Rangayya | कला | देवनागरी | पूर्ण |
| १२२ | मजली-मफी टाळे करणे कैफि. तपसील पृ.१-४३ | Hanma Bhaskar Konniya | कला | मोडी | पूर्ण |
| १२२ | नाणे जित्रस पृ.१-४ | अनाम | Mumistos | मोडी | पूर्ण |
| १२२ | बडेर लोक कैफियत पृ.६ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२३ | विक्रम बत्तिशी कथा पृ.२४ | अनाम | नीतिकथा | मोडी | अपूर्ण |
| १२३ | नलदमयंती कथा पृ.१ | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२३ | रामायण कथा पृ.१ | अनाम | पुराण | मोडी | अपूर्ण |
| १२३ | दमयंती कथा पृ.१ | अनाम | पुराण | मोडी | अपूर्ण |
| १२३ | बडा बलापुर कैफि.पृ.४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२३ | असबजाग कैफि.पृ.९-३८ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२३ | अनागोंदी कथा पृ.१ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२३ | हस्तनावती-दिल्ली कैफि.पृ.७ | नारायणराव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२३ | मराठी राज्याची बखर | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२४ | गोवा बंदर कैफि. | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १२४ | किरिस्तान पृ.५ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२४ | आंपसर कोट महात्म्य पृ.८ | अनाम | पुराण | मोडी | अपूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| १२४ | मृगजातीची कैफि.पृ.१ | अनाम | प्राणी | मोडी | अपूर्ण |
| १२४ | किरिस्तान इंग्रजांची कैफि.पृ.२ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२४ | याद सदाशिवगड कैफि.पृ.७ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२४ | कोट सिवेश्वर कैफि. | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १२४ | जंजिरा कुर्मगड कैफि.पृ.२ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १२४ | तंबाकू कैफि.पृ.१ | अनाम | शेती | मोडी | पूर्ण |
| १२४ | मराठे आडनावे जाती तपशील पृ.२ | अनाम | सामाजिक इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२४ | रास्तल बेगमपूर जैन कैफि.पृ.१ | अनाम | सामाजिक इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२४ | अरहाडेश्वर कैफि.पृ.१ | अनाम | लोककथा | मोडी | अपूर्ण |
| १२४ | पांडवांचा अज्ञातवास | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२४ | गोकर्ण महाबळेश्वर महात्म्य पृ.६० | अनाम | पुराण-कथा | मोडी | पूर्ण |
| १२४ | मायूर वर्मा कैफि.पृ.४२ | सुबय्या | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १२४ | तोळी देश कैफि.पृ.४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२४ | सुब्रह्मण्य कथा पृ.८ | अनाम | पुराण-कथा | मोडी | पूर्ण |
| १२५ | ऐतिहासिक पत्रे ६ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १२६ | ऐतिहासिक पत्रे १९ | Shou Fate Bhale<br>Balaji Rao<br>Madhav Rao | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १२७ | ऐतिहासिक पत्रे ४ | Balaji BajiRao<br>Madhav Rao<br>Trimbak Rao<br>Vishwanath | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२८ | ऐतिहासिक पत्रे ७ | संभाजीराजे छत्रपती<br>माधवराव,घोरपडे<br>बळवंतराव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १२९ | ऐतिहासिक पत्रे २ | बंगलयाचमा नायडू<br>कुमार इचम्मा नायडू | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३० | ऐतिहासिक पत्रे १३ | अबदुल अलीखान<br>रामराव,शंकरराव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३१ | ऐतिहासिक पत्रे १ | रामराव शांताराव | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३२ | ऐतिहासिक पत्रे ४२ | माधवराव बल्लाळ<br>बाळाजीराव,बाजीराव<br>मुरारराव घोरपडे,टिपू | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | तिरुपती उत्सव पृ.१ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | सूर्यनारायणस्वामी वगैरे पृ.३ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | तिरुपतीचे राजे | अनाम | इतिहास | मोडी | अपूण |
| १३३ | वेंकटरमणस्वामीस डकेर दिपेचे राजे पृ.१-२० | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |

| | ग्रंथनाम | कवी/लेखक | विषय | लिपी | पूर्ण/अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|
| १३३ | तिरुमले देवस्थान नित्यकर्म पृ.१४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | मूर्तीचा तपशील | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | तिरुमलाई तालुका उत्सव पृ.४ | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | तिरुमलाई तालुका उत्सव पृ.७-२० | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | वेंकटेश चरित्र पृ.१४६ | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | तिरुमल पर्वत कैफि. जाणाची वाट पृ.८ | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १३३ | तिरुमल निवेशन मंटप तपशील | अनाम | इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | तिरुमल पर्वत भाग ६ | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | वेंकटेश वृत्तान्त पृ.४२ | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | व्यवहारिक माहिती संवत्सर नामें | अनाम | संकीर्ण/जनरल | मोडी | अपूर्ण |
| १३३ | वेंकटेश वृत्तान्त पृ.३-४४ | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३३ | श्री वेंकटेश स्वामी कैफि.१४ | अनाम | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३४ | ऐतिहासिक पत्रे १२ | घोरपडे | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३५ | ऐतिहासिक पत्रे ९ | भोसले, पेशवा | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३६ | ऐतिहासिक पत्रे ८ | हरिराय | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३७ | ऐतिहासिक पत्रे ९ | टिपू, बाळाजी बाजीराव, पूर्णिया इ. | पुराण-इतिहास | मोडी | अपूर्ण |
| १३८ | ऐतिहासिक पत्रे– पत्रसंख्या ३२ | माधवराव बल्लाळ अंबाजी, बाळूराव | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १३९ | ऐतिहासिक पत्रे– पत्रसंख्या ६४ | सुभेदार | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १४० | ऐतिहासिक पत्रे– पत्रसंख्या १९ | सुभेदार | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १४१ | भक्तमाला | अनाम | पुराण | देवनागरी | पूर्ण |
| १४२ | मेकिंसी म्यानसक्रपट्स vol I | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १४३ | मेकिंसी म्यानसक्रपट्स vol II | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १४४ | मेकिंसी म्यानसक्रपट्स vol III | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १४५ | मेकिंसी म्यानसक्रपट्स vol IV | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १४६ | मेकिंसी म्यानसक्रपट्स vol V | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १४७ | कैफियत फर्मानास | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १४८ | कैफियता | अनाम | इतिहास | मोडी | पूर्ण |
| १४९ | हिंदुमताचे सणवार | अनाम | ? | | |
| १५० | चंद्रगुप्त मौरिय चरित्र व वेताळ पंचविशी | अनाम | कथा | मोडी | पूर्ण |
| १५१ | Judgements Tanjore Mudvitha saba | Court-Records | Records | | |

| पूर्ण/ अपूर्ण |
|---|
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| पूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| अपूर्ण |
| र्ण |
| र्ण |
| र्ण |
| र्ण |

## मद्रासची मराठी हस्तलिखिते

...यापूर्वी आम्ही 'त्रिवेंद्रमची मराठी हस्तलिखिते' या शीर्षकाची एक सूची वाचकांच्या हाती ठेवलेली आहे आणि आज 'मद्रासची मराठी हस्तलिखिते' ही दुसरी वर्णनात्मक सूची अभ्यासकांना उपलब्ध करून देत आहोत. सूची हे साधन आहे, साध्य नव्हे याची आम्हाला जाणीव आहे; परंतु हे साधन हाती आल्याखेरीज पुढील वाटचाल योग्यरीतीने करणेही शक्य नसते... एखाददुसरा अपवाद वगळता या सूचीत नोंदलेली हस्तलिखिते इतिहास व वाङ्मय क्षेत्रातील अभ्यासकांनी अद्याप न पाहिलेलीच आहेत. त्यांच्या परिशीलनाने या दोन्ही अभ्यासक्षेत्रांवर नवा प्रकाश पडण्यास बरेच साह्य होणार आहे.

ज्ञानाचे, नव्या माहितीचे पत्ते माहीत होणे ही संशोधनाच्या, अध्ययनाच्या क्षेत्रातील अगदी प्राथमिक परंतु नितांत गरजेची पायरी आहे. महाराष्ट्रापासून आता दूर, परंतु दोन-एकशे वर्षांपूर्वी खूपच जवळ असलेल्या दक्षिण कडील प्रदेशातील ज्ञानाच्या साधनांचे पत्ते मराठी अभ्यासकांपर्यंत पोचविण्याचे फार महत्त्वाचे काम ही सूची साध्य करणार आहे.

एकोणिसाव्या शतकात साऱ्या भारतभर पसरलेल्या इंग्रज शासकीय अधिकाऱ्यांची ज्ञानपिपासा आणि त्यासाठी अपार कष्ट घेण्याची तयारी कौतुकास्पद होती. या जिज्ञासेपोटीच इथला इतिहास, भूगोल, भाषा, साहित्य, विज्ञान, तत्त्वज्ञान आदी विषयांचे ज्ञान त्यांनी करून घेतले. या विषयांवरील हस्तलिखिते मिळविली किंवा त्यांच्या प्रती तयार करवून घेतल्या. टिपणे काढली. त्यांचा मोठा संग्रह केला. मद्रासच्या प्रस्तुत ग्रंथालयातील हस्तलिखितांचा प्रचंड संग्रह सुद्धा कर्नल कॉलिन मेकेन्झी, डॉ. लेडन आणि सी. पी. ब्राऊन यांच्या परिश्रमांचे फलित आहे. काही ताम्रपट, शिलालेख आणि कैफियती यांचीही उपलब्धी त्यांच्या शोधयात्रेत झाली. त्यांचाही संग्रह येथे करण्यात आला आहे.

**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३ महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई - ४००००१.